॥ अथ श्रीप्राकृत दासविजय ग्रंथ प्रारंभः ॥



॥ श्रीमन्महागणाधिपतये नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरु दत्तात्रयायनमः ॥ श्रीगुरुनाथाय नमः ॥ श्रीरवळेशाय नमः ॥ ॐ नमो रकार ब्रह्मरूपाय ॥ वकार विष्णुजगन्मयं ॥ ळकारं त्र्यंबकाय ॥ तन्नमामिकृतेश्वरम् ॥ ॥ १ ॥ निर्गुण निरुपम निर्विकार ॥ निगमागमअगोचर ॥ निष्कर्मीकर्मी स्वधर्माचार ॥ नित्यानंद भक्तानुग्रहकारक ॥ २ ॥ रजतमसत्व बुद्धीच्या लहरी ॥ एकत्र मिनल्या विधिशिवहरी ॥ नवविधान जामदग्नि रळावतारी ॥ चिद्रलगिरी शोभला ॥ ३ ॥ जगज्जनकजगदीश्वर ॥ जगव्यापक जगदाकार ॥ जंगम स्थावरादि नरसुरवर ॥ साष्टांगेसी वंदिले ॥ ४ ॥ जन्मांतरवासिया जगविहारा ॥ जांबुनद जगनग हे मीं अलंकारा ॥ जंघजानु भुजंगम आकारा ॥ अनाथनाथा दीनबंधू ॥ ५ ॥ सप्तद्वीपामाजी जंबुद्वीपजाणे ॥ नवखंडी भरतखंड श्रेष्ठपणें ॥ रामक्षेत्रीं दंडकारण्यें ॥ अतिविस्तीर्ण साजिरें ॥ ६ ॥ भरतखंडाग्रीं प्रसिद्धकरविरीं ॥ पंचगंगाउत्तरतीरीं ॥ चिद्रलागिरी मंदिरीं ॥ दक्षिणदीप लाविला ॥ ७ ॥ अकारादि क्षकारांत ॥ वर्णमंत्रान्वय मूर्तिमंत ॥ नवनाथवर नवविधान नवांकित ॥ नवचक्रेश्वर वंदिला ॥ ८ ॥ नवद्वय भैरवी चक्राधिपा ॥ नवाग्नि अंतभैरवरूपा ॥ नमकचमकादि रुद्रजपा अजपा ॥ नवजलजवर्णा अतसिकुसुमा ॥ ९ ॥ विशाळाक्षा विशाळ ह्दया ॥ विश्वतोमुखा विश्वोदया ॥ विमळांबुजकर मंडितवलया विश्वासफल विनायका ॥ १० ॥ जयजय मंगळकारका ॥ जयमंगळजननी भूषित पादुका ॥ मंगळारंभी मंगलदायका ॥ मंगळमूर्ति शुभ मंगळा ॥ ११ ॥ जयागणाधीशा गणनाथा ॥ गजवदन विचिंत एकदंता ॥ गणगंधर्वगंधर्वार्चिता गहन निगमाअगम्य ॥ १२ ॥ मंगळजननी धरितां शिरीं ॥ शेषें चिंतिलें ह्दयांतरीं ॥ निर्विघ्न करोनी फणाग्रीं ॥ पुष्पप्राय धरिली ॥ १३ ॥ गणपती आधीं वंदोन ॥ तयानंतरें त्रि

लोचन ॥ घोर करूनी त्रिपुरहनन ॥ अपर्णारमण विजयी झाला ॥ १४ ॥ सृष्टी सृजितां चतुरानन ॥ आरंभि-
स्मरोन गजवदन ॥ उत्पत्ति करितो कमळासन ॥ विश्वजननीजनक तूं जनी ॥ १५॥ स्तवोनी आधीं विघ्नेश्वर ॥
पार्वती घेवोनी तीव्रभार ॥ चंडमुंडादि ह्मैषासुर ॥ घोर संग्रामीं वधियेला ॥ १६ ॥ कश्यपादिक ऋषेश्वर श्रेष्ठ ॥
शापानुग्रहबळवरिष्ट ॥ विघ्नेश्वर स्मरतां महदारिष्ट ॥ तपाचरणीं नबाधी ॥ १७ ॥ बिल्वमंगल विभांडिक च्यवन
॥ यक्षकिन्नर सिद्धचारण ॥ प्रथमारंभीं तुझेस्तवोनीचरण ॥ तपाचरणीं जय पावले ॥ १८ ॥ आधीं गणेशअना
दिशक्ति ॥ अनादिनामीं व्यक्ताव्यक्तीं ॥ मदाघूर्णिताक्ष मंगळमूर्ती ॥ मराळवहन माळिकाधर ॥ १९ ॥ कृतयुग
त्रेतादि द्वापारीं ॥ कलियुगादि युगें चत्वारीं ॥ निर्विघ्न करोनी चराचरीं ॥ विश्वविहरींमिरविसी ॥ २० ॥ ऐसा
अनादि महागणपति ॥ केदारविजयीं स्तविलाभक्तीं ॥ तयानंतर सिद्धसरस्वती ॥ वाग्विलासिनी वंदिली ॥२१॥
आतां वंदू अनादिशक्ति ॥ जे विराटपुरुषाची वाग्विभूती ॥ जे जगत्रय रंगली भागीरथी ॥ ते सिद्धसरस्वतीसी
प्रणिपात ॥ २२ ॥ तव पूणकृपें रसचत्वारीं ॥ वाग्विलास केला ऋषीं मुनिवरीं ॥ वेदव्यासांबुधीच्या लहरी ॥ के-
दारविजयतटणीं पातल्या ॥ २३ ॥ व्यास शब्द हे नवरत्न खचित ॥ तवहस्तचपळता अखंड लिखित ॥ शब्दा-
र्थ गोविता सत्यवतीसुत ॥ निरसोनी पदार्थी लिहीसी ॥ २४ ॥ तैसेची माझिये ह्दयकमळीं ॥ ॐकार बीजा-
क्षरीच्या ओळी ॥ लिहिवी ब्रह्मास्मि सोहंमेळीं ॥ संतमराळीं सेवावया ॥ २५ ॥ कृपानुग्रह हे सदाशिवे ॥ श्रीह
रीनारायण देवाधिदेवे ॥ योगियांचे धनतल्लठेवे ॥ मनोहर मंदिरीं ठेविले ॥ २६ ॥ प्रतिसृष्टिकर्ता दुसरा जाण ॥
विश्वामित्र कर्ता विश्वतपोधन ॥ समर्थ वरशापानुग्रहकारण ॥ हरिश्चंद्रादि राज्यीं स्थापिले ॥ २७ छळितां

नचळतां हरिश्चंद्र ॥ राज्यीं स्थापिला करूनी समुद्र ॥ असा विश्वामित्र प्रळयरुद्र ॥ हरिनारायण अवतरला ॥ २८ ॥ भक्तानुग्रहार्था कारणें ॥ चित्समुद्रीं तपाचरणें ॥ केलें भक्षोनी पारिभद्रपर्णें ॥ द्वादश वर्षें अडी ॥ २९ ॥ तेथोनी होतां आकाशवाणी ॥ जावें भुवनेश्वरी सन्निधानीं ॥ भिल्लाटग्राम प्रख्यात जनीं ॥ तेथें जगद्गुरु पातले ॥ ३० ॥ द्वादशाब्दीं कृष्णातटीं ॥ दक्षिणवाहिनी भूतळवटीं ॥ तपश्चर्येची हातवटी ॥ ऐसी नकरवे ऋषीसुरवरां ॥ ३१ ॥ श्रीपाद श्रीवल्लभमुनी भिल्लाटग्रामीं तपाचरणीं ॥ प्रगटले तैसेची वासरमणी ॥ श्रीहरिनारायण अवतरला ॥ ३२ ॥ लाहोनी भुवनेश्वरीचें वरदवचन ॥ कपित्थ्य नगरासी हरिनारायण ॥ येवोनी वंदिला लोटांगणें ॥ श्री सिद्धराज आवडीं ॥ ३३ ॥ दंडकारण्याचे शेजारीं ॥ प्राकृत नाम कविटें कपित्थ्यनगरी ॥ तीव्र तपकरोनी नरहरी ॥ द्वादशाब्द संवत्सरें ॥ ३४ ॥ जितेंद्रिय निराहारी ॥ सप्तशतीस बीजाक्षरीं ॥ पठण करितां दिवाशर्वरीं ॥ सिद्धेश्वरी प्रसन्न ॥ ३५ ॥ हें पाहोनिया परमभक्ती ॥ मानस तुळजापुर भगवती ॥ प्रगटोनी सुप्रसन्न चित्तीं ॥ घेई ह्मणे वरदान ॥ ३६ ॥ पूर्ण होईल कामना ॥ जे वर्तत असे तव मना ॥ तें मी देईन वरदसुमना ॥ श्रीहरिनारायणा नेत्र उघडी ॥ ३७ ॥ तुझें पाहूनि तपाचरण ॥ संतोषलें माझें मन ॥ द्यावयालागीं वरदान ॥ बिराड सिद्धाश्रमीं प्रगटलें ॥ ३८ ॥ परिसोनी सिद्धलक्ष्मीची वाणी ॥ वंदिली भावें लोटांगणीं ॥ लक्षिली जैसी सुधाकिरणीं ॥ राका विस्तीर्ण साजिरी ॥ ३९ ॥ ह्मणे अंबे मजलागीं कांहीं ॥ विषय पदार्थीं इच्छा नाहीं ॥ अखंडित वसावें माझे ल्हदयीं ॥ जिव्हाग्रीं अक्षयीं असावें ॥ ४० ॥ तवचरणारविंदीं अखंडित ॥ चित्त असावें नवरसभरित ॥ अंतीं देई सायोज्य पदातें ॥ ब्रह्मकल्पांतींहीचळोन ॥ ४१ ॥ तथास्तु ह्मणोनी अनादिशक्ति ॥ तें

अदृश्य झाली श्रीभगवती ॥ जैसा तारावया त्रिजगतीं जेवीं गभस्ती उगवला ॥ ४२ ॥ लाहोनी ऐसी सिद्ध महिमा ॥ जगद्व्यापक अतर्का निगमा ॥ भक्तकामकल्पद्रुम-कुसुमा ॥ सत्समागमीं अक्षय ॥ ४३ ॥ जगदानंद आनंद लहरी ॥ जगद्गुरु मन मोहरी ॥ तारावया पृथ्वीवरी ॥ भक्तानुग्रहार्थी फिरतसे ॥ ४४ ॥ करुपरेद्र कृष्णातटीं ॥ औदुंबर कल्पतरु तळवटींश्रेष्ठ गुरु दत्तात्रय धूर्जटी ॥ साष्टांगेसी वंदिला ॥ ४५ ॥ श्रीपाद श्रीवल्लभ ॥ जगद्गुरु अभेद भक्तांसुलभ ॥ विषयतेसी दुर्लभ ॥ ब्रह्मादिकांसी जो कळेना ॥ ४६ ॥ श्रीगुरुमहिमा अपार गहन ॥ वर्णू न शके सहस्रवदन ॥ तेथें यदर्थी प्राकृत वचन ॥ वर्णितां सर्वथा नवर्णवे ॥ ४७ ॥ तथापि श्रीगुरुनाथ वरदोत्तरें ॥ पंगू लंघिजेति गिरिवरें ॥ मुका सांगे पुराण विस्तारें ॥ हें प्रसिद्ध महिमा गुरुचरित्रीं ॥ ४८ ॥ ऐसा गुरुनाथ मनमोहरी ॥ गीर्वाण शब्द सुमनोहरी ॥ केदार विजय ग्रंथ जोहरी ॥ हरिखे मोहरी कृपाघन ॥ ॥ ४९ ॥ नमोनी यावरी सभासागर ॥ जेथें जन्मला चातुर्य सुधाकर ॥ चतुःषष्ठीं भाष्य व्याकर्णांबर ॥ प्रश्नोत्तर इंदु प्रकाशवी ॥ ५० ॥ चातुर्य चंद्रकळा चतुःषष्टीं ॥ अखंड गुरुनाथ कृपादृष्टी ॥ ह्मणोनी भविष्य वदला शतकोटी ॥ श्री सदाशिवें वांटिलें त्रिजगा ॥ ५१ ॥ आतां वंदू ब्रह्मवृंद ॥ जयांसी वंदिता परमानंद ॥ ह्मणोनी पूर्णब्रह्मपद्मीं मकरंद ॥ तत्वानुभवी निजानंदें सेविती ॥ ५२ ॥ ज्याचे भक्तीचे सुरवाडे ॥ विधीसी गणिजेना पहिलें कुवाडें ॥ ह्मैशा वदनीं अवघडे ॥ जयानीं वेद घडघड बोलविला ॥ ५३ ॥ ऐसे विवेक सिंधूचे पोहणार ॥ एकनाथ निवृत्ति ज्ञानेश्वर ॥ सोपान मुक्ताक्षी मुक्तेश्वर ॥ ग्रंथारंभीं वंदिले ॥ ५४ ॥ चोखामेळा रोहिदास ॥ गोरा कुंभार श्रीरंगनाथ रामदास ॥ ज्यांचे हस्तें घे देव ग्रास ॥ तो नामदेव तुकोबा नमियेला ॥ ५५ ॥ अभेद भ-

क्त अनंतभक्त ॥ धीटपाठवरदी समर्थ ॥ यातेंही दीर्घ प्रणिपात ॥ सद्गुरुरूप हे ह्मणोनिया ॥ ५६ ॥ सर्व कवेंद्रां माझी मुगुटमणी ॥ कीं जांबुनद जगनगजैसे सुवर्णी ॥ तैसे लोलिंबराज मुकुंदराज दोन्ही ॥ सद्भक्तांसी वंदिलें ॥ ५७ ॥ श्रीवेदाब्धि मथुनी बादरायणें ॥ नवनीत काढिलीं हीं पुराणें ॥ कीं व्यासवाणि हें कांचन ॥ अष्टादश पुराण लेखन गणपतीं ॥ ५८ ॥ कीं ते विचित्र रत्नीं व्यासवाणी ॥ प्रकाश ब्रह्मोत्तर भविष्य पुराणीं ॥ करवीर कांडाची शिराणी ॥ काशीखंडीं अपूर्व ॥ ५९ ॥ ब्रह्मोत्तरखंड ब्रह्मांडपुराण ॥ हीं पांच अनुक्रमीचें संबोधन॥ कीं ते पंचतत्वीं चिद्रत्नखुण ॥ हरिमति कोंदणीं जडियेली ॥ ६० ॥ ऐशिया प्रकाशाचा तरणी ॥ उगवला हो जिये पासुनी ॥ ती नमियेली जनकजननी ॥ ग्रंथारंभी साष्टांगीं ॥ ६१ ॥ केलिया पुत्रें गयावर्जन॥ सांग करितां मा-घस्नान ॥ मुक्तहोय पितृव्य ऋण ॥ एकदां करितां साक्षेपें ॥ ६२ ॥ परी मातऋणा पासून मुक्त ॥ नहोय ऐसें शास्त्र संमत ॥ ह्मणोनी ग्रंथारंभीं सद्यचित्त ॥ मातचरण वंदिले प्रीतीं ॥ ६३ ॥ न मातुःपरदैवत जाण ॥ ऐसें वदे शास्त्रींचें वचन ॥ हे जाणती विजनीचे विद्वज्जन ॥ सुजाण व्युत्पन्न समदर्शनी ॥ ६४ ॥ पुंडरीकादि पितृव्य भजनीं ॥ निमग्न झाले भीमातटिनी ॥ ज्याचे भक्तीस्तव उभा समचरणीं ॥ पांडुरंग अठ्ठावीस युगें अद्यापि ॥ ६५ ॥ पितृभजना वांचोनि कांहीं ॥ भगवत्प्राप्तीचा लेश नाहीं ॥ ज्याचेनि आकारला नरदेही ॥ ह्मणोनी हे गुरुकृपा लाधली ॥ ६६ ॥ जैसी गंगा अमळ जीवनीं ॥ संताप निववी तृषा हरुनी ॥ तैसी अंगापूरकर देशमु-खरमणी ॥ गोपाळराव मृदुभाषणीं मम पिता ॥ ६७ ॥ उत्सवनाम भारद्वाज गोत्री ॥ तयाची यमुना पुत्री ॥ ते वरियेली वसिष्ट गोत्री ॥ अंगापूरकर गोपाळरायें ॥ ६८ ॥ वशिष्टऋषि कुळभूषण ॥ गोपाळराव जनक सु-

जाण ॥ यमुना जननी पासोनि जननें ॥ हरि नामाभिधान जन्मला ॥ ६९ ॥ साक्षात यमुनेचा अवतार ॥ धरि-
लाच वाटे सूक्ष्मविचार ॥ कीं हा केदारविजय कवनार्थी सार ॥ जन्मासी केदारें घातलें ॥ ७० ॥ कीं उद्योग
भीष्मपर्व ॥ करविलीं सांक्षेपें अपूर्व ॥ कीं संतपदीं व्हावया अर्ह ॥ ह्मणोनी हरिमति अंकिली ॥ ७१ ॥ सत्समाग-
माची चरणधूळी ॥ अवचट स्पर्शली ममकपाळीं ॥ कीं पूर्वदत्तें फळासी आली ॥ श्रीगुरुनाथचरणवंदितां ॥ ७२ ॥
आमुचें कुळदैवत असे समर्थ ॥ त्रिभुवनीचें जयासी सामर्थ्य ॥ सर्वांठायीं श्रीगुरुनाथ ॥ सांप्रदायीं अवतरला ॥
॥ ७३ ॥ मूळ श्रीगुरुनाथ सदानंद ॥ चतुःशास्त्री जितेंद्रियशुद्ध ॥ काशींत प्रसिद्ध सच्चिदानंद ॥ जो अपरोक्ष ज्ञा-
नी ब्रह्मवेत्ता ॥ ७४ ॥ सच्चिदानंदापासोनी ब्रह्मारण्य ॥ अवतार धरिला नारायण ॥ नारायण भट्टींचें प्राधान्य ॥
चतुः शास्त्रीं अग्रगणी जे ॥ ७५ ॥ नारदाचार्य तयापासोनि ॥ सिद्धांत कौमुदीचा मथितार्थ मथनीं ॥ आनंदा
चार्य व्याकर्णी ॥ काशी पट्टणीं प्रसिद्ध जो ॥ ७६ ॥ सहजानंदाचार्य सत्तम ॥ पातले दक्षिणेसी तीर्थोत्तम ॥ पा-
होनी राहिले जाण निवृत्ति संगम ॥ हरिनारायण तेथेंचि पातला ॥ ७७ ॥ जगद्गुरु प्रतापसूर्य ॥ वंदोनी सहजा-
नंदाचार्य ॥ हरिनारायण गुणगांभीर्य ॥ अनुग्रहस्था तपाचरला ॥ ७८ ॥ सदाशिव नंदाचार्य निधान ॥ ऐसे न-
वांकित नवनाथमंडण ॥ यांनीं नवविधि अर्चन विधिप्रकरण ॥ उपदेशरस कर्णी भरिला ॥ ७९ ॥ कीं हरी चंद-
नागर कठिणपणीं ॥ उगळुनी आत्मानुभव सहाणीं ॥ सद्भक्तीसी सुगंधसुमनीं ॥ अभेद ग्रंथारंभीं बुध पूजिले ॥
॥ ८० ॥ ग्रंथकर्ते सहजानंद ॥ पूर्णानंद रामानंद ॥ ज्यांचे ऐकोनी प्रबंध ॥ तत्र तिष्ठामि नारद मुने ॥ ८१ ॥
ऐसें हरि भक्तीं करितां स्तवन ॥ संतोषले विद्वज्जन ॥ ह्मणती केदारविजय आख्यान ॥ विस्तारोनी सांगपां ॥ ८२ ॥

ब्रह्मांडपुराणार्थे काशीखंडीं ॥ भविष्योत्तर पुराणेसी करवीर कांडीं ॥ तेचि कथा ब्रह्मोत्तरखंडांत केदारखंडीं ॥ श्री केदारविजयीं तेचि विस्तारीं ॥ ८३ ॥ मथुरावृंदावनीं तुजला ॥ श्रीकेदार कथार्थ कथिला ॥ साक्षात्कारही त्रिवार झाला ॥ केदारविजय कथार्थी ॥ ८४ ॥ तें त्वां नमनोनिया मनें ॥ हरिद्वारतीर्था करितां गमनें ॥ तेथेंही पुनरपि आगमनें ॥ होउनि स्वयें केदार बोधी ॥ ८५ ॥ जाग्रती स्वप्न सुषुप्तींत ॥ बोधिलें हें न धरिसी चित्तांत ॥ श्रमें फिरसी विषयीं स्वार्थ ॥ विलंबी संवत्सरापर्यंत ॥ ८६ ॥ सुभानुसंवत्सरा पासोनी ॥ विलंबी पर्यंत न मानिसी मनीं ॥ श्रीरत्नागिरिवरासी येवोनी ॥ नकरिसी कवनार्थ देवाच्या ॥ ८७ ॥ श्रमीं झालासि त्रिमास ॥ प्राण होतांचि कासाविस ॥ कृपाळू होउनि हस्तस्पर्शे ॥ श्रीगुरुनाथें श्रम हरिले ॥ ८८ ॥ सज्जनासि सांगोनि केदारें ॥ आणोनि दिधले कागद कोरे ॥ नकार शब्द वदोंनकोरे ॥ हरी संदेह ओंकार सकळांचे ॥ ८९ ॥ हरिखें परिसोनि वरदवचन ॥ ह्रदयीं प्रकाश जहाला पूर्ण ॥ केदारविजय नवनिधान ॥ ज्ञानांजनीं लाधला ॥ ९० ॥ आतां श्रोते मुनि गुणिजन ॥ स्वस्थ बैसोनि सावधान ॥ वक्तत्वाचें अवधान ॥ देउनि परिसावा केदारविजय ॥ ९१ ॥ बद्रिकाश्रमीं हे कथा देखा ॥ सूत सांगे शौनका ॥ वैशंपायन कुरुनायका ॥ ईश्वरवदतसे षण्मुखा पंपासरोवरीं ॥ ९२ ॥ जामदग्नि वदे पारेश्वरा ॥ पारगा वरुणानदीतीरा ॥ दक्ष यज्ञांतीं हरिद्वारा ॥ कपिलमुनिवरादि ऋषिवर्यें ॥ ९३ ॥ घटोद्भव सांगे लोपामुद्रेसी ॥ व्यास वदत श्रीशुकासी ॥ तें शुकाचार्य प्रश्नोत्तरासी ॥ करिता झाला आदरें ॥ ९४ ॥ सूत ह्मणे शौनक मुनिवरा ॥ दक्षिणयात्रे कलशकुमारा ॥ कारण काय ह्मणसी चतुरा ॥ सोडोनि वारणसी काशीक्षेत्र ॥ ९५ ॥ तें जमदग्नि ह्मणे शौनकासी ॥ चौथी मोक्षपुरी काशी ॥ ते त्यजोनिया अग-

स्ति ऋषी ॥ दक्षिणेसी गेला किंनिमित्य ॥ ९६ ॥ स्वर्गीं दुर्लभ देवादिकां ॥ विष्णुपादोद्भव त्र्यंबका ॥ भगीरथ प्रयत्नें काशीसी देखा ॥ जगदोत्धारका पातला ॥ ९७ ॥ पृथ्वी नवखंडशरीरी ॥ दहावें खंड कायाशिर काशीपुरी ॥ सत्वरजतम संगम करी ॥ गंगा यमुना सरस्वती ॥ ९८ ॥ अमरगण इच्छिती मरण ॥ परी ते न पवती काशीपट्टण ॥ सायोज्य मोक्षींचें निधान ॥ काशी स्थान हें सांगती ॥ ९९ ॥ ऐसें ऐकोनि घटनंदन ॥ जाणत असोनि मोक्षस्थान ॥ त्यागोनि गेला तो दक्षिणे ॥ काय कारण सांगपां ॥ १०० ॥ रक्तबीज रक्तभोजन ॥ ह्मीषासुरादि रत्नासुरदारुण ॥ करवीर कोल्हाळाख्य गण ॥ हे कवणा हस्तीं वधावले ॥ १ ॥ रक्त भोजाचा रक्तबिंदू ॥ भूमीसि पडतां प्रतापसिंधू ॥ असंख्य उद्भवती जेंवी इंदु ॥ जळीं जळबिंदू ज्यापरी ॥ २ ॥ हे षड्रिपु कवणा करीं ॥ मृत्युपावले घोर समरीं ॥ कवण केला राज्याधिकारी ॥ करवीरीं आणि रत्नागिरितें ॥ ३ ॥ हें मज करीं समूळ ज्ञान ॥ केदारविजयींचें रसायण ॥ धन्वंतरी या होऊन ॥ अर्पीं कृपेनें भवरोगिया ॥ ४ ॥ ऐकोनि जमदाग्नी याचें वचन ॥ सूत शौनकासि ऐका ह्मणे ॥ कलशोद्भवाचा नंदन ॥ शिष्य विंध्याद्रि जाणतसा ॥ ५ ॥ ध्यावया बद्रिकेदार दर्शन ॥ विंध्याचळ नित्य ये घोरगर्जन ॥ तों मार्गीं भेटला विधिनंदन ॥ तयातें अगस्ति शिष्य भेटला ॥ ६ ॥ विंध्याद्रि वदे नारदमुनी ॥ तुह्मीं परम अपरोक्षज्ञानी ॥ दीर्घायु दीर्घशरीर मजहुनी ॥ कवण तो त्रिभुवनीं सांगपां ॥ ७ ॥ परिसोनि पर्वताचें आग्रह वचन ॥ नारद ह्मणे सुहास्य वदन ॥ हिमालय लक्षयोजन ॥ स्वर्गापर्यंत मस्तक गमतसे ॥ ८ ॥ चंद्राचळ द्विलक्ष गणना ॥ त्वदयीं न कीजे दीर्घाभिमाना ॥ ईश्वर भांडारगृहीं-रत्ना ॥ गणित कवणा न करवे ॥ ९ ॥ परिसोनि नारदमुखींची वाणी ॥ संतापला अंतःकरणीं ॥ पहिलें हिमा-

ल्य बोलिला हेळुनी ॥ तेणेंही अंतरीं पोळला ॥ १० ॥ संतापोनि हृदयसंपुटीं ॥ विंध्याचळ पातला नर्मदातटीं ॥
उभा राहिला ब्रह्मांडघटीं ॥ दीर्घशरीरीं वाढतसे ॥ ११ ॥ चंद्राचळाहुनि द्विगुणगणित ॥ उंच वाढला अंबरांत ॥
अडथळिलें सूर्यरथातें ॥ स्थीर केलें षण्मास जाणा ॥ १२ ॥ कीं मेरूची प्रदक्षिणा ॥ अवकाश नदेखे अर्धक्षणा
॥ यास्तव माध्यान्हीं विश्राम पेणें ॥ अभिजित सुमुहूर्त निर्मिला ॥ १३ ॥ षण्मास झाले ऐशियापरी ॥ दक्षिण-
दिशा अंधकारी ॥ व्यापिले जन पीडाकारी ॥ जन व्यापारी आकर्षिले ॥ १४ ॥ मिमांस व्याकरण तर्क भाष्य ॥
साचार अष्टादशींचें रहस्य ॥ स्वाहा स्वधाकारीं पडलें आलस्य ॥ स्नानसंध्यादिक राहिल्या ॥ १५ ॥ जपतपादि
कर्मं बुडालीं ॥ वौषट्कारें पात्रें भंगिलीं ॥ कुकर्म मार्गी भक्ति जडली ॥ घातपातीं सुरवाडली वासना ॥ १६ ॥
तैं श्रीलक्ष्मी करवीरवासिनी ॥ ब्रह्मवरदें पुत्रराज्यासनीं ॥ करवीरीं स्थापोनि तेचिक्षणीं ॥ बद्रिकाश्रमासी श्री
गेली ॥ १७ ॥ भविष्य जाणोनि लक्ष्मीनें ॥ बद्रिकाश्रमासि केलें प्रयाण ॥ असो अस्ताचळींच्या पिशितासनें ॥
थोर उत्पात मांडिला ॥ १८ ॥ सप्तसिंधूंचे पैलतीरीं ॥ रक्तबीजाची श्रोणिता पुरी ॥ तोचि रक्ताक्ष निशाचर प-
रिवारीं ॥ उदयाचळीं युद्ध अद्यापी ॥ १९ ॥ शतमुखादि सहस्रमुख ॥ श्रोणितापुरींचे नरनायक ॥ रक्ताक्षबीज
वंशधर मुख्य ॥ सैन्यसमुदायीं क्षोभला ॥ १२० ॥ असो उदयाचळींचे निशाचर ॥ यांनीं घेउनि राक्षसभार ॥
युद्धकरावया घोरांदर ॥ करवीरपुर वेढिलें ॥ २१ ॥ रक्तबीज रक्तभोजन ॥ करवीर कोल्हासुर दारुण ॥ देविला-
स्य रत्नासुर घनगर्जन ॥ असुरदळभार सिद्ध झाले ॥ २२ असुरचमू पृथकाकार ॥ होउनि घेतलें श्रीकरवीर ॥
भोंवते ठेविले असुरभार ॥ मार्ग रोधिले आमुचे ॥ २३ ॥ रक्तबीज कोल्हासुरादि करवीर त्रिवर्गी आक्रमिलें को-

ल्हापुर ॥ रक्तभोजन रत्नासुर ॥ रत्नागिरिवरी ठेविला ॥ २४ ॥ पराशराचिये शेजारीं ॥ ह्मैसासुर ठेविला दळ-
भारीं ॥ देविलाख्य देवाळे नगरीं ॥ गिरिजापुरीं गृध्रासुर ठेविला ॥ २५ ॥ शय्याद्रिचे पूर्वभागीं ॥ सिंधुराज सिं-
दुर अंगीं ॥ असो दैत्यसमुदायेसीं अंगप्रत्यंगीं ॥ श्री करवीराचे ठेविले ॥ २६ ॥ भार्गवराम हे वसुंधरी ॥ एक
वीसवेळ निर्वीरकरी ॥ ब्राह्मणा करुनि राज्याधिकारी ॥ स्वयें सागर सारोनि राहिला पश्चिमे ॥ २७ ॥ शौनक
ह्मणे सूतातें ॥ सिंधू सारावया कारण किमर्थ ॥ तो वदावा संज्ञार्थ ॥ ऐकोनि सूतह्मणे शौनकमुनी ॥ २८ ॥ क्षा
त्रधर्मीं रणपंडित ॥ कल्पांत भैरव रणदीक्षित ॥ निर्वैर करोनिया नवखंडांत ॥ ब्राह्मणातें समर्पी ॥ २९ ॥ ब्राह्म
णा देवोनि पृथ्वीदान ॥ तेथें न करावें आचमन ॥ ह्मणोनी पश्चिम समुद्रीं आगमन ॥ भृगुनंदनाचें होतसे ॥
॥ १३० ॥ तंव येरीकडे समुद्रतीरीं ॥ वाळवीचीं घरें सहस्रवरी ॥ भंगूनि सांडी सिंधुलहरी ॥ कित्येक दिवस
अविचारें ॥ ३१ ॥ वाळवी ह्मणे समुद्रासी ॥ तूं समर्थ ह्मणोनि कुटुंबेसीं ॥ वसावया पातलों तंहारिसी ॥ किंनि
मित्य सांगपां ॥ ३२ ॥ नीचाश्रय न करावा कोणी ॥ महदाश्रय कीजे अकिंचनीं ॥ हे मात ऐकोनि जुनाट पुरा
णीं ॥ वसों येथ आलों सायासीं ॥ ३३ ॥ महदाश्रयाची हे गती ॥ ऐसी असे कीं सरितापति ॥ सुवस्तु कुवस्तु संग्रह
करिती ॥ ते कवणेरिती सांगपां ॥ ३४ ॥ कुवस्तुमाजि आह्मीं अग्रगणी ॥ तूं तंव समुद्र प्रख्यात त्रिभुवनीं ॥
नामासारखी असावी करणी ॥ ते तव कीर्ति दिसेना ॥ ३५ ॥ वाळ विधवेसी सावित्री अभिधान ॥ नेत्रांधासी
कमळनयन ॥ अव्युत्पन्नातें बुध ह्मणे ॥ ही व्यर्थ महिमा नांवाची ॥ ३६ ॥ हुतांशें जाळितां विझवी वनीं ॥
जीवनाचे मंदिरा लाविला अग्नि ॥ तेथें कवण वर्जील हे समर्थ करणी ॥ माझिये नयनीं भासतसे ॥ ३७ ॥ प-

हा हो क्षमासमूह केवळ ॥ उपमा देती विश्व सकळ ॥ हें तों असो आतां शीघ्रकाळ ॥ कार्यासी येईन पैं तुझ्या
॥ ३८ ॥ तुह्मांसी नमीन प्राणांतीं ॥ हा निश्चय मानी सरितापति ॥ हें परिसोनि समुद्रें चित्तीं ॥ विचार लक्षि
त दीर्घदृष्टी ॥ ३९ ॥ व्यापक अणुरेणुच्या ठायीं ॥ ज्योति स्वरूप विश्वहृदयीं ॥ नांदे साक्ष सर्वांठायीं ॥ जेवीं
कुंभोदकीं सूर्यमंडळ ॥ १४० ॥ हें सिंधूनें विचारुनी मन कल्पनें ॥ उदीसीं दिधलें अभयवचन ॥ वाळवी राहि
ली निर्भयमनें ॥ तेथें वारुळ विस्तीर्ण वाढलें ॥ १४१ ॥ तया उदीचिया बेटांत ॥ पातला जमदग्निचा सुत ॥
चत्वारिविंशति योजनांत ॥ सिंधु सारावा बाणाग्रीं ॥ ४२ ॥ धनुष्य ठेउनि वारुळ बेटीं ॥ जपासी बैसला समुद्र
तटीं हें उदीनें पाहोनि दृष्टी ॥ धनुष्यातळवटीं रिघाल्या ॥ ४३ ॥ शतपदरांची धनुष्यगुणी ॥ त्यांतून एक
पदर राखोनि ॥ सर्व भक्षिले वाळवींनीं ॥ अलिप्तपणीं न कळतां ॥ ४४ ॥ असो अमोघ मंत्रयोजुनि ॥ बाणीं
भार्गवें धनु वोढीतां आकर्णी ॥ सीत पदर गेला तुटोनी ॥ तैंसमुद्र जीवनासी खळबळीला ॥ ४५ ॥ विश्व प्रळ-
यींचा सुटतां प्रभंजन ॥ कीं कल्पांतींचा हुताशन ॥ कीं सप्त पाताळ करावया दहन ॥ सहस्र नयन क्षोभला ॥
॥ ४६ ॥ कीं शिव कल्पांतीं वैश्वानर ॥ जाळील वाटे विश्व भांडार ॥ कड कडा कडती सप्तसागर ॥ भार्गव शर
अंगार वर्षती ॥ ४७ ॥ कीं अगस्ती पातला कृतांत स्वरूपी ॥ पुनरपी पातला शापादपी ॥ ऐसा समुद्र मन
संकल्पीं ॥ थर कंपीत जहाला ॥ ४८ ॥ वाळवीचा कृतोपकारी ॥ मीन झालों संसार सागरीं ॥ सीत असतें ज-
री शत पदरी ॥ भृगुपती संव्हारिता मजलागीं ॥ ४९ ॥ यालागीं थोर लहानपण ॥ हृदयीं न धरितां गर्वाभि
मान ॥ सर्वांभूतीं सम समान ॥ पूर्णपणें विलोकावें ॥ १५० ॥ असो भार्गव शरें समुद्र जीवन ॥ मागें सारिलें

दश योजन ॥ भार्गवाश्रमासि निर्माण ॥ भार्गव तेथेंचि राहिला ॥ ५१ ॥ हें प्रत्यक्ष लक्षित जन ॥ देखती ऐके
ती त्रिविध श्रवण ॥ असो संत गुणिजनीं करावें मनन ॥ सिंव्हावलोकनें आवडी ॥ ५२ ॥ विंध्याचळावरी मा-
ध्यान्हीं ॥ अस्ता पावला वासरमणी ॥ ह्मणोनि विघ्नें उठती दक्षिणायनीं ॥ राक्षसांचीं अपारें ॥ ५३ ॥ ऐसें पा-
होनि धरा देवी ॥ महाकल्पांत भाविला जीवीं ॥ गायन होउनि इंद्रा आघवी ॥ दुष्टाचरण मुखें वदतसे ॥५४॥
करवीर कोल्हासुर रक्त भोजन ॥ रत्ना सुरादि दैत्य दारुण ॥ घेउनि करवीराचें राज्यासन ॥ धर्म उत्थापन स
र्व केला ॥ ५५ ॥ विंध्याद्रि पर्वतीं दिवाकर ॥ अस्त पावतांचि अंधकार ॥ दक्षिणदिशा व्यापिली असुरें ॥ सुर
नर मुनी पळवीले ॥ ५६ ॥ पर पीडा वाढली परम प्रीति ॥ ज्यारण मारणीं उपजलि रती ॥ निंदा द्वेष हिंसक
दुरुक्ती ॥ राक्षसांची वाढली ॥ ५७ ॥ त्या दुष्ट नष्टाचरण भारें ॥ मातें न सोसवेचिगा क्षणभरें ॥ ऐसें ऐकोनियां
सुरेश्वरें ॥ वसुंधरेसि वदतसे ॥ ५८ ॥ महीसी वदे वज्रपाणी ॥ उदयास्तुच्या पित्याच्या पिशीताशनीं ॥ रक्तबी-
ज रत्नासुर तपाचरणीं ॥ दिव्य दहा शत सहस्रवर्षें वर्तले ॥ ५९ ॥ करवीर कोल्हासुररक्तभोजन ॥ या षड्गांचें
तप दारुण ॥ त्यांत करवीर कोल्हासुराचें जाण ॥ चतुर्युग सहस्र शत गणीतें ॥ ६० ॥ ऐकोनि नीलग्रीवाची
वाणी ॥ करवीर कोल्हासुर रत्नासुर तीनी ॥ वंदोनि भावें शूळपाणी ॥ अचळ नमनीं स्तवनीं नामियेला ॥६१॥
पंचाग्नि साधन निराहारी ॥ त्रिवर्ग तप आचरले खडतरीं ॥ तें पाहोनि मदनारी ॥ प्रसन्न होऊं पातला ॥ ६२ ॥
तुमचें पाहुनि तपश्चर्य ॥ मातें वाटलें अति आश्चर्य ॥ वरद वाक्याचा प्रताप सूर्य ॥ तवत्हृदयीं उजळावया पातलों
॥ ६३ ॥ ऐकोनि नीलग्रीवाची वाणी ॥ त्रिवर्ग वदती विनयपणीं ॥ वंदोनि भावें लोटांगणीं स्तुति रत्नीं पूजीती

॥ ६४ ॥ काम क्रोध षड्विकारीं ॥ बुडालों मोह अंधकारीं ॥ आहे आहे मदनारी ॥ तव चरणाधिकारी करावें ॥ ६५॥
अजिंक्य व्हावया त्रिभुवनीं ॥ युद्धींथारों न शकोत कोणी ॥ ब्रह्माविष्णु शूळपाणी ॥ युद्धा पातल्यासी पराभवे
॥ ६६ ॥ श्रमीहोऊनि रणांगणीं ॥ गुप्त देवीं रहावें स्वस्थानीं ॥ ऐसी ऐकोनी त्रिवर्गांची वाणी ॥ त्रैलोक्य नाथ
वदतसे ॥ ६७ ॥ कामाक्षाचे वरद वचनीं ॥ योगदंड दिधला कामाक्षा लागोनीं ॥ तो योगदंड ठेवीतां धरणीं ॥
त्र्यमल्ली वधील कामाक्षातें ॥ ६८ ॥ अपर्णाकांत क्रोधायमान ॥ ह्मणेरे तामसी तपाचरण ॥ केलें ऐसेंचि स-
हस्र गणनें ॥ दशानना सारीखें ॥ ६९ ॥ असो ते होणार प्रारब्ध गती ॥ सर्व पराभविले त्रिदशपंक्ती ॥ हरि-
हर ब्रह्मा संग्रामवर्ती ॥ थारों न शकती समरंगणीं ॥ ७० ॥ परी अनादियोगमायेचें आराधन ॥ न करितां
तिचें आज्ञावचन ॥ तात्काळ पावाल समरीं मरण ॥ विष्णुशक्तिहस्तें योगदंडवियोगें ॥ ७१ ॥ त्रिवर्गी
गौरवोनी वरदोत्तरीं ॥ स्वस्थाना जाते समयीं त्रिपुरारी ॥ ह्मणे जमदग्नि रवावतारी ॥ पौगंडऋषिनंदन वधील
॥ ७२ ॥ ऐसें शंकरवरदें निशाचरीं ॥ ब्रह्मार्धकल्पेसी महीवरी ॥ राज्य केलें ब्रह्मांडीं श्रीकरवीरीं ॥ सुर नर-
खेचरां पराभवुनी ॥ ७३ ॥ ह्मणोनी उदय माध्यान्ह सायंकाळीं ॥ त्रिवर्गांचें हें त्रिस्थान मुळीं ॥ युद्ध करीन भू
मंडळीं ॥ त्रिवर्गाग्रजहे त्रिकाळींचे ॥ ७४ ॥ देवादिकांचे यत्न कांहीं ॥ न चलती रक्तबीजोद्भव उद्भवीं ॥ हें
लक्षोनी शौनकही ॥ परम आश्चर्यें सूतासी ह्मणे ॥ ७५ ॥ रक्त बीजाचे रक्तबिंदु ॥ महीपडतांची रक्तथेंबु ॥ अ-
सुरउद्भवितां यशइंदु ॥ सुरवरनरांचे खंडिती ॥ ७६ ॥ घनमंडळें खेचरमंडळें ॥ गंधर्वमंडळें रविमंडळें ॥ ग्रह
मंडळादिक चंचळें ॥ केलीं रक्ताक्षबीज्यानें ॥ ७७ ॥ असाध्य रक्ताक्षबीजोत्पत्ती ॥ रक्तबीज आणि रक्तभोज कुमती

॥ ते वदावे सारांश मती ॥ शौनक वदे सूतातें ॥ ७८ ॥ सूत ह्मणे शौनकाशी आदरें ॥ कश्यपसृष्टीचा प्रतिसृ-
ष्टि करतारे ॥ ब्रह्मोत्तरखंड ब्रह्मांडपुराणांतरें ॥ सत्यवतीकुमारचि बोलीला ॥ ७९ ॥ सृष्टि करता कश्यपयोगमा
याज्ञेनें ॥ आरंभीं विष्णुकीरीट चंडांशकीर्णें ॥ क्रिया शुद्धिस्तव भ्रमणें ॥ मेरु प्रदक्षिणा करितसे ॥ ८० ॥ मग
वक्रजनें अचळ पदें ॥ पावला रविवदती उपनिषदें ॥ कीं भक्त प्रदक्षिणा करावया आनंदें ॥ दिनानाथें लाविलें अ
व्यापी ॥ ८१ ॥ ऐसा दिनकरनाथ गभस्ती ॥ प्रदक्षिणा करी अहोराती ॥ असो माध्यान्हीं देखोनी रवीची वस्ती ॥
राक्षस समुदाय क्षोभला ॥ ८२ ॥ शिव वरदें गर्वदुरुक्ती ॥ सूर्यासी कुशब्दशर मारीती ॥ असो स्वार्थ धरित चक्र
गभस्ती ॥ अगस्ति शिष्य आवडीला ॥ ८३ ॥ सूर्य आणी ब्रह्मराक्षसां ॥ वाग्वादहोतां पावले रोषा ॥ रक्ताक्ष बीज
कृतांत वेषा ॥ थोर संग्रामीं खवळला ॥ ८४ ॥ तीव्र युद्धकरी घोरांदर ॥ श्रमी झाला सहस्र कर ॥ ग्रासीला वाटे निशा-
चरें ॥ देखोनीदेवचक्र गजबजीलें ॥ ८५ ॥ देवें करितां संग्राम करणी ॥ मुक्त न होय वासरमणी ॥ गाऱ्हाणे सांगती शेष
शयनीं ॥ उदयाचळीं चा वृतांत॥८६॥श्रोणीतपुरींचा राक्षस सहस्त्र वदन ॥ समुदायेसी वेढिला सहस्रकीर्ण ॥ त्रिदश श
क्ति केल्या जीर्ण ॥ राक्षस दारुण क्षोभले ॥८७॥ ते कथा रसिक द्वितीयोध्यायीं ॥ संतीं बैसोनी स्वस्थ हृदयीं ॥ नवरसभ
रित केदारविजयीं ॥ सेवितां विजयी होईजे ॥ ८८ ॥ इति केदारविजय सागरीं ॥ संतप्रश्नोत्तरींच्या लहरी ॥ हरि
नामीं कीर्तिध्वजउभारी ॥ चिद्रनागिरि अक्षयीं ॥८९॥ हा केदारविजय सार ॥ श्रोतीं सेविजे परमादर ॥ सुजाण सुचक्र
पंडित चतुर ॥ प्रथमोध्याय सेवोत गोडहा ॥ १९० ॥ इतिश्री केदारविजय ॥ ब्रह्मांड भविष्योत्तर ॥ केदारखंड विर
चितायां ॥ पृथ्वी सुरेंद्र संवादोनाम प्रथमोध्याय गोडहा ॥ १ ॥ ओंव्या ॥ १९० ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ८ ॥


अध्याय २रा.
विंध्याद्रिपर्वत
नारद
देव
अगस्तिऋषि

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीदक्षिणपतये नमः ॥ जय जयाजी वद्रिविहारी ॥ जग नग कांचन नीळ आकारी ॥ श्री-
केदारविजयीं अधिकारी ॥ होऊनी विस्तारी कथान्वय ॥ १ ॥ परा पश्यंति मध्यमा वैखरी ॥ चतुर्विध मुद्रा
गोचर अगोचरी ॥ निर्विकार साकार मकराकारी ॥ जगदांकुर मोहरेसी ॥ २ ॥ कीं विजयकल्पतरूवरी ॥ श्री-
व्यास वाग्वल्लरी ॥ गीर्वाणशब्दें फळली भारी ॥ प्रश्न जलधिलहरी सुरवाडे ॥ ३ ॥ संकृत छायीं अतणें घडे ॥
प्राकृत कर घेतां नये आवघडे ॥ ते हरीनामाच्या आंकडे ॥ संतीं नीवाड काढिले ॥ ४ ॥ असो प्रथमाध्यायीं
कथा रस ॥ माध्यान्हीं अस्त झाला चंडांश ॥ दक्षिणदिशा पडली वोस ॥ राक्षस भयें करोनीयां ॥ ५ ॥ ह्मणो-
नी इंद्रातें कुंभिनी शरण ॥ जाऊनि कथीलें दुष्टाचरण ॥ हें प्रथमाध्यायीं निरुपण ॥ श्रोतीं मुनिवरें परिसिलें ॥
॥ ६ ॥ शौनकादि ऋषेश्वर ॥ यातें वदत पराशर ॥ युद्धा वर्तीं दिवाकर अपार ॥ परम श्रमातें पावला ॥ ७ ॥
संग्राम करितां अति दारुण ॥ क्षीण झाले मार्तंडकीर्ण ॥ हें ऐकोनी पृथ्वी ह्मणे ॥ सुरेंद्रातें आदरेसी ॥ ८ ॥
उदय माध्यान्ह सायंकाळीं ॥ युध्द करिती राक्षस बळी ॥ राक्षसां सूर्यासीं त्रिकाळीं ॥ वैर संबंध कां लागला ॥
॥ ९ ॥ इंद्र ह्मणे परिसें कुंभिनी ॥ विश्वजनाचें आयुष्य घेऊनी ॥ अस्ता पावे वासरमणि ॥ सूर्याचेनी गाणित
आकारा ॥ १० ॥ आयुष्य विश्वयोगांत गणना ॥ प्राधान्य हो सूर्य असें जाणा ॥ यालागीं वधावें सहस्त्रकी-
र्णा ॥ ह्मणोनी दैत्य समुदाय कोपला ॥ ११ ॥ विश्वजन युगाचा ह्याची चोर ॥ कृतांत असे जयाचा कुमर ॥
यम लोकींचा राजधर ॥ श्रीशंकरें करोनी स्थापिला ॥ १२ ॥ गतायुषी करीतो जनां ॥ यालागीं वधावें सहस्त्र
कीर्णा ॥ ह्मणोनी त्रिकाळीं करिती कंदना ॥ ब्रह्म राक्षस प्रतापी ॥ १३ ॥ ह्मणोनी अवनीये चंडांशकीर्ण ॥ रा-

क्षर्सी युद्धीं केलें जीर्ण ॥ दक्षिणदिशा कृष्ण वर्ण ॥ नर्मदे पासोनी जाहली ॥ १४ ॥ युद्ध करितां त्रिकाळीं ॥ अजिंक्य रक्तबीजवळी ॥ सहस्रकीर्ण कळा सकळी ॥ जर्जर केल्या जयानीं ॥ १५ ॥ राक्षसावतीं प्रभाकरें ॥ युद्ध करितां घोरांदरें ॥ श्रमी होतांची अपारें ॥ देवचक्रें गजबजीलीं ॥ १६ ॥ सुरवर यक्ष मरुद्गण ॥ वैवस्वत अष्ट वसु वरुण ॥ यांनीं करितां घोर कंदन ॥ निस्तेज पावले ॥ १७ ॥ देवीं करितां संग्राम करणी ॥ मुक्त न होय वासरमणी ॥ गाऱ्हाणें सांगतां शेषशयनीं ॥ उदयाद्रींचा वृत्तांत वर्तला ॥ १८ ॥ हे परिसोनी दीनवाणी ॥ गर्जिली गंभीर मेघध्वनी ॥ त्रिकाळसंध्या करावी ब्राह्मणीं ॥ सौर बीजाक्षरीं अर्घ्यदान ॥ १९ ॥ त्रिकाळ साधितां ब्राह्मणीं ॥ अर्घ्यदेतांचि वासरमणि ॥ मुक्त होईल राक्षसा पासोनी ॥ ब्रह्म तेजें करोनियां ॥ २० ॥ सप्त पाताळ सप्त द्वीप ॥ नवखंड पृथ्वी शरीररूप ॥ दहावें खंड शिर ब्रह्मांडरूप ॥ जेथें परमहंस नांदतसे ॥ २१ ॥ परा पश्यंति विशंती चारी ॥ अजपा गायत्री जपाधिकारी ॥ चतुर्दळीं आधार चक्रीं ॥ ऋतुचक्रीं सहाशत जप ॥ २२ ॥ स्वाधिष्ठानीं चतुरानन शक्तीसी ॥ जप होत संख्या षट् सहस्रेसी ॥ मणिपुरीं महाविष्णु श्रीयेसी ॥ दशदळीं षट् सहस्र ॥ २३ ॥ अनुहातीं द्वादश कमळोदरीं ॥ पार्वती सहित मदनारी ॥ षट् सहस्र जपाधिकारी ॥ एकाग्रचित्तें जीतेंद्रियीं ॥ २४ ॥ विशुद्ध षोडशदळीं जीवें ॥ माया अनादिशक्ति विभवें ॥ एक सहस्र स्वपंक्ति रवें ॥ जप संख्या रात्रंदिनीं ॥ २५ ॥ भ्रूवोर्मध्यें अग्निचक्रीं ॥ द्विदळीं हं क्षं अक्षरीं ॥ ज्ञान शक्ति परमात्मेसी वरी ॥ तेथें जप सहस्रैक करितसे ॥ २६ ॥ ब्रह्मरंध्रीं सहस्रदळपत्रीं ॥ जप दशशत सार अहो रात्रीं ॥ विमळ शीतळ रश्मी बीजमंत्रीं ॥ श्रीगुरुनाथ शोभला ॥ २७ ॥ एकवीस सहस्र साहाशत जप ॥

अखंड होतां लक्षी ज्योतिस्वरूप ॥ अजपा गायत्रीचें रूप ॥ [illegible]तां विज्ञान दीप उजळीजे ॥ २८ ॥ दृष्टी राखावी पराचे उपरि ॥ एकवीस सहस्र साहा शत वरी ॥ हें जाणती जितेंद्रिय सुविचारी ॥ सदैव शुचि अजपार्थी ॥ २९ ॥ अर्घ्य तोय ब्रह्मास्त्र होऊनी ॥ उदय माध्यान्ह अस्तमानीं ॥ राक्षस संव्हारिजे त्रिस्थानीं ॥ ब्रह्म कर्म करूनियां ॥ ३० ॥ ऐसी परिसोनी आकाशवाणी ॥ तैसेचि आचरती सुरद्विज मुनी ॥ राक्षस मृत्यु पावती प्रतीदिनीं ॥ हें निर्धारें जाणपां ॥ ३१ ॥ हत्या घडती अर्घ्यदानें ॥ ह्मणोनी करावें भू प्रदक्षिणे ॥ अशक्ता न होय प्रतितिने ॥ त्यानीं स्वदेह प्रदक्षिणा करावी ॥ ३२ ॥ पृथ्वी नवखंड शरीर अखंड ॥ दहावें खंड तें शिर ब्रह्मांड ॥ भूमी मस्तक तें काशीखंड ॥ हे कीर्ति प्रचंड तिहींलोकीं ॥ ३३ ॥ असो रक्षावया कारणें ॥ त्रिकाळ ब्राह्मणीं अर्घ्यदानें ॥ करावयालागीं प्रतिदिनें ॥ चतुराननें लावीलें ॥ ३४ ॥ असो ऐसी वसुंधरा ॥ शक्रें बोधिली परम चतुरा ॥ येरीति दक्षिणदिशा भारा ॥ उतरील श्रीभगवान ॥ ३५ ॥ सत्वरज तम एकाकारें ॥ ॐकार बीज उकार मकारें ॥ त्यांत जमदाग्नि रवावतार ॥ धरील जेव्हां बद्रिविहारी ॥ ३६ ॥ ब्रह्मचारी बटु भैरवाकारी ॥ पैं ऋषिकांतेच्या जन्मेल करीं ॥ तो राज्यकरिल संह्याद्रिवरी ॥ रत्नासुर रक्तभोज वधोनी ॥ ॥ ३७ ॥ नर वान्नरा हस्तीं रावण ॥ बाहत्तर युगांतीं पावला मरण ॥ अठरापद्म वान्नर गण ॥ अंश अवतार देवाचे ॥ ३८ ॥ अठरा जुत्तत्ति वान्नर बळी ॥ तेचि अवतरतील भूतळीं ॥ षोडश सिध्द अष्टभैरव दळी ॥ नवनाथ सिखामणि श्रीरवळनाथ ॥ ३९ ॥ असो जमदाग्नि नवरवाग्नी बंबाळ ॥ प्रदिप्त भरतखंडाग्नीं प्रबळ ॥ कल्पांत बटु भैरवाग्नि कल्होळ ॥ होईल अवतार कुंभिनीये ॥ ४० ॥ रत्नासुरादि रक्त भोजन ॥ दुर्मदा चर-

णी तो कर्पूरवर्ण ॥ तो स्पर्शतांची रवाग्नीनें ॥ भस्म होती स्वकुळेसी ॥ ४१ ॥ असो रवळेश्वराचे स्वशक्तिकरें ॥ रक्तभोजनादि रत्नासुर ॥ झैषासुरादि षड्‌रिपु सारे ॥ मरण पावतील संह्याद्रिवरी ॥ ४२ ॥ आमुचे यदर्थी स्वदळें बळें ॥ रक्ताक्ष बीजासवें होय विकळे ॥ तेणें जिंकिलें त्रैलोक्य सकळें ॥ शिव वरदबळें राक्षसीं ॥ ४३ ॥ लक्ष्मी सहित केदारें ॥ युद्ध करितां घोहांदरें॥ तरी नाटोपे करवीर कोल्हासुर ॥ रत्नासुरादि रक्त भोज ॥४४॥ रक्तबिंदु पडतां धरणीं ॥ तैं रक्त भोज उद्भवती धरणीं ॥ क्लेश पावती विष्णुरमणी ॥ तैं चर्पटा क्षोभे भद्र काळी ॥ ४५ ॥ अष्टादश भुजा भगवती ॥ षष्टीसी होईल विशाळा कृती ॥ तैसाचि नवनाथ निरंजन ज्योती ॥ विश्वोद्धारी जो विधि हरिहर ॥ ४६ ॥ असो हेंवर्म अवनीये अभंगे ॥ जावोनी बद्रिनारायणासी सांगें ॥ हें ऐकतां खवळीजे ऋषिनंदन भुजंग ॥ अश्वारूढ श्रीरवळेश्वर नामा ॥ ४७ ॥ ऐसेंचि निवेदी बद्रिविहारा ॥ मी जातसें वाराणसीपुरा ॥ अगस्तीसी विनवूनि दिनकरा ॥ मुक्त करवीन पुर्ववत॥४८॥ बद्रिकाश्रमा धाडोनी मही ॥ इंद्र निघाला तेंचि समयीं ॥ पातला जान्हवीतटींवटअक्षयीं ॥ ब्रह्मकल्पांती जो साजीरा ॥ ४९ ॥ वंदोनी शक्रें विश्वनाथा ॥ सकळ कथिली दक्षिण वार्ता ॥ अडथळिलें होतें सूर्यरथा ॥ घटोद्भवशिष्य पर्वतें ॥ ५० ॥ आजी षण्मास पर्यंत ॥ रवि अस्त झाला अचळांवरांत ॥ तैं पासोंनी पीडा विश्वातें ॥ अपार झाली मृडहरा ॥ ॥ ५१ ॥ ऐसें वदतां पर्वत रिपु ॥ शिव ह्मणें सत्व रजतम ऐक्य वपु ॥ वंशावतार कोटी कंदर्पु ॥ पौगंडऋषि नंदन त्रिगुणरूपी ॥ ५२ ॥ विश्वनाथ ह्मणे सुरेंद्रासी ॥ तुवां प्रार्थोनियां अगस्तिऋषी ॥ धाडिल्या दक्षिण यात्रेसी ॥ तो स्वशिष्यासी बोधील ॥ ५३ ॥ श्रीगुरु वचन वंदोनी शिरीं ॥ निद्रा करिल नर्मदातीरीं ॥ सूर्य उ-

गवेल तें अंबरीं ॥ यथा पूर्वमकल्पयेत् ॥ ५४ ॥ सर्वें घेवोनियां ब्रह्मा ॥ मींही जातसें बद्रिकाश्रमा ॥ विष्णूसी सांगूनी ऐसिया श्रमा। विश्वजनाचा परिहारू॥५५॥ ऐसेंसांगोनी सुरेंद्रातें। त्र्यंबक गेला बद्रिकाश्रमातें। चवथी मोक्षपुरी जगविख्यात। प्रयागीं कलशोद्भव देखिला सुरेंद्रें ॥५६॥ तयासी वदे वज्रपाणी। रेवानाम दक्षिणतटणीं। अंधकार दाटला रजनीं। स्वधर्म धर्म बुडविला ॥ ५७॥ राक्षसप्रतापाच्या धुसारें। व्यापिलें क्षितितळासी अंत्ररें। दक्षिणदिशे अंधकारें ॥ दिवाकरातें आकर्षिलें ॥ ५८ ॥ स्वधर्म कर्मधर्मांचा लोप॥ होतां दक्षिणयात्रेचा खंडला संकल्प ॥ आतां रत्नागिरी वरी दक्षिणदीप ॥ बळप्रताप उजळिजे ॥ ५९ ॥ अगस्ति सारिखा पुण्यश्लोक ॥ दक्षिणयात्रा करितां हारिख ॥ सन्मार्गीं वर्तवी विश्वलोक ॥ अवतार चरित्र प्रगटावया ॥ ६० ॥ कृतत्रेत द्वापार कली ॥ बाहातर युगें युगांतीं झालीं ॥ हनुमंतें सीताशुद्धि करितां पडली ॥ मुद्रिका कमंडलूंत तुमचिया ॥ ६१ ॥ श्रीरामावतारींच्या मालिका ॥ सीताशुद्धीच्या मुद्रिका ॥ बाहात्तर वेळ सित्थोदका ॥ उलंघीलगोपदवत प्रसादें ॥ ६२ ॥ देव द्विज प्रसादें सकळ ॥ दैत्य उपद्रव खंडेल सकळ ॥ मुक्त करावें मार्तंडमंडळ ॥ जमदाग्निअवतार मिरवावया ॥ ६३ ॥ दैत्योत्पातकाचे धुसर ॥ व्यापील क्षितितळासी अंबर ॥ तव शिष्य कोपला दुर्धर ॥ दीर्घ शरीर वाढला जो ॥ ६४ ॥ विंध्याचळ कोप भारितें ॥ वाढोनि टेंकला अंबरातें ॥ तेणें न चले सूर्यरथ ॥ व्योमपंथ रोधिला ॥ ६५ ॥ षण्मास झाले ऐसिये परी ॥ तें धर्म उच्छेदिला निशाचरीं ॥ रक्तबीजादि रत्नासुरीं ॥ महाप्रळय मांडिला ॥ ६६ ॥ तव कृपावलोकनें दीप ॥ उजळल्या दक्षिणेसी बळप्रताप ॥ तत्प्रकाशें येईल ज्योतिस्वरूप ॥ सत्वरजत्तम एक होऊनी ॥ ६७ ॥ विरंची हरिहर ॥ ऐकत्र करोनी खाग्निअवतार ॥ खळनाथ भैरवाकार ॥

बद्रिकेदार अवतरवी ॥ ६८ ॥ ऐसें वदतां सहस्रनयनें ॥ उत्तर दिधलें घटनंदनें ॥ सोडोनियां मोक्षस्थान ॥ जावें दक्षिणेसी सांगसी ॥ ६९ ॥ सगरराज वसुंधरापती ॥ सप्तार्णवीं जयाची आज्ञा कीर्ति ॥ स्वर्गीहूनि भागीरथी ॥ आणिलीहो जयानें ॥ ७० ॥ भगीरथप्रयत्नें प्रेमभक्ती ॥ स्वर्गीहूनि आणिली पितृव्यभक्ती ॥ ह्मणोनी जन ह्मणती ॥ भागीरथी अभिधान ॥ ७१ ॥ स्वर्गीहूनि पातली महागजरीं ॥ जेष्ठमास दशमी वामनावतारीं ॥ बळीराज स्वात्मनिवेदनकरी ॥ त्रिपदभूमी दिधली स्वदेहीं ॥ ७२ ॥ सर्व ठेली एकचरणीं ॥ दुसरापद भरला गगनीं ॥ तैं ब्रह्मदेव बसला अभिषेचनीं ॥ अभिषेकार्थीं बैसला ॥ ७३ ॥ तेथोनि भगीरथें प्रार्थना करोनी ॥ आणित हिमगिरीवरी मंदाकिनी ॥ नामपावली कैलासभुवनी ॥ गंगा शंकरें जे वंद्य केली ॥ ७४ ॥ गंगामृत दुर्लभ पापापहारी ॥ चपळ गिरिराज गुहाविदारी ॥ हिमालयें गळीं घातली उत्तरी ॥ ह्मणोनी गंगोत्तरी या नामें ॥ ७५ ॥ यास्तव गंगोत्तरी विश्वजन ॥ ह्मणती गंगा भागीरथी प्रयत्नें ॥ आणिली अमळ या भूतळीं जनें ॥ गंगामृत हें विश्व वदती ॥ ७६ ॥ हे अमळ विष्णुपदोद्भवी ॥ जन्हुऋषि समूळ सेवी ॥ तैं देखोनी भगीरथ सदेवीं ॥ शतसहस्र संवत्सर ॥ ७७ ॥ हें जाणोनी ऋषेश्वर जीवीं ॥ जानुतून काढिली गंगादेवी ॥ यामुळें नांव गंगाजान्हवी ॥ जन्हुऋषिवर्या आवडली ॥ ७८ ॥ तेथोनी गंगा चालिली गजरीं ॥ भगीरथासह पातली हरिद्वारीं ॥ जयेचें नाम मायापुरी ॥ जेथें दक्षें यज्ञारंभ केला ॥७९॥ कुशावर्ती गंगाद्वारें ॥ विल्वकें नीळ गिरिवरें ॥ सुतीर्थीं स्नान केलिया नरें ॥ पुनर्जन्मा न येती ॥ ८० ॥ ऐसी मायानाम मोक्षपुरी ॥ जेथें दक्ष यज्ञारंभ करी ॥ पर्वतप्राय यज्ञसामोग्री ॥ नीळपर्वत कांचनमय ॥ ८१ ॥ असो ऐसी

मायापुरी ॥ दर्शनमात्रें पापापहरी ॥ मुक्ति द्यावया प्रेमळ हरी ॥ तेथें हिमकेदारी तिष्ठतसे ॥ ८२ ॥ स्वर्ग द्वाराची प्रथमपायरी ॥ प्रख्यात असे हरिद्वारीं ॥ पंचपांडव तीर्थ ईशान्य उत्तरीं ॥ भीमकुंडा पश्चम राधा कुंडें ॥ ८३ ॥ राम सौमित्र सीतार्थी ॥ तीर्थांबु स्पर्शतां संतापहरती ॥ राधाकुंडादि न कळे होय सुस्नार्थी पुनर्जन्म न मानवा ॥ ८४ ॥ असो त्या उत्तमोत्तम ॥ जेथें त्रिवेणीचा संगम ॥ काशी प्रयागीं अक्षयवटद्रुम ॥ ब्रह्मकल्पांतीं साजिराजो ॥ ८५ ॥ पृथ्वी नवखंडें खंडिली ॥ सप्तद्विपांतरीं विचित्र घडली ॥ दहावेंखंड शिर ब्रह्मोत्तरी ओतिली ॥ भूषित नक्षत्रें जगनग भरणीं ॥ ८६ ॥ ह्मणोनी ब्रह्मप्रळयीं मकार ऐसी ॥ बाळमुकुंद हृदयनिवासी ॥ त्रैलोक्य साठवोनी ह्लदयाकाशीं ॥ चित्घट पत्रांतरीं शयन कीजे ॥ ८७ ॥ अनंत ब्रह्मांड ओतींव सगळें ॥ देहबुद्धीचे सोहं मेळे ॥ ज्ञानाक्षबुबुळीं विज्ञान सोज्वळ ॥ निवृत्तीनें दाविलें धरोनी हातीं ॥ ८८ ॥ शब्दरसीं लीन झाला ॥ अहंब्रह्मास्मीं सामावला ॥ भेदाविणे सुनादीं गजर केला ॥ तोचि भक्त भुकेला अवतारचरित्रीं ॥ ८९ ॥ औटपीठातळाभीतरीं ॥ कीं सहस्रदळ कमळोदरीं ॥ तेथें वाजिन्नली मनमोहरी ॥ अमनभुजंग भुलोनी गेला ॥ ९० ॥ कींते नेत्रींचिबाहुली गरोदर झाली ॥ तेच भास अभास जगदांकुरली ॥ विस्तीर्णचि द्वंद्वासी भरली ॥ तेच अनुग्रहार्थी उरली हरिकीर्तनीं ॥ ९१ ॥ नवच क्राचिये माझारीं ॥ औटपीठाचे सेजारीं ॥ शून्याचिये निजमंदिरीं ॥ सुनीळप्रभा मिरवीजे ॥ ९२ ॥ तेथें दशांगुळ प्रमाण ॥ त्यावरी परार्धाचें आवर्ण ॥ कीं तो अव्यक्त दशचंडांशकीर्ण ॥ वस्ति संपूर्ण करीजैसा ॥ ९३ ॥ तेंचि चैतन्य अकारवर्ण ॥ महाकारणाचें देहधारण ॥ असे सुरेंद्रा मसुरप्रमाण ॥ हे श्रीगुरुनाथ खूण जाण-

वी ॥ ९४ ॥ ऐसें जगद्गुरु दिनानाथें ॥ तो हा विश्वेश्वर स्थापिला आदिनाथें ॥ तारकोपदेशीं समर्थें ॥ ज्योतिर्लिंग हा मोक्षपुरींचा ॥ ९५ ॥ देखोनी वारणसी मोक्षस्थान ॥ अमर इच्छिती संतोषें मरण ॥ हें त्वां सहस्रनयन लक्षोन ॥ केवीं धाडिसी दक्षिणयात्रेसी ॥ ९६ ॥ काशी मनकर्णिका त्रिवेणी ॥ वेणिमाधव गंगागुणीं ॥ धुंडी काळभैरव दंडपाणी ॥ मुनि गुणिजनीं वेष्टिला जो ॥ ९७ ॥ ऐसियाचा दर्शन महिमा ॥ न कळेचि सुजाणा सुरेंद्रोत्तमा ॥ भागीरथी मज्जनीं दोषगरिमा ॥ हरोनि जन्मा अजन्मकरी ॥ ९८ ॥ हें गंगामृत दुर्लभ देखा ॥ त्यांत तीर्थ विशेष मनकर्णिका ॥ ऐसें अव्हेरुनी सुरनायका ॥ जावें ह्मणसी दक्षिणयात्रे ॥ ९९ ॥ टाकोनी जान्हवी विश्वेश्वरासी ॥ कदापी न जाय मी दक्षिणेसी ॥ ऐसें वदतां सुरेंद्रासी ॥ चिंताज्वरें व्यापिलें मानसा ॥ ॥ १०० ॥ ह्मणे कलशोद्भव कुळमंडना ॥ नहुष दुर्मदांधा दंडणा ॥ सिंधु आतापि गर्वखंडना ॥ शापानुग्रह कारणा समर्था ॥ १ ॥ पापराक्षसी प्रवर्तली निशा ॥ कर्मभूमी दक्षिणदिशा ॥ तव कृपावलोन रविप्रकाशा ॥ करितां अवतार दशा उजळवी ॥ २ ॥ अनंत अवतार लीला चरित्री ॥ भैरवी कीर्ति सुगंध दर्शवी पात्रीं ॥ पौंगंडऋषि कांतेच्या करपात्रीं ॥ ज्योतिस्वरूप अवतरवी ॥ ३ ॥ असो अनेक रीतीची रसोत्पत्ती ॥ सुरेंद्र वदतांचि ऋषि अगस्ती ॥ ह्मणे तुमचे वचनीं दक्षणावर्तीं ॥ करावया मी जातसें ॥ ४ ॥ परी जान्हवी वियोग सातें न करीं ॥ ऐसें जाहलिया पर्वतारी ॥ तैं सूर्य मिरवेल अंबरीं ॥ यथा पूर्वमकल्पयेत् ॥ ५ ॥ जलधि वैरियाचें उत्तर ॥ परिसोनी वदे सुरेश्वर ॥ दक्षिणदिशेचा करावया उद्धार ॥ जान्हवी येईल समागमें ॥ ६ ॥ ह्मणोनी सिंहस्तीं गौतमेसी ॥ जान्हवी येतसे द्वादशवर्षी ॥ तया नंतर सृष्टीसी ॥ द्वादश वर्षी येतसे ॥ ७ ॥ कंन्यागतीं श्रीकृष्णे-

सी ॥ भीमा वरुणा चंद्रभागेसी ॥ घटप्रभा मलापहरेसी ॥ तुंगभद्रेसी तदनंतर ॥ ८ ॥ स्थळोस्थळीं दक्षिण दिशीं ॥ भागीरथी येतसे आर्जवेसीं ॥ तो विस्तार वदतां विशेषीं ॥ पाल्हाळ चतुरीं न ह्मणिजे ॥९॥ श्रीमद्भारतीं व्यासवाणी ॥ तीनशतसाठी तीर्थें शिराणी ॥ वदली अष्टादशपुराणीं ॥ शौनकादि मुनिवरांसी ॥ १० ॥ असो गौतमीसी जान्हवी ॥ द्वादशवर्षी भेट घावी ॥ ह्मणोनी येत नित्य कलशोद्भवी ॥ अमरज्यासंगमीं अद्यापी ॥ ॥ ११ ॥ हें प्रत्यक्ष कलियुगीं जन ॥ देखती ऐकती पुराणश्रवण ॥ असो दक्षिणयात्रेसी तीर्थाटण ॥ करावया अगस्ति निघाला ॥ १२ करोनी भागीरथीचें स्नान ॥ मनकर्णिकेंचें अघमर्षण ॥ विश्वनाथासी पूजोन ॥ कलशोद्भव निघाला ॥ १३ ॥ कलशकुमर मोक्षपुरी ॥ बाहेर निघोन नमस्कार करी ॥ काळभैरवादि ऋषि मुनिवर ॥ क्षेत्रवासियां आलिंगित ॥ १४ ॥ श्रीजनकारि वदे सर्वा ॥ ढुंढिराजादि काळभैरवा ॥ सिद्धचारण गणगंधर्वा ॥ ह्मणे लोभ असों द्यावा हरिस्मरणा ॥ १५ ॥ मोक्षपुरींचे निवासी ॥ अगस्ति वियोगें परमक्लेशी ॥ होऊनि गेले स्वस्थानासी ॥ अगस्तीसी पाठऊनी दक्षिणे ॥ १६ ॥ सत्समागम धन उत्तम ॥ ऐसें वाक्य गर्जे निगम ॥ अगस्तिवियोग मोक्षधाम ॥ रम्य न दिसे कथान्वयीं ॥ १७ ॥ जेवीं तारांगणीं चंद्रमा ॥ भूषित तेवीं अगस्तिप्रतिमा ॥ ज्याच्या क्रोधाग्नीची गरिमा ॥ साहों न शकती हरिहर ॥ १८ ॥ हरिहरकथा पुराणश्रवण ॥ कलशोद्भव कथनार्थी सुगम ॥ तयाचे संगतीं वेधलें मन ॥ सज्जनाचें परतेना ॥ १९ ॥ असो ऐसा क्षेत्रवासियांसी ॥ अगस्तीचा ध्यास अहर्निसी ॥ मागें परतल्या नंतर ऋषी ॥ तीर्थाटनासी निघाला ॥ २० ॥ ते कथा परिसावी गहन ॥ केदारविजयींचें आख्यान ॥ ऐकोनी संत वसंतींमनें ॥ हरिचंदनागरें चर्चिती ॥ २१ ॥ संत पंडित

महंतजनीं ॥ ज्ञानविज्ञानाची विचित्र खाणी ॥ गीर्वाणशब्दें कांचनमणी ॥ संतश्रेणि भूषिल्या ॥ २२ ॥ कीं कांचमणियांचीं भूषणें ॥ आवडी लंकेसी करिती लेणें ॥ तैसेयदर्थीं प्राकृत वचनें ॥ सुवर्णालंकार भावोनि घेती ॥ २३ ॥ इति ही केदारविजय कथनें ॥ श्रवणार्थी पाविजे जय कल्याणें ॥ ब्रह्मोत्तरखंड ब्रह्मांड पुराणें ॥ भविष्योत्तर पुराणार्थी वदतसे ॥ २४ ॥ जे संशय मानितील उदंड ॥ त्यांनीं पाहावें काशीखंड ॥ श्रीकेदारखंडींही प्रचंड ॥ ऐसेंचि असे कथान्वया ॥ २५ ॥ तें ह्या केदार विजयीं सुगंधपणी ॥ हरिनामामृत कूपिका भरोनी ॥ ठेविल्या त्या अर्चन सुमनीं ॥ करावया हरिकीर्तन द्वितीयोध्याय गोडहा ॥ २६ ॥ इति श्रीकेदार विजय ॥ केदार खंड भविष्योत्तर पुराण विरचितायां ॥ अगस्ति दक्षिण यात्रा गमनोनाम ॥ द्वितीयोध्यायः ॥ २ ॥ ॥ ओंव्या संख्या ॥ १२६ ॥



अध्याय, ३ रा.
विंध्याद्रि
अगस्तिऋषि
केदारनाथ
गौंडऋषिची पत्नी

श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयजयाजी बाद्रिनिवासी ॥ जयजगव्यापका जगविलासी ॥ जयजय अनादिमायावेषी ॥ चिद्रूीजासी आकार ॥ १ ॥ जय भक्तमनोरथ मोहरा ॥ जय अभेदभक्तिमाहेरा ॥ जय विधि हरि नमोहरा ॥ जय श्वेतमंदारप्रियहरी ॥ २ ॥ जयजया संतवसंतलहरी ॥ जय त्रिविधसंताप समूळहरी ॥ जय सच्चिदानंद जलधिजालहरी ॥ चिद्रत्नाद्रीं समुद्रतटीं पातल्या ॥ ३ ॥ कीं द्वादशज्योतिर्मयस्वरूपा ॥ कीं द्वादशार्क निजरूपा ॥ जय भरतखंडाग्री दक्षिणदीपा ॥ चिद्रत्नागिरीवरी विराजिता ॥ ४ ॥ जय श्रीकेदार सगुणसागरा ॥ योगी मुनिजन गणनागरा ॥ जय केदारविजय रसिकगिरा ॥ नटनागरा ह्यालविसी ॥ ५ ॥ ॥ जेवीं दुर्बळाच्या पंक्ती ॥ श्रीमंत वाढी आपुलेहस्तीं ॥ पूर्णता पावोनि समस्तीं ॥ धनमानें सन्मानें ॥ ६ ॥ दुर्बळजन अकिंचनपणी ॥ देखोनी श्रीमंतसगुणी ॥ आपुल्यासारखी संपादणी ॥ परहस्तीं करी आवडी ॥ ७ ॥ जेवीं थोर सांडोनि परते ॥ उच्छिष्ट काढी रमाकांत ॥ तैसेंचि येथें दिनानाथें ॥ साक्षभूत लिहिवितसे ॥ ॥ ८ ॥ नमना वरद शिरोमणी ॥ चिद्रत्नाची अमोल्यखाणी ॥ ते हरिनामाचे कनककोंदणीं ॥ श्रीनाथांगीं जडतसे ॥ ९ ॥ असो सिद्ध मुनींद्र तपोरासी ॥ तव अनुभवी ब्रह्मऋषी ॥ ब्रह्मवेत्ते क्षेत्रवासी ॥ संवादती ऋषिवर्य ॥ १० ॥ चंडांश मोचनार्थी गिरिवैखरी ॥ पातल्या वाराणसी महापुरीं ॥ अगस्तीसी बोधोनि स्वधर्माचारीं ॥ जगश्रम हरणार्थाकारणें ॥ ११ ॥ मुनीसी बोधिलें सहस्रनयनें ॥ तव बोधार्थ निरोपणें ॥ त्रिकाळ युद्ध राक्षसाचरणें ॥ भागीरथी आगमन कथियेलें ॥ १२ ॥ द्वितीयोध्यायीं ऐसी कथा ॥ शौनकें कथियेली ऋषिसमस्तां ॥ अगस्ति निघाला दक्षिणतीर्था ॥ येथोनि कथा परिसावी ॥ १३ ॥ क्षेत्रवासी यांचा निरोपु ॥ घेऊनि

निघाला श्रीतातरिपु ॥ दक्षिणयात्रेचा संकल्पु ॥ सिद्धकरावया चालिला ॥ १४ ॥ जात जात घटनंदन ह्मणे
॥ उत्तरमानस करावें पूर्ण ॥ ह्मणूनि कुरुक्षेत्रीं करुनि स्नान ॥ लोपामुद्रे सह विधियुक्त ॥ १५ ॥ त्रिराती क्र-
मूनि कुरुक्षेत्रीं ॥ भार्या ऋषि पवित्रीं ॥ स्नान करूनि पुष्करतीर्थीं ॥ त्रिरात्र तेथें राहिला ॥ १६ ॥ तेथोनि चा-
लिला शोणितभद्रा ॥ सवें घेऊनि लोपामुद्रा ॥ सिंधु सरस्वती सुवर्णभद्रा ॥ गंडकी कौंकिणी पयोष्णिनदी ॥
॥ १७ ॥ शरयू कौशिकी कुशावर्ती ॥ शुक्र उलूक मांडव्य पिंगतीर्थीं ॥ भद्रकाळी कपिलतीर्थीं ॥ अगस्ति वस्ती
करितसे ॥ १८ ॥ स्थळोस्थळीं करोनि वस्ती ॥ हास्यपर्वता पावला अगस्ती ॥ क्रमोनि तेथें तीनराती ॥
संपूर्ण तीर्थविधि केला ॥ १९ ॥ शिळानदीचे उत्तरतीरीं ॥ पातला मानससरोवरीं ॥ बिल्व मंगळादि ऋषि
मुनिवरीं ॥ पुण्याश्रमीं ऋषिगण देखिले ॥ २० ॥ भृषंडीऋषि बकदालभ्य ॥ तत्वानुभवी मुनींद्रसभ्य ॥
ह्मणती सत्समागम अलभ्य ॥ लाभ झाला आमुतें ॥ २१ ॥ सत्संगती करूनि शेतें ॥ चालतां हरी दुरित दु-
ष्कृतें ॥ सद्बुद्धीचा अखंडसेतू ॥ भवाब्धींतें तारक प्राणियां ॥ २२ ॥ असो संतसमागमीं तीनराती ॥ राहो-
नियां मुनिअगस्ती ॥ सर्वांसी पुसोनियां विनयभक्ती ॥ पश्चिमपंथीं चालिला ॥ २३ ॥ करूनि सर्व उत्तरमानस ॥
द्वारके चालिला मनोल्हास ॥ सोरट देशींचा श्रीमल्लेश ॥ ज्योतिर्लिंग ऋषीनें वंदिला ॥ २४ ॥ तेथोनि निघाला
सरितावैखरी ॥ जेकां मोक्षपुरीमाजी दुसरी ॥ मथुरानाम कुंजविहारी ॥ राधारमण पूजिला ॥ २५ ॥ बन-
सिवेटमठ नंदिग्राम ॥ काळयवन कालिंदीसंगम ॥ जेथें काळियाभुजंगम ॥ तेथें सुस्नात झाला ॥ २६ ॥
कृष्णावतारींची लीलास्थानें ॥ स्वकांतेसी दाऊनि अगस्तीनें ॥ पातला जेथें रेवतीरमण ॥ लक्ष्मणावतार

बळिभद्र ॥ २७ ॥ कांतेसी दाऊनि गोवर्धनधरा ॥ सवेग पातला हरिद्वारा ॥ नीळपर्वत लंघोनी हिमकेदारा ॥ पंचप्रयागीं तीर्थविधि केला ॥ २८ ॥ बद्रिकेदार बद्रिनारायण ॥ साष्टांगेसी करितां नमन ॥ उभय ह्मणती हे घटनंदन ॥ दक्षिणयात्रेसी निघावें ॥ २९ ॥ तव शिष्य गौरवोनी मधुरोत्तरीं ॥ निद्रिस्थ करावा नर्मद्रातीरीं ॥ तरींच सूर्य उगवेल गगनोदरीं ॥ प्रकाश होईल पूर्ववत ॥ ३० ॥ सारांश मुक्त मार्तंडमंडळा ॥ करितां स्वामी मननिर्मळा ॥ आह्मीं त्रिगुणात्मक ज्योतिलीळा ॥ एकत्र होऊनि गुणरवाग्नी ॥ ३१ ॥ अनंत अवतार माळिकेचे मणी ॥ त्यामाजी तो सारंगधर कोदंडपाणी ॥ अष्टादश पद्मींचे संबोधनीं ॥ देवावतार द्रुमपाणि जाणावे ॥ ३२ ॥ तेचि वान्नर कृष्णावतारीं ॥ गोवळे झाले युगबाहत्तरीं ॥ तेचि गोवळ भैरवभारी ॥ षोडशासिध्दनव नाथ हे ॥ ३३ ॥ जमदाग्नि रवाग्निवेष ॥ त्रिगुणात्मक पूर्णांश ॥ अवतरोनि रवळेश ॥ तवमार्गीं येतसे ॥ ३४ ॥ ऐसीं परिसोनी उभयोत्तरें ॥ दक्षिणेसी चालिला कलशकुमर ॥ पातला अवंतिका मोक्षपुर ॥ जेथें महंकाळ ज्योतिर्लिंग ॥ ३५ ॥ तीनदिवस क्षिप्रास्नान ॥ करोनि महंकाळपूजन ॥ अंकपाततीर्थीं सुस्नातमन ॥ संदीपन वंदिला ॥ ३६ ॥ यात्रा करोनि पंचक्रोशी ॥ अगस्ति निघाला सदारेसी ॥ हरसिध्दि महंकाळेसी ॥ पूजोनि ऋषेश्वरनिघाला ॥ ३७ ॥ मनोल्हास कलशोद्भव ॥ पातला ज्योतिसंभव ॥ ॐकार बीजाक्षरीं महादेव ॥ श्रीनर्मदातीर विहारी जो ॥ ३८ ॥ तीर्थ महिमा परिसोनि सारा ॥ पूजिलें ॐकार ममलेश्वरा ॥ तों नर्मदेदक्षिणतीरा ॥ अंधकारान्वय सर्वजगती ॥ ३९ ॥ ऐसें लक्षूनियां मुनिवरें ॥ स्वशिष्यापासीं चालिलात्वरें ॥ तो दीर्घवाढला गगनोदरें ॥ मस्तक जयाचा टेंकला ॥ ४० ॥ आश्चर्य करी कुंभकुमर ॥ येवढें दीर्घायुशरीर ॥ हाकमारीत ऋषेश्वर ॥ ते गिरिवरें परिसिली ॥ ४१ ॥ ऐकोनि गुरुना-

थवाणी ॥ विंध्याद्रि द्वयकर जोडोनी ॥ वंदी अगस्तीस लोटांगणीं ॥ अचळचरणीं मस्तकानें ॥ ४२ ॥ स्थिरो
भवति या वचनें ॥ नर्मदातीरीं करावें शयन ॥ सुषुप्ति समाधिस्थ होई गहन ॥ हरिहर स्मरणीं असावें ॥ ४३ ॥
तीर्थयात्रेचा उद्देश ॥ करावया जातों दक्षिणमानस ॥ मी येईतंववरी रेवातटाकीं संतोषें ॥ निद्रा करावी मम
आज्ञा ॥ ४४ ॥ ऐसें वदतां अगस्तिऋषी ॥ मस्तकीं वंदोनि अचळाशिरीं ॥ नर्मदेतीरीं करी शयनासी ॥ दी-
र्घशरीरीं पसरला ॥ ४५ ॥ उदयाद्रि पासोनि अस्ताचळें ॥ पर्वतें शयनकेलें ॥ तैं अंबरीं रविमंडळ ॥ निर्मळ
केलें ऋषीनें ॥ ४५ ॥ दक्षिणदिशेच्या महाजनीं ॥ अकस्मात देखिला मध्यान्हीं ॥ पूर्ववत चंडांशकीर्णी ॥
माध्यांजनीं देखिला ॥ ४७ ॥ यजुर्वेदाचें विवर्ण ॥ मार्तंडबोधीं हें व्यासवचन ॥ उपदेश रसभरित श्रवण ॥
माध्यान्ह समयीं जयमुनीसीं ॥ ४८ ॥ माध्यान्ह समयीं माध्यान्हजना ॥ उपदेशील ह्मणोनी नामाभिधाना ॥ हा
अर्थ भविष्योत्तर पुराणा ॥ माजी पंडितीं पाहावा ॥ ४९ ॥ असो चंडांश देखोनी महाजन ॥ करावया चालिले
माध्यान्हस्नान ॥ जपतप क्रतुअनुष्ठान ॥ पंचाग्निसाधनादि चालविलें ॥ ५० ॥ षण्मासाची घोरनिशा ॥ हरिला
क्लेशभार जगदीशा ॥ आतां केधवां दैत्यराक्षसां ॥ निर्दाळिसी कळेना ॥ ५१ ॥ फार मातले पिशिताशन ॥
रत्नासुर रक्तभोजन ॥ करवीर कोल्हासुराचें दमन ॥ केंधवां करसील दयाळा ॥ ५२ ॥ ऐसी विश्वोत्तरींची वाणी
॥ परिसोनि सकंप झाली धरणी ॥ बद्रिकेदार नारायण ॥ भूभार फेडीं दक्षिणेचा ॥ ५३ ॥ सुरेंद्रासी सांगितली
दक्षिणवार्ता ॥ तो ह्मणे करणार विश्वकर्ता ॥ हर्ता कर्ता आकर्षिता ॥ तिघां वांचोन हें घडेना ॥ ५४ ॥ त्रिगु-
णात्मकीं एकविचार ॥ हरावा वसुंधरेचा भार ॥ धर्मस्थापोनि निरंतर ॥ दक्षिणउद्धार करावा ॥ ५५ ॥ सहीं

ह्मणे हे मदनारिमित्रा ॥ विंध्याद्रीनें आकर्षिलें कश्यपपुत्रा ॥ तें अगस्तीनें दिधलें स्वपुत्रा ॥ जेवीं घटश्रोत्रा चतुराननें ॥ ५६ ॥ हें सुरेंद्र ऐकोनि घटोद्भवकुमरा ॥ गौरवोनि मधुरोत्तरा ॥ दक्षिणेसी जातेसमयीं गिरिवरा ॥ शयन करविलें रेवातीरीं ॥ ५७ ॥ जेवींचतुरानन कुंभकर्णा ॥ वर देतांचि करी शयना ॥ तेंचि भासत माझिये-मना ॥ बद्रिनारायणा अवधारीं ॥ ५८ ॥ रक्तभोज देविलाख्य रत्नासुर ॥ करवीर जंबुकादिह्लैषासुर ॥ हे लक्ष्मीच वधील साचार ॥ जे दुर्धरखर माजले ॥ ५९ ॥ न पाहतां दीर्घविचार ॥ वर दिधला गौरीहरें ॥ तेणें धर्म उच्छेदिलासारा ॥ सुरनर भूचरांदि त्रासिले ॥ ६० ॥ रक्ताक्षीबीज रक्तभाजन समरंगणीं ॥ रक्तबिंदु पडतां धरणीं ॥ एकबिंदुहूनि शतगुणीं ॥ रक्तभोजन असंख्य उद्भवती ॥ ६१ ॥ ऐसें वरदानें निशाचर ॥ आरंभिती घोर अनाचार ॥ जैसे अंत्यजगृहीं अस्थिगिरिवर ॥ तेवीं असुरभार मेळविले ॥ ६२ ॥ कीं मद्यपी याचे निजमंदिरीं ॥ पानास्तव बैसती चक्राकारीं ॥ सेवितां गर्जती मदांधशरीरी ॥ धिःकारिती अमृतातें ॥ ६३ ॥ तयातें सांगती गीर्वाणशब्द ॥ ते न मानूनि करिती ह्रदयभेद ॥ जेवीं अगीर्वाण कानर्नीचेद्विज ॥ धर्मइक्षुदंड खांडिती ॥ ६४ ॥ आधीं दुर्जन त्यांत राक्षस ॥ यावरी शिववराचा सौरस ॥ ऐसें समजूनि करवीराधीशा ॥ काय केला लक्ष्मीनें ॥ ६५ ॥ आधींच वनचरमर्कट जाण ॥ त्यास करविलें मद्यपान ॥ तस्ययोगांत वृश्चिकानें ॥ दंशितां अन्योन्य भविष्यती ॥ ६६ ॥ दैत्य राक्षसयोनि दुर्धर ॥ त्यांत शनिपात होयज्वर ॥ त्यावरी होतां भूतसंचार ॥ मगसुविचार तेथें कैंचा ॥ ६७ ॥ पांचजंन्याची अतिप्रीती ॥ त्यांत फाल्गुणमास पातला वस्ती ॥ परद्वारया जारसंगतीं ॥ पूर्वार्जितीं लाधली ॥ ६८ ॥ अनृत कुटिलोक्तीची ज्वाळा शिराणी ॥ बाह्यांतरीं जो अगीर्वाणी ॥ त्यांतें दुरत्यैदु-

राभिमानी ॥ दैवयोगें भेटला ॥ ६९ ॥ तेथें अपर्याप्तीचें बोलणें ॥ स्वगृहीं मानिती तें ठेंगणें ॥ ऐसें दुराग्रही राक्षसाचरण ॥ दक्षिणेसी उत्कर्षें वाढलें ॥ ७० ॥ स्थावरजंगम मेरुअचळ ॥ सप्तार्णवाचें जळतुंबळ ॥ याचिया भारें नसे व्याकुळ ॥ परी नसोसवे दुर्जनभारा ॥ ७१ ॥ दुर्जनभारें रसातळा ॥ मी जाईन वैकुंठपाळा ॥ हें देखोनि अनादि कमळा ॥ प्रज्वाळोनि क्षोभली ॥ ७२ ॥ अवनीसी वदे वारिजाक्षी ॥ मद्‌वचें बीजाक्षरजो न संरक्षी ॥ त्यातें चर्पटअंबा समरींभक्षी ॥ लक्षावधि रक्तोद्भव सकळही ॥ ७३ ॥ लक्ष्मी वदे वैकुंठवासी ॥ अवतार धरूनि त्रिगुणांशीं ॥ रक्तोद्भव रत्नासुरासीं ॥ विध्वंसी वटु भैरवस्वरूपीं ॥ ७४ ॥ ऐसी अनादि शक्तीची वाणी ॥ परिसोनि हरिहरपद्मयोनी ॥ ह्मणती निजानंद रंगवासिनी ॥ मेदिनी करवीं खेदरहित ॥ ७५ ॥ शक्तिविरहित त्रिगुणाकृती ॥ निर्मित नस्थापे त्रिगुणाकृती ॥ विध्वंसावया राक्षसजाती ॥ प्रळयशक्ति असावी ॥ ७६ ॥ तथैव ह्मणे अनादिशक्ती ॥ सांडूनि निराकाराची वृत्ती ॥ जैसी योगियां वरिजे शांती ॥ तैसी कांति विराजे ॥ ७७ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ एकत्र अवतार भैरवाकार ॥ चतुर्भुज शामसुंदर ॥ भुजंग जंघासनीं मंडित ॥ ७८ ॥ क्रमण पदीं ध्वज वज्रांकुशरेखा ॥ सुवर्णादि कांति मंडित देखा ॥ विंशति अघोळीं चंद्रकळिका ॥ द्वितीये सारिख्या एक पंक्ती ॥ ७९ ॥ अतसिकुसुम जलबिंदु ॥ अंगप्रभा रणदीक्षित धैर्यसिंधु ॥ चरणीं ब्रीद गर्जेंदीनबंधु ॥ भक्तचकोर पूर्णेंदु उगवला ॥ ८० ॥ त्रिशूल डमरु पात्र खड्ग करीं ॥ द्वादश ज्योतिर्लिंगांकित शरीरी ॥ यज्ञोपवितावरी वस्त्र उत्तरी ॥ गंगोत्रिये सारखा ॥ ८१ ॥ वैजयंतीवरी आपादवरी ॥ कास कसोनि पितांबरीं ॥ कपोलमंडित नवकेशरीं ॥ इंदुवहन नंदी विराजे ॥ ८२ ॥ कोटीकंदर्पलावण्य खाणी ॥ कीं अनंत उगवले वासरमणी ॥

श्रवणीं डोलती भुजंगमणी ॥ कीं भृगु अंगिरा कर्णी गुज सांगती ॥ ८३ ॥ जैशा प्रळयकाळींच्या सौदामिनी ॥ रुक्मप्रभेसी समरस होऊनी ॥ कांति फांकली मुगुटमणी ॥ चिद्रत्न कोंदणीं जडियेला ॥ ८४ ॥ कीं चंद्रार्कांचीं एकत्र कीर्णे ॥ होऊनि राहुभयें जीर्णे ॥ वसों पातलीं विस्तीर्णें ॥ मुगुटीं चिद्रत्नें अक्षयीं ॥ ८५ ॥ स्वेतमंदारहार सोज्वळ ॥ भ्रमरांकित केशकुरळ ॥ विशाळाक्षनाशिक सरळ ॥ द्वयओष्ट्र प्रव्वाळ जापगी ॥ ८६ ॥ नीळ कलिवरा वरी मौक्तिकमाळा ॥ शोभती दिव्य अम्लान माळा ॥ जेवीं कालिंदीवरी जान्हवीबाळा ॥ चपळांबर स्वेतवर्णी ॥ ॥ ८७ ॥ असो ऐसा खळेश्वर ॥ ब्रह्मा हरि भवानीशंकर ॥ अवतार धरिला भैरवाकार ॥ जमदग्नि खाग्नि अवतारला ॥ ८८ ॥ ऐसा बद्रिकाश्रमीं बद्रिकेदार ॥ अवतार बटुभैरवाकार ॥ तैं भरतखंडाग्रीं सह्याद्रीवर ॥ प्रळय विद्युल्लता पडियेली ॥ ८९ ॥ उल्कापात झाला क्षिती ॥ दिवसा दिवाभीत बोभाइती ॥ येथें राक्षसांची शांति ॥ श्रीकेदारहस्तीं होईल ॥ ९० ॥ हे ध्वनि ऐकोनि निशाचर ॥ पडिले चिंतेच्या सागरीं ॥ दैत्यराक्षस सजिले दळभारीं ॥ करवीरीं आणि सह्याद्रीं ॥ ९१ ॥ करवीर कोल्हासुर अतिदारुण ॥ रत्नासुरादि रक्तभाजन ॥ सह्याद्रीवरी सावधान ॥ दैत्य समुदाय आणविले ॥ ९२ ॥ कथा परिसावी येरिकडे ॥ बद्रिकाश्रमीं कायघडे ॥ केदारविजयमंटपीं उघडे ॥ दृष्टांतधडे सांगूनि बोलती ॥ ९३ ॥ दीर्घायुप्रति सुभाषित ॥ पाराशरऋषि प्रश्न करित ॥ शौनकातें सूतवदत ॥ श्रीनाथाचा अजन्मजन्म ॥ ९४ ॥ शौनक ह्मणे सूतासी ॥ तुह्मीं विस्तार वदला बहुवसी ॥ अवतार त्रिशतमुखी त्रिगुणांशी ॥ अयोनि वा योनिसंभव ॥ ९५ ॥ त्रिगुणात्मक हा हिमकेदारी ॥ पदोपदीं कथाविस्तारी ॥ वदला परंतु एक नवलपरी ॥ जन्मकीं अजन्म अवतार कैसा ॥ ९६ ॥ अवतार धरिला

होता साकार ॥ परी तो कैसा निराकारींचा आकार ॥ जाह्लें ते शताननाचे हरिहर ॥ एकत्र पुनरपि केवीं झाले
॥ ९७ ॥ ब्रह्मज्ञान पूजापहारी ॥ मायेनें करोनि कळा आकारी ॥ विष्णुमुगुटमस्तक अंबरीं ॥ अहंब्रह्मास्मि
फिरत आद्यापी ॥ ९८ ॥ योगमायेचीं बीजाक्षेरं ॥ अवत्थ अव्हेरिती त्रिगुणाकारें ॥ अनादिनाथ जन्मला भै-
रवाकारें ॥ तो अवतार विस्तारें वदावा ॥ ९९ ॥ ऐकोनि शौनकाचे उत्तमोत्तरा ॥ सूत ह्मणे हे चित्सुभाष्यका-
रा ॥ ज्योतिर्मय अजन्मी जगदांकुरा ॥ तयासी जन्मसंभव असेचिना ॥ १०० ॥ जो अकल्प तरुवर ॥ जो
अविनाश निगमागोचर ॥ जोतत्वानुभवी याचें आगर ॥ अभेदभावना पुरिजे ॥ १ ॥ कीं अद्वैष्टकंदरींचा चिम-
णाहरि ॥ कीं तो चित्समुद्रींची आनंदलहरी ॥ गर्जतां ॐकारबीजाक्षरीं ॥ अहंकार कुंजर दिगांतरीं दडाले ॥
॥ २ ॥ कीं अनंतब्रह्मांडाच्या घडामोडी ॥ करोनि बाहत्तर युगांच्या परवडी ॥ अनंतअवतार चरित्रलुगाडीं ॥ प्र-
रिधान करवी इच्छाशक्तीसी ॥ ३ ॥ ब्रह्मा शंकर मधुसूदन ॥ जयेचे उदरीं पावले जनन ॥ अहं ब्रह्मास्मि हो
स्फुरण ॥ सत्व रज तम शतमुखी निर्मिले ॥ ४ ॥ ऐसा अनादिमायाधीश ॥ ज्योतिर्मय चिदात्मवेष ॥ नटला
जगनगजडितकोश ॥ श्रीरवळनाथ खड्ेश भैरवभारी ॥ ५ ॥ पौंगंडऋषीच्या तपाचरणीं ॥ अवतरला हा ख-
ड्गपाणी ॥ येथें आशंका अंतःकर्णीं ॥ शौनकमुनि कां घेसी ॥ ६ ॥ निरंजनातें भवबंधप्राप्ती ॥ कदापी न होय
शिवकल्पांतीं ॥ अद्वैत ब्रह्मचारी षोडशचक्रवर्ती ॥ वर्णितां वेदस्फूर्ति मावळल्या ॥ ७ ॥ ज्योतिस्वरूप वर्णाव-
यासी ॥ शब्दैंकरोंनि सहस्रमुखासी ॥ वर्णिताझाला द्विजिव्हेसीं ॥ परी वस्तुनिजठेव न वदवे ॥ ८ ॥ शेषें
करूनि विशेषवदनें ॥ नवरसभारती नूतन निर्मोन ॥ ठेविल्या एकेक सहजस्थान ॥ प्रथकाकार सहस्राननीं ॥ ९ ॥

जिव्हाग्रीं सिद्धसरस्वती अमूपा ॥ शेष ठेऊनि दशग्रंथीं अक्षेपा ॥ वर्णितां ज्योतिर्मयस्वरूपा ॥ थकोनि चरणा वंदितसे ॥ १० ॥ ऐकोनि शौनक मुनींची वाणी ॥ परिसोनि वदे सूत साराशवचनीं ॥ त्याचा विस्तार अग्निपुराणीं ॥ व्यासें कथिला विस्तारें ॥ ११ ॥ यदर्थीं ऐका अगस्तिवचन ॥ जंबुद्विपांत भरतखंड जाण ॥ अमरजा संगमापासोन गणन ॥ अष्टादश योजनें दक्षिणेसी ॥ १२ ॥ उडपीक्षेत्रा पासोनी ॥ महोदधि पासोन नैऋत्यकोनीं ॥ यज्ञ मांडिला ब्रह्मारण्यीं ॥ अष्यायशींसहस्र ऋषेश्वरीं ॥ १३ ॥ यज्ञ भंगिती राक्षसगण ॥ ह्मणोनि ऋषिवर्य लक्ष्मीरमण ॥ प्रार्थून करविलें मख रक्षण ॥ सातसंवत्सर पर्यंत ॥ १४ ॥ बकदालभ्यादि सप्त ऋषि प्रसिद्ध ॥ भृशुंडीश लोमहर्षणसिद्ध ॥ मार्कंडेयो हंस मयूर विबुध ॥ अश्वमेध संपूर्णकरिती ॥ १५ ॥ मज वांचून प्रतापशौर्या ॥ कवण रक्षील मखअध्वर्या ॥ माझेनि पाड याजगत्रया ॥ आन दुसरा असेना ॥ १६ ॥ म्यां यज्ञ करविला यथाविधी ॥ ऐसा बद्ध अहंकृती आधिव्याधी ॥ व्यापी हरिमायादिव्यौषधी ॥ धनुर्दंड प्रहरें मस्तक उडवील ॥ १७ ॥ तेंचि उदयास्त मार्तंडमंडळ ॥ विष्णुमुगुट द्वादशार्क द्वादशदळें ॥ कश्यप सूत्रीं सहस्रदळीं मेळें ॥ सहस्रकीर्ण तो चिदांबरींचा ॥ १८ ॥ लोकोपकारा कारणें ॥ पवनचक्रीं चंडांशकीर्णें ॥ प्रकाशफांकला विस्तीर्ण ॥ प्रथम प्रहरीं कृतयुगारंभी ॥ १९ ॥ ब्रह्मसृष्टि चतुर्दशभुवन ॥ चतुर्दश कल्पप्रकाशीं वर्ततांजन ॥ तें लागतां तीव्र मार्तंडकीर्ण ॥ लोपले चवदाही कल्पतरू ॥ २० ॥ असो विष्णुमस्तक तेंचि मार्तंडबिंब ॥ निर्मिलें मायाकृत अविलंब ॥ तें यज्ञारंभीं ऋषिकदंब ॥ मस्तकरहित विष्णु लक्षिती ॥ २१ ॥ हे हरिनारायण मखरक्षका ॥ विश्वोद्धारिया विश्वपालका ॥ कां विपरितार्थ क्षयकारका ॥ दाविलासी कां त्रिजगासी ॥ २२ ॥ ऐसें अष्यायशीं सहस्र ऋषेश्वर ॥ ग-

र्जती चतुर्वेदें वर्णाचार ॥ तों महदाकाशींचा शब्द घनघोर ॥ झालातो ऐका ऋषिवरहो ॥ २३ ॥ हयमस्तक अभिमंत्रोनि घ्यावें ॥ विष्णुकबंधासीं तें लावावें ॥ नाम हयग्रीव ठेवावें ॥ हें सर्व ऋषिवरें ऐकिलें ॥ २४ ॥ हें आकाशीं ऐकोनि अभिनव ॥ हरिहर शब्दें गर्जले सर्व ॥ हयमस्तक यज्ञींचें अपूर्व ॥ विष्णुग्रीवास्थानीं ठेविलें ॥ २५ ॥ पुन्हा सृष्टीचा उद्भव ॥ करितें ऐसे ऋषिपुंगव ॥ दहा अवतारांत श्रेष्ठ अपूर्व ॥ अवतार एकादश प्रथमहा ॥ २६ ॥ जळप्रवाही विष्णुग्रीवोद्भवा ॥ यालागीं नाम नदीहयग्रीवा ॥ जेथील राज्य देईल सुग्रिवा ॥ वाळी वधोनि राम पुढारीं ॥ २७ ॥ दहा अवतारांचे आधीं ॥ ऋक्षेश्वराचे हयमेधीं ॥ दक्षिणदेशीं हयग्रीवानदी ॥ तेथें हयग्रीव अवतार धरिला ॥ २८ ॥ हे कथा अग्निपुराणीं ॥ विस्तार वदला व्यासमुनी ॥ योगमायेची विचित्रकरणी ॥ सिंहावलोकन कथान्वया ॥ २९ ॥ जे अबोलणी बोलकीफार ॥ जे निगमागमा अगोचर ॥ जे वरासी नेणतां माया विस्तार ॥ जगनगअळकारीं भूषिला ॥ ३० ॥ जें गयासुराचें समाधिशयन ॥ अखंडित असे काशीपट्टण ॥ जें करवीरासुरासी वरदायन ॥ योगदंडधारण जिचेनी लाधला ॥ ३१ ॥ ऐशियेचे उत्तरोत्तरें ॥ नवदत्तां गर्जेल ब्रह्मांडगारें ॥ हें परिसोन सत्व रज तम एकाकारें ॥ होऊनि ज्योतिर्मय अवतरला ॥ ३२ ॥ ब्रह्मार्धकल्प तप पर्यंत ॥ शनिप्रदोष करितां व्रत ॥ झाली पौगंडऋषीची कांता ॥ ह्मणोनि नवचक्रासनी अवतरला ॥ ३३ ॥ अचळबुद्धि अचळमनीं ॥ अचळ सुचिष्मत सह्यासनीं ॥ बहुवेळ हरिहर अर्चितां तपाचरणीं ॥ खड्गपाणी सत्पुत्र चांगभला लाभला ॥ ३४ ॥ अभेदभक्ति अखंडित ॥ ज्याचें सदयहृदय मंडित ॥ तयासी ऐसा पुत्र रघपंडित ॥ ह्मणुनि ज्योतिस्वरूपदीप उजळला ॥ ३५ ॥ पूर्ण फलप्राप्तीचा ऐसा प्रकार ॥ सर्वात्मनेकभावना जे आ-

कार ॥ तोचि मायावेषी भैरवाकार ॥ जगदाकुरेसी सौदागर आकारला ॥ ३६ ॥ ऐसा श्रीनाथें अवतार धरिला ॥ कीं तो व्हदयातून बाहेर पातला ॥ कीं तो हरिकीर्तीचा ध्वज उभारिला ॥ भैरवभारी दुरिताप हरणीं ॥ ३७ ॥ तो विमलांबु जनकरांगुळी ॥ उघडोनि पाहतां नेत्रकमळीं ॥ चतुर्भुज तनु सांवळी ॥ बत्तिसाक्षरी शुभलक्षणी ॥३८॥ असंख्यात ऋषिअंगना ॥ उभ्या उर्वशी देवांगना ॥ पाहतां श्रीनाथ निरंजना ॥ रंजविती नृत्यगायनीं ॥ ३९ ॥ सिद्ध साध्य विद्याधर ॥ आठ्यायशींसहस्र ऋषेश्वर ॥ तेतीसकोटी अमरभार ॥ नारद तुंबर एकादशरुद्र पातले ॥ ४० ॥ घेवोन धन रत्नाचिया कोटी ॥ कुबेर पातला विमानदाटी ॥ सुवर्णपुष्पाची करोनि वृष्टी ॥ ऋषिकांते सहित नाथ पूजिला ॥ ४१ ॥ कुबेरा हर्ष अंतःकर्णा ॥ धन धान्यादि वस्त्राभरणा ॥ भांडार फोडोन दिधलें ब्राह्मणा ॥ याचक मनकामना पुरविल्या ॥४२॥ स्तुति करिती अमरगण ॥ ऋषेश्वर ह्मणती धन्यधन्य ॥ सिद्ध झालें अनुष्ठान ॥ शेषशयनी पुत्र झाला ॥ ४३ ॥ व्यक्ताव्यक्त गुण निर्गुण ॥ भासे अभासित वर्णावर्ण ॥ वर्णू न शके सहस्रवदन ॥ सहस्रनयनीं न लक्षवे ॥ ४४ ॥ तो त्वां व्हदय मानस मंदिरीं ॥ स्मरावा निशिदिनीं अष्टौप्रहरीं ॥ तो तुझें कार्य करील सत्वरी ॥ दिनानाथ दीनबंधु ॥ ४५ ॥ ऐसी हे अनादिशक्ती ॥ व्हदयीं ध्यातां मानसमूर्ती ॥ तात्काळप्रगटे वरदांतीं ॥ सत्व रज तम नवरंगभरणी ॥ ४६ ॥ ऐसी मूळमाया योगिनी ॥ देखोनि वदे पद्मयोनी ॥ ह्मणे तूं कवणाची नंदिनी ॥ उर्ष्टीं बैसोनि कोठें जासी ॥ ४७ ॥ ऐसें वदतां चतुराननें ॥ उत्तर दिधलें मूळमायेनें ॥ कवण कार्यालागीं तिघेजण ॥ कार्याकारण जाणतसा ॥ ४८ ॥ परिसोनि चिदात्मनेची वाणी ॥ ब्रह्मा ह्मणे मीं चतुर्दशभुवनीं ॥ श्रीविष्णु विश्वपालनी ॥ हा शूलपाणी संहारकर्ता ॥ ४९ ॥ मीं ब्रह्मा ऐसें वचन ॥ आदिशक्ति वदे अबोलणेंपण ॥ कोठील ब्र-

ह्मा हरि त्रिलोचन ॥ ब्रह्मांडांत कीं वेगळाले ॥ ५० ॥ विधि मीं त्रैलोक्यजनक ॥ आह्मां वदसी उणें आधिक ॥
वृद्धा होऊनि वदसी लटिक ॥ उदर नभरे लटिकेविणें ॥ ५१ ॥ स्वामीं आह्मीं त्रिजगाचे ॥ तूचि माता संभ्रमसी
वाचे ॥ उष्ट्रभार घेऊनि धनफुकाचें ॥ चालिलीस कवणें देशांतरीं ॥ ५२ ॥ काय भरिलें उंटावरी ॥ तो मज दावीं
जिन्नस लौकरी ॥ न दाविल्या बलात्कारीं ॥ सत्यलोकासी नेईन ॥ ५३ ॥ हें ऐकोन हसे मंदस्मिता ॥ विधीसी चम-
त्कारिकवदे अबोलतां ॥ मृगमैथुनीं मनीं रमतां ॥ अझून पर्याप्त न झालासी ॥ ५४ ॥ सत्यलोका माझारीं ॥ अस-
त्य नाहीं स्वप्नांतरीं ॥ मृगवेष धरूनि फिरावें अंबरीं ॥ ह्मणोन ब्रह्मांडोदर गर्जिन्नलें ॥ ५५ ॥ वृथा न वदतां अ-
तर्क्य गर्जना ॥ ब्रह्मांडघट गर्जेल जाणा ॥ तैं विष्णूचें धनुष्य शरासना ॥ न कर्षितां सीत तुटोनि कोदंड शिर उडा
लें ॥ ५६ ॥ धनुष्य टणत्कारूनि हनुवटिला ॥ द्वैतार्थी विष्णु होता उभाराहिला ॥ तैं अहंकार तंतू तुटोनि गेला ॥
तैं धनुष्यें उडविला शिरमुकुट ॥ ५७ ॥ अहं धनुष्य मायाटणत्कारी ॥ विष्णु षडचक्रांत मणिपुरीं ॥ शिरासहित
मुगुट वायुचक्रावरी ॥ तोचि रविप्रकाश नव खंडीं कोंदला ॥ ५८ ॥ कश्यपपुत्र मित्रजाण ॥ तोंचि हे द्वादशार्क
पवन चक्रासन ॥ हे मायावदनींचें ओडंबर भ्रमण ॥ अकल्पीसंकल्पीं उगवला ॥ ५९ ॥ ब्रह्मांड मंडळीं मार्त्तंड चं
ड ॥ विष्णूचा अहंमुगुट कोदंड ॥ तोचि मायालाघवी अखंड ॥ कश्यपपुत्रें मस्तकीं घातला ॥ ६० ॥ नकळे यो-
गमायेची करणी ॥ विष्णुशिर मुगुट तो चंडांशकीर्णी ॥ नामठेवी वासरमणी ॥ वासना अहंकृति योग अहंभ्रम-
ण ॥ ६१ ॥ ऐसा नाम पावला प्रभाकर ॥ ध्रुवप्रदक्षिणा करी आष्टौप्रहर ॥ निर्मिली घटिपळकर्णसप्तवासी ॥ साठी
संवत्सर गणित ज्योतिष शास्त्रीं ॥ ६२ ॥ असो सूर्यासहि झाली अहंता ॥ तेव्हां ब्रह्मदेवा मदगर्विता ॥ जन्मलीरक्त

बीजसंख्या अपरमिता ॥ ब्रह्मराक्षस उदयाद्रीं श्रोणितपुरींचे ॥ ६३ ॥ ह्मणोनि ब्रह्मराक्षस आणि सूर्य ॥ युध्दीं प्रवर्तले प्रतापशौर्य ॥ तें द्वितीयोध्यायीं युद्धमात्सर्य ॥ सहस्रनयन महीसी वदला ॥ ६४ ॥ हें द्वितीयोध्यायीं परिसिलें संतें ॥ जें सूर्यासी धरत्रीचे संमतें ॥ हें अलक्षलक्षोनी सत्व रज तमी समर्थ ॥ धरकंपित त्रिवर्ग झाले ॥ ॥ ६५ ॥ ब्रह्मात्द्द्रव्यं सर्वहरी ॥ ह्मणोनि मानपूजापहारी ॥ विधीसी केलें चराचरीं ॥ ब्रह्मोत्तर खंडींचा निश्चय हा ॥ ६६ ॥ ब्रह्मोत्तर खंड तें पासोन ॥ नाम ठेविलें अविधि वचन ॥ ब्रह्मोत्तर खंडील ह्मणोन ब्रह्मोत्तरपुराण ॥ ज्ञानाभिधानापरी हरी ॥ ६७ ॥ ह्मणोनि विधि मानपूजापहारा ॥ प्राप्त झाला शौनकमुनिवरा ॥ विष्णुमुगुट कश्यप कुमरा ॥ किरीटप्रभाकर ह्मणताती ॥ ६८ ॥ असो विष्णूचिया महदहंकारें ॥ काढोनि मायेनें पत्रनचक्राकारें ॥ ठेविला दिवस गणिताकारें ॥ मायास्तरणीची तरणीप्रभाहे ॥ ६९ ॥ सारांश विष्णु निर्विकार ॥ करावया अभिजित फलदातार ॥ यास्तव निर्हेतु निरहंकार ॥ ह्मणोनि विष्णु सत्वगुणीं आकारला ॥ ७० ॥ मान सन्मानाचीं पडळें ॥ गेलीं सर्वहि अकाळकाळें ॥ ह्मणोनि साहिलीं ह्रदयीं पदतळें ॥ पासाव भृगुलांछन मिरवितसे ॥ ७१ ॥ असो विधीसी अबोलणा वदे वचना ॥ उंटावरी ह्मणसी काय कारणा ॥ भरला तो पाहीं रे चतुरानना ॥ ह्मणोनि त्रिगुणांड काढिलें ॥ ७२ ॥ हातीं घेतां त्रिगुणात्मअंडें ॥ विधीनें उचलितां भुजदंडें ॥ विकळ झाला बळप्रचंडें ॥ अंड पडिलें भूमंडळीं ॥ ७३ ॥ अंडप्रचंड पडतां महीवरी ॥ त्यांतूनि उद्भवले त्रिगुण अवतारी ॥ ब्रह्मशंकर आणि हरी ॥ प्रतिसृष्टिकर्ते शताननाचे ॥ ७४ ॥ ते शताननीं विधि हरिहर ॥ उभे स्तविती जोडोन कर ॥ ह्मणती हे अनादि करुणाकरे ॥ संकल्पस्थिति कारके ॥ ७५ ॥ जो अलक्ष अगोचर दिगंबर ॥ अलक्ष

झालिसी सोऽहंभावाकार ॥ अलक्ष लागतां चंद्रार्क विकार ॥ तेथें नाथनिरंजन प्रकाश कोंदला ॥ ७६ ॥ तया निरंजनींचे प्रकाशें ॥ शिव झाला तृतीयअंशें ॥ शिवापासाव परियेसें ॥ भासाभास चैतन्याचा ॥ ७७ ॥ तया चैतन्याचे उदरीं ॥ एक पुरुष निराधार सागरीं ॥ तयापुरुषापासाव उद्भव लावण्यलहरी ॥ ते तूं मूळमाये सुंदर जननीये ॥ ७८ ॥ मूळमायेचे ह्रदयसंपुटीं ॥ ॐकार जन्मला परार्धशेवटीं ॥ ॐकारापासोनि धूर्जटी ॥ महारुद्र जाहला ॥ ७९ ॥ महारुद्राचे निजतेजीं ॥ विष्णु जन्मला भक्तकाजीं ॥ विष्णुचिया नाभीसरोजीं ॥ विधाता जन्मला पंचमुख ॥ ८० ॥ तया विधातिया पासोनि जाणा ॥ अनंतपिंड ब्रह्मांड रचना ॥ ऐसी निवृत्तियोग जाणोनि खुणा ॥ ह्मणोनि जननी शरण तुज आलों ॥ ८१ ॥ तूं न बोलतांच कांहीं वाणी ॥ मन कल्पीं रचिसी ब्रह्मांडश्रेणी ॥ अनंत सत्व रज तमाच्या भरणीं ॥ जगनग कांचनी नाटकी जननीये ॥ ८२ ॥ ऐसे शक्त मुखाचे त्रिगुण अवतारें ॥ स्तवन करिती जोडल्याकरें ॥ हें पाहोनि पंचमुख हरिहर ॥ विनयोत्तरें विनविती ॥ ॥ ८३ ॥ तुजनेणतां झालों कष्टी ॥ लागलों मायामय भारती पाठीं ॥ आपुलेंच भारती आपणा पाठीं ॥ प्रतिबिंब झाली जननीये ॥ ८४ ॥ अपूज्य केलेंसी या त्रिभुवनीं ॥ हे खंती वाटे अंतःकरणीं ॥ निंद्यकर्म हें त्रिभुवनीं ॥ नये तें करावें जननीये ॥ ८५ ॥ श्रीविष्णु करितांचि ऐसें स्मरण ॥ तैं मायाप्रतिबिंब दे हासोन ॥ उंटावरी आलें बैसोन ॥ अझून कांहीं मी न बोललें ॥ ८६ ॥ तुह्मीं सृष्टीचे मुख्यधणी ॥ तुह्मां विरहित नाहीं या त्रिभुवनीं ॥ ह्मणोनि ब्रह्मास्त्र तिच्या आवरणीं ॥ आकर्ण कर्णी पडियलें ॥ ८७ ॥ ऐसें ऐकोनि विधि हरहरी ॥ क्षमस्व अपराध आधि कौमारी ॥ तव निजरूप भारती हे अंतरीं ॥ आज कळली जननीये ॥ ८८ ॥ क्षमस्व अपराध क्षमासमु-

द्रे ॥ चिदाकाशीये पूर्णशरचंद्रे ॥ हरिचित्त आरद्रे ॥ क्षमा करावी ॥ ८९ ॥ ऐसा सत्वगुणी सत्ववेत्ता ॥ विष्णूचें स्तवन ऐसें परिसतां ॥ योगमाया झाली आज्ञा करितां ॥ शतमुखीजे विधि हरिहरा ॥ ९० ॥ सत्वरजतम त्रिगुणाकार ॥ ज्योतिस्वरूप रसगंध आकार ॥ होऊनि पौगंडऋषीचा कुमर ॥ शेषासहीत अवतारी जा ॥९१॥ एक ब्रह्मकल्पपर्यंत ॥ विमळांबुजेसी तप अद्भुत ॥ केलें शनिप्रदोषाचें व्रत ॥ ब्रह्मार्धकल्प पुरुषार्थी ॥ ९२ ॥ अर्चन भक्ति अपरोक्ष ज्ञान ॥ अचळ मानस श्रवण पठण ॥ अचळ सांख्यात्म निवेदन ॥ पौगंड ऋषि पुत्रार्थी आचरला ॥ ९३ ॥ ह्मणोनि पौगंडऋषि कांते सहित ॥ पुत्रार्थी बैसला धैर्यवंत ॥ त्यातें करोनि पुत्रवंत ॥ अयोनिसंभव विमळांबुज करी ॥ ९४ ॥ बटु भैरवाकार त्रिगुण गुणीं ॥ अष्टादश पद्माचे संबोधनीं ॥ ते अष्टादशपद्म भैरव वाहिनी ॥ भरतखंडार्धीचे दैत्य वधावे ॥ ९५ ॥ सर्वे घेऊनि विष्णुशक्ती ॥ राज्य करावें संह्याद्रि पर्वतीं ॥ हें ऐकोनि त्रिशतमुखी त्रिमूर्ती ॥ एकत्र झाले ज्योतिस्वरूपा ॥ ९६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध ॥ हे ज्योतिस्वरूपाचे ज्ञानेंद्रिय अभेद ॥ सृष्टि क्रमाचा भेदांगविध ॥ श्रीमद्विवेकसिंधु माजी ॥ ९७ ॥ जे संवशय मानितील बुद्धी ॥ तेणें विवेकसिंधूचे पूर्वार्धी ॥ पाहांता विमळांबुजेचे करार्धीं ॥ यथार्थ वाटेल पंडितां ॥ ९८ ॥ असो येरिकडे बद्रिकाश्रमीं ॥ भार्येसी पाचारितां मनो धर्मीं ॥ पूर्ण फळ प्राप्तीची पातली उर्मी ॥ ज्योतिर्मय भैरवाकारीं ॥ ९९ ॥ विमळांबुजा बध्दांजुळी ॥ पद्मासनीं होती बैसली ॥ ते ज्योतिर्मय हृदयकमळीं ॥ प्रकाशला सहस्र दळांत ॥ २०० ॥ पूर्ण फळप्राप्तीचा फळला भाव ॥ झाला हृदय स्थ देवाधि देव ॥ योगी तत्वानुभवी याची ठेव ॥ विमळांबुजीं करसंपुट प्रकाशली ॥ १ ॥ विमळांबुजी झाली ज्योतिर्मया ॥ कीं ते अनादि स्वरूपाची

माया ॥ कीं ते पोगंडऋषीची उन्मनी जाया॥ ज्योतिस्वरूपासी प्रसवली ॥ २॥ विमळांबुजा विमळार्चनीं ॥ बैसली साक्षात्कार भुवनीं ॥ तों मणिपुरीं विष्णुरमणी ॥ सहित खड्गपाणी शोभला ॥ ३ ॥ कीं जळीं स्थळीं काष्टांत प्रगटला ॥ कीं जगत्रयचि व्यापक एकवटला ॥ कीं अभेदभक्तिरस ओतिला ॥ विमळांबुजीकरीं जगदोद्धारा ॥ ४ ॥ असो विमळांबुजा ज्ञानाभिधान ॥ भासे अभासे कार्यकारण ॥ नेत्रीं अपरोक्ष ज्ञानांजन ॥ योगमाये अव्यक्तव्यक्त लेवविलें ॥ ५ ॥ शौनक ह्मणे सूताप्रती ॥ अपूज्य विधाता अहंकृतीं ॥ ह्मणोनि ब्रह्मदेवाचीमूर्ती ॥ मृत्युलोकीं नसे यासाठीं ॥ ६ ॥ हें जाणोनि कमलासन ॥ चिदात्मनेसी मागे वरदान ॥ यास्तव त्रिगुणात्म एक वटून ॥ पूज्या घ्यावया अवतरले ॥ ७ ॥ हें प्रत्यक्ष विश्ववदनीं ॥ खूण पाहतां पद्मपुराणीं ॥ विष्णुमस्तकें तोचि वास रमणी ॥ गगनमार्ग उदयास्तु कारणें ॥ ८ ॥ तोहा विष्णुमस्तक सूर्यजाणा ॥ अहंश्रमें ऋषि प्रदक्षिणा ॥ करिल क्षिति विश्वनयना ॥ युगायुगीं ऋषिवर्या ॥ ९ ॥ सर्वस्य गात्रं शिरप्रधानं ॥ तो उडविला माया धनुष्यानें ॥ विष्णुकबंध मस्तका विणें ॥ राहिलें तैसेंचि सांगपां ॥ १० ॥ नकळे ज्योतिर्मयाचा पार ॥ स्तब्ध झाले साहा चार ॥ हेंचि ह्मणती भाष्यकार ॥ अंत नाहीं नाथनिरंजनाचा पैं ॥ ११ ॥ श्रुतिस्मृति लावण्य लतिका ॥ दशावतार ईशकळिका ॥ पाजळोनि उन्मनी प्रकाशदीपिका ॥ अनंत ब्रह्मांडें उजाळिलीं ॥ १२ ॥ असो ऐसा अनादि विभवें ॥ अयोनि चरित्रांश अभिनवें ॥ तयासी कैंचा जन्मसंभव ॥ नवरवनाथ सिखामणी ॥ १३ ॥ त्रिदशगण पावले श्रम ॥ यास्तव भक्तकामकल्पद्रुम ॥ अवतरतां बद्रिकाश्रम ॥ ऋषि पावले विश्राम सर्वही ॥ १४ ॥ ते ऐकावी सुरसवाणी॥ सूत शौनका वदे काहाणी ॥ लोपामुद्रेसी अगास्तिमुनी ॥ वदतसे तेंचि परि-

सावें ॥ १५ ॥ मूळ मायेचे आज्ञा वचनें ॥ विधीं निर्मिलीं चतुर्दशभुवने ॥ मधुमूरूचें करूनि कंदन ॥ नारायणदर्यें चर्म काढिलें ॥ १६ ॥ तें पसरिलें जळमायेवरी ॥ चतुर्दश भुवनाची कुसरी ॥ चतुर्दशलोक चतुर्वर्ण विस्तारीं ॥ चतुरानन निजहस्तीं ॥ १७ ॥ मधु मूरु कर्णा पासोनी ॥ निर्माण ह्मणतील पंडितजनी ॥ रक्तमोज वर्धातीं विस्तारूनी ॥ विशंती अध्यायीं परिसा पुढें ॥ १८ ॥ सारांश कल्पद्रुम चतुर्दश ॥ चतुर्दश लोक तत्प्रकाश ॥ वर्ते जगतीं अप्रयास ॥ मृत्यु तंव नसे अकाळीं कोणा ॥ १९ ॥ सर्व अस्थिगत असती प्राण ॥ बहुतेक असती इच्छा मरण ॥ त्याकाळीं पौगंडऋषीनें ॥ विमळांबुजे कांते पाचारिलें ॥ २० ॥ कृतयुगीं अस्थिगत सत्य भाषणीं ॥ त्रेतायुगीं चर्मगत प्राणी ॥ द्वापारीं मांसगत होतास मरणीं ॥ मरण पावले कुरुक्षेत्रीं ॥ २१ ॥ कलयुगीं अन्नगत असे प्राण ॥ ऐसी अनंतब्रह्मांड रचना जाण ॥ केली असे व्यासवचनें ॥ भविष्योत्तरीं बोलती ॥ २२ ॥ असो विधीनें तप दारुण ॥ दिव्यसहस्र दहा गणन ॥ केल्या संपूर्ण उघडिले नयन ॥ आचमनार्थीं आदरें ॥ ॥ २३ ॥ तंव सन्मुख देखेचि मृगमैथुन ॥ त्दयीं विंधिला बाण ॥ मनद्विजपक्ष छेदितां झालें पतन ॥ अज्ञान सागरीं बुडियेला ॥ २४ ॥ तैं आशा तृष्णा द्वैतसांगडी ॥ धरूनि पातल्या संशय दरडी ॥ तैं विरहज्वराची हुडहुडी ॥ पावेतों सन्मार्गाची पडली ॥ २५ ॥ तैं विवेकवैद्यराज परतोनि गेला ॥ तेणें करोनी विरहज्वर संचरला ॥ तंव विधीनें अवचिता लक्षिला ॥ सौंदर्य वैश्वानर भारती ॥ २६ ॥ अमृतशरीर वन्ही ॥ ऐसी भारती स्फुलिंग कीर्णी ॥ तो देखोनि संतोषला पद्मयोनी ॥ क्षेमालिंन घ्यावया ॥ २७ ॥ सरस्वती ह्मणे चतुरानना ॥ हरणी होई मृगलोचना ॥ पितृवचन अवगता हरिण ॥ झाला न कळोनि कुटिळपणा ॥ २८ ॥ भारती ह्मणे चतुरानना ॥

अभिलाषिलें कां लावण्यपणा ॥ पावसील निंद्यकर्म लांछना ॥ चतुर्दश लोकीं जाणिजे ॥ २९ ॥ भारतीच्या न
मानोनि बोला ॥ विधि अविधि मार्गें पाठीं लागला ॥ ब्रह्मांडगृहीं फिरतां देखिला ॥ तैं सदाशिवें मारिला बाण
अंबरीं ॥ ३० ॥ मदनांतकें शरासनें ॥ मृगनक्षत्र पंचलोचनें ॥ सप्तविशंती नक्षत्रांत जाण ॥ युगायुगीं तारांग-
णीं ॥ ३१ ॥ ऐसा चतुरानन मनसंकल्पें ॥ वाचांशें मनातें स्पर्शिला स्वल्प ॥ परी शरीर संबंधाचा आक्षेप ॥ घ
डिला नाहीं हरभयें ॥ ३२ ॥ हरिहर मायास्वरूपी आवरण ॥ विचरत तीव्र चंडांशकीर्ण ॥ हें संमत ब्रांह्मपुरा-
ण ब्रह्मोत्तरखंडीं सित्धांत ॥ ३३ ॥ विधीनें चतुर्दश कल्पद्रुम ॥ निर्मिले चतुर्दश गेहीं चतुराश्रम ॥ भारतीचा
धरिला काम ॥ वाचांशें लिप्तझाला चतुर्मुख ॥ ३४ ॥ आयासी अनायासी हे भावना ॥ उरली नाहीं चतुरान-
ना ॥ लिप्तझाला गर्वाभिमाना ॥ मीच सृष्टि निर्माणकर्ता ॥ ३५ ॥ तैसाचि विष्णु विश्वपाळणें ॥ अहं ब्रह्मास्मि
झालें विरूढणें ॥ हें अनादिमायेनें जाणोन ॥ अपरिव्याप्त मायासंभ्रंत्र दाखवी ॥ ३६ ॥ स्वेदज उद्भिज अंडज ॥
चतुरास्यादि जारज ॥ चवदा भुवनींचे चतुर्दश मनुज ॥ ज्यापासूनि कश्यप सृष्टी ॥ ३७ ॥ असो तें हें सृष्टिभां
डार ॥ आब्रह्मस्तंभ व्याप्त भास्कर ॥ उष्ट्रभार चालिले अपार ॥ सहस्त्रवदना न गणवे ॥ ३८ ॥ सदाशिव विधि
आणि हरी ॥ ह्मणती वनाची हे नवलपरी ॥ विरिंची ह्मणे हे अकारणकरी ॥ स्वयें निर्मिलें न वचे सर्वथा ॥ ३९ ॥
विष्णुह्मणे हें प्रतिपाळण ॥ आमुचें हस्तीं न घडे जाण ॥ संहारावर्ती उष्ट्रगण ॥ हरवदे देखील न परिवारीं ॥
॥ ४० ॥ जमाखर्ची चित्रगुप्त ॥ पाहोनि ह्मणे यद्‌थीं अलिप्त ॥ जाग्रति स्वप्न सुषुप्तींत ॥ अलकत वार्ता हे न
देखें ॥ ४१ ॥ विधिह्मणे हें कायकरणें ॥ आह्मां वांचूनि निर्मिजे कवणें ॥ ऐसें वदोनी अहंभ्रमणें ॥ शोधासी

तिघे निघाले ॥ ४२ ॥ ब्रह्मा शंकर आणि हरी ॥ शोधित चालिले पुढारी ॥ सत्व रज तमाचे आकारी ॥ अहंकारी श्रमी झाले ॥ ४३ ॥ अंत नलगे विधि शंकरा ॥ बहुत दिवस शोधिली धरा ॥ तरी चिद्गगनींचा पसारा ॥ पसरलाता अपरांपर ॥ ४४ ॥ बहुत श्रमी होतां तिघेजण ॥ शोधित चालिले अविद्याविपिन ॥ ज्यांसी चिदांश संबोधन ॥ तेचि भासासी चिदांकुरली ॥ ४५ ॥ तेचि मायाष्टधाकीर्णी ॥ जे कां चिन्मात्रका आवर्णी ॥ कांत करोनि जे अपर्णी ॥ तेचि अपर्णित प्रणवबीजा ॥ ४६ ॥ असो ते माया जगदांकुरी निःसंग अभंगा ॥ जे समाधि मीन पिपीलिका विहंगा ॥ आगम निगमागम अभंगा ॥ चिच्छक्ति निःसंगा शोभतसे ॥ ४७ ॥ निर्गुण निरुपम निर्विकारी ॥ चक्रासनीं शेषावरी ॥ चतुर्भुजालिंगांकित शरीरी ॥ पूजिला ब्रह्मकल्प पर्यंत ॥ ४८ ॥ ऐसा जो मुनिमानस आकारिला ॥ तो या त्रिजगासीं आणोनि दाविला ॥ धन्य ह्मणती विमळांबुजेला ॥ मायावेष शेषासहित आकारिलासी ॥ ४९ ॥ श्री नाथ आज्ञेनें महावनीं ॥ पातला अवतार भूधरमणीं ॥ त्याचे भारतीची सिराणी ॥ षष्ठमोध्यायीं परिसावी ॥ ५० ॥ असो विमळांबुजा करभोरुहातीं ॥ ज्योतिस्वरूपत्तेज नवरसें पाहती ॥ जैसा चिदांबरीं उगवला गभस्ती ॥ दक्षिणायनीं विमळांबुजकरीं ॥ ५१ ॥ पाहोनि स्वरूपाचे पदकमळीं ॥ अरुण रंगला प्रातःकाळीं ॥ चतुर्भुज तनु नीलोत्पलदळीं ॥ सिंहकटीमेळीं साजिरा ॥ ५२ ॥ विशाळाक्ष विशाळ ह्रदय ॥ नादब्रह्म कटीं विराजित चंद्र सूर्य ॥ किरीट कुंडलें रंगलीं वैडूर्य ॥ उत्तर दक्षिणे प्रकाशवी ॥ ५३ ॥ मंदस्मित मुखारविंद ॥ त्रिमळांबुज कराब्ज मिलिंद ॥ देखोन पातला उत्तरायणीं कलिंद ॥ श्रीनाथपदारविंद वंदावया ॥ ५४ ॥ असो ऐशा पुत्रोच्छवासी ॥ करिती अध्यायसीं सहस्रऋषी ॥ अजन्मी आखिल बटु भैरववेषी ॥

जन्मला हें तव श्रेष्ठभाग्य मुनिवरा ॥ ५५ ॥ अखिल श्री आरोग्य शरीर ॥ एकोपि गुणवान् रणधीर कुमर ॥ बहुजन्म अर्चितां हरिहर ॥ पौंगंडऋषि ऐसीं फळें पाविजे ॥ ५६ ॥ शुक्लपक्ष मधुमास वसंतकाळीं ॥ भानुवासरीं सप्तमीतें सकाळीं ॥ नाथ अवतार ह्मणोनि षष्ठीपूजा त्रिकाळीं ॥ चतुः षष्ठी चैत्रमासीं अद्यापी ॥ ५७ ॥ शुद्ध पक्ष मधुमास वसंतीं ॥ नाथ अवतार प्रिय मुनिमानस वसंतीं ॥ चतुःषष्ठी कळा पात्र पूर्णकरिती ॥ त्रिशतसाठी दुर्वांकुर शमी ॥ ५८ ॥ असो तो हा श्रीनाथ निरंजन ॥ तवभाक्तितपाचरणीं झाला सगुण ॥ हातीं अमृतपात्र असोन ॥ प्रेमपान्हा पाजविसी जननीये ॥ ५९ ॥ अगस्ति दीर्घायू गर्गाचार्य ॥ ह्मणती एक पौंगंडऋषेश्वर भार्ये ॥ याचा पराक्रम प्रतापसूर्य ॥ उगवेल दक्षिणेसी संह्याद्रीवरी ॥ ६० ॥ अगस्ति ह्मणे विमळांबुजेसी ॥ तवपुत्र अवतरला मायावेषी ॥ अष्टादशपद्म भैरवेशी ॥ त्रिशूळ खड्गवेषी धुरंधर ॥ ६१ ॥ गयासुराचे द्वयसहोदर कुमर ॥ करवीर आणि कोल्हासुर ॥ योगदंडधर रणधीर ॥ रत्नासुर रक्तभोज परिवारेसी ॥ ६२ ॥ हे दैत्य वधार्थी कार्या कारण ॥ अष्टादशभैरवी घेवोनी सैन्य ॥ जेवीं अठरापद्म वानरगण ॥ लंकेसी बाहात्तर वेळ भविष्यार्थें ॥ ६३ ॥ बाहात्तरयुगाचे प्रथमचरणीं ॥ सिद्धदळ करील खड्गपाणी ॥ अष्टादशपद्म भैरववाहिनी ॥ मार्तंडभैरवादि शतकोटी ॥ ६४ ॥ नवकोट कात्यायनी भैरवभारीं ॥ लक्ष्मी उतरली हरिद्वारीं ॥ एकमंडळ राहोनि काशीपुरीं ॥ द्वादश ज्योतिर्लिंग स्थापन करील हा ॥ ६५ ॥ कल्पांतभैरव बाळभैरी ॥ काळभैरवादि शब्द स्पर्श रस गंध भैरी ॥ हे पंचवदनापासाव जन्मले नवल परी ॥ केदारकल्पतरुग्रंथीं विचारावें ॥ ६६ ॥ असो यावरी मथुरादंदावनीं ॥ जावोनि उतरले महावनीं ॥ सर्वे घेवोन भूधरमणी ॥ पंचवटिकेशी उतरले ॥ ६७ ॥ तेथोनि गंगाद्वार

भीमाशंकरीं ॥ उतरोनि तोरणभैरव दळभारीं ॥ संह्याद्रीं धाडी तो अविचारी ॥ रत्नासुरासी मिळाला ॥ ६८ ॥ हें परिसोन तव अविनाशकुमरें ॥ वाघें गर्जविलीं ब्रह्मांडोदरें ॥ श्रियालयीं उतरोनि श्रीदळभारें ॥ दिगांबर होई ल अष्टभैरवेंशी ॥ ६९ ॥ येऊन संह्याद्रीं श्रीकेदारी ॥ रत्नासुरासी वदेल उत्तरोत्तरीं ॥ युद्धीं मिसळतील निकुरीं ॥ रत्नागिरीस बळप्रतापें ॥ ७० ॥ करवीरादिक रत्नासुरा ॥ स्वशक्तिसामर्थें करोनिमारा ॥ वधोन रक्तभोज्यादिक परिवारा ॥ लक्ष्मी स्थापील परिवारीं ॥ ७१ ॥ रत्नासुर वधोत्सव करोन भारी ॥ संह्याद्रीतें नाम ठेविलें रत्नागिरी ॥ तेथील होईल राज्याधिकारी ॥ हरिनामीं ध्वजउभारील चैत्रमासीं ॥ ७२ ॥ निशाण दुंदुभि वाजंतरें ॥ मिळतील सुरनर वरांचे भारे ॥ चांगभलियाचा करिल गजर ॥ लक्ष्मी आपुले निजमुखानें ॥ ७३ ॥ अपार करील पतितोद्धार ॥ मायावेषधारी हा भैरवाकार ॥ अवतरला विमळांबुजेच्याकरें ॥ भवजळ सैन्य उद्धारार्थी ॥ ७४ ॥ हा अजन्मी अखिल चिन्मात्र ॥ यासी कैंचें जन्मपत्र ॥ याचे गुणानुवाद स्वतंत्र ॥ आगमंत्रास्मि अमूर्तमूर्ती ॥ ७५ ॥ ज्योतिस्वरूपाचा लावण्यइंदू ॥ उगवला प्रणवांबरीं चिन्मात्रबिंदु ॥ तो विस्तार वदेल जैत्यपाळमुकुंदु ॥ निजानंदु कोंदला विमळांबुजेकरीं ॥ ७६ ॥ दिनानाथ दीनबंधू ॥ सृष्टिक्रमेचा विवेकसिंधू ॥ शब्द स्पर्श रूप रस गंधू ॥ विस्तार ज्ञानेंद्रिय ज्योतिर्मयाचा ॥ ७७ ॥ ऐसें जातक अगस्तिमुनी ॥ वदतां मंदस्मित खड्गपाणी ॥ ऋषिमुख पाहे परतोनी ॥ विमळांबुजांकीं स्तनपान करितां ॥ ७८ ॥ ऐसा ज्योतिर्मय मायावेषधारी ॥ अवतरला जो बद्रिविहारी ॥ पूर्ण ब्रह्मास्मित ब्रह्मचारी ॥ बाळकिशोर तारुण्यार्क ७९ ॥ जैसा बाळ दिवाकर गगनीं ॥ ऐसा नवकिशोर आकार तरणी ॥ अश्वारूढ दनुजदमनीं ॥ भैरवगणेशी विजनीं विचरत ॥ ८० ॥ विजनीं

केदार खेळूनि बद्रिकाश्रमाला ॥ नाथ पातला कथानुक्रमाला ॥ संतीं परिसिलें मायाविक्रमाला ॥ मही श्रमा विजय.
ला येवोनि वदली ॥ ८१ ॥ हे विभवेंद्रा प्रथमाश्रमासी ॥ घेवोनी राहिला बद्रिकाश्रमासी ॥ विध्वंसिलें तृतीय
२३ आश्रमासी ॥ करवीरादि रत्नासरें ॥ ८२ ॥ ऐशा ऐकूनि महीच्या बोला ॥ भैरवदळेसी सिद्धझाला ॥ अमरचमू
घेऊनि कमला ॥ गगनगर्जे मंगळतुरीं ॥ ८३ ॥ सिद्ध षोडश नवनाथ अमरपाळ ॥ अष्टदश सेना भैरव तुंबळ अ. ३
॥ वेष्टित चालिला दीनदयाळ ॥ शक्तिचमूसी हरिद्वारीं उतरला ॥ ८४ ॥ हे नाथ अजन्म जन्मीची सिराणी
॥ व्यासें कथिली अग्निपुराणीं ॥ योगमायेची विचित्र करणी ॥ तदाचरणीं हे विस्तारली ॥ ८५ ॥ असो शुक्लप-
क्ष मधुमास रविदिन शुभवेळ ॥ षष्ठीसह सप्तमीस नाथाचा जन्मकाळ ॥ झाला ह्मणूनी संमारंभ सकळ ॥ ज-
नेसी सप्तमी पासून पौर्णिमे ॥ ८६ ॥ यास्तव संवत्सरप्रतिपदेसी ॥ प्रारंभ केदारविजयासी ॥ श्रीनाथें करवि
ला परम संतोषीं ॥ तो विजयदशमीसी संपूर्ण करील ॥ ८७ ॥ हें दिनानाथाचें वरदवचन ॥ यथार्थ मानिजे अं-
तःकर्णीं ॥ केदारविजय करवित सदा लेखनीं ॥ भ्रमरगुंफेंत बैसोनि हरिद्रापत्रीं ॥ ८८ ॥ कीं ह्या केदारविजय
मंटपाभितरीं ॥ शुद्ध बैसका सबाह्यांतरीं ॥ पंक्ति बैसविल्या सुमनोहरी ॥ तत्वानुभवी गुणिजन मुनी ॥ ८९ ॥
सद्बुद्धि समयीं स्वल्प ॥ अहं ममतेचें भरोनि तूप ॥ पंचप्राण उजळोंनि ज्योतिस्वरूप ॥ हरिखें तनुमनेंसीं वो
वाळी ॥ ९० ॥ संत वसंतीं प्रेमलहरी ॥ पातलिया मघमघीत सह्याद्रीं ॥ सेवितां विकल्प न धरिजे अंतरीं ॥
कथांतरीं न पाहतां जन ॥ ९१ ॥ कल्पना यदर्थी कीजे मनीं ॥ त्यांनीं भविष्योतर अग्निपुराणीं ॥ पहावी कथा-
न्वय संबोधोनी ॥ केदार वदवी तैसें लेखन करीं ॥ ९२ ॥ यदर्थी अनाथ कैवारिया ॥ केदारविजय सिंधोदरिया २३

॥स्वलीळा नौका तरावया ॥ दृष्टांत रत्नवर्णी भरलीं आपार ॥ ९३ ॥ तेथें हरिनामाच्या पातल्या लहरी ॥ गर्जंत संह्याद्रि गिरीवरी ॥ आणिलें सुगंध नानापरी ॥ ते श्रवण वदनें सेविजे संतीं ॥ ९४ ॥ इति केदारविजयोत्तरें ॥ श्रवण करितां भवसिंधु उतरे ॥ जयकल्याण उत्तरोत्तरें ॥ तृतीयोध्याय गोड्हा ॥ २९५ ॥ इतिश्री केदार-विजय ॥ भविष्योत्तर अग्निपुराण विरचितायां ॥ श्रीनाथ जन्मकाळ कथनोनाम तृतीयोध्यायः ॥ ३ ॥

श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्री दक्षिणकेदारेश्वराय नमः ॥ जय अनादिपुरुषा श्रीकेदारा ॥ अहंब्रह्मास्मित ॐकारा ॥ आब्रह्मस्तंभ विश्वमंटपीं आकारा ॥ अकल्पनाकार मायामानसा ॥ १ ॥ अस्थिगत त्वचामिमांस जगदांकुरा ॥ आस्ति भाति प्रचंडांश दिनकरा ॥ अन्नब्रह्म कलीं तारक लौकरा ॥ अनीलतरळ कुहलयनयना ॥ २ ॥ आप तेज वायु खग तत्वार्थविस्तारा ॥ अनयद्वय उपनिषदार्थ विवरा ॥ अविद्यात्मक अर्थसंहारा ॥ अद्वैतभावन प्रदर्शका ॥ ३ ॥ अकल्पनाकार कृतमानसा ॥ अकल्पि सत्समागमीं सादृशा ॥ अपर्याप्त भासाभासा ॥ अश्विथऔदुंबरनिवास श्रीगुरू ॥ ४ ॥ अजन्मी जन्मिया भक्तार्थी वरदा ॥ अभिजितफल दीस्वीतसभदा ॥ अक्षकल्याण पावन तवपदा ॥ आधि व्याधि मृत्यु दरिद्र नाशना ॥ ५ ॥ कामांतका खड्ग त्रिशूळ डमरुधरा ॥ कामजननी सुत उपावितधरा ॥ ॥ काळाग्नि रौद्र भयंकरा ॥ काळचक्राग्नि प्रवर्तका ॥ ६ ॥ काळनेमा अवंचकवंचका ॥ काळांतक अक्षयी क्षं क्षर अकारका ॥ काळत्रयसाध्य काळ आकर्षका ॥ कालिंदीविहारा कालियांगजना ॥ ७ ॥ उत्तरकरवीराधीशा संह्यागद्रिवासा ॥ कमळ मायामानस नटवेषा ॥ कमळ पूजार्चनीं नवचंडिततोषा ॥ कमळमैत्री नवविध हेमकमळीं ॥ ८ ॥ खाणी मधुर कट्वाम्ल लवण चेष्टिता ॥ खाणी चत्वारिया विवर्जिता ॥ खावोनि पत्रशाख पूर्ण मनोरथा ॥ हानि आणिसी दुर्वासा ॥ ९ ॥ गांभिर्य अमित फल दातारा ॥ गोपीगीतगोविंद प्रियकरा ॥ गार्गीय दीर्घायु ऋषेश्वरा ॥ गांधर्वसिध्दिमंडळ पूजिता ॥ १० ॥ घाट पाट रोधना कुंजविहारा ॥ घावरा होऊनी धांवसी गजेंद्रोद्धारा ॥ घालिसी उडी द्रौपदीच्या कैवारा ॥ घाणियांत गाळिसी तैं कौरवा ॥ ११ ॥ नाहंवसामि वैकुंठपुरीं ॥ नारदासी वदला कनकाद्रिविहारी ॥ नाना लीलावतारी हिमकेदारी ॥ नागारि वाजीवाहान भुषा॥१२॥


अध्याय ४ था
जमदग्नीच्या आज्ञेनें परशु राम हस्तें रेणुकावध.
गाधिजराजास सहपरिवार ऋषि भोजन घालतात
कामधेनु गाधिजाचा गर्व हरिते

चारित गोवृष वनगंव्हरा ॥ चाविळसी बाळा अवळा सुंदरा ॥ चाखसी दहीं संचित फोडूनि भावरा ॥ चांचल्य अहंगोपास्थितिकारका ॥ १३ ॥ चांगला फार सुंदर खड्गपाणीं ॥ चांगला लाभ हा स्वधर्माचरणीं ॥ चांगभला उच्चारितां स्ववदनीं ॥ चांगलाच लाभ लाईजे ॥ १४ ॥ छायापति मार्तंडमंडळोदया ॥ छाला मृगासन भुजंगम पाया ॥ छापा हरिनामाकृति सदय ल्हदया ॥ छांदस योगाभ्यास कारणा ॥ १५ ॥ जाति अजाति अजन्मी विभवा ॥ जाण अजाण व्यापक देवा ॥ जागत असती विश्वघटीं संभवा ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति विरहिता ॥ ॥ १६ ॥ सोडिसी दुराभिमानाची ऊर्मी ॥ झांकिसी दोष भक्तांचे वर्ततां स्वधर्मीं ॥ झाडोनि करिसी अलिप्त भवकर्दर्मीं ॥ झाडखंडीं धुंडितां न सांपडसी ॥ १७ ॥ यांचिंतयामि सततं मयि सा विरक्ता ॥ यामीं पूजार्चनीं विधिनवनिधुकृता ॥ यास्तव अवतार धरिसी व्यक्ताव्यक्ता ॥ यावच्चंद्रार्क दृश्य अदृश्य ॥ १८ ॥ टाळिसी भक्तांच्या महारिष्टा ॥ टाकिसी द्वैत धनुष्य खंडोनि सुभटा ॥ टाळोनि अर्जुनाचा संदेह वोखटा ॥ टाकण तुरंग जुंपसी समरीं ॥ १९ ॥ ठावठिकाण तवशोधितां ॥ ठायीं न पडसी निगमीं धुंडितां ॥ ठाऊक पडसी सत्समागमीं विचरतां ॥ ठाकसी उभा हरिकीर्तनी ॥ २० ॥ डमरु पात्र त्रिशूल करभूषण ॥ डाकिनी शाकिनी वेष्टित आवर्ण ॥ डाजित रत्नासुर अंतःकरण ॥ जारण मारण रणशूरा ॥ २१ ॥ ढांडोनि केलें वेदोद्धारा ॥ ठाकसी क्रौडरूपा धरूनि आकारा ॥ ढाल खड्ग घेवोन भैरवभारा ॥ सहित हरिद्वारीं शोभसी ॥ २२ ॥ नांतःपरतव देव देवेशा ॥ नापि पूजामि जानाय पुराणपुरुषा ॥ नादब्रह्मीं कार्याकारण चिदंशा ॥ नानाभावार्थ फळदायका ॥ २३ ॥ तालाष्टमे संगीत गात सप्तस्वरा ॥ तात्काळ पावसी खळेश्वरा ॥ तारकोपदेशकृता विश्वेश्वरा ॥ त्वष्टाप्रजापति सोहं सोनारिसि

द्दा ॥ २४ ॥ तापत्रयदुरितविपिनदहना ॥ तामस राजस सत्वैक सगुणा ॥ तांब्रपर्णी विहारिया गजवदना ॥ तारकासुर मदनोत्कटा ॥ २५ ॥ थाटराक्षस वधार्थीकृत मखरक्षणा ॥ थाली अर्पिसी कुरुभूषणा ॥ स्थापोनि राज्यीं कुरुनंदना ॥ थाटकौरव तरुवरकुठारा ॥ २६ ॥ दाविसी पौंगडऋषीसी पुत्रोत्सवा ॥ दालभ्यादि ऋषिपुंगवा ॥ दानवांतका अयोनि संभवा ॥ दाविसी विमलांबुज करसंपुटीं ॥ २७ ॥ धारणोधारणान्वयप्रियकरा ॥ धारणान्वय कार्या कारण आकारा ॥ धाता विधाता ऊर्ध्व परार्ध विवरा ॥ धन्वतरिया करुणार्णवा ॥ २८ ॥ नारसिंहो वीरसिंहा ॥ नागेंद्र गुणगातां होय द्विजिव्हा ॥ नाहींच वर्णवे तवगुण जेव्हां ॥ ह्मणोनि कृपानुग्रहें मनमोहरी ॥ २९ ॥ पार न कळे ह्मणोनि शेषरसना थकल्या ॥ प्राकृतमनीं नाथकृपेनें शिरल्या ॥ पाहतां तवपदातळीं शिरल्या ॥ पात्र झाल्या क्रमणचरणा ॥ ३० ॥ फांकली रविकांति क्रमणचरणीं ॥ सौंदर्य भैरवाकृति खड्गपाणी ॥ फाल्गुन प्रियकर हेंचि भैरववाहिनी ॥ स्फालित गंगाजळ अघमर्षणीं ज्या ॥ ३१ ॥ बालार्कबिंबाय कोटिकंदर्पा ॥ बाप मंदिरींच्या कुळदीपका ॥ बाळभैरवादि अष्टदशरूपा ॥ ब्राह्मण नंदे श्रुव्दीं परिवारा ॥ ३२ ॥ भार्गववंशज नरवीरपंचानना ॥ भार्गवकोदंड भवभंजना ॥ भावार्थरामायणीं अहंदशकंठ दमना ॥ भारतीं अर्जुना गीतार्थ बोधका ॥ ३३ ॥ मायामानसवेषिया खळेश्वरा ॥ मार्तंडभैरवेसी तुरंगाविहारा ॥ मायबाप पुष्यनक्षत्र कृतांतरा ॥ मायापावनचक्री प्राधान्या ॥ ३४ ॥ पवन सूर्य असे गगनीं ॥ यालागीं पौंगडऋषि विमलांबुजाजननी ॥ यास्तव नाथाचीं मायबापें दोनी ॥ पुष्यनक्षत्र सप्तविंशांतिमाजी ॥ ३५ ॥ ल्हान स्थूल सूक्ष्मावतारा ॥ लांब रुंदी आब्रह्मस्तंभ महोदरा ॥ लाक्षारस सुवर्णाकारा ॥ लागला ध्यास तवपदाचा ॥ ३६ ॥

रातोत्पलदळ जलजवर्णा ॥ राजीवनयना भृगुटिळका आकर्णा ॥ राधानाथा मनरंजना ॥ रामकृष्ण अवतारि
या ॥ ३७ ॥ त्रिशूळ खड्ग पात्र डमर मंडितकरा ॥ वाजिवाहान दैत्यसंव्हारा ॥ वारिजाक्षी परमप्रियकरा ॥ वारि
सी संकट मंदोल्धरिया ॥ ३८ ॥ सार्वभौम चित्पर्दांच्या आधिवटांशा ॥ सामुद्रिक कार्यकारण सदृशा ॥ शामसुं-
दर चित्प्रकाशा ॥ सारासार विचार विवरा ॥ ३९ ॥ शेषकुंडल मणिमयदंशा ॥ शेषारूढ मुगुटावतंसा ॥ शंख च
क्र त्रिशूल खड्ग विशेषा ॥ शेष अशेष होऊन क्रमणपर्दी दृडी ॥ ४० ॥ शास्त्रवेत्ता शास्त्रकर्त्तारा ॥ शास्त्रमंत्राक्ष
बीज प्रखरा ॥ शास्त्रशासन खळेश्वरा ॥ शास्त्राधारो जघन्मया ॥ ४१ ॥ हरिहर ब्रह्मारवाग्निवेषा ॥ हरिद्वारीं उत्त
रलासी हर्षा ॥ हरिकीर्तन नगाऱ्यांच्या घोषा ॥ हर हर ह्मणती घनघोरें ॥ ४२ ॥ क्षेत्रपाळ क्षयरहिता ॥ क्षात्र
ज्ञयो रणदीक्षिता ॥ क्षीराब्धिरिपु यदर्थी वदतां ॥ बत्तिसाक्षरीं सुमनोहरी ॥ ४३ ॥ अकारा पासोन क्षकारी ॥ ब-
त्तिस अक्षरें सुमनोहरी ॥ गुंफिलीं हरिया तुळशी आपादवरी ॥ तेणें बद्रिविहारीशोभला ॥ ४४ ॥ जय पौ-
ंडऋषिनंदना ॥ जयविमळांबुजा ह्दयरत्ना ॥ जय दनुजदळ भवभंजना ॥ जयबद्रिनारायणा सगुणानि-
धी ॥ ४५ ॥ जयजय हरि हरा पूर्णब्रह्मा ॥ जय भक्तकाम सुफळित कल्पद्रुमा ॥ जयश्रीहरि पुराणपुरु
षोत्तमा ॥ मुनिजन विश्रमा नव निधी ॥ ४६ ॥ मच्छ अवतारिया मंदारोद्धरा ॥ मंदाकिनी प्रिय सुमनोहरा ॥ म
दनमूर्ति नटनागरा ॥ मनमोहना कमठस्वरूपा ॥ ४७ ॥ वामन बटु वराह भैरवरूपा ॥ नारसिंहभार्गव बळप्रतापा
॥ माया चंडांशकुळदीपा ॥ श्रीकृष्ण बौद्ध कलंकिया ॥ ४८ ॥ दश अवतारिया शिखामणी ॥ तुरंग वाहनीं खड्ग
पाणी ॥ ब्रद्रिकाश्रमिया त्रिगुणगुणीं ॥ अवतारला श्रीखळेश्वर ॥ ४९ ॥ विष्णुमुगुट अहंकार सहस्त्रकीर्णें ॥ ह्मा

ला मायावलोकनें ॥ हयग्रीवावतार जाहलें कथन ॥ ब्रह्माभारती नक्षत्र अवगली ॥ ५० ॥ शताननींचे हरिहर ॥ झाले मूळमायेच्या विचारें ॥ ज्योतिस्वरूप ज्ञानेंद्रिय भैरवाकारें ॥ पौगंडऋषिकुळीं अवतरले ॥ ५१ ॥ हा पूर्वाध्यायीं कथारस गहन ॥ कलशोद्भव सहस्रकीर्ण ॥ मुक्तकरितां विंध्याद्रिशयन ॥ केलें नर्मदेतटाकीं ॥ ५२ ॥ पृथ्वीचीं करुणोत्तरें ॥ परिसोनि बद्रिविहारें ॥ आकारिले कल्पांत भैरवाकार ॥ जमदग्निरव अवतरिला ॥ ५३ ॥ तृतीयोध्यायींचें निरूपण ॥ संत पंडितीं केलें श्रवण ॥ आतां परिसा विचक्षण ॥ हरिखें केदारविजय यथार्थ ॥ ॥ ५४ ॥विधि हर विष्णुरूपी खळेश्वर ॥ सवें घेऊन भैरवभार ॥ नवलक्ष ऐशींहजार ॥ पैगंवरभारीं शोभला ॥ ॥ ५५ ॥ सोळासिद्धि नवनाथनिधी ॥ सवें घेवोनि अष्टमासिद्धी ॥ भैरवी चातुरंग सैन्यउदधी ॥ लोटला दक्षिणदेशावरी ॥ ५६ ॥ विजयी दुंदुभीच्या महागजरीं ॥ गर्जत पातले मायापुरीं ॥ मोक्षपुरींमाजी द्वारीं ॥ स्वचमूसी ब्रद्रिविहारी उतरला ॥ ५७ ॥ सूताप्रति शौनक ह्मणें ॥ कथा व्यसनीं भुलले मन ॥ काय निमित्य जमदग्नीनें ॥ क्रोध टाकिला सागपां ॥ ५८ ॥ ऐसी ऐकोनि शौनकवाणी ॥ सूत वदे हे चातुर्यखाणी ॥ व्यासशब्द कनकरत्नाभरणी ॥ भविष्योत्तर रुक्मकोंदणीं जडियेला ॥ ५९ ॥ तेचि कथेचे चिद्रत्नी अळंकार ॥ शौनक श्रवणीं कुंडलाकार ॥ डोलती यदर्थी सुमनोहर ॥ तोचि चतुरीं ज्ञानार्थ लक्षिजे ॥ ६० ॥ कौशिकदेशींचे राजेश्वर ॥ गाधिराजयाचे कुमर ॥ विश्वामित्र नामा नृपवर॥ धनुर्धर प्रतापी भूमंडळीं ॥ ६१ ॥ क्षत्रियामाजी जो मुगुटमणी ॥ तेजानें जैसा दिव्यतरणी ॥ कीं नक्षत्रामाजी सुधाकीर्णी ॥ तैसा क्षत्रियामाजी विराजमान ॥ ६२ ॥ कीं वृक्षामाजी कल्पतरू ॥ अचळामाजी महामेरू॥ कीं परिमळांत जैसा मलयागरू ॥ कीर्ति सुगंध तैसा मघमघी ॥ ६३ ॥ असो विश्वा

मित्र ऐसियेपरी ॥ राज्यकरी सपरिवारीं ॥ तंव एकेदिनीं चमूघेऊनि सारी ॥ घोर कांतारीं प्रवेशला ॥ ६४ ॥ मृगया खेळ खेळूनि कुशला ॥ जमदग्नि आश्रमा समीप पातला ॥ विश्वामित्र स्वमनीं संतोषला ॥ ऋषि आश्रमासी पाहोनी ॥ ६५ ॥ रथाखालीं उतरूनि राय ॥ वंदी जमदग्नीचे पाय ॥ गौरऊनि महदाश्चर्य ॥ सदय व्हदय तोषवी ॥ ॥ ६६ ॥ देखोनि राजा वीर शौर्य ॥ चातुरंग सैनेसी महदैश्वर्य ॥ रेणुकासती करी आश्चर्य ॥ धन्य नृपवर्य पूर्वार्चितीं ॥ ६७ ॥ हे विश्वामित्र दैवीसपत्ती ॥ याची अचळ हो यशकीर्ती ॥ हें जाणून रेणुकासती ॥ जमदग्नीप्रती वदतसे ॥ ६८ ॥ चमू सहित विश्वामित्रा ॥ भोजनीं तोषवावें ऋषिपवित्रा ॥ गृहाजातां गाधिपुत्रा ॥ महाद्भुतयश वर्णिजेती ॥ ६९ ॥ परिसोनि रेणुकेची मात ॥ जाणोनि पुढील भविष्यार्थ ॥ ह्मणे रेणुके भोजनांतीं अनर्थ ॥ घडेल तोही देखसी ॥ ७० ॥ रेणुका ह्मणे हे महाऋषी ॥ होणार होईल भविष्यीं ॥ ऐसें ऐकोनि निश्चयासी ॥ नृपासी आमंत्रणासी दिधलें ॥ ७१ ॥ नृपचमू परिवारेंसी भोजना ॥ सांगोनि ऋषि बैसला अनुष्ठाना ॥ तैं चंडांश पातला माध्यान्हा ॥ सूत ह्मणे हे शौकनमुनी ॥ ७२ ॥ वाढवेळ लागला स्वयंपाकासी ॥ सूर्या पातला आस्ताचळासी ॥ केधवां ऋषि स्वसैन्यासी ॥ देईल भोजनासी कळेना ॥ ७३ ॥ ऐसा करोनि दृढविचार ॥ नृपवरें धाडिले परिचार ॥ ते येवोनि सकळ समाचार ॥ नृपवरातें ऋषीचा ॥ ७४ ॥ दूत सांगती गाधिजराया ॥ गोमय मज्जन करोनवांयां ॥ ऋषि बैसला तपश्चर्या ॥ स्वयंपाक कार्यासी दिसेना ॥ ७५ ॥ कंदमुळाचे ऋषि आहारी ॥ त्याचा स्वयंपाक कोण करी ॥ भोजना यावें ऋषि सह परिवारी ॥ कवणें हातीं आंवतिलें ॥ ७६ ॥ शतं विहाय भोक्तव्यं ॥ भोजन करावें त्यजोन सहस्रकार्य ॥ कोटिकाम त्यजूनि करी दातव्य ॥ यदर्थी भुंक्तव्य

दिसेना ॥ ७७ ॥ अग्निहोत्रादि वैश्वदेव ॥ आहुति विरहित आगमोक्ति सर्व ॥ रिक्तचरुपात्रामाजी अपूर्व ॥ दर्विमात्र देखिली ॥ ७८ ॥ अष्टदशांतील एक धान्य ॥ ऋषिगृहीं नसे जाण ॥ गृहांतरही संकीर्ण ॥ तुळशी वृंदावन अपूर्वमात्र ॥ ७९ ॥ स्वप्नांतरीं न देखती पक्वान्न ॥ तेथें कैचें मिष्टान्नभोजन ॥ ऐसें पारिसोनि दूत वचन ॥ गाधिज मनीं आश्चर्य करित ॥ ८० ॥ हें जमदग्नीस कळतां चित्तीं ॥ विस्तीर्ण गृह मंटपाकृती ॥ स्थळो स्थळीं बैसका चित्राकृती ॥ सप्तरंगी निर्मिल्या ॥ ८१ ॥ कामधेनूची करितां प्रार्थना ॥ विस्तीर्ण निर्मिलें मंटपस्थाना ॥ तें दूत धाडोनि भोजना ॥ गाधिजासी आणिजे ॥ ८२ ॥ सैन्यासहित विश्वामित्राला ॥ रेणुकेपवित्रें दूत धाडिला अस्ताचळा सूर्यपातला ॥ भोजना सर्व आणविले ऋषीनें ॥ ८३ ॥ दूत जाऊनिशीघ्रगती ॥ ह्मणती राया कृपा मूर्ती ॥ घेवोनि सेना संपत्ती ॥ सत्वरगति भोजनायावें ॥ ८४ ॥ ऋषिप्रसाद घ्यावयासी ॥ सत्वर उठावें स्वसैन्यासी ॥ अन्नें वोगरिलींपात्रेसी ॥ तीं निवतील अविलंबें ॥ ८५ ॥ परिसोनि चारमुखींची वाणी ॥ विश्वामित्र उठिला तेचिक्षणी ॥ पातला ऋषीचे गृहांगणीं ॥ मंटपीं बैसला स्वसैन्यासी ॥ ८६ ॥ तें ऋषीनें करितां धेनुपूजन ॥ सुवर्ण ताटीं षड्रस पक्वानें ॥ वोगरोनि ठेविलीं इच्छा भोजनें ॥ आश्चर्य करिती लहानथोर ॥ ८७ ॥ लेह्य पेह्य चोष्य खाद्य जे ॥ अक्रोड बदाम फणस बीज ॥ पूर्णपोळी भक्ष भोज्य ॥ स्तब्द ऊब्जेसी सेविती ॥ ८८ ॥ अंबू लवण हुताशन ॥ विरहित निर्मिलीं चतुराननें ॥ तें ह्या षड्रसामाजी अभिधान ॥ खूण विचक्षण जाणती ॥ ८९ ॥ जिव्हेनें चाटूनि घेईजे रसासी ॥ लेह्यबोलिजे नामतयासी ॥ उदका ऐसें ठेवी संतोषीं ॥ पेह्य नाम तयासी ह्मणिजे ॥ ९० ॥ रस चोखोनि घ्यावा सुरसें ॥ थुंकोनि सांडिजे चाक

सें ॥ त्या नाम बोली च्योष्ये ॥ सुपशास्त्रीं हें बोलिलें ॥ ९१ ॥ कट्त्राम्लादि तीक्ष्ण ॥ मधुरादि षड्रस नामा भिधान ॥ भिन्न भिन्न सुगंधपण ॥ पक्वान्नें सन्माने मिरवती ॥ ९२ ॥ ऐसीं षड्रसें कनक पात्रीं ॥ वाढिती चपळा कुरंग नेत्री ॥ पक्वान्नेंसी मघमघी धरत्री ॥ तो सुवास पातला मलयाचळा ॥ ९३ ॥ अक्रोड बदाम गोडंबिया ॥ घृत शर्करेसी लाडू बुंदिया ॥ खीरण्या फळसे खर्जुरी चारोळिया ॥ अंबोळिया फणसपोळ्या ॥ ९४ ॥ सपीठ सोजीच्या पोळिया ॥ घृत शर्करेसी तळिलिया ॥ अरुवार गुळवर्येसी साजरिया ॥ कुरवंडिया मांडेसी फेण्या ॥ ९५ ॥ मूगवडेसी चणकवडिया ॥ आंबवडीसी तीळवडिया ॥ कथिकावडेसी सालपापडिया ॥ सांडगे कुष्मांडमिश्रिताचे ॥ ९६ ॥ दध्योदनेंसी कुसुमकळिया ॥ जैइया मालती बकुल मलिया ॥ त्यावरी चंपक पीलोत्पलिया ॥ तैसें बोदनावरी परान्न ॥ ९७ ॥ गोधूमगर्भश्वेत सेवया ॥ मालगव्हले घोळबोटविया ॥ शर्करा मिश्रित सगर्भ फेणिया ॥ चत्वारी विंशति शहाणिया वाढिती ॥ ९८ ॥ दधि मधु वडेसी लोणचिया ॥ पापड सुरण मान्मूळिया ॥ आंबे लिंबें निर्गुडिया ॥ मेथकुटादि तीक्ष्ण ॥ ९९ ॥ दधिसार दुधसारीं ॥ राजस वाढल्या कोशंबिरी ॥ चतुःषष्ठी पत्रशाखा घेऊनि करीं ॥ शाकंबरिया वाढितसे ॥ १०० ॥ असो विश्वामित्र नृपनाथ ॥ चमूसहित झाला तृप्त ॥ अंचवले स्वसैन्या समस्त ॥ विडे दिधले त्रयोदशगुणी ॥ १ ॥ विश्वामित्र ह्मणे हें निजमानसीं ॥ केवढें सामर्थ्य ऋषीश्वरासी ॥ जेजे इच्छा असे जयासी ॥ ते ते पुरविती आठ नौजणी ॥ २ ॥ द्विपदा आणि त्रिपदा चतुष्पदी ॥ त्यामाजी शाखा भया अनादी ॥ तत्पद असिपद त्वंपदी ॥ चत्वारीविंशती देखियल्या ॥ ३ ॥ येरीति कल्पोन गाधिराया ॥ क्षण क्षणा करित आश्चर्या ॥ हा जमदग्निऋषि महावर्या ॥ धन्य ध

न्या त्रैलोकीं ॥ ४ ॥ चतुर्दशामाजी परम ॥ कामधेनु रत्न उत्तम ॥ इच्छा भोजनाचा काम ॥ पूर्ण झाला इचे-नी ॥ ५ ॥ ऐसें कुटिल कल्पोन मनीं ॥ उठोन वंदिला जमदग्नी ॥ ह्मणे त्रिभुवनीचा मुगुटमणी ॥ तूंचि एक देखिलासी ॥ ६ ॥ गाधिज ह्मणे हे देवऋषी ॥ तृप्तिपावलों सैन्यवैभवेसी ॥ परी एक अपेक्षा असे मानसीं ॥ तें कार्यसिद्धीसी नेइजे ॥ ७ ॥ कामधेनु देऊनि आह्मां ॥ संतोषवावें मुनिंद्रोत्तमा ॥ धनसंपत्ति ठेवा उत्तमोत्तमा ॥ अपार देईन मनेच्छा ॥ ८ ॥ ऐसी ऐकोनि नरेंद्रवाणी ॥ जमदग्नि वदे हास्यवदनीं ॥ ह्मणे राया मुगुटमणी ॥ तूंचि एक देखिलासी ॥ ९ ॥ त्रिकाळ होमालागीं जाण ॥ लक्ष्मीभगिनी सातवें रत्न ॥ स्थापोनी गेला चतुरानन ॥ तें त्वां विपरीत न करावें ॥ १० ॥ हे नव्हे द्यावयाची वस्तु ॥ सर्पमणिया घालितां हस्त ॥ मृत्यूवीण नव्हे प्राप्त ॥ मग त्या माणिक्यास कवणें घ्यावें ॥ ११ ॥ ज्याचे घरीं भक्षिलें अन्न ॥ त्याचोंचि करावें धेनुहरण ॥ हें कैसें तुझिया निर्मळमनें ॥ अंगिकारिलें कैसें कळेना ॥ १२ ॥ जमदग्नीचें बोलणें ॥ गाधिज झाला क्रोधायमान ॥ चमू सज्जोन प्रधानासी ह्मणे ॥ कामधेनु सोडोनि आणावी ॥ १३ ॥ राजाज्ञा होतां प्रधानासी ॥ वेढिलें जाऊनि ऋषिआश्रमासी ॥ सोडावया कामधेनूसी ॥ प्रधान मंत्री पातले ॥ १४ ॥ लक्ष्मीची हे धाकुटी भगिनी ॥ ह्मणे हें विपरीत झालें जमदग्नी ॥ गर्जना करित अंगरोम उभारूनी ॥ शृंगें ताडिलें तें प्रधानासी ॥ १५ ॥ पुच्छ मस्तकीं मनोहर ॥ वाहोनी चालिली पवनाकार ॥ तैं पाठी लागला राजभार ॥ शस्त्रास्त्रीं मारिती ॥ १६ ॥ धेनुरक्त पडतांचि तीव्र धरणीं ॥ तेथोनि अविंध झाले तांत्रवर्णी ॥ जन्मोनी मिसळले घोरकंदनीं ॥ गाधिज नृपवरा त्रासिलें ॥ १७ ॥ मे खुरापासोन खुरासनी नामें ॥ रोमा पासोन रोहिले रूमशामे ॥ अविंध जन्मले गोमेध कर्दमें ॥ विविधानामें संग्राम करि-

ती ॥ १८ ॥ ऐसा संग्राम घोरांदर ॥ करितां श्रमीझाला ऋषेश्वर ॥ जर्जर केलें राज्यदळभार ॥ युद्ध धुरंधर क
र्शोनियां ॥ १९ ॥ जर्जर करोन नृपवरदळ ॥ उरलें त्यातें सुटलापळ ॥ गाधिज सर्वार्थी निर्बळ ॥ राज्यमंडळ त्या-
गिलें ॥ २० ॥ धिग् धिग् क्षेत्रियांशाजिणें ॥ धिग् तें क्षेत्रकिरणीं हीन ॥ वर्णांनां श्रेष्ठ ब्राह्मण ॥ पुराणीं श्रव-
णीं विख्यात ॥ २१ ॥ याचिदेहीं खडतर तपें ॥ करोन व्हावें ब्राह्मणस्वरूपें ॥ दीर्घ करोनि दृढसंकल्पें ॥ देह भस्म
करावा आपुला ॥ २२ ॥ नव्याणव कोटी संवत्सर ॥ तपश्चर्याग्नि धुरंधर ॥ केलें जितेंद्रिय निराहार ॥ लोहचूर्ण भक्षोनियां
॥ २३ ॥ जठराग्नि प्रज्वाळून गाधिजकुमरें ॥ शरीरभस्म करोनि सारें ॥ पुनरपि होऊन विश्वांकुरें ॥ अतींद्रिये
सी तप दारुण करितसे ॥ २४ ॥ अर्ध ब्रह्मकल्पांत ॥ तप आचरला अत्यद्भुत ॥ ब्रह्मत्व पावला स्व सामर्थ्यें ॥ प्र
ख्यात तेज सप्तऋषिमंडळीं ॥ २५ ॥ ब्रह्मऋषि न ह्मणती आपणा ॥ ह्मणोनि वसिष्ठाच्या शतनंदना
॥ मारून पुनरपि जीवविले प्राज्ञा ॥ तो हा विश्वामित्र पुन्हा सृष्टिकर्ता ॥ २६ ॥ असो इकडे जमद-
ग्नी ॥ अयुक्तमानी आपुलेमनीं ॥ गोरक्तोद्भवें जन्मले जनीं ॥ दुरत्यै राक्षस यवन ॥ २७ ॥
हें पाहोन ऋषिसत्तमा ॥ पाचारोनि भार्गवरामा ॥ तयासी आज्ञापि उत्तमोत्तमा ॥ मायर्थमाहारणार्थीं ॥ २८ ॥
ताताज्ञेनें वधोन माया ॥ हस्त जोडोन उभा विनया ॥ हें देखोनि संतोष आणि विस्मया ॥ अतींद्रिय पुत्रासी
वदतसे ॥ २९ ॥ अपेक्षित मातें मागेंवर ॥ तो मीं देईन सुमनोहर ॥ कांतेचेनि भोजनोच्छव गोरुधिर ॥ पाहि
ल्या प्रायश्चित्त जाहलें ॥ ३० ॥ परिसोन जमदग्नीचें वचन ॥ परशराम हर्षायमान ॥ ह्मणे जननीसी उठऊनी
होम हवन ॥ त्रिकाळींचा करावा ॥ ३१ ॥ तथास्तु वदे जमदग्नी ॥ वरदोत्तरें सिंपोनि पाणी ॥ रामें उठवोनि

यां जननी ॥ लोटांगणें वंदिली ॥ ३२ ॥ ऋषीनें जाणून स्वविवेकें ॥ कांहीं न करितांचि विवेक ॥ घडविलें स्त्रीहत्येचें पातक ॥ कवणें कर्में कळेना ॥ ३३ ॥ दीर्घ विचारून अतींद्रिय अंतरीं ॥ ह्मणे कवण या शरीराधिकारी ॥ काम क्रोध दंभ अहंकारी ॥ मद मच्छरी षड्रिपुहे ॥ ३४ ॥ क्रोध करवील हत्येचें पाप ॥ घडवितां जाळील पश्चात्ताप ॥ रामा सारिखा होता कुळदीपक ॥ ह्मणोन उजळला रेणुकामंदिरीं ॥ ३५ ॥ स्त्रीहत्येचा घडविला दोष ॥ हे कीर्तिवाढली भुवनचतुर्दश ॥ क्रोधत्यजावा सारांश ॥ या स्वदेहा विरहित करावा ॥ ३६ ॥ जमदग्नि क्रोधासी ह्मणत ॥ बाहेर यावें सोडोन देहातें ॥ हे क्रोधें परिसोन सक्रोध मात ॥ जमदग्नीतें वदतसे ॥ ३७ ॥ क्रोधा वांचोनियां शरीरा ॥ कवण वागवील गा मुनिवरा ॥ तुझिया क्रोधाचा दरारा ॥ देव दैत्यांस मग कैंचा ॥ ३८ ॥ कैंचें महत्व मान सन्मान ॥ कैंचें जपतप अनुष्ठान ॥ कवण करील दशइंद्रियांचें आवर्ण ॥ गमनागमनीं मजविना ॥ ३९ ॥ मी तुझ्या शरीरा विरहित ॥ होतां होसील सजीव प्रेत ॥ पावसील क्षणक्षणा अनर्थ ॥ प्राणांत समयीं तुज कोण रक्षी ॥ ४० ॥ ऐसें वदोन सक्रोध वचन ॥ बाहेर पातला दैदिप्यमान ॥ तो प्रळयाग्नीचा हुताशन ॥ जगत्रय जाळूं ह्मणतसे ॥ ४१ ॥ जमदग्नि क्रोधाग्नीच्या ज्वाळा ॥ जाळूं शकती या भूगोळा ॥ सप्तार्णवींच्या तुंबळजळा ॥ शोषावया रवाग्नि कल्पांतींचा ॥ ४२ ॥ थरारिलीं सप्तपाताळें ॥ सकंप झालींकाद्रव्यकुळें ॥ हें जाणोन अमरपाळें ॥ दश त्रिगणेशीं पातला ॥ ४३ ॥ जमदग्नीतें सहस्रनयन ॥ वंदोन ह्मणे करुणा वचन ॥ तुमचा रवाग्नि प्रळयवर्ण ॥ जाळूंशके ब्रह्मांडागारा ॥ ४४ ॥ ऋषीनें कथिली गाविजकरणी ॥ ह्मणोनि त्यजिला मद्रवाग्नी ॥ स्त्रीहत्याच्या दोषभवनीं ॥ बध्द झालों सुरेशा ॥ ४५ ॥ तें परशराम मागोनि वरा ॥ उठवी कांता सुरेश्वरा ॥ आतां रवाग्नि वैश्वानरा ॥ अं

गिकारार्थी विलोकीं ॥ ४६ ॥ तैं सुरेंद्र ह्मणे परशरामा ॥ अर्धी रवाग्नीची गरिमा ॥ स्वीकारोन नरेंद्रोत्तमा ॥ शिक्षा करोनि त्यासी वधावें ॥ ४७ ॥ एकविंशति आवर्तनीं ॥ निक्षेत्री करावी हे मेदिनी ॥ अर्ध विभागाचे दशांश करोनी ॥ समुद्र काननीं विश्वास त्रयविभागीं ॥ ४८ ॥ नवविभाग देईं नवनाथ प्रियकरा ॥ दशमभागाचे त्रिगुणाकारा ॥ एक समुद्रीं दुसरा कांतारा ॥ तिसरा विश्वोदरीं संचरवी ॥ ४९ ॥ हें प्रत्यक्ष देखती जन ॥ श्रीव्यासाचें हें मुख्य वचन ॥ नवविभाग हेमाद्रीतें देवेंद्रानें ॥ दिधले नवनाथ नवचक्रेश्वरा ॥ ५० ॥ तीनविभाग दशांशाचे ॥ देवेंद्रें करोन प्रथम साचे ॥ काष्टांतरीं ठेवितां अरणाचे ॥ युग्मकाष्टीं मंथोनि प्रगटे ॥ ५१ ॥ यज्ञारंभीं मंथन कर ॥ प्रगटहोय वैश्वानर ॥ तैसाचि दग्ध करील कांतार ॥ निर्मनुष्य ज्या वनगंव्हरीं ॥ ५२ ॥ शतयोजने सिंधुजळें ॥ जाळित द्वितीयभाग वडवाग्नळें ॥ तृतीयभाग मनुष्यादिधला प्रबळें ॥ ह्मणोन जमदग्नि क्रोधी ह्मणती ॥ ॥ ५३ ॥ ऐसा पांचाजण्या रवाग्नि दिधला ॥ अर्ध स्वीकारितां रामें प्रबळा ॥ एकवीस वेळ धरत्रिपाळा ॥ क्रोधाग्निरवें जाळिलें ॥ ५४ ॥ नवरवाग्नीचा अवतार ॥ धरिला त्रिगुणीं सगुणाकार ॥ ह्मणूनि नाम रवळेश्वर ॥ आगमोत्तरीं ठेविलें ॥ ५५ ॥ सत्व रज तमाच्या आकारें ॥ उत्पत्ति पाळण संव्हारें ॥ पूर्वीं होता प्रथमाकारें ॥ तोएक ज्योतिस्वरूप झाला ॥ ५६ ॥ ब्रह्मांडाच्या घडामोडी ॥ एकठायीं बैसोंनि दंडीं ॥ कीं सद्भक्ताचेनिज आवडी ॥ हिमकेदार हा अवतरला ॥ ५७ ॥ कीं रत्नासुराचा वधोत्सव करावा ॥ कीं आपुलाच बळप्रताप मिरवावा ॥ कीं हरिकीर्तीचा ध्वज उभारावा ॥ श्रीरत्नागिरीवर चैत्रमासीं ॥ ५८ ॥ किंवा मधुमास वसंतीं ॥ कोकिळान्वय मुनिमानस वसंतीं ॥ दुंदुभिनादें ध्वज पताका उभविती ॥ तो दिग्विजयघोष ऐकावया ॥ ५९ ॥ ऐसा त्रयदेवात्मक ब

द्रिविहारी ॥ येवोन उत्तरला हरिद्वारीं ॥ ते कथा तृतीयोध्यायीं विस्तारीं ॥ श्रीनाथ अवतार नवरस कथियेला
॥ ६० ॥ कीं हा केदारविजय इक्षुदंड ॥ कीं पस्तीसकांडियाचा पुंडाऊंस उदंड ॥ मूळ वाढिया सारिखा अखंड ॥
कथारस प्रचंड भरियेला ॥ ६१ ॥ पस्तीसकांडियाचा पुंडाऊंस ॥ मुळाग्रापासोन सारिखा रस ॥ भरला तो चतुर
श्रोतेमानस ॥ श्रवणाननीं सेविजे ॥६२॥ श्रीमत्केदारविजय सारें॥ पाविजे भवसिंधूच्या पारें ॥ संतीं सेविजे सुम
नोहरें॥श्रीव्यासोत्तर हें त्रिवाचा ॥ ॥ ६३ ॥ इति केदारविजय वल्ली ॥ केदारकल्पतरु हरिनामामृत फुलली ॥ ल
विन्नली ॥ चतुर्थोंध्यायीं सेवोत गोडही ॥ १६४ ॥ इतिश्री केदारविजय भविष्योत्तर केदारखंड विरचितायां ॥ र-
वाग्नि रसनत्राभिधान ॥ गाधिजगर्व हरणोन्नाम ॥ चतुर्थोऽध्याय गोडहा ॥ ४ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥


अध्याय ५ वा.
केदारनाथ
रुधिरोद्गारी
काशीक्षेत्र

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय केदार उदंड प्रचंड दिनकरा ॥ ऊर्ध्वमूल अकल्प कल्पतरुवरा
॥ उपनिषदार्थ जगदांकुरा ॥ उर्वरीत महोदयार्णव स्वरूपा ॥ १ ॥ उमाकांत सदाशिव गुरुवरा ॥ उपासका बा-
ळार्क यंत्रोद्धारा ॥ उन्मनि मंदिरीं सुषुम्ना आकारा ॥ उपरतिया उपवीतधरा ॥ २ ॥ उर्वी उद्धार घृतावतारा ॥
उत्पात दैत्यदमनीं प्रखरा ॥ उपेंद्र मधुसूदना बद्रिविहारा ॥ उत्पत्ति पालन संहारका ॥ ३ ॥ उलूक मांडव्य चि-
त्तानंदकंदा ॥ उत्तम भृगुलांच्छन व्हदयारविंदा ॥ उत्तरोत्तर रसिक प्रसित्धा ॥ उठविसी रोमांच अष्टभावार्थीं ॥ ४ ॥
उदास बालोन्मत्त वैरागरा ॥ उरगकुंडलें शशिशेखरा ॥ उर्वशी रंभा गायन प्रियकरा ॥ उच्चैश्रवानुज वाहना ॥
॥ ५ ॥ प्रवृत्तीश्वर श्रीनाथानिरंजना ॥ प्रकृति निवृत्ति गुणनिर्गुणा ॥ प्रयाग अक्षयवटपत्रीं शयना ॥ प्रसिल्वउतरला
सी हरिद्वारीं ॥ ६ ॥ प्रजोत्पत्य पालनाश्रिया ॥ प्रणवबीजाक्षरी संसृति आश्रया ॥ प्रगटलासी विमळांबुजे क-
रीं खेळाया ॥ प्रत्यक्ष शतशीर्ष त्रयमूर्ती ॥ ७ ॥ प्रधान अष्टदळीवर भूषणा ॥ प्रतापकल्पांत भैरवमंडित सेना ॥
प्रकाश व्यापिजे चंडांशकीर्णा ॥ प्रळयीं जगत्रय उदरस्था ॥ ८ ॥ प्रदीप्त खाग्नि खावतारा ॥ प्रळयाग्नि वटुभै
रव आकारा ॥ प्रमदा कमळेच्या नवकोटिपरिवारा ॥ प्रसिद्ध परमेश्वरा खळनाथा ॥ ९ ॥ पौष्य हेमंतु कुसुमाक
रा ॥ पौलस्तिसंतति क्षयकरा ॥ पौगंडऋषिनंदना सुंदरा ॥ पुष्यनक्षत्रविमळांबुज करभूषणा ॥ १० ॥ प्रभव वि
भवान् संवत्सरा ॥ प्रतापसमुद्रा सौदागरा ॥ प्रगटलासी मम व्हदयांतरा ॥ प्रसाद केदारविजय विरचिता ॥ ११ ॥
त्रयदेवात्मक श्रीगुरुनाथा ॥ त्रंयंबका श्रीपादवल्लभ समर्था ॥ त्रेतादि कली भक्तानुग्रहार्था ॥ तृष्णाहारका कृष्णा
विहारिया ॥ १२ ॥ गोपाळ गौमतीतीरनिवासा ॥ गोधनाधिप व्रजविलासा ॥ गोवर्धनोद्धारणाश्चर्य सुरेशा ॥ गो

पीभुजांगी मलयागरा ॥ १३ ॥ देवतांत श्रेष्ठ गुरुनाथ अचळ ॥ ह्मणोन रामकृष्ण अवनारीं सकळ ॥ गुरुशुश्रू-
षा करिती स्वलीळे ॥ भजनमार्गदाविला सकळां ॥ १४ ॥ ह्मणोन गुरुपीठदत्तात्रय ॥ ज्योतिर्मय व्यापिलें जग-
त्रय ॥ अवतार अंबरींचे सूर्य ॥ त्रिगुणाकारी सगुण उगवले ॥ १५ ॥ गुरुनाथ आणि खळनाथ ॥ दोनाम ए-
कचि व्यक्ताव्यक्त ॥ संदेह मानिती अपंडित ॥ भेदभाव मतें करोनियां ॥ १६ ॥ श्रीगुरुनाथरूपी एकघरी दो
नामीं ॥ अवतरले भक्तार्थी सकामकामीं ॥ भूषित सर्वांतरात्मीं ॥ श्रीबद्रिकेदार ज्योतिस्वरूप ॥ १७ ॥ तत्वानुभ
वकमळलोचना ॥ जय ज्योतिस्वरूप भवमोचना ॥ जयजय नाथनिरंजना ॥ भक्तमनरंजना निजरूपा ॥ १८ ॥
जय ॐकारेश्वर व्यंजना ॥ त्वदयाक्षी ज्ञानाक्ष अपरोक्षज्ञाना ॥ जय मायामोह मदभंजना ॥ हरि स्यंद
नातें आरूढें ॥ १९ ॥ तत्ववेत्या तत्वानुभावा ॥ तत्वविदो तत्वोद्भवा ॥ तत्ववित् त्वष्टा प्रजापतीचा ठेवा ॥ त्वन्ना
म तंत्रयंत्रादि आगमंत्रस्मी ॥ २० ॥ आगमंत्रास्मि मंत्राधीनंच देवतां ॥ ते मंत्र ब्रह्म जानाति अधिनता ॥ मम
ब्रह्मास्मित दैवार्चिता ॥ पूर्वार्चिता नवनिधाना ॥ २१ ॥ नवनाथ प्रियकर नवरस भरिता ॥ नतद्भास्तनाहि शशी
पावक सविता ॥ नमो दक्शमन गंगोद्धारिता ॥ नमो चमकरुद्र प्रियरुद्रा ॥ २२ ॥ तुळशी श्वेतमंदार सुमनाप्रि-
या ॥ तुरंगमवाहना भुजंगमवलया ॥ तुंबर नारद सदयहृदया ॥ तुर्यावराकां कवेंद्रवरदा ॥ २३ ॥ ऐसा जगदीश्व
र त्रिगुण अवतारी ॥ येवोन उतरला हरिद्वारीं ॥ जमदग्निरत्नाचे अधिकारी ॥ पांचजण जाहले ॥ २४ ॥ ऋषि
क्रोधाग्नीची गरिमा ॥ ऊर्ध्वी दिधली परशुरामा ॥ अर्धियाचे दशांशींचें त्रिगुणाक्रमा ॥ तीनविभाग तिघांसी दि-
धले ॥ २५ ॥ नव रव ठेविला हिमालयशिखरीं ॥ तेवीं नवनाथवर प्रियस्वीकारी ॥ असो पांचजणा वांटली त्यां

ची नवलपरी ॥ शचिवर जमदग्नि देखतां ॥ २६ ॥ असो जमदग्निगृहीं भोजन ॥ गाधिजें करूनि केलें धेनुहरण ॥ तेथें युध्द झालें दारुण ॥ श्रोतीं मुनिजनीं परिसिलें ॥ २७॥ ऐसी कथा चतुर्थाध्यायीं ॥ सविस्तारें केदारविजयीं ॥ परिसिली असतां स्वस्थह्रदयीं ॥ पुढील निरूपण परिसावें ॥ २८ ॥ शौनक ह्मणे सूतातें आदरें ॥ रजतम सत्व स्वावतारें ॥ एकरूप ॐकार मायावीजाक्षरें ॥ नाम स्वळेश्वर ठेविलें ॥ २९ ॥ जे अनादिमायेचे संभवें ॥ तो नामस्वरूपा आला स्वभावें ॥ जो नामरूपीं अक्षयींवटपत्रीच्या विभवें ॥ तो हा विमळांवुज करोद्भवीं जलवर्णी ॥ ३० ॥ ऐसा नाथ घेऊन भैरवभार ॥ दक्षिणेसी जातसे स्वळेश्वर ॥ हे कथा वदावी सविस्तर ॥ नामाभिधानीं अनुक्रमीं ॥ ३१ ॥ परिसोनियां शौनकोत्तरा ॥ सूत वदत अमृतगिरा ॥ केदारविजय मलयागरा ॥ सबाह्यांतरीं अर्चन करी ॥ ३२ ॥ दक्षयज्ञ मंडपांतरीं ॥ स्वळनाथ सपरिवारीं ॥ उतरला जान्हवीतटीं हरिद्वारीं ॥ जे कां मायापुरी मोक्षस्थान ॥ ३३ ॥ लक्ष्मीसी चर्पटअंबा ॥ महामाया श्रीजगदंबा ॥ पाळावया विश्वकुटुंबा ॥ चंद्रार्कबिंबानना अवतरल्या ॥ ३४ ॥ ॐकार बीजाक्षरींच्या ओळी ॥ तैसी काळरात्रीसी महंकाळी ॥ न्रसिंह कंकाळी ॥ ज्वाळामुखी ॥ ३५ ॥ एकचक्षूसी सहस्त्रनयनी ॥ एक चक्षुश्रत्री नवकोटचामुंडा कात्यायनी ॥ लंबोष्ट्री उज्वळांबादि विकट दर्शनी ॥ त्रयमह्लीत्रयंबकी सुगंधी विक्राळवदनी ॥ ३६ कौशिका कौळिकी कुशावर्ती ॥ कौळीचारी कमठाक्षिती ॥ कौटाळी कैवर्तकी सूक्ष्मदीर्घती ॥ बाळा बगळा कुष्मांडी ॥ ३७ ॥ ऐसा महामातृकांचा मेळादेखा ॥ मत्स्योदरींसी षण्मुखा ॥ अश्विनी भरणी वृश्चिका ॥ मृगव्याघ्राये रोहिणी ॥ ३८ ॥ मघाघूर्णिताक्ष मंगळाई ॥ माहिंद्री तुकाई पावनाई ॥ मातंगमंथनी ह्मसाई ॥ इंद्रायणी समुद्राई शोभल्या ॥ ३९ ॥ भैरव

चर्क्रीं सित्थहास्तिणी ॥ सित्थचर्क्रीं शक्तिशंखिणी ॥ निर्जरचक्रात शक्तिपाद्मिणी ॥ पन्नगचक्रांत चित्रिणी शोभती ।४०।
कीं नवविधा तेचि नवनाथ ऐका ॥ कीं नवपीठिका आगमोक्तिका ॥ कीं नवग्रहाचे कुळदीपका ॥ दैत्यांतकदक्षिणे-
चे ॥ ४१ ॥ षोडशप्रयोगेसी सिद्ध सर्वे ॥ सिद्ध झाले आत्मानुभवें ॥ त्याचीं नामें ऐकतां स्वभावें ॥ द्वैत दुरित-
तापहारी ॥ ४२ ॥ यदर्थीं संतीं श्रवणपुटीं ॥ प्रख्यात त्रेतायुगींच्या गोष्टी ॥ भविष्य वदला शतकोटी ॥ हनुमं-
तनाटकीं कथियेलें ॥ ४३ ॥ अवतार माळिका युगचत्वारी ॥ बाहत्तर युगसंख्या नवलपरी ॥ जमदग्नि खावतारी
॥ हिमकेदारी अवतरला ॥ ४४ ॥ हिमकेदार भैरवभारीं ॥ खड्गडमरु पात्र त्रिशूळकरीं ॥ कसोनकांस पितांबरीं ॥ टिळ-
ककेशरी रेखिला ॥ ४५ ॥ त्यावरी मृगमद बिंदु नीळवर्णी ॥ अनुहातनाद कंठीं हेमांभरणीं ॥ कुंडलें डोलती चं-
द्रार्ककीर्णी ॥ अष्टादशभैरवगणीं वेष्टिला ॥ ४६ ॥ कीं अष्टभैरव ऊष्टदिक्पाळ ॥ कीं ते अष्टवसूचि अष्टभाळ ॥
कीं ते अष्टावतारींचे गोपाळ ॥ भैरवक्षेत्रपाळाकारीं गर्जती ॥ ४७ ॥ सोळा सिद्धेसी नवनाथ ॥ कीं नवार्णवीच्या
आकृति मूर्तिमंत ॥ कीं त्या नवनिधीचे महारथ ॥ भरले भक्तमनोरथ पुरवावया ॥ ४८ ॥ नवनाथ आणि सोळा
सित्थ ॥ त्यांचीं नामें परिसा प्रसिद्ध ॥ रणभैरव गंडभैरव द्विविध ॥ चवथा विकटाट काळभैरव ॥ ४९ ॥ पांचवा
तो बादलभैरी ॥ षष्ठम कमळभैरव अवधारी ॥ सातवा कल्पांतभैरव आकारी ॥ सुवर्णभैरव अष्टम कुबेरांश ॥ ५०
आणखी दहाभैरवाचे अंश ॥ शकटभैरी विकटभैरीवेष ॥ कलहाटभैरी हाकाटभैरी कर्कश ॥ पांचवा शंखभैरव अवधारी
॥ ५१ ॥ षष्ठम तो बाळभैरी ॥ कर्कोटाष्टक गुंडभैरी ॥ कमार्दिग्मंद शौरी ॥ तृतीयनेत्रा पासूनि जन्मले ॥ ५२ ॥
षोडशचक्रा षोडशी ॥ सित्थमंडळ चंद्रार्क अंशी ॥ जन्मले सहस्रकमळीं कृतांतवेषी ॥ मधुमास वसंतकाळीं ॥ ५३

॥ वडवाग्निसिद्द सोनारासिद्द ॥ रेवणासिद्द वाचाळसिध्द ॥ कल्याणसिद्द विराडसिद्द ॥ विजयसिद्धेश्वर सातवा ॥५४
॥ शब्द स्पर्श रूप रस गंध ॥ देवअवतार हे सिध्द साध्य ॥ अतींद्रियेसी अप्रसिध्द ॥ ज्ञानेंद्रिय दृष्टीनें पाहतां
॥ ५५ ॥ अष्टमासिध्दि नवनिधी ॥ नऊनाथेंसी अष्टभैरव उदधि ॥ साज्जिले ते विशाळबुध्दि ॥ युधत्समयीं प्रताप
परिसावा ॥ ५६ ॥ ऐशा नवकोट कात्यायनी ॥ अनादिशक्ति त्या ह्या तीनी ॥ चर्पटअंबा लक्ष्मी दोनी ॥ स्वयं-
भ यमाई तिसरी ॥ ५७ ॥ प्रवृत्ति आणि निवृत्ति प्रकृती ॥ सत्व रज तमाच्यावि विधकृती ॥ अष्टशक्तिपीठीं-
च्या भारती ॥ दुंदुभिनादीं गर्जिन्नल्या ॥ ५८ ॥ कीं सप्तकोटी महामंत्र ॥ तैसें दिसत सैन्यसूत्र ॥ मध्यें ॐका
र बीजमंत्र ॥ श्रीनाथ भैरवाकार यंत्रीं रेखिला ॥ ५९ ॥ असो द्विसप्तकोटी भैरवभार ॥ सप्तैकलक्ष ऐशींहजार ॥
सोळालक्ष सिध्दपारिवार ॥ पैगंबरेसी नवनाथवर शोभला ॥ ६० ॥ लक्ष्मी ह्मणे हे खळेश्वरा ॥ येथोनि निघावें र
णरंगधीरा ॥ हें परिसोनि अमरेंद्र भारा ॥ सहित प्रस्थान भेरी वाजविल्या ॥ ६१ ॥ अठरा वाद्यांच्या महागज
रें ॥ सहा बारा ध्वजाकारें ॥ वाद्यें गर्जती जयजयकारें ॥ तोरणभैरव दळभारीं ॥ ६२ ॥ दशग्रंथ भेरीनाद चौघ
डा ॥ कुंजरपृष्टीवरी धडधडा ॥ वाजत निघाले करावया झगडा ॥ दैत्यप्रचंड होडा जिंकावया ॥ ६३ ॥ नाना वा
द्यध्वनि महागजरें ॥ गर्जिन्नलीं गिरिकंदरें ॥ छत्र चामरी मेघडंबरें ॥ सुवर्णाकारें झळकती ॥ ६४ ॥ षोडशसहस्र
छत्राकारी ॥ कीं षोडांश कळा उजळल्या शिरीं ॥ कीं षोडश मुक्ताफळ जोहरी ॥ बद्रिविहारी मिरवत ॥ ६५ ॥
समारंभेसी भैरवभारी ॥ महदैश्वर्यें हिमकेदारी ॥ येवोनि उतरले गंगातिरीं ॥ कपिलाचार्य मुनेंद्रस्थानीं ॥ ६६ ॥ जे
थें क्षेत्र सोहंरम्य ॥ तेथेंचि असे कपिलाश्रम ॥ त्यासन्मुख तिष्ठे भगीरथोत्तम ॥ जान्हवीतटाकीं अद्यापी ॥ ६७ ॥

तेथेंचि श्वेतवराह अवतारें ॥ धरोन हिरण्याक्ष वधिला करें ॥ वराहतीर्थीं हिमकेदारें ॥ बद्रिकेश्वर स्थापिला ॥६८॥ सोरटदेशींचा सोमनाथ ॥ ज्योतिर्लिंग असे नवांकित ॥ तें स्थापोन आदिनाथ ॥ श्वेतवराहीं पातला ॥ ६९ ॥ सोरमक्षेत्रीं सगरोत्धार ॥ कलियुगार्धीं होय पुढार ॥ ते हो कथेचा विस्तार ॥ काशीखंडीं कथियेला ॥ ७० ॥ असो नवनाथ भैरवभारी ॥ त्रिरात्र राहिला सोरमपुरीं ॥ श्वेतवराह नाम नगरीं ॥ संकल्पविधि प्रख्यात ॥ ७१ ॥ जो नवनाथासी प्रियकर ॥ देवाधिदेव रवळेश्वर ॥ परब्रह्मींचा सुरतरुवर ॥ भैरवाकारी मुहरला ॥ ७२ ॥ कीं प्रभावेष्टित वासरमणी ॥ कीं चंद्रमा भूषित तारांगणीं ॥ कीं रुद्रगणीं वेष्ठित शूलपाणी ॥ तैसा नाथदिनमणी शोभला ॥ ७३ ॥ जेवीं उपासना यंत्राकारें ॥ दशग्रंथ संहिता वर्णोच्चारें ॥ क्रम जटा अरण जटा सामोत्तरें ॥ भैरव केदार स्वसैन्येसी ॥ ७४ ॥ सोरट कानडा मेघमल्हारी ॥ दीपक सारंग आसावरी ॥ कल्याण केदार बिभास रामकली दरबारी ॥ गुर्जरी गौडीकर्नाटकी वाद्यध्वनी ॥ ७५ ॥ शरदृतूसी ग्रीष्मऋतु हेमंत ॥ रामकलीसी कुसुमाकार वसंत ॥ बाळा बगळा मुग्धा प्रगल्भ्यायुक्त ॥ राग रागिणी सहित गाती ॥ ७६ ॥ सहाराग छत्तीस भार्या ऐशा वाद्यध्वनि शब्दरस गंध पर्यया ॥ पारिसविती भैरवदळीं गुणत्रयां ॥ श्रीनाथनिरंजना संतोष ॥ ७७ ॥ ऐसा वेद घोष मंगळतुरीं ॥ गर्जती नवनाथासिध्दि भैरवभारी ॥ निघाला गर्जत हिमकेदारीं ॥ शिवराजपुरींसीजावया ॥ ७८ ॥ तैं मार्गीं दैत्य रुधिरोद्गारी ॥ उभा ठेला सेनाग्रावरी ॥ विक्राळवदन पर्वतशरीरी ॥ पिंगटजटा रक्ताक्षी ॥ ७९ ॥ हा रक्तभोजनाचा सापत्नबंधू ॥ पाळतीसी धाडिला पापसिंधू ॥ हें पाहोनि अनाथबंधू ॥ तोरण भैरवासी वदतसे ॥ ८० ॥ रक्तभोजसापत्न सहोदर ॥ रुधिरोद्गारी हा निशाचर ॥ ऐसें वदतां रवळेश्वर ॥ प्रत्युत्तर

वदे तोरणभैरी ॥ ८१ ॥ बद्रिकाश्रम सांडोनि सत्वर ॥ स्वामी निघाले स्वसैन्यभार ॥ आजि द्विसप्तदिवस झा-
ले सारे ॥ अवतारचरित्रा आपुल्या ॥ ८२ ॥ परिसोनि तोरणभैरववाणी ॥ तयातें वदे नारदमुनी ॥ सत्व रज त
मेसी स्वामी ॥ अवतरले हे जासमयीं ॥ ८३ ॥ त्रिगुणात्मकी स्वावतार ॥ धरिला मूळमायेच्या अज्ञोत्तरें ॥ तेव्हां
विद्युत्पात झाला संह्याद्रीवर ॥ उत्तरभागीं गिरि भंगला ॥ ८४ ॥ उल्कापात रक्तवृष्टी ॥ झाली पंचगंगेच्यातटीं
॥ रत्नासुर रक्तभोज ल्हदयसंपुटीं ॥ भयकंपाग्नि संचरला ॥ ८५ ॥ नारद ह्मणे हे स्वळेश्वरा ॥ ते समयीं त्यां
रत्नासुरा ॥ अवतार चरित्राग्नीच्वा वरा ॥ सोडोनि कथिला समाचार ॥ ८६ ॥ अवतार स्वाम्नीची गरिमा ॥ रत्ना
सुर स्पर्शतां पावला भ्रमा ॥ रक्तभोज करवीर जंबूकनामा ॥ ह्मैषासुरादि गजवजिले ॥ ८७ ॥ देविलास्यादि र-
क्तबीज ॥ हे षड्रिपु उन्मत्तगज ॥ सर्वही झाले निस्तेज ॥ तुमचे आगमन होतें ह्मणोनी ॥ ८८ ॥ चिंतार्णवीं प-
डिले असुर ॥ क्षणक्षणा टाकिती स्वासथोर ॥ तीव्रसज्जोनि राक्षसभार ॥ सोनारी पर्यंत सावध असती ॥ ८९ ॥
रत्नासुराची निजांगना ॥ निद्रिस्त झाली मंचकासना ॥ अतिसौंदर्य चंद्रसेना ॥ भविष्य पतीतें वदतसे ॥ ९० ॥
ते पुढारें उपश्रुती ॥ विस्तार वदेल रसोत्पत्ती ॥ ऐसें वदोनि नारदमूर्ती ॥ उर्ध्वपंथें तो गेला ॥ ९१ ॥ नानापरी
चीं दुश्चिन्हें ॥ जहालीं संह्याद्रीवरी जाण ॥ तैं रत्नासुर रक्तभोजन ॥ एकांत गिरीं बैसले ॥ ९२ ॥ करवीर को
ल्हासुर ह्मैषासुर ॥ देविलास्यादि साही असुर ॥ ह्मणती दुश्चिन्हें संह्याद्रीवर ॥ आजन्मांतरीं न देखिलीं ॥
॥ ९३ ॥ विद्युत्पात महा अनर्थ ॥ होतेंझाले गर्भपात ॥ उत्तरभागीं संह्याद्रिपर्वत ॥ खचोनि पडला महीवरी ॥
॥ ९४ ॥ रामजन्मतां चंडांशवंशीं ॥ रक्तवृष्टि झाली लंकेसी ॥ तैसेंचि भासतें आह्मांसी ॥ ह्मैषासूर ह्मणे विना-

शकाळ पातला ॥ ९५ ॥ अनंतावतार माळिकेचा मेरू ॥ श्रेष्ठावतार हिमकेदारू ॥ बाहत्तरयुगींचे प्रथमप्रहरू ॥ ज्योतिसौदागरु अवतरला ॥ ९६ ॥ बाहत्तरयुगाचे प्रथमप्रहरीं ॥ रामावतार झाले षोडशवरी ॥ युद्धीं उत्पात सोळावेळ लंकेवरी ॥ जाहला आमुचे देखतां ॥ ९७॥ परीनाथावतारचरित्र गरिमा ॥ सारखी द्यावया नाहीं उपमा ॥ ऐसा कोल्हासुरातें ह्मैषासुरनामा ॥ ह्मणे येवोनि विनाशकाळ पातला ॥ ९८ ॥ असो पुढील भविष्योत्तर ॥ होणार होतसे साचार ॥ अवतार धरोनि त्रिगुणाकार ॥ बद्रिविहारी सैन्य भैरवभारी ॥ ९९ ॥ नवकोटी भैरवीचमूसी घनघोरीं ॥ येवोनि उतरला सोरमपुरीं ॥ तो समाचार कळावया लौकरी ॥ शिवराजपुरीसी धाडिजे ॥ ॥ १०० ॥ ऐसें ह्मैषासुराचें धूर्त लक्षण ॥ त्रिकाळज्ञानी बळसंपन्न ॥ आमुचें जाणोनि आगमन ॥ ह्मणोन दुर्धर धाडिला ॥ १०१ ॥ तोहा पातला रुधिरोद्गारी ॥ ऐसें वदला हिमकेदारी ॥ काळरूपी विक्राळशरीरी ॥ यासी वधावें त्वां रणभैरवा ॥ २ ॥ ऐसें वदतां खळेश्वर ॥ युद्धीं मिसळला तोरणभैरववीर ॥ रुधिरोद्गारें घासोनि महीसी कर ॥ तोरणभैवासी आकर्षिला ॥ ३ ॥ रुधिरोद्गारी तोरणभैरव ॥ झुंजा प्रवर्तले क्रोधाग्निरवें ॥ प्रतिशब्दें गर्जविती ब्रह्मांडोद्भवें ॥ क्रोधें कांपती थरथरां ॥ ४ ॥ मुष्टिघात वज्रमणिया ॥ थडकामुंड चंडकणिया ॥ मारितां विकट दंत होती कणिया ॥ दोर्दंडप्रहरें करोनियां ॥ ५ ॥ मल्लयुद्धाची कळा कुसरी ॥ अपार दावी परोपरी ॥ ऐसें युद्ध दोनप्रहरीं ॥ पर्यंत केलें निकुरानें ॥ ६ ॥ त्यावरी रणभैरव क्रोधाग्नितवकें ॥ भूमीसी घासोनि द्वयहस्तकें ॥ मेघगर्जनें सारखी हाक ॥ देवोनि निशाचर कवळिला ॥ ७ ॥ चरण धरोनि दक्षिणकरीं ॥ सहस्रफेरे चक्राकारी ॥ देवोनि ताडिला तीव्र महीवरी ॥ रुधिरोद्गारासी रणभैरवें ॥ ८ ॥ भूमीं पडतां रुधिरोद्गारी ॥ सहस्रचूर्ण झा

ला शरीरीं ॥ गर्जना करोनि दीर्घस्वरीं ॥ प्रळयघन गर्जत पडियेला ॥९ ॥ सुर नरवरीं केला जयजयकार ॥ वर्ष
ती दिव्यसुमनाचेभार ॥ ह्मणती विजयी विजयी केदारेश्वर ॥ राक्षस वधोनि होय पुढारीं ॥ १० ॥ दिग्विजय
प्रस्थानभेरी ॥ वाजवित भैरवदळभारीं ॥ खळनाथ सुमनांबरीं ॥ गौरवी तोरणभैरवा ॥ ११ ॥ असो रुधिरोद्गारी
निशाचरा ॥ रणभैरवकरें यमनगरा ॥ धाडिल्या नंतर शिवपुरा ॥ अस्तमानीं पातले ॥ १२ ॥ सैन्यभारेसी खळ
नाथ ॥ येवोनि उतरला प्रख्यात ॥ हा रसिक व्यासकवनार्थ ॥ केदारखंडींचा पंडित हो ॥ १३ ॥ शिवराजपुरीं त्रै-
लोक्यनाथ ॥ भैरवदळ बळसामर्थ्य ॥ उतरलें ह्मणोनि सूर्यें आपुला रथ ॥ अस्ताचळीं उतरिला ॥ १४ ॥
कीं त्रैलोक्यनाथ बद्रिविहारी ॥ उतरला तो शिवराजपुरीं ॥ ही मात फांकली पृथ्वीवरी ॥ सूर्यप्रभे सारखी ॥
॥ १५ ॥ हें पारिसोनि निद्रार्णवींची पुतळी ॥ ज्ञानांजनेसी निवाली ॥ भूषित नक्षत्र मुक्ताफळीं ॥ घननीळ मराळी
पातली ॥ १६ ॥ कीं रजनी नव्हे ही महंकाळी ॥ उभी राहिली ब्रह्मांडगोळीं ॥ कीं ज्योतिस्वरूपाची तनु सांव-
ळी ॥ भैरवदळींची प्रख्यात ॥ १७ ॥ कीं ते रत्नासुर वधोत्सवार्थ ॥ आज्ञा देई खळनाथ ॥ ह्मणोनी मौन्यें
चरणीं ठेवोनि मस्तक ॥ ब्रह्मांडगृहीं निजाली ते ॥ १८॥ असो ऐसी प्रवर्तल्या निशी ॥ पुढीलकथा रस सेविजे
संतोषीं ॥ सूत वदत शौनकासी ॥ पाराशर पुंण्यारंण्यीं ॥ १९ ॥ इतिश्री केदारविजय कथनें ॥ श्रवणार्थी पा-
वे जयकल्याण ॥ हरिनामचंदनें अर्चितां संतचरण ॥ पंचमोध्याय गोडहा ॥ १२०॥ हा केदारविजय भविष्योत्त-
र ॥ केदारखंड केदारकल्प विरचितायां ॥ रुधिरोद्गारी वधोंनाम ॥ पंचमोध्याय गोडहा ॥ ५ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीकेदारेश्वराय नमः ॥ जय भृगुपति भृगुपदलांच्छना ॥ भृगुकार्मुकधृत शरासना ॥ भ्रूसंके
तालंकारकृत व्रजमोहना ॥ भवहरि इडा पिंगलान्वय दर्शका ॥ १ ॥ धनुभंग धनुर्धरा नवघन किशोरा ॥ धनु
र्जय विजयकृत स्वयंवरा ॥ धनुर्याग रणदीक्षित प्रखरा ॥ धर्मार्थकाममोक्ष फलप्रदा ॥ २ ॥ ज्ञानयोग संबोधना ॥
ज्ञान चक्षुश्रवा विश्वरूप दर्शना ॥ ज्ञाता ज्ञेय मदभंजना ॥ ज्ञानार्कलोचना ज्योतिर्मया ॥ ३ ॥ मृषाभास साद्द-
श्यका ॥ मृगजळसा अभाविका ॥ मृगपृष्ठीं रघुनायका ॥ मृगांकलोचनेचे उत्तरोत्तरा ॥ ४ ॥ मृगकंचुकीस्तव म-
रीचि दमना ॥ मृगमदतिलकांकित वदना ॥ मृदूत्तर राम अवतारींची खुणा ॥ मंदस्मित तें मुखारविंदा ॥ ५ ॥
मंदलकंदल दहन खंदरा ॥ मर्दिसी लवणासी घोरसमरा ॥ मनंतमाघ अतींद्रिय खळेश्वरा ॥ मंदवासरीं निघाले द
नघोरें ॥ ६ ॥ इतिवरदीप्सित दत्तदिगंबरा ॥ इंदुमुखारविंदा भक्तचकोरा ॥ इंदुवहन नंदिनीतिलक किशोरा ॥ ई
शशक्ति षण्मुखजनका ॥७॥ इडा पिंगला कार्यकारणा ॥ इंद्रियपंचक अतींद्रिय प्रकर्णा ॥ इत्यर्थ पंचवीस द्विधाव
र्णा ॥ सहदळार्थी परत्रपरमेश्वर ॥८॥ इंदिरा सुवर्णवहना ॥ इंद्र चंद्रार्क वंदिती चरणा ॥ ईक्षित मुरली वादना ॥
इतिहास पुराणें विरचितार्था ॥ ९ ॥ आश्रय आश्चर्य कर्तारा ॥ गांभिर्य माधुर्य चंदनागारा ॥ माधुर्य चातुर्य सौ
दागरा ॥ मां त्राहे संसार करुणासिंधू ॥ १० ॥ चतुर्भुजसुंदर जलजवर्णा ॥ चंचल कुंडलें डोलती कर्णा ॥ चैल-
ललाम मौक्तिक इंदुकीर्णा ॥ चपळांवरीं कास झळके कटीं ॥ ११ ॥ निष्कळंकयोगी विश्वरूपा ॥ विश्वनाथस्थाप
क निजरूपा ॥ विश्वमुखी संह्याद्रिदीपा ॥ विमळांब्जीं करीं लागेल अष्टादशाध्यायीं ॥ १२ ॥ कीं द्वादशार्कमय
कळावतारा ॥ कीं द्वादशज्योतिलिंग स्थापित केदारा ॥ कीं द्वादशलिंगांकित शरीरा ॥ कीं द्वापारांत वाहत्तरयुगा

अध्याय ६वा.



रंभीं ॥ १३ ॥ षष्ठकोटी दिव्यघटिका ॥ शेषपद्माचा असे लेखा ॥ षण्मासगणती करितां सहस्त्रमुखा ॥ तैं शिवा
ची त्रुठि एक मोडे ॥ १४ ॥ ऐसी गणती करितां बद्रिकाश्रमीं ॥ ऐश्वर्येसी निघाले प्रथमाश्रमीं ॥ असो भैरव-
दळ संभ्रमीं ॥ श्रीखळनाथ मिरवला ॥ १५ ॥ जयजय विश्वेश्वर विश्वंभरा ॥ विश्वाकार विश्वोद्धारा ॥ विश्वाव
सु विष्णु अवतारा ॥ विश्वासासी फलदायका ॥ १६ ॥ विरंची विमळ उपवीतधरा ॥ विश्वजनन जननीवरा ॥ वि
श्वनाथा विश्वकर्म प्रियकरा ॥ विस्मयकृता विशेषस्तु प्रिया ॥ १७ ॥ ब्रह्मास्मि प्रिया कमळार्णवा ॥ ब्राह्मीं मुहू
र्तीं जप नवार्णवा ॥ ब्रह्मचारी गृहस्थाश्रमी विभावा ॥ ब्रह्मोत्तरविरचिता सुमनोहरी ॥ १८ ॥ रजनिचरांतक रण
पंडिता ॥ रज तम सत्वान्वय अखंडिता ॥ रसिक कवनार्थी रसमंडिता ॥ रकारबीजी खळनाथा ॥ १९ ॥ ऐसा
नवनाथनिधी ॥ सवें घेऊनि अष्टमासिद्धी ॥ शिवराजपुरासी पातला उदधी ॥ दक्षिणदधीसी मिळावया ॥ २० ॥
भैरवचमूसी खळेश्वर ॥ निगमतुरंगीं होऊनि स्वार ॥ अश्विनी भरणी शृंगार ॥ कृत्तिकाहारीं मुक्ताफळें शोभती ॥
॥ २१ ॥ यापरी ऐसा दिनानाथ ॥ महदैश्वर्यें असे मिरवत ॥ तैं मार्गीं रुधिरोद्धारी मदोन्मत्त ॥ वधोन वाजवि-
ल्या कुंजभेरी ॥ २२ ॥ प्रथमारंभीं रुधिरोद्धारी ॥ रणभैरवा हस्तीं वधिला समरीं ॥ विजयध्वज उभवी कनकांबं
रीं ॥ बद्रिविहारी आवडीनें ॥ २३ ॥ हा पंचमोध्यायीं कथारस ॥ संतीं सेविला मनोल्हास ॥ आतां विज्ञानी-
राजहंस ॥ स्वातीजळघोष सेविजे ॥ २४ ॥ ब्रह्मांडकरंडीं कुंकुमवर्णें ॥ अरुणरंगीं चंडांशकीर्णें ॥ झाकोनि ठेवि-
तां संकीर्णें ॥ निशा गेली आणावया ॥ २५ ॥ ऐसी निशा पाहोनि भारी ॥ अरुणासी सूर्य ह्मणे अवधारी ॥ र-
जनी सारोनि माघारी ॥ करीं अरणोदयप्रकाशा ॥ २६ ॥ अरुण ह्मणे स्वामीदिवाकरा ॥ निरालंबमार्गीं कां करितां

त्वरा ॥ हें परिसोनि गरुडाग्रजगिरा ॥ सहस्रकीर्ण वदतसे ॥ २७ ॥ प्रातः माध्यान्ह सायंकाळीं ॥ युद्धावर्ती गोंविलें
त्रिकाळीं ॥ युद्ध करितां क्लेशानळीं ॥ दग्ध झालों हें जाणसी ॥ २८ ॥ राक्षसजाती अतिदुर्धर ॥ त्यानीं आ-
क्रमिलें श्रीकरवीर ॥ ह्मणोनि त्रैमूर्ति अवतार ॥ धरिला दैत्यहननार्थीं ॥ २९ ॥ तयाचें घ्यावयालागीं दरुशन ॥
यालागीं उदया आदि वरुण ॥ मार्ग करोनि सहस्रकीर्ण ॥ क्रमणपदतळीं रंगला ॥ ३० ॥ हे ऐकोनि महिमा विशेष
॥ पाताळींहूनि पातला शेष ॥ जानु जंघनीं संतोष ॥ चरणमहिमा लक्षितसे ॥ ३१ ॥ शेष ह्मणे अरुणासी ॥ सांडोनियां
सूर्यरथासी ॥ क्रमणपदातळीं दडसी ॥ किंनिमित्य सांगपां ॥ ३२ ॥ परिसोनि भूधराचें वचन ॥ प्रत्युत्तर देत अरुण
॥ करितां मेरूचे प्रदक्षिण ॥ विश्राम कांहीं न पावलों ॥ ३३ ॥ एकचक्री एकरथ ॥ एकतुरंग सप्तमुखवक्त ॥ भुजं
गदोर बंधनार्थीं अलिप्त ॥ निरालंबमार्ग अंतराळीं ॥ ३४ ॥ चरणरहित मी सारथी ॥ नित्यसुप्तायान्हीं माध्यान्हीं
प्रभातीं ॥ स्वप्नीं ही न देखों विश्रांती ॥ ह्मणोनि विश्रामस्थान पावलों ॥ ३५ ॥ तैंसुपर्णाग्रजासी ह्मणे भूधर ॥ मातें न
सोसवे दुर्जनभार ॥ यास्तव पातलों साचार ॥ ह्याचि समाचार सांगावया ॥ ३६ ॥ ज्योतिर्मय त्रिगुणाकारें ॥ बद्रिविहारी
श्रीरवळेश्वरें ॥ जाग्रत केला सहस्रकरें ॥ दैत्यदुर्धर वधावया ॥ ३७ ॥ असो उदया येतां वासरमणी ॥ जागिंनली
भैरववाहिनी ॥ नवनाथ प्रियकर शिखामणी ॥ सिद्ध झाला सैन्यभारें ॥ ३८ ॥ ब्राह्मींच रौद्री कौमारी ॥ वृषारूढोनि
जाई माहेश्वरी ॥ ऐंद्राहंसासनी इंद्रायणी खेचरी ॥ वहिश्वरी काळरात्री चर्पट अंबा ॥ ३९ ॥ अष्टपीठी शक्तिनायका
॥ स्वदळेसी भैरवभारी देखा ॥ चालिल्या जेवीं सिद्धोदका ॥ तुल्यभ्यासूर गर्जती ॥ ४० ॥ ऐसा तीव्र सर्ज्जोनिभार ॥
निघताझाला हिमकेदार ॥ वार्योगर्जवी ब्रह्मांडोदर ॥ आले दक्षिणेसी दैत्यहननार्थीं ॥ ४१ ॥ रुधिरोद्गारी निशाच

र ॥ हयमग्रहासी धाडिला रत्नासुर ॥ ऐसा वाद्यगर्जनेचा खदिरांगार ॥ दैत्यभारीं वृष्टि झाली ॥ ४२ ॥ ह्मणती केवढा विजयीशब्द ॥ नभाहोनि गेला भेद ॥ सुरनरवरांचा पदच्छेद ॥ केला ह्मणोनि हें चिन्ह उच्छेदिती जेवीं॥ ॥ ४३ ॥ असो दैत्य पडिले चिंतार्णवीं ॥ येरीकडे कथारसाळ अपूर्वी ॥ संतसज्जनीं ऐकावी सर्वी ॥ अवतारचरित्र ठेवी भविष्योत्तरीं ॥ ४४ ॥ भैरवचमूसह दिनानाथ ॥ चालिला पुरवावया भक्तमनोरथ ॥ ऐश्वर्ये मनोरथ मिरवत ॥ काशीपट्टणासी पातला ॥ ४५ ॥ बद्रिनाथ प्रथम ज्योतिर्लिंग ॥ द्वितीयसोरटेंसी अभंग ॥ तृतीय क्षिप्रातीरीं तरंग ॥ अवंतिकीं स्थापोनि महंकाळ ॥ ४६ ॥ तेथोनि चवथी मोक्षपुरी ॥ भागीरथी मनकर्णिकेचेतीरीं ॥ तारकोपदेश जो करी ॥ तोहा विश्वनाथ स्थापिला ॥ ४७ ॥ निरामय निरुपम निर्विकार ॥ निर्गुण सगुणीं त्रिगुणाकार ॥ होवोनि यां बद्रिविहार ॥ संभवामि युगायुगीं ॥ ४८ ॥ चारीयुग सहस्रवेळा जाती ॥ तैं ब्रह्मदेवाचा एकदिवस गणती ॥ विधीचे सहस्रदिवस होती ॥ तैं विष्णूची घटिका एकभरे ॥ ४९ ॥ विष्णुर्घटिका सहस्राणी ॥ निमिषार्ध होय शूळपाणी ॥ हे संख्या भविष्योत्तरपुराणीं ॥ श्री व्यासवाणी बोलिली ॥ ५० ॥ ऐसें बाहत्तरयुगाचे प्रथमारंभीं ॥ अवतार धरिले यात्रिवर्गी ॥ अष्टावताराचे मध्यगर्भी ॥ अवतार धरिला खळेश्वरें ॥ ५१ ॥ श्रीकेदारखंडींचें वचन ॥ द्वादशज्योतिर्लिंग स्थापन ॥ अवतारला हयवाहन ॥ काशीपट्टणीं जो पातला ॥ ५२ ॥ एकमंडळ राहोनि काशीं ॥ स्नानकरोनि मनकर्णिकेशी ॥ यात्रा करी पंचक्रोशी ॥ चित्घट मंचकीं जो निजेला ॥ ५३ ॥ अगम्य अतर्क्य जो अगोचर ॥ अनादि अखिल अमळोदर ॥ मायावेषीं पौगंडऋषिकुमर ॥ बद्रिविहारी अवतरला ॥ ५४ ॥ कीं तो अगम्य अनादिपुरुष ॥ कीं माया नटनाटकवेष ॥ कीं भैरवांबरींचा चंडांश ॥ द्वादशार्क खाग्नि अवतरला ॥ ५५ ॥ अ-

सो गंडभैरव चमूसहित ॥ सोळालिखवाहिनीसी नवनाथ ॥ छत्रचामरें मिरवत ॥ श्रीनाथ निघाला भैरवभारी ॥ ५६ ॥ अश्व गज रथ पदांती॥ सभोंवते चालती चक्राकृती ॥ ध्वज पताकीं छत्रार्क उभाविती ॥ शतसहस्रकन कांवराचीं ॥ ५७ ॥ मेघडंबरमिना कनकवर्ण ॥ ज्यांवरी झळकतीं मार्तंडकीर्ण ॥ राहुभयें होऊनि जीर्ण ॥ वसों पातलीं निर्भयमनें ॥ ५८ ॥ नवकोटी चामुंडा कात्यायनी ॥ द्विसप्तकोटी भैरवीवाहिनी ॥ त्यांमाजी नवनाथ शिखामणी ॥ हिमकेदारी शोभला ॥ ५९ ॥ ऐसें कल्पांत भैरवदळ ॥ जेवीं प्रळयीं पसरिजे सिंधुजळ ॥ दक्षिणप्रवाहीं प्रचंड खळवळ ॥ तैसें चमूशब्दें महीमंडळ थरारिलें ॥६० ॥ नानालंघित वनोपवन ॥ अमृतोपम मिश्रित जीवन ॥ सेवित पावले महावन ॥ जेथें बळिभद्र अवतार सहस्रमुखी ॥ ६१ ॥ कृतांतभागिनीच्या उत्तरतीरीं ॥ प्रत्यक्ष असे भूधर अवतारी ॥ येतां देखोनि बद्रिविहारी ॥ वंदिला भावें हलधरें ॥ ६२ ॥ राम अवतारींचे सेवकपणें ॥ परमरसोत्पत्तीचें बोलणें ॥ भरतभावार्थी भूषणें ॥ बिभीषणश्रवणीं कुंडलाकृती ॥ ६३ ॥ चतुर्दश संवत्सरीं ॥व्रत धरोनि ब्रह्मचारी ॥ जितेंद्रियेसी निराहारीं ॥ राहोनि वधिलें इंद्रजिता ॥ ६४ ॥ हे बद्रिनिवास चंद्रांशकीर्णा ॥ वधोनि रावणकुंभकर्णा ॥ लंका देवोनि बिभीषणा ॥ त्रिदशगणा सोडविलें ॥ ६५ ॥ रामाज्ञा रेखार्णवीं ॥ प्रतिबिंब सीतांश उभारवी ॥ अनादिसीता नेऊनि ठेवी ॥ जैसी नेली तैसीच आणिली ॥ ६६ ॥ राम अवतारींच्या धाकुटपणीं ॥श्रम घडले घोररणीं ॥ हें जाणोनि कोदंडपाणी ॥ अभयवाणीं गौरविसी ॥ ६७ ॥ कृष्णावतारीं यादववंशीं ॥ आम्रजल दिधलें जें आम्हांसी ॥ परी ते थोरपणाची गति ऐसी ॥ ते बद्रिनिवासें ऐकावी ॥ ॥ ६८ ॥ ऊमृतोपम बाळभाषण ॥ अमृतस्वामी गौरव पूर्ण ॥ वडिलाहोनि धाकुटपण ॥ सौख्यकारक बाह्यांतरीं


॥६९॥ केतकीचे वरपत्राचे ठिकाणी ॥ प्रीत न उपजे सर्वांमनीं ॥ लघुपत्र देखोनि सर्वजनीं ॥ गौरविती सन्मानें ॥७०॥ यालागीं थोरपण करोनि परतें ॥ धाकुटपण हेंचिपरमामृतें ॥ देवोन मजला नेई सांगातें ॥ रत्नासुरवधोच्छव पाहवया ॥ ७१ ॥ त्रेतायुगीं तूं राम मीं लक्ष्मण ॥ द्वापारीं तूं कृष्ण मीं रेवतीरमण ॥ कंस चाणूर मुष्टिक वधोन ॥ राज्यीं उग्रसेन स्थापिला ॥ ७२ ॥ अनंतावतार माळिकेचे मणी ॥ त्यांमाजी तूं श्रेष्ठ खड्गपाणी ॥ ऐसें असोनि मातें त्यजोनी ॥ दक्षिणेसी जासी कां सांगपां ॥ ७३ ॥ दक्षिणदिग्विजया कारणें ॥ जमदग्नि अवतरतां अतींद्रिय धरणें ॥ लागलें ह्मणोनि मातें नेणें ॥ रणोच्छवासी पहावया ॥ ७४ ॥ ऐसी परिसोनि भविष्यवाणी ॥ आवश्य ह्मणे खड्गपाणी ॥ ह्मणोनि शेषारूढ क्रमणचरणीं ॥ चंद्रार्ककांती लोपली ॥ ७५ ॥ असो ऐसा खळेश्वर ॥ चमू घेउनी भैरवाकार ॥ तें कालिंदीचे दक्षिणतीर ॥ बद्रिविहारी उतरला ॥ ७६ ॥ गोकुळ मथुरा वृंदावनीं ॥ वस्ती करोनि तीनरजनीं ॥ उदय पावतां वासरमणी ॥ भैरवाहिनी जागिनली ॥ ७७ ॥ तेथोनि निघाले महागजरें ॥ वाद्यध्वनीसी ब्रह्मांडोदरें ॥ वेत्रवतीतीरा घनघोरें ॥ संपूर्ण सेनेसह पातला ॥ ७८ ॥ अनादि प्रयाग वेत्रवती ॥ पुराणप्रसिद्ध जिचीकीर्ती ॥ तेथें सैन्यासह करोनि वस्ती ॥ तीनदिवस दिनानाथें ॥ ७९ ॥ तैं गगनोदरीं उगवतां सूर्य ॥ भैरवचमूसी प्रतापशौर्य ॥ चालिला गर्जत महादैश्वर्य ॥ सुरवर नर मुनिवर वंद्य जो ॥८०॥ स्थळो स्थळीं करोन वस्ती ॥ पातले नदी चर्मणवतीं ॥ तेथें राहोनि एकरातीं ॥ सैन्यभारेसी विश्रामले ॥ ८१ ॥ ॥ चर्मणवतीचें करोनी स्नान ॥ चक्रेश्वराचें करोन दर्शन ॥ निघाले लक्ष्मी सहित सेन्यगर्जन ॥ भैरवदळेसी ज्योतिस्वरूप ॥ ८२ ॥ दिव्यदुंदुभीचे गजरीं ॥ येवोनि उत्तरले अवंतिकापुरीं ॥ त्रिरात्र राहोनि क्षिप्रातीरीं ॥ प्र

भातें सैन्येंसी निघाले ॥ ८३ ॥ विजयभेरींचा करित गजर ॥ हरिखें पातले नर्मदातीर। पाहोन ॐकार ममलेश्वर ॥ तें महाघोष विंध्याद्रीनें ऐकिला ॥ ८४ ॥ किरातराज किरातवंशीं ॥ राज्य करी प्रतापघोषीं ॥ झुंजा प्रवर्तले निकरेसीं ॥ गंडभैरवासी स्वसैन्यभारीं ॥ ८५ ॥ विंध्याद्रीच्या शिखरावर ॥ युद्ध होतसें घोरांदर ॥ तें गंडभैरव अतिदुर्धर ॥ घोरसंग्रामीं मिसळला ॥ ८६ ॥ धनुर्बाणाचिये कडकडाटीं ॥ शस्त्र अस्त्राचिये खणखणाटीं ॥ आस्थि मांसादि रक्तवृष्टी ॥ नर्मदाजीवनीं मिसळली हो ॥ ८७ ॥ पर्वतास्त्र टाकितां सुचंदन ॥ वज्रास्त्र गंडभैरव पाडी खंडोन ॥ रुद्रास्त्र किरातराज सोडोन ॥ भैरवसैन्य त्रासिलें ॥ ८८ ॥ गंडभैरव शस्त्रास्त्रीं चतुर ॥ शस्त्रांच योजी भस्मासुर ॥ हें जाणोन किरातेश्वर ॥ वैश्वानरास्त्र सोडिताझाला ॥ ८९ ॥ तें मेघास्त्र सोडिलें गंडभैरीं ॥ प्रळयचपळा कडाडल्या अंबरीं ॥ तें सुचंदनें उडविलें पवनशरीं ॥ युद्ध धुरंधर करोनियां ॥ ९० ॥ पन्नगास्त्र सोडी किरातेश्वर ॥ सर्व व्यापिला भैरवभार ॥ येरें गरुडास्त्र सोडूनि भयंकर ॥ उरगशरजाळ खंडिला ॥ ९१ ॥ माहेशास्त्र नारायणास्त्र सुचंदन ॥ सोडील ज्यांवरी अनंतमार्तंडकीर्ण ॥ गंडभैरवीं अपर्णास्त्रीं संकीर्ण ॥ केलीं जीर्ण शक्त्यास्त्रवर्णी ॥ ॥ ९२ ॥ किरातवेषी सुचंदन ॥ वीर शौर्य बळसंपन्न ॥ युद्धीं निवारील शरनिर्वाण ॥ गंडभैरवासी तोषवील ॥ ९३ ॥ गंडभैरव ह्मणे सुचंदना ॥ तुझिया पाहोन अंगवणा ॥ सुप्रसन्न होऊनि मना ॥ स्वइच्छा पुरवीन जें मागसी ॥ ९४ ॥ ऐसें ऐकोन सुचंदन ॥ गंडभैरवासी करी अभिवंदन ॥ ह्मणे मायावेषी नट नारायण ॥ दक्षिणभूभार फेडावया ॥ ९५ ॥ तुमचे घ्यावया दर्शन ॥ इच्छित असें बहुकाळमन ॥ दर्शनीं अपरमित समाधान ॥ तवं झालें असे गंडभैरवा ॥ ९६ ॥ किरातराज स्वचमू सह सत्वर ॥ वंदिला येवोनि हिमकेदार ॥ स्तुति करोनि विनयोत्तरीं अपार ॥

३८

वंदोनि नाथासन्मुख बैसला ॥ ९७ ॥ हें पाहोनि गंडभैरव ॥ सुचंदनासी ह्मणे ऐक अनुभव॥ अंगुष्ठरहित किरातमानव ॥ कोणें अनुभवें झाले सांगपां ॥ ९८ ॥ सुचंदन ह्मणे परिसें सादर ॥ ममांग पूर्वज स्थापी युधिष्ठीर ॥ परमयोद्धा धनुर्धर ॥ जयाचीं प्रख्यात दहानामें ॥ ९९ ॥ तिसरा नवनाग भीमसेन ॥ दोघे माद्रीचे नंदन ॥ अश्विनीदेवावतार जाण ॥ नकुळ सहदेव लावण्यसुरतरू ॥ १०० ॥ ऐसे पांडव प्रसिद्ध महाबळी ॥ दुर्योधनादिक कुरुकुळीं ॥ जन्मले प्रतापकीर्ति भूमंडळीं ॥ दुंदुभिनादान्वय जगश्रवणीं ॥ १ ॥ त्यांतून प्रसिद्ध पांचजण॥ त्यांतील तिसरा श्वेतवाहन ॥ ज्याचा सारथी हरिनारायण ॥ हनुमंत जयाचे ध्वजाग्रीं ॥ २ ॥ विद्याभ्यासी तो बाळपणीं ॥ करितां द्रोणगुरु गोंविला वचनीं ॥ सर्वविद्या शरसंधानीं॥ निपुणत्व मजहून कोणी नकरावा ॥ ३॥ द्रोण ह्मणे सखया अर्जुना ॥ तूं संपूर्ण अखंडित विद्याधना ॥ लाधलासी करोनि बहुसाधना ॥ तव संग्राम तुळणेसी नये दुसरा ॥ ४॥ ऐसा संकल्प बहुतेकदिवसीं ॥ धरिल्या नंतर निजमानसीं॥ द्रोणाचार्य मृगयामिषें वनासी ॥ अर्जुना सहित निघाला ॥ ५॥ विजनीं मृगयाकरित सहज ॥ पातले जेथें ममपूर्वज ॥ तेणें देखोनि भारद्वाज ॥ साष्टांगेंसी वंदिला ॥ ६ ॥ षोडशोपचारें करोनि पूजा ॥ पूर्ण झाला मनोरथ माझा ॥ कांहीं मागें श्रीगुरुराजा ॥ ह्मणून बद्धांजळीं विनवीतसे ॥ ७॥ भारद्वाज ह्मणे ऐक वचन ॥ दक्षिणकरांगुष्ठ करोनि छेदन ॥ जेव्हां अर्पिसी गुरुदक्षिणाजाण ॥ तैं संपूर्ण जाण मज पावली ॥ ८ ॥ परिसोनि जगद्गुरूचें वचन ॥ स्वशिष्य करांगुष्ठ छेदून ॥ पूजिले द्रोणाचार्यचरण ॥ ममपूर्वजें आवडी ॥ ९ ॥ अंगुष्ठ दिधला गुरुदक्षिणीं ॥ ह्मणोनि अद्यापी शरसंधानीं ॥ मध्यमांगुली सीत अर्जुनी॥ धनुशरासनासी वोढिती ॥ १० ॥ हें प्रत्यक्ष देखिजे जनीं ॥ कृतयुगादिक युगीं प्रथम

चरणीं ॥ श्रीनाथ अखंड स्मरणीं ॥ लोटांगणेसी वंदिला ॥ ११ ॥ असो सुचंदनकिरातनृप ॥ गंधर्वांश कुळदीप ॥
आमुचे पूर्वज बळप्रताप ॥ किरातवंशज उजळिले ॥ १२ ॥ हाहा हुहुगंधर्व दोनी ॥ क्रीडा करिती गंगाजीवनीं ॥
ते उद्धरतील शिवार्चनीं ॥ मालतीपतिव्रतेच्या योगें ॥ १३ ॥ ते सुरसिक शिवरात्रकथा ॥ आवडली श्रीखळ
नाथा ॥ पुरवावया सर्व मनोरथा ॥ सद्भक्ताचे आवडी ॥ १४ ॥ ते शिवरात्रीची कथा श्रवण ॥ पुढारीं करावें श्रोतेंजन ॥ रेवातटीं नवनिधान ॥ श्री ज्योतिर्लिंग उतरला ॥ १५ ॥ श्री नर्मदेच्या दक्षिणतिरीं ॥ नाथउतरला शक्ति भैरवभारीं ॥ श्रीकेदारविजयाब्धीच्या लहरी ॥ मनोहरी संकल्पी अपार ॥ १६ ॥ तेथें अनुभवी पातले स्नाना
॥ पंडित पातले अघमर्षणा ॥ हरिसंकल्प सांगतां होय कल्याणा ॥ सेविजे षष्ठमोध्याय गोडहा ॥ ११७ ॥ इति
श्रीकेदारविजय भविष्योत्तर केदारखंडविरचितायां ॥ रेवातटाकीं श्रीनाथशक्ति भैरवचमू आगमनोन्नाम षष्ठमोध्याय
गोडहा ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥


अध्याय ७ वा.
अगस्तीऋषि
विकर्णिककिरात
व कांता मालती
आणि पंचमृग
उद्धार.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय नर्मदातटविहारी ॥ जय ॐकारममलेश्वरस्थापन अवतारी ॥ जय ज्योतिर्मय भक्तसाकारी ॥ जयजय आकारी स्थिरचर्पटी ॥ १ ॥ श्रीकेदारा हिमनगनिवासा ॥ श्रीकंदर्पकोटि चिद्विलासा ॥ श्रीकटतटीं पीतपटवासा ॥ श्रीकंजाक्ष कमनीयस्वरूपा ॥ २ ॥ कर्पूरगौरा कमलाक्षा कर्कोटधरा॥ कमलोद्भवजनका कमलावरा ॥ कपोलमंडित नवकेशरा ॥ कस्तूरीकर्दम तिलकांकिता ॥ ३ ॥ खड्ग पात्र डमरु त्रिशूलधरा ॥ खड्गांगनग शशिशेखरा ॥ खगेंद्रवहना खळसंहारा ॥ खंजिरिटाक्षा कृपानिधे ॥ ४ ॥ गंगा यमनातीर विहारा ॥ गर्गाचार्य वरदा प्रियकरा ॥ गंध माल्यांबरधर चिरा ॥ गीर्वाणगिरा वरदायका ॥ ५ ॥ ऐसा दिनानाथ करुणाकर ॥ सर्वे घेऊनि भैरवभार ॥ पातला जगीं भूधरावतार ॥ कालिंदीतटाकीं जो होता ॥ ६ ॥ रामावतारींचें कथन ॥ परिसे बद्रिनारायण ॥ सर्वे घेतला रेवतीरमण ॥ भूधरावतार जंघनी जो ॥ ७ ॥ शाक्ति दळेसी भैरवभारी ॥ गगन गर्जनेसी हिमकेदारी ॥ येवोनि उतरला नर्मदातिरीं ॥ सुचंदनें सांगितली पूर्वजकथा ॥ ८ ॥ हाहा हूहू गंधर्व दोघेजण ॥ उद्धरतील शिवाख्यानें जाण ॥ ऐसें षष्ठमोध्यायीं निरूपण ॥ संतमुनिजनें परिसिलें ॥ ९ ॥ आतां ब्रह्मोत्तरखंडींचीं रसायनें ॥ शौनकाप्रती सूत ह्मणे ॥ शिवरात्री कथामृत श्रवणें ॥ हरि कीर्तनीं करितसे ॥ १० ॥ बद्रिकाश्रमीं बादरायणें ॥ वेद सिद्धांतासी व्याख्यानें ॥ नैमिषारण्यीं जमदग्नीनें ॥ सौतीसी पान करविलें ॥ ११ नर्मदातटीं श्रीरवळनाथें ॥ वरद गंडभैरवासी ह्या कथार्थें ॥ ते संत पंडित महंतें ॥ शिवरात्रीकथा परिसावी ॥ १२ ॥ शौनकातें वैशंपायन ॥ ह्मणे ऐक शिवरात्री कथन ॥ परमादरीं करितां श्रवण ॥ दोष दारुण नासती ॥ १३ ॥ हाहा हूहू गंधर्व दोनी ॥ सोमदंती राजकाम व्यसनीं ॥ महदैश्वर्यें गंगाजी

त्रनीं ॥ क्रीडती रजनीमाजी निर्भर ॥ १४ ॥ ते होणार प्रारब्धाची सीमा ॥ उपहासिलें ऋषिसत्तमा ॥ हें पाहो
नि घटोद्भवनामा ॥ अगस्तिऋषि क्षोभला ॥ १५ ॥ रेरे हूहूगंधर्वांश अनुजा ॥ स्वर्गभोगा पासोनि निर्लज्जा ॥
पतन पाऊनि होईजे किरातराजा ॥ पापकंदरीं विचरावें ॥ १६ ॥ हूहू तुझा ज्येष्ठसहोदर ॥ भोगिजे किरातांश
कंदर ॥ हाहा होवोनि मृगकांतार ॥ प्राणधाकें अरण्यांत भ्रमावें ॥१७॥ अगस्तिमुखींच्या कार्मुक शरें ॥ गर्जला
प्रचे शापोत्तरें ॥ सोमदंत नृपांतरें कांतारें ॥ कामांकुशकल्हारे समूळ खुडलीं ॥ १८ ॥ हें परिसोनी गजबजिले
दोघेबंधु ॥ येवोनि नमिला शापासिंधु ॥ आमुचा स्वधर्म यशइंदु ॥ स्वर्गीवरीं मिरवी तें करीं ॥ १९ ॥ परिसोनि
गंधर्वाचें करुणोत्तर ॥ कृपेनें द्रवला करुणाकर ॥ माघवद्यचतुर्दशी सोमवार ॥ अपूर्व शिवार्चन घडेल तुजला ॥
॥ २० ॥ पंचमृग कुटुंबींचा संबंधु ॥ द्वैषोपदेश उभय बंधु ॥ करितां मुक्ति पावाल अगाधु ॥ मालती पतिव्रतेच्या
योगें ॥ २१ ॥ ऐसें देखोनि अभयोत्तरें ॥ आश्रमा गेला कलशकुमर ॥ सोमदंती गंधर्वांश किरातवंशधर ॥ क-
र्णिकवीर्यें जन्मला ॥ २२ ॥ कर्णिककिरात सैंधवेश्वर ॥ विकर्णिकनामा तयाचा कुमर ॥ जन्मतांचि मृत्यु पावला
सत्वर ॥ पर्णिकपितृव्य विकर्णिकाचा ॥ २३ ॥ षोडश संस्कार सर्व करोनी ॥ संपादिलें दायादगणी ॥ द्वादशव
र्षां नंतर गुणी ॥ लावण्यखाणी वरियेली ॥ २४ ॥ विकर्णिक नामा निशाधपती ॥ राज्य करी सैंधवपर्वती ॥ प्रा-
कृत सैंधवो विश्वबोलती ॥ अद्यापि युगायुगीं जाणतसां ॥ २५ ॥ नर्मदातटाकीं विस्तीर्ण ॥ उदयास्ता पासोनि
लंबायमान ॥ अगस्तिशिष्यें केलें शयन ॥ तें द्वितीयोध्यायीं कथियेलें ॥ २६ ॥ उदयाद्रि पासोनि विंध्याद्रि वि-
ख्यात ॥ सैंधवें तें राज्य केलें प्रख्यात ॥ उपदेश जिंकोनि झाला यशवंत ॥ गंधर्वांश विकर्णिक जाहला ॥ २७॥

दायाद सर्व कारागृपंजरीं ॥ घालोनि झाला राज्याधिकारी ॥ राज्य करितसे उत्तरतीरीं ॥ श्रीनर्मदातटाकीं जो॥ २८॥
॥ संपत्ति संततीचें ठेवणें ॥ लाधल्या विश्व होय ठेंगणें ॥ दुसरें लावण्यदारारत्नें ॥ मालती ऐसी कनकलतिका ॥
॥ २९ ॥ भ्रतारसेवेची परमभक्ती ॥ वल्लभोत्तरें अमृतोपमे अपेक्षिती ॥ दृष्टि अखंड असे परमार्थीं ॥ मालती र-
मणी पतिव्रता ॥ ३० ॥ सुलोचना मंदोदरी तारा ॥ तयातुल्य मालती परात्पर चतुरा ॥ विकर्णिक किरातेश्वरा
॥ परमदैवें जडली ॥३१॥ अचळभक्ति अचळज्ञान ॥ अचळदैवी अर्चनवंदन ॥ अचळदास्य सख्यात्मनीं ईश्वर-
भजन॥ करितां ऐसें फळ पाविजे ॥ ३२॥ जन्मोजन्मीं शतवारजरी॥पूजिली असेल मगंळागौरी॥ तरीच माल
ती ऐसी नोवरी ॥ प्राप्त झाली विकर्णिका ॥ ३३ ॥ असो ऐसी लांवण्यलतिका ॥ मालती कनकचंपककळिका ॥
परमदैवें विकर्णिका ॥ प्राप्त झाली नवनिधानें ॥ ३४ ॥ स्वरूप सौंदर्य सौदामिनी ॥ मंदस्मिता गजगामिनी ॥ षो
डशकीर्णी निशाकररमणी ॥ विकर्णिकरमणी इंदुवदना ॥ ३५ ॥ कीं मुखकमळकुमोदीनि ॥ विकर्णिकलुब्धला भ्र
मरपणीं ॥ खंजिरिटाक्षी मदनमोचनी॥ भ्रूकार्मुकि शरासना ॥ ३६ ॥ असो ऐसी लावण्यवल्ली॥ ज्ञानविज्ञानघनीं
अखंड फुलली ॥अभेद हरिभक्ति सुरस भरली ॥ पतिसुरतीं सुफळ लवोनीं ॥ ३७ ॥ यापरी विकर्णी किरातराजा
॥ मालतीऐसी लाधली भाजा ॥ स्वर्गसुखान्वय पाविजे लज्जा ॥ भवाब्धिनौकाध्वजा मालती ॥ ३८ ॥ कीं ते
चंपक बकुळ शेवती ॥ मलयागरादि सुगंधयाती ॥ तैसी सुचैल्लाम मालती ॥ नामा सारखी पतिव्रता ॥ ३९ ॥
कीं मलयागरवेष्टित नागिणी ॥ कीं प्रभावेष्टित वासरमणी ॥ कीं जांबूनद सुगंधपर्णी ॥ तैसी सबाह्यांतरीं पतिव्र
ता ॥ ४० ॥ कांहीं दिवस ऐसिये रीती ॥ मालती श्रृंगार वनस्पती ॥ त्यासाजी धन्वंतरीची मूर्ती ॥ संग्रहीं रती

औषधीं तोषला ॥ ४१ ॥ जेवीं कमळीं गुंतला भ्रमर ॥ दृष्टीं न देखे दिवाकर ॥ निमग्न झाला मनोहर ॥ माल-
ती रमण भ्रमरान्वयें ॥ ४२ ॥ जैसी विरक्ति समाधि स्थातें ॥ तैसा झाला विषयीं सक्त ॥ तें दायादगण समस्त ॥ सैन्यसमुदायीं सिद्ध झाले ॥ ४३ ॥ तैं मालती ह्मणे विकर्णिकराया ॥ पद्मिणीशृंगार विहारका या ॥ येथोनि कष्ट काळ भोगावया ॥ प्राप्त स्वामिया दिसतसे ॥ ४४ ॥ दुश्चिन्ह मजला पडतें नयनीं ॥ राज्यप्राप्तीची हानी ॥ होय ऐसें वदतां रमणी ॥ विकर्णिकानें तैं धिःकारली ॥ ४५ ॥ हें पाहोनि किरातरेतानुज ॥ सैन्य भारें गगनगर्जें सहज ॥ घेवोनि रथ पदाति तुरंग गज ॥ करावया झुंजा प्रवर्तला ॥ ४६ ॥ नर्मदातटाकीं विख्यात ॥ सैंधवनगर विंध्याद्रिपर्वत ॥ सैंधवे बोलती जनप्राकृत ॥ किरातकंदरीं संघाट दुर्गमें ॥ ४७ ॥ तेथें घोर करोनि संग्रामा ॥ घेतलें किरातदुर्गोत्तमा ॥ विकर्णिकासी करोनि विरामा ॥ मालती सहित आकर्षिला ॥ ४८ ॥ घेऊनि सर्व धनसंपत्ती ॥ पर्णिक धरूं गेला मालती ॥ तंव कुंभकांतक प्रधान सुमती ॥ पर्णिकातें वदतसे ॥ ४९ ॥ मालती लावण्य स्फुलिंगकीर्णी ॥ स्पर्शतां भस्मसील तत्क्षणीं ॥ पतिव्रता हे विकर्णरमणी ॥ स्वधर्मवंश कुळतारिणी उभयवंशीं ॥ ५० ॥ ऐसी प्रधान वदतां वाणी ॥ विकर्णिकासहित मालतीराणी ॥ ग्रामा बाहेर आणिली ओढोनी ॥ हकटवणीं चहुहाटीं ॥ ५१ ॥ मालती ऐसी पतिव्रता ॥ नदेखों ऐसी करुणासरिता ॥ चतुरपर्णी वैराग्य भरिता ॥ किरातवंश ध्वजलता ॥ ५२ ॥ मालती ह्मणे हे महाजना ॥ आह्मीं जातसों कैलासभुवना ॥ पूजावया कैलासराणा ॥ आवडी तयातें उपजली ॥ ५३ ॥ ऐसें परिसोनि महाजनीं ॥ अश्रु ढाळिलें नेत्रांतूनी ॥ सकुमार मालती क्रमणचरणीं ॥ चालत वनांतरासीं नेली ॥ ५४ ॥ एक ह्मणती कोश मात्रा ॥ चालतां दग्ध होईल वारिजनेत्रा ॥ दुसरी

ह्मणे इच्या सकुमारगात्रा ॥ त्रिनेत्रासी अभिमान ॥ ५५॥ तिसरी ह्मणे अर्चन वंदना ॥ करोनि आराधिलें हे त्रिलोचना ॥ चौथी सांगे हिंडतां तीव्रवना ॥ दास्यत्व हरिहरार्थ करील ॥ ५६ ॥ पांच सहा सात जणी ॥ ह्मणतीं हे विचरतां काम्यकवनीं ॥ कामना पुरवील शूळपाणी ॥ मालती सुवासिनी अक्षयी ॥ ५७॥ आठवी सखी चतुरा ॥ वदती कर्णिक मालतीकरा ॥ धरूनि चढेल कैलासगिरिवरा ॥ गिरिजावरासी हे आवडली ॥ ५८ ॥ नववी ह्मणतसे सकळजना ॥ द्वादशवर्षें तीव्रतपाचरणा ॥ करोनि करील शिक्षाशमना ॥ शिवगणा करवीं परम निकरें ॥ ५९ ॥ ॥ पंचमृग उद्धार सोमदंती अंश ॥ पति सहित कैलासवास ॥ करील अंतरात्मा संतोष ॥ ह्मणोनि जातसे वनाप्रती ॥ ६० ॥ असो अनेकरीति वदले महाजन ॥ तैं वनासी गेले दोघेजण ॥ वन उल्लंघोनि दारुण ॥ काम्यक कंदरीं राहिले ॥ ६१ ॥ विकर्णिक ह्मणे हे शुभानने ॥ एकटी वनीं तुज ठेऊन ॥ वधावयालागीं मृगगण ॥ कैसा जाऊं सांगपां ॥ ६२ ॥ मालती ह्मणे हे किरातराया ॥ हरिहरें निर्मिली माझीकाया ॥ तोचि रक्षील ह्रदयालया ॥ चिंता मनीं कांहीं न करावी ॥ ६३ ॥ विश्वकुटुंबी जगदीश्वर ॥ तोचि तूं मद्रमण नृपवर ॥ तव कृपाकटाक्षींचे शरपंजर ॥ मत्कलेवरमंडित अक्षयी ॥ ६४ ॥ कृपापंजर ॥ सवाह्यांतरीं ॥ परिधान करवील मंगळतुरीं ॥ बांधोनि कृष्णमणि कंठीं गळसरी ॥ निजांकावरीं बैसवोनियां ॥ ६५ ॥ कीं तव अंकांकित भुजंगमणी ॥ स्पर्शील तो पावेल प्राणहानी ॥ ऐसी वामांगाची करणी ॥ तव सामर्थ्यतरणी मोहना ॥ ६६ ॥ ऐसी प्रियेची सुगंधवाणी ॥ सुमनीं गुंफूनि ह्रदयभुवनीं ॥ स्नेहभावें आलिंगोनी ॥ गौरवोनि अमृतोत्तरीं ॥ ६७ ॥ तैं निघाला घेऊनि धनुष्यबाण ॥ शोधोनि मारिला श्वापदगण ॥ भार्येसी एकपात्रीं भोजन ॥ दिवारात्रीं करितसे ॥ ६८ ॥ ऐसें त्रयोदशसंवत्सरें ॥

तीर्थें वंदोनि वधिलीं वनचरें ॥ पापें जोडलीं अपारें ॥ मेरुतुल्य कळेना ॥ ६९ ॥ अगणित झाल्या पापराशी ॥ अ
न्न नमिळे त्रिकार्णिकासी ॥ वनीं हिंडे दिवानिशी ॥ दिनत्रयें एकमृग सांपडे ॥ ७० ॥ ऐसी क्रमिलीं तेरावर्षें ॥ स
मूळ झाला वाढिभ्रंश ॥ पांच सात दिवसासी मांस ॥ मृगाचें घेवोनि येतसे घरा ॥ ७१ ॥ तैसेपरी गर्भिण एके-
दिवसीं ॥ धरोनि आणिली स्वमंदिरासी ॥ उदर फाडितां कासाविसी ॥ बाळकें महाशब्द तैं केला ॥ ७२ ॥
मृगपाडसाची परिसोनि वाणी ॥ मालती दचकली अंतःकरणीं ॥ ह्मणे उत्तमा ऐसी अगाधकरणी ॥ आजपासोनि
न करावी ॥ ७३ ॥ कंदमूळ आणोन राया ॥ संरक्षावी आपुली काया ॥ जीववध करोनि तीव्र वांया ॥ सुकृतक्षया
कां करसी ॥ ७४ ॥ परिसोनि मालतीचा शब्द ॥ गमला तीव्र ह्रदयभेद ॥ न करितां मृगाचा वध ॥ क्षुधाते
न्ही शमेना ॥ ७५ ॥ समजोनि पूर्वसुकृताचरणा ॥ गंधर्ववंश किरात तपाचरणा ॥ तैं मृगचरगणीं करितां छळ-
णा ॥ तोचि क्रोधाग्नि मनीं वाढला ॥ ७६ ॥ यासाठीं मृगाचें दमन ॥ करितसा अहोरात्र दारुण ॥ परी न बो-
लेची शब्दकठिण ॥ वल्लभातें महासती ॥ ७७ ॥ क्षमा आलिंगन देवोनि प्रीतीं ॥ ह्मणे राया गुणैकमूर्ती ॥ मी
एक मागतें परमार्थी ॥ मृग जीवंत धरोनि आणावा घरा ॥ ७८ ॥ हेचि विनंती वारंवारीं ॥ मृग वधोनि न आ
णावा घरीं ॥ मज खेरीज वधतां न सापडे वनांतरीं ॥ ह्मणोनि मृगवत्सवध नकरावा ॥ ७९ ॥ तथास्तु ह्मणोनि त्रि-
कर्णिक जाण ॥ प्रवेशला शोधित काम्यकवन ॥ सज्जोनियां धनुष्यबाण ॥ वनोपवनीं हिंडतसे ॥ ८० ॥ दिवारात्रीं
हिंडतां श्रमा ॥ पावल्या न मिळे मृगाची प्रतिमा ॥ निराहारी परतला निजाश्रमा ॥ महाकष्टें करोनियां ॥ ८१ ॥
येतां देखोनि रिक्तरमणा ॥ मालती सुहास्य निशाकर कीर्णा ॥ लावण्य लतिका जैसी अपर्णा ॥ त्र्यंबकाचे अंकि-

ता ॥ ८२ ॥ तैसी पातली षोडशकळी ॥ वल्लभ चकोरनेत्र न्याहाळी ॥ कीं वचन मौक्तिक मराळी ॥ गुंफित हंसमेळीं आवडी ॥ ८३ ॥ कीं वसंतकाळातें जैसा अपक्षी ॥ कीं मंत्रोपदेशें जैसा संरक्षी ॥ कीं सर्वांभूतीं समान रक्षी ॥ तत्वानुभवी तैसी मालती ॥ ८४ ॥ ऐशी मालती देखोनि नयनीं ॥ ह्मणे कांते कांतार धुंडोनी ॥ नैमिषारण्या पासोनी ॥ कम्यकंदरीं वनांतरीं शोधिली ॥ ८५ ॥ तीनदिवस निराहारी ॥ शोधिली गुहा गिरिकंदरीं ॥ कष्ट झाले गे ममसुंदरी ॥ ह्मणोनि निजमंदिरीं पातलों ॥ ८६ ॥ निराहारी निरोदक ॥ हिंडतां पावलों परमदुःख ॥ तीनदिवसातें तवमुख ॥ मृगांक लक्षीविश्रांती पावलों ॥ ८७ ॥ भार्या परता मित्रदुसरा ॥ शोधितां न मिळेचि या वसुंधरा ॥ भोजनासी जैसी जननीगिरा ॥ कार्यासी मंत्री जाणिजे ॥ ८८ ॥ दास्यत्व कारणें दासीचीच शोभा ॥ अंतारशयनीं जैसी रंभा ॥ ऐसी षड्गुणी अगंप्रभा ॥ ते भार्या कुळवर्धनी ह्मणावी ॥ ८९ ॥ ऐशी भार्या सर्वश्रमहारती ॥ भार्यें सर्वें विश्राम करिती ॥ भार्यें सर्वें यशकीर्ती ॥ ध्रुवाकृति सरेना ॥ ९० ॥ वनीं त्रिदिनउपोषण श्रमा ॥ करोनि पातलों निजाश्रमा ॥ लक्षितां तव दिव्यसौंदर्यद्रुमा ॥ विश्रामछायीं निवालों ॥ ९१ ॥ कांता विश्रांतीचें स्थान ॥ कांता निजानंद स्वधर्मसदन ॥ ही प्रचीत पावली मममना जाण ॥ मालती दर्शनें गमतसें ॥ ९२ ॥ होणार चिन्हें भ्रताराचीं जाणोन ॥ मालती वदे हास्य वदन ॥ मृगवध न करीं जाण ॥ मज वांचूनि तूं जाणपां ॥ ९३ ॥ आतांचि जावें काम्यकवनीं ॥ सजीव धरोनि आणावी हरणी ॥ सांपडतील ही मद्वाणी ॥ जन्मखाणी येथोनि खुंटली ॥ ९४ ॥ जेवीं अमृतघन वर्षणीं ॥ चकोरा तृप्ति होयमनीं ॥ तेवीं सुहास्या मालतीकिरणी ॥ विकर्णिकातें बोले आवडीनें ॥ ९५ ॥ मग घेऊनियां धनुष्यबाण ॥ हर्षें प्रवेशला महावन ॥ दिवारात्रीं करितां भ्रमण ॥ मृगचरगण

नदेखे ॥ ९६ ॥ दुसरेंदिवसीं हिंडतां वनीं ॥ अस्ता पावला वासरमणी ॥ त्रिल्वदृक्षाचिये काननीं ॥ कासारति-
रीं राहिला ॥ ९७ ॥ असंभाव्य सरोवरीं ॥ पाश पसरिले कासारतिरीं ॥ आपण बिल्ववृक्षखांदियेवरी ॥ जपत बै-
सला मृगहननार्थी ॥ ९८ ॥ तंव पंचमृगणाचा मेळा ॥ नीर प्राशावया सरोवरीं आला ॥ जळपान करितां तें वे
ळा ॥ अद्भुत वर्तलें तें ऐका ॥ ९९ ॥ तों झडझडाट सुटतां पवन ॥ खांदी मोडली कडकडोन ॥ विकर्णिक पडला चाच
रून ॥ कासारजीवन धडाडिलें ॥ १०० ॥ जीवनीं पडतांचि विकर्णिक ॥ बाहेर पातला लगबगदेख ॥ पुन्हा वृक्षीं
चढोनि अदृश्यक ॥ मृगसमुदायातें विलोकी ॥ १ ॥ वृक्षशाखा पडतां जीवनीं ॥ पळोनि गेल्या पांचहरिणी ॥ पुन-
रपि एक कुरंगिणी ॥ उदकपानार्थ पाहे भोंवती ॥ २ ॥ स्वापद नदेखे एकही नयनीं ॥ जपत बैसला तो तरुदाटणीं ॥
पांचही हरणांग प्रत्यगींचें पाणी ॥ अपूर्व शिवलिंगीं अभिषेक झाला ॥ ३ ॥ शिवरात्री असे तयेदिवसीं ॥ माघव
द्य चतुर्दशी ॥ इंदुवासर शुभतिथीसी ॥ यामिनीपूजार्चन घडलें ॥ ४ ॥ किरातशीर्षगात्र गुहाविदारी ॥ भागी-
रथीच्या पातल्या लहरी ॥ उर्ध्वमूल मध्यशाखांतरीं ॥ छंदांसी यस्य पर्णानी ॥ ५ ॥ श्रीमद्भगवद्गीतेची वाणी ॥
अर्जुनासी बोधी सारंगपाणी ॥ विकल्प न मानिजे गुणिजनीं ॥ कथांतरीं हो न पहातां ॥ ६ ॥ नवखंड शरीरी
पृथ्वी देख ॥ दहावेंखंड काशीमस्तक ॥ सत्रावीचें गंगोदक ॥ आत्मा विश्वनाथ अभिषेका ॥ ७ ॥ असो निर्गुण
ब्रह्मारण्यीं ॥ उर्ध्वमूल अधःशाखेचें पाणी ॥ अपूर्वशिवार्चनीं शिवरात्रींदिनीं ॥ अभिषेकिलें विकर्णिकें ॥ ८ ॥ चा-
रप्रहरीं पूजायामिनी जागरणा ॥ तें मानवलें शिवाच्यामना ॥ भोळा कैलासीचा राणा ॥ प्रसन्न होईल अतिसा-
क्षेपें ॥ ९ ॥ असो चारप्रहर क्रमोनि रजनी ॥ तृषाक्रांत झाली हरिणी ॥ पति बाळकातें त्यजोनी ॥ सरोवरजीव-

नासी पातली ॥ १० ॥ तोय सेवूनि कुरंगिणी ॥ मागें परतल्या उड्डाणचरणीं ॥ पाश गुंडाळोनि पडली धरणीं ॥ हें विकर्णिक लक्षोनि धांवला ॥ ११ ॥ हर्षें करोनि धरिली हरिणी ॥ ह्मणे मालतीची फळली वाणी ॥ हरणी घेऊनि उल्हासमनीं ॥ ग्रहांगणीं पातला ॥ १२ ॥ मालतीनें देखोनि प्रसन्न वदन ॥ ह्मणे घडलें यांसी शिवार्चन ॥ आजि पाहिला सुदिन ॥ सुवर्णीसुगंधीं उगवला ॥ १३ ॥ विकर्णिक ह्मणे शुभाननें जाण ॥ सुफळ झालें तुझें वचन ॥ आतां करीं मृगमांसभोजन ॥ द्वयउपोषणांतीं पारणें ॥ १४ ॥ तंव हरिणी ह्मणे हे मालती ॥ सत्य परिसावें महासती ॥ तुझ्या दर्शनें हरिहरप्राप्ती ॥ होय आह्मांसी गमतसे ॥ १५ ॥ परी तें असो होणार सत्कर्म ॥ माझा पूर्ण करावा काम ॥ भ्रतारकामना सुरतसंगम ॥ सफळ करावा जननीये ॥ १६ ॥ तव भ्रतारभयें करोनी ॥ पळोनि तो गेला अस्तमानीं ॥ तोय न सेवितां घोररजनी ॥ महादुःखें लोटली ॥ १७ ॥ तैं मद्भ्रतार कामातुर ॥ झाला व्याकुळ अपार ॥ रतिसंग मागें वारंवार ॥ परी मीं न रमलें पतिसवें ॥ १८ ॥ कुरंग झाला बहुतअधीर ॥ अनुमात्रही न धरी धीर ॥ म्यां तों प्राशिलें नाहीं नीर ॥ ह्मणोनि कुरंग वर्जिला ॥ १९ ॥ रुदितां क्षुधिता तृषाक्रांता ॥ तांबूल कुंकुम वस्त्र हरिता ॥ ह्या मन्वादिकीं वर्जिल्या समस्ता ॥ जेवीं आळवणें कथा नामाविणें ॥ २० ॥ असो ममकांत कामविव्हळ ॥ जाहाला मीं न होतां अनुकूळ ॥ तयातें सांगोनि मन निर्मळ ॥ जळसेवनार्थ मीं आलें ॥ २१ ॥ ये चतुष्पदा मी तुझी ललना ॥ तृषाक्रांत न कीजे मैथुना ॥ ऐसें सांगोनि निजरमणा ॥ आलें जीवनासी तव कांत जेथें ॥ २२ ॥ उदक सेवूनि जातां सत्वरीं ॥ गुंतोन पडिलें पाशपंजरीं ॥ धरोनि आणिलें तव मंदिरीं ॥ धन्य प्रारब्धगती उत्तम माझी ॥ २३ ॥ आतां मद्भ्रांस-

पाक करोनी ॥ दंपत्यें जेवाल हर्षें करूनी ॥ याहोनि श्रेष्ठलाभ तो कवणजनीं ॥ निवडोनि वनचरां सांगावा ॥ २४ ॥ बरें तें असो सुरस बोलणें ॥ कळो येईल सुकृताचरणें ॥ मी जावोनि भ्रतरचरण ॥ वंदोन पुरवीन जें मानसीं ॥ २५ ॥ पुरवूनि भ्रतारमनोरथवल्ली ॥ पाडसें न्याहाळीन दृष्टिवहिलीं ॥ शीघ्र येईन हेचि पाऊलीं ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ २६ ॥ पुरुषविकाराची भावना ॥ नाना सुरतोपचारी ललना ॥ पाविजे जाणत अससी ह्या वेधना ॥ नलगे जननी सांगणें ॥ २७ ॥ परिसोनि मृगाचें रसाळ भाषण ॥ संतोषलें मालतीचें मन ॥ आज्ञा दिधली गहिवरून ॥ नेमिल्या नेमा येइजे ॥ २८ ॥ पतीसी व्हावया अनुतापज्ञान ॥ मृगीसी दिधलें ध्रुवप्रमाण ॥ वंदोनि मालतीचें चरण ॥ तेथोनि मृगी वनीं गेली ॥ २९ ॥ चतुष्पादामाजी कुरंगी भली जाती ॥ प्रमाण देवोनि स्वगृहा जाती ॥ व्हावया जन्म अजाती ॥ स्वपतीपासीं पातली ॥ ३० ॥ भेटली पतीसी प्रेमभरें ॥ पोटासी धरिलीं लेंकरें ॥ पतीतें तोषऊनि सुरतोपचारें ॥ ह्मणे ऐक कुरंगेश्वरा ॥ ३१ ॥ तुमचा आमुचा ऋणानुबंध ॥ समाप्तीसी आला खुंटला विनोद ॥ मुलें संरक्षावीं आनंदें ॥ सुखें नांदें वनांतरीं ॥ ३२ ॥ द्वितीयसंबंध करोनि संसारीं ॥ क्रीडा करीं काम्यक कांतारीं ॥ मी सत्य करावया वैखरी ॥ मालतीदर्शना जातसें ॥ ३३ ॥ मालतीसौंदर्य लावण्यलहरी ॥ विकर्णिक किरात सागरोदरीं ॥ गर्जत करुणाघन उत्तरीं ॥ श्रीगंगे यमुने सारखीं ॥ ३४ ॥ निर्मळ जैसी जान्हवीबाळा ॥ क्रोधें जाळील याभूगोळा ॥ तियेचा पति जैसा भोळा ॥ शंकराचि जाणपां ॥ ३५ ॥ महापतिव्रता ते मालती ॥ जैसी विरक्ता वरिज शांती ॥ तैसी नामासारखी करणी आकृती ॥ श्रीमालतीची देखिली ॥ ३६ ॥ भ्रतारकाम करूनि शमना ॥ शीघ्र येईन तव दर्शना ॥ ऐसें त्रिवार दिधलें वचना ॥ मालतीलागीं प्राणेश्वरा ॥ ३७ ॥ प्रियेच्या प-

रिसोनि अमळोत्तरा ॥ कुरंग झाला अतिघाबरा ॥ ह्मणे दुस्तर या संसारा ॥ ग्रहणीसार प्रथम संबंधीं ॥ ३८ ॥ हे सकुमार शृंगडोळसे ॥ तुजवीण परदेशी त्रयपाडसें ॥ यांसी पाळोनि संतोषें ॥ निर्भय वनीं असावें ॥ ३९ ॥ मीं जातसें मालतीसदना ॥ तोषवीन तिचिया मना ॥ इतुकेनीं संसारबंधना ॥ मुक्तझालों शहाणिये ॥ ४० ॥ तुजवीण त्रय-बाळकांसी ॥ आमुचेहस्तें न होय पाळण्यासी ॥ तू जरी उदास बोलिलीस पाडसांसी ॥ तरी ती संतोषी तव संगें ॥ ॥ ४१ ॥ ऐसें परिसोनियां पाडसें ॥ पितयासी बोलतीं मनोल्हासें ॥ तुह्मीं उभयतां आनंदमानसें ॥ काम्यकवनीं असावें ॥ ४२ ॥ आमुचें मांस अतिकोमल ॥ मालती स्वीकारील स्नेहाळ ॥ आमुचा जन्म होईल सफळ ॥ धन्य ह्मणतील वंश याचा ॥ ४३ ॥ ऐकोनि चौघाचें करुणोत्तर ॥ हरिणी ह्मणे धन्य जन्मांतर ॥ होईल सर्वांचा उद्धार ॥ मालतीदर्शनें अविलंबें ॥४४॥ कुरंग कुरंगी तिघेंबाळें ॥ हर हर शब्दें गर्जिनले॥ टाळी पिटूनि करकमळें ॥ मालती मंदिरा पातलीं ॥ ४५ ॥ पांचही मृग लोटांगणीं ॥ वंदिली विकर्णिक लावण्यखाणी ॥ मालतीवचनाची शिराणी ॥ सुरकिन्नरगणीं दुर्लभ ॥ ४६ ॥ पाहोनि मृगींचें विज्ञानपूर्ण ॥ चतुष्पादास केवढें ज्ञान ॥ आह्मीं मनुष्य असोन देहाभिमानें जाण ॥ व्यर्थ हिंसार्णवीं बुडालों ॥ ४७ ॥ केवढी असाधारण करणी ॥ पति सह पाडसें घेऊनी ॥ आली निर्भय शुद्धांतःकरणीं ॥ धन्यधन्य जन्मांतर इचें ॥ ४८ ॥ ऐसें पाहोन विकर्णिक ॥ अनुतापें झाला विवेक ॥ ह्मणे धन्य तूंचि शुभाननें एक ॥ सर्वभूतीं समानदया ॥ ४९ ॥ मी पतित बत दुष्कर्मी ॥ उद्विग्न चित्तीं विषउर्मी ॥ नविचारलें कर्माकर्मी ॥ स्वप्नींही स्वधर्मीं न वर्तलों ॥ ५० ॥ हर हर शंभु शशिशेखरा ॥ ह्मणोनि भूमीं टाकिलें शरीरा ॥ तों मृत्युलोकीं जावया यमकिंकरा ॥ आज्ञा दिधली यमधर्में ॥ ५१ ॥ यमाज्ञेनें दूत

केदार पातले महीं ॥ हें मालतीतें ठाउक नाहीं ॥ धरा बांधा विकर्णिकातें ही ॥ हें मृग समुदायीं लक्षिलें ॥ ५२ ॥ मृ- विजय
गगण ह्मणती हे मालती ॥ यमदूतीं आकर्षिला तव पती ॥ हें पाहोनि महासती ॥ यमभृत्यांसी वदतसे ॥ ५३ ॥
४५ कवणाचे तुह्मीं असा कवण ॥ करूंनये तेंचि कर्म करण ॥ मातें न विचारितां मत्पतिबंधन ॥ काय कारण करि अ. ७
तसा ॥ ५४ ॥ मद्रमण क्रोधाग्नीची गरिमा ॥ ठाउक असे तुझिया यमा ॥ अभिमंत्रोनि रुद्रन्यास अनुक्रमा ॥ भस्म
लाविलें पतीसी ॥ ५५ ॥ भयाभीत होऊनि मानसीं ॥ विकर्णिक बैसला मालतीपासीं ॥ तों दूत गेले यमापासीं ॥
वर्तमान वर्तलें तें सांगितलें ॥ ५६ ॥ ऐकोनि अमर्यादेची वाणी ॥ कृतांत कोपला चौगुणीं ॥ मत्तमातंग प्रचंडवाह-
नीं ॥ बैसोनि यम निघाला ॥ ५७ ॥ रागें पातला विकर्णिकापासीं ॥ आकर्षितां ते लिंगदेहासीं ॥ तें स्वर्गीं गज
बजला कैलासवासी ॥ नंदिकेश्वरासीवदतसे ॥ ५८ ॥ मालती सहित विकर्णिकासी ॥ घेवोनि यावें कैलासासी ॥
दंडूनि यमदूत यमासी ॥ प्रबळबळें कुरंगेसी आणावी ॥ ५९ ॥ परिसोनि जगदीश्वराची वाणी ॥ नंदिकेश्वर वि-
मानयानीं ॥ घोरें गर्जोनि उतरला धरणीं ॥ मालती जवळीं पातला ॥ ६० नंदी आणि कालिंदीबंधू ॥ वाग्वा-
दीं खवळले प्रतापसिंधु ॥ युध्दासी खवळले सक्रोधू ॥ ह्मणती वधूं एकमेका ॥ ६१ ॥ यम ह्मणे रे नंदिकेश्व
रा ॥ त्वदर्यी शोध आणोनि बरा ॥ मग करावें घोरसमरा ॥ कर्णिककिरात पापराशि हा ॥ ६२ ॥ त्रयोदश वर्षें
किरातनर ॥ पाप जोडी वधोनी पक्षिकुळें वनचर ॥ किरातपापाचें गिरिवर ॥ मोजितां संख्या न
करवे ॥ ६३ ॥ पापी नरासी यमलोका ॥ घेऊनि जातसें शिवाज्ञेची मुद्रिका ॥ ऐसें असोनि तूं निःशंका ॥ यु-
द्धासी देखा प्रवर्तलासी ॥ ६४ ॥ ॥ दीर्घ पाहोनि बरवें नंदी ॥ हें नकरीं शिव मुद्रेसी वंदीं ॥ मजकृतांता सवें ४५

द्वंदी ॥ कवण तो अक्षयी वांचला ॥ ६६ ॥ ऐकोनि यमाचे तीव्र बोल ॥ नंदी उडवी चरणकपोल ॥ ह्मणे रे शि वरात्रीं शिवार्चन घडलें अमोल ॥ पुण्यसागर खोल विकर्णिकाचा ॥ ६६ ॥ शिवार्चन केवळ खदिरांगार ॥ स्पर्शतां दुष्कृत कर्पूरागिरिवर ॥ भस्म होती अगणित महाथोर ॥ तेथें तूं पतंगाकार केवीं उरसीं ॥ ६७ ॥ असो कृतां तासवें नंदिकेश्वर ॥ वदोनि तीव्र युद्ध केलें घोरांदर ॥ मालती सहित किरातेश्वर ॥ पंचमृगेसी विमानीं वाहिली ॥ ६८ ॥ वृषभयोगीं नंदीपुराणीं ॥ अपार कथिली विचित्रवाणी ॥ संज्ञा दिधली सारांश वचनीं ॥ यदर्थीं विकल्प न धरावा ॥ ६९ ॥ हाहा हूहू गंधर्व दोघे ॥ दिव्यदेह पावले अमोघे ॥ मृगपाडसें जीं तिघें ॥ त्या दिव्याप्सरा तिनी झाल्या ॥ ७० ॥ पंचमृगांची टाकोनि गवसणी ॥ दिव्यदेहासह विकर्णिकरमणी ॥ नंदिकेश्वरें वाहोनि विमानयानीं ॥ कैलासभुवनासी पातला ॥ ७१ ॥ अक्षयी वास कैलासीं ॥ झाला मालती विकर्णिकासी ॥ पंचमृगें किन्नर ऐसीं ॥ उद्धरिलीं दीनानाथें ॥ ७२ ॥ हे शिवरात्रीकथा परमसार ॥ श्रवणार्थि या रसिक अपार ॥ ब्रह्मोत्तर खंडींचे उद्गार ॥ बद्रिनाथ वदे रेवातटीं ॥ ७३ ॥ सुचंदन सांगे गंडभैरवा ॥ ममपूर्वजाचा हा शिवार्चनठेवा ॥ निवेदिला तो महानुभवा ॥ आत्मानुभवी जाणती ॥ ७४ ॥ आधींच शिवरात्रीची कथा ॥ कायकारण आली ह्मणतील श्रोता ॥ सहज पातली दृष्टांता ॥ नाथ पंथाग्रीं रेवातिरीं ॥ ७५ ॥ मालती नवरस प्रेमभरिता ॥ सुजाण शुची पतिव्रता ॥ जिचें चरित्र परिसतां ॥ दोष दारुण नासती ॥ ७६ ॥ ऐसीच वृंदा महासती ॥ जिची पुराणीं महाख्याती ॥ अंगें येवोनि वैकुंठपती ॥ अर्चन करी वृंदेचें ॥ ७७ ॥ तें पुढारीं चोविसाध्यायीं ॥ कथा ऐकावी केदारविजयीं ॥ असो नाथ सूर्योदयीं ॥ सैन्य समुदायीं निघाला ॥ ७८ ॥ वीरश्रीकंकण भैरववीरीं ॥ पृथकाकार

सर्वीं बांधिलीं करीं ॥ जयजयकार भैरवभारीं ॥ झाला गगनगर्जनेसारिखा ॥ ७९ ॥ इतिश्री केदारविजय ग्रंथ ॥ श्रवणार्थी याचे पूर्णमनोरथ ॥ होय हरिनामीं नवरसभरित ॥ सेचा सप्तमोध्याय गोड हा ॥ ८० ॥ इति केदारविजय भविष्योत्तर ॥ ब्रह्मोत्तरखंडे नंदीपुराणे ॥ विरचितायां सप्तमोध्याय समाप्तः ॥ ओंव्या ॥ १८० ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अध्याय ८वा.



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय ॐकारबीजांकुरा ॥ जय अंगारक जननीधर अलंकारा ॥ जय अं-
गारपर्ण सिद्ध विद्याधरा ॥ जयनर्मदा विहारिया प्रियपरमा ॥ १ ॥ श्वेतवराह अवतारा ॥ श्वेतबंध ज्योतिर्लिंगांकित
आकारा ॥ श्वेतमंदार हरप्रियकरा ॥ श्वेततुरंगम वाहनप्रिया ॥ २ ॥ श्वेतांबरधर लीलावतारी ॥ स्वछंद स्वच्छ
मनोहरी ॥ स्वस्थासनी स्वतंत्र स्वव्यापारी ॥ स्वस्थ मानस कारका ॥ ३ ॥ स्वयंभ स्वप्रकाश स्वरव्यंजना ॥ स्वर्गाप
वर्गांप्रिय तर्जन भर्जनः ॥ स्वरातीता स्वरभूषणा ॥ स्वजन मुनिमनरंजना खळनाथा ॥ ४ ॥ ऐसा खळनाथ निरं-
जन ॥ योगमाया मानसमोहन ॥ दुरित दैत्यदळ भंजन ॥ शुक्लहयवाहन भैरवदळीं ॥ ५ ॥ गंडभैरवासी सुचंदन
॥ सांगताझाला मालतीचें माहिमान ॥ शिवरात्रीं पंचमृग उद्धारण ॥ कथिलें संपूर्ण जाणतसां ॥ ६ ॥ बळिभद्र प्र
त्यक्ष भूधरावतार ॥ सवें घेऊन वद्रिविहार ॥ अस्तमान होतां दिवाकर ॥ श्रीनर्मदातटीं उतरला ॥ ७ ॥ सप्त-
मोध्यार्यांचा कथारस ॥ श्रोतीं सेविला गोडसा ॥ पुनरपि पहातां सदय अरसा ॥ निजरूपसौंदर्य आपुलें दि-
सें ॥ ८ ॥ श्रीनर्मदातट विहारी ॥ स्वचमूसी उतरला भैरवभारीं ॥ निबिड दाटली शार्वरी ॥ कृष्णपक्षींची अनिवा
र ॥ ९ ॥ हें देखोनी सहस्रकरें ॥ अरुणासी सारोन माघारें ॥ जागृत करावया केदारेश्वरभारे ॥ दशशतकरें उदया
सी आला ॥ १० ॥ ऐसें उदयासी येतां रविमंडळ ॥ जागे झालें सहशक्ति भैरवदळ ॥ स्नान संध्या करोन स-
कळ ॥ चमू प्रबळ सजिली ॥ ११ ॥ अष्टादश भैरवी सेनार्णवो ॥ नवनाथवर षोडशसिद्ध समूहो ॥ द्विसप्तकोटि
मंत्रास्त्र भैरवो ॥ प्रबळवाहिनी निघाली ॥ १२ ॥ एकशतलक्ष ऐशींहजार ॥ चालिले मीर अमीर पैगंबर ॥ सुव-
र्णदंडी छडीदार ॥ सेनामुखीं सहस्रएक चालती ॥ १३ ॥ ऐसा सेनार्णवाचा लोट ॥ दक्षिणपंथीं चालिला अ-

चाट ॥ गिरिकंदरीं लंघितां घाटपाट ॥ तापीतटीं नीट पातले ॥ १४ ॥ तपती कालिंदीची भगिनी ॥ दिवाकराच्या ह्या द्व्यनंदिनी ॥ त्यामार्जा तपती पश्चिमवाहिनी ॥ तेथें श्रीनाथ वाहिनीसी उतरले ॥ १५ ॥ करोन तेथें माध्यान्हस्नान ॥ वाल्मीकाश्रमीं विश्रामोन ॥ तेथोन निघाले घनगर्जन ॥ भैरवचमूसी प्रतापीं ॥ १६ ॥ सैन्यभारीं महागजर ॥ वाद्यध्वनीसी ब्रह्मांडोदर ॥ गर्जना करित भैरवभार ॥ कृष्णेश्वरा पातले ॥ १७ ॥ वेरूळीं कृष्णेश्वर जाण ॥ कृतयुगीं असे शुभ्रवर्ण ॥ त्रेतायुगीं पीतवर्ण ॥ ताम्रवर्ण द्वापारीं ॥ १८ ॥ कलयुगीं झाला लोहवर्ण ॥ ह्मणोन कृष्णेश्वर नामाभिदान ॥ श्रीकेदारखंडींचें वचन ॥ खळेश्वरें स्थापिला ॥ १९ ॥ ब्रह्म विष्णु श्रीशंकर ॥ त्रैमूर्तीचा हा एक अवतार ॥ द्वादशज्योतिर्लिंगांचा आकार ॥ वद्रिविहारी करून स्थापी ॥ २० ॥ द्वापारींचा हा खळनाथ ॥ असोन कैसी स्थापना करित ॥ ऐसें वदतील महापंडित ॥ यदर्थीं पुराणसंमत परिसावें ॥ २१ ॥ बाहत्तरयुगाचे प्रथमचरणीं ॥ अवतार माळिकेचे फिरती मणी ॥ जाहले तेंचि निर्गुणत्रिगुणीं ॥ एकत्वमुखीं त्रिगुणावतारी ॥ २२ ॥ द्वादशलिंगांकित चिन्हें ॥ ज्योतिस्वरूपीं भिन्नाभिन्नें ॥ सर्वे लिंगांगीं भूषणें ॥ वाजीवाहन दैत्यदमनी ॥ २३ ॥ असो बाहत्तरयुगाचे प्रथमप्रहरीं ॥ अवतारला हा वद्रिविहारी ॥ ह्मणोनि द्वादशलिंगांकित शरीरी ॥ कृष्णेश्वरीं उतरला जो ॥ २४ ॥ स्थापिलीं हीं ज्योतिर्लिंगें बारा ॥ यालागीं नाम हें खळेश्वरा ॥ ज्योतिर्लिंग ह्मणती पुराणोत्तरा ॥ शौनकमुनिवर अद्यापी ॥ २५ ॥ हें भविष्योत्तर केदारखंडीं ॥ सज्जनीं पहातां संशयखंडी ॥ दूषण ठेवितील पाखांडी ॥ ह्मणोन दृष्टांत सुमनीं पूजीं ॥ २६ ॥ असो लक्ष्मी आणि खळनाथ ॥ सजोन भैरवदळ समस्त ॥ वाद्यध्वनीसी गर्जना करित ॥ पंचवटींसी पातले ॥ २७ ॥ शेष ह्मणे

गा बद्रिविहारा ॥ पंचवटीं उत्तरावें सैन्यभारा ॥ नवनाथ भैरवादि महावीरा ॥ निवडोन धाडीं संह्याद्रीं ॥ २८ ॥ त्रेतायु
गीं गा याचिस्थानीं ॥ पंचवटिकेंचिया काननीं ॥ मरीचि मृगवेष धरोनी ॥ आला होता जाणतसां ॥ २९ ॥ पाठीं
लागोन मिरजेपर्यंत ॥ मरीचि वधिला मरंचीक्षेत्रांत ॥ खर दूषण सांवादि वधोन समस्त ॥ शूर्पनखेसी विटंबिलें-
॥ ३० ॥ येथोन राक्षसघातारंभ रंग ॥ खंडिल्या पावले जय अभंग ॥ संह्याद्रींचे कोंत्र मत्तमातंग ॥ खंडावें शक्तिकु
ठारीं ॥ ३१ ॥ रक्तबीज करवीर कोल्हासुर ॥ यांचे बंधु दायादकुमर ॥ खंदारनामा निशाचर ॥ दहासखेसी पातला ॥ ३२
ते लवण खंदार दोघे बळी ॥ अजिंक्य असतील याभूमंडळीं ॥ मृत्यु जिंकोन पायातळीं ॥ तोडर ज्यांनीं बांधि
ले ॥ ३३ ॥ त्यांचें युध्द अनिवार ॥ ते काळखंजनाचे दोघे कुमर ॥ त्यातें वधावयाचा विचार ॥ हा सर्व वृतांत
तुज ठाउका ॥ ३४ ॥ त्यांत प्रसिध्द शतव्याघ्र शरीरी ॥ स्वनामीं वसविली सोनारपुरी ॥ सोनारदेशभाषा कीजे
उत्तरीं ॥ ह्मणोन सोनारी वदती जन ॥ ३५ ॥ ऐसी परिसोन शेषवाणी ॥ आवश्य ह्मणे तैं खड्गपाणी ॥ षोडश-
सिध्दांसी बोलावूनी ॥ श्रीविष्णुरमणी वदतसे ॥ ३६ ॥ षोडशचक्राधीश्वर ॥ वडवाग्निसिध्द धुरंधर ॥ रस आणि
रजोगुणी सिध्दकुमर ॥ गंधसिध्द वसुंधरोद्भवें ॥ ३७ ॥ वडवाग्निसिध्द त्या वडवानळें ॥ जाळावया दुरित दनुज
दळें ॥ सोहंसिध्दाचिये करकमळें ॥ शतव्याघ्रदैत्य वधिजेती ॥ ३८ ॥ असो सोळासिध्द दळभारेंसीं ॥ बोला
विलें रेवणसिध्दासी ॥ रेवातटींचा जो निवासी ॥ रेवामज्जनीं जो निर्मिला ॥ ३९ ॥ रेवाजीवनीं शूलपा-
णी ॥ पातला ब्रह्मकपाट भयें करूनी ॥ स्नान करितां षोडशनिशाकरमणी ॥ उगवले शिवाघमर्षण करितां ॥ ४० ॥
अतींद्रिय शब्द स्पर्श रूप रस गंधू ॥ कीं षोडशकळीं प्रकाशइंदू ॥ सिद्ध जन्मले प्रतापसिंधू ॥ आकाशवाणी

जगश्रवणीं ॥ ४१ ॥ ह्मणोन वदती रेवणसिद्ध ॥ भूत भविष्य नानाविधू ॥ वदणार हें मानदेशीं प्रसिद्धू ॥ षोडशचक्रीं शिवाचे जन्मले ॥ ४२ ॥ असो षोडशसिद्धां प्रबोधोनी ॥ धाडिले खंदारराक्षस हननीं ॥ सोळासहस्र लक्षवाहिनी ॥ वाद्यध्वनीसी निघाले ॥४३॥ तैं खंदारआणि लवणासुर ॥ मायिक ते शतव्याघ्राकार ॥ होऊन पातले सामोर ॥ सैन्यभारेंसी युध्द करावया॥४४॥खंदार लवण दैत्यदारुण ॥ हे त्रेतायुगींचे खर दूषण॥मानदेशीं दैत्य कुतोहल जाण॥ अजिंक्य तिघेजण हे लक्ष्मी ॥ ४५॥ लक्ष्मी ह्मणे हे रवळनाथा॥ हें कां न बोधिलें सिद्ध समस्तां ॥ पाचारोन वदा सर्वकथा ॥ त्रेतायुगींच्या चरितान्वया ॥ ४६ ॥ परिसोन लक्ष्मीची सुरसवाणी ॥ आवश्य ह्मणे हो खड्गपाणी ॥ तिघांसिद्धांसी बोलावूनी ॥ श्रीनाथ वदतसे तैं ऐका ॥ ४७ ॥ खंदार आणि खदिरांगार ॥ हे त्रेतायुगींचे खर दूषण निर्धार ॥ कुतोहल आणि लवणासुर ॥ हे महेश सोहंसिद्धें वधावे ॥ ४८ ॥ शब्दसिद्धें वधावा खदिरांगार ॥ सोहंसिद्धें वधिजे खंदार॥खंदार असे अजरामर॥ युद्धकंदनीं नाटोपे तुह्मां ॥ ४९ ॥ तरी तूंचि या चवदावासनु कल्पावा ॥ स्वयंभू त्वष्टाप्रजापति कुलोद्भवा ॥ सोहंसिद्धा महानुभावा ॥ तुवां वंगभस्म करावें ॥ ५० ॥ तूं विश्वकर्माच्या जाणसी सर्वकळा ॥ साध्यासाध्य विचार कुशळा ॥ तरी खंदारशक्ति आकर्षावी सकळा ॥ वंगभस्म देवोनी ॥ ५१ ॥ सिद्धपत्रीं मिश्रित वंगभस्म ॥ खंदारासी देऊन अग्न्यस्त्रीं करावा भस्म ॥ मग करून घोरसंग्रामे॥ चत्वारी दैत्य चौघांनीं वधावें ॥ ५२ ॥ वर्म कर्म निवारण सूक्ष्मविचार ॥ नाथें बोधोन सारासार॥ तंव आवश्य ह्मणोन सोहंसिद्धाचार ॥ दिगंबर होऊन चालिले ॥ ५३ ॥ सोहंसिद्ध होऊन संन्यासी ॥ पातला लवण खंदारापासीं ॥ सिद्धपत्री राजद्वारापासीं ॥ घोंटित बैसला सोहंसिध्द ॥ ५४ ॥ तंव खंदार ह्मणे हे दिगंबरा ॥ कवण ओ-

षध घोंटिसी चतुरा ॥ हें ऐकोन खंदारोत्तरा ॥ सोहंसिध्द वदतसे ॥ ५५ ॥ ही सिध्दपत्री महावल्ली ॥ जयांनीं अखंड सेविली ॥ तयांची काया दिव्य झाली ॥ परी इचें अनुपान अवघड असे ॥ ५६ ॥ हें वंगभस्म सेवितां अभंग ॥ गात्रें कदापी न पावतीं भंग ॥ सुवर्णकांतीची ओप शुभांग ॥ कीं बाळदिवाकर च भाविती ॥ ५७ ॥ ती प्रचीत पाहें ममशरीरीं ॥ देह असे सुवर्णाकारी ॥ तंव खंदार ह्मणे करुणोत्तरीं ॥ तव शरीरकांतिवत ऐसें मज करावें ॥ ५८ ॥ ऐकोन खंदाराचें वचन ॥ सिध्द वदे सोहंपण ॥ वंगभस्म करविलें लेपन ॥ सबाह्यांतरीं संधोपसंधीं ॥ ५९ ॥ असो वंगभस्माची देवोन ओप ॥ खंदारदेह केला कांचनरूप ॥ परी वंग स्वरूपें काळसर्प ॥ कंठीं सुदेले कळेना ॥ ६० ॥ तीनदिवस घेई दिव्यौषधी ॥ खंदारा तुझी आधिव्याधी ॥ हरपली वाटे त्याच संधीं ॥ वंगभस्में वज्रांग होईल ॥ ६१ ॥ आतां असोद्यावी दया ॥ तुमची दिव्य झाली काया ॥ जावें संग्राम करावया ॥ षोडशचक्रासी दारुण ॥ ६२ ॥ ऐसें लवण आणि खदिरांगार ॥ वंग भस्मांकित सुवर्णाकार ॥ करोन जीवित हरोन तस्कर ॥ तैसी अजरामरकळा हरियेली ॥ ६३ ॥ हे तिघेदैत्य अनिवार ॥ जाहले होते अजरामर ॥ ह्मणोन सोहंसिध्देश्वर ॥ वंगभस्मांकित मृत्यूनें अंवतिलें ॥ ६४ ॥ अग्निशस्त्र विरहित जाणा ॥ मृत्यु नाहीं यातिघांजणा ॥ ऐसा विश्वकर्मा शहाणा ॥ मरण पल्लवीं बांधिलें दैत्यांचें ॥ ६५ ॥ तंव श्रीनाथ होऊन दिगंबरधारी ॥ क्रोधें पातला कुतोहलगिरीं ॥ अष्टभैरवदळ भारी ॥ श्रीशंभुशिखरीं माणदेशीं ॥ ६६ ॥ हें जाणोन कुतोहल ॥ घेऊन आला राक्षसदळ ॥ नाथें युध्द केलें रणतुंबळ ॥ भवानीशंकर होऊनियां ॥ ६७ ॥ निराहारी निरोदक ॥ युध्द केलें एकसप्तक ॥ त्यावरी पौंगंडऋषि कुळदीपक ॥ अतिकौतुकार्थ दाखवी ॥ ६८ ॥ युध्द करितां बद्रिविहारी ॥

गुप्त झाला कुतोहल गिरीवरी ॥ तेथेंचि प्रगटला त्रिपुरारी ॥ कैलासशिखरींचा शंभु जो ॥ ६९ ॥ कुतोहल आणि वृषभध्वज ॥ युध्दीं मातले उन्मत्तगज ॥ तें समुदायीं कुतोहल निस्तेज ॥ मासवसंतीं झाला ॥ ७० ॥ कुतोहलासी वधी महादेव ॥ कोथळासुर ह्मणती प्राकृतमानव ॥ हें भूचरित्र स्कंधपुराणीं सर्व ॥ कथिलें यदर्थीं दृष्टांता ॥ ७१ ॥ कुतोहल वधोन कुतोहलगिरीं ॥ नांव ठेविलें सिंगणापुरी ॥ तेथोन नाथ पातला भैरवभारी ॥ पंचवटींसी घनघोरें ॥ ७२ ॥ ताडकासुर जाणोन भारी ॥ त्यावरी धांडिला बाळभैरी ॥ दहासहस्रभैरव महावीरीं ॥ घोरगर्जना करित पातला ॥ ७३ ॥ ताडकासुरा सवें घोरादरें ॥ तीनदिवस युध्द केलें निकुरें ॥ बाळभैरवें वज्रप्रहारें ॥ ताडकासुर वधियेला ॥ ७४ ॥ बाळस्वरूप बाळभैरी ॥ धरूनि ताडकासुर संहारी ॥ ह्मणोन ताथवडा हे चराचरीं ॥ बाळभैरी बाळोबा प्राकृत बोलती ॥ ७५ ॥ ताथवडेची चौकी बाळभैरीं ॥ बळेंचि आकर्षिली बळात्कारीं ॥ तेतींसकोटि अमरभारी ॥ पुरंदरासी पुरंदर पातला ॥ ७६ ॥ पर्वतपुरंदरीं श्रीकेदार ॥ अष्टभैरवेसी असे लिंगाकार ॥ तेथें चौकीसी ठेऊन अमर ॥ श्वेततुरंगमीं स्वार नाथ झाला ॥ ७७ ॥ खळनाथ काळभैरी ॥ उभय तुरंगीं करूनि स्वारी ॥ घाट रोधिले शक्तिभैरवभारीं ॥ पुरंदरा पासोन कुतोहल पर्यंत ॥ ७८ ॥ नाथाज्ञा घेऊन शक्तभैरी ॥ सालपेसीं पातला सहस्रवीरभारीं ॥ शबर वधोनियां घोरसमरीं ॥ दोनीदिवस युध्द करोनियां ॥ ७९ ॥ तैसाचि खदिरांगारासी शब्दसिध्द ॥ अग्न्यस्त्रें करी दग्ध ॥ नाम पावला खरसुंडसिध्द ॥ ह्मसवड सिध्द तें पासोन बोलती ॥ ८० ॥ चौकिया करोन सावध शाश्वत ॥ पंचवटीं पातला खळनाथ ॥ तंव दूतीं आणिला वृत्तांत ॥ करवीरपुराचा तो ऐका ॥ ८१ ॥ ब्रह्मदेवाचा वरद कुमर ॥ गयासुरादि कोल्हासुर ॥ तयाचा ज्येष्ठपुत्र करवीर ॥ अजरा

मर योगदंड धारी ॥ ८२ ॥ योगदंडाची नवलपरी ॥ असाध्य जाणावी बद्रिविहारी ॥ केशियाराक्षस केसापुरीं ॥ पूर्वी वधिला शतकोटि परिवारासह ॥ ८३ ॥ त्याहून कोटिगुणें करवीरासुर ॥ तें लक्ष्मीविजयीं युत्ध भयंकर ॥ ह्मणोन केदारविजयींचा वृतांत मनोहर ॥ रत्नासुर वधांतीं परिसावा ॥ ८४ ॥ करवीर योगदंडाचें वारें ॥ लक्ष्मीचमूसी झगटल्या अनिवारें ॥ शेळया मेंढ्या करील शक्तिपरिवारें ॥ ह्मणोन नाथ शोधी गिरिकंदरीं ॥ ८५ ॥ ॥ असो ऐसी स्थळोस्थळीं ठेऊनि चौकी ॥ नाथ पातला पंचवटीकीं ॥ तंव इकडे षोडशसित्ध कटकीं ॥ घोरयुत्धा प्रवर्तले ॥ ८६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध ॥ हे षोडशसित्धांमाजी प्रसित्ध ॥ शब्दसित्ध गर्जतां शतव्याघ्र द्विरद ॥ भय कांतारीं दडाले ॥ ८७ ॥ स्पर्श सित्धवीराचा सिंहनाद ॥ नभोदराचा करी भेद ॥ रौद्ररूपें लक्षितां रणमद ॥ उतरोनी गेला दैत्यांचा ॥ ८८ ॥ ऐसें षोडशसित्ध दळभारीं ॥ युत्धीं मिसळलें घोरांदरीं ॥ तैं खंदार आणि लवणासुरीं ॥ प्रचंड धनुष्य घेतलें ॥ ८९ ॥ दोनीसैन्या झाली भेटी ॥ खड्गबाणांची खणखणाटीं ॥ शिरकमळें पडलीं भूतळवटीं ॥ तैं कवंधें युत्धा पातलीं ॥ ९० ॥ शतव्याघ्राचें करितां हनन ॥ मायारूपी कबंध शिराविण ॥ अतिभ्यासुर चित्रवर्ण ॥ युत्ध करिती भयंकर ॥ ९१ ॥ शतकबंध परम निकुरें ॥ झुंजा प्रवर्तलीं घोरमारें ॥ हें पाहोन षोडशवीरें ॥ सित्धचक्रें क्षोभलीं ॥ ९२ ॥ सित्धषोडशचक्राधिकारी ॥ बाण वर्षती खदिरांगारी ॥ शतव्याघ्र मायिक देहधारी ॥ शरपंजरीं पहुडविले ॥ ९३ ॥ सातसहस्र निशाचर ॥ घोरयुत्धीं शस्त्रास्त्रीं केले चूर ॥ ऐसें जाणोनि खंदार लवणासुर ॥ सन्मुखोंतरीं लोटले ॥ ९४ ॥ तैं सोहं रजोगुणीं सित्धेश्वर ॥ असंख्य वर्षला पावकशर ॥ ते छेदी लवणासुर ॥ गर्जना करित वदतसे ॥ ९५ ॥ आमुचा तीव्र

क्रोधानळ ॥ जाळूं शके हा कुळाचळ ॥ तेथें तुमचें षोडशसहस्रदळ ॥ तृणप्राय आमुतें ॥ ९६ ॥करवीराचें
आज्ञावचन ॥ भंगू नशकें चतुरानन ॥ तेथें सोळासिध्धाचें अंगवण ॥ जेवीं तृणाग्नीतें पवनमेळें ॥ ९७ ॥
कीं दीपाराधनीं पतंग ॥ कीं रागोध्धारीं भ्रमे सारंग ॥ कीं गरुडगृहीं वस्ती करी भुजंग ॥ मृत्युद्वाराचे या नाम
॥ ९८ ॥ असो तुह्मांसी पातलें मरण ॥ ह्मणोनी येथवरी येणें झालें जाण ॥ आमुचे हस्तें यमसदन ॥ अंतकाळीं
पहावें ॥ ९९ ॥ ऐसें वदतां लवण खंदार ॥ शब्द स्पर्श द्वय सिध्धेश्वर ॥ तिसरा आला महाक्रूर ॥ लवणातें श-
ब्दस्पर्शें ताडितसे ॥ १०० ॥ युध्ध करितां घोरांदर ॥ जर्जर षोडश चक्रेश्वर ॥ होतां तेव्हां बद्रिविहार ॥ पवन
किरणीं पवनात्मज धाडिला ॥ १ ॥ करवीर कोल्हासुर आनिवार॥संह्याद्रींचा रक्तभोज रत्नासुर॥ तैसेचि शतघ्न निस्सीम
लवण खंदार ॥ हे भीमसेनें सिध्धहस्तें वधावें ॥ २ ॥ पाराशराचे दक्षिणभागीं ॥ धर्मराजें असावें बंधुवर्गी ॥ हें
अद्याप बाहत्तरयुगीं ॥ करवीर पश्चिमेसी कळेगांव असे ॥ ३ ॥ शतव्याघ्र कबंधें पडलीं रणीं ॥ पुनरपि तींच
सावध होउनी ॥ लवण खंदारा सहित घोरकंदनीं ॥ सिध्धचक्रीं समदळीं मिसळले ॥ ४ ॥ पराभवितां सिध्ध भा
र ॥ तैं नाथें प्रेरिला भैरवाकार ॥ ज्याचें नाम वृकोदर ॥ पांडवदळीं नवनाग सहस्रबळी ॥ ५ ॥ तैं सोळासिध्दां
आश्वासून ॥ रणीं उभा भीससेन ॥ सोहं अळसिध्ध दोघेजण ॥ भीमसेनासी बोलती ॥ ६ ॥ शब्द रस गंधादि
पंचसिध्ध ॥ तुह्मीं आह्मीं त्रिगुणविध ॥ अष्टगुणीं चढोन क्रोध ॥ लवण खंदार अग्न्यस्त्रें वधावे ॥ ७ ॥ ऐसें बो-
लोन आठैजण ॥ युध्धा प्रवर्तले पंचानन ॥ वात पर्जन्य हुताशन ॥ शस्त्राग्नि दारुण वर्षती ॥ ८ ॥ ऐसें सप्तदिवस अतिदा
रुण ॥ करान तीव्र घोरकंदन ॥ खंदार आणि व्याघ्र लवण ॥ सोहंसिध्धें वधियेले ॥ ९ ॥ अग्निबाणाच्या शरांगारीं ॥ लवण

खदिरांगार खेदारी ॥ भेदिले दारुण शरीरी ॥ संधोपसंधीं खंडिले ॥ १० ॥ जेवीं कर्पूरपर्वतीं पडतां स्फुलिंग ॥ ज-
ळोन जाय जैसा पतंग ॥ तैसें हे तिघेजण भुजंग ॥ दंगभस्में गरुडें खंडिले ॥ ११ ॥ शतव्याघ्र कबंध निशाच
र ॥ भीमें वधिले करून गदाप्रहार ॥ सातलक्ष निशाचरभार ॥ सोहंसिध्दें अस्त्रें जाळिले ॥ १२ ॥ विजयभेरी-
चिया नादें ॥ जयजयकारीं सुरवरवृंदें ॥ नाम ठेविलें सोनारासिध्दें ॥ षोडशचक्रीं आवडी ॥ १३ ॥ शतव्याघ्र व
धिला घोरसमरीं ॥ ह्मणोन वदती ग्रामसोनारी ॥ हे उत्तर भाषा सुरकिन्नरीं ॥ स्तवनोत्तरीं गर्जती ॥ १४ ॥
सोनारी पासून दंडकारण्यीं ॥ षोडशचक्रीं व्यापिली धरणी ॥ कपित्थनगरीं प्रसिध्दजनीं ॥ विराडासिध्दराज वि
ख्यात ॥ १५ ॥ कृष्णातटीं दीर्घायुमुनी ॥ वीरभद्रें व्यापिली मेदिनी ॥ ऐसें दैत्य गिरिकंदरा घाटपाट रोधोनी ॥
अष्टदिशागुप्तमार्गें व्यापिल्या ॥ १६ ॥ पलशदेव पालाशमेदिनी ॥ नाम पावला भीमातटनीं ॥ हें वद्रिविहारें परि-
सोनी ॥ भैरववाहिनीसी संतोष ॥ १७ ॥ पंचवटीं भैरवभारीं ॥ वाजती प्रस्थान विजयभेरी ॥ ही मात पातली श्री
करवीरीं ॥ संह्याद्रीवरी रत्नासुरा ॥ १८ ॥ चार सांगतीं वर्त्तमान ॥ अनिवार हिमकेदारीसैन्य ॥ त्यामाजी षोड
शचक्रीं नामाभिधान ॥ कृतांतरूपी मातृके ॥ १९ ॥ त्याची अनिवार क्रोधाग्निशिखा ॥ युध्दावर्तीं प्रदीप्तदेखा ॥
झाला तेवीं युध्दाग्निभडका ॥ लागतां खंदार लवण दग्धले ॥ २० ॥ शतव्याघ्रकबंधें होऊनी रणीं ॥ युध्द करोनी
निर्वाणीं ॥ मृत्यु पावले समरंगणीं ॥ दहासहस्र एकदांची ॥ २१ ॥ सारांश कल्पांत भैरवाकार ॥ अवतारला ब-
द्रिविहार ॥ पंचवटीं भूधरावतार ॥ तव हननार्थी बैसले ॥ २२ ॥ बटुभैरव जाज्वलाया ॥ खवळल्या कवणत्या अव-
राया ॥ नसे ह्मणोनि सांगावया ॥ तुह्मांप्रती पूर्वपुण्यें पातलों ॥ २३ ॥ खंदारा सहित सोनारकबंध ॥ वधोन रा

जिला सोनारसिद्ध ॥ खदिरांगार वधोन खरसुंडसिद्ध ॥ नाथें स्थापिला राज्यपदीं ॥ २४ ॥ कुतोहल वधिला माणदेशीं ॥ पुरंदरीं गुप्तअसे बद्रिनिवासी ॥ शावर मर्दोन सालपेच्या घाटासीं ॥ ताडकासुर वधिला ताथवडीं ॥ २५ ॥ मणिमल्लावरी मल्लाळदेशीं ॥ मार्तंडभैरवाचे स्वारीसी ॥ होणार ऐसें जाणोन मानसीं ॥ तुह्मांपासीं पातलों ॥ २६ ॥ हें परिसोन चारमुखींचें वचन ॥ चिंतार्णवीं निशाचरगण ॥ पडिले रत्नासुरादि रक्तभोजन ॥ संह्याद्रीं सावध परिवारीं ॥ २७ ॥ पुढील कथेची कैसी सूचना ॥ सूत ह्मणे शौनका परिसें सुजाणा ॥ हें श्रीकेदार कल्पीं व्यासवचना ॥ कथानुसंधान पंडितहो ॥ २८ ॥ पंचवटीहून बद्रिविहारी ॥ श्रीलक्ष्मी संहित वैकुंठवि- हारी ॥ निघोन उतरले भैरवभारीं ॥ शिष्टाई धाडिल तोरणभैरवा ॥ २९ ॥ तें नवमोध्यायीं परिसावें आदरें ॥ संत- महंत पंडित चतुरें ॥ हरिनामामृताच्या तुषारें ॥ अतींद्रिय भ्रमरगुंफैत बैसोनी ॥ ३० ॥ इतिश्री केदारविजय तु- रंगी ॥ बैसोनि तारील भवजलतरंगीं ॥ हरिकीर्तनीं रंगोन अंतरंगीं ॥ केदारविजय हरिखें अभंगीं लिहवीतसे ॥ ३१ श्रोतावक्ता श्रीरवळनाथ ॥ गीर्वाण व्याकरणार्थ हे प्राकृत ॥ माझें ह्रदयीं व्यापक ह्रदयस्थ ॥ कर्ता नाथ अष्टमो- ध्याय गिरार्थ गोडहा ॥ १३२ ॥ इतिश्री केदार विजय भविष्योत्तर केदार खंडे केदारकल्प विरचितायां खंदार खदिरांगार लवण वध कुतोहल मर्दन पुरंधरीं नाथ गुप्तरूप सोनारी सोनारसिद्ध राज्यीं स्थापनो नाम ॥ अष्टमोध्यायः श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥


अध्याय ९ वा.
भीमाशंकरीं
केदारनाथ
येतात
तोरणभैरवास शिष्टाईस
पाठविलें असतां तो
रत्नासुरास मिळाला.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीखळेश्वरायनमः ॥ जय केदार सगुणनिधी ॥ सर्वं घेऊनि अष्टमासिद्धी ॥ नवनाथ होचि न
वनिधी ॥ भूषित हरि हर विधि एकरूप ॥ १ ॥ जय बटुभैरवनट बटु पालना ॥ बटु वै उत्कृष्ट सुहास्यवदना ॥
बटु लुटु लुवै क्रमणचरणा ॥ क्रीदावळी आपुली सांभाळीं ॥ २ ॥ बत्तीससामुद्रिक शुभलक्षणा ॥ बद्रिकाश्रम नि-
वासा सगुणा ॥ बलप्रताप संरक्षणा ॥ भवबंधमोचना करुणानिधी ॥ ३ ॥ बिल्व मंदार हृयत्हृदय मंडिता ॥ बीजत्र
य सगुण त्रिकुटी अखंडिता ॥ बिंबविशी त्हृदयीं तवगुण कविता ॥ त्या केदारविजयीं विस्तारीं ॥ ४ ॥ संत पंडि-
त महाचतुरीं ॥ स्वस्थ बैसोनि त्हृदयमंदिरीं ॥ कथा परिसावी दुरितापहारी ॥ भविष्योतरींची आवडीनें ॥ ५ ॥
सोनारासिद्ध सोनारीं ॥ स्थापोनि राज्याधिकारी ॥ पंचवटीहूनि हिमकेदारी ॥ महागजरीं निघाला ॥ ६ ॥ लव
ण खदिरांगार खंदार ॥ वधिले शतकबंध घोरादर ॥ हा अष्टमोध्यायीं विस्तार ॥ श्रोतीं मुनिजनीं परिसिला ॥ ७ ॥
॥ नवनाथ अष्टादश भैरवदळ ॥ निघालें श्रीभारा सहित सकळ ॥ आलें डांकिनीतीर्था जवळ ॥ वाद्यध्वनीसी गंगा
द्वाराहूनि निघालें ॥ ८ ॥ भीमातटीं भीमाशंकर ॥ डांकिनीतीर्थीं सुमनोहर ॥ तेथें येऊनी केला जयजयकार ॥ भैर-
वभारेसी अमरगणीं ॥ ९ ॥ अठावीसयुगांचा भीमाशंकर ॥ श्रीपांडुरंगाचा अवतार ॥ पितृभक्तीचा अळंकार ॥
अद्यापि जगश्रवणीं शोभतो ॥ १० ॥ असो श्रीसहित खळनाथ ॥ येताझाला रत्नासुर वधोत्सवार्थ ॥ पुरवा-
वया भक्तमनोरथ ॥ भीमातटीं उतरला ॥ ११ ॥ मानदेशीं कैलासगिरीवरी ॥ प्रख्यात असे शिंगणापुरी ॥ तोचि
कुतोहलपर्वतकंदरीं ॥ सिद्धचक्रें उतरलीं खरसुंडी पर्यंत ॥ १२ ॥ महादेवा पासोनि पुरंदरा पर्यंत ॥ भैरवीसेना
१८ उतरली अद्भुत ॥ भीमाशंकरीं लक्ष्मी सहित ॥ भैरवभारें नाथ उतरला ॥ १३ ॥ तैं श्रीलक्ष्मी गरुडगामिनी ॥

ज्योतिस्वरूपासी वदे वचनीं ॥ ह्मणे कवण धाडावा संह्याद्रिपट्टणीं ॥ खड्गपाणी सांगपां ॥ १४ ॥ भैरवचमूमाजी प्रबळ ॥ काळभैरव रणवेताळ ॥ तिसरा तोरणभैरव विशाळ ॥ चवथा कमळभैरी बादलभैरी पांचवा ॥ १५ ॥ गंडभैरव तो हा सहावा ॥ सप्तम कल्पांतभैरव जाणावा ॥ सुवर्णभैरव आठवा ॥ कुबेराचा अवतार जो ॥ १६ ॥ अष्टवसु भैरवाकार ॥ अवतरले हे रणरंगधीर ॥ शंखभैरी कल्होटेश्वर ॥ हाकाटभैरव तिसरा ॥ १७ ॥ शकटभैरी विकटाटभैरी ॥ कंकाळभैरव कुष्मांडभैरी ॥ गुढभैरी निगुढभैरी ॥ हे नवभैरव शिवाष्टांगीं जन्मले ॥ १८ ॥ ऐसें अष्टादशभैरव महावीर ॥ महायोद्धे रणधीर क्रूर ॥ ज्यांचा अंगवात स्पर्शतां निशाचर ॥ मरण पावती समरांगणीं ॥ १९ ॥ सोळासिध्येसी नवनाथ ॥ अष्टवसु भैरवेसी समर्थ ॥ नवग्रह कंकाळ वेताळ बहुत ॥ नवयक्षिणी नवदेवता ॥ २० ॥ सहस्रनयनेसी त्रिदशगण ॥ एकादशरुद्र वैवस्वत मरुद्गण ॥ द्वादशलिंगांकित द्वादशचिन्ह ॥ मत्कलेवर जाज्वलायी ॥ २१ ॥ द्वादशमार्तंडभैरव ॥ यक्षकिन्नर सिद्ध चारण गंधर्व ॥ नवकोटकात्यायनी विबुध सर्व ॥ हे मुख्यनायक तवआज्ञा अपेक्षिती ॥ २२ ॥ सप्तकोटि मार्तंडभैरवदळ ॥ तैसेंचि अठरापद्म भैरवदळ ॥ एकला वश करील भूमंडळ ॥ तेथें संह्याद्रि करवीर केउते ॥ २३ ॥ ऐसें वदतां हिमकेदारी ॥ उत्तर वदली क्षिराब्धिकुमरी ॥ रणभैरव कवण तो कवणा पाचारी ॥ संह्याद्रीसी धाडावया ॥ २४ ॥ परिसोनि विष्णुप्रियेचें वचन ॥ उत्तर वदे नाथनिरंजन ॥ काळभैरवापासीं तोरणभैरवगण ॥ भैरवदळीं जो निवडिला ॥ २५ ॥ नामा सारखी उत्तमकरणी ॥ असावें समयोचित बुध्दिस्फुलिंगाकिरणी ॥ किंवा खदिरांगारीं शिंपितां पाणी ॥ ठायींच शांति पावतो ॥ २६ ॥ मनीं एक जिव्हाग्रीं एक ॥ जनीं सांगोनि वर्ती अनेक ॥ ऐसा तोरणभैरव देख ॥ नहोय ऐसा

असे कीं ॥ २७ ॥ स्वामीकाजीं वेची प्राण ॥ अथवा यशश्वी होऊनियां अंगवण ॥ ऐसा असेल तोरणभैरवगण ॥ त्यासवें अनादिगणपति धाडिजे ॥ २८ ॥ प्रधान असावा सर्वगुणी ॥ समयोचित जाणें मृदुभाषणीं ॥ दुष्ट राक्षसांच्या दिसावा स्वप्नीं ॥ कृतांत करणी असावी ॥ २९ ॥ परिसोनि अंबेस ह्मणे हे कमले ॥ दुरितदनुज कल्मषशमले ॥ सुर भूसुर मुनिमन विमले ॥ मुखचंद्रकमळे मंदस्मिते ॥ ३० ॥ रणभैरवाचे सांघातीं ॥ धाडावा ह्मणसी मंगळमूर्ती ॥ निर्विघ्न करील संह्याद्रिपर्वतीं ॥ कवणेंयुक्तीनें सांगपां ॥ ३१ ॥ कवणवंशीं कवणजाती ॥ गजानन मनुष्याची आकृती ॥ त्याची अवतार रसोत्पत्ती ॥ सारांश यदर्थीं वदावें ॥ ३२ ॥ चर्पटअंबेची परिसोनि वाणी ॥ ऐक ह्मणे विष्णुरमणी ॥ कैलासीं नसतां शूलपाणी ॥ पंचमुखीविधाता पातला ॥ ॥ ३३ ॥ तंव पार्वती ह्मणे हो पंचवदना ॥ बहुतेक दिवसीं केलें आगमना ॥ येथवरी किंवा पुढारी भावना ॥ काय मनकामना सांगिजे ॥ ३४ ॥ असो पार्वती आणि विधि पंचवदन ॥ करिती तत्वान्वय संबोधन ॥ तंव त्या समयातें त्रिलोचन ॥ वृषभध्वज पातला ॥ ३५ ॥ नमस्कार करोनि श्रीशंकरा ॥ त्रिवर्ग बैसले स्वस्थांतरा ॥ गंगाधर ह्मणे सारासारा ॥ दीर्घदर्ष्टी लक्षीं मनांतरीं ॥ ३६ ॥ विधीचीही पंचवदनें ॥ आमुची ही पंचाननें ॥ द्वैतार्थी भावना भिन्नाभिन्न ॥ एके समयीं वाढिजेती ॥ ३७ ॥ ऐसें आणूनि निजानुभवा ॥ त्र्यंबक ह्मणे परिसें पद्मोद्भवा ॥ चतुर्वेद क्रमेसीं पढावा ॥ हेचि आवडी बहुकाळ असे ॥ ३८ ॥ ऋग्वेद यजुर्वेद अथर्वण ॥ चवथा सामवेद पांचवेवदन ॥ षडांगराग छत्तीसभार्या स्वरव्यंजन ॥ रागोत्धारीं करितां आवडी ॥ ३९ ॥ हें परिसोनि शंकरवचन ॥ आवश्य ह्मणे सरसिजोद्भवजाण ॥ पूर्वमुखीं ऋग्वेद शब्द रूप रसस्पर्शन ॥ आश्वलायन शाखा छंदासी

गातसे ॥ ४० ॥ दक्षिणमुखीं यजुर्वेद रूप रसगंध ॥ माध्यांजनी प्रथमशाखा शाण्णवभेद ॥ संथा पद क्रम जटादि विबुध ॥ नाना छंदासी गातसे ॥ ४१ ॥ अथर्वणेसी सामगायनें ॥ पश्चिमोउत्तर आननीं ह्मणे ॥ उपवेद पांचवा तो ऊर्ध्ववदनें ॥ सप्तमस्वरीं छंदासी गातसे ॥ ४२ ॥ ऊर्ध्ववदनीं सप्तस्वरें ॥ गायन करितां रागोत्थारें ॥ अवध्य जाणोनि श्रीशंकरें ॥ परशु काढला हननार्थीं ॥ ४३ ॥ विरंचीचें ऊर्ध्व मस्तक ॥ रागें च्छेदितां त्रिपुरांतक ॥ तें ब्रह्मकपाली भयानक ॥ मुख पसरोनि धांवली ॥ ४४ ॥ त्रिपुरांतका निरापराधें ॥ ऊर्ध्व मुखातें ब्रह्मपदें ॥ किंनिमित्य केला शिरच्छेद ॥ आह्मीं कुटिल नसोनियां ॥ ४५ ॥ तेचि पाठीसी तीव्रजाण ॥ ब्रह्मकपाट लागलें दारुण ॥ भयंकर पसरोनि वदन ॥ स्थिर स्थिर ग्रासीन ह्मणतसे ॥ ४६ ॥ ब्रह्मकपोलीचें पाहोनि तेज ॥ घाबरा झाला वृषभध्वज ॥ त्रिभुवनीं हिंडतां निस्तेज ॥ भवानीशंकर झाला ॥ ४७ ॥ सप्तपाताळ सप्तद्वीप ॥ एकवीस स्वर्ग पहातां झाला सकंप ॥ ब्रह्मकपोली कृतांत स्वरूप ॥ पाठी लागली सुटेना ॥ ४८ ॥ दृश्यादृश्य भिन्नाभिन्न ॥ वेष धरिला वर्णावर्ण ॥ लिंगदेह करोनि संकीर्ण ॥ लिंगणीवेलीं दडला ॥ ४९ ॥ लिंगणीवेलीं लिंगांकित ॥ अतींद्रियेसी अवयव लपवीत ॥ तें पासोनि शिवलिंग पार्थिव करित ॥ चत्वारी युगीं अद्यापी ॥ ५० ॥ शिवालयीं लिंगाकार ॥ होऊनि ठेला गौरीहर ॥ स्थळो स्थळीं वनांतरीं शिव आकार ॥ प्रत्यक्ष अर्चिती अद्यापी ॥ ५१ ॥ हें प्रत्यक्ष लिंगणीफळा माझारी ॥ अद्यापि जन पहाती लिंगाकारीं ॥ हें पहाती युगेंचारी ॥ साक्षभूत ईश्वर सर्वांठायीं ॥ ५२ ॥ अणुरेणु व्यापक जगजीवन ॥ हें श्रीव्यासाचें वचन ॥ दुसरें तूर्या वस्तीचें संबोधन ॥ श्रीनाथ निरंजनाचें यदर्थीं ॥ ५३ ॥ असो ऐसा पिनाकपाणी ॥ हिंडोनि सप्तार्णवी मेदिनी ॥ परमश्रमें कैलासभुवनीं ॥ स्वकांतेचें

मंदिरीं प्रवेशले ॥ ५४ ॥ ते अनादिमाया हिमनगसुता ॥ नग्न होऊनि अभ्यंग करितां ॥ हरिद्राकर्दम कुंकु-
माकृता ॥ अंगमर्दना करवितसे ॥ ५५ ॥ काढोनियां निजांगमळा ॥ पार्वतीनें तयाचा पुतळा ॥ करोनि द्वारीं र
क्षणार्थ ठेविला ॥ निग्रह करूनि आज्ञांकित ॥ ५६ ॥ माझिया गा आज्ञे विणे ॥ मम ग्रहांत कवणासी येवूं नदे
णें ॥ अमृतसंजीवनी मंत्रानें ॥ सजीव करोनि ठेविला द्वारीं ॥ ५७ ॥ ब्रह्मकपोली भयें जाण ॥ श्रमी होऊनि त्रि
लोचन ॥ पावले आपुलें कैलासभुवन ॥ जेथें अपर्णा स्नान करी ॥ ५८ ॥ पार्वती हस्तीचा करतळामळ ॥ मा-
नवाकृति द्वारपाळ ॥ त्याणें आडवा दंड धरोनि प्रबळ ॥ त्रयंबका स्वबळें वर्जियेले ॥ ५९ ॥ जयाची सत्ता त्रि
भुवनीं ॥ त्यांसी यदर्थीं वदावे कवणी ॥ परंतु विषम काळाचिये मांडणी ॥ हरिहर ब्रह्मासही न सोडी ॥ ६० ॥
दंडें ढकलितांचि शूलपाणी ॥ कामांतक क्रोधावला तमोगुणीं ॥ परशें मस्तक च्छेदूनी ॥ गौरीपासीं पावला ॥
॥ ६१ ॥ अपर्णा ह्मणे हे त्रिलोचना ॥ मत्पुत्र होता द्वाररक्षणा ॥ ठेविला तो बळसंपन्ना ॥ शंकर ह्मणे शिर च्छे
दिलें त्याचें ॥ ६२ ॥ तें भवानी वदे खेदवचन ॥ हाहा कपर्दी त्रिलोचन ॥ कैसें केलें पुत्रहनन ॥ सर्वांग देखणा
असोनियां ॥ ६३ ॥ बाण रावण चंडीचिया ॥ नंदी भ्रुंगी जटालया ॥ वीरभद्रादि स्कंधाहूनियां ॥ विशेष मातें तो
आगळा ॥ ६४ ॥ तयाला संजीवन करितां जाण ॥ मी त्यजीन आपुला प्राण ॥ गंगेसहित कैलास भुवन ॥
अकल्पवरी भोगावे ॥ ६५ ॥ मातें चोरानि ठेविसी मुगुटीं ॥ तियेतें सांगतसां गुह्य गोष्टी ॥ माझिये मागें करा
वी रहाटी ॥ उघडपणें लौकिकीं ॥ ६६ ॥ मी तूतें पहिले पासोनि न वरीं ॥ नावडे बलात्कारें केली नवरी ॥ दु
सरी गंगा नवी नवरी ॥ घेऊनि कैलासशिखरीं नांदावें ॥ ६७ ॥ पुत्रहत्या महा दोष ॥ कवण घेईल कळोनि वि

ष ॥ ऐसें ह्मणावें तरी विशेष ॥ विषाग्निकल्होळ ग्रासिला तुह्मीं ॥ ६८ ॥ समर्थे केलें निंद्यकर्म जाण ॥ तयांसी
दंडिजे कवण ॥ अग्नि उदकें होय शमन ॥ उदकाचि जाळितां कवण उपावो ॥ ६९ ॥ ऐसें वदतां गिरिजावचन ॥
क्रोध परतवी अनंगदहन ॥ द्वारीं पहातां मस्तकावीण ॥ कबंध दृष्टीं पाहिलें ॥ ७० ॥ ज्ञानाक्षीं लक्षितां ना
स्वनीळ ॥ अढळपदीं गेलें शिरकमळ ॥ नचळे नहालें आळुमाळ ॥ ॥ ब्रह्मकल्प पर्यंत ॥ ७१ ॥
हें जाणोनियां नीळकंठ ॥ अजन्मीं देखिलें संकट ॥ आतां येईल ब्रह्मकपाठ ॥ याहूनि दुर्घटकवण कर्म
असे ॥ ७२ ॥ अनंत ब्रह्मांडाच्या कोटी ॥ निर्मूनि दाखवूं सकळ सृष्टी ॥ त्यामाजी ब्रह्मकपोलीची गोष्टी
॥ केवढें भय पोटीं पडियलें ॥ ७३ ॥ मम माया दुरत्यया ॥ ऐसेंचि सांगितलें पार्थसखया ॥ निमित्य बुद्धिभ्रं
श व्हावया ॥ ऐसें हृदयांतरीं विचारितसे ॥ ७४ ॥ आह्मां सारख्याची ऐसी गती ॥ मा इतर मानवांची कै-
सी मती ॥ ह्य शिरच्छेद केला म्यां आहंकृती ॥ ह्मणोनि योगमायेनें हें दाविलें ॥ ७५ ॥ यालागीं न ध
रावी अहंकृती ॥ आत्मानुभवीं संत महंतीं ॥ अखंडित असावें सत्संगति ॥ अनुभवशांती नवरी वरावी ॥ ७६ ॥ ऐसें क
ल्पोनि निजांतरा ॥ सवेग पातला हिमालयशिखरा ॥ युद्ध करोनि घोरांदरा ॥ गजासुरासी वधियेलें ॥ ७७ ॥
मस्तक च्छेदोनि तीव्रखड्गें ॥ तैसाचि निघाला त्वरित वेगें ॥ पावला कैलासीं सवेगें ॥ श्रीगजमस्तक घेवो
नियां ॥ ७८ ॥ गजशिर घेवोनि मानव कबंधीं ॥ अमृत शिंपितां आधि व्याधी ॥ हरोनियां जीवशिव उपाधी
॥ अतींद्रिय विशाळबुद्धि निर्मिला ॥ ७९ ॥ ह्मणोनि नर्मदा नामाभिधान ॥ नरमस्तक झाला निर्माण ॥ या
स्तव नर्मदा गणदा गणपति पूजन ॥ शिवाआज्ञेनें युगायुगीं ॥ ८० ॥ ईश्वरकृपेची दिव्यौषधी ॥ सेवोनि

बसला उठोनि आधीं ॥ सवें वेष्टित अष्टमासिद्धी ॥ सुरनर विबुधीं पूजिला ॥ ८१ ॥ नाम ठेविलें गजानन ॥ कार्यारंभीं पूज्यमान ॥ ह्मणोनी करिती विनायकपूजन ॥ सर्व कार्यार्थ सिद्धये ॥ ८२ ॥ ऐसा पूजोनि गजवदन ॥ यशस्वी झाला अपर्णारमण ॥ ब्रह्मकपोलींचें आख्यान ॥ भीष्मपर्वीं वदलें असे ॥ ८३ ॥ सिद्धिविनायक धुरंधर ॥ ज्यांनीं स्थापिला गोकर्णेश्वर ॥ ते कथा विनायकमहात्म्यीं विस्तार ॥ असे दशकंधर विकळ जेथें ॥ ८४ ॥ ऐसी कमलोद्भवजननी कमळा ॥ चर्पटअंबेसी हे कथा विमळा ॥ वदे केदारकल्पीं अर्थ उमगला ॥ सविस्तारेसीं अभिनव ॥ ॥ ८५ ॥ असो कथा बोधोनि ऐसी अभिनव ॥ पाचारिला तोरणभैरव ॥ देवोनि सुविचार बोधाब्धिरत्न ठेव ॥ धाडिला सुविचार कथूनियां ॥ ८६ ॥ तोरणभैरव दळभारीं ॥ निघाला वाजवीत कुंजरभेरी ॥ वंदोनि कमळा हिमकेदारी ॥ साष्टांगेसीं आवडी ॥ ८७ ॥ जातां मार्गीं झाले अपशकुन ॥ सव्य तास गेले उडोन ॥ अपसव्य गेले वायसगण ॥ नाना रीति दुश्चिन्ह होतां दचकला ॥ ८८ ॥ ह्मणे ही ईश्वरमायेचीं कौतुकें ॥ होणार प्रारब्धलिखित नचुके ॥ ह्मणे जें व्हावयाचें होतसे सुखें ॥ ॥ चिंतादंशक झोंबला मनीं ॥ ८९ ॥ हरिखें पातला वरुणातिरीं ॥ घोषें गर्जति विजयाकारीं ॥ सुवर्णांबरपटमंदिरीं ॥ निर्भय अंतरीं उतरला ॥ ९० ॥ हें परिसोनि रत्नासुर ॥ दूत धाडिले गुप्ताकार ॥ तयांनीं घेऊनि समाचार ॥ रत्नासुरासी सांगितला ॥ ९१ ॥ तोरणभैरव नामाभिधान ॥ महायोद्धा पंचानन ॥ सहस्र महावीर बळसंपन्न ॥ निर्भय मनें उतरला ॥ ९२ ॥ ब्रह्मांड जयातें ठेंगणें ॥ कृतांतरूपीं करील कंदन ॥ त्या सारखा वीर आन ॥ निशाचरगणीं दिसेना ॥ ९३ ॥ ऐसें परिसोनि रत्नासुर ॥ कोपें खवळला अतिदुर्धर ॥ बोलावूनि रक्तभोजनाचे द्वय कुमर ॥ धीरोचन रुधिरोचना ॥ ९४ ॥ प्रबोधोनि धी-


रोचना रुधिरोचना ॥ तीव्र सजिलीं राक्षससेना ॥ तीससहस्र निशाचरगणना ॥ विक्राळवदनी दीधली ॥ ९५॥ रत्नासुर ह्मणे रुधिरोचना ॥ धीर उदारा रणधीर सदना ॥ साम दाम भेद सूचना ॥ अलिप्तपणीं करावी ॥९६॥ हेचि त्रेतायुगीचे वैरसंबधी ॥ रावणें घालोनि देवबंदीं ॥ राज्य करितां लंकापदीं ॥ तो रामचंद्रें मारिला ॥ ॥ ९७ ॥ त्रेतायुगीं देव अवतार ॥ अठरापद्म वानरभार ॥ बिभीषणासी देऊन लंकापुर ॥ अयोध्येसी श्रीराम पातला ॥ ९८ ॥ त्रेतायुगीं झाला राज्याधिकारी ॥ द्वापारीं झाला नंदीचा खिल्लारी ॥ आतां अवतरला बद्रिविहारी ॥ शिव विधि हरि एकरूप ॥ ९९ ॥ विष्णूनें घेवोनि दहाअवतार ॥ रावणादिक सहस्रार्जुन थोर थोर ॥ एकवीस वेळा वसुधापति धुरंधर ॥ एकटेनें वधिले कुरुक्षेत्रीं ॥ १०० ॥ अठरा चोक् बहात्तर ॥ आह्मां देखतां रामावतार ॥ आतां झाला त्रिगुणावतार ॥ हिमकेदार अवतरला ॥ १ ॥ आतां विष्णु ब्रह्मा श्रीशंकर ॥ चवथा-जमदग्निक्रोध वैश्वानर ॥ हे एकत्र होऊनि हिमकेदार ॥ मज वधावया अवतरला ॥ २ ॥ तो मी नव्हें दशकंधर ॥ शतमुखरावणाचा अवतार ॥ तो मी रक्ताक्षबीज वंशधर ॥ रत्नासुर जन्मलों संह्याद्रीं ॥ ३ ॥ तेथें संह्याद्रीवरी मैनागिरी ॥ राज्य करित सहपरिवारी ॥ ऐसें रुधिरोचन धीरोचन सुविचारीं ॥ बोधिले वर्म कर्म विरोधवचनीं ॥ ४ ॥ तूं सर्वार्थी असे जाणता ॥ रूपासी पालटोनि सूक्ष्मता ॥ देह धरावा प्रसंगोपाता ॥ महाबळिया रुधिरोचना ॥ ५ ॥ साम अथवा दंड करोनी ॥ तोरणभैरव आणावा धरूनी ॥ तुवां जावेंचि येथुनी ॥ जेथें नवनाथ शिखामणी उतरला ॥ ६ ॥ त्यांसी सांगावयाची हेचि युक्ती ॥ बोधिलें धरावें अचळचित्तीं ॥ आवश्य ह्मणोनि भद्रजाती ॥ स्वसैन्यभारीं निघाला ॥ ७ ॥ रुधिरोचन विशाळ शरीर ॥ धरोनि चालिला पर्वताकार ॥

धीरोचन तैसाचि महागिरिवर ॥ मायारूपी द्वय राक्षस वळी ॥ ८ ॥ जेवीं अचळा भोंवतें तरुवर ॥ तैसा वेष्टित सैन्यभार ॥ विद्युत्पाता सारिखा गजर ॥ एकसरें हो माजला ॥ ९ ॥ हें पाहोनि रणभैरव ॥ वाद्यें गर्जवी ब्रह्मांड सर्व ॥ युध्दा पातला सगर्व ॥ वरुणानदी आलिकडे ॥ १० ॥ दोनी सैन्या झाली भेटी ॥ येरयेरासी पडली गांठी ॥ विकोश शस्त्रें झळकती मुष्टीं ॥ किटाट शब्द गर्जना करिती ॥ ११॥ रुधिरोचन महाबळी ॥ युध्द करितां रणमंडळीं ॥ झाडिली रणभैरवचमू सकळी ॥ जेवीं कुंजरकर्दळी खंडिजे ॥ १२ ॥ असाध्य शौर्य रुधिरोचन ॥ हें रणभैरवें जाणोन ॥ सामोपचारें वदती वचन ॥ तें युध्दसंकल्प राहिला ॥ १३ ॥ रत्नासुरें रुधिरोचना ॥ सांगितल्या ज्याज्या वर्मखुणा ॥ त्यात्या विस्तारोनि मृदूत्तर वचना ॥ रणभैरवासी सर्व कथियेल्या ॥ १४ ॥ नाभेद कळा सुविचारीं ॥ बोधोनि केला स्वविचारी ॥ सन्मानोनि राजोपचारीं ॥ रणभैरवासी संभ्रमें ॥ १५ ॥ रणभैरवासी रुधिरोचन ॥ सैन्यभारेसीं घन गर्जन ॥ मैनागिरीसी येवोन ॥ रत्नासुरासी भेटला ॥ १६ ॥ रत्नासुरासी रक्तभोजन ॥ नव्वदलक्ष निशाचरगण ॥ सभामंटपीं बैसले दारुण ॥ करवीरा पासोनि मैनागिरिवरा ॥ १७॥ ॥ संह्याद्रीवरी मैनागिरी ॥ सभा निर्मिली कनकांबरी ॥ मर्गजस्तंभ टेंकिले मंटपांतरीं ॥ विचित्र वर्णीं अपारें ॥ ॥ १८ ॥ जेवीं छत्र नृपवरशिरीं ॥ तैसी संह्याद्रित्रिपुटी मैनागिरी ॥ ते कोरोनी सर्वतोदरी ॥ सभासुवर्ण मंटपीं रेखिली ॥ १९ ॥ सुवर्णपिंपळ राजद्वारीं ॥ पत्रपुष्प फळ संभारीं ॥ कथा काशीखंडांतरीं ॥ श्रोतीं रत्नासुर वधांतीं परिसावी ॥ २० ॥ रणभैरवातें मैनागिरीं ॥ नाथें धाडिला हे व्यासवैखरी॥ वदली मात्र हे कथा दुसरी ॥ नवलपरीची ऐकावी ॥ २१ ॥ दैत्यदर्प दळभंजन ॥ श्रीनाथ असे हयवाहन ॥ ऐसें केदारकवचीं ध्यान ॥ श्री

व्यासाचें यथार्थ ॥ २२ ॥ परी तो विभव अश्वारूढ नदिसे नयनीं ॥ ऐसें ह्मणूंनये याअज्ञान वचनीं ॥ बौद्ध अ-
वतारांतीं म्लेंछधरणी ॥ होतां अश्वारूढ दीनानाथ होय ॥ २३ ॥ सरलिया बौद्ध अवतार ॥ अश्वारूढ होईल
हिमकेदार ॥ म्लेंछ वधील स्वखड्गें निर्धार ॥ तें तुरंगमवाहन होईल जनदृष्टी ॥ २४ ॥ ह्मणोनि खड्ग धरिलें हा
तीं ॥ म्लेंछ मारी खड्गघातीं ॥ यामुळें संज्ञा दाविली हातीं ॥ हें सुजाण जाणती आत्मानुभवी ॥ २५ ॥ दक्षि
णाननीं दक्षिणहस्तीं ॥ मातें दाविला संकेत स्वहस्तीं ॥ तो संत महंतीं चित्तीं ॥ आत्मस्थितीनें लक्षावें ॥ २६ ॥
दक्षिण दिग्मुखीय दक्षिणेंत ॥ मजलागीं दाखविला दृष्टांत ॥ तत्वानुभवी ब्रह्मवेत्ते ॥ नाथाचा हस्तसंकेत जाण-
ती ॥ २७ ॥ ऐसा नाथसंकेत पुढारें ॥ श्रवण करितां संतापहरे ॥ असो तोरणभैरव अविचारें ॥ रत्नासुरासी
मिळाला ॥ २८ ॥ पंचमुखी परमेश्वर ॥ जनींजनार्दनाचि सर्वेश्वर ॥ अबाल वृद्ध जे नर ॥ ह्मणती तोरणभैरव मि-
ळाला ॥ २९ ॥ असो तोरणभैरव रत्नासुरा ॥ मिळोनि राहिला विश्वांतरा ॥ दोष न ठेविजे अर्थांतरा ॥ दीर्घ
न पहातां पंडितजनीं ॥ ३० ॥ असो पुढें रुधिरोचन ॥ रत्नासुरें धाडिला बळसंपन्न ॥ जेथें उतरला नाथनिरं-
जन ॥ भीमाशंकरीं डांकिनीतीर्थीं ॥ ३१ ॥ तें कथामृत नवरस भरित ॥ दशमोध्यायीं संत महंत ॥ श्रवणार्थीं
सेविजे पुण्यवंत ॥ स्वस्थ चित्तें आवडी ॥ ३२ ॥ कीं ह्या केदारविजयीं सिंधोदरीं ॥ दृष्टांतरूपीं पातल्या लहरी ॥
हरिनामाच्या नौकांतरीं ॥ कथानुसंधान रत्नें भरियेलीं ॥ ३३ ॥ संत मुनिवरा प्रश्नपवनें ॥ शाब्दि बंदरीं गुरुनाथ
वचनें ॥ आणिलें हरिनामाचें केणें ॥ श्रोतीं गुणिजन संग्रहार्थीं ॥ ३४ ॥ कीं हा केदारविजय नवरस ॥ श्रवण
अर्चन वंदन दास्य ॥ कीर्तन सख्यात्मनिवेदन सुरस ॥ कीं ते नवरस सुगरणीं वोगरिती ॥ ३५ ॥ ते सेवि-

तां आत्मानुभवें ॥ त्रिविधताप हरिले विभवें ॥ हरिनाम रसायण अभिनवें ॥ नवमोध्याय सेवोत गोडहा॥ १३६॥
इतिश्री केदारविजय भविष्योत्तरे ॥ केदारखंड ब्रह्मांडपुराण विरचितायां ॥ तोरणभैरव रत्नासुर सौरस भवति नाम नवमोध्यायः ॥ ९ ॥ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय अश्विनी वाहन हेमाभरणी ॥ अकृत्रिम कृत्तिका शनि रोहि-
णी ॥ अतर्क्य मृगेंद्रकटीतटीं किंकिणी ॥ आरद्रा आर्द्र चित्तवेधका ॥ १ ॥ पुनर्वसु वसु अष्टमा ॥ पुष्य पुण्यार्क
उत्तमा ॥ पूर्णेष्टदत्त आश्लेषा श्लेषहारक सुगमा ॥ पूर्ण मघा मेघगर्जका ॥ २ ॥ उत्तम पूर्वापूर्व देवपरंपरा ॥
उत्तरा उत्तरोत्तरा मुनिवरा ॥ उत्तंक हस्तोहस्तीं क्रिया खड्गधरा ॥ उरग चित्र विचित्र वरदा ॥ ३ ॥ स्वाती
स्वस्थ मनकारका ॥ विशाखा त्रिमळांबुजकरीं विषहारका ॥ अनुराधा राधामनवेधका ॥ ज्येष्ठा सुरवर वरिष्ठा
य नमो ॥ ४ ॥ मूळकंद जगनग हेमा ॥ पूर्वाषाढा धनधान्या सुगमा ॥ उत्तराषाढा उद्योग निगमागमा ॥
त्रिगुणगुण गरिमा ऐक्यस्वरूपा ॥ ५ ॥ श्रवण श्रवणप्रिय सत्समागमा ॥ धनिष्ठा धनरूपा जंघंवीं भुजंग
मा ॥ शततारक जडजंगमा ॥ पूर्वाभाद्रपदा भद्र दायका ॥ ६ ॥ उत्तराभाद्रपदा भद्रावतारा ॥ रेवती खळेश्वर
खाग्नि आकारा ॥ सप्तविंशति नक्षत्रीं सुमनोहरा ॥ वद्रिविहारा शोभसी ॥ ७ ॥ डांकिनीतीर्थी भीमातटविहारा
॥ भीमाशंकरप्रिय हिमकेदारा ॥ भीमप्रताप गरिमा जमदाग्नि अवतारा ॥ दीनोद्धारका करुणानिधी ॥ ८ ॥ नि-
र्गुण निरूपम रणरंगधीरा ॥ निंदाद्वेषोपहारका गंभीरा ॥ निकरीं समरीं दनुजसंहारा ॥ निराकार अकारा मकारा
श्रया ॥ ९ ॥ असो ब्रह्मांडकरंडीं निशाकर रमणी ॥ नवनाथतेचि नवलक्ष तारांगणी ॥ भूषित भैरवाकार
सभास्थानीं ॥ अनंतार्क प्रभेसी खळनाथा ॥ १० ॥ असो तोरणभैरवें घोरा ॥ युद्ध करोनि मिळाला रत्नासु
रा ॥ रुधिरोचन पातला भीमातीरा ॥ मनुष्याकृति होऊनियां ॥ ११ ॥ लघुरूप धरोनि रुधिरोचन ॥ भैरवद
ळां पातला जाण ॥ तैं सिंहासनीं दैदिप्यमान ॥ श्रीनाथ निरंजन बैसला ॥ १२ ॥ नमस्कारोनि सर्वसभा ॥


अध्याय १० वा.
रावण कैलास
हालवितो-
केदारनाथ यु-
द्धाची तया-
री करि-
तात-

द्वयकर जोडूनि सन्मुख उभा ॥ एकघटिका टेंकोनि स्तंभा ॥ भैरवीशोभा लक्षितसे ॥ १३ ॥ हें पाहोनि कमलभैरी ॥ रुधिरोचनासी सुविचारीं ॥ ह्मणे कोठील देशांतरीं ॥ वास्तव्य कवण तें सांगे ॥ १४ ॥ कवण कार्यालागीं येथवरी ॥ येणें घडलें कीं जाणें पुढारीं ॥ हें ऐकोनि मधुरोत्तरीं ॥ रुधिरोचन वदतसे ॥ १५ ॥ स्वामीकार्यें असतीं नानापरी ॥ एक सांगावें एकांतमंदिरीं ॥ एक वदावें सबाह्यांतरीं ॥ एक षट्कर्णीं न करितां वर्तिजे ॥ १६ ॥ एक शब्द करावा प्रगट ॥ एक शब्द करावा बळ वरिष्ठ ॥ ऐसें सुशब्द वदती श्रेष्ठ श्रेष्ठ ॥ सभाधीटपाठी बोलती ॥ १७ ॥ यालागीं तुह्मांसी न सांगणें ॥ ऐसें रत्नासुराचें आज्ञावचन ॥ बद्रिविहारासीच निरोपण ॥ सांगेन तेंचि परिसावें ॥ १८ ॥ जोहारोनि हिमकेदारा ॥ रुधिरोचन बोले विनयोत्तरा ॥ आपण घेवोनि भैरवभारा ॥ कायकारण येथवरी पातला ॥ १९ ॥ रक्तबीज कोल्हासुर ॥ देविलाख्य रक्तभोज रत्नासुर ॥ शतमुखरावणाचा अवतार ॥ रत्नासुर हा प्रतापी ॥ २० ॥ ज्याच्या पूर्वजांची अचाटकरणी ॥ आमरणांतीं पडला वासरमणी ॥ युद्धा पातल्या त्रिदशगणी ॥ भयें देशांतरीं पळविले ॥ २१ ॥ रत्नासुर रक्तभोजन ॥ जैसें रावण कुंभकर्ण ॥ कुंभकर्ण निजसुरा ह्मणोन ॥ रामचंद्रें मारिला ॥ २२ ॥ षण्मास निद्रा पूर्ण झाली ॥ ह्मणोनि रामा विधिगत फावली ॥ येरवीं वटवृक्षाची सावुली ॥ पाहोनि वसविलीं अरण्यें ॥ २३ ॥ दहामुखाचा रावण ॥ वधावया पडिला भगीरथप्रयत्न ॥ अठरापद्म वानरगण ॥ मिळोनि शिळासेतु बांधिला ॥ २४ ॥ निकुंबळेमाजी निगूडस्थानीं ॥ इंद्रजित बैसला नग्न हवनीं ॥ सुवर्णरथ निघावा तंव तेचिक्षणीं ॥ ऋषभवानरें विध्वंसिला ॥ २५ ॥ ह्मणोनि मेघनाद वधिला लक्ष्मणें ॥ तो ही अचेतन झाला शक्तिभेदनें ॥ हनुमंतासी प्रेरून आणिला द्रोण ॥ यासुळें वांचला शे-

षजंघनीचा ॥ २६ ॥ महाप्रयत्नें वधोनि रावणा ॥ लंका दिधली बिभीषणा ॥ सीता घेवोनि अयोध्यापट्टणा ॥ गेल्या नंतरें बहुतेकदिवसीं ॥ २७ ॥ तैं एकादशीचे दिवसीं ॥ बिभीषण पातला अयोध्येसी ॥ शतमुखरावणें लंकेसी ॥ घेतलें ह्मणोनि आलों रामा ॥ २८ ॥ ऐसें वदतां बिभीषण ॥ क्रोधें उठलेतीं आपण ॥ हनुमंतस्कंधीं बैसोन ॥ मायापुरासीं पातला ॥ २९ ॥ शतमुखासवें करितां घोरकंदन ॥ श्रमी झालें तीव्र अंतःकरण ॥ तुमचे हस्तीं नसोनि मरण ॥ दारुणप्रतिज्ञा कासया बोलिला ॥ ३० ॥ शतमुखरावण सीतेहस्तीं ॥ मरण पावेल मध्य रात्रीं ॥ ऐसें आकाशवाणी अवचितीं ॥ होता सर्वांसी तैं कळलें ॥ ३१ ॥ तैं मारुतीनें विषाळाकृती ॥ पहिलेच अयोध्यें धरिली होती ॥ एकपद शरयूतीराप्रती ॥ मायापुरीं दुसरापद ठेविला ॥ ३२ ॥ असो हनुमंतकरीं आणोनि सीता ॥ तुह्मींच प्रार्थिली अनादिदेवता ॥ ह्मणोनि शतमुखाची युत्थावर्ता ॥ वांचली ते हनुमंतबळें ॥ ३३ ॥ तुह्मीं शतमुखासी जानकीकरीं ॥ क्रोधें वधविलें घोरसमरीं ॥ तोची शतमुख संह्याद्रीवरी ॥ अवतरला हा रत्नासुर ॥ ३४ ॥ हे निश्चयार्थीं मानावें मनीं ॥ रत्नासुर परमदीर्घाभिमानी ॥ कृतांत स्वरूपी शतवदनी ॥ रत्नासुर मे नागिरीं भूपती ॥ ३५ ॥ असंख्य खड्ग योगदंडबळ ॥ त्यांतूनि तूं प्रसिद्ध विशाळ ॥ नव्वदलक्ष जैसें अचळ ॥ रणवेताळबळी आढ्य ॥ ३६ ॥ एकेक राक्षस महाक्रूर ॥ जाळूं शकती हें ब्रह्मांडागार ॥ तेथें भैरवदळ पतंगाकार ॥ तव शक्तिदळेसीं कल्पिती ॥ ३७ ॥ दशमुखासाठीं रामावतार ॥ धरोनि मेळविले वानरभार ॥ आतां जमदग्नि रवावतार ॥ भैरवाकार झालेतीं ॥ ३८ ॥ सोळासिद्ध नवनाथ ॥ अष्टादश भैरवीचमू समस्त ॥ नवलक्षसाधु खताल पैगंबर बळोन्मत्त ॥ ऐशींहजाराचें मानितां ॥ ३९ ॥ अकरारुद्र त्रिदशगण ॥ द्वादशार्क नवग्रह

दारुण ॥ यांचिये भरवशावरी घोरकंदन ॥ करावें ह्मणोन पातलां ॥ ४० ॥ परिणामीं निर्फळजाणा ॥ ऐसें दिस
तें माझिये नयना ॥ जैं सिंहाचिये परमयत्नीं सदना ॥ कुरंगवस्ती आला समुदायीं ॥ ४१ ॥ कीं व्याघ्राचे घरीं
पातले हरिण ॥ कीं पिपीलिके फुटती पंख जाण ॥ कीं सुपर्णगृहीं काद्रवेयगण ॥ या नांवे मरण बोलिजे ॥ ४२ ॥
अन्न उदकाचा ऋणानुबंध ॥ आयुष्यमर्यादा खुंटल्या प्रारब्ध ॥ वधार्थी यानें हातांत तस्करवृंद ॥ मरण बोलि-
जे यानांवे ॥ ४३ ॥ रक्तभोजाचा कुमर ॥ शिष्टाईसी पातला सामोपचार ॥ हें रत्नासुराचें आज्ञोत्तर ॥ अधिको
त्तरीं मी कांहीं न बोलें ॥ ४४ ॥ अंगीं असेल पराक्रम ॥ ह्मणोनि सोडिलें वाटें बद्रिकाश्रम ॥ परी तो कळ-
ला तुमचा श्रम ॥ भैरवचमू अनुक्रमें पहातां ॥ ४५ ॥ शक्तिचमूसी भैरवभारीं ॥ शोधितां महावीर नसे नि
र्धारीं ॥ त्यांच्या भरवशावरी हिमकेदारी ॥ कैशावरोनि येथें पातला ॥ ४६ ॥ राक्षसांचा विकटाटशब्द ॥ हो
य सुरवर नराल्हदय भेद ॥ तेथें हीं भैरवचमूचे वृंद ॥ तृणप्राय मानिती मत्पूर्वज ॥ ४७ ॥ तुमचा रणभैरव
सेनापती ॥ रणपंडित कृतांताकृती ॥ पाहूनि रत्नासुर बळसंपत्ती ॥ सेवक झाला तयाचा ॥ ४८ ॥ त्या रण-
भैरवाचा तुह्मांसी भरवसा ॥ त्याची झाली ऐसी दशा ॥ दीर्घ पाहूनि बद्रिकेशा ॥ युध्दारंभ करा विचारू
नी ॥ ४९ ॥ भैरवभारीं बद्रिविहारी ॥ कवणतो वीर वदें रणधीरा ॥ युद्धीं जिंकिजे रत्नासुरा ॥ क्षेत्रीं नसे मजला
गीं ॥ ५० ॥ वेष पालटोनि मायास्वरूपी ॥ विक्राळ लघु प्रचंडरूपी ॥ ऐसियाच्या युध्दसंकल्पीं ॥ था
रों न शके भैरवदळीं ॥ ५१ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ एकरूपी झाला भैरवाकार ॥ जमदग्नि र-
वावतार ॥ ह्मणवितां तुह्मीं बद्रिविहारा ॥ ५२ ॥ आणि शतमुख ब्रह्मा हरिहर ॥ ऐक्य झालेती योगमाया

विचार ॥ पौंगंडऋषीनें ब्रह्मकल्पवर ॥ तपाचरणें विमलांबुजी अवतरला ॥ ५३ ॥ पौंगंडऋषि वार्धक्यपणीं ॥ कष्ट न द्यावे खड्गपाणी ॥ तुमची विमलांबु जननी ॥ शोक करी ऐसें नकरावें ॥ ५४ ॥ हे ऐकूं तव अजन्मीची कहाणी ॥ प्रचीत पावे रणांगणीं ॥ जेवीं शतमुखाचिये घोरकंदनीं ॥ चिंतार्णवीं पडियेला तैसें नाचरावें ॥५५॥ नवल दुसरें करावें श्रवण ॥ तुह्मातें नेलें अहिरावणें जाण ॥ महिकावतीतें बळीदान ॥ द्यावयालागीं आणिलें तुह्मां ॥ ५६ ॥ दैवयोगें हनुमंतबळें ॥ महिरावण वधिला पवनबळें ॥ पति मरण जेव्हां सांगितलें ॥ तें तुह्मीं वंधिलें अहिरावणा ॥ ५७ ॥ तोचि अहिरावण वैर संबंधू ॥ धरोनि जन्मला प्रतापसिंधू ॥ तो रत्नासुराचा ज्येष्ठबंधू ॥ रक्तभोज नाम जयाचें ॥ ५८ ॥ जैसें अहिरक्त पडतां महीं ॥ उद्भवती शतसहस्र अही ॥ तैसाचि रक्तभोज असे पाहीं ॥ रणीं रक्त पडतां उद्भवती ॥ ५९ ॥ ह्मणोनि रक्तभोज रक्तोद्भव जाण ॥ नाम ठेविलें रक्तभोजन ॥ तयाचें युद्ध अतिदारुण ॥ अहिरावणाचा अवतार जो ॥ ६० ॥ शेषासी विचारीं खळनाथा ॥ सत्य मिथ्या वदेल तोचि आतां ॥ तो रक्तभोज रणीं खवळतां ॥ कवणें त्या वीरा आवरावें ॥ ६१ ॥ रक्तभोजाचे दुपकुळदीप ॥ धीरोचन ममबंधु बळ प्रताप ॥ तोरणभैरवासी रव साक्षेप ॥ युद्ध संकल्प पाहिला आमुचा ॥ ६२॥ रुधिरोचन मी दुसराकुमर ॥ माझिये प्रतापाचा गिरिवर ॥ ब्रह्माशक्ति हरिहर ॥ नुलंघी युद्धमर्यादा सर्वथा ॥ ६३ ॥ मेरुमांदार उत्पाटीन करतळीं ॥ पालथी घालीन पृथ्वी सकळी ॥ कौतुक दावितों या भैरवमंडळीं ॥ परी त्या रत्नासुर बळीची नसे आज्ञा ॥ ६४ ॥ आपुला पराक्रम आपुले वदनीं ॥ सांगतां लघुत्व येईल जनीं ॥ ह्मणोनि सारांश वदलों वचनीं ॥ रक्तभोज रत्नासुर आज्ञेनें ॥ ६५ ॥ हें परिसोनि उत्कर्षवाणी ॥ शेषें धिःकारिला तीव्रवचनीं ॥

तुझिये हननार्थीं याचिक्षणीं ॥ काळभैरवहस्तें करवितों ॥ ६६ ॥ ऐसें वदतां भूधरावतार ॥ कोपें खवळला भैरव भार ॥ काळभैरव भयंकर ॥ बाहु पिटित करतळीं ॥ ६७ ॥ हें पाहोनि श्रीकेदार ॥ काळभैरवासी ह्मणे धरीं सुविचार ॥ रुधिरोचन हा महा रणशूर ॥ भुवनत्रीं नसे दुसरा ॥ ६८ ॥ याची मृत्युघटका उरली थोडी ॥ ह्मणोनि अरिया पहा बडबडी ॥ काळभैरव ह्मणे याचि घडीं ॥ केवढी प्रौढी पाहों याची ॥ ६९ ॥ अवतार चरित्राचें बोलणें ॥ तें सत्यच नाहीं यदर्थीं उणें ॥ आज्ञा देईं याचिक्षणें ॥ शिरच्छेद करीन याचा ॥ ७० ॥ लक्ष्मी ह्मणे परिसें केदारमूर्ती ॥ काळभैरवासी करावें सेनापती ॥ अष्टादशपद्मीं अष्टप्रधान असती ॥ कनकाभरणीं गौरवावें ॥ ७१ ॥ प्रथम आदिनाथ गोरखनाथ ॥ कमळनाथ गोपिनाथ ॥ जालंदर कानिफ मत्स्यनाथ ॥ काळनाथ अष्टम ॥ ७२ ॥ नववा विजयगंधनाथ ॥ यातें गोरवी दीनानाथ ॥ सोळासिद्धचक्रेसी प्रख्यात ॥ गौरविलें हेमाभरणीं ॥ ७३ ॥ अनादिशक्तीसी चामुंडा नवकोटी ॥ कात्यायनीसीं भीमातटीं ॥ उतरल्या त्यांच्या क्रोधाग्निपेटी ॥ श्रीखळेश्वरें उघडिली ॥ ७४ ॥ जेवीं ज्वाळा स्पर्शती गगनीं ॥ ते उज्वळांबेसी ज्वाळामुखी कात्यायनी ॥ गर्जती भैरवासहित वाहिनी ॥ विद्युत्पातध्वनी सारख्या ॥ ७५ ॥ अनादिशक्तीचे कोशभांडार ॥ फोडोनि गौरविला शक्तिभैरवभार ॥ कीं डहुळला सैन्यसागर ॥ रत्नासुर वडवाग्नि विझवावया ॥ ७६ ॥ असो काळभैरव ह्मणे रुधिरोचना ॥ सिष्टाईसी येवोनि वर्मवचना ॥ बोलसीं रे हीनवर्णा ॥ अकरणा करीन ये समयीं ॥ ७७ ॥ आमुचा क्रोधवैश्वानर ॥ जाळूं शके हा ब्रह्मांडगिरिवर ॥ तेथें रत्नासुर रक्तभोजखर ॥ काय करिती सांगपां ॥ ७८ ॥ खद्योत सूर्यापुढें प्रकाश मिरवी ॥ सुपर्णापुढें शलभ झेंपदावी ॥ हनुमंतापुढें उड्डाणठेवी ॥ दावितां निर्फळ कोल्

टी ॥ ७९॥ सिंहापुढें जंबूक जाण ॥ होऊनि गेला पंचानन ॥ तो सिंह जंबूकासी पाहोन ॥ पळोनि जाईल सांग मजला ॥ ८० ॥ कीं हरणीनें चिंतावीं शृंगें ॥ व्याघ्रें होईजे दोनी भंगें ॥ कीं चित्रींचा देखोन भुजंग ॥ गरुड पळेल काय पामरा ॥ ८१ ॥ कीं चित्रींचा घेऊन हुताशन ॥ जाळीन ह्मणसीं ब्रह्मारण्य ॥ कीं खदिरांगाराची गुंफोन सुमन ॥ माळ घालील कर्पूरपुतळा ॥ ८२ ॥ वंध्याकुमराचा विवाह करोनी ॥ मंटपीं न्हाणिला मृगजळजीवनीं ॥ कांसवी घृतें तृप्त पावला अग्नी ॥ हें तों अघटित सर्वथा ॥ ८३ ॥ तेवीं जंबूक नामा कोल्हासुर ॥ रक्तभोज कर वीर रत्नासुर ॥ यांचा सांगसीं बडिवार ॥ भुवनत्रयीं न समाये ॥ ८४ ॥ ग्रामसिंह पातल्या द्वारीं ॥ तो बळोन्मत्त विष्टेचा अधिकारी ॥ वृश्चिक देखतांचि निजकरीं ॥ पादरक्षें प्रतिपाद्य करावें ॥ ८५ ॥ ऐसें वदता काळभैरी ॥ रुधिरोचन कोपोनि अंतरीं ॥ स्वरूपराक्षस भयंकरी ॥ अंबरोदरीं गर्जिन्नला ॥ ८६ ॥ ह्मणे रे काळभैरवनामी ॥ करणी कळोनि येईल संग्रामीं ॥ जंबूक किंवा सिंह आह्मीं ॥ युद्धारंभीं दाखवूं ॥ ८७ ॥ रक्तबिंदु पडतां धरणीं ॥ रक्तोद्भवतील रणांगणीं ॥ तेव्हां मल्हारतीची शिराणी ॥ नाथनिरंजनासी तें होय ॥ ८८ ॥ आमुचिये घोर संग्रामीं ॥ थारों न शके तुझा स्वामी ॥ रज सत्व तमाची अचाट ऊर्मी ॥ विकळ करील समरीं रक्तभोज ॥ ८९ ॥ आतांचि दावितों तुझियामना ॥ परी त्या रत्नासुरें न दिधली आज्ञा ॥ ऐसें ह्मणोनि सिंहगर्जना ॥ करोनि गगनीं उडाला ॥ ९० ॥ दाऊनि अद्भुत बळप्रताप ॥ ऊर्ध्वपंथीं चालिला कोपें ॥ तीव्र अंगवातें वनपादपें ॥ चक्राकृति भोंवतीं ॥ ९१ ॥ हें पाहोन आकाशभैरी ॥ ह्मणे आज्ञा देईं बद्रिविहारी ॥ रुधिरोचन धरोनि निज करीं ॥ स्वामीपासीं आणितों ॥ ९२ ॥ हिमकेदार ह्मणे एधवां ॥ स्वस्थ असावें बादलभैरवा ॥ मी सांगेन त्या

समयीं वधावा ॥ समरंगणीं रुधिरोचना ॥९३॥ काळचक्र तयानें घातलें पाठी ॥ ह्मणोनि पातला आमुचे भेटी ॥
महापराक्रमी दुष्टकपटी ॥ वदला वर्मगोष्टी अवतारींच्या ॥ ९४॥ तयाचा मृत्यु एकमंडळ ॥ उरला ह्मणोन न हो
य उतावेळ ॥ असो भैरवीचमू सजिली सकळ ॥ सिद्धचक्रेसी नवनाथ ॥ ९५ ॥ आश्चर्य करिती भैरवभारीं ॥
केवढी अंग सामर्थ्यांची लहरी ॥ धिःकारोनि गेला अंबरीं ॥ धैर्य न धरावें धरावया कोणा ॥ ९६ ॥ शतमुख
रावणाचा वैर संबंधु ॥ कथिला परिसोनि अनाथबंधु ॥ उत्तर नच करुणासिंधु ॥ यासाठीं विरोधी गमतसें ॥९७॥
ह्याचि भयकृत भयनाशन ॥ ऐसा श्रीनाथ निरंजन ॥ रत्नासुर रक्तभोजन ॥ वधोत्सवार्थी उतरला ॥ ९८ ॥ र-
त्नासुराची वाढवावी कीर्ती ॥ ह्मणोनि हीं चिन्हें दाविलीं आह्मांप्रती ॥ असो शक्तिदळेसी शब्दव्युत्पत्ती ॥ तर्के
भाष्य करितीं अपार ॥ ९९ ॥ असो रुधिरोचन गगनपंथा ॥ आक्रमित पातला संह्याद्रिपर्वता ॥ सांगोन सकळ
वृत्तांता ॥ भीमाशंकरींचा विस्तार ॥ १०० ॥ परिसोनि रुधिरोचनाच्या उत्तरा ॥ आनंद झाला सकळ असुरां-
रक्तभोज रत्नासुरा ॥ संतोष झाला बहुतेक ॥ १ ॥ येरीकडे भैरवभारीं ॥ कथा परिसावी नवलपरी ॥ लक्ष्मीप-
ति मधुरोत्तरीं ॥ चर्पटअंबिका वदतसे ॥ २ ॥ तोरणभैरव मिळाला असुरां ॥ तैसाची महागणपति होईल दुस
रा ॥ तैं कमला ह्मणे ऐक उत्तरा ॥ तैसा नव्हे विघ्नेश्वर ॥ ३ ॥ ऐक गणपतीचें बळ गाढें ॥ हातीं धरून बोधकु-
ऱ्हाडें ॥ खंडित दैत्यवंश जुंबाडे ॥ अलिप्तपणीं धड धड जाळितसे ॥ ४ ॥ येविषयीं इतिहास ऐक वचन ॥ कै-
लासीं पातला रावण ॥ मूषकारूढ गजानन ॥ शंकरद्वारीं उभा असे ॥ ५ ॥ दंड धरोनि आडवा उभा ॥ देखो-
नि रावण ह्मणे हेरंबा ॥ महाद्वारीं कैसी शोभा ॥ उंदरावरी बैसोनियां ॥६ ॥ आणखी वाहना दुष्काळ पडिला ॥

मूषकवाहन त्वां आवडला ॥ न घेई कोणी एक कवडिला ॥ हें वडिलांसी विचारूनि येईं कां ॥ ७ ॥ मूषकवाहन ढेरपोटा ॥ कर्ण विस्तीर्ण दांत थोटा ॥ वेष्टिला नाग कटींतटा ॥ फार गोमटा तूंचि दिससी ॥८॥ गजमुख सलंभ नाशिक ॥ एकीकडे बैस घटिका एक ॥ हें परिसोनि विनायक ॥ रावणासी वदतसे सक्रोधें ॥९॥ हा शिवदंड न उचले मातें ॥ तूंचि करीं गा द्वारा परतें ॥ हें ऐकोनि पादघातें ॥ शिवदंडासी ढकलिलें ॥ १० ॥ अंगुष्ठें ढकलितां शिवदंड ॥ जळोनि गेलें बळप्रचंड ॥ उचलितां जरी वीस भुजदंडें ॥ ब्रह्मांडा येवढें गमतसे ॥११॥ शिवदंड अणुमात्रही न हाले ॥ रावणगात्रें झाला वेहाल ॥ स्तवन करितां मननिर्मळें ॥ विघ्नेश्वराचें तें काळीं ॥ १२ ॥ आदिगणेशा अनादिगणनायका ॥ सकळारंभीं सुखदायका ॥ तुज न पूजितां पावती दुःखा ॥ जय विनायका एकदंता ॥ १३ ॥ चौदाविद्या चौसष्टकळा ॥ तव अर्चनीं पावती सकळां ॥ चतुर्थी उपोषित पहावी चंद्रकळा ॥ पूजा अर्घ्यपाद्य मधुपर्की ॥ १४ ॥ लक्ष्मीचा जो सखा बंधु ॥ नाम तयाचें पूर्णेंदु ॥ चतुर्थीदिवसीं अमृतबिंदु ॥ अर्चनीं संतोष पावती ॥ १५ ॥ ऐसा स्तवोनि गजानन ॥ येरु ह्मणे हे गर्वनिधि करी शिवदर्शन ॥ दूर अंतरले शिवाचे चरण ॥ गर्वाभिमानें करोनियां ॥ १६ ॥ शिक्षा झालि बहु मीपणें ॥ तंव दीन वदन केलें रावणें ॥ त्वां जिंकिलीं चतुर्दशभुवनें ॥ लंका मढिली नवकांचनीं जंबुद्विपाचें आणूनियां ॥ १७ ॥ कैलासगिरि हालविसी हातें ॥ ऐसें तुझें बळ अद्भुत ॥ बरें तें असो समयोचित ॥ व्यसनें घडतीं सुरनरांसी ॥ १८ ॥ ऐसें वदोनि लंबोदर ॥ पाचारूनि आणिला उंदीर ॥ द्वारीं शिवदंड पडिला थोर ॥ तो एकीकडे करावा तुवां ॥ १९ ॥ ऐसें वदतांचि गणपती ॥ मूषकें शिवदंड धरूनि दांतीं ॥ एकीकडे करितां लंकापती ॥ आश्चर्य करित मा

नसीं ॥ २० ॥ ह्मणे धन्य आदिगणदैवत ॥ मूषकवाहनीं प्रख्यात ॥ जेवीं पिपीलिकेनें महापर्वत ॥ उचलिला ईश्वरकृपनें ॥ २१ ॥ मज सारखा रावणबळी ॥ पालथी घालीन पृथ्वी सकळी ॥ उंदीरें उचलितां जाहलों निर्बळी ॥ उंदीर बळी मजहूनी ॥ २२ ॥ ईश्वरगृहीं दुराभिमान ॥ नचलें यदर्थीं असे प्रमाण ॥ ऐसा अनुतापीं तापोनि रावण ॥ तप दारूण करितसे ॥ २३ ॥ शत संवत्सर तपाचरण ॥ लोहकंटकीं ठेऊनी चरण ॥ तिष्ठत राहिला अचळमन ॥ कैलासद्वारीं शिवाच्या ॥ २४ ॥ आपुलें शिरछेदूनि केला विणा ॥ सप्तस्वरें करी गायना ॥ ऐसा नवविध करूनि प्रविणा ॥ नाडि त्या तारा तंत वितंत सुस्वरीं ॥ २५ ॥ सहाराग छत्तीसभार्या ॥ बारातासांच्या बत्तीस घटिया ॥ तैसाचि द्विदळावरील चौघडिया ॥ सरागचर्या गातसे ॥ २६ ॥ हें पाहोनि श्रीगणपती ॥ शिवासी विनवी रसोत्पत्तीं ॥ तैं भोलानाथ तो पशुपती ॥ लंकापतीपासीं पातला ॥ २७ ॥ कृपेनें पाहिलें दशकंधरा ॥ तंव पूर्वी ऐशीं दशशिरा ॥ होतांचि करी जयजयकारा ॥ नमस्कारिला लोटांगणीं ॥ २८ ॥ शंभु ह्मणे गा लंकानाथा ॥ काय आवडे तें सांग आतां ॥ रावण ह्मणे आमुची माता ॥ मृत्तिका लिंगार्चन पूजा करी ॥ २९ ॥ तव अचळ भक्त मी रावण ॥ ऐसें बोलती चतुर्दशभुवन ॥ आणि माझे मातेनें लिंगार्चन ॥ मृत्तिकेचें पुजावें कीं हरा ॥ ३० ॥ ह्मणोनि आतां भद्रावतारा ॥ तव प्राणलिंग देईं मजउदारा ॥ माता पूजा करील गंगाधरा ॥ मातृऋणा पासोन मुक्त करीं ॥ ३१ ॥ ऐसें ऐकतां त्रिपुरांतक ॥ तटस्थ ठेला मुहूर्तैक ॥ दिधलें परंतु तुज अलभ्यदेख ॥ परमदैवें पाविजे ॥ ३२ ॥ रावणा होऊनि सावधान ॥ शुचिष्मित राखावें मन ॥ भूमीं न ठेवावें ह्मणोन ॥ प्राणलिंग दिधलें रावणा ॥ ३३ ॥ लिंग घेवोनि दशकंधर ॥ आधीं नमस्कारिला लंबोदर ॥ म्यांच तपकरितां झालों ईश्वर ॥ प्राणलिंग प्राप्त शिवार्चनीं ॥ ३४ ॥


नाना स्तवनीं विघ्नेश्वर॥ स्तवोनि निघाला दशकंधर ॥ हें पाहोनि पद्मोद्भवकुमर ॥ धांवत गेला वैकुंठा ॥ ३५ ॥ काय बैसलासी निश्चळमन ॥ अमर जाहला हो रावण ॥ प्राणलिंग दिधलें गौरीरमणें जाण ॥ प्रसन्न होऊनि दशकंधरा ॥ ३६ ॥ बंदीचे सुटतील कैसे देव ॥ बुडाली अवतार चरित्र ठेव ॥ देवपणाचें बुडालें नांव ॥ रावण देव जाहला ॥ ३७ ॥ कैंचा राम कैंची सीता ॥ होणार लटकीच झाली वार्ता ॥ शतकोटि रामायणाची कथा ॥ वाल्मीकानीं वृथा कथियेली ॥ ३८ ॥ साठीसहस्र वर्षां नंतरीं ॥ राम अवतरेल अयोध्येपुरीं ॥ ते मिथ्या झाली वैखरी ॥ वाल्मीकाची मज वाटे ॥ ३९ ॥ ऐसें वदतां नारदमुनी ॥ गडबडोनि उठिला सारंगपाणी ॥ मन पवनासी दूर सोडोनी ॥ शूळपाणीपासीं पातला ॥ ४० ॥ विष्णु ह्मणे हे उमाकांता ॥ कां लवकरीच केलें ब्रह्मकल्पांता ॥ त्रिदशगणांच्या आकांता ॥ कवणें आतां पावावें ॥ ४१ ॥ अवतार घ्यावया काय कारण ॥ अमर केला तुह्मीं रावण ॥ हें परिसोनि गिरिजारमण ॥ विष्णूप्रती वदतसे ॥ ४२ ॥ महाभक्त तो दशानन ॥ करोनि आपुलें शिरच्छेदन ॥ केलें रागोद्धारीं सामगायन ॥ तेणें तनुमनधनेंसी भुललों मीं ॥ ४३ ॥ विसर पडिला माझिया मना ॥ ह्मणोनि लिंग दिधलें रावणा ॥ आतां तूं सर्वगत कळाप्रवीणा ॥ धांव घालीं पवनसंगें ॥ ४४ ॥ समीप जातसे रावण जाणा ॥ ऊठ विलंब न करीं सुजाणा ॥ तूं सर्वार्थी चतुर शाहणा ॥ गजानना नेईं समागमे ॥ ४५ ॥ लंकेसी गेलिया दशकंधर ॥ होईल अक्षयी अजरामर ॥ यालागीं मार्गीं करूनि चमत्कार ॥ दशकंधर सिंतरावा ॥ ४६ ॥ परिसोनि त्रिपुरांतकाची वाणी ॥ पवनवेगाहून सहस्रगुणीं ॥ सवें घेऊनि नारदमुनी ॥ गणपति सहित पातला ॥ ४७ ॥ नारदासी बोधोनि अमळोत्तरा ॥ गोंवावया धाडिलें दशकंधरा ॥ श्रीगणपतीतें बोधोनि त्वरा ॥ रावणाप्र-

ती घाडिला ॥ ४८ ॥ नारद ह्मणे हे दशानना ॥ कवण कार्यार्थी लगबग जाणा ॥ रावणें कथिलें सकळाचरणा ॥ शिवलिंग प्राप्त झालें ऐसियापरी ॥ ४९ ॥ तैं विष्णूनें सोडिलें सुदर्शन ॥ झांकिला अलक्षी सहस्रकिरण ॥ दोनघटका अस्तमान ॥ रावणातें गमतसे ॥ ५० ॥ नारद ह्मणे हे रावणा ॥ संध्या लोप कां करिसी सुजाणा ॥ वेदशास्त्रिया विचक्षणा ॥ संध्याविक्षेप न करावा ॥ ५१ ॥ ऐसें सांगोनि दशकंधरा ॥ नारद पातला पश्चिमसमुद्रा ॥ तैं दशानन योजी निजांतरा ॥ प्राणलिंग कोठें ठेविजे ॥ ५२ ॥ लिंग न ठेवावें या महीं ॥ ऐसी शिवाज्ञा अचळ पाहीं ॥ तंव गणपति विप्रवेष लवलाहीं ॥ समिधा तोडितां देखिला ॥ ५३ ॥ तैं पाहोनि दशकंधरीं ॥ ह्मणे ऐक बाळा ब्रह्मचारी ॥ प्राणलिंग देतसें तुझिया करीं ॥ घ्यावें दोनघटिका पर्यंत ॥ ५४ ॥ आग्रह करोनि दिधलें करीं ॥ तैं गणेश ह्मणे हें जडभारी ॥ होतां हाक मारूनि त्रिवारीं ॥ महीवरी ठेवीन निर्धारें ॥५५॥ श्रीलिंग देऊनि श्रीगणेशा ॥ आपण करूं गेला दिशा ॥ निधान लाधलें तंव अवदशा ॥ आड ठाकिली ज्यापरी ॥ ५६ ॥ असो रावण संध्यासारी ॥ जपासी बैसला सागरतिरीं ॥ तैं गणेश हाक मारोनि त्रिवारीं ॥ लिंग महीवरी ठेविलें ॥५७॥ ॐनमो शिवाय मंत्र जपोनी ॥ लिंग प्रतिष्ठिलें मेदिनीं ॥ जयजयकारीं दिव्यसुमनीं ॥ दुंदुभिनादीं वर्षती ॥ ५८ ॥ संध्या सारोनि रावण पातला ॥ लिंग ठेविलें ह्मणोनि कोपला ॥ तंव गणपति अदृश्य झाला ॥ रावणें आश्चर्य केलें मानसीं ॥ ५९ ॥ रागें लिंग उत्पाटितां दोकरीं ॥ पृथ्वी डळमळली विंशती करीं ॥ लिंग जाहलें गोकर्णाकारी ॥ ह्मणोनि गोकर्णेश्वर बोलती ॥ ६० ॥ गोकर्णेश्वरमहिमा गहन ॥ ब्रह्मोत्तरखंडीं व्यासवचन ॥ विस्तारें परिसावें संतजन ॥ यदर्थी संदेह न धरावा ॥६१॥ त्रिमूर्तीचा अवतार ॥ कुरुपुरेंद्रीं असे य

तिवर ॥ श्रीपाद श्रीवल्लभ मुनिवर ॥ औदुंबरीं जो अक्षयी वसे ॥ ६२ ॥ गोकर्ण आख्यान विस्तारें ॥ गुरुचरित्रीं परिसावें चतुरें ॥ असो हा भीमाशंकरीं कथार्थ सारें ॥ चर्पटअंबेसी लक्ष्मी वदे ॥ ६३ ॥ ऐसा गणपति निर्विघ्न कर्ता ॥ तो धाडिजे सह्याद्रिपर्वता ॥ एकविंशती गिरि आवर्ता ॥ गणेशाकृति असे ठायीं ठायीं ॥ ६४ ॥ लक्ष्मी ह्मणे बद्रिनिवासा ॥ बोधोनि महा गणाधीशा ॥ धाडिजे न करोनि आळसा ॥ तोरणभैरव नव्हे हा ॥६५॥ परिसोनि श्रीकमलेची वाणी ॥ तैं नाथासी वदे गणपति वचनीं ॥ रत्नासुर राक्षस मायाविंदानीं ॥ तत्प्रसाद मोदक मज देईं ॥ ६६ ॥ ऐसें वदतां महागणपती ॥ बद्रिकेदार परम अर्थी ॥ बदरीफळ देवोन गणेशहस्तीं ॥ सह्याद्रि पर्वतासी धाडिला ॥६७॥ गणेश धाडिला मैनागिरीं ॥ तैं वार्ता पातली भैरवभारीं ॥ पालाशमदैत्य पैगंबरीं ॥ मार्ग आमुचा रोधिला ॥ ६८ ॥ मणिमल्ल असे मणिभद्रपुरीं ॥ नाम प्रख्यात जेजोरी ॥ नळदुर्ग मल्याळी ते बारामल्लारी ॥ अंदासुर ही मिळाला ॥ ६९ ॥ करवीर योगदंडाचें वारें ॥ झगटतां उज्वलविच्या सह परिवारें ॥ शेळ्या मेंढिया ह्मैसी खिल्लारें ॥ करवीरें करोनि वनीं चारितसे ॥ ७० ॥ करवीराचे मल्ल नवलक्षपाहीं ॥ त्यांत मणिमल्ल मणिभद्र पर्वतदेहीं ॥ मैराळादि दैत्य साही ॥ त्यांणीं सर्व मही व्यापिली ॥७१॥ बारामल्हारापासोन जेजोरी पर्यंत ॥ रत्नासुराचे मणिमल्ल अद्भुत ॥ असती रोधोनि आमुच्या मार्गांत ॥ गिरिकंदरीं घाट वाटे॥७२॥ ऐसी वार्त्ता ऐकोनि श्रीनाथ ॥ लक्ष्मी चर्पटअंबा रेणुका सहित ॥ परशराम मार्तंडभैरवादि समस्त ॥ जाऊन एकांतीं बैसले ॥ ७३ ॥ ते कथेची अभिनव गोडी ॥ संतीं सेविजे सुरस आवडीं ॥ श्रीकेदारविजय घन बांकडी ॥ वरदश गडाडी चिदांबरीं ॥ ७४ ॥ ते परी महंत संत परिसती ॥ जेवीं शुक्लपक्ष मधुमास वसंतीं ॥ हरिजन को-

किळान्वय कुंजती ॥ श्रीकेदारकल्पतरूवरी ॥ ७५ ॥ कीं नव इंद्रियांमाजीं ज्येष्ठपण ॥ दशेंद्रिय ज्यासी अभिधान ॥ तैसें दशमोध्यायीं निरोपण ॥ संतगुणिजनीं परिसिलें ॥ ७६ ॥ कीं मीन पिपीलिका विहंगम ॥ हे मार्ग रोधितां षड्रिपु भुजंगम ॥ हें जाणोनि उन्मेष तुरंगम ॥ सज्जोनि नाथ जडजंगम उद्धरी ॥ ७७ ॥ तेचि करवीर पालाशम साचार ॥ हें युद्ध करणार घोरांदर ॥ जाणोनि हें बद्रिविहार ॥ मार्तंडभैरवासी वदतसे ॥ ७८ ॥ कानडी देशभाषा गोमटी ॥ नाथें नाम ठेविलें यळकोटी ॥ गण देऊनि तेतीसकोटी ॥ मल्लदर्शनासी धाडितसे ॥ ७९ ॥ मार्तंडभैरवासी बद्रिविहारी ॥ बोधोनि करील चमत्कारी ॥ मणिमल्लावरी होईल स्वारी ॥ तें एकादशोध्यायीं अवधारा ॥ ८० ॥ इति केदारविजय परम ॥ श्रवण करितां संसारश्रम ॥ परिहारोनि पावती सुखसंभ्रम ॥ श्रवणार्थी अक्षय संतोष ॥ ८१ ॥ श्रोतावक्ता तर्क सुभाषित ॥ अकर्णी गीर्वाण कवनार्थ ॥ यदर्थी अवघा श्रीखळनाथ ॥ हरिखें सुमनोरथा पुरवित ॥ ८२ ॥ सारांश भावार्थें करिता श्रवणें ॥ तुटतीं भवबंधाचीं बंधनें ॥ एकमंडळ करितां श्रवण पठणें ॥ जय कल्याण पावती ॥ ८३ ॥ कीं हे केदारविजय वल्ली ॥ हरिनारायण सघनीं फुलली ॥ हरिनाम रसायणीं अखंड भरली ॥ लवोनि आली दशमोध्याय गोडहा ॥ १८४ ॥ इति श्रीकेदारविजय रुधिरोचन शिष्टाई कथनं ॥ लक्ष्मी चर्पटअंबा संवादे ॥ भविष्योतर केदारखंड विरचितायां ॥ दशमोध्याय गोडहा ॥ १० ॥ श्रीकेदारार्पण मस्तु ॥ ॥ श्रीसांब शिवार्पण मस्तु ॥ ओंव्या ॥ १८४ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय शेषारुढा विष्णुअवतारा ॥ शेष वासुकी कुंडलधरा ॥ सनत्कुमार शक कर्त्तारा ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध तत्वा ॥ १ ॥ शरत्काळ षड्तु ज्योतिस्वरूपा ॥ शेषशयनीं सुरपादपा ॥ शंखचक्रधर दनुजदर्पा । शिनिवाली पौर्णमीं इंदुतिलकांकिता ॥ २ ॥ क्रमणपदीं ध्वजांकुश मंडिता ॥ कृत त्रेत द्वापार रणपंडिता ॥ कृपार्णव खड्ग धृता ॥ कृपार्णवा सौदागरा ॥ ३ ॥ ऐसा नटनागर सुंदर ॥ दैत्यांतक जमदग्नि अवतार ॥ उतरला जेथें भीमाशंकर ॥ डाकिनीतीर्थ भीमातटाकीं ॥ ४ ॥ तेथें रक्तभोजनाचा ज्येष्ठकुमर ॥ रुधिरोचन नामा तीव्र असुर ॥ दौंशकंदर्प दाखऊनि भयंकर ॥ मैनागिरिविरासी तो गेला ॥ ५ ॥ लक्ष्मी चर्पटेचे शब्दार्थ कथनें ॥ शिवप्राणलिंग नेलें रावणें ॥ तीं गोकर्णींची महादाख्यानें ॥ दशमोध्यायीं कथिलीं असे ॥ ६ ॥ आतां परिसावें श्रोतेजन ॥ स्वस्थ मनेंद्रिय अतःकरण ॥ करा केदारविजय रसपान ॥ दोष दारुण नासती ॥ ७ ॥ यावरी कमला विमलांबुज नयना ॥ ह्मणे परिसें नाथनिरंजना ॥ रुधिरोचन वदला ज्या अवतारखुणा ॥ त्या विदित असती सकळ ही ॥ ८ ॥ दूत सांगती अघटित वार्ता ॥ रत्नासुर अजिंक्य सर्वथा ॥ दैत्य आवर्ता संह्याद्रिपर्वता ॥ घालोनि दिवारात्रीं संरक्षिती ॥ ९ ॥ योगदंडाचियें बळ ॥ जाहलें कोल्हसुर करवीर प्रलयानळ ॥ आह्मां सर्वांतें मानिती निर्बळ ॥ प्रतिज्ञाज्वाळमाळ धडकती ॥ १० ॥ लक्ष्मी ह्मणे त्रद्रिविहारा ॥ सप्तकोटि देऊनि सैन्यभारा ॥ मार्तंडभैरव दिनकरा ॥ वस्त्राभरणीं गौरविजे ॥ ११ ॥ श्रीनाथ ह्मणे हे मार्तांडभैरवी ॥ यळकोटि गण उभे दळभारीं ॥ घेऊनि निकुरें करावी स्वारी ॥ मणिमल्लासी वधावया ॥ ॥ १२ ॥ कानड्याशह्लाची ऐकावी गोष्टी ॥ सप्तकोटीसी ह्मणती योळकोटी ॥ हे मात प्रख्यात मराठी ॥ ह्मणोन


अध्याय ११ वा.
मणिमल्ल दैत्य
केदारनाथ
गृधासुर
अवंदासुर

यळकोटि उभे ह्मणावें ॥ १३ ॥ प्रत्यक्ष शंकराचा अवतार ॥ मार्तंडभैरव लिंगाकार ॥ नंदी तोचि तुरंग मनोहर ॥ ह्माळसा गंगा जाणावी ॥ १४ ॥ पीतोत्पलदल गौरवर्ण ॥ तैसा मल्हारी चंडांशकिरण पीतांबर धर पीत वीरकंकण ॥ श्रीखळनाथें बांधिलें ॥ १५ ॥ नळदुर्गादि मल्याळ बारामल्हारी ॥ मंगशोळीश गुडपाल पेंबरी ॥ मणिमल्ल मर्दोनि गडजेजूरीं ॥ राज्य तुवां करावें ॥ १६ ॥ पीतवसन पीतसुमन ॥ पीततिलकांकित कंठाभरण ॥ पीतकुंडलें मुद्रिकासुवर्ण ॥ पीतदुसरा शरीरीं शोभला ॥ १७ ॥ नानाळंकार चित्रभूषणें ॥ नाथ गौरविला सन्मानें ॥ सप्तकोटि तीव्रगण घेऊन ॥ बारामल्हारीसी पातला ॥ १८ ॥ तेथें नारदाची झाली नारदी ॥ प्रभव विभव साठी संवत्सरादी ॥ पुत्र प्रसवला मनन शब्दीं ॥ नारदी प्रसिद्ध मल्याळदेशीं ॥ १९ ॥ मैराळदैत्य मारोनि मल्याळदेशीं ॥ मैराळ नाम तैं पासोन मार्तंडासी ॥ त्यावरी येऊन पालपेंबरीसी ॥ जेजूरीसी मणिमल्ल मर्दिला ॥ २० बारामल्लारा पासोनि ॥ पुरंधरा पर्यंत ज्यांनीं ॥ रत्नासुराच्या मल्लें व्यापिली धरणी ॥ मल्ल मर्दोनि मार्तंडभैरवें ॥ २१ ॥ जेजोरी पर्यंत बैसविलीं ठाणीं ॥ मणिमद्र मल्लभद्र हे दोन्ही ॥ जेजोरीचे गडपट्टणीं ॥ मणिभद्रासी मर्दिलें ॥ २२ ॥ मल्ल संहारिले ह्मणोन मल्लारी ॥ युद्ध करोन घोरांदरीं ॥ माणि मर्दिले ते कथा विस्तारीं ॥ मल्हार माहात्म्यीं कथिली असे ॥ २३ ॥ ह्मणोन सारांश कथनार्थ ॥ यदर्थी बोलिला खळनाथ ॥ केदारखंडींचा एकश्लोक संमत ॥ मार्त्तंडभैरव कीर्ति वदलासे ॥ २४ ॥ असो मणिमल्ल ह्मणोनि मल्हारी ॥ वाजविताझाला प्रस्थान भैरी ॥ दूत धाडिले भैरवभारीं ॥ हिमकेदारासी कळावया ॥ २५ ॥ रत्नासुराचे मणिमल्ल दोघे ॥ महायोद्धे वीरअमोघें ॥ बारामल्याळीं वधितां ज्याप्रयासीं वोघें ॥ वाहती भडभडासरिते परी ॥ २६ ॥ ऐसा असोन मार्त्तंडभैरवी

॥ मल्ल मर्दोनि उद्धरिली ऊर्वी ॥ नलदुर्गपाल पीतांबर जेजोरीं मिरवी ॥ जैसा अंबरीं रविप्रकाश ॥ २७ ॥ ऐसे परिसोन हिमकेदार ॥ आनंद भरित झाला सगुणसागर ॥ भरतें सज्जिलें भैरवभार ॥ भक्त सुधाकरा पाहोनियां ॥ २८ ॥ द्रोणागिरि हनुमंतें आणितां ॥ संतोष झाला श्रीरामचित्ता ॥ तैसाच मार्तंडभैरवनाथा ॥ भेद सर्वथा यदर्थीं नाहीं ॥ २९ ॥ श्री नाथ ह्मणे कमलेसी ॥ मणिमल्ल मर्दिला प्रतापराशी ॥ यळकोट ह्मणिजे सप्तकोटीसी ॥ आमुचे पृष्ठभागीं सावध असें ॥ ३० ॥ आजि मूळनक्षत्र असे जाण ॥ अवंदासुर युद्धीं पावेल मरण ॥ मीं जातसें भैरवीचमू घेऊन ॥ अवंदासुर वधावया ॥ ३१ ॥ ऐसें वदोन खळेश्वर ॥ तीव्र सज्जोन भैरवभार ॥ शक्तिदळेसी हिमकेदार ॥ श्रीमूळगिरीसी पातला ॥ ३२ ॥ श्रीमूळगिरि हे कानडीभाषा ॥ कंटकगिरि महाराष्ट्र सुरसा ॥ मोरलतीर्थीं परात्परपुरुषा ॥ सैन्यभारेसी येणें घडलें ॥ ३३ ॥ भैरवभारीं घोरगर्जना ॥ परिसोनि अवंदासुर पातला कंदना ॥ पर्वतासमान कृष्णवर्णा ॥ खदिरांगार नयनीं सांडितसे ॥ ३४ ॥ विक्राळशरीर भयानक ॥ नाथ देखतां दैत्य सन्मुख ॥ धनुष्य वाहोनि शतसायक ॥ विद्युत्प्राय सोडिले ॥ ३५ ॥ अग्नि वात पर्वत पर्जन्य गिरी ॥ वर्षला समरीं बद्रिविहारी ॥ अवंदासुर महा भयंकरीं ॥ घोरसंग्रामीं मिसळला ॥ ३६ ॥ अवंदासुर महा पराक्रमी ॥ मागें पाय न ठेवी संग्रामीं ॥ श्रीनाथ झाला बहुत श्रमी ॥ युद्ध करितां प्रतापें ॥ ३७ ॥ अजिंक्य जाणोनि अवंदासुर ॥ युद्धार्थी चिंती बद्रिविहार ॥ ह्मणे यमाई येई येई अतित्वरें ॥ माये यमाये या रणांगणीं ॥ ३८ ॥ ऐसी ऐकोन सखेदवाणी ॥ यमाई पातली रणांगणीं ॥ नाथ ह्मणे यमाईये येक्षणीं ॥ तैसी वचनाकृति होवोन आली ॥ ३९ ॥ यमाई पडतांचि समदृष्टी ॥ अवंदासुर चमत्कारिला पोटीं ॥ ह्मणे तूं कोण वो गोरटी ॥ युद्धासाठीं पातलीस कां ॥ ४०

कामिनीसवें युद्ध न केलें कोणी ॥ करितां अकीर्ति होय त्रिभुवनीं ॥ न वाढे पुरुषार्थाची करणी ॥ परतोन जा-
य शशांकाननें ॥ ४१ ॥ ऐसें वदतां अवंदासुरीं ॥ ते अनादिमाया कौमारी ॥ होऊन पातली घटघुर्घुरीं ॥ प्रचं
डशरीरीं जाहली ॥ ४२ ॥ चामुंडेचा सहोदर ॥ हादुष्ट धाकुटा अवंदासुर ॥ असो युद्ध करावया धुरंधर ॥ सि
द्ध जाहला कृतांता परी ॥ ४३ ॥ देखोन यमाई भयासुर ॥ अवंदासुर भयाभीत फार ॥ धीर धरोन सामोर ॥
यमाई सन्मुख लोटला ॥ ४४ ॥ यमाई सन्मुख युद्ध दारुण ॥ चारीघटिका केलें पूर्ण ॥ त्यावरी यमाई सिंह-
गर्जनें जाण ॥ करोन त्रिविधाजाहली ॥ ४५ ॥ यमाई तुकाई मोकळाई ॥ जाज्वल झाल्या प्रचंडलद्दयीं ॥
शंख चक्र गदा धार्यी ॥ अवंदासुरासी वधियेलें ॥ ४६ ॥ अवंदासुर मर्दोन यमाई ॥ जयवंत केदार केला वि-
जयी ॥ पुष्पें वर्षती सुरसमुदायीं ॥ केदारविजयी होय सदा ॥ ४७ ॥ आतां रत्नासुर रक्तभोजना ॥ वधावया
जाई नाथनिरंजना ॥ सवें घेऊनि अष्टादशभैरव पद्मसेना ॥ नवनाथ नवलक्ष सिद्ध षोडशचक्रीं ॥ ४८ ॥ ल-
क्ष्मीसी नवकोटि कात्यायनी ॥ सप्तकोटि अमरवाहिनी ॥ गण गंधर्व पैगंबर मुनी ॥ नव्वदलक्ष ऐंशींहजार ॥ ४९
साधु खताल नवलक्ष हजार ॥ अलंप्रभू धुळकटेश्वर ॥ अरुणाचल नाम अळतेंनगर ॥ परशरामालिंगाकार तेथें
॥ ५० ॥ करवीर योगदंडाचे वारें ॥ झगटतां कैंचा शरीराकार ॥ तुह्मीं गुप्त करवीराचीं अष्टद्वारें ॥ रोधोन
सावधान असावें ॥ ५१ ॥ हिमागिरीची हिमाचळ लहरी ॥ धाडावी पुढें संह्याद्रीवरी ॥ ते देखतां रत्नासुर र-
क्तभोज असुरीं ॥ थरारिजे निजमानसीं ॥ ५२ ॥ देवीं बळप्रताप दाऊन असुरां ॥ वधावें समरीं निशाचरां ॥
जय लक्ष्मीसीं नांदावें हिमकेदारा ॥ सगुणसागरा ज्योतिर्लिंगा ॥ ५३ ॥ लक्ष्मी चर्पटअंबा आणि तुकाई ॥

तुर्ते साह्य असेंगा शेषशायी ॥ ऐसें वदतांचि यमाई ॥ वंदिली समारंभेसी आदरें ॥ ५४ ॥ भैरवभारीं जयजयकार ॥ निशाणी दुंदुभिचा गजर ॥ पूजा षोडशोपचारें श्रीकेदार ॥ अमरेंद्रा सहित करितसे ॥ ५५ ॥ शुद्ध सुमनाचे चंपकहार ॥ परिधान करविलें कनकांबर ॥ चिद्रत्नाचे अळंकार ॥ वद्रिविहारें लेवविले ॥ ५६ ॥ सुगंधादि हरिचंदन ॥ हळदी कुंकुम कर्णभूषण ॥ वांकी वाळे रुळेपैंजण ॥ अंदुनेपुरें रुणझुणती ॥ ५७ ॥ निंबें नारिंगें नारळ सोहं अमूप अमृतफळ ॥ अनादि कौमारीसी समर्पण सकळ ॥ सुफळितफळें भक्तमनकामनेसी ॥ ५८ ॥ ऐसी ऐकोनि केदारवाणी ॥ संतोषली शुंभनिशुंभ मंथनी ॥ मुळागिरिनिग निवासिनी ॥ मूळनक्षत्रीं यमाईनें दैत्य वधियेला ॥ ५९ ॥ ह्मणोन नाम श्रीमूळपीठ ॥ अष्टादश पीठांत परमश्रेष्ठ ॥ जिचें स्मरणीं महदारिष्ट ॥ हरोन हरती कष्ट संसारींचे ॥ ६० ॥ असो ऐसी लाहोन संकेतगोष्टी ॥ नवनाथ भैरवामर शतकोटी ॥ देवेंद्रा सहित तेतीसकोटी ॥ नवकोटि चामुंडा कात्ययनी ॥ ६१ ॥ पृष्ठभागीं मार्तंडभैरवीं ॥ चमू ठेविली जेवीं प्रभातें रवी ॥ असो ऐसिया सैनार्णवीं ॥ श्रीनाथ मंदराचळ गमतसे ॥ ६२ ॥ श्रीनाथ सैन्यार्णवींच्या लहरीं ॥ वाद्यध्वनि घनगर्जन अंबरीं ॥ गर्जत पातल्या सह्याद्रीपर्यंत ॥ ६३ ॥ कीं भैरवसेनार्णवींचा भडका ॥ आदळला सह्याद्रि दैत्य खडका ॥ हिमकेदाराच्या हिमाचा तडका ॥ शीतज्वर कडका व्यापिला दैत्यें ॥ ६४ ॥ शीतज्वराची चंडगरिमा ॥ साहूं न शकती दानवाधमा ॥ दैत्य पावले सकळाश्रमा ॥ ह्मणती जाज्वल गरिमा केदारची ॥ ६५ ॥ वातपित्त कफादि धनुर्वात ॥ शरीरशक्ति राहिल्या निवांत ॥ पूर्वाषाढामुखि होतांवांत ॥ दैत्य शांतीतें हें गमतसे ॥ ६६ ॥ हें पाहोन रत्नासुर मांत्रिक शाबरी ॥ प्रदीप्त केला अथर्वणीं वैश्वानरी ॥ राक्षसीमा-

या अतिदुर्धरी ॥ हिमज्वरताप निववीले ॥ ६७ ॥ रत्नासुर मैनागिरीवरी ॥ बैसला निशाचर परिवारीं ॥ तंव
वार्ता आणिली दूत चारीं ॥ श्रीभैरवभारींची ऐकावी ॥ ६८ ॥ मणिमल्ल मर्दोन मार्तंडभैरी ॥ राज्य करितसें पै-
गंबर जेजोरी ॥ अनादिमाया होऊनि कौमारी ॥ वैष्णवी रौद्री ब्राह्मी जाहल्या ॥ ६९ ॥ हाकमारितां केदारें य-
माई ॥ अवंदासुर वधोन केदार केला विजयी ॥ हें परिसोन संशय तोयीं ॥ असुरसमुदायीं पडियले ॥ ७० ॥
असो भैरवसैन्यासी अपरमित ॥ मूळपीठाहून रवळनाथ ॥ श्रीयालयीं असंख्यात ॥ भैरवी शक्तिसैन्यासीं उतर-
ला ॥ ७१ ॥ श्रीयालयीं उतरला दीननाथ ॥ लक्ष्मीसहित सुशोभित ॥ श्रीसी चर्पट अंबे सहित ॥ एकांत भुव
नीं बैसला ॥ ७२ ॥ अष्टभैरवासी नवनाथ ॥ भीमसैन्यासी प्रतापवंत ॥ बोलावोनि त्यांसीं वदत ॥ बद्रिविहार आव
डी ॥ ७३ ॥ हे भीमसेना प्रतातराशी ॥ सिद्ध करोनिदळभारासी ॥ जावोन वधावें गृध्रासुरासी ॥ घोर युद्धासी
करोनियां ॥ ७४ ॥ जैसा प्रचंड अवंदासुर ॥ तेसाचि दुसरा गृध्रासुर ॥ मायारूपी तो निशाचर ॥ परमयत्नीं तो वधा
वा ॥ ७५ ॥ ऐसें वदोन भीमसेना ॥ गृध्रासुरावरी धाडिला जाणा ॥ त्यावरी काळनाथासी वदेवचना ॥ हाटका
सुर वधार्थीं जायतूं ॥ ७६ ॥ कालिके सहित काळनाथ ॥ निघाला दौशकसैन्य दशशत ॥ हाटकासुर लक्षोन ब-
ळ अद्भुत ॥ पळाला कमंडलीनदीकासारीं ॥ ७७ ॥ येरीकडे भीमसेन ॥ गिरिजासुरावरी चालोन ॥ आला हें गृ
ध्रासुरें ऐकोन ॥ भीमावरी लोटला ॥ ७८ ॥ मग मल्लयुद्धासीं मिसळलां ॥ करतळीं धरोन पादयुगुला ॥ भीमा-
सी महींपाडितां प्रबळा ॥ द्विगुण बळार्थिला तो वासुकीवरें ॥ ७९ ॥ तो नवनाग सहस्रबळी ॥ पुनरपि मिसळ-
२३ ला केशकवळी ॥ गिरिजासुरधरोन कटिमंडळीं ॥ भूमंडळीं आपटिला ॥ ८० ॥ सावरोन उठला गृध्रासुर ॥ मल्ल-

युध्द केलें परमनिकुर ॥ दोष्ट्र विक्राळ खावोन अधर ॥ पुन्हा भीमासी कवळलें ॥ ८१ ॥ तें झिंजाडोन टाकिला गृध्ररावो ॥ सवेंच मस्तकीं गदाघावो ॥ भीमेंघालितांचि वर्मठावो ॥ गदाघातीं पाडियेला ॥ ८२ ॥ गिरिजासुर गदाघातीं ॥ भीमें वधिला भद्रजाती ॥ हे वार्ता संह्याद्रिपर्वतीं ॥ चारमुखीं विस्तारिली ॥ ८३ ॥ मायारूपीराक्षस क्रूर ॥ भीमें मारिला ज्येष्ठासुरसहोदर ॥ काळखंजन अनुजकुमर ॥ हाटकासुर पळाला ॥ ८४ ॥ अनिवार केदारभैरवीसेना ॥ श्रीयालयीं उतरली निर्भयमना ॥ हानिश्चयजरी रत्नासुर रक्तभोजना ॥ तरि बद्रिविहारें प्रळय मांडला ॥ ८५ ॥ श्रीदळा सहित हिमकेदारी ॥ सभेसी बैसला भैरवभारीं ॥ महावीर भारती ननापरी ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ८६ ॥ सैन्य समुदाय लक्षितां नयनीं ॥ क्षणैक दिसती विक्राळवदनीं ॥ क्षणैक भासती वानरवर्णी ॥ स्वेत बंदींजेवीं रघुनाथ ॥ ८७ ॥ शेष लक्षितां निश्चय मन ॥ यथार्थ भासे लक्ष्मण ॥ खळनाथतो रघुनंदन ॥ कोदंड शरासन सज्जिलें भासे ॥ ८८ ॥ अष्टादश भैरव भद्रजाती ॥ दृष्टि पडिले विशाळाकृति ॥ नळ नीळ सुग्रीवादि अष्टजुत्पती ॥ भासती भैरव अष्टादशपद्मीं ॥ ८९ ॥ पृथक् पृथक् घनगर्जन ॥ सर्वीं बांधिलें वीरकंकण ॥ ह्मणती जैसे रावण कुंभकर्ण ॥ घोरसंग्रामीं निवटिले ॥ ९० ॥ ऐसेंचि युद्ध करोनि अतिदारुण ॥ वधूं रत्नासुर रक्तभोजन ॥ ऐसी प्रतिज्ञा ब्रह्मांडभुवन ॥ भरोनि अपरमित उरविली ॥ ९० ॥ ऐसीं भैरवभारींचीं चिन्हें ॥ पाहोन आलों आपुल्या नयनें ॥ कृष्णावतारींच्या ही खुणे भैरवाकार देखिल्या ॥ ९२ ॥ केदार हाचि नंदकिशोर ॥ शेषावतार तोचि हलधर ॥ रक्तभोज रत्नासुर ॥ कौंस चाणूराऐसें वधीन ॥ ९३ ॥ जेवीं बाळपणीं शकटासुर ॥ मारिला करून लत्ता प्रहार ॥ तैसा वधीन रत्नासुर ॥ स्वशक्तिप्रहारें करोनियां ॥ ९४ ॥ जेवीं कौंसाचि-

या राजद्वारीं ॥ कुवलयपीठ कुंजरवधिला निकुरीं ॥ तैसे रत्नासुराचे रदन चत्वारी ॥ उपटीन गळगळ करावया कलियुगीं ॥ ९५ ॥ ऐसी अवतारचारित्रगरिमा ॥ दाविली आमुच्यानेत्रपद्मा ॥ हिमाचळींची अचळमहीमा ॥ तुह्मातें जेवीं दाविली ॥ ९६ ॥ ऐसी हेर मुखींची दुश्चिन्हवाणी ॥ रत्नासुर परिसोनिश्रवणीं ॥ चिंतार्णवींचा दौंशफणीं ॥ ऱ्हदयवर्मी झोंबला ॥ ९७ ॥ धैर्यस्तंभीं टेंकोनि असुर ॥ श्वास टाकी जैसा विखार ॥ रक्तभोजह्मणे निश्वयोत्तर ॥ भैरवचमूसी संहारीन ॥ ९८ ॥ तरीच नाम रक्तभोजन ॥ ह्मणोन वीर मिळविले बळसंपन्न ॥ करवीरासी धाडिलें सांगोन ॥ कोल्हासुरपुत्र योगदंडधारी ॥ ९९ ॥ बारालक्ष मल्ल वधिले बारामल्हारीं ॥ मणिमल्ल मर्दिले जेजूरीं ॥ नळदुर्गादि पालपेंबरीं ॥ पालाशन मार्तांडभैरवें वधिला ॥ १०० ॥ अनादि यमाई औंदमहर्ली ॥ औंदासी वधोन तेथेंच राहिली ॥ गध्रासुरासीही दिधली ॥ मुक्तिपदातें भीमहस्तीं ॥ १ ॥ श्रीयालयीं बद्रिविहारी ॥ श्रीसहित उतरला भैरवभारीं ॥ सदनें उभविलीं कनकांबरीं ॥ वरुणानदीतीरीं अपार ॥ २ ॥ श्रीयालयीं पासोन ब्रह्मनाळीं ॥ उभी राहिली भैरवफळी ॥ ज्वाला नगरीपर्यंत मायाकारें शक्तिदळीं ॥ प्राकृत जेलालपुरी ज्वाळा नरसिंह ॥ ३ ॥ असो श्रीयालयीं बद्रिविहारी ॥ श्रीसहितउतरला भैरवभारीं ॥ करवीराच्या पंचकोशावाहेरी ॥ जेवीं अष्टादशपद्मीं भैरवभार ॥ ४ ॥ ऐसा परिसोन समाचार रक्तबीज निघाला घनघोर ॥ येऊनि मैनागिरीवर ॥ रत्नासुरासी गौरविलें ॥ ५ ॥ रक्तभोजादि थोरथोर ॥ धीरोचन रुधिरोचन पुष्कर ॥ दैविलास्यादि ह्रैषासुर ॥ रक्तबीजें सन्मानिलें ॥ ६ ॥ वर्मकर्मानिवारण ॥ कथोन गौरविलें कनकाभरणेंजाण ॥ असो ऐसें वीरविवंचन ॥ युद्धदारुण दिसतसें ॥ ७ ॥ तोकथारस वीरश्री घनगडाडि ॥ युद्धसंधानीं विजयीं कडाडी ॥ असुर प्रे

ताच्या दरडी धडाडीं॥ संह्याद्रि परखडीतळीं पडतील ॥८॥ तें परिसावें द्वादशोध्यायीं ॥ बैसोन श्रोतीं मुनिगण समुदायीं ॥ कथा भविष्योत्तरींची केदारविजयीं ॥ तैसीच केदारखंडीं अवधारा ॥ ९ ॥ काशीखंडीं यदर्थी संमत ॥ पदोपदीं भविष्योत्तरीं गहनार्थ ॥ त्यांत केदारखंडींचे सुमनपदार्थ ॥ हरिखेंममतीं गुंफिले अ ंगीं ॥ १० ॥ इति श्रीकेदारविजय लीळा ॥ श्रवणार्थियां तारी सकळां ॥ ह्मणोनि हरिखें वरदार्थ उकलिला ॥ बद्रिनाथ विरचितां लिहितां यदर्थीं ॥ ११ ॥ कीं हा केदारविजय कल्पतरू ॥ पस्तीसअध्यायांचा हा विस्तारू ॥ दृष्टांत फळाचा सुमनसंभारू ॥ भावार्थफळींलवोनि आलारूपा ॥ १२ ॥ ऐसा केदारकल्पतरु तळवटीं ॥ श्रवणार्थी जेजे कल्पी पोटीं ॥ श्रीनाथ कर्ता ते ते गोष्टी ॥ एकादशोध्याय सेवोत गोडहा ॥ ११३ ॥ इति श्री केदारविजय ॥ मणिमल्लादि गृध्रासुर ॥ आणि अवंदासुर मर्दनोन्नाम ॥ भविष्योत्तर ॥ केदारखंड विरचितायां ॥ एकादशोध्याय गोडहा ११ श्रीकेदारार्पणमस्तु ॥श्रीरामजयराम ॥ ओंव्या ॥ ११३ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥


अध्याय १२वा
कालरात्रि
देवी
देविलासुर

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय द्वादश ज्योतिर्लिंग स्थापना ॥ दैत्य दानव उत्थापना ॥ द्वारका मन्मथ गोवर्धनोद्धारणा ॥ द्वापारीं भक्तमनोरथ विहारिया ॥ १ ॥ दानवांतक दनुजदमना ॥ दामोदर खड्गधर हयवाहना ॥ दाविसी संकेत कलंकीवहाना ॥ दासा रक्षिसी अक्षयीं ॥ २ ॥ ऐसा निर्गुणीचा सगुण अनादिपुरुष॥ सत्व रज तमीं त्रिशतमुखांश ॥ अवतरला खाग्निवेष ॥ श्रीखळेश्वर भैरवभारीं ॥ ३ ॥ श्रीनाथ भैरवाकार नटला ॥ दुरित दैत्यांसी पळ सुटला ॥ सोम शब्दार्थ समुळ खुंटला॥ आयुष्यतंतु तुटला दैत्यांचा ॥ ४ ॥ असो ऐसा बद्रिविहारी ॥ लक्ष्मीसहित चर्पटा दुसरी ॥ काळभैरवासी एकांतागारीं विचारविवरीं बैसले ॥ ५ ॥ खळेश्वर ह्मणे वारिजाक्षी ॥ दैत्य मरणार कवणाकरीं लक्षीं ॥ सर्वांतरात्मीं तूं साक्षी ॥ कै पक्षीं आमुची जननीये ॥ ६ ॥ चर्पटाहस्तीं दैत्यमरणें ॥ कवण तो पावेल वदावे संज्ञे ॥ काळरात्री इंद्रायणीनें ॥ कवण तो निशाचर वधावा ॥ ॥ ७ ॥ परिसोनि खळेश्वराची वाणी । उत्तर वदे ते विष्णुरमणी प्रारब्ध लिखिताची कहाणी ॥ अविद्या सौभान संतो वदेल विस्तारीं ॥ ८ ॥ यश लाभ मृत्यु हानी ॥ हे ब्रह्मलिखिताची परम शिराणी ॥ ते वाचणार सटवाई चतुर शहाणी ॥ हे खड्गपाणी जाणपां ॥ ९ ॥ हें परिसोनि हिमकेदार ॥ हास्य करोनि वदे उत्तर ॥ ह्मणे मीं नव्हें तो दशकंधर ॥ सटवाईसी विचारावया ॥ १० ॥ कमला ह्मणे तैं नाथनिरंजना ॥ ऐसी न करावी अकल्पी कल्पना तूं योगीमानस मनरंजना ॥ सर्व ही खुणा तुज ठाउक या ॥ ११ ॥ परिसोन श्रीकमलेचें उत्तर ॥ प्रत्युत्तर वदे हिमकेदार ॥ काळरात्रीनें युद्धीं निकुरें ॥ देवि लास्यासी वधावें ॥ १२ ॥ इंद्रायणीनें ह्मैषासुरा ॥ युद्धीं वधावें परमनिकुरा ॥ सिद्धचक्रें वधावें सिंधुराजनिशाचरा ॥ घोरप्रतापीं संग्रामीं ॥ १३ ॥ मैनागिरिच्या सभोंवते ॥ राक्ष

स असती असंख्यात ॥ कुंभासुर काळभैरवहस्तें ॥ कृष्णा वरुणा संगमातें संग्रामीं ॥ १४ ॥ असो जें जेसमयीं सम
योचित ॥ तेंतें करावें विचारोक्त ॥ प्रस्तुत देविलाख्य वधार्थ ॥ काळरात्रीसी धाडिजे ॥ १५ ॥ काळरात्री
सी विष्णुरमणी ॥ ह्मणे देविलाख्य वधावा घोरकंदनि ॥ सन्मानितां ते वस्त्राभरणीं ॥ वाद्यध्वनीसी निघाली ॥ १६
हें देविलाख्य परिसोनी ॥ सिद्ध झाला राक्षसीवाहिनी ॥ तों काळरात्री पातली घनगर्जनीं ॥ देवाळेसीं सक्रोधें ॥
१७ ॥ देविलाख्य सह चमूसी ॥ सन्मुख पातला विक्रालवेषी ॥ न्याहाळोन पाहतां शक्तिसैन्यासी ॥ देविलाख्यें
काळरात्रीसी लक्षिलें ॥ १८ ॥ ह्मणे हे काळरात्री शुभानने जाण ॥ कैसें करिसी घोरकंदन ॥ कामिनीसवें युद्ध
दारुण ॥ केलिया प्रताप कवणवर्णी ॥ १९ शक्ति धाडोनि संग्रामासी पुढें ॥ नाथ राहिला मागिल्या कडे ॥ कीं
त्याचें चालेना कुंचर घोडें ॥ ह्मणोन मागें पुढें पहातसे ॥ २० रत्नासुर रक्तभोजन ॥ त्यांचें युद्ध अतिदारुण ॥
ज्यासी सन्मुख देखतां नयन ॥ कृतांतसदनाचि पाहावें ॥ २१ ॥ विरंची हरिहर अवतार ॥ धरिका व्यर्थ हा बडि
वार ॥ भुवनत्रयीं नसमाय थोर ॥ तरी कां अजोन न देखों ॥ २२ ॥ चामुंडचा ज्येष्ठ सहोदर ॥ अवंदासुर म-
हाक्रूर ॥ युद्ध करितां शस्त्रप्रहार ॥ बद्रिविहारी श्रमी जाहला ॥ २३ ॥ रत्नासुराचा बैसला प्रतापकडका ॥ दुस
रा रक्तभोजन वीजेचा तडका ॥ कीं गृध्रासुराचा बैसला धडका ॥ ह्मणोनि संग्रामासी नये नाथ ॥ २४ ॥ आतां
आलेनी पंथें जावें ॥ नाथासी आमुचें अभयद्यावें ॥ सर्व जीव घेवोन जावें ॥ बद्रिकाश्रमासी मागुती ॥ २५ ॥
पौगंडऋषीनें एक ब्रह्मकल्प ॥ तप केलें पुत्रार्थीं धरोन संकल्प ॥ वृद्धपणीं नाथ पितृव्यासी विकल्प ॥ पडे ऐसें
न करावें ॥ २६ ॥ भीमाशंकरीं रुधिरोचनें ॥ वदला संपूर्ण शब्दरत्नें ॥ कुंडलाकृति घालितां श्रवणें ॥ मिरवत

असतील डोळसे ॥२७॥ ऐकोन देविलास्याची वाणी ॥ काळरात्रीवदे कृत्रिमपणीं ॥ बद्रिनिवास हळुवटपणीं ॥
मानिसी अधमा शतमूर्खा ॥ २८ ॥ विरंचीनें विश्वनिर्मिलें ॥ विष्णूनें विश्वपालन केलें ॥ त्रिपुरांतकें संहारिलें ॥ वि
श्वप्रळयीं पामरा ॥ २९ ॥ त्रिगुणगुणाची सामर्थ्ये करणी ॥ ऐसा सत्व रज ऐक्यतमोगुणी ॥ होऊनि अवतरला
खड्गपाणी ॥ त्रिभूवनीं ज्याची एक आज्ञा ॥ ३० ॥ जो दृष्टि करितांचि बांकडी ॥ पाडील ब्रह्मांडाची उतरंडी ॥
तेथें रत्नासुर रक्तभोज माकडीं ॥ ते कृतातदरडींत पडतील ॥ ३१ ॥ वाजीवाहन अवलोकन ॥ करीं खड्ग त्रि
कोश करून ॥ येईल तेव्हां पाहातांचि नयन ॥ कर्कोटा कोठवरी पळसील ॥ ३२ ॥ तूं बोलिलासी सर्व जीव जा
वे घेऊन ॥ ह्मणसी बद्रिकाश्रमा करावें गमन ॥ तुह्मांसी तेथेंचि दुर्लभ राहणेंजाण ॥ सुकृताचरणें पाविजे॥३३॥
दुष्कृतासीं अप्राप्त बद्रिकाश्रम ॥ हें निश्चयें मानीरे असुराधम ॥ तुज साहित रत्नासुर वैवस्वतधाम ॥ बोळविणें स्व
शक्तिहस्तें ॥ ३४ ॥ रत्नासुर समुदायीं रक्तभोजनासी ॥ मृत्यूनेंसांगितलें आमंत्रणासी ॥ ह्मणोन तुवां यमभुवना
सीं ॥जावोनि बैसावया स्थळ पाहावें ॥ ३५ ॥ असो तूं तंव राक्षस पापखाणी ॥ तुजलागीं न वधी खड्गपाणी ॥
ह्मणोनि तूतें वधावया रणांगणीं ॥ मीच पातलें रे पामरा ॥ ३६ ॥ शतसहस्र निशाचरांचें बळ ॥ तूं मानिसी
निर्बळ ॥ परीतुझा मृत्यु आला नकळेजवळ ॥ माझिया शस्त्रजाळें करोनी ॥ ३७ ॥ तुजलागीं वधावया कारणें
॥ येथवरीझालें माझें येणें ॥ हें परिसोनि निशाचरगणें ॥ सहित सन्मुख पातला ॥ ३८ ॥ गदा घेऊनि तीव्रह-
स्तीं ॥ देविलास्य लोटला भद्रजाती ॥ तैं काळरात्रीनें निघातीं ॥ गदा छेदिली हस्तींची ॥ ३९ ॥ गदाघाय
२४ वृथा गेला ॥ गर्जोनि देविलास्य बोलिला ॥ वदन पसरोनि भयानक धांवला ॥ ग्रासावया काळरात्रीतें ॥ ४० ॥

राक्षसीमायार्णव भयंकर ॥ ज्यावदनींमातील शत गिरिवर ॥ ऐसें रूपधरूनि श्यासुर ॥ काळरात्रीवरी ॥ धांविन्न ला ॥ ४१ ॥ हें लक्षियेलें काळरात्रीं ॥ बाण काढिला पावकवक्त्री ॥ कोदंडीं लावोनि बीजमंत्रीं ॥ राक्षसा वरुता सोडिला ॥ ४२ ॥ तें शब्द करोनि घर्घराटी ॥ रागें वळोनि वज्रमुष्टी ॥ बाण खंडिला तडतडाटी ॥ हस्तप्रहारें राक्षसें ॥ ४३ ॥ सर्वेचि पट्टिश घेऊनि निशाचर ॥ रागें धांवला शक्ति सामोर ॥ पट्टिश फिरवित चक्राकार ॥ क्रोधें भयंकर पातला ॥ ४४ ॥ काळरात्री जेजे बाणसोडी ॥ तेते पट्टिशधारें तोडी ॥ मेघनादातुल्य गडाडी ॥ खडबडिली तैं शक्तिसेना ॥ ४५॥ काळरात्री काळेश्वरीं ॥ असंख्य वर्षली पावकशरीं ॥ तेणें ती चमुनिशाचरी ॥ दग्ध जाहली अनिवार ॥ ४६ ॥ सर्वेचि विंधिला वज्रास्त्र बाणीं ॥ पट्टिश उडविले करच्छेदूनी ॥ कुठार शरतें स्वजोनी ॥ एक भुज खंडोनि पाडिला ॥ ४७ ॥ भुज छेदितां राक्षस ॥ पर्वत घेवोन पातला रोषें ॥ तैं वज्रास्त्रें गिरि तिळांशें ॥ चूर्ण करोनि सांडिला ॥ ४८ ॥ ऐसा संग्राम एक सप्तक ॥ झाला तेव्हां प्रतापार्क ॥ राक्षस अस्ता जातसे अतिकौतुक ॥ काळरात्रीचें तें ऐका ॥ ४९ ॥ तैं काळरात्रीनें परम निकुरें ॥ राक्षस विंधिला सहस्त्रशरें ॥ शतबाणें छेदिलें शिर ॥ थोर संग्राम करोनियां ॥ ५० ॥ असो देविलास्यमस्तक पडतां धरणीं ॥ पुनरपि उडालें ऊर्ध्व गगनीं ॥ गर्जना करित विक्राळवदनीं ॥ मैनागिरीवरी पडियलें ॥५१॥ ह्मणे रे परिसें रक्तभोजना रत्नासुरा ॥ युद्ध करोनि घोरांदरा ॥ काळरात्रीचा मनोरथपुरा ॥ पूर्ण केला संग्रामीं ॥५२ ॥ काळरात्रीचें यथार्थनाम ॥ केला करील दारुण संग्राम ॥ तुह्मीं सर्व दैत्य अनुक्रमें ॥ मरण पावला नाथस्वशक्तिकरें ॥ ५३ ॥ सामान्य नव्हे वद्रिविहारी ॥ तुह्मांतें वधवील स्वशक्तिकरीं ॥ हें मानी निश्चयें निर्धारीं ॥ असुर परिवारीं परिसावें ॥५४॥

अनादिपुरुषाची इच्छाकामिनी ॥ त्या ह्या नवकोट कात्यायनी ॥ यांचिया करें मृत्यु आमंत्रणीं ॥ गोंविलें असे ब द्रिविहारें ॥ ५५ ॥ त्याची प्रतिज्ञा अत्यद्भुत ॥ स्त्रियेचे हस्तें वधवीन सत्य ॥ तरीच नाम खळनाथ ॥ हें सत्य सत्य दैत्यचक्रीं ऐकावें ॥ ५६ ॥ स्त्रियेचे हस्तीं पावतां मरण ॥ याहून लाज ती कवण जाण ॥ सहजीं कैसें दाखऊं वदन ॥ ह्मणोनि निर्जीव वदनीं हें सांगु पातलों ॥ ५७ ॥ तुह्मीं ही शक्तिहस्तें मरणार ॥ हेंचि वदावया पातलें शीर ॥ सारांश त्रयमूर्तीचा अवतार ॥ अजिंक्य जाण त्रैलोकीं ॥ ५८ ॥ ऐसें देविलाख्यशिरकमळ ॥ रणांगणीचें वर्तमान सकळ ॥ वदतां आश्चर्य राक्षस पाळ ॥ रत्नासुरादि मानिती ॥ ५९ ॥ तें रुधिरोचन ह्मणे असुरांतें ॥ हें अनादिपुरुष मायेचें कृत्य ॥ देविलाख्य रणीं पातला मृत ॥ देवाळेनगरीं प्रतापी ॥ ६० ॥ जळीं स्थळीं काष्टीं पाषाणीं ॥ अणुरेणु व्यापकत्व खड्गपाणी ॥ अलिप्त असे विश्व सृजोनी ॥ स्वतंत्र जो हा खळनाथ ॥ ६१ ॥ रत्नासुराची आज्ञा घेऊनी ॥ भीमाशंकरासी स्वयें जाऊनी ॥ तुमचा पराक्रम विस्तारोनी ॥ वदलों उत्कर्षें ते समयीं ॥ ६२ ॥ सजीव वदेल पुरुषार्थकरणीं ॥ परी निर्जीव वदेल हें न ह्मणे कोणी ॥ सजीवें अजीवें शस्त्रहननीं ॥ हिरण्यकश्यप मरेना ॥ ६३ ॥ ह्मणोनि प्रगटला नरहरी ॥ नखें करोनि उदर विदारी ॥ हें प्रख्यात पुराणांतरीं ॥ नरकेश्वरीं आख्यान ॥ ६४ ॥ तैसीच जाणावी हे ही परी ॥ मीं ही वदलों अमित वैखरी ॥ मायाचाळक बद्रिविहारी ॥ ह्मणोनि निर्जीव शिरा करवीं हें कथियेलें ॥ ६५ ॥ ऐसा अलिप्त हिमकेदारी ॥ गर्जत असे भैरवभारीं ॥ हें परिसोनि रत्नासुरीं ॥ रक्तभोजादि गजबजिले ॥ ६६ ॥ रत्नासुरासी ॥ ह्मणे रक्तभोजन ॥ ह्मणे शक्तीचें बळ असे दारुण ॥ काळरात्री हे कृतांत जाण ॥ देविलाख्यासी वधियेलें ॥ ६७ ॥

चामुंडेचा सहोदर ॥ तेजें प्रतापी वैश्वान्नर ॥ त्यासवें युद्ध हिमकेदार ॥ कारितां जर्जर जाहला ॥ ६८ ॥ व्याकुळ जाहला नाथ ते समयीं ॥ ह्मणे ये ये यमाई ॥ ऐसें बोलतांची केदारहृदयीं ॥ यमाईमूर्ति प्रगटली ॥ ६९ ॥ यमाईनें युद्ध निकुर ॥ करोनि वधिला अवंदासुर ॥ असो ऐसा पराक्रम करोनि थोर ॥ शक्तिबळें थोरावला ॥ ७० ॥ शक्तिप्रतापअळंकार ॥ लेइलाच वाटे बद्रिविहार ॥ शक्तीविरहित भैरवाकार ॥ नटेल सौदागर कैसेनी ॥ ७१ ॥ अनादिशक्तीचा करोनि अव्हेर ॥ दक्षिणेसी पातला रत्नासुर ॥ सवें घेऊनि भैरवभार ॥ ह्मणोनि उत्तरला श्रीयालायीं ॥ ७२ ॥ श्रीनाथाज्ञें संह्याद्रि तळवटीं ॥ गणेश पातला घ्यावया भेटी ॥ तंव दूत येवोनि सांगती गोष्टी ॥ श्रीगणपतीची परिसावी ॥ ७३ ॥ उंदीरीं चढोनि विघ्नेश्वर ॥ पाशांकुश पद्मधर ॥ बदरीफळ घेवोनि निजकरें ॥ मैनागिरीवरी चढियेला ॥ ७४ ॥ गुप्तस्वरूपीं पातला वरी ॥ प्रख्यात दिसे पर्वताबाहेरी ॥ एकविंशती आकारी ॥ मैनागिरीभोंवता बैसला ॥ ७५ ॥ कोठें बैसला कोठें उभा ॥ कोठें अभिन्नवकरी शोभा ॥ श्रीनाथ बदरीफळ हेरंभा ॥ दिधलें त्याचें नवल ऐका ॥ ७६ ॥ बदरीफळ पेरितांची गणेशकरीं ॥ तत्काळ बदरीवृक्ष जाहला गणेशदरीं ॥ हें प्रत्यक्ष बाहत्तरयुगाचे प्रथमप्रहरीं ॥ जन पहाती अद्याप कलयुगीं ॥ ७७ ॥ तया बदरीवृक्षाचे तळीं ॥ गणेश बैसला एकांतस्थळीं ॥ काय योजितो हृदयकमळीं ॥ ब्रह्मादिकांसी कळेना ॥ ७८ ॥ क्षणैक रूप लावण्य सुंदर ॥ क्षणैक दिसतसे भयंकर ॥ दृश्यादृश्य लंबोदर ॥ भासाभासी अभासीतसे ॥ ७९ ॥ ज्यांची जैसी भक्तिभावना ॥ त्यांतें तैसीच दावी रचना ॥ असो त्यावरी रक्तभोजना ॥ रत्नासुर वदतसे ॥ ८० ॥ आमुचे चंद्रसेनेचा जो कुमर ॥ महापराक्रमी पुष्कर ॥ सवें देवोनि ह्मैषासुर ॥ युद्ध कंदनासी धाडिजे ॥ ८१ ॥

आमुची कांता चंद्रसेना ॥ त्रिकाळज्ञानी चतुर संपन्ना ॥ पुष्कर जन्मकाळींची खुणा ॥ सांगितलीते ऐकावी ॥ ८२ ॥ एकवीससहस्रायुष्यी पुष्कर ॥ महायोद्धा धुरंधर ॥ युद्ध करोनि घोरांदर ॥ पराभवील खळनाथा ॥ ८३॥ चत्वारिदिवस करोनि कंदन ॥ जयवंत होईल स्वनंदन ॥ ह्मैषासुर हे दोघेजण ॥ युद्ध करावयासी धाडिजे ॥ ८४ ॥ ऐसें वदतां रत्नासुर ॥ रक्तभोज ह्मणे हें उत्तमोत्तर ॥ असो पुढील कथार्थ चतुर ॥ त्रयोदशोध्यायीं परिसावा ॥ ८५ ॥ कृष्णा वरुणा संगमी ॥ कुंभक नामा महापराक्रमी ॥ युद्धावर्ती होतांश्रमी ॥ काळभैरव वधील पुढारें ॥ ८६ ॥ ह्मैषासुरासी वधील इंद्रायणी ॥ हे केदारखंडींची सुरसवाणी ॥ ऐसेंचि भविष्योत्तरपुराणीं ॥ सूत शौनकाप्रती वदला असे ॥ ८७ ॥ संशय मानितील जे उदंड ॥ त्यांनीं पाहावें ब्रह्मोत्तरकेदारखंड ॥ अव्युत्पन्नाचा संशयखंड ॥ श्रीकेदारविजय श्रवण करितां ॥ ८८ ॥ विद्वजन ब्रह्मवेत्ता ॥ आत्मानुभवी नवरस भरिता ॥ दुषण ठेवितील ग्रंथार्था ॥ दीर्घ न पाहतां यदर्थीं ॥ ८९ ॥ पाषांडी अविवेकी अगीर्वाणी ॥ दुरत्यय दुर्जन दुराभिमानी ॥ हे निंद्य पहिलेंचि हरिकीर्तनीं ॥ त्यांसी हरिकथानावडे ॥ ९० ॥ ऐसे सज्जन निंदक भले ॥ अपूर्ण ज्ञानमदें उगेंच फुगले ॥ ते यदर्थीं राहती उगले ॥ केदारविजय श्रवण करितां ॥ ९१ ॥ संत सज्जन परमार्थी ॥ स्वस्थ बैसोनि श्रवण करिती ॥ धन्य हें कर्ता नाथचि वक्ता ह्मणती ॥ संताप हरती तव बोलें ॥ ९२ ॥ आधींच केदार सगुण साकार ॥ कीं तो वरद कवींचा रत्नाकर ॥ तो तुज प्रसन्न झाला साचार ॥ सौदागर ज्यास ह्मणती ॥ ९३ ॥ जेवीं मातेची ह्यलेकुरें ॥ जननीसी बोलती बोबडीं उत्तरें ॥ हर्ष मानोनि दोनीकरें ॥ उचलोनि माता अंकीं बैसवी ॥ ९४ ॥ पुनरपि बोलें बोलें बोबड्या वचना ॥ ह्मणोनि जननी करी प्रार्थना ॥ आपणही वदे

बोले बोबडेपणा ॥ स्वबालकातें संबोधी ॥ ९५ ॥ बाळकें घेवोनि भलताचि थाया ॥ मागे कुंभातील सूर्या ॥ जननी त्यातें नाना उपाया ॥ रचोनि माय समजावी ॥ ९६ ॥ ऐसें तुझिये मनमोहरीं ॥ अहंममतार्थी मदमोहहारी ॥ सर्वां घटीं बद्रिविहारी ॥ व्यापोनि उरलें हें ज्योतिस्वरूप ॥ ९७ ॥ कीं तवत्हृदयमंदिरीं साक्षेप ॥ श्रीगुरुनाथें विज्ञानदीप ॥ लावितां प्रकाश अमुप ॥ दशखंडामाझि कोंदला ॥ ९८ ॥ ना ते दशेंद्रिय तेंचि दशखंड ॥ दाहावेंखंड तेचि शिरब्रह्मांड ॥ तेथेंज्योतिस्वरूप अखंड ॥ नांदे तोचि हा ग्रंथ बोलवी ॥ ९९ ॥ ऐसे संत सुधारसीं बोल ॥ सेवून हरिख पावला आमोल ॥ संतचरणकमळीं करी कल्होळ ॥ हरिभ्रमर केदारविजय कल्लोळी ॥ १०० ॥ इति श्रीकेदारविजयसार ॥ सेवितां हरती संतापसर्व ॥ हरिचंदनागर तुषार ॥ संतचरण रजत्रंदोन आर्चिती ॥ १०१ ॥ श्रीनाथाचिये वरदोत्तरें ॥ केदारविजय हाचि भविष्योत्तरें ॥ लिहिवितसे हरिमतिकरें ॥ द्वादशोध्यायार्थ गोडहा ॥ १०२ ॥ इतिहि केदार विजय केदार खंड ॥ भविष्योत्तर पुराण विरचितीयां ॥ द्वादशो ध्यायः ॥ १२ ॥ ॥ श्रीकेदारार्पणमस्तु ॥ ॥ ओंव्या ॥ १०२ ॥ ॥


अध्याय १३वा
कुंभासुर
कालभैरव
कोथळासुर

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ श्रीरवळेश्वरायनमः ॥ जयजयाजी अनाथनाथा ॥ आनंदघना विश्व भरिता ॥ अनंतावतार लीलाकृता ॥ अहंब्रह्मास्मिता तूंचि एक ॥ १ ॥ अनंतावतार माळिकेचे मणी ॥ त्यांमाजी तूंचिगा मुगुटमणी ॥ बाहत्तरयुगाचे प्रथमचरणीं ॥ खड्गपाणी अवतरलासी ॥ २ ॥ सद्भक्तिकरा विभक्तदमना ॥ भक्तकामकल्पद्रुम सुमना ॥ भरतखंडाग्रीं भैरवीसेना ॥ भक्तसहायासी आलासी ॥ ३ ॥ भजनीं लावावे विश्वजन ॥ भुवनत्रयीं लावावें स्वनिशाण ॥ भविष्य संह्याद्रि घालिजे ठाण ॥ भैरवीचमूसी निजबळें ॥ ४ ॥ रत्नासुरवधोत्सव करावा ह्मणोनी ॥ रक्तभोज वधावा निकरणीं ॥ ह्मणोनि रवळनाथ भैरववाहिनी ॥ घेऊन श्रीयालयीं उतरला ॥ ५ ॥ कनकांबराच्या मंटपांतरीं ॥ श्रीनाथ बैसला सहपरिवारीं ॥ तैं वार्ता आणिली धूर्तचारीं ॥ बद्रिविहारासी नमोनि वदती ॥ ६ ॥ कृष्णा वरुणा संगम तीर ॥ रक्षित बैसला कुंभासुर ॥ दहासहस्र निशाचर ॥ सिद्धझाले युद्धार्थीं ॥ ७ ॥ काळभैरवासी तयानें ॥ पाचारिलें युद्धाकारणें ॥ हें ऐकोनि अतिदारुण ॥ काळभैरव क्षोभला ॥ ॥ ८ ॥ आज्ञा मागोनि रवळेश्वरा ॥ सवें घेऊनि भैरवभारा ॥ सवेग पातला वरुणातीरा ॥ कृष्णासंगमीं घनघोर ॥ ९ ॥ इकडे काळरात्रीनें निकरें ॥ देविलास्य वधोनि निजकरें ॥ संह्याद्रीवरी तयाचे शिरें ॥ बद्रिविहाराची कीर्ति वर्णिली ॥ १० ॥ हे द्वादशोध्यायींची सुरसकथा ॥ विस्तारें परिसिली संतश्रोत्यां ॥ केदारविजय नवरस भरिता ॥ पुढील अनुसंधान परिसावें ॥ ११ ॥ सूत ह्मणे शौनकादिकां ॥ केदारविजय परिसका ॥ लक्ष्मी ह्मणे रवळनाथा कां ॥ अघटित वार्ता ऐकिली ॥ १२ ॥ रत्नासुराचा ज्येष्ठ कुमर ॥ महापराक्रमी असे पुष्कर ॥ सवें घेऊनि ह्मैषासुर ॥ युद्ध करावया येतसे ॥ १३ ॥ तुह्मांसवें करूनि कंदन ॥ श्रमी करील चत्वारिंदिन ॥ ह्मैषासुर वधा-

वा इंद्रायणीनें जाण ॥ ऐसें चिन्ह दिसतसे ॥ १४ ॥ हें परिसोनि खळेश्वर ॥ ह्मणे अंबे हा यथार्थ सार ॥ काळभैरवाहस्तें पुष्कर ॥ मरण पावेल समरंगणीं ॥ १५ ॥ आह्मांसवें तीनराती ॥ युद्धींश्रमी करील कुमती ॥ चौथे दिवशीं दक्षिणेसी सूर्यास्तीं ॥ पुष्करासी वधील काळभैरी ॥ १६ ॥ तंव अळसिद्ध ह्मणे केदारा ॥ कल्हाट कर्कोटभैरव दुसरा ॥ शंखभैरीजाण तिसरा ॥ यांणीं गुप्त समाचारार्थ वर्तावें ॥ १७ ॥ यवलुजीं असावे कल्हाटें ॥ दानवखेंडित असावें कर्कोटें ॥ शंखभैरवें बोभाट ॥ असुर निघतांचि करावा ॥ १८ ॥ ॥ हे कृष्णअवतारींच्यासौंगड्या ॥ ओळखी धरीं गा नाथगडिया ॥ वडजा पेंधा वांकडिया ॥ अत्यंत आवडी यांची तुज ॥ १९ ॥ परिसोनि अळसिद्धाचीं उत्तरें ॥ आलिंगिलें बद्रिविहारें ॥ गौरवोनि कनाकांबरें ॥ त्रिवर्ग त्रिस्थानीं ठेविले ॥ २० ॥ पाराशराचे पश्चिमोत्तरीं ॥ ह्मैषासुर बैसला दळभारीं ॥ तेथेंचि पुष्कर घनघोरी ॥ चमू परिवारीं पातला ॥ २१ ॥ पुष्कर ह्मणे हे रत्नासुरा ॥ चाल पाहूं बद्रिविहारा ॥ युद्ध करोनि भैरवभारा ॥ पराभवीन मीं प्रतापें ॥ २२ ॥ ह्मैषासुर ह्मणे हे राजकुमरा ॥ क्षणैक आतां धरोनि धीरा ॥ तीव्र सज्जोनी परिवारा ॥ स्वस्थानींच सावधअसावें ॥ २३ ॥ न पाचारिल्या विणें युद्धा ॥ करावया जातां पावसी वधा ॥ दीर्घ पाहूनि आचरतां खेदा ॥ कदाकाळीं न पावसी ॥ २४ ॥ आजि झाला सायंकाळ ॥ ह्मणोनि न होय उतावेळ ॥ तुझिये निढळीं लिहिलें अढळ ॥ तें सत्य होय चत्वारिदिवशीं २५ ॥ विधात्यानें तुझियाभाळीं ॥ लिहिली वेळ कवण टाळी ॥ काळभैरवाचिये करतळीं ॥ मृत्यु तुझा जाणपां ॥ २६ ॥ उदयीक पासोनि चत्वारिदिवस ॥ तूं पावसी गा प्राणनाश ॥ काय याहूनि विशेष ॥ पुष्करा तूतें काय बोलूं ॥ २७ ॥ ऐसें ह्मैषासुराचें उत्तर ॥ परिसोनि वदला पुष्कर ॥ युद्धीं जिंकूनि बद्रिविहार ॥

धन्य ह्मणवीन त्रैलोकीं ॥ २८ ॥ असुरयोनींत पावोनि जनना ॥ मग कासया भ्यावें पातल्या मरणा ॥ करोनियां घोरकंदना ॥ कीर्ति करावी आपुली ॥ २९ ॥ क्षणं चित्तं क्षणं वित्त ॥ क्षणैक मानवालागीं जीवित ॥ युद्ध करोनि व्हावें जयवंत ॥ श्रीरवळनाथादेखतां ॥ ३० ॥ रणागंणीं पावतां मरणा ॥ स्वर्गीं भोगाव्या सुरांगना ॥ जीवंत असल्या राज्यासना ॥ काय चिंता मरणें रणीं ॥ ३१ ॥ श्रीनाथाचे करीं मरण ॥ पावावें हेंचि असे प्रमाण ॥ होतें परंतु विधीचें लेखन ॥ कवणें विपरीत करावें ॥ ३२ ॥ काळभैरवाहस्तीं मरण ॥ पावावें हेंचि आतां प्रमाण ॥ असो आमुचें संचित क्रियमाण ॥ कार्यकारण तेंचि घडे ॥ ३३ ॥ ऐसा निश्चय धरोनि चित्तीं ॥ पुष्कर राहिला तेथेंचि वस्ती ॥ निशा सरतांचि गभस्ती ॥ उदयाचळीं पातला ॥ ३४ ॥ काळभैरवें करोन स्नान ॥ ह्रदयीं पूजोन नाथनिरंजन ॥ परिधान करोनि वस्त्राभरण ॥ भैरवीभार गौरविला ॥ ३५ ॥ महाघोष गर्जनीं ॥ काळभैरव रणांगणीं ॥ उभाराहिला प्रतापतरणी ॥ कुंभासुरासी वधावया ॥ ३६ ॥ हें पाहून कुंभासुर ॥ वेष्टित निशाचरपरिवार ॥ रूपधरोन भयंकर ॥ घोर युद्धासी मिसळला ॥ ३७ ॥ व्याघ्र जंबूक वृकानन ॥ सिंह शार्दूलासारिखें वदन ॥ पसरोन धांवले भिन्नभिन्न ॥ देह धरोन पर्वताकारी ॥ ३८ ॥ ऐसा देखून कुंभासुर ॥ अनिवार देखून निशाचर ॥ होवोन कल्पांत भेदाकार ॥ काळभैरव क्षोभला ॥ ३९ ॥ ह्मणेरे कुंभका हीनवर्णा ॥ महामूर्खा अंतर मळिणा ॥ माझिये बाणीं यमसदना ॥ अविलंबें पहावें ॥ ४० ॥ रत्नासुरादि रक्त भोजना ॥ ठाव पहावया करावें गमना ॥ ऐसें वदोनि शरासनां ॥ सहस्त्रसायक लावोनि ओढी ॥ ४१ ॥ काळभैरवें ओढितां कानाडी ॥ शर सोडितांचि घन जैसा गडाडी ॥ तेवीं भैरवचमू कडाडी ॥ शरकु


न्हाडी सुटले ॥ ४२ ॥ हस्तकमळें चरणकमळें ॥ भयानक राक्षसांचीं शिसाळें ॥ तुटोन महीं पडतां बंबाळें ॥ रक्तकल्होळ उसळती ॥ ४३ ॥ सांवरोनि निशाचरपरिवार ॥ युद्ध करोनि घोरांदर ॥ मार्गें सारिला भैरवभार ॥ काळभैरवा सहित ॥ ४४ ॥ कुंभासुर ह्मणे काळभैरवा ॥ शक्तीचा करीं धांवा ॥ भय नाहीं तुझिया जीवा ॥ तुमच्या देवा सांगों जाईं ॥ ४५ ॥ जें जाहलें तें बहुत बरवें ॥ बद्रिकाश्रमातें उठोनि जावें ॥ हेंचि नाथासी सन्मजोनि द्यावें ॥ शक्तीच्या नांवें विकूनको ॥ ४६॥ हें परिसोनि काळभैरव ॥ शब्दें गर्जवी ब्रह्मांड सर्व ॥ झाडोनि रत्नासुराचा मद गर्व ॥ शिरें छेदीन निशाचरांचीं ॥ ४७ ॥ दोनसहस्त्र पावकास्त्र बाणीं ॥ सोडोनि विंधिलें राक्षसगणीं ॥ सवेंच शतशिरातें त्यजोनी ॥ कुंभासुरासी वदतसे ॥ ४८ ॥ कल्पांतभैरव प्रचंडगरिमा ॥ कुंभासुर देखोनि पावला श्रमा ॥ निशाचरीचमू संग्रामा ॥ करितां समूळ आटली ॥ ४९ ॥ सहासहस्त्र निशाचर ॥ रणीं मर्दिला भैरवभार ॥ अशुद्ध गंगेसी आला पूर ॥ कृष्णासंगमीं मिसळला ॥ ५० ॥ शतबाणांच्यापंजरीं ॥ कुंभासुरासी खिळिलें समरीं ॥ तैं दैत्य दांत खाऊनि करकरीं ॥ बाणपंजर चूर्ण केला ॥ ५१ ॥ गदा घेऊनि दोहीं करीं ॥ मायारूपी द्विविधा शरीरीं ॥ कुंभासुर होवोन मागें पुढारीं ॥ काळभैरवासी वेढिला ॥ ५२ ॥ तैं सहस्त्रबाण छेदोनि तवकें ॥ छेदिलें गदेसहित हस्तकें ॥ शतबाणीं छेदोनि मस्तकें ॥ कुंभासुरासी वधियेला ॥ ५३ ॥ कुंभासुर नामा निशाचर ॥ काळभैरवें वधिलाकरें ॥ उदर फोडोनियां निकुरें ॥ दानव कोथळासुर खवळला ॥ ॥ ५४ ॥ कुंभासुराचें चिरितां उदर ॥ दोघे निघाले प्रचंड असुर ॥ दानवांतक कोथळासुर ॥ काळभैरवासी ते वदती ॥ ५५ ॥ ह्मणेरे काळभैरव ह्मणविसी वीरा ॥ श्लाघ्यता न मानीरे निज अंतरा ॥ साह्य केल्या बद्रिविहारा

॥ आह्मीं न सोडूंच सर्वथा ॥ ५६ ॥ ऐसें वदोनि घनघोर ॥ काळभैरवावरी लोटले धुरंधर ॥ खड्गधारें शरांगार ॥ काळभैरवाचा खंडिती ॥ ५७ ॥ पन्नगास्त्र पर्वत अग्नी ॥ सोडितां दग्धली भैरववाहिनी ॥ युद्ध करोनि दिवस दोनी ॥ अनेक अस्त्रींद्वय असुरें ॥ ५८ ॥ हें पाहोन काळभैरी ॥ त्रिशूळ पट्टिश खड्गधारी ॥ द्वय असुर छेदोन शरीं ॥ गदेसहित पाडिले ॥ ५९ ॥ खड्गधारें कुंभ मस्तक उडविलें ॥ नागनाथाचे सन्मुख पडिलें ॥ तेथें नागनाथें ग्राम वसविलें ॥ ह्मणती कुंभोध्वज या नांवें ॥ ६० ॥ ह्मणोनि कुंभज बोलतीं जन ॥ दानव कोथळी नामाभिधान ॥ अद्यापि कलयुगीं नांदतीजन ॥ केदारखंडाधार दृष्टांत हा ॥ ६१ ॥ निशाचरांचे भार सहस्रदहा ॥ शराग्नीनें करोन दाहा ॥ लंघिती निशाचर दाहा ॥ घायाळ काळभैरवबळें ॥ ६२ ॥ घायाळ वदती जाऊनि वचना ॥ अनिवार काळभैरवीसेना ॥ परिसें रत्नासुर रक्तभोजना ॥ अजिंक्य जाणा खळेश्वर ॥ ६३ ॥ जेवीं पूर्वी पंचगंगेच्या तीरीं ॥ केशीराक्षस केसापुरीं ॥ दहालक्ष सहाशत बाहत्तरी ॥ निशाचर भारा परिवारा ॥ ६४ ॥ ऐसा राक्षसकेशी परिवारा ॥ लांब रुंद योजनें बारा ॥ त्यासी जिंकावया कोल्हासुरा ॥ धाडिले देवीं सोळा कोटी ॥ ६५ ॥ सोळाकोटि परिवार ॥ घेऊन पातला कोल्हासुर ॥ केशीराक्षस वेढोन चौफेर ॥ युद्ध शत संवत्सर ॥ ६६ ॥ केशीराक्षस मारोन रणीं ॥ कोल्हासुर बैसला राज्यासनीं ॥ तैसेंच भासत आमुचें मनीं ॥ भैरववाहिनी हा नाथ आला ॥ ६७ ॥ केशी आणि कोल्हासुर ॥ युद्धीं आटले राक्षसभार ॥ तयांचा लक्ष्मीविजयीं विस्तार ॥ करवीर कोल्हासुराचा परिसावा ॥ ६८ ॥ करवीर कोल्हासुर केशीवाहिनी ॥ त्यांहून अधिक भैरव आणि खड्गपाणी ॥ उत्तरदिशे पासून पूर्व दक्षिणी ॥ भैरवचमूसी व्यापिलें वरुणातटीं ॥ ६९ ॥ असो वृक जंबूक वराह व्याघ्र ॥ मुख

पसरोन राक्षसांसी समग्र ॥ युद्ध करितां कृतांतमार्ग ॥ काळभैरवें दाखविला ॥ ७० ॥ दहासहस्र निशाचर ॥ रणीं आटिले करोन मार ॥ शेवटीं वधिला कुंभासुर ॥ मायारूपी जो राक्षस ॥ ७१ ॥ काळभैरव तो केवळ काळ ॥ प्रतापें जाळील ब्रह्मांडगोळ ॥ तेथें तुमचें राक्षसदळ ॥ जेवीं जातवेदीं तृणप्राय ॥ ७२ ॥ ऐसें ऐकोन दूतवचन ॥ चिंतार्णवीं निशाचरगण ॥ पडिले रत्नासुरादि रक्तभोजन ॥ विकल्प आवती उभय बंधू ॥ ॥ ७३ ॥ असो येरीकडे भैरवभारीं ॥ श्रीनाथ बैसला सभांतरीं ॥ तैं मात आणिली विजयोत्तरीं ॥ काळभैरव जयवंत जाहाला ॥ ७४ ॥ विजयध्वजा उभारून ॥ कुंजरभेरी घनगर्जन ॥ तैं काळभैरवें चमू घेऊन ॥ श्रीनाथचरण वंदिले ॥ ७५ ॥ तैं काळभैरवा उचलोन करीं ॥ आलिंगित हिमकेदारी ॥ गौरवोनि अमृतोत्तरीं ॥ कनकांबरीं पूजिला ॥ ७६ ॥ इंद्रायणीनें तदनंतर ॥ पाचारिला बद्रिविहार ॥ तुवां घेऊन स्वसैन्यभार ॥ ह्मैषासुरातें वधावें ॥ ७७ ॥ ह्मैषासुराचें जन्मांतर ॥ समूळ शोधी बद्रिविहार ॥ वेष नानाकृति निशाचर ॥ गुप्त प्रगट युद्ध करिती ॥ ७८ ॥ क्षणैक दिसेना दिसे कांहीं ॥ युद्ध करणार गुप्त देहीं ॥ नाना स्वरूप होऊन पाहीं ॥ घोरयुद्ध करील रत्नासुर ॥ ७९ ॥ ह्मैषासुराचें सांगोन मरण ॥ इंद्रायणीतें कनकाभरणें ॥ श्रीनाथें गौरविलें प्रेमसन्मानें ॥ लक्ष्मी ह्मणे ऐक इंद्रायणी ॥ ८० अनिवार दारुण ह्मैषासुर ॥ बहुत सावध असावें चतुर ॥ ज्वालामुखीसी परिवार ॥ चारसहस्र नेई सांगातीं ॥ ८१ ॥ संकटीं स्मरावी चोपडाई ॥ ती पावताचि युद्ध समयीं ॥ ह्मैषासुरासी यमाई ॥ तुझिया करें बोळवील ॥ ८२ ॥ इंद्रायणीनें परिसोनि वाणी ॥ ज्वालामुखीसी स्ववाहिनी ॥ निघाली जैसी तीव्र सौदामिनी ॥ जेवीं प्रळयकाळींची कडाडी ॥ ८३ ॥

इंद्रायणीचमूप्रळयलतिका ॥ नाथांबरांतून निघाली देखा ॥ गर्जे कडकडाट न धरोनशंका ॥ झैषासुर वधावया निघाली ॥ ८४ ॥ इंद्रायणीप्रतिज्ञेचा वारा झगटला झैषासुरा ॥ निस्तेज होतांति अवसरा ॥ चवकोनीं उठिला लगवगें ॥ ८५ ॥ चारघटका हस्तपाय ॥ निस्तेज झाला प्रतापसूर्य ॥ ह्मणे येवढें व्हावया आश्चर्य ॥ बहुतांदिवशीं कांझालें ॥ ८६ ॥ पुष्करासी ह्मणे झैषासुर ॥ तुवां निघावें अतिसत्वर ॥ सावध करावा रक्तभोज रत्नासुर ॥ मरण समीप पातलें ॥ ८७ ॥ नाना प्रकारें भविष्याचिन्ह ॥ पुष्कर ब्रोघोन धाडिलाजाण ॥ तों संह्याद्रीवरी जाऊन ॥ रत्नासुरासी वदे तें ऐका ॥ ८८ ॥ झैषासुर स्वप्नींच्या गोष्टि ॥ होणारा सारिखें दिसे दृष्टी ॥ अष्टादशादिसां सेवटीं ॥ एकवीसघटके मरण तुतें ॥ ८९ ॥ झैषासुराचे स्वप्नावस्थीं ॥ सर्व निशाचरांच्या विशाळकृती ॥ स्वराटझैषावरुती ॥ बैसले रत्नासुरादि रक्तभोजन ॥ ९० ॥ रक्तांबर परिधान करोनी ॥ रक्तचंदनें वपु चर्चूनी ॥ हार घातले रक्तसुमनीं ॥ रक्तांबूल वदनीं रंगलें ॥ ९१ ॥ ताम्रपात्रीं रक्तप्राशन ॥ करी निशाचरेसी रक्तभोजन ॥ झैषासुराच्या स्वप्नींचें चिन्ह ॥ यथार्थ होणार जाणिजे ॥ ९२ ॥ जेंजें मागें कथिलें-झैषासुरें ॥ तें तें घडोन आलें साचारें ॥ अष्टादशदिवशीं निशाचर ॥ तुह्मां सहित मृत्यु पावतील ॥ ९३ ॥ चर्पट अंबेच्या निज करें ॥ मृत्यु पावावें रत्नासुरें ॥ रक्तभोजनातें खळेश्वर ॥ युद्धीं भयंकर वधील ॥ ९४ ॥ पुष्करासी वधील काळभैरी ॥ सिंधुराजासी षोडशसिद्ध संहारी ॥ इंद्रायणी घोरसमरीं ॥ वधील झैषासुरासी प्रतापें ॥ ९५ ॥ ऐसें स्वप्नींचें भविष्योत्तर ॥ निश्चयें जाणून झैषासुर ॥ ह्मणोनि मजधाडिलें साचार ॥ यदर्थीं संदेह न धरावा ॥ ९६ ॥ ममप्रताप अचळागिरी ॥ भूषित तव चमूतरुत्ररी ॥ गर्वराजमदें संह्याद्रीवरी ॥ सुफळित भारीं शोभलासी ॥ ९७ ॥ श

क्तिकुठाराचे पुढें ॥ ब्रह्मांड होइजे शतखंडें ॥ श्रीनाथ मानिला तयातें दंडें ॥ तव चमू उदंड तरुवर खंडावया ॥ ॥ ९८ ॥ श्रीनाथ घेऊन शक्तिकुऱ्हाडी ॥ तंव निशाचरचमू सर्व झाडी ॥ तोडोन संह्याद्रीच्या दरडी ॥ सोज्वळ करील प्रतापें ॥ ९९ ॥ आज पासोन तुमचा जीवो ॥ समाप्त झाला निश्चयो ॥ तुह्मांतें आजपासोन क्षयो ॥ पातला वाटे रत्ना सुरा रक्तभोजना ॥ १०० ॥ चारीदिवस करून कंदन ॥ घावें करीन भैरवसैन्य ॥ खळनाथासी पराभवून ॥ प्रताप मिरवीन आपुला ॥ १ ॥ तुमच्या आमुच्या तपाचरणीं ॥ प्रसन्न झाला शूलपाणी ॥ ते प्रचीत दाखवूं रणांगणीं ॥ खड्ग पाणीसी आदरें ॥ २ ॥ सत्व रज तम एकाकार ॥ होऊन आला भैरवभार ॥ हें नवल नव्हेंचि थोर ॥ जमदग्नि अवतार जाज्वल ॥ ३ ॥ त्यामाजी केदारहस्तीं अमृतवाटी ॥ ह्मणोन करी कृपामृतदृष्टी ॥ भैरवसैन्यउठे तें कोट्यानकोटी ॥ युद्ध करावया पुनरपी ॥ ४ ॥ कुंभासुर युद्धीं घोरांदर ॥ एककोटि मारील भैरवभार ॥ तें नाथउठवील अमृततुषारें ॥ ह्मणोन काळभैरवें कुंभकवधिला ॥ ५ ॥ असो जमदग्नि अवतार ॥ धरोन पातला बद्रिविहार ॥ ह्मणोन काळभैरवें वधिला असुर ॥ देविलास्यादि गृध्रासुर ॥ ६ ॥ ऐसें ह्मैषासुराचें स्वप्नोत्तर ॥ पितयासी बोलिला पुष्कर ॥ हें परिसोन निशाचर परिवार ॥ चिंतार्णवीं पडियेले ॥ ७ ॥ असो पुढील कथेची ऐका सूचना ॥ केदारखंडीच्या श्लोकार्थ गहना ॥ इंद्रायणी मातंगमथना ॥ करील चतुर्दशोध्यायीं ॥ ८ ॥ इति श्रीकेदारविजय सारिता ॥ व्यास वर्षला नवरसभरिता ॥ पूर येतां लहरी अपर्मिता ॥ केदारविजयीं जयसागरीं सूचनार्थीं ॥ ९ ॥ तेथें तत्वानुभवी करितां स्नाना ॥ पंडित पातले अघमर्षणा ॥ हरिसंकल्प सांगतां होय कल्याणा ॥ त्रयोदशगुणीं अध्यायगोडहा ॥ ११० ॥ इति श्रीकेदारविजय ॥ भविष्योत्तरपुराणें केदार खंड ॥ ब्रह्मांडपुराण विरचितायां ॥ त्रयोदशोध्याय गोडहा ॥ १३ ॥ श्रीखळेश्वरार्पणमस्तु ॥ ॥


अध्याय १४ वा
श्री इंद्रायणी
देवी
महिषासुर

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीहिमकेदारेश्वरायनमः ॥ जयजय केदार सगुणसागरा ॥ केयूराणिमणिज्वलमनो-
हरा ॥ करुणार्णवा सौदागरा ॥ कंदर्पणयोग कमनीयस्वरूपा ॥ १ ॥ खगेंद्रवाहना प्रियकरा ॥ खड्ग हस्तीं रणरं-
ग धीरा ॥ खंदार लवण खदिरांगार संहारा ॥ खंजिरिटाक्षा करुणानिधी ॥ २ ॥ गंगोत्तरीधरा निगमागमा ॥
गंधार्चिता जघनीं भुजंगमा ॥ गंधर्वगायनीं रसोप्तती सुगमा ॥ गंध माल्यांबरधर प्रिया ॥ ३ ॥ घननीळ कलि-
वर सकुमारा ॥ घंटानाद उत्तम प्रियकरा ॥ घटिका पल निमिषार्धिपरा ॥ घटमठीं व्यापकत्व अलिप्ता ॥ ४ ॥
नवनाथवरदाप्रियशिखामणी ॥ नवार्णव जप प्रिय शिरोमणी ॥ नवांकितरूपा नवविध भजनी ॥ नवचक्रास-
नीं शोभसी ॥ ५ ॥ चंद्रार्ककुंडलें डोलती श्रवणीं ॥ चंचलांवरी कास कसोनी ॥ चंदनउटी शुभ्रवर्णी ॥ चर्चिली
घननीळ कलेवरा ॥ ६ ॥ छंदसारोच्छादांश करिता ॥ छत्र चामरीं शिर मंडिता ॥ छत्र सिंहासनीं विराजिता ॥
भक्तछत्र सम्रुद्धि संपन्ना ॥ ७ ॥ जन्मकर्ता जन्मसुखदा ॥ जन्मांतरवासा कवितावरदा ॥ जन्मनाशा अजन्मीं
अभयदा ॥ जन्मांतरोद्धारका ॥ ८ ॥ झशेष जंघनीं चपळाकृती ॥ झकारकार ॐकार श्रुती ॥ झशेंजरूपें अनु
स्मृती ॥ झणत्कार वेद स्फूर्ति मावळल्या ॥ ९ ॥ याकुंदेंदु स्पटिकांगभासिता ॥ याशुभ्र वस्त्रांबरअळंकृता ॥ या
खड्ग डमरु शूळ मंडिता ॥ यागसिध्यर्थ धृतावतारा ॥ १० ॥ टंकपात्र शुळ खड्गधरा ॥ टंकणी जगनग कांचनीं
अलंकारा ॥ टणत्कार कृत कार्मुकशरा ॥ टं बीजाक्षर प्रिय परमा ॥ ११ ॥ ठकिल्या अहं गोपस्त्रीया ॥ ठक पडि-
ले सहस्त्राक्षिया ॥ ठसा दैत्यांचा पावविसी क्षया ॥ ठरेना दैत्यमायाजाळ ॥ १२ ॥ डमरु अनुहाताची नादघायी
॥ डंब डिंब डमरु पाहीं ॥ डम डम पीट हड हड मही ॥ डळमाळित डामर स्थापका ॥ १३ ॥ ढकारध्यय ढवळे-

श्वरा ॥ ढवळरंगीं मुक्त सुमनोहरा ॥ ढळढळी शुक्र आणि अंगिरा ॥ ढकानीं कुंडलाकृति गुजसांगती ॥ १४ ॥ णणा णणी भणगा भणणा ॥ णणदिव्याळ क्रमण चरगा ॥ णणदीग्रामीं चंडांशकिरणा ॥ तनुद्भासित पावक शशांका १५ ॥ तत्वानुभवी तत्ववेत्ता ॥ तत्वार्थ सर्व दृश्य दृश्यार्था ॥ तत्ववित् विश्वंभर आलिप्ता ॥ त्वन्नाम तारक चिंतामणी ॥ १६ ॥ थकिता चित्तार्थ चित्तस्था ॥ थै थै तुरंगम सुशोभिता ॥ थरकंपित दनुजदमिता ॥ तव कीर्ति घोर घनगर्जे ॥ १७ ॥ दनुजदमनीं महाउद्भटा ॥ दशमुखांतका बळवरिणा ॥ दमघोषनंदन महदारिष्टा ॥ देणार तूंचि बद्रिविहारी ॥ १८ ॥ धनदो धनदाताच अकांचन जना ॥ धन्वंतरी कीर्तिय बळवर्धना ॥ धैर्यस्तंभीं नृसिंहवदना ॥ धन्य केलें प्रल्हादासी ॥ १९ ॥ न जाणती स्मरणार्चितपावनकरा ॥ न लक्षे अलक्षी लक्षी दिनकरा ॥ नर नारायण भैरवाकारा ॥ नवकिशोर पौगंडऋषितनया ॥ २० ॥ परा पश्यंति मध्यमा वैखरी विवरा ॥ परात्परा त्रयं बीजांकुरा ॥ पलार्ध व्यंजना दीर्घ ईश्वरा ॥ परोपकारार्थीं अवतरलासी ॥ २१ ॥ फल्गुतीर्थावगाहनप्रिया ॥ फल्गुनाप्रियकर त्हृदयालया ॥ फळ भक्षसी सदयत्हृदया ॥ फार उच्छिष्ट न ह्मणसी ॥ २२ ॥ बरवे कुब्जेसी अमृतोत्तरा ॥ बटुभैरव रवाग्निअवतारा ॥ बटु वामन नटनागरा ॥ बळ प्रतापदिनकरा दीनानाथा ॥ २३ ॥ भक्तकाममनोरथवल्ली ॥ भरतखंडाग्रीं अमूप फुलली ॥ भैरवभारीं पराक्रमें महूरली ॥ भजनीं सुफळली भावार्थफळें ॥ २४ ॥ मनकल्पित कल्पतरुवरा ॥ मन संतापत्रय संहारा ॥ मानसाकार मनमोहरा ॥ मकरध्वज निकेतना ॥ २५ ॥ यजन याजन अध्यापका दिवाकरा ॥ यजुर्वेद ऋग्वेद अथर्वण प्रियकरा ॥ यद्वैष्णव परमपद मुनिवरा यद्भावनाकार चेतसा ॥ २६ ॥ रकार ब्रह्मास्मि रवळेश्वरा ॥ रसचत्वारि भाष्यकारा ॥ रस प्रकृत प्रिय

कुसुमाकरा ॥ रसिककविता विचारितार्था ॥ २७ ॥ वकार विष्णुश्रीकरधरा ॥ वर्णाश्रम स्वधर्म निरंतरा ॥ वषट्कारी वर्म बीजाक्षरा ॥ वर्णोचारिया वंशकुरू ॥ २८ ॥ लंकारेश्वर भूसुरभूषणा ॥ लंकाप्रसाद देसी दशकंठदमना ॥ लंकापती करिसी बिभीषणा ॥ लज्जा रक्षिसी भक्तांची ॥ २९ ॥ लवणसमुद्रि स्वेताचळा ॥ लभ्य अलभ्य लाभ सुफळा ॥ लग्नतारा घटि पळ योग कर्ण फळा ॥ लक्ष्मीप्रियकरा रवळेश्वरा ॥ ३० ॥ सत्व रज तम ऐक्य सिंधू ॥ सर्वांतरात्मा तत्वार्थ बोधू ॥ सवित्कर्त्तार अनाथबंधू ॥ सच्चिदानंदस्वरूप वानू ॥ ३१ ॥ खदिरांगारादि कुंभासुर शासना ॥ देविलस्या लवण खंदार दमना ॥ खळबळीं विशिशत कबंधशयना ॥ खर दुषणान्वय उडविसी ॥ ३२ ॥ शतमखरक्षणार्थ अवतारा ॥ शेषासनस्था हिमकेदार ॥ सेतुबंधन महोदधी उत्तरा ॥ शरद्चंद्रार्क पूर्ण प्रकाशा ॥ ३३ ॥ हर हरि ब्रह्मा रवाग्निअवतारा ॥ हरि भोक्ता हा रवि प्रियकरा ॥ हं क्षं क्षराक्षर हंसपदविवरा ॥ हंसो हंस स्वरूपवान् ॥ ३४ ॥ क्षरा क्षरीं स्वर व्यंजना ॥ क्षयरहित वृद्धि निरंजना ॥ क्षमस्व अपराध दैत्यगंजना ॥ क्षण लव त्रुटि एकाग्रमानस कृता ॥ ३५ ॥ नमोस्त्वनंताय सहस्राक्षाय ॥ सहस्रपाद सहस्रशीर्षाय ॥ पद्भ्यां शूद्रो अजायताय ॥ तन्मेज्योतिस्वरूपाय नमः ॥ ३६ ॥ ऐसी बत्तीसाक्षरी सुमनमाळा ॥ गुंफोन हरिनामीं सोज्वळा ॥ आवडी घातली केदारगळां ॥ क्रमणपदतळा पर्यंत ॥ ३७ ॥ ऐसा ज्योतिस्वरूप अनादिपुरुष ॥ श्रीयालयीं उतरला भक्तमनोल्हास ॥ विभक्तहननार्थी जमदग्निरोष ॥ त्रयदेवात्मक अवतरला ॥ ३८ ॥ काळभैरवें कुंभासुरा ॥ मर्दिलें मायारूपी निशाचरभार ॥ रामकृष्णादि अवतारा ॥ चिंन्हें दूतीं कथियेलीं ॥ ३९ ॥ झैषासुराचें स्वप्न विस्तारें ॥ रत्नासुरासी वदलें पुष्करें ॥ तें परिसि

लें विस्तारें ॥ त्रयोदशोध्यायीं श्रोतेजनीं ॥ ४० ॥ चर्पटअंबेहस्तें मरण ॥ पावावें हें विधिलेखन ॥ ह्मणोन चित्त करी उद्विग्न ॥ रत्नासुर क्षणक्षणीं ॥ ४१ ॥ तें सर्वेचि उठिला रत्नासुर ॥ सीघ्र घेऊन राक्षसभार ॥ मैनागिरि भोंवते महावीर ॥ सावध करित चालला ॥ ४२ ॥ मैनागिरीचे पूर्वदिशे ॥ सिंधुराज रणकर्कश ॥ हे त्रिपंचसहस्र सैन्यास ॥ युद्ध निग्रहार्थीं ठेविलें ॥ ४३ ॥ साठीसहस्र पिशिताशन ॥ उत्तरदिशे ठेविले दारुण ॥ वीससहस्र निशाचरगण ॥ दानवखेंडींत ठेविले ॥ ४४ ॥ अठावीसलक्ष साठिसहस्र त्रिशते ॥ पराशराचे समोंवते ॥ निग्रह करून निवड क्रूर अद्भुतें ॥ ठेविले बलोन्मत्त गिरिवरजैसे ॥४५॥ त्यामाजीं ह्मेषासुर मुख्यधनी ॥ स्वाधीन केली तीव्र वाहिनी ॥ गौरवोनि वस्त्राभरणीं ॥ एकांतभुवनीं उभय बैसले ॥ ४६ ॥ ह्मेषासुराप्रती रत्नासुर ॥ ह्मणे ऐकगा सुविचार ॥ स्वप्न सांगितलें पुष्करें ॥ तें विस्तारोन मजला सांगीं ॥ ४७ ॥ चिंताज्वरें व्यापिलेंमन ॥ शक्तीच्या करें पाविजे मरण ॥ चर्पटअंबा असे कवण ॥ चोपडाई तीतें कां ह्मणती ४८ ॥ ह्मेषासुर ह्मणे रत्नासुरा ॥ क्षणैक स्वस्थ असावें चतुरा ॥ चंद्रानन वसूभुजकरा ॥ अष्टायुद्धासी धरियेलें ॥ ४९ ॥ चर्मन्वतीचेदक्षिणतीरीं ॥ चर्पटा विचरितां सह परिवारीं ॥ चर्व्हासुर आडवा पातला गजरीं ॥ मार्ग रोधिला शक्तीचा ॥ ५० ॥ हें पाहोन चर्पटअंबा ॥ युद्धा प्रवर्तली चंद्रार्कबिंबा ॥ जेवीं वधावया शुंभनिशुंभा ॥ विष्णुमाया जापरी ॥ ॥ ५१ ॥ तेचि रीति शक्तिसौदामिनी ॥ गर्जली संग्राम रणांगणीं ॥ नानाशस्त्रें शरसाधनीं ॥ युद्ध भयंकर करितसे ॥ ५२ ॥ पर्वतांसमान चर्व्हासुरें ॥ युद्ध केलें तीव्र निकुरें ॥ त्यावरी शक्तीनें निर्वाणशरें ॥ सप्तसायकें विंधिला ॥ ५३ ॥ ते अनिवार तीक्ष्णबाण ॥ ते चर्व्हासुरें स्वयें लक्षोन ॥ पळाला सोडोन रणांगण

॥ मायापुरीपर्यंत ॥ ५४ ॥ हरिद्वारस्वर्गांचीं प्रथमपायरी ॥ नाम प्रख्यात मायापुरी ॥ चव्र्हासुर पळाला तेथ-
वरी ॥ चर्पटअंबा आली तेथें ॥ ५५ ॥ मायानाम तृतीय मोक्षपुरी ॥ तेथें युद्ध करोनि घोरांदरीं ॥ चव्र्हासुरासी
संहारी ॥ सप्तार्णवशरीं चर्पटअंबा ॥ ५६ ॥ दैत्यचर्म काढोनि केली दुरडी ॥ चव्र्हासुराची मोडोनि नरडी ॥ म-
स्तक ठेविलें चर्मपरडीं ॥ नीळपर्वतदरडी बैसली ॥ ५७ ॥ तों वाद्यध्वनीसी भैरवभारीं ॥ निघाला घोषें बद्रि-
विहारी ॥ येवोन उतरला हरिद्वारीं ॥ तंव तेथें चर्पटअंबा देखिली ॥ ५८ ॥ भीमासी लेक्षोनि ह्मणे अंबा ॥ दुर-
डी उचलींगा विलंबा ॥ ह्मणे वृद्धार्क हे शशांकबिंबा ॥ तूंचि एकीकडे उठोन बैस ॥ ५९ ॥ ऐसें वदतां भीमसेन
॥ उत्तर वदे नाथनिरंजन ॥ अनादिपुरुषांचें हें अच्छादन ॥ हे शक्तिप्रावर्ण चर्पटा ॥ ६० ॥ वृद्धा नव्हे ते नृ-
सिंहकराळी ॥ कीं ते विराटस्वरूपाची कांबळी ॥ ब्रह्मांडशक्तीवरी सायंकाळीं ॥ उकलोन इच्या हातीं घातली ॥
॥ ६१ ॥ भाळीं नक्षत्रमौक्तिकजाळी ॥ चंद्रार्क ताटकें कर्णयुगुळीं ॥ ऐसें स्तवोन व्हदयकमळीं ॥ बद्रिविहारी व-
दतसे ॥ ६२ ॥ ह्मणे कोणहो वृद्धार्कबिंबे ॥ तूं काय करसील वो अंबे ॥ तुजविरहित विश्व जगदंबे ॥ दक्षिण
जय कल्याण कारिके ॥ ६३ ॥ नाथमुखींचें परिसोन वचन ॥ तथास्तु ह्मणे तुझें स्ववचन ॥ येमाई तुकाई होऊ
न ॥ त्रेतायुग झालें तव बोलें ॥ ६४ ॥ चव्र्हासुर वधिला चक्रालयीं ॥ ह्मणोन नाम माझें चोपडाई ॥ मी तुज
युद्धाचे संकटसमयीं ॥ सहाय होईन खळनाथा ॥ ६५ ॥ ऐकोन चोपडाईची अमळ गोष्टी ॥ नाथें बांधिली श
कुनगांठी ॥ मातें रक्षी कृपामृतदृष्टी ॥ दैत्यकपटी वधार्थ यावें ॥ ६६ ॥ गंडभैरवदेह सकुमारी ॥ कैसे जाज्वल
२७ दैत्य मारी ॥ तुझें स्वरूप बाळासकुमारी ॥ दानव समरीं केवीं वधसी ॥ ६७ ॥ ऐसी मात परिसोन ते समयीं

॥ विशाळ वाढली चोपडाई ॥ महदाकाशब्रह्मांडगेहीं ॥ उभि राहिली चर्पटअंबा ॥ ६८ ॥ जेवीं शतमुख वधा-
वया कारणें ॥ सीतेसीं आणविलें रघुनंदनें ॥ ते जाहली विशाळवर्ण ॥ एकादशीचे दिवशीं ॥ ६९ ॥ तैसी चर्प
ट विशाळस्वरूपा ॥ दावितसे जाज्वल ज्योतिस्वरूपा ॥ ह्मणे श्रीनाथराया बळप्रतापा ॥ संग्रामसमयीं तूज दा-
खवीन ॥ ७० ॥ अमृतपात्र तुझिये करीं ॥ झुंजतां दैत्यवृद्धि पावतील समरीं ॥ संकटीं स्मरतां मज केदारी ॥
दनुज अजिंक्य करीं निवटीन ॥ ७१ ऐसीं नाथासी अभयवचनें ॥ दिधलीं असे चोपडाईनें ॥ ह्मणोनि मुनिजन
मोहन ॥ श्रीयालयीं उतरला ॥ ७२ ॥ नाहीं करवीरयोगदंडाचें भय ॥ शक्तीवळें नाथ जाहला अभय ॥ करवी
र केशापुरांतूनि बाहेरनये ॥ ह्मणोन श्रीनाथ विजयी होतसे ॥ ७३ ॥ नाथसैन्यांत अपेशवंत ॥ तोरणभैरव हो-
ता कृतांत ॥ नाथें तुज करावया अपेशवंत ॥ त्वां तो जीवंत ह्मणोन आणिला ॥ ७४ ॥ तोरणभैरव अपेशरासी
शरण पातला रुधिरोचनासी ॥ त्यासी इच्छितां मरणासी ॥ दुषणासी लागतसे ॥ ७५ ॥ तोरणभैरव समरीं
किडदा ॥ धीरोचन वृथाचि हिडदा ॥ तंव असुरचमू समूळ गिडदा ॥ नाथें कडिदा शक्तिकुठारीं ॥ ७६ ॥ ऐसें
ह्मैषासुराचें भविष्योत्तर ॥ परिसोनियां रत्नासुर ॥ श्वास टाकी जैसा विखार ॥ हुंकारें गरळ वमितसे ॥ ७७ ॥
भूत भविष्य वर्तमान ॥ ठाउकें सर्व तुज पूर्ण ॥ मोहन मारण उत्पाटण ॥ किमपि न करिसी संग्रामीं ॥ ७८ ॥
ऐकोन रत्नासुराच्या बोला ॥ जेवीं घृतें वैश्वानर शिंपिला ॥ तेवीं ह्मैषासुर प्रदीप्तझाला ॥ रत्नासुरा वदत प्रता
पें ॥ ७९ ॥ आह्मीं पराक्रमी दानवीं सकळीं ॥ युद्ध करितां भैरवदळीं ॥ पराभवूं परी शक्तिची फळी ॥ न भंगे-
चि रणांगणीं ॥ ८० ॥ ह्मणोन संग्राम मनोरथवल्ली ॥ आयुष्यमंटपीं अमूप भरली ॥ ते स्वशक्तिकरें समूळ खुड

ली ॥ पूर्वी विधिलेखनार्थी खळनार्थे ॥ ८१ ॥ यास्तव संग्राम इच्छा ह्रदयीं ॥ खंडोनि गेली सबाह्य पाहीं ॥ या साठीं संशयाचे डोहीं ॥ पराक्रमचित्तें बुडाल ॥ ८२ ॥ तुजलागीं पडिलें पूर्व विस्मरण ॥ पूर्वजन्मीं तूं शतमुखरावण ॥ सीतेहस्तीं पावलासी मरण ॥ त्रेतायुगाचे अंती हनुमंतबळें ॥ ८३ ॥ दाशरथीपुत्र चंडांशकिरणी ॥ अवतार प्रख्यात रामायणीं ॥ पौलस्तिसंततिक्षय करोनी ॥ लंका दिधली बिभीषणा ॥ ८४ ॥ सीता घेऊन अयोध्यापट्टणा ॥ हरिखें पातला रामराणा ॥ तयानंतर बहुतेक दिना ॥ कुंभकर्ण पौत्र निघाला ॥ ८५ ॥ पौलस्तिसंततीचा एक तंतू ॥ श्रीरामें रक्षिला शरणांगतू ॥ रघुनाथवाक्य भंगावया सेतू ॥ कुंभकर्ण पौत्र निघाला कोपें ॥ ८६ ॥ तो निकुंभाचा षौड्रिक कुमर ॥ सवेग पातला मायापुर ॥ प्रवेशोनि राजद्वार ॥ शतमुखरावणासी भेटला ॥ ८७ ॥ संतती संपतीचा सागर ॥ ईश्वरभक्त दशकंधर ॥ ज्याचें सुवर्णलंकापुर ॥ बंदीं सुरगण ज्यानीं घातले ॥ ८८ ॥ ऐसा पूर्वजाग्रज गर्वनिधी ॥ रामें सहपारिवारें वधिला युद्धीं ॥ बिभीषण स्थापिला युद्धा आधीं ॥ ह्मणोन दशकंधर मारिला ॥ ८९ ॥ रघुनाथानें कांचनपुरीं ॥ बिभीषण केला राज्याधिकारी ॥ गोत्रज वधोन वानरकरीं ॥ हें पूर्वीं तुह्मां कळलें असेल ॥ ९० ॥ ऐसें वदतां निकुंभकुमर ॥ शतमुख खवळला वैश्वानर ॥ लंका घेऊनि केला राज्यधर ॥ कुंभकर्ण पौत्र त्वां केलासी ॥ ९१ ॥ हें सांगावया बिभीषण आला अयोध्या ॥ श्रीरामा तूं परम योद्धा ॥ शतमुखरावणें तुतें युद्धा ॥ आजि लंकेसीं बोलविलें ॥ ९२ ॥ त्वां मज दिधलें लंकापुर ॥ यावःश्चंद्रार्क उदयास्तु प्रखर ॥ तें विपरीत शतकंधर ॥ करोनि लंका घेतली ॥ ९३ ॥ ऐसें वदतां बिभीषण ॥ आवेशला रघुनंदन ॥ हनुमंतासी भीमरूप धरवून ॥ स्वसैन्य घेवोनि निघावें ॥ ९४ ॥

आजि शतमुख वधोनि राती ॥ उदयीक येईजे अयोध्येप्रती ॥ साधनी द्वादशीचिये रीती ॥ आमुची तुतें ठाउक
असे ॥ ९५ ॥ सूर्यउदय होतां जाणा ॥ वधोनि यावें शतानना ॥ लंकेसी स्थापोनि बिभीषणा ॥ अयोध्ये
सी भोजना घेवोन येई ॥९६॥ तरीच सूर्यवंशीं रघुनंदन ॥ एकपत्नीं एकबाण एकवचन ॥ हें परिसोनियां वायुनं
दन ॥ विराटस्वरूपी अवगला ॥ ९७ ॥ एकचरण शरयूतिरीं ॥ दुसरा दक्षिणपद मायापुरीं ॥ तैं रामलक्ष्मण स्कं
धावरी ॥ चमू परिवारेसी वळंघले ॥ ९८ ॥ मायापुरीं उतरोनि श्रीराम ॥ दारुण केला संग्राम ॥ दाशरथीस जा
हले बहुतश्रम ॥ शतमुखपराक्रमें नाटोपे ॥ ९९ ॥ अग्नि पर्जन्य पन्नग गिरि ॥ ब्रह्मास्त्र वज्रादि नानापरी ॥ नि
र्फळ होतां धनुर्धारी ॥ रामलक्ष्मण गजबजिले ॥ १०० ॥ तैं भविष्य जाणविलें आकाशवाणीं ॥ सीता आणो-
नि चंडांशकिरणीं ॥ ते वधील शतमुख समरंगणीं ॥ निश्चयेसीं रघुनाथा ॥ ॥१०१ ॥ ऐसा शब्द परिसोनि घ-
नघोर ॥ रामें प्रार्थोन रुद्रावतार ॥ तैं सीता आणावया गेलासत्वर ॥ वायुकुमर वातगती ॥ २ ॥ दक्षिणपाय हो
ता जो मायापुरीं ॥ तोचि ठेविला परतोनि शरयुतीरीं ॥ मंदिरीं प्रवेशला तैं सीतासुंदरी ॥ निद्रिस्त जाहली मंच
कावरी ॥ ३ ॥ निद्रिस्त जाहली रामरामा ॥ यालागीं रघुनाथ श्रमला वाटे रिकामा ॥ तरीच शतमुखास्त्रे युद्धीं
विरामा ॥ श्रीरामचंद्र पावला ॥ ४ ॥ शक्तिविरहित गेला रघुनाथ॥ ह्मणोनि शतमुखीं केला अनर्थ ॥ असो सी-
तामंदिर स्वसामर्थ्यें ॥ जयराम ह्मणोनि हातीं घेतलें ॥ ५ ॥ मंदिरासहित सीता करतळीं ॥ घेऊनि उड्डं पाहे अं
तराळीं ॥ तैं अहंकृतियोगें पडला भूतळीं ॥ भरतशराग्रीं जेवीं नंदिग्रामीं ॥ ६ ॥ तैं निरहंकृती होवोनि मारुती ।
ह्मणें त्राहें त्राहें अनादि भगवती ॥ शतमुखह्मैसा वधोनि आजिचे राती ॥ रघुनाथ जयवंत करावा ॥ ७ ॥ द्रौ

णाचळहोनि शतकोटी ॥ अनंतब्रह्मांड तुझिये पोटीं ॥ हळुवट व्हावें अवतार चरित्रपोटीं ॥ माझीयेसाठीं जननी ये ॥ ८ ॥ ऐसें स्तवन करितां करुणोत्तरीं ॥ सीता पुष्पप्राय भासली हनुमंतकरीं ॥ मंदिरासहित मायापुरीं ॥ हनुमंतें पुनरपि पाय ठेविला ॥ ९॥ विद्युत्पात जाहला अठरावेळ ॥ लंकेसी मिळालीं गोळांगुळ ॥ अठरापद्म वानरदळ ॥ कमंडलूंत मुद्रिका बाहत्तरवेळ पडली ॥११०॥ अठरा चोक् बाहत्तरीं ॥ नाथ अवतरला प्रथमप्रहरीं ॥ हें हनुमंतनाटकीं भविष्योत्तरीं ॥ जेवीं भारतीवाणी शतंभीष्म ॥ ११ ॥ ऐसेचि अनंत अवतार ॥ घेतले दीनानाथें उदार ॥ जैसा हनुमंतें आणिला गिरिवर ॥ तेवीं मंदिरोधर आणिला ॥ १२ ॥ हें पाहोनि रघुनाथप्रकृती ॥ अनादिदेवी करोनि जाग्रती ॥ तीव्रसंग्राम करोनि विक्राळशक्ती ॥ शतमुख वधिला सीतेनें ॥ १३ ॥ शतमुखासी वधोनि मायापुरीं ॥ बिभीषण स्थापोनि हेमनगरीं ॥ श्रीराम पातला अयोध्येसी गजरीं ॥ साधनी तैं करितां भोजन ॥ १४ ॥ असो तेचि सीता चंद्रार्कबींबा ॥ अवतरली पाळित विश्वकुटुंबा॥ ऐसी ते असे अनादिजगदंबा ॥ चर्पटअंबा चोपडाई ॥ १५ ॥ त्रेतायुगीं सीताचापधरा ॥ केलें शतमुख संहारा ॥ यदर्थी तैसेंचि तुज रत्नासुरा ॥ चोपडाई वधील स्वशक्तीं ॥ १६ ॥ रत्नासुरा तूं युद्धीं निकुरीं ॥ करिसील श्रमी बद्रिविहारी ॥ सहाय होईल ते अवसरीं ॥ चोपडाई खळनाथा ॥ १७ ॥ शक्तिदीपिका धरोनिहस्तीं ॥ शोधोनि नाथ मारील भद्रजाती ॥ जमदग्नीच्या आवर्ती ॥ दग्धजाहलीं राक्षसकुळें ॥ १८ ॥ येथें संशय न धरोनि मनीं ॥ आज पासोनि अष्टादशदिनीं ॥ चर्पटाहस्तीं घोरकंदनीं ॥ मरण पावसील रत्नासुरा ॥१९॥ आमुच्या मृत्यूचें वर्म सकळ ॥ नाथासी आहे करतळामळ ॥ असो तव वंश कंदरींचेंमूळ ॥ करील निर्मूळ श्रीनाथ ॥ १२० ॥ तुमचें आमचें तपाचरण

॥ एकचि फळलें अनुष्ठान ॥ तुझिये काजीं देहजाण ॥ देतां उत्तीर्ण होईन ते समयीं ॥ २१ ॥ आयुष्य तंतु तुटोनि गेला ॥ सहजचि विनोदहीखुंटला ॥ जन्मांतरीं अबोला पडला ॥ ह्मणोनि वदलों विस्तारें ॥ २२ ॥ आतां धैर्य धरोनि रणांगणीं ॥ वरद वाक्येंगोंवीं खड्गपाणी ॥ ठाव मागोन संन्निधानीं ॥ श्रीनाथ सन्मुख असावें ॥ २३ ॥ तूं शतमुखाचा अवतार ॥ नाम पावलासी रत्नासुर ॥ युद्धीं तोषवीं बद्रिविहार ॥ हें निश्चयार्थ मानिजे ॥ २४ ॥ अहिरावणाचा अवतार जाण ॥ तव ज्येष्ठ बंधु रक्तभोजन ॥ अष्टभाव अष्टगंध भिन्न भिन्न ॥ श्रीनाथ निरंजन अर्चनार्थीं ॥ २५ ॥ रक्तभोजनासी वधील खड्गपाणी ॥ हे निश्चयें माझी गोष्ट मानी ॥ सारांश युद्ध करावें विरोधपणीं ॥ नाथासीं अचळपद मागावें ॥ २६ ॥ ऐसें वदतां ह्मैषासुर ॥ उत्तर वदे रत्नासुर ॥ मम वधोत्सवें हिमकेदार ॥ होईल आनंदी परिपूर्ण ॥ २७ ॥ नाथासन्मुख पाविजे मरण ॥ याहूनि प्रारब्ध धन्य कवण ॥ आमुचें अचळ विरोधाचरण ॥ श्रीकेदारासी दाखवूं ॥ २८ ॥ ऐसें कथोनि रत्नासुर ॥ अर्पूनि सर्वांसी कनकांबर ॥ गौरवोनि ह्मैषासुर ॥ मैनागिरीं रत्नासुर पातला ॥ २९ ॥ तंव येरीकडे श्रीयालयीं ॥ इंद्रायणी निघाली चमूसमुदायीं ॥ लागली वाद्यध्वनिची घायी ॥ घनगर्जनें सारिखी ॥ ३० ॥ हें परिसोनि ह्मैषासुर ॥ सवें घेऊनि राक्षसभार । युद्धा पातला घोरांदर ॥ मोहरेवरी वरुणातीरीं ॥३१॥ मोहनास्त्रीं मोहरेवरी ॥ आकर्षणार्थीं उभा दळभारी ॥ तंव नाथापासीं शंखभैरी ॥ पळत येऊनि सांगतसे ॥ ३२ ॥ मोहरेनगरीं ह्मैषासुर ॥ मोहनास्त्रीं मंत्रोनि सहपरिवार ॥ उभा राहिला उच्चाटणाकार ॥ तुह्मांतें येथोनि दिसतसे ॥ ३३ ॥ ऐसें वदतां शंखभैरी ॥ कोपें खवळला बद्रिविहारी ॥ संकेत जाणविला रणमोहरी ॥ आलों युद्धांसी ह्मैषासुरा ॥ ३४ ॥ क्षेत्रपाळादि गंडभैरव ॥

भैरवभार सज्जिले सर्व ॥ ह्मैषासुराचा आजि दीर्घगर्व ॥ रणमंडळीं झाडावा ॥ ३५ ॥ तैं ज्वालामुखीसी स्फुलिंगाकिरणी ॥ युद्धा पातली इंद्रायणी ॥ वर्षली असंख्य शरसंधानी ॥ सहस्रवदनी न वदवे ॥ ३६ ॥ जेवीं पर्वतावरी पर्जन्यधारां ॥ मेघवृष्टि करी प्रचंडगारां ॥ तेवीं इंद्रायणी खदिरांगारा ॥ ह्मैषाचळावरी वर्षली ॥ ३७ ॥ हें पाहोनि ह्मैषासुर ॥ पवनवेगें सोडोनि शर ॥ बाण खंडिलें जैसें विखार ॥ गरुडमुखीं तडतडा ज्यापरी ॥ ३८ ॥ तंव भैरवदळार्णव बळ अद्भुत ॥ प्रळयवळेसी श्रीरवळनाथ ॥ गगन गर्जनेसी बळोन्मत्त ॥ भैरवेसी श्रीनाथपातला ॥ ३९ ॥ इंद्रायणी निघोनि पाठीसी ॥ नाथ पावला कंदना समदृष्टीसी ॥ अपरमित शराग्रीं वृष्टीसी ॥ ह्मैषासुरासी लक्षोनियां ॥ ४० हें पाहोनि ह्मैषासुर ॥ गर्जनें गाजवी ब्रह्मांडागार ॥ गदाप्रहरीं बाणपंजर ॥ चूर्ण केले राक्षसें ॥ ४१ ॥ हे नवनाथ त्रिगुणावतारा ॥ ह्मणवितां तुह्मीं बद्रिविहारा ॥ रक्तभोजन रत्नासुरा ॥ केवीं वधसी कळेना ॥ ४२ ॥ न पाहतां दीर्घदृष्टी ॥ बद्रिकाश्रम सोडिला कवण्या गोष्टी ॥ चमू घेऊनि द्विसप्तकोटी ॥ पातला वृथा हें अनुचित ॥ ४३ ॥ तुमचे हस्तें रत्नासुर ॥ मृत्यु न पावेचि जाण निर्धार ॥ रक्तभोजासी तुमचे करें ॥ महद्व्यसनीं श्रमी कारिसी ॥ ४४ ॥ ऐसें ह्मणोनि ह्मैषासुर ॥ विशाळ वाढला पर्वताकार ॥ हें पाहोनि भैरवभार ॥ अतिआश्चर्य मानिती ॥ ४५ ॥ केवढा विकटाट याचा शब्द ॥ नभा होऊनि गेला भेद ॥ केतु राहूचा दुसरा द्विरद ॥ कीं शनेश्वरचि ह्मैषासुर हा ॥ ४६ ॥ नाना राक्षस रूपांच्या चर्या ॥ जेवीं इंद्रजीतें दाविल्या रघुराया ॥ तैसें राक्षसें धरोनि धैर्या ॥ विद्वद्वर्या दावितसे ॥ ४७॥ त्रिकांडत्रिशूळीं अखंड विकोश ॥ कारिती कल्पांतभैरव रोष ॥ डमरूनादें ब्रह्मांडघोष ॥ प्रतिशब्दातें परिसवी ॥ ४८ ॥ इंद्रायणी आणि खड्गपाणी ॥ ह्मैषासुरासी युद्ध कारि

तां रणीं ॥ भंग न पावे राक्षसकरणी ॥ अनेक शस्त्रांस्त्रीं युद्ध करितां ॥ ४९ ॥ श्वेत तुरंगम चिंतामणी ॥ त्याव-
री चपळाकृति खड्गपाणी ॥ नाथचपळत्व रणांगणीं ॥ भय नधरीच रत्नासुर ॥ ५० ॥ श्रीनाथ तुरंगमाचें वारें ॥
मनोवेगाहूनि अनिवारें ॥ झगटतां राक्षसचमू माघारें ॥ सारोनि दैत्य युद्ध करितसे ॥ ५१ ॥ अनिवार देखोनि
ह्मैषासुरा ॥ क्षताम्र जाहला रक्तांबरा ॥ परी पाय नठेवीच माघारा ॥ ह्मैषासुर बळी गाढा ॥ ५२ ॥ नानाशस्त्रीं
न पावे मरण ॥ क्षतांग जाहला रक्तवर्ण ॥ हें देखोनि नाथनिरंजन ॥ अनादिशक्तीचें चिंतन केलें ॥ ५३ ॥ डिं-
वि डिंविडां डमरूघायीं ॥ ठंक ठणठणत्कार ब्रह्मांडालयीं ॥ गर्जत गहं गहं गंभीर चिदांशगेहीं ॥ तो रव भरिला ब्र
ह्मांडीं ॥ ५४ ॥ अनुहातनाद डमरगर्जना ॥ गगनीं भरोनि चोपडाई स्मरणा ॥ पावतां निघाली घेऊनि लक्ष से
ना ॥ लक्ष्मी आज्ञेनें चर्पटअंबा ॥ ५५ ॥ महाघोषें चोपडाई ॥ रहंरहं पातलें तुझ्या समयीं ॥ हें दहदह राक्ष-
स समुदायीं ॥ खळनाथ इंद्रायणी करें ॥ ५६ ॥ ऐसें अंबेचें परिसोनि वचन ॥ युद्धा प्रवर्तला नाथनिरंजन ॥ इंद्रा
यणी ही शर घनगर्जन ॥ ह्मैषासुरावरी वर्षली ॥ ५७ ॥ हें पाहोनि निशाचर भयंकर ॥ गुप्त होऊनि स्वसैन्यभा
र ॥ गर्जना करित ब्रह्मांडोदर ॥ गुप्त होऊनि अंबरीं ॥ ५८ ॥ तेथोनि वर्षत शरधारां ॥ वन्हि वर्षती खदिरांगा-
रा ॥ जेवीं पुच्छानें कल्होळ लंकापुरा ॥ भैरवभारीं तेवीं झालें ॥ ५९ ॥ हें देखोनि चोपडाई ॥ नाथासी ह्मणे गा
स्वस्थ त्वद्यीं ॥ चक्षुविद्या घे मंत्रान्वयी ॥ सबीजाक्षरी घेई कां ॥ ६० ॥ श्रीनाथासी चक्षुविद्या मंत्रा ॥ प्रबोधो-
नि वारिजनेत्रा ॥ इंद्रायणीसी ह्मणे ब्रह्मास्त्रा ॥ त्यजोनि राक्षस आजीं वधावा ॥ ६१ ॥ हें वचन ऐकोनि भयं-
कर ॥ प्रगट झाला ह्मैषासुर ॥ युद्ध करोनि घोरांदर ॥ नाथा सन्मुख पातला ॥ ६२ ॥ चर्पटअंबेचियेबळें ॥

राक्षसविपिन कारिसी निर्मूल ॥ शक्तिविरहित तूं निर्बळ ॥ थारों न शकसी संग्रामीं ॥ ६३ ॥ हें असुराचें ती-
त्रोत्तर ॥ परिसोनियां श्रीकेदार ॥ चक्षुमंत्रासी भैरवाकार ॥ कल्पांत तेजें सोडिलें ॥ ६४ ॥ चक्षुमंत्रास्त्र भैरवाकृ
ती ॥ चर्पटा बीजाक्षरें त्या वरतीं ॥ झळकतां राक्षसें पाहोनि भद्रजाती ॥ मागें परतला ह्मैषासुर ॥ ६५ ॥ दहा
सहस्र भैरवभार ॥ युद्धीं करोनि त्यांचा संहार ॥ मागें परतला स्वसैन्यभार ॥ पाराशराचे पश्चिमोत्तरीं ॥ ६६ ॥
पाठी लागली इंद्रायणी ॥ चर्पटअंबा खड्गपाणी ॥ ह्मतापदीपिका प्रकाश करोनी ॥ ह्मैषासुरासी वेढिलें ॥ ६७ ॥
दहासहस्र भैरवीवाहिनी ॥ ह्मैषासुरें वधिली रणांगणीं ॥ तों वामपात्रीं अमृतसंजीवनीं ॥ खड्गपाणीनें उठविलें ॥
॥ ६८ ॥ मोहरे पासोनि प्रतापवंत ॥ ह्मतापदीपिका असंख्यात ॥ लाविल्या पाराश पर्यंत ॥ श्रीखळनाथें सको
पें ॥ ६९ ॥ चोपडाई ह्मणे श्रीकेदारा ॥ इंद्रायणीहस्तें वधवीं ह्मैषासुरा ॥ आजिच दैत्य मृत्यु पावेल रणधीरा ॥
उदयीक आह्मां नाटोपेची ॥ ७० ॥ आजिच ह्मैषासुर होईल क्षया ॥ उदयीक न मरेचि गा नाथराया ॥ श्रमी
करील तुमची काया ॥ प्राण वांयां द्यावे लागती सर्वां ॥ ७१ ॥ ऐसें वदतांचि चोपडाई ॥ नाथ निघाला श-
क्तिसमुदायीं ॥ जेथें ह्मैषासुर वेढिला पाहीं ॥ इंद्रायणीनें युद्धावर्तीं ॥ ७२ ॥ हें लक्षोनि निशाचरें ॥ घरघराट
शब्द अंबरोदरें ॥ प्रतिशब्द परिसोनि भयंकरें ॥ ह्मैषासुरें काय केलें ॥ ७३ ॥ ह्मैषा होऊनि पर्वताकारा ॥
शृंगें ताडिलें हिमकेदारा ॥ पर्वता खालीं पडतां हाहाकारा ॥ भैरवभारीं माजला ॥ ७४ ॥ ही वार्ता पातली
मैनागिरीं ॥ असुर गर्जती जयजयकारीं ॥ रक्तभोज रत्नासुर परिवारीं ॥ पश्चिमगिरीवरी पाहतसे ॥ ७५ ॥
अश्वारूढ त्रैलोक्यनाथ ॥ ह्मैषासुरें केला पर्वतपात ॥ धन्य ह्मणती असुर समस्त ॥ कृतांतरूपी ह्मैषासुर हा ॥

॥ ७६ ॥ असो श्रीनाथ पर्वतातळीं ॥ अश्वासहित भूमंडळीं ॥ पडतां थरारिली ही महीतळीं ॥ अंगभारें नाथाचे ॥ ७७ ॥ तुरंगभारें चत्वारी चरण ॥ ऊर्ध्व उडतां पद उच्चाटण ॥ त्या चत्वारी पदतळीं वाहती जीवन ॥ कलियुगीं महाजन पाहती ॥ ७८ ॥ कीं ते विरोध भजनाची अचळ गरिमा ॥ जनांसी दावी सुखसंभ्रमा ॥ कीं वाढवावा ह्लैषासुरमहिमा ॥ युगायुगीं हे संग्रामकरणी ॥ ७९ ॥ असो ह्लैषासुरें देवोनि मस्तकधडकी ॥ इंद्रायणी पाडिली पर्वतखडकीं ॥ शक्तिसैन्यासी दुधडकीं ॥ ह्लैषासुर सडकीश्रृंगें करोनियां ॥ ८० ॥ असो ऊर्ध्व उडवोनि तुरंगम ॥ नाथें केला तीव्र संग्राम ॥ चपेटा इंद्रायणी एकनाम ॥ विशाळ स्वरूपी अवगली ॥ ८१ ॥ राक्षसीचमू हे निबिड आडवी ॥ माजली अकर्मीं अविधि विघडवी ॥ त्रिकांड त्रिशूळादि दुघडवी ॥ दैत्य तुडविला इंद्रायणीनें ॥ ८२ ॥ असो शक्तिसहित खळनाथ ॥ ऊर्ध्व उडोनि गगनपंथ ॥ ह्लैषासुर मदोन्मत्त ॥ इंद्रायणीनें आकर्षिला ॥ ८३ ॥ झोटी धरोनि ह्लैषासुरा ॥ युद्ध करितसे घोरांदरा ॥ दैत्या पदघाते क्षताघ्रधरा ॥ होतां कल्पांत जाहला ॥ ८४ ॥ ह्लतापदीपिका लावोनि समरीं ॥ युद्ध केलें दिवसचत्वारी ॥ ऐसें युद्ध दिवस शार्वरी ॥ इंद्रायणीसवें असुरें केलें ॥ ८५ ॥ चोपडाई आणि खळनाथ ॥ यांणीं घालोनि बाणाग्निआवर्त ॥ इंद्रायणी-अतिअद्भुत ॥ महंकावतीस्वरूप धारिलें ॥ ८६ ॥ विशाळ होऊनि महंकावती ॥ त्रिशूळ खड्ग परीघ हातीं ॥ गदाघायीं निघातीं ॥ निशाचरासी ताडिलें ॥ ८७ ॥ त्रिशूळीं केला त्रिखंड ॥ खड्गें मस्तक केलें दुखंड ॥ परीघें दुखंड केले भुजदंड ॥ जैसा इक्षुदंड क्षुधार्थी ॥ ८८ ॥ असो खड्गघायीं ह्लैषासुरा ॥ चूर्ण करोनि चछेदिलें शिरा ॥ अशुद्धें करोनि रंगविली धरा ॥ घोरांदर युद्ध करोनियां ॥ ८९ ॥ साठीसहस्र निशाचर ॥ इंद्रायणीनें वधिले

निकुर ॥ अशुद्धगंगा दुस्तर ॥ भैरवदरींत मिळाली ॥ ९० ॥ आठावीसलक्ष नवसहस्रभार ॥ समरीं वधी हिमकेदार ॥ चोपडाईनें ही निजकरें ॥ शतसहस्र वधियेले ॥९१॥ पद कर विरहित तनु विशाळ ॥ रक्तनदीतें वाहती सकळ ॥ दैत्य क्रोधाग्नीचा खळाळ ॥ राक्षसविक्राळ प्रेतें वाहतीं ॥ ९२ ॥ असो यापरी दैत्य भद्रजाती ॥ मरण पावला अर्धरात्रीं ॥ इंद्रायणी होऊनि महंकावती ॥ स्वयंभाकृति जाहली ॥ ९३ ॥ शक्ति परिवारेसी महंकावती ॥ नाथें करविली तेथेंचि वस्ती ॥ पाराशराचिये सभोंवती ॥ शक्ति समुदायी उत्तरली ॥ ९४ ॥ हें युगायुगीं नामाभिधान ॥ बाहत्तर युगांतरींचें प्रमाण ॥ ह्मैषासुर मथिला ह्मणोन ॥ महिकावती नाम ठेविलें नाथें ॥ ॥ ९५ ॥ हें प्रत्यक्ष ह्मैसाईपटारें ॥ ऐसें वदती विश्वसारें ॥ ह्मैषासुराच्या जन्हूभारें ॥ भूमीसीं गुडघे रुतले ॥ ॥ ९६ ॥ अश्वारूढ दैत्य दमन ॥ करितां श्रीनाथ निरंजन ॥ मही रुतले तुरंगमचरण ॥ अंगभारें नाथरायाचे ॥ ९७ ॥ त्रैलोक्य जयाचिये उदरीं ॥ असती तोचि हा हिमकेदारी ॥ अश्वचरण रुतले महीं चत्वारी ॥ नवलपरी हे नव्हेची ॥ ९८ ॥ कीं अनंतब्रह्मांडांच्या ओळी ॥ असती एकेक रोमावळीं ॥ ऐसा केदार अतुर्बळी ॥ ह्मैषासुरें थडकोनि केवीं पाडिला ॥ ९९ ॥ ऐसें वदतील पंडितजन ॥ परी ते संज्ञा परिसावी विचक्षण ॥ अष्टादश भैरवचित्त अहंपण ॥ ह्मणोनि चिंन्हें नाथें दाविलीं ॥ २०० ॥ ह्मैषासुराचा प्रताप थोर ॥ करोनि दावी बद्रिविहार ॥ मही रुतले अश्वचरण अंगभारें ॥ युगायुगीं विस्तार हे व्हावया ॥ २०१ ॥ जनीं जनार्दनचि सर्वांघटीं ॥ ह्या विश्वोत्तरींच्या सिद्धांतगोष्टी ॥ यदर्थीं पंडितीं संशय पोटीं ॥ न धरावा गुणिजनीं ॥ २०२ ॥ केदारखंड भविष्योत्तर ॥ ब्रह्मांडपुराणाचा आधार ॥ लिहिवितसे हिमकेदार ॥ माझिये हस्तीं आवडीं ॥ २०३ ॥ अ-

 सो महिकावतीचे पाठारीं ॥ स्वदळेसी ठेवूनि शक्ति परिवारीं ॥ विजयघोषें हिमकेदारी ॥ ह्मतापप्रकाशीं
निघाला ॥ २०४ ॥ विजयघोषीं घनघोरी ॥ चोपडाई सहित बद्रिविहारी ॥ पातला श्रीयालयनगरीं ॥ श्री
 लक्ष्मीसी भेटला ॥ २०५ ॥ असो ह्मैषासुर परिवारीं ॥ मर्दिला इंद्रायणीचे करीं ॥ ह्मैसाई ठेविली गिरि
पाठारीं ॥ स्वबळेसी रवळनाथें ॥ २०६ ॥ हें वर्तमान दयाळवीरीं ॥ आणिलें मैनागिरीवरी ॥ रक्तभोज रत्ना
सुरीं ॥ सभागारीं बैसोनि ऐकिले ॥ २०७ ॥ अतिजाज्वल इंद्रायणी ॥ कल्पांत भैरवखड्गपाणी ॥ चोपडाई प्रळय
सौदामिनी ॥ भैरवभारीं गगन गर्जे ॥ २०८ ॥ त्रिवर्गीं वधिला ह्मैषासुर ॥ महापराक्रमी भयंकर ॥ हें रक्त
भोज रत्नासुर ॥ ऐकोनि विकळ पडियेले ॥ २०९ ॥ ह्रदय ताडी रत्नासुर ॥ रक्तभोज कपाळ पिटितकर
॥ तीव्र श्वास टाकित थोर ॥ हाहा काय नवल जाहलें ॥ २१० ॥ आह्मांसी जयाचा भरवसा ॥ भुवनत्रयीं
जयाचा ठसा ॥ सांगे आह्मातें भूत भविष्या ॥ वरी आपुली दशा न वदेची ॥ ११ ॥ कीं आमची विजय-
ध्वजा विखंडिली ॥ कीं दक्षिणबाजू आजि पडली ॥ कीं धैर्यस्तंभासी आदळली ॥ प्रळयकाळींची विद्युल्ल
ता ॥ १२ ॥ गेला सर्वांचा आवांका ॥ काळभैरवासी ज्याची शंका ॥ आतां मार्ग झाला निका ॥ बद्रिवि-
हारासी यावया ॥ १३ ॥ आह्मांसी न विचारूनि ह्मैषासुरा ॥ गेलासी कैसा कैलासगिरिवरा ॥ तुज वांचू-
नि बद्रिविहारा ॥ कवणें युद्धीं जिंकावा ॥ १४ ॥ बद्रिविहाराचा कावा ॥ तव संग्रामीं कदापि न विकावा
॥ श्रीनाथविजयघोष न ऐकावा ॥ दैवें अन्यत्र चिंतयामी ॥ १५ ॥ ऐसा शोक नाना परी ॥ रक्तभोजादि
रत्नासुरीं ॥ करितां मैनागिरीवरी ॥ महाकल्पांत जाहला ॥ १६ ॥ रत्नासुर ह्मणें हे रक्तभोजना ॥ व्यर्थ

कां करिसी खेद मना ॥ अन्यथा नव्हे विधिलेखना ॥ निर्धारेसी जाणपां ॥ १७ ॥ ईश्वरसत्तान्वयें पूर्वार्चितें ॥ मंत्र मैथुन ग्रहादिकृत्यें ॥ औषध दान मान अपमानातें ॥ नव गौप्य ही करोती ॥ १८ ॥ यालागीं न करावी खेद खंती ॥ विचित्र कर्मणो गहनो गती ॥ हें वाक्य भगवद्गीतीं ॥ जाणती तत्त्वानुभविये ॥ १९ ॥ लाभालाभ खेद संतोष ॥ प्राप्त होतां अपेशयश ॥ विस्मय न करोनि मानी हर्ष ॥ सुजाण पुरुष जाणपां ॥ २० ॥ विधीनें केलें लेखन ॥ तें अविधिमार्गें नटलें जाण ॥ यास्तव खेद सांडोन मन ॥ पुढील कर्त्तव्य विलोकीं ॥ २१ ॥ भक्तिमार्गाहून परम सुगम ॥ आमुचा जाण विरोधधर्म ॥ यालागीं करोनि संग्राम ॥ मोक्षधाम पावावें ॥ ॥ २२ ॥ ऐसें बोधोन रक्तभोजना ॥ सावध करोन आपुल्या मना ॥ तीव्र सज्जोन आपुली सेना ॥ मैना गिरीवरी सावध असती ॥ २३ ॥ आतां सिंधुराज निशाचर ॥ जैसा प्रतापी ह्लैषासुर ॥ तैसाचि जाण तो दुसरा असुर ॥ मायारूपी राक्षस हा ॥ २४ ॥ सिंधुराज गंडभैरवहस्तीं ॥ मरण पावेल मध्यरात्री ॥ त कथारस संत श्रोतीं ॥ पंचदशोध्यायीं परिसात्री ॥ २५ ॥ इतिश्री केदारविजय सुरतरुवर ॥ शास्त्रखांदि यांचा प्रचंड विस्तार ॥ केदारखंड अग्निपुराण भविष्योत्तर ॥ काशीखंडादि ब्रह्मांडपुराण ॥ २६ ॥ ब्रह्मोत्त रखंड करवीरकांड ॥ केदारविजय द्रुमापरी अखंड ॥ ह्याशाखाविस्तार प्रचंड ॥ गीर्वाणशब्देपर्ण सुमनोहरी ॥ २७ ॥ संस्कृतछायामंटपाकार ॥ नानाख्यान शाखा पल्लव मनोहर ॥ हरिनामीं मुहूरला अपार ॥ दृ- ष्टांत सुफळित लवंिन्नला ॥ २८ ॥ कीं हा केदारविजय कल्पतरू ॥ पस्तीस अध्यायांचा विस्तारू ॥ काल्पिलें देणार नाथजगद्गुरू ॥ श्रवणार्थीं निश्चय धरियेल्या ॥ २९ ॥ यदर्थीं केदार सर्वसाक्षी ॥

अलक्ष लक्षी सर्वांक्षी ॥ हरिनामाचा कें पक्षीं ॥ अक्षयीं अभंगीं प्रेमळहरी ॥ ३० ॥ इति श्री केदार विजय रस ॥ श्रवणार्थी पावे अखंड यश ॥ परिसावा हरिकीर्तनीचा घोष ॥ चतुर्दशोध्याय गोडहा ॥ २३१ ॥ इतिश्री केदारविजय भविष्योत्तर ॥ केदारखंड ब्रह्मांडपुराण ॥ करवीरकांड ब्रह्मोत्तरखंड ॥ विरचितायां ॥ ह्लैषासुरवध रक्तभोज रत्नासुरशोक कथनोनाम ॥ चतुर्दशोध्यायः ॥ १४ ॥ श्रीनाथार्पण मस्तु ॥ श्री केदारार्पण श्रीराम जयराम जयजयराम ॥ ओंव्या ॥ २३१ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अध्याय १५ वा



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयनाथ चतुर्दशभुवनपाळा ॥ जयजय नाथ दीनदयाळा ॥ जय-
जय पौगंडऋषिमंडणकुळा ॥ विमलांबुजी करकमलोद्भवा जनका ॥ १ ॥ जीवशिव ऐक्यत्व प्रकृतिरूपा ॥ जिं-
किला वामब्रह्मचर्यआश्रम दीपा ॥ जीर्ण करोनि म्हैषासुरपादपा ॥ जीर्णोद्धार करिसी इंद्रायणीकरीं ॥ २ ॥
मध्यरात्रीं त्रैलोक्यपाळ ॥ म्हतापदीपिकेचे बंबाळ ॥ लाऊनि मदगर्वित विकाळ ॥ इंद्रायणीहस्तें म्हैषासुर
वधियेला ॥ ३ ॥ श्रीकेदार होवूंनि जयवंत ॥ दुंदुभिनादीं जय गर्जत ॥ आला श्रीयालयीं आनंदभरित ॥ भैरवी
सभेंत बैसला ॥ ४ ॥ जैसा तारांगणीं निशाकरमणी ॥ कीं द्वादशार्कामाजीं चंडांशुकिरणी ॥ कीं काद्रव्यांमा-
जी सहस्त्रफणी ॥ तैसा दिनमणि श्रीनाथ शोभला ॥ ५ ॥ जेवीं समुद्रमंथनीं अमृतपानीं ॥ पंक्ति बैसल्या
सुरवरमुनी ॥ तैसा शोभला सभास्थानीं ॥ नवनाथ शिखामणी साजिरा ॥ ६ ॥ नराणांच नराधीपा ॥ तुझिया
विभूति ज्योतिस्वरूपा ॥ अश्वत्थ औदुंबर सुरपादपा ॥ केदारकल्पतरुवरा ॥ ७ ॥ गंधर्वाणां चित्ररथा ॥ रुद्राणां
च श्रीरवळनाथा ॥ वृष्णिकुलावतंसमंडिता ॥ दीनानाथा कंसारिया ॥ ८ ॥ असो लक्ष्मीसहित विराज मान ॥
सभे बैसले महावीरादि प्रधान ॥ हे चतुर्दशोध्यायींचें कथन ॥ संत गुणिजनीं परिसिलें असे ॥ ९ ॥ सर्वांघटीं
दीनानाथ ॥ व्यापोनि उरला जो अव्यक्तव्यक्त ॥ तोचि रत्नागिरीवरी हा रवळनाथ ॥ भक्तमनोरथ पुरवावया
उभा असे ॥ १० ॥ म्हणोनि विभूति स्तव करावया ॥ योग्यता असे नाथराया ॥ यदर्थी अव्युत्पन्न संशय
वांयां ॥ घेतील म्हणोनि हा दृष्टांत ॥ ११ ॥ लटकीच हे लाघवीवाणी ॥ ऐसें वदतील अगीर्वाणी ॥ त्यां-
णीं शोधितां भविष्योत्तरपुराणीं ॥ उत्तरार्धीं ऐसेंचि असे ॥ १२ ॥ एकशत अष्टोत्तरीं ॥ केदारस्तवराज

भविष्योत्तरीं ॥ त्यामाजीं श्लोक चत्वारी ॥ श्रीव्यासोक्तीचे निश्चयें ॥ १३ ॥ असो तर्क भाष्य गीर्वाण कवन ॥ यदर्थी कर्त्ता नाथनिरंजन ॥ दूषणं न ठेवावें पंडितजन ॥ ग्रंथसारा न श्रवण करितां ॥ ॥ १४ ॥ सत्समागमाची ठेवी ॥ पस्तीसमंदिरीं श्रीनाथ ठेवी ॥ पाषांडी अगीर्वाणीतस्करीं न ठेवी ॥ दूषण पाउल पस्तीसघरीं ॥ १५ ॥ पस्तीसअध्याय पस्तीसमंदिरें ॥ श्रीनाथें उभाविलीं सुमनोहरें ॥ परा पश्यंति मध्यमा वैखरी मणिपुरें ॥ ईशशक्ति सुंदर विराजितसे ॥ १६ ॥ अनुहात सदाशिव गोल्हाटी ॥ ऊर्ध्व पाहातां दृष्टि होय उपराठी ॥ ज्ञातापदीपिका त्रिपुटी ॥ सहस्त्रदळसंपुटीं हा नाथ विराजे ॥ १७ ॥ ऐसा नाथनिरंजन ॥ जगद्गुरु योगी मुनिमनरंजन ॥ सर्वांतरीं व्यापोनि उरला जाण ॥ त्या ह्या विभूति नाथरायाच्या ॥ १८ ॥ सुमासांमाजी मार्गशीर्षमास ॥ नाद ब्रह्मीं घंटाघोष ॥ तेजामाजी चंडांशु ॥ ह्यांतद्विभूति केदारा ॥ १९ ॥ सुरवरांमाजी सहस्त्रनयन ॥ इंद्रियातें मन प्राधान्य ॥ अग्नीमाजी जठराग्न ॥ हे तद्विभूति सौदागरा ॥ २० ॥ तारांगणांत सुधाकर ॥ यादवांमाजी नंदकुमर ॥ पक्षियांत वैनतापुत्र ॥ ह्या सौदागराच्या आकृती ॥ २१ । धेनुपुत्रांमाजी नंदिकेश्वर ॥ वानरांत अंजनीकुमर ॥ चतुष्पादांत सिंहथोर ॥ ह्यांतद्विभूति केदारा ॥ २२ ॥ तृणामाजी दर्भोत्तम ॥ आश्रमांत श्रेष्ठ चातुर्थाश्रम ॥ वृक्षांमाजी कल्पद्रुम ॥ ज्योतिस्वरूप ज्याठायीं ॥ २३ ॥ अश्वांत श्रेष्ठ सप्तानन ॥ शंखांमाजी नवांकितजाण ॥ हेमांत जांबूनदसुवर्ण ॥ हे नवनिधान नवनिधी ॥ २४ ॥ मुनीमाजी कपिलमुनी ॥ अलंकारांत कौस्तुभमणी ॥ पदांत भृगुलांच्छनी ॥ धेनूंत भक्तिस्वरूपकामधेनू । २५ ॥ पुष्पांमाजी पारिजात ॥ मुक्तांमाजी जीवन्मुक्त ॥ भजनामाजी पितृभक्त ॥ ऋतूमाजी कुसुमाकर तद्विभूती ॥ २६ ॥ पाषाणांत परीस

थोर ॥ रूपांमाजी ज्योतिरूप निर्विकार ॥ अक्षरांमाजी मकार ॥ तोहा भैरवाकार जो नटला ॥ २७ ॥ ऐसा ज्यो-
तिस्वरूपाच्या असंख्य विभूती ॥ अखंडित करितसे तेथें वस्ती ॥ अणु रेणु व्यापोनि सर्वांभूतीं ॥ असोनि वेग-
ळा दैत्यदमनार्थी उतरला जो ॥ २८ ॥ हेमाद्रि आश्रमीं शेषशायी ॥ सदैव विराजित असे अक्षयी ॥ साक्षीभूत
सर्वांठायीं ॥ अलिप्तपणीं सूर्य जैसा कुंभोदकीं ॥ २९ ॥ ऐसा देवादिदेव दीनानाथ ॥ पुरवावया भक्तमनोरथ ॥
श्रीयाळापासोनि ब्रह्मनाळापर्यंत ॥ वरुणा कृष्णासंगमीं उरतला ॥ ३० ॥ श्रीलक्ष्मीसह बद्रिविहारी ॥ बैसला सभेंत
भैरवभारीं ॥ तैं गंडभैरवासी पाचारी ॥ सिंधुनिशाचर वधावया ॥ ३१ ॥ गंडभैरवासी केदार ॥ वदत घेऊन भैरव
भार ॥ काळभैरवाचे विचार ॥ सिंधुनिशाचर वधावा ॥ ३२ ॥ जैसा प्रचंड दुर्धर म्हैषासुर ॥ तैसाच सिंधुनिशा-
चर ॥ महत् यत्नीं तुझिया करें ॥ मृत्यु पावेल सिंधुराज ॥ ३३ ॥ सिधुराजाचे मस्तकीं सूर्यकिरणीं ॥ पडतां ध
रारील हे मेदिनी ॥ ग्रीवेतूनि निघेल विशाळवन्ही ॥ सिंह शार्दूल द्वय असुर ॥ ३४ ॥ ते युद्ध करतील दोन
राती ॥ अतिविक्राळ भद्रजाती ॥ ते मृत्यु पावतील तव हस्तीं ॥ काळभैरवाचे युक्तीनें ॥ ३५ ॥ काळभैरवासी
तयाचीं वर्मे ॥ पहिलीच बोधिलीं असती अनुक्रमें ॥ अनादिशक्ति समागमें ॥ सैन्यभारेसी नेईजे ॥ ३६ ॥ पर-
म सावध होऊनि सुमती ॥ दैत्य वधावा सिंधुकुमती ॥ वीस सहस्र सेना संपत्ती ॥ निजसांगाती नेईजे ॥ ३७ ॥
बहुतप्रकारचीं वर्मे कर्मे ॥ गंडभैरवासी अनुक्रमें ॥ बोधिलीं करावया घोरसंग्रामें ॥ श्रीनाथें गंडभैरवासी ॥
॥ ३८ ॥ परिसोन श्रीनाथमुखींचें वचन ॥ गंडभैरव अभिवंदन ॥ करोनियां घनगर्जन ॥ निनादिशक्तिसहित
निघाला ॥ ३९ ॥ तीससहस्र भैरवभार ॥ सवें तितकाच शक्तिपरिवार ॥ घेऊनि निघाला बळसागर ॥ काळभै

रवासहित समरंगणीं ॥ ४० ॥ महाघोषें करित घनगर्जना ॥ गंडभैरव पातला रणांगणा ॥ आले ऐसें जाहले
श्रवणा । सिंधुराक्षस क्षोभला ॥ ४१ ॥ पंचदशसहस्र निशाचर ॥ युद्धासी ठाकले रणरंगधीर ॥ महाघोषें पा-
तला सामोर ॥ मायारूपी राक्षस ॥ ४२ ॥ पंचदशसहस्र रणधीर ॥ त्यांमाजी सिंधुराक्षस महाक्रूर ॥ युद्धीं खव
ळला रणशूर ॥ रूप पालटोन आपुलें ॥ ४३ ॥ सिंधुराक्षस विशाळशरीरा ॥ रोधोनि पातला घोर समरा ॥ गंड
भैरवा देखोनि तीव्रोत्तरा ॥ काळभैरवासी वदतसे ॥ ४४ ॥ केव्हढा निशाचर मायारूपी ॥ शरीर धरितो मन
संकल्पीं ॥ महापरक्रमी असे अकल्पी ॥ संग्राम दारुण दिसतसे ॥ ४५ ॥ परिसोनि गंडभैरवाचीं उत्तरें ॥ काळ-
भैरव वदे सुविचारें ॥ निनादिशक्ति सिद्धकरें ॥ मरण पावेल तव करीं ॥ ४६ ॥ नाथें हें जाणोनि होणार ॥ स्प-
र्शसिद्ध धाडिले सत्वर ॥ हें परिसोन घनघोर ॥ गंडभैरव युद्धा मिसळला ॥ ४७ ॥ गंडभैरव सिंधुराज ॥ युद्धा-
सी खवळले उन्मत्तगज ॥ परिवार जाहला निस्तेज ॥ उभयतांचा ते काळीं ॥ ४८ ॥ उभयशब्दांची घनगर्जना
॥ परियाप्त जाहली ब्रह्मांडरचना ॥ अग्नि वात पर्वत पर्जन्या ॥ शस्त्र बाणास्त्रीं वर्षती ॥ ४९ ॥ गदाघायीं युद्धीं
निकुरें ॥ केलीं उभयतीं दारुण शरें ॥ शस्त्राग्नि वर्षती खदिरांगारें ॥ एकमेकासीं नगणती ॥ ५० ॥ राक्षसी मावे
ची अचळकरणी ॥ शास्वत दाखवी समरंगणीं ॥ सिंधुराज वधावा बाणीं ॥ ऐसावीर कोणी न देखों ॥ ५१ ॥ तैं
सिंधुराज मायार्णवा ॥ राक्षसीमाया ते गंडभैरवा ॥ दावी सृष्टिक्रमाचा पूर्ण ठेवा ॥ जेवीं चतुराननाचा सांक्षेपें ॥
॥ ५२ ॥ उत्पत्ति पालन संहार ॥ यांचे कतृत्वासी भयंकर ॥ दावितसे निशाचर ॥ गंडभैरवासी रणांगणीं ॥ ५३ ॥
जिंकोनियां शक्तिपरिवार ॥ कारागृहीं पंजरीं भैरवभार ॥ घालोनि आणिला हिमकेदार ॥ शरपंजरीं अवचितां ॥

॥ ५४ ॥ हें गंडभैरवें देखोनि मनीं ॥ संग्राम टाकिला विपरीत लक्षोनी ॥ ह्मणे कां ओखटें केलें खड्गपाणी ॥ यश दिधेलेंसे वैरिया ॥ ५५ ॥ कारागृहीं सुदेलें भैरवदळ ॥ हें अघटित भासे आह्मांसी केवळ ॥ वडवानळ होइजे शीतळ ॥ परी नाथ आतळेना राक्षसा ॥ ५६ ॥ जंबूक सिंहातें आकळी ॥ गजेंद्र सगळा मुंगी गिळी ॥ मेरूमांदार झेलवे करतळीं ॥ परी नवनाथ शिखामणी न धरवे ॥ ५७ ॥ सप्त समुद्र घोटती घोट ॥ तीव्रवात बांधवेल मोट ॥ केशरीचा मोडोंशके कंठ ॥ परी नाथमनगट न धरवे ॥ ५८ ॥ वंध्याकुमराचें विवाह कार्य ॥ करावया येईल महदैश्वर्य ॥ पाषाणनौका मृगजळीं सिंधु तरूं ये ॥ परी नाथ न सांपडे राक्षसा ॥ ५९ ॥ कीं वाळू घालोनि घाणीं ॥ तैल काढवेल महत्प्रयत्नीं ॥ परी नाथ न धरवेल असज्जनीं ॥ हें निर्धारेंसी जाणपां ॥ ६० ॥ किंवा काळोखें भरोनि घटरांझणीं ॥ धुवोनि काढवेल मृगजीवनीं ॥ वाळत घालोंयेईल सूर्यकिरणीं ॥ परी नाथ आकर्षणीं नयेची ॥ ६१ ॥ खदिरांगाराची सुमन माळा ॥ गळांघालील कर्पूर पुतळा ॥ पंगुलंघील कुळाचळा ॥ परी नाथासी बंधन न घडे ॥ ६२ ॥ ऐसी कल्पना करितां काळभैरवें ॥ तें राक्षस गर्जला मद गर्वें ॥ नाहीं सेना मायाशक्ति भैरवें ॥ नवनाथ शिखामणी ही दिसेना ॥ ६३ ॥ जेवीं विष्णुस्मरणे संताप हरी ॥ तैसी राक्षसमाया अचळ परी ॥ असो निनादिशक्तिपरिवारी ॥ स्पर्श सिद्धि रणागणीं गर्जत ॥ ६४ ॥ निनादिशक्ति नीलांबरी । निनाई नामाचीअधिकारी ॥ युद्ध करावया घोर समरीं ॥ स्पर्शसिद्धेसी उभी असे ॥ ६५ ॥ तीव्र धरोनि स्वरूपाकृती ॥ सिंधुराक्षसीमाया संहारिती ॥ तंव निशाचर तीव्र भद्रजाती ॥ गंडभैरवावरी चालिला ॥ ६६ ॥ राक्षसीमाया अनेकवर्ण ॥ निनाईनें ग्रासिले संपूर्ण ॥ स्पर्शसिद्ध कृनांत किरण ॥ राक्षसीमाया विध्वंसिली ॥ ६७ ॥ गंडभैरव वर्षला प्रचंड दुर्धर ॥ काळभैरव दारुण श्रा

रांगार ॥ वर्षला प्रचंड दुर्धर ॥ हिमकेदार आज्ञामंत्रार्क्षी ॥ ६८ ॥ लक्षोनि सिंधुनिशाचरें ॥ चूर्ण केले शर दु शरें ॥ गदा फिरवित गर्गरें ॥ गंडभैरव ताडिला ॥ ६९ ॥ गंडभैरी गदाप्रहरीं ॥ विकळ पडला रहंवरीं ॥ हें लक्षोनि काळभैरी ॥ सहस्त्रैक बाण वर्षला ॥ ७० ॥ नीळपर्वत नगवासनी ॥ निनादि धांवली विकाळवदनी ॥ स्पर्शांगार-सिद्ध समरंगणीं ॥ शरसंधानीं वर्षला ॥ ७१ ॥ निनादिशब्दसिद्धस्पर्श ॥कवळली रणांगणीं रणकर्कश ॥ सन्मुखीं दक्षिणेसी पृष्टिपार्श्व ॥ बाणाहुति वर्षती ७२ ॥ ऐसें दोन दिवस पर्यंत ॥ युद्ध केलें त्रिवर्गीं समर्थ ॥ गंडभैरवासी स्वसामर्थ्यें ॥ काळभैरवें जीवविलें ॥ ७३ ॥ दहासहस्त्र भैरव गण ॥ सिंधुराक्षसें वधिले दारुण ॥ ते उठविले अमृत सिंपोन ॥ काळभैरवें प्रतापें समरंगणीं ॥ ७४ ॥ नाथ अमृतपात्रींचा बिंदु ॥ गंडभैरवाचें मुखारविंदू ॥ प्रवेशतां क्षोभला प्रतापसिंधू ॥ सिंधुराज वधावया ॥ ७५ ॥ ह्मणे हे काळभैरवा रणरंगधीरा ॥ त्वां वांचविलें मम शरीरा ॥ आतां सिंधुराज निशाचरा ॥ वधीन स्वयें नाथकृपेनें ॥ ७६ ॥ श्रीनाथें सांगितलें वर्म ॥ तें प्रगट करींगा मज अनुक्रम ॥ माझे हस्तीं राक्षसाधम ॥ मरण पावेल कवण्या उपायीं ॥ ७७ ॥ काळभैरव ह्मणे हे खगशार्दूला ॥ मम काळखड्ग घेऊन करतळां ॥ युद्ध करोन रजतुंबळा ॥ सिंधुराजाचें शीर च्छेदावें ॥ ७८ ॥ राक्षस समस्त पडतां धरणीं ॥ मीं साह्य होईन तुज रणांगणीं ॥ सिंहासुर वैश्वानर दोनी ॥ राक्षस मस्तकीं जन्मतील ॥ ७९ ॥ रक्तापासोन जन्मतील सहाजण ॥ संदल मंदल कंदलासन ॥ चौथा वाजोनिलांजन मंद्रखंजन ॥ सांद्रदलासुर सहावा ॥ ८० ॥ नीलांजन आणि सांद्रखंजना ॥ हें युग्म वधावें निनाईनेंजाणा ॥ संदल मंद्रल कंदलासना ॥ हे तिघे वधावे सिद्धचक्रीं ॥ ८१ ॥ सहावा सांद्रदलासुरजाण ॥ काळनाथें वधावा दारुण ॥ ऐसें षड्रिपु

नामाभिधान ॥ शक्तिसिद्धकरें वधावे ॥ ८२ ॥ सिंधुराक्षस ग्रीवेतून दोनी ॥ सिंहासुर वैश्वानर हे दोनी ॥ माझिये हस्तीं कृतांतसदनीं ॥ वसवीन समरंगणीं प्रतापें ॥ ८३ ॥ सिंधुराज निशाचर क्रूर ॥ हा रक्तबीजाचा सहोदर ॥ ह्मणोनि रक्तापासोन आठ असुर ॥ उत्पन्न होतील निर्धारेसी ॥ ८४ ॥ ग्रीवेतून निघतील दोघे असुर ॥ कबंधापासोनि सहाक्रूर ॥ ऐसें आठ निशाचर ॥ रक्तापासोनि जन्मतील ॥ ८५ ॥ रक्तबीजाचा वंशधर ॥ ह्मणोनि रक्तापासोनि आठ असुर ॥ उद्भवतील त्यांचा संहार ॥ करावा हें निश्चयें श्रीनाथ बोलिला ॥ ८६ ॥ हें खळनाथें कथोनि वर्म ॥ तुह्मांसी करावया संग्राम ॥ धाडिलें वधावया राक्षस अष्टम ॥ वर्म कर्म निवारण विवरोनी ॥ ८७ ॥ ऐसें वदोन काळभैरी ॥ काळखड्ग गंडभैरवाचे करीं ॥ देऊनियां शक्तिपरिवारीं ॥ सिद्धचक्रीं सिद्धजाले ॥ ८८ ॥ जेवीं प्रळयकाळीं सौदामिनी ॥ तेवीं निनाईभैरववाहिनीं ॥ सिंधुराक्षस शरसंधानीं ॥ प्रचंडबाणीं विंधिला ॥ ॥ ८९ ॥ ब्रह्मास्त्र योजोन तीनबाणीं ॥ राक्षस विंधिला त्रिवर्गानीं ॥ हें लक्षोनियां नयनीं ॥ राक्षस कोपें धांवला ॥ ९० ॥ गदा घेउन खटाटोप ॥ दावावया पातला साटोप ॥ तें ब्रह्मास्त्रें पडिला शिराचा टोप ॥ कोशपर्यंत उडाला ॥ ९१ ॥ सिंधुराज कवणा नाटोपे ॥ ह्मणोनि ब्रह्मास्त्रें पाडिला शिरटोप ॥ काळभैरव ह्मणे आंतांचि आटोपे ॥ गंडभैरव सिंधुराज संहारी ॥ ९२ ॥ शिरटोप पडला पर्वततळीं ॥ पालथा पडला भूमंडळीं ॥ टोपनगरी हें जन सकळी ॥ प्रख्यात बोलती जगदोद्धारें ॥ ९३ ॥ सिंधुराक्षस मस्तकीं सूर्यकिरण ॥ नपडतां रणीं नपावे मरण ॥ ह्मणोनि ब्रह्मास्त्रीं शिरटोप उडऊन ॥ राक्षस मस्तक उघडें केलें ॥ ९४ ॥ मस्तक उघडें पडतां रणीं ॥ तेव्हांचि काळखड्गें शिरच्छेदूनी ॥ पाडिसील ऐसें खड्गपाणी ॥ वर्म मजला कथिलें

असे ॥ ९५ ॥ गंडभैरवासी काळभैरी ॥ हें वर्म बोधिलें रणचत्वारीं ॥ तें काळखड्ग घेऊन विकोशकरीं ॥ सिंधुराज च्छेदनार्थी उठिला ॥ ९६ ॥ स्फुलिंग सांडित खड्गधारे ॥ चपळाकारी खदिरांगारें ॥ वर्षत चपळाकृति पवनाकारें ॥ गंडभैरव प्रतापी ॥ ९७ ॥ गंडभैरव आणि राक्षस ॥ खड्गयुद्ध चत्वारी दिवस ॥ करितां त्यावरी पराक्रम विशेष ॥ करोनि उत्कर्ष दाविला ॥ ९८ ॥ ऊर्ध्व उडोनि गगनोदरीं ॥ राक्षस कवळीला कवरीभारीं ॥ सहस्रार्धी फिरऊन चक्राकारीं ॥ तीक्ष्ण गिरिशृंगीं आपटिला ॥ ९९ ॥ सवेंचि काळखड्ग तीव्रधारें ॥ राक्षस शिरच्छेदितां भयंकरें ॥ गर्जना करित गगनोदरें ॥ नवल दुसरें जाहलें लोपामुद्रे ॥ १०० ॥ घायासरसे राक्षस उडाले ॥ पंचगंगेउत्तरतटीं पडिले ॥ तें शिरापासोन द्वयराक्षस उद्भवले ॥ विक्राळरूपी शस्त्रपाणी ॥ १ ॥ हें काळभैरवें पाहोनी ॥ चपळ पातला पवन किरणीं ॥ तें सिंहासुर हे दोन्हीं ॥ युद्धीं घोरांदरीं मिसळले ॥ २ ॥ दोनप्रहर तीव्र करोनि संग्राम ॥ दोघांसी मारिलें अनुक्रम ॥ तेथें काळभैरवें वसविलें ग्राम ॥ नामाभिधानें दोघांचीं ॥ ३ ॥ राक्षस मारोन वसविलें ग्राम ॥ ऐसें न वदतील पंडितजन ॥ दारुण करवीराचा संग्राम ॥ योग दंडाचे बळें होणार पुढें ॥ ४ ॥ ह्मणोनि अष्टदिग्पाळ तेचि अष्टभैरी ॥ दिग्बंधन करोन काळभैरवें निकुरीं ॥ दैत्य मारोन राक्षस नामाच्या नगरीं ॥ राहतां योगदंड वारें न लागें ॥ ५ ॥ ह्मणोन ऐकसी हें दुसरें भय ॥ सिंधु राक्षस युद्धीं झाला क्षय ॥ पुनरपि परिवार आतां नये ॥ युद्ध करावयासी मागुता ॥ ६ ॥ आमुचें मृत्युवर्म बद्रिविहारी ॥ तुज बोधिलें ह्मणोनि नवलपरी ॥ आमुचीं केलीसे काळभैरी ॥ ग्रामें वसविलीं दो नामाचीं ॥ ७ ॥ सिंहाकृति भैरवभार ॥ वीस सहस्र रणरंगधीर ॥ रक्षावया पंचगंगातीर ॥ सिंहादुर्गा ठेविली ॥ ८ ॥ अळतें नाम अरुणाच

ळीं ॥ परशरामलिंग अलंप्रभू समदळीं ॥ मायाका चिंचणी प्राकृत जुगुळी ॥ मीरपीर पैगंबर ठेविले ॥ ९ ॥ असो निग्रह करोनि ठेविलें दळ ॥ मागें परतला महाकाळ ॥ तंव सिंधुकबंधा पासोन विक्राळ ॥ सहा राक्षस युद्ध करिती ॥ ११० ॥ संदल मंदल कंदल ॥ या त्रिवर्गीं युद्ध केलें तुंबळ ॥ त्या वरी स्पर्शसिद्ध प्रळयानळ ॥ क्षोभला तिघांसी वधावया ॥ ११ ॥ घालोनि मंत्रास्त्राची जाळी ॥ सांद्रदळासी घातलें पाताळीं ॥ तिघे दैत्य वधिले भुजबळी ॥ काळनाथें भैरवेपदतळीं आपुल्या ॥ १२ ॥ खंजन आणि निलांजन ॥ हें युग्म खवळलें पंचानन ॥ त्यांणीं युद्ध केलें अतिदारुण ॥ निनादि सर्वे दोघानीं ॥ १३ ॥ चत्वार्धी निशार्धी राती ॥ निनाईनें ब्रह्मास्त्रीं घातीं ॥ दोघे दैत्य वधिले कुमती ॥ शक्ति अद्भुत करोनियां ॥ १४ ॥ येरीति करोन घोरसंग्राम ॥ राक्षस मारोन वसांवेला ग्राम ॥ मैनागिरि भोंवत्या दिशा दुर्गम ॥ भैरवमारीं आक्रमिल्या ॥ १५ ॥ संदल मंदलाचे नांवें ॥ सादळ मादळ वसविलीं गांवें ॥ हें कलयुगीं अद्यापि बोलती सर्व ॥ तैसाचि श्लोकाधार पंडितहो ॥ १६ ॥ असो शक्ति सहित निनाई ॥ नीलपर्वतींचे समुदायीं ॥ ठेविली सिद्धचक्रीं सिद्धालयीं ॥ काळभैरवाज्ञेमिसी दयासुळकीं ॥ १७ ॥ असो सिंधुराज कृतांत वर्ण ॥ भैरव हस्तीं मरण पावला भिन्नभिन्न ॥ ऐसी पूर्वदिशा आक्रमोन ॥ काळभैरी उभयतां निघाले ॥ १८ ॥ गंडभैरव काळभैरी ॥ वाजवित निघाले विजय भेरी ॥ वाद्यध्वनीसी विजय गजरीं ॥ श्रीयालयासी पातले ॥ १९ ॥ येऊनि वंदिलें बाद्रिविहारा ॥ सिंधु कथनार्थ कथिलासारा ॥ तैं नाथें गौरविलें उभय वीरां ॥ अमृतोत्तरीं वस्त्राभरणीं ॥ २० ॥ तंव येरीकडे क्षतांग निशाचर ॥ पातले संह्याद्रि मैनागिरीवर ॥ ह्मणती जैसा ह्मैषासुर ॥ तैसाचि सिंधुराज पराक्रमी ॥ २१ ॥ गंडभैरव काळभैरी ॥ निनाई श-

क्तिसिद्ध परिवारी ॥ यांणीं युद्ध केलें घोरांदरीं ॥ सिंधुराक्षसा सवें पैं ॥ २२ ॥ तीन दिवसांचे आस्तमानीं ॥ सिंधुराज तुज तारणी ॥ शिरटोप पालथा पडला धरणीं ॥ ब्रह्मास्त्रें करोनियां ॥ २३ ॥ मुगुट पडतां भूमिकेसी ॥ सिंधु धांवला मोकळे केशीं ॥ हस्त घांसोन भूमिकेसी ॥ गदा घेवोन धांवला ॥ २४ ॥ काळखड्ग घेऊन गंडभैरी ॥ उभय युद्ध करितां घोर समरीं ॥ सिंधूचें शिरच्छेदिलें स्वकरीं ॥ गंडभैरवें निकुरें ॥ २५ ॥ खड्गधारेसी उडालें ॥ पंचगंगा तटाकीं पडलें ॥ शिरातून दैत्य उद्भवले ॥ सिंहशार्दूल प्रतापी ॥ २६ ॥ ते उभय दैत्य घोरांदरें ॥ युद्ध करोनि भयंकरे ॥ काळभैरवें खड्गधारें ॥ संहारिलें उभयतांसी ॥ २७ ॥ रक्ता पासोन सहाजण ॥ दैत्य उद्भवतां बळसंपन्न ॥ हें पाहोनि निनादि शक्तिसिद्धानें जाण ॥ साहीजणासी वधियेलें ॥ २८ ॥ सिंधुराज कबंध ग्रीवेतूनी ॥ अष्टदैत्य प्रताप तरणी ॥ उद्भवले हें नवल त्रिभुवनीं ॥ कीर्ति कोंदली अपार ॥ २९ ॥ ह्मैषासुराहूनि दारुण ॥ युद्ध केलें अतिनिर्वाण ॥ परी ते खवळले पचानन ॥ काळभैरव गंडभैरी सिद्ध शक्ती ॥ ३० ॥ न भूतो न भविष्यति ॥ सारांश राक्षसा जाहली शांती ॥ अपेशाची घेऊन बुंथी ॥ सिंधुराज पहुडला रणमंदिरीं ॥ ३१ ॥ करवीर रत्नाद्रीचे चतुष्कोनी ॥ व्यापिलें भैरवशक्ति वाहिनी ॥ वरुणा कृष्णा संगमा पासोनी ॥ पंचगंगेहून श्रीयालया पर्यंत ॥ ३२ ॥ हें ऐकोनि करवीर आणि रत्नासुर ॥ खेदकरोन ह्मणती अपार ॥ खचोनि पडिला आजि दिवाकर ॥ महत्प्रतापी धुरंधर स्वशाखी ॥ ३३ ॥ सिंधुराज आणि ह्मैषासुर ॥ हे माझे भुजदंड प्रचंड धुरंधर ॥ ते खंडिले हिमकेदारें ॥ शक्तिकुठारें करोनीयां ॥ ३४ ॥ जेवीं शरीरासी युग्मलोचन ॥ गेलिया अंध जाहलें त्रिभुवन ॥ कीं चरणखंडिल्या खुंटलें गमन ॥ तेवीं जाहलें मजलागीं ॥ ३५ ॥

ऐसा करीतां महाशोक ॥ तयाला करावयालागीं अशोक ॥ रक्तभोजनाचा कुळदीपक ॥ षोडशोध्यायीं वदे तें एकावें ॥ ३६ ॥ पुढील कथामृत मिष्टासी ॥ सेवितां संतोष होय शिष्टांसी ॥ असंतोष अविस्मय अनिष्टांसी ॥ त्यांच्याही कष्टांसी हारपती ॥ ३७ ॥ येथें अहंपणाची भावना ॥ श्रीनाथासी पाहिले पासोन भावेना ॥ ह्मणोन केदारविजयार्थीं भावना ॥ पस्तीसपात्रीं भरियेली ३८ ॥ नाथ वामहस्तींचा अमृत बिंदू ॥ सेवितां हरिजना परमानंदू ॥ कीं हरिकीर्तनाचा उगवला इंदू ॥ श्रीनाथ करुणासिंधु पासोनी ॥ ३९ ॥ इति श्री केदारविजय तुरंग ॥ बैसोन करील दुरितदल भंग ॥ संत मुनिजन अंतरंग ॥ जोतिलिंग भुजंगी ऐक्य विधिहरिहर ॥ ४० ॥ द्वादशलिंगांकित सुमनोहरीं ॥ भस्मांकित बद्रिविहारी ॥ श्रोत्या वक्त्याचे संशय हरी ॥ पंचदशांमृत लहरी सेवितां गोड ॥ १४१ ॥ इति श्री केदारविजय भविष्योत्तरें ॥ पद्म पुराण ब्रह्मांड पुराण विरचितायां ॥ सिंधुराज वधनोन्नाम ॥ पंचदशोध्याय गोडहा ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ श्रीराम जयराम जयजयराम ओंव्या ॥ १४२ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय किष्किंदाधीश शरशासना ॥ किरण सहस्रवंश निकेतना ॥ किलकं सबीजाक्षर स्वरव्यंजना ॥ कीर्ति यशवर्धना ज्योतिस्वरूपा ॥ १ ॥ खिलाखिल त्रिगुणाकारा ॥ खिन्न चिदानंदकरा ॥ खिकीया मकारान्वय उकारा ॥ खिखीकाम पिवेघसा ॥ २ ॥ गीत संगीत गानगोचरा ॥ गीताशास्त्र रहस्यसारा ॥ गीर्वाण शब्द व्याकरण विवरा ॥ ग्रध्रासुरारि प्रियमानसा ॥ ३ ॥ घीघी घुमरु तुरंग चरणा ॥ घीवरी परियाप्त रसिक रसना ॥ घीगांघुरडमरगर्जना ॥ घींकार रसोत्पत्ति सप्तस्वरा ॥ ४ ॥ मचपिमानसाकारमानसोल्हासा ॥ मदनांतक प्रियचंद्रांशा ॥ मन्निष्टं कंटक शूलघृताशा ॥ मनपिकांचनदशा मोहनी ॥ ५ ॥ चित्त स्वस्थोपिकारका ॥ चिंतार्णवारि शोकोपि अशोका ॥ चिंतनाकार अचिंतका ॥ चिंतामणि तुरंगम वाहना भुजंगमा ॥ ६ ॥ छचार तत्वपदरजां वांछीं ॥ छैयाकार सकळी मन इच्छी ॥ छकार रकार विरंची ॥ छपन्न सहस्र शतसहस्रया ॥ ७ ॥ जीर्णोद्धारा जगत्रय-जीवना ॥ जीत घननीळ जलदवर्णा ॥ जिंकिलें राक्षसदल मंजल खंजना ॥ जीव शिवा जीवन तूं एक ॥ ७ ॥ झर्झरोदक निर्जराधीपा ॥ झिंझाडोन दमिसी दैत्य दर्पा ॥ झकार वर्षाऋतुस्वरूपा ॥ झिजसी चंदनागर संदोपसंदीं ॥ ९ ॥ टिकला कपाळीं नवकेशरी ॥ टिकले कोटिचंद्रार्क मुकुटावरी ॥ टिकली पीतकपोली इंदुवहकुमरी ॥ टीकाकार यदर्थीं केदारविजयीं ॥ १० ॥ ठिकुड जडलेसी जगनग हेमा ॥ ठिकी पडेनासी निगमागमा ॥ ठिकाण तुज सत्समागमा ॥ ठिलिया दधिघृताची करविसी ॥ ११ ॥ ढिंग्र विघ्नादंलंकार निबिडीं ॥ डिकार दैत्य वधिसी प्रौढीं ॥ डिंगर होऊन उच्छिष्ट सावडी ॥ डिमिडिम नादा प्रियकरा ॥ १२ ढासाळ वानर वधिसी करें ॥ ढिवरवंशज तो वनचर ॥ ढिग केलेसी पर्वताकार ॥ ढिल्ल न होसी भक्तसंकट हरा-


अध्याय १६ वा
कालभैरव, गंडभैरव व हनुमन्त यांनी पुष्कर विमानाचा भंग केला.
कालभैरव
पुष्कर

वया ॥ १३ ॥ निर्गुण निरूपम जगदांकुरा ॥ निष्कर्मी निगमागमा अगोचरा ॥ निर्विकल्प कल्पतरूवरा ॥ निंदास्त द्वेषोपहारका ॥ १४ ॥ तीर्थमाहात्म्य जनीं विस्तारा ॥ तीक्ष्णशरीं हत दशकंदरा ॥ तीव्र दैत्य कौरवसंहारा ॥ त्रिगुणगुणमय सगुणभरिता ॥ १५ ॥ स्थिति पालन संहारका ॥ स्थित्वा जगत्पद्मीं ऐक्या ॥ स्थिरचरपटींतंतु स्फटिका ॥ थिदळें दैत्य घृत स्वाग्निवेषा ॥ १६ ॥ दीनानाथ दीनबंधु ॥ दीनोद्धारक कृपासिंधू ॥ दीनदयार्णवा अर्चन इंदू ॥ दीर्घायु अकल्पवरा दितिदल भंजना ॥ १७ ॥ धीर वीर शौर्य उदारा ॥ धीमंत सागरा चंद्र चकोरा ॥ धिमकिट् धिलांग सप्तस्वरा ॥ धींधीं मृदंग मृदुरवा ॥ १८ ॥ निर्जरोदक जटाधारणा ॥ निर्जरेश दशशतमुख शयना ॥ नित्य नूतन गुणानिर्गुणा ॥ निजानंदघना निजबींजांकुरा ॥ १९ ॥ पीतोत्पल दल मुगुटतंसा ॥ पिनाकधर मुनिमानसहंसा ॥ पीतवर्ण कुंडलाभासा ॥ पिंगला इडा सुषुम्ना स्वरभूषणा ॥ २० ॥ फिटला संदेह तवगुण पठणें ॥ फिरली वासना विषयभजनें ॥ फिकाम्रृत रस हरिकीर्तनें ॥ फिकार बीज आकारका ॥ २१ ॥ बिंबाबिंबप्रातिबिंबका ॥ बिल्वदळ त्रिगुण प्रिय त्रियंबका ॥ ब्रीदावळी पढतां वेद झाले षण्मुखा ॥ बीज वटपत्रदलशयना ॥ २२ ॥ भिन्नभिन्न वर्णावर्णा ॥ भिक्षार्थी धृतरूप बटुवामना ॥ भीष्मप्रतिज्ञार्थीं धृतसुदर्शना ॥ भीमार्जुना संरक्षिसी ॥ २३ ॥ मीन कुर्म वराह सिंव्हा ॥ मीन पिपीलिका विहंगमजिव्हा ॥ मिमांस तर्क भाष्य व्याकरणी कृत्वा ॥ मित्र किरणा पुराणपुरुषा ॥ २४ ॥ इतिहास पुराण कथार्थ विवरा ॥ इंद्रजित दमनीं भूधरावतारा ॥ यतीवर हंसपद परंपरा ॥ इंद्रियचाळका आडवी हुतांशा ॥ २५ ॥ ऋषि मुनिगण भूसुरवरा ॥ ऋत्विज ऋतु स्वाहा स्वधाकारा ॥ ऋचाघोष वेदउच्चारा ॥ रिक्ताहारार्थीं अकार बीजा ॥ २६ ॥ लिहिलें पाहिलें पुसोन भा

ळीं ॥ लिहिसी भक्तांचे अक्षय कपाळीं ॥ लिप्त सद्भक्तांचे ह्रदयकमळीं ॥ लीन होसी युगायुगीं ॥ २७ ॥ विषमोपमा विषामृतकरा ॥ विलासान्वय चंद्रार्थ धृतशेखरा ॥ विश्वावसु विष्णुअवतारा ॥ विश्वासफल विद्वाना विद्वज्जना ॥ २८ ॥ लिंगदेह स्फुलिंग किरणा ॥ लिंगणीफळी अकारवर्ण अपर्णा ॥ लिंगार्चन प्रिय चत्वारीवर्णा ॥ लिंगांकित सर्वांग भूषिता ॥ २९ ॥ हिमकेदार हिमनगवासा ॥ हिरवा कनकांबर प्रियसुवासा ॥ हिरवा अवतार विमलांबुजी मायावेषा ॥ हिलालाक्षा पौगंडऋषिकुमरा ॥ ३० विमलांबुजी करसंपुटीं जनना ॥ विषाळाक्ष पौगंडऋषिनंदना ॥ विश्वामित्र मखरक्षणा ॥ विज्ञान ज्ञानी सांख्य बोधका ॥ ३१ ॥ क्षिराब्धिनंदन प्रियकरा ॥ क्षीरनीर निवाड चतुरा ॥ क्षीण करोनि राक्षस समरा ॥ क्षीरसिंधु देशी उपमन्या ॥ ३२ ॥ दीर्घस्वर रहस्य बत्तीसाक्षरी ॥ गुंफोन हरिखें परिमळलहरी ॥ ते गळां घालितां हिमकेदारी ॥ हरिजन कैंवारि शोभला ॥ ३३ ॥ ॐकार बीजत्रय स्वरव्यंजन ॥ सभेत बैसला चंडांश किरण ॥ योगीमानस मनरंजन ॥ जेवीं अष्टादशपद्मीं रामशोभला ॥ ३४ ॥ ऐसा अनादि परमेश्वर ॥ भैरव सभेंत राजोपचार ॥ बैसला धीरवीर उदार ॥ हिमकेदार सगुणनिधि ॥ ३५ ॥ राम अवतारींचें अठरा जुत्पती ॥ तेचि अष्टादश भैरव भद्रजाती ॥ नाथें पाचारोन वयांप्रती ॥ सार वचन वदतसे ॥ ३६ ॥ रक्तभोजनाचा जो कुमर ॥ महापराक्रमी निशाचर ॥ युद्ध करावया घोरांदर ॥ आजि येतील रणांगणीं ॥ ३७ ॥ राक्षसी मायेचिये विमानीं ॥ बैसोन येतील प्रतापतरणी ॥ त्यां सवें युद्ध शूरसंधानीं ॥ करितां अजिंक्य राक्षस ॥ ३८ ॥ मायाविमानीं बैसोनि दैत्य ॥ युद्ध करितां त्रासील सत्य ॥ शर वर्षतील अगणित ॥ भैरवदळीं जेवीं जळधर ॥ ३९ ॥ असो मायीकराक्षसी विमानें ॥ भंगोनि सांडावीं बहुत प्रयत्नें ॥

॥ त्याचें वर्म वायुनंदन ॥ जाणे विमान भंगावया ॥ ४० ॥ हनुमंतासी त्या ठाउक्या खुणा ॥ समयोचित करून विचारणा ॥ युद्ध करोन निर्वाण रुधिरोचना ॥ आकाशभैरवें वधावा ॥ ४१ ॥ धीरोचन वधावा काळभैरवें ॥ अवकाश न घेतां धांवा एकलवें ॥ तरीच रुधिरोचनाचा जाईल जीव ॥ आज पासोन तृतीय दिवशीं ॥ ४२ ॥ वर्में कर्में निवारणें ॥ नाना युद्ध गति साधनें ॥ बोधोन काळभैरवादि वायुनंदनें ॥ बादल भैरवादि कमल भैरवा ॥ ४३ ॥ ऐसें बोधोन चौघांजणां ॥ सवें देवोन भैरवीसेना ॥ गौरविलें कनकाभरणा ॥ बद्रिनाथें आवडी ॥ ४४ ॥ तंव येरीकडे मैनागिरीवरी ॥ रक्त भोजादि रत्नासुरीं ॥ बैसोन निशाचर परिवारीं ॥ दीर्घ विचारीं वदतसे ॥ ४५ ॥ सिंधुराज आणि ह्लैषासुर ॥ हे प्रचंड जैसा मेरूमांदार ॥ शक्ति चपळा भैरवी वज्र प्रहर ॥ चूर्ण करोन नाथें टाकिले ॥ ४६ ॥ असो हे प्रबळ बळेंसी निशाचर ॥ समरीं वधावया धाविन्नले बद्रिविहार ॥ एकदांही भैरव वीर ॥ मरण पावला नाहीं तव करीं ॥ ४७ ॥ ऐसें वदतां रत्नासुर ॥ तैं उत्तर बदला पुष्कर ॥ घोर युद्धीं ह्लैषासुर ॥ बद्रिविहारासी पराभवील ॥ ४८ ॥ पराभविलें भैरव भारें ॥ पर्वत पात हिमकेदारें ॥ केला शक्ति सहित अनिवारें ॥ हें प्रत्यक्ष दृष्टी पाहिलें तुवां ॥ ४९ ॥ एकरूपी विधिहरिहर ॥ चौथा जमदग्नि स्वावतार ॥ ऐसा जाज्वल्य त्रिगुणावतार ॥ जो श्रीनाथ अवतरला ॥ ५० ॥ ज्याचे ल्हदयीं अनंत त्रिभुवनें ॥ सांठऊन वटपत्रीं करी शयन ॥ इच्छामात्रें चतुर्दश भुवन ॥ अनंत स्वरूपें रचितसे ॥ ५१ ॥ ऐसा अनादि स्वरूपी दिगंबर ॥ धरूनि जामदग्नि अवतार ॥ शक्ति सहित भैरवभार ॥ युद्धासाठीं जो पातला ॥ ५२ ॥ जयाचीं खदिरांगार नयनें ॥ सांडितां दग्ध होती त्रिभुवनें ॥ तो ह्लैषासुर श्रृंगें ताडणें ॥ पर्वतातळीं पडियेला ॥ ५३ ॥ याहून कवणती करावी करणी

॥ हेंतु सांगतां निवडूनी ॥ तुमची कीर्ति व्हावी त्रिभुवनीं ॥ ह्मणोनि पर्वतपाता दाखविलें ॥ ५४ ॥ परिसोन पुत्राचें परनिष्ठ वचन ॥ तथास्तु ह्मणे रुधिरोचन ॥ पुष्कराहोन शतगुण ॥ रुधिरोचन ऐसेंचि बोलिला ॥ ५५ ॥ ऐकोन उभय पुत्राची वाणी ॥ रत्नासुरें धिःकारलें तीव्र भाषणीं ॥ मम वंशज होऊन हीन करणीं ॥ व्यर्थ भूमी भार झालेती ॥ ५६ ॥ विरोध धर्माचरण सारें ॥ नसेविसी तूं वंशज कसारे ॥ भजन स्तवनाचे पसारे ॥ मज विस्तारोन दाविसी ॥ ५७ ॥ कैंचा देव कैंसा धर्म ॥ बोलिसी तितुका घडे अधर्म ॥ करोनियां घोर संग्राम ॥ नाथ कल्पद्रुम समूळ उपडावा ॥ ५८ ॥ आणोन लावावा संह्यांद्रीवरी ॥ आपुली कीर्ति विस्तारावी महीवरी ॥ तीव्र युद्ध करोन समरीं ॥ हिमकेदारी जिंकावा ॥ ५९ ॥ आमुचे वीर्यज असाल जरी ॥ देवांसी जिंकाल घोर समरीं ॥ हें परिसोन रुधिरोचन पुष्करीं ॥ ह्रदयांतरीं संतापले ॥ ६० ॥ प्रतिज्ञा करोनि तें त्रिवर्ग ॥ घेऊन थोरथोर आप्तवर्ग ॥ धनुष्यबाण पाश पट्टिश खड्ग ॥ एकाक्ष देशींचें राक्षस अतिरथी ॥ ६१ ॥ एकाक्ष देशींचा जो भूपाळ ॥ पुष्कराचा जो मातुळ ॥ चंद्रसेनाचा बंधु प्रबळ ॥ यक्षराज बळ सिंधु ॥ ६२ ॥ यक्षा सहित यक्षराज ॥ सर्व घेऊन राक्षस फौज ॥ पुष्कर रुधिरोचनानुज ॥ पावक तेजें निघाला ॥ ६३ ॥ वंदोन रत्नासुर रक्त भोजना ॥ चतुष्टय निघाले घनगर्जना ॥ भूमी सारोन रणांगणां ॥ भैरवदळासी पाचारिती ॥ ॥ ६४ ॥ हें पाहोन शंखभैरी ॥ पळत पातला भैरवभारीं ॥ विमानयानीं राक्षस परिवारीं ॥ घनघोरेंसी पातले ॥ ६५ ॥ संह्याद्रि पासोन ओहरीं ॥ विमानयानीं राक्षस परिवारीं ॥ युद्ध करावया घोर समरीं ॥ पुष्कर रुधिरोचन पातले ॥ ६६ ॥ एकयोजन विमानयानीं ॥ पुष्कर पातला सहवाहिनी ॥ जेवीं इंद्रजित रामायणीं ॥ रामचंद्रावरी घनघोरें

॥ ६७ ॥ तैसे पातले चार असुर ॥ रुधिरोचन धीरोचन पुष्कर ॥ यक्षराक्षसादि राजकुमर ॥ विमानयानीं पातले ॥ ६८ ॥ कमळभैरव ह्मणे देवा ॥ यक्ष राक्षस हा कवण सांगावा ॥ विमानयानांवरींचा दिवा ॥ चारी समानदिसती ॥ ६९ ॥ कमल भैरीसी श्रीकेदार ॥ ह्मणे रक्तभोज रत्नासुर ॥ वधिल्या नंतर सविस्तर ॥ एकादशी अरुयानीं सांगेन ॥ ७० ॥ महा पराक्रमी हे चतुष्टय ॥ विमानांवरींचे प्रतापसूर्य ॥ उगवेल त्यांतें प्रताप शौर्य ॥ हनुमंतें युक्तीनें वधावे ॥ ७१ ॥ आतां भैरवचमू घेऊन सर्व ॥ हनुमंत आणि काळभैरव ॥ कमळ भैरव गंडभैरव ॥ पराक्रम दीपिका उजळावी ॥ ७२ ॥ परिसोन नाथ मुखींची वाणी ॥ सज्जिली भैरव वाहिनी ॥ वाद्य ध्वनि गर्जती मेघ ध्वनी ॥ राक्षश्रेणी ह्रदयस्फोट ॥ ७३ ॥ काळ भैरवेसी हनुमंत ॥ तीव्र चमूसी बळ अद्भुत ॥ वाद्य ध्वनिसी गर्जना करित ॥ उभे ठाकले रणांगणीं ॥ ७४ ॥ संह्याद्रीच्या समसमान ॥ महीपासोन अर्ध क्रोश उंच प्रमाण ॥ लांब रुंद एकयोजन ॥ माया विमान राक्षसी ॥ ७५ ॥ लक्ष्मी ह्मणे हे खळेश्वरा ॥ केव्हडें कपट राक्षसी वोडंबरा ॥ जेवीं अशाश्वत संसार सागरा ॥ सत्यच वाटे संसारिकां ॥ ७६ ॥ विरक्तातें न सागर पाही ॥ कदापि न बुडे संसार डोहीं ॥ तैसें हनुमंतें लक्षोन पाहीं ॥ काळ भैरवासी वदतसे ॥ ७७ ॥ काळभैरव गंडभैरी ॥ होईजे कल्पांतभैरवाकारी ॥ वेष पालटावे बादलभैरी ॥ सपक्ष पर्वताकारी होईजे ॥ ७८ ॥ यक्ष खेचर यक्षासहितें ॥ वेगळोन करावें युध्दातें ॥ गंडभैरवाचेनि हस्तें ॥ एकाक्ष यक्षा वधावें ॥ ७९ ॥ पुष्कर आणि वद्रिविहारी ॥ युध्द करतील घोर समरीं ॥ युद्धीं स्तब्ध झाल्या हिमकेदारी ॥ तें काळभैरवें पुष्करासी वधावें ॥ ८० ॥ रुधिरोचन धीरोचन ॥ अकाशभैरवें करावें हनन ॥ चत्वारी वीर वधावे चौघेजण ॥ मीं राक्षसांसी विध्वंसितों ॥ ८१ ॥

ऐसा करोनि दृढ विचार ॥ युत्धा खवळले भैरवभार ॥ वर्षती शरांचे जळधर ॥ राक्षसयानावरी घनगर्जे ॥ ॥ ८२ ॥ महीपासोन अर्धक्रोश ॥ यानराक्षसीं रण कर्कश ॥ युद्ध केलें एकवीस दिवस ॥ मेघवर्णी शरीरीं ॥ ८३ ॥ वरुणा नदीचे दक्षिण तीरीं ॥ मागले पासोन मोहरी ॥ भैरवदळ गांजिलें निशाचरीं ॥ हें बद्रिविहारीं देखिलें ॥ ॥ ८४ ॥ हनुमंतासी ह्मणे हे रुद्रावतारा ॥ शरणांगतासी वज्रपंजरा ॥ विमान विध्वंसूनि निशाचरां ॥ महीवरी समदळीं दाखवीं ॥ ८५ ॥ ऐसें ऐकोन हनुमंतें ॥ पुच्छ चालविलें विमानपंथें ॥ भुभुकारें गर्जना करित ॥ विशाळरूपी अवगला ॥ ८६ ॥ हें लक्षोन एकाक्ष पुष्करें ॥ रुधिरोचनें सत्वरें ॥ युद्ध करावया घोर समरें ॥ पवनात्मजावरी लोटले ॥ ८७ ॥ हातीं घेऊनि पर्वत शिखरें ॥ हनुमंतासी ताडिती निकुरें ॥ तें न मानोन वज्र शरीरें ॥ विमान वुच्छीं अकर्षिलें ॥ ८८ ॥ पुच्छीं कर्षोन राक्षसयान ॥ महीवरी आहाटितां सहस्त्र चुर्ण ॥ होतां राक्षस झाले जीर्ण ॥ फडत्कारीं पुच्छाग्रींच्या ॥ ८९ ॥ वज्रदेही वज्रहस्तें ॥ ताडितां राक्षस होती प्रेतें ॥ हें पाहोन महापवेंतें ॥ सपक्ष चौघे पातले ॥ ९० ॥ बादल भैरवेसी रुधिरोचन ॥ युद्ध करितसे निर्वाण ॥ कमळभैरव एकाक्षगण ॥ धीरोचन काळभैरव युद्ध करिती ॥ ९१ ॥ पुष्कर आणि बद्रिविहारी ॥ युद्धीं खवळले कृतांताकारी ॥ तें दणाणिली ब्रह्मांडोदरी ॥ नाथ पुष्कर समायुद्ध होतां ॥ ९२ ॥ रुधिरोचन महाकाळ ॥ गर्जनें गाजवी ब्रह्मांड गोळ ॥ आकाश भैरवासी वदे निश्चळ ॥ जंबूक किंवा रे सिंह आह्मीं ॥ ९३ ॥ भीमाशंकरीं तीव्रपणीं ॥ म्हणे वदसी आपुले वदनीं ॥ तें सत्य करोन दावीं समरंगणीं ॥ आकाश भैरव सम रणातें ॥ ९४ ॥ तें बालभैरव ह्मणे रुधिरोचना ॥ शिष्टाईसी येवोन हीन वचना ॥ वदलासी जो बाष्कळपणा ॥ तितुकेंचि ताडणपण पावसी ॥ ९५

तेचि समयीं पावतासी मरणा ॥ परि एक मंडळहोती आयुष्य गणना ॥ ह्मणोन तेथें वांचलासी प्राणा ॥ येरवीं तात्काळ मरण पावतासी ॥ ९६ ॥ त्या एकमंडळाच्या आजि दिवसा ॥ तुझिया करावया आलों प्राण नाशा ॥ ह्मणोन विमानीं या मृत्यु फांसा ॥ घालोन तुज काळें वोढिलें ॥ ९७ ॥ माझिये हस्तीं तुज मरण ॥ पावसी युद्धीं निर्वाण ॥ ह्मणोनियां तीव्र संधान ॥ बादलभैरी करितसे ॥ ९८ ॥ तैं रुधिरोचन महाबळी ॥ बादलभैरवाची शराग्निजाळी ॥ करतळीं करोन रांगोळी ॥ भैरवफळी मोडिली ॥ ९९ ॥ रुधिरोचन धीरोचन ॥ यक्ष पुष्कर चौघे जण ॥ युद्ध करितां अति दारुण ॥ भैरवी सेना पराभविली ॥ १०० ॥ वीससहस्र भैरवगण ॥ रणीं पाडी रुधिरोचन ॥ पुष्करें ही युद्ध करोन दारुण ॥ षोडस सहस्र मारिले ॥ १०१ ॥ हें पाहोन श्रीनाथें ॥ अमृत घेवोन वामहस्तें ॥ शिंपोन उठविले भैरव समस्त ॥ कृपामृतें श्रीकेदारें ॥ २ ॥ भैरवी चमू उठवोन नाथनिरंजन ॥ तिरस्कारिलें भैरवसैन्य ॥ ह्मणे वधावें आजि चौघे राक्षस गण ॥ संग्राम करोन भयंकर ॥ ३ ॥ रुधिरोचनाचे शस्त्रप्रहारें ॥ जर्जर झाले भैरवभार ॥ राक्षस घायीं शतजर्जर ॥ पुनरपि झाले भैरव दळपती ॥ ४ ॥ पुष्कर आणि बद्रि विहारी ॥ युद्ध केलें ऐसेंचि दिनचत्वारी ॥ अग्नि पर्जन्य पर्वत वात चक्रधारी ॥बाणधारीं वर्षती ॥ ५ ॥ शस्त्रें अस्त्रीं अनेक वर्णीं ॥ वर्षला दारुण रणांगणीं ॥ काळभैरव वर्षतां स्फुलिंग किरणीं ॥ महा कल्पांत वर्षला ॥ ६ ॥ तैसाचि धीरोचन आकाश भैरी ॥ शस्त्रास्त्रीं जझुती घोर समरीं ॥ ऐसें तीन दिवा शार्वरी ॥ निर्वाण युद्धीं झुंजती ॥ ७ ॥ तिसरेदिवशीं अस्तमानीं ॥ उभय मीनले झोट धरणी ॥ वोष्ट चावोन ऊर्ध्व दशनीं ॥ मत्तद्विरदापरी खवळले ॥

॥ ८ ॥ घाय मारितां परस्परें ॥ दणाणिलीं गिरिकंदरें ॥ हस्तप्रहारें वाहाती रुधिरें ॥ पर्वत कंदरी सारखीं ॥
॥ ९ ॥ असो ऐसा संग्राम दारुण ॥ केलिया आकाश भैरवें जाण ॥ चरणीं धरोन रुधिरोचन ॥ चक्राकृति फि-
रविला ॥ १० ॥ सहस्र फेरे चक्राकृती ॥ करोन त्राहाटिला तीक्ष्ण क्षिती ॥ तें चूर्ण होवोन पडल्या अस्थि ॥
रुधिरोचनाच्या समरंगणीं ॥ ११ ॥ बादल भैरवाचेकरीं मरण ॥ ये रीति पावला रुधिरोचन ॥ ऐसेंचि युद्ध क-
रितां सत्राण ॥ धीरोचनासी वधील काळभैरी ॥ १२ ॥ कमळ भैरव एकाक्ष खेचरें ॥ कपिलतिर्थीं वधिला
निकुरें ॥ गणेशदरा हें विश्वोत्तरें ॥ कपिलाश्रम त्यासी ह्मणती ॥ १३ ॥ कपिलाश्रमीं कमळभैरवें ॥ एकाक्ष खेचर मा-
रिला जीवें ॥ त्याच्या पूर्वजान्वयें अभिनवें ॥ एकादशी कथार्थ विस्तारिला ॥ १४ ॥ तें रत्नासुर वधोत्सवा अंतीं ॥
एकाक्ष खेचराची वंशोत्पत्ती ॥ एकादशीकथा सूत शोनकाप्रती ॥ वदेल अगस्ति पुढारें ॥ १५ ॥ असो ऐसें
दोघे असुर ॥ युद्ध करोनी घोरांदर ॥ मृत्यु पावला तिसरा असुर ॥ भैरव हस्तीं समरंगणीं ॥ १६ ॥ कमळभै-
री काळभैरी करोन मार ॥ तिघे बधिले क्रूर निशाचर ॥ हें लक्षोन राजकुमर ॥ राक्षस पुष्कर क्षोभला ॥ १७ ॥
अथर्वणीं वेदाब्धिचीं रत्नें ॥ आवाहनिलीं पुष्करें प्रयत्नें ॥ निमिषार्धांत राक्षसी यानें ॥ निर्माण केलीं भयंकरें
॥ १८ ॥ हें पाहोन अनाथ नाथा ॥ आश्चर्य गमलें परम चित्ता ॥ ह्मणे हें पुनरपि यान हनुमंता ॥ करोनि रा-
क्षस बैसला ॥ १९ ॥ कुंभकर्णासारखा पराक्रमी ॥ त्वां चरणी धरोन फिरविला संग्रामीं ॥ तेथें पुष्कर भयाची
ऊर्मी ॥ तणप्राय तुज मीं जाणतसें ॥ २० ॥ हें पाहोन अंजनीकुमर ॥ कोपें खवळला अतिदुर्धर ॥ ह्मणे स्तब्ध
कां झाला हिमकेदार ॥ कवण विचार कळेना ॥ २१ ॥ पुष्कर बैसोनियां विमानीं ॥ युद्धा पातला प्रताप तरणी

॥ ऐसें पाहोन खड्गपाणी ॥ कल्पांत भैरवाकारी खवळला ॥ २२ ॥ अश्वारूढ त्रैलोक्यनाथ ॥ जाहल्या नंतर हनुमंत ॥ ऊर्ध्वे उडोन गगनपंथ ॥ लांगूलें आकर्षिलें विमानासी ॥ २३ ॥ सहस्त्रफेरे चक्राकारी ॥ राक्षसयानें गगनोदरीं ॥ फिरवोनि त्राहाटिलीं महीवरी ॥ रुद्रावतारें निजबळें ॥ २४ ॥ राक्षसयानें भंगितां रणीं ॥ पुष्कर पडिला रणांगणीं ॥ सवेंचि उठिला सांवरोनी ॥ बाण पर्जन्य वर्षला ॥ २५ ॥ घेघे घर्घराट यावचनीं ॥ नाथें बांधिला सहस्त्र बाणीं ॥ हें पाहोन खड्गपाणी ॥ त्रिकोश वर्णी धांवला ॥ २६ ॥ खड्गधारीं बाणजाळीं ॥ खंडोनि पाडिलीं भूमंडळीं ॥ त्या वरी ब्रह्मास्त्र सोडोन नभमंडळीं ॥ प्रकाश कोंदला दशदिशा ॥ २७ ॥ निरोदकी निराहारी ॥ युद्ध करितां रात्रचत्वारी ॥ श्रमी झाला हिमकेदारी ॥ हनुमंता सहित समदळीं ॥ २८ ॥ तैं पुष्करावरी ब्रह्मास्त्र ॥ नाथ टाकितां बीजमंत्र ॥ त्यावरी काळभैरवाकार यंत्र ॥ पुष्करावरी सोडिलें ॥ २९ ॥ हें पाहोनियां पुष्कर ॥ मागें परतविला स्वसैन्यभार ॥ सव्य घालोन संह्याद्रि गिरिवर ॥ वृषभाकार झाला ॥ ३० ॥ तैं पाठी लागला काळभैरी ॥ तों पुष्कर दिसे वृषभाकारी ॥ युद्ध करोन घोरांदरीं ॥ पुष्कर वधिला काळभैरवें ॥ ३१ ॥ काळभैरवासी पुष्कर ह्मणे ॥ आमुची चालवीं नामाभिदानें ॥ नाथा सन्मुख देई स्थानें ॥ तीर्थी सुस्नात त्रिभुवन करावें ॥ ३२ ॥ ऐसी परिसोन पुष्कर वाणी ॥ तथास्तु ह्मणे भैरव वचनीं ॥ जेवीं कृतायुगीं पुष्कर तीर्थ मेदिनी ॥ तैसेंचि तव नामाचें पुष्कर तीर्थ ॥ ३३ ॥ तो तीर्थ महिमा सुरस पुढारें ॥ संती परिसावा सविस्तारें ॥ असो काळभैरवाचे करें ॥ पुष्करासी वधविलें शौनका ॥ ३४ ॥ पुष्कर युद्धीं वृषभाकार ॥ ह्मणोन तीर्थ गोमुख आकार ॥ ह्मणती समस्त नारी नर ॥ ह्मणोन वदती गोमुख ॥ ३५ ॥ जैसें कृतायुगीं तीर्थ पुष्कर ॥ तैसेंचि संह्याद्रि द-

क्षिणेसी साचार ॥ पुष्करतीर्थ गोमुख आकार ॥ काळभैरवें निर्मिलें ॥ ३६ ॥ काळभैरवें वधोन पुष्करा ॥ सैन्या
सी परतला माघारा ॥ वाजवित दिग्विजय नगरा ॥ कपिलाश्रमीं पातला ॥ ३७ ॥ कपिलाश्रमीं कमळभैरी ॥
उभय मिळोन महागजरीं ॥ दैत्य वधिले घोरसमरीं ॥ वीससहस्त्र निशाचर ॥ ३८ ॥ जाखले पासोन निशाचर-
फळी ॥ जावोन वधिले खळजाफळी ॥ जाय पळत संह्याद्रि फळी ॥ वर्तमान सांगावया ॥ ३९ ॥ असो मर्दोन
चौघे असुर ॥ विजयार्क झाला हिमकेदार ॥ भैरवभारीं जयजयकार ॥ दुंदुभि नादीं गजर जाहला ॥ ४० ॥
अस्ता पावतां दिवाकर ॥ जयवंत झाला हिमकेदार ॥ ह्मताप दीपिका अपार ॥ जयजयकारीं लागल्या ॥ ४१ ॥
कमळ भैरवेसी काळभैरी ॥ गर्जत पातले विजयभेरी ॥ येऊन वंदिला बद्रिविहारी ॥ काळभैरवादि आवडिनें ॥
॥ ४२ ॥ काळभैरव जैसा रवी ॥ कल्पांत भैरव तेज मिरवी ॥ तैं श्रीनाथ भैरवासी गौरवी ॥ कनकाभरणीं अ-
पारें ॥ ४३ ॥ पुष्कर रुधिरोचनाचे शर ॥ क्षतव्याप्त झाले भैरवभार ॥ ते सर्व नाथें कृपामृततुषार ॥ सावध
केले सर्वही ॥ ४४ ॥ ऐसा श्रीनाथ भक्तमनोरथी ॥ विजय नोवरी वरीली सूर्यास्तीं ॥ सैन्यासहित केली वस्ती ॥
रणसागरीं विजय घोषीं ॥ ४५ ॥ पूर्व पश्चिम उत्तर दिशे ॥ दैत्य मारिले दक्षिणाधीशें ॥ ह्मणोन नाम ठेविलें
वेदव्यासें ॥ दक्षिणपति दक्षिण जयवंत ॥ ४६ ॥ आतां उदयीक संह्याद्रिवरी ॥ भस्मांकित जटाधारी ॥ मिरवेल
सूर्यप्रभाकरी ॥ बद्रिविहारी अरुणरंगी ॥ ४७ ॥ ते कथा परम चरितांमृत ॥ संतीं सेवावें सावचित्त ॥ रत्नासुर
वधोत्सवार्थ ॥ श्रीरवळनाथ येत रत्नागिरी ॥ ४८ ॥ इतिश्री केदारविजय कथा ॥ श्रवणार्थी पूर्णहोय मनोरथा ॥
संतीं सेविजे हरिनामामृता ॥ षोडशोध्याय सेवोत गोडहा ॥ १४९ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ओंव्या १४९ ॥ ९६

अध्याय १७ वा.



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीदक्षिण केदारेश्वरायनमः ॥ जय कुंभिनीवहन मंडित जंघना ॥ कुंकुमांकित क्रमणचरणा ॥ कुंदेंदुशंखरव स्फटिकवर्णा ॥ कुसुंबीहेमांबर मंडिता ॥ १ ॥ कुरंगनंदिनी तिलक भाला ॥ कुसुममंदारप्रिय अम्लान माळा ॥ कुर्मावलोकय दीनदयाळा ॥ कुरुकुशल श्रवणार्थी ॥ २ ॥ कुस्तो रत्नासुर वधोत्सव रूपा ॥ कुंतलमस्तकीं जटाकलापा ॥ कुशावतीं नीलपर्वत हेमाश्वत्थपादपा ॥ कुंभकर्णारि बिभीषण वरदा ॥ ३ ॥ कुमारी विमळांबुजकर उद्भवा ॥ कुज भगिनीवर कोदंडविभवा ॥ कुब्जाप्रिय मनमानस अनुभवा ॥ कुलोद्धार पौगंडऋषेश्वरकुमरा ॥ ४ ॥ कौसल्या नटनाटक सौदागरा ॥ कौशिकऋषिसुत शौनकगिरा ॥ कंस चाणूर संहारा ॥ कौरव दमना पांडवप्रिया ॥ ५ ॥ खुजटरूपधर बळीद्वारपाळा ॥ खुंटिली सत्याची जननमाळा ॥ खुळखुळ वाजविसी पैंजणवाळा ॥ खुळ्या केल्या व्रजांगना ॥ ६ ॥ गुरुनाथगुह्यमहत्व विस्तारी ॥ गूडभाषणार्थी निगमार्थ करी ॥ गूढ पिपीलिका मीन विहंगम प्रखरी ॥ गुजगुह्यशास्त्र बोधिसी पार्था ॥ ७ ॥ घुसळितां धरिसी रवी चहुंकरां ॥ घुमारा मायेसी मागसी वरा ॥ घुरटागौळणीसी रहस्य अंतरा ॥ घुंगट उघडिसी राधिकेचे ॥ ८ ॥ चुंबन आलिंगन व्रजोल्हासा ॥ चूडामणिराज परमहंसा ॥ चूर्ण करिसी शकटमायावेषा ॥ चुंवनीं पुतना शोषिली ॥ ९ ॥ ऐसा श्रीनाथ परमात्मा निर्मळी ॥ स्वयें अंगींचा काढोन मळी ॥ कीर्तिनामा भटतनु सांवळी ॥ श्रीनाथ रणमंडळीं निर्मिला ॥ १० ॥ त्यांसी बोधोन बत्तिसाक्षरीं कीर्ति उद्भट संह्याद्रीवरी ॥ बोधोन नाना रसिकोत्तरीं ॥ रत्नासुरासी करणार्थी धाडिला ॥ ११ ॥ तो सुभटकीर्ति वर्धमानें ॥ बत्तीस अक्षरींच्या उकारवर्णनें ॥ तो रत्नासु-
११ रासी भेटोन ॥ वर्णी तेंचि परिसावें ॥ १२ ॥ श्रीनाथाची कीर्ति उद्भटवर्णी ॥ ते ऐकावी गीर्वाणवाणी ॥ सज्ज-

नीं न ह्मणावें अगीर्वाणी ॥ श्लोकाधार हा पुराणार्थी ॥ १३ ॥ पुष्करनाथ करितां स्मरण ॥ शरीरधर्म मन नि-
मौन ॥ कीर्ति उद्भटबळवर्धन ॥ बत्तिसाक्षरीं असुरातें वदतसे ॥ १४ ॥ छुकारा पासोन क्षुकारी ॥ कीर्ति उद्भट
वर्णील वैखरी ॥ ते संतीं परिसावी स्वच्छांतरीं ॥ नाथ जगन्मयकीर्ति प्रथमाश्रमींची ॥ १५ ॥ छुटायो पौगंड
ऋषिको छावो ॥ छुंछं पैजण वाजत बावो ॥ छुटि नहीं गांट अयबे बनावो ॥ छुछु बरन परिहार ते हारो ॥ १६ ॥
जुगजगीं जीवन नाथनिरंजना ॥ झुंजार नाथा दैत्यदमना ॥ जुनाटरूपा मनरंजना ॥ जुंबाडराक्षस झुंजोन वधि-
सी ॥ १७ ॥ झुर झुर कृत दैत्यांतरीं ॥ झुलत ऐरावत भैरवभारी ॥ झुमत आवत हिमकेदारी ॥ झुगारीयो पु-
ष्कर समायुद्धीं ॥ १८ ॥ ये ये युद्धासी किशोर बनेये ॥ येवोन वंदीरे देवाच्या पहेये ॥ एकलक्ष ऐसींहिजार तुज
अवलये ॥ य ञे ञे करसी रत्नासुरा ॥ १९ ॥ युगा युगीं अवतार धरोन श्रीनाथें ॥ युथप युथप वीर मारोनि
रक्षिलीं अनाथें ॥ युवती षोडश सहस्राचे पूर्णमनोरथ ते ॥ युक्तीनें करोनी ब्रह्मचर्यतेजो आगळा ॥ २० ॥ टुकडे
पाडिले तव कुमरें शयनीं ॥ टुकटुक पाहाती राक्षस नयनीं ॥ टुकटुकी उरली हृदयभुवनीं ॥ टुम शद्बांची उरे-
ना ॥ २१ ॥ टुंटुण उडसी काय अर्जुनी ॥ टुणका बैसवील खड्गपाणी ॥ ठुसफुस देई सर्व टाकोनी ॥ ठुमणा हो-
ऊनि शरणये देवांसी ॥ २२ ॥ डुबगई तव चमू यनरी माडु ॥ डुकररूप घृत कुदरी नेरीदा पाडु ॥ डुंडुमडमर
गर्जत मुंद नोडू ॥ डुगडुग चित्तींची सर्व सोडीं ॥ २३ ॥ ढुनि बाहत्तरयुगीं प्रथम चरणीं ॥ ढुंत तुज आला
खड्गपाणी ॥ ढुंढिराज काळभैरव अष्टादशगणीं ॥ ढुंढाळिती तुजलागीं ॥ २४ ॥ न्यून नसे नाथ व्यापक अणुरेणू
॥ नुठेचि तव अंगी रोमांच कां नेणू ॥ नुपेक्षिच ह्मैषासुर उद्धरिला कोणू ॥ नुच्यप अतिदित ह्मणसी नाथातें ॥

॥ २५ ॥ तूर्यांबरांतून नाथार्क उगवला ॥ तुझ्यासाठीं श्रीयालयीं उतरला ॥ तुंबळ युद्धीं पुष्कर वधिला ॥ तुजलागीं अजोनि कैसें कळेना ॥ २६ ॥ थूथू करितें विश्वसारें ॥ थुंकी वदनीं घेसील कसारे ॥ स्थूळ सूक्ष्म देहाचे संताप सारे ॥ थूंकावें गा तयांवरी ॥ २७ ॥ दुंदुभीआनकपुत्र पौगंडतनया ॥ दुष्कृत दैत्य धाडिले क्षया ॥ दुष्काळीं रक्षिसी ऋषेश्वर सदया ॥ दुरिताप हरती जयाचे नामीं ॥ २८ ॥ नूतन नित्य श्रृंगार करी ॥ नुगमेचि निगमागमोत्तरीं ॥ नुपजेचि पश्चाताप अंतरीं ॥ नुरेचि तव चमु रत्नासुरा ॥ २९ ॥ पुराणपुरुषोत्तम दक्षिणदीप ॥ पूर्ण उजळला ज्योतिस्वरूप ॥ पुरवील तव मनोरथ संकल्प ॥ पुतनांतक जो पुष्कररिपु ॥ ३० ॥ स्फुल्लारविंद बद्रिविहारी ॥ फुलला विजयतरुवर भैरवभारीं ॥ फुगला वृथाचि तुह्मीं अहंकारीं ॥ फुटला मरण फांटा तुह्मांसी ॥ ३१ ॥ बुडालां सहकुळेसी काय उरलें ॥ बुद्धि असोन कां राज्य हरविलें ॥ बुगड्या विरोद्या मंगळसूत्र हारपलें ॥ बुझे जाऊनि हे चंद्रसेनेसी ॥ ३२ ॥ भूधर अवतार रेवतीरमण ॥ भुजंगारि स्वारी हयवाहन ॥ भुजाचारि आयुधें धारण ॥ भूभार फेडावया नाथ आला ॥ ३३ ॥ मूर्तिमंत त्रैलोक्य नाथ ॥ मुद्दाम येतसे तव पर्वतांत ॥ मुगुट कुंडलें भस्मांकित ॥ मुख्य गोष्टी तव भाग्य श्रेष्ठ ॥ ३४ ॥ युगचत्वारीं ज्याची करणी ॥ युद्धार्थी नटले खड्गपाणी ॥ युग्माक्षि सहस्राक्षी सहस्रमूर्ध्नी ॥ युग बाहत्तर प्रथमचरणीं आला ॥ ३५ ॥ रुमझुम रुमझुम आवत बदर्या ॥ रूप औदार्य दिल्लदर्या ॥ रुजू होईं वोडंबरिया ॥ ऋतुवसंतीं मधुमासीं जन्मला ॥ ३६ ॥ रुद्रविष्णु चतुरानन ॥ रुद्राक्ष प्रियकर हयवाहन ॥ ऋग्वेद यजुःसाम अथर्वणीं जो प्रवीण ॥ रुष्टा दिल्लदर्या आवतधीरा ॥ ३७ ॥ उद्यन्न मार्तांडभैरवाकार ॥ ऊर्ध्व मूल जगद्रुम जगदांकुर ॥ उत्तंकसंह्या-

द्रिगिरिवर उत्तम करीलतव वधोत्सवीं ॥ ३८ ॥ सुचिकद्वत्तिप्रिय रवळेश्वर ॥ लुप्तपिंड विभव करील संहार ॥ लुटिली तव चमू भैरवभार ॥ लुगडीही रतली शक्तिपरिवारीं ॥ ३९ ॥ शुक्लांबरधर ज्योतिस्वरूपें ॥ शुक्ल हयवाहनबळ प्रतापें ॥ शूर्पनखा ज्यानीं विटंबिली कोपें ॥ शूर उद्धरिले रत्नासुरा ॥ ४० ॥ हुंकारें उठावें युद्धाकारणें ॥ हुतांशी पातला हयवाहन ॥ हुं बीजाक्षर करील सम रण ॥ हुहु करितां न सोडी ॥ ॥ ४१ ॥ क्षुधा तृषा जो निद्रा रहित ॥ क्षुद्रघंटीं ज्याची कटिमंडित ॥ क्षुद्र भद्र करील रणपंडित ॥ क्षुल्लकबुद्धि नधरीं अजूनी ॥ ४२ ॥ उकारा पासोन क्षकारी ॥ उत्कर्ष वर्णिला बत्तिसाक्षरीं ॥ उत्तर घावयालागीं वैखरी ॥ उरली नाहींच रत्नासुरासी ॥ ४३ ॥ ऐसें बत्तिसाक्षरींचें शरसंदान ॥ रुधिरोचन धीरोचन ॥ काळभैरवहस्तीं पावले मरण ॥ पुष्करादिक रणचत्वारी ॥ ४४ ॥ रक्तभोजनाचे दोघेकुमर ॥ धीरोचन रुधिरोचन रणशूर ॥ युद्ध करोनि पुष्करादिक धुरंधर ॥ रणमंदिरीं पहुडले ॥ ४५ ॥ त्यामाजीं पुष्कर महावीर ॥ युद्धीं श्रमी झाला फार ॥ टाकोनियां देहगार ॥ वृषभाकार जाहला ॥ ४६ ॥ तयातें वधोन काळभैरवें ॥ तीर्थ निर्मिलें पुष्करनांवें ॥ सर्व सेना मारोन जीवें ॥ रक्तार्णवीं टाकिले तव परिवारा ॥ ४७ ॥ ऐसा कीर्ति नाम उद्भट वचन ॥ ऐकोनि रत्नासुर तयांसी ह्मणे ॥ देवांसीं युद्ध करावया दारुण ॥ सिद्ध असावें सांग जाईं ॥ ४८ ॥ तैसाचि उठिला कीर्तिवर्धन ॥ गेलिया नंतर रक्तभोजन ॥ रत्नासुरादिकीं परिसिलें श्रवण ॥ पुत्र पडिले समरंगणीं ॥ ४९ ॥ तिघे पुत्र पावले मरण ॥ हें रत्नासुर रक्तभोजन ॥ परिसोन खेद करिती दारुण ॥ चंद्रसेनादि जळसेने सहित ॥ ५० ॥ पुत्रशोकें करी रुदना ॥ रत्नासुरासी वदे चंद्रसेना ॥ पुष्कर आणोनि दाखवीं नयना ॥ त्यावीण शुन्यमंदिर पडिलें ॥ ५१

करोनिये तेंचि कर्म करणें ॥ तोरणया आणिला कां धरून ॥ यश न पावलां तें पासोन ॥ युद्ध करनीं एकदांही ॥ ५२ ॥ ऐकें स्वामी प्राणनाथा ॥ माझिये स्वप्नींची अघटित वार्ता ॥ दिगंबर येऊनि एक अवचिता ॥ मम अलंकार तेणें काढिले ॥ ५३ ॥ बाळया बुगड्या मंगळसूत्र ॥ मोडोन तोडिलें मंगळसूत्र ॥ जोडवीं विरोद्यें कळसूत्र ॥ भंगोन टाकिलें पर्वततळीं ॥ ५४ ॥ स्नेह घेऊन विगतधवेनें ॥ मस्तकीं चर्चोन करित मर्दन ॥ उत्तरोन सर्वसौभाग्य आभरण ॥ मुक्तकेशी मजलागीं केलें ॥ ५५ ॥ शीतोदकीं करविलें स्नान ॥ मातें नेसविलें कृष्णवसन ॥ तशांत खरोष्ट्रीं बैसवोन ॥ पुष्करा सहित तुह्मीं पातला ॥ ५६ हें लक्षोन दुश्चिन्ह ॥ उद्विग्न झालें माझें मन ॥ तें उठलें गडबडोन ॥ येत होतें सांगावया तुह्मां ॥ ५७ ॥ तुह्मांसी सांगावया स्वप्न ॥ येत असतां दुश्चिन्ह मन ॥ तंव दूतीं आणिलें वर्तमान ॥ पुत्र पडिले रणांगणीं ॥ ५८ ॥ पुत्र शोकार्णवींचा कल्होळ ॥ नव शरीरीं साजला प्रबळ ॥ त्यामाजी स्वप्नावस्थीं गोळांगुळ ॥ पुच्छाग्नि लंकेसी ज्यापरी ॥ ५९ ॥ दरिद्रव्याघ्र लागतां पाठी ॥ परिहारार्थीं पातला श्रीमंतभेटी ॥ तयानें यष्टिका वेत्रपृष्टीं ॥ ताडोनि दुर्धरवनीं दवडिलें ॥ ६० ॥ चैत्रमासीं द्वादशदिवाकरें ॥ उष्णें तापवी मही खडतरें ॥ भू पाषाण पर्वत शिखरें ॥ खदिरांगारें वर्षती ॥ ६१ ॥ ऐसीया उष्णातें चालतां क्लेश ॥ पृष्ठीं लागला एकराक्षस ॥ हें लक्षोन हाहा क्लेश ॥ रुक्षगृहांतरीं प्रवेशला ॥ ॥ ६२ ॥ दरिद्रव्याघ्र संचरला पोटीं ॥ दुजा राक्षस लागला पाठी ॥ तिसरी तापली पृथ्वीतटीं ॥ चौथा रुक्षगृहीं विश्राम कैंचा ॥ ६३ ॥ विनाशकाळीं बुद्धिभ्रंश ॥ मग पुढें संपत्तिनाश ॥ आपणही प्राणहत्या पावे स्वदोष ॥ श्रीनाथ क्षोभ या नांव ॥ ६४ ॥ ऐसें रत्नासुरा रक्तभोजना ॥ होणारा सारिख्या पातल्या खुणा ॥ येरीति शो

क अंतःकर्णां ॥ चंद्रसेना करितसे ॥ ६५ ॥ ऐकोन कांतेची संतापवाणी ॥ रक्तभोजासी वदे वचनीं ॥ तप्त होऊ
न अंतःकरणीं ॥ ह्मणे तीव्र वाहिनी सज्जकरा ॥ ६६ ॥ ऐसे चिंतार्णवींचे सागरीं ॥ दैत्य पडिले सह परिवारीं ॥
सावध असती रत्नागिरीवरी ॥ चतुष्कोनीं प्रतापें ॥ ६७॥ तंव येरीकडे भैरव भारी ॥ काय करित बद्रिविहारी ॥
अनुहातनाद गगनोदरीं ॥ अष्टभैरव भारी दिगंबरवेषी ॥ ६८ ॥ त्रिशूल खड्ग विकोशधारी ॥ अनुहात नाद ग
गनोदरीं ॥ तो नाद भरला गिरिकंदरीं ॥ अमृत पात्र पूर्ण करीं घेतलें ॥ ६९ ॥ काळ भैरवादिक अष्टभैरी ॥
भस्मांकित झाले जटाधारी ॥ मृगचर्म काषाय व्याघ्रांबरीं ॥ हिमकेदारी शोभला ॥ ७० ॥ ह्मणे श्रीकमळे विम-
ळांबुजे ॥ ॐकार मातृका प्रणवबीजे ॥ तुझिये स्मरणीं निस्तेज ॥ संह्याद्रीवरी दैत्यकरिसी ॥ ७१ ॥ रत्नासुरा
रक्तभोजना ॥ वधावया जातसें जाणा ॥ संकटीं रक्षावें करून कंदना ॥ अभयवचनासी देईजे ॥ ७२ ॥ ऐसें वद-
तां निरंजन ॥ तथास्तु वदे कमला वचन ॥ चर्पट अंबे हस्तीं मरण ॥ रत्नासुरासी निर्मिलें ॥ ७३ ॥ भस्म धुस
र भूषणें ॥ मंडित अष्टभैरवगणें ॥ जावोन संह्याद्री घालिजे ठाणें ॥ रत्नासुर वधोत्सव करोनियां ॥ ७४ ॥ ऐसें ल-
क्ष्मीचें अभयोत्तर ॥ घेऊन निघाला दक्षिककेदार ॥ चांगभला संह्याद्रीगिरिवर ॥ अष्टभैरवेसी पातला ॥ ७५ ॥
हें पाहोन निशाचरपरिवारी ॥ रत्नासुरासी ह्मणती नवलपरी ॥ चतुर्भुज ब्रह्मचारी ॥ दिगंबर नौजण पातले
॥ ७६ ॥ शामसुंदर भस्मांकित ॥ ऊर्ध्व त्रिपुंड्र त्रिशूल डमरु अमृत ॥ पात्रशोभे कराब्जांत ॥ अष्टदिगंबर सां-
गातीं ॥ ७७ ॥ त्यामाजी तेजःपुंज प्रकाशवंत ॥ जैसा भोळा उमाकांत ॥ ऐसी मूर्ति ब्रह्मकल्पांत ॥ देखिली
नाहीं आजन्मीं ॥ ७८ ॥ अजानुबाहु अनादि पुरुष ॥ अलक्ष लक्ष चंडांश वेष ॥ अपार ब्रह्मास्मीचा हुतांश ॥

दक्षिणाधीश ह्मणवितसे ॥ ७९ ॥ नाम विचारिलें तयालागीं ॥ तो ह्मणे अनामिया त्रिजगीं ॥ नाहीं वास्तव्य एकाजागीं ॥ युगायुगीं जोगी होऊन हिंडतसें ॥ ८० ॥ आमुचें नाम गोत्र कुळ कांहीं ॥ चतुर्वेदांसी ठाउकें नाहीं ॥ वर्णाश्रमाचि उपाधि यानरदेहीं ॥ न लागोनि हिंडो विदेहपणें ॥ ८१ ॥ सप्तद्वीपामाजी जंबुद्वीप ॥ भरतखंडाग्रीं झाला कर्मलोप ॥ हें पाहावयालागीं साक्षेप ॥ उत्तर खंडाहून पातलों ॥ ८२ ॥ दीनजनाचें संरक्षण- ॥ स्वधर्म धर्म संस्थापन ॥ करावया दुष्टाचें हनन ॥ चौदाभुवनीं हिंडतसों ॥ ८३ ॥ ब्रह्मद्वेषी दुराचारी ॥ गुरुतल्पकी विश्वासघात अंगिकारी ॥ यातें वधावया शस्त्रधारीं ॥ संह्याद्रीं पातलों याकामा ॥ ८४ ॥ दैत्यमारोन बळिगाढे ॥ संह्याद्रीं लावीन निशाण बगाडें ॥ रत्नासुर दशनगळ निवाडें ॥ जन लावितील पुढें कलियुगीं ॥ ॥ ८५ ॥ होणार जाहलें भविष्य ॥ तुमचें सरलें गा आयुष्य ॥ खळनाथ नव्हें गा मनुष्य ॥ दक्षिणाधीश ह्मणती ज्यासी ॥ ८६ ॥ ऐसी परिसोन हेरवाणी ॥ रत्नासुर झाला क्रोधाग्नि मनीं ॥ दैत्य परिवारीं घनगर्जनीं ॥ श्रीनाथा जवळी पातला ॥ ८७ ॥ दुरून पाहिला ज्योतिस्वरूप ॥ सगुणसागर बळप्रताप ॥ संह्याद्रीवरी दक्षिण दीप ॥ काळभैरव साक्षेपें उतरला ॥ ८८ ॥ चतुर्भुज शामसुंदर ॥ भस्मांकित नटनागर ॥ खड्गपात्रत्रिशुल डमर ॥ मस्तकीं शोभे भार जटांचा ॥ ८९ ॥ कुंडलें श्रवणीं दंशक मणिमय ॥ प्रकाशें व्यापिले द्वादश सूर्य ॥ दीनजनां द्यावया अभय ॥ निर्भय मनें येथें आला ॥ ९० ॥ पहातां दिसे निरापेक्षी ॥ सज्जन साधूंसीं संरक्षी ॥ सर्वांभूतीं समान लक्षी ॥ संह्याद्रि अपेक्षी वस्तीतें ॥ ९१ ॥ रत्नासुर ह्मणे योगिया निरंजना ॥ दर्शनें पावलों समाधाना ॥ श्रवणीं परिसा नामाभिधाना ॥ जेणें अंतःकरणा सौख्य वाटे ॥ ९२ ॥ कवण ग्राम कवण भूमी ॥

कवण देश उपदेश आश्रमीं ॥ कवण कार्यालागीं स्वामी ॥ येथवरी किंवा पुढारें ॥ ९३ ॥ बाहेर तापसाचा वेष ॥ बरवा दिसतसे ह्व्यास ॥ अंतरीं क्रोधाचा हुतांश ॥ प्रदीप्त जाहला किंनिमित्य ॥ ९४ ॥ कीं लपवितां नलपे परिमळ ॥ करांबुजें न झांकें रविमंडळ ॥ कांखेसी न झांके कुंजरबाळ ॥ मार्जार पिलिया सारखें ॥ ९५ ॥ गुप्त राहोन अंधारीं ॥ हातें वाजवितां कुंजरभेरी ॥ तो नाद भरिला ब्रह्मांडोदरीं ॥ जगश्रवणीं अपारें ॥ ९६ ॥ नाथ मार्गाधिपत्य सबाहीं ॥ आयुधें धरिलीं चत्वारी बाहीं ॥ भस्मांबरांतून प्रतिबिंबाही ॥ प्रगट दिसती तीव्र लक्षणें ॥ ९७ ॥ ऐसाचि आमुचा उमारमण ॥ आह्मांवरी प्रसन्न तपाचरण ॥ तें लोपोन चिन्ह ॥ कां उद्विग्नवेषें फिरसी ॥ ९८ ॥ ऐसें वदतां रत्नासुर ॥ नाथें केलें निरुत्तर ॥ आपुला आपण गुरु निरंतर ॥ शिष्यही आपुला आपण-ची ॥ ९९ ॥ अजन्मी अकल्पी अजरामर ॥ अज अखिल मी अविकार ॥ आदिमायावर जगदांकुर ॥ अकार क्षकार पर्यंत मुहूरलों ॥ १०० ॥ साधुजनांते प्रतिपाळणें ॥ दुरितदुष्कृत दनुजदमनें ॥ करावयालागीं हा देह-धरणें ॥ संह्याद्रीवरी येणें या मुळें ॥ १ ॥ भरतखंडाग्रीं दुष्कृत धुसर ॥ व्यापिलें राक्षसीं मही अंबर ॥ तें निवा-रावया खड्ग दक्षिणकर ॥ संह्याद्रीवरी येणें यासाठीं ॥ २ ॥ संत निंदक दुष्कृताचरणीं ॥ दुरत्यय दुर्जन दुराभि-मानी ॥ गो भूसुरातें त्रासिती जे प्रतिदिनीं ॥ त्यांसी वधावया शस्त्र धरिलें करीं ॥३ ॥ ब्राह्मी रौद्रीच कौमारी ॥ नवकोटि कात्यायनीसी भैरवभारीं ॥ वैष्णवीमाया श्रीयालयनगरीं ॥ अमरेंद्र परिवारासी उतरली ॥ ४ ॥ तिये-च्या सैन्यांत केली वस्ती ॥ या संह्याद्रीचे राक्षस समस्तीं ॥ मातले ह्मणोन वदला अगस्ती ॥ याकारणें राक्षस चूर्ण करावया पातलों ॥ ५ ॥ ऐसी परिसोन उत्कर्षवाणी ॥ रत्नासुर चमत्कारला अंतःकरणीं ॥ ह्मणे केवढा धै-

र्यवंत खड्गपाणी ॥ चातुर्यें बोलतसे ॥ ६ ॥ स्वप्नामाजी परिसोन वाणी ॥ वरळोन उठावें त्रिदशगणीं ॥ सन्मुख कवण संभाषणी ॥ आजपर्यंत कोणी न देखिला ॥ ७ ॥ आह्मीं परमश्रेष्ठ ईश्वरभक्त॥ तुजला पाहिजे विषयी विरक्त ॥ तूं जें बोलिलासी व्यक्ताव्यक्त ॥ दिगंबर सक्त होऊन दाविसी ॥ ८ ॥ ईश्वराठायीं तुज मानिलें होतें ॥ महत्व गमाविलेंस आपुले हातें ॥ सोडिलें जाई गा जीव जितें ॥ ऐसी मात वदूंनये दिगंबरा ॥ ९ ॥ आमुचे चित्तींची सद्वासना ॥ होती तुजद्यावें रत्नखचित सदना ॥ अखंडित असावें संभाषणा ॥ परी तव कपाळीं लिहिलें नसे ॥ १० ॥ तव कपाळींचे लेखनें ॥ शुन्यवृत्ति सदाफिरणें ॥ गो भूसुर हुताशन करोन वदनें ॥ अगोचरपण करिसी सदां ॥ ११ ॥ उदर न भरे ह्मणोन करिसी चोरी ॥ याचक होऊन दारोदारीं ॥ फिरतां बांधिलें उलुखली वरी ॥ असो तें अबोलणें पुढें असे ॥ १२ ॥ कवण अबोलणी माय व्याली बिचारी ॥ कोणें उपदेशकेला अविचारी ॥ ह्मणोन भस्मांकित जटाधारी ॥ होऊन आलासी याठायां ॥ १३ ॥ तुजसारिखे वेषधारी ॥ क्रोधें पातल्या सहस्त्रचारी ॥ मज रत्नासुरासी झुंजतां समरीं ॥ यश समरीं न पावसी समर्था ॥ १४ ॥ असेल अंगीं प्रतापगरिमा ॥ तरी चालोन न जावें पराच धामा ॥ मर्यादेची नुलंघीच सीमा ॥ महासमुद्र अद्यापी ॥ १५ ॥ न करावें तें अंगिकारी ॥ जाणोन सेवीविषवल्लरी ॥ हेमशस्त्र ह्मणोन उदरीं ॥ समजोन कैसें खोवावें ॥ १६ ॥ ऐसें अघटित घडविता कैसें ॥ ह्मणविसी आपणाचि अविनाशें ॥ तूंचि पूर्ण त्रिगुण संतोषें ॥ कैशावरोन ह्मणावें ॥ १७ ॥ ऐसें वदोन रत्नासुरें ॥ हास्य केलें सुमनोहरें ॥ टाळ्या वाजविल्या मग गजरें ॥ राक्षसीं करतळीं परिवारीं ॥ १८ ॥ त्रिशूळपात्र डमर झोळी ॥ कांखेसी घेऊनि हिंडावें भूमंडळीं ॥ आह्मां पराक्रमिया सवें खंदळी ॥ रण मंडळीं क

रीन ह्मणतो ॥ १९ ॥ भिक्षा मागोन उदरभरणें ॥ हें टाकोन कांप्राण देणें ॥ एक ह्मणती कैफी नयन ॥ आरक्त दिसती खदिरांगारी ॥ २० ॥ सिद्धपत्री भक्षिली उदंड ॥ ह्मणोनि अपरिपात्त बडबड ॥ एक ह्मणती ऐसेंचि भंगड ॥ कैफी अफिमी बडबडती ॥ २१ ॥ बालोन्मत्त पिशाचवृत्ती ॥ योगियांच्या ऐशाच आकृती ॥ स्वर्गसंपदाधिःकारिती ॥ चतुर्विधमुक्ति सहित ॥ २२ ॥ गिरि पुरी भारती अरण बागडे ॥ मौनी ठाडेसरी जटिल मुंडे ॥ गुंगी बावरे मलंग शवडे ॥ विरक्त कुंभाडे दिगंबर ॥ २३ ॥ ऐसे अनंतसिद्धाचे अवतार ॥ फिरत असतीं देशांतर ॥ भ्रमत कैफी दिगंबर ॥ संह्याद्रीवरी चुकोनी आला ॥ २४ ॥ बालोन्मत्त पिशाचगुण ॥ एकेक करिती योगधारण ॥ एकत्र मीनले त्रिगुण सगुण ॥ या दिगंबराच्या हृदयीं ॥ २५ ॥ बाळदशेचि बाळकरणी ॥ जगीं वर्ते पिशावर्णी ॥ उन्मत्तदशा उन्मत्तपणीं ॥ या खड्गपाणी हृदयीं मीनल्या ॥ २६ ॥ एक योगधारण धरून योगीजाण ॥ आपुले सेवेसी लाविती चतुर्वर्ण ॥ हा दिगंबर भुलवावया त्रिभुवन ॥ संह्याद्रीवरी भुलवूं पाहे ॥ २७ ॥ परी हें रत्नासुराचें वज्रठाण ॥ समजोन करावें शीघ्र गमन ॥ प्रतिष्ठेचे रक्षोनि प्राण ॥ गंतव्य करावें बद्रिकाश्रमीं ॥ २८ ॥ ऐसें वदतां निशाचर ॥ क्रोधें खवळला हिमकेदार ॥ तप्त कल्पांत भैरवाकार ॥ होऊन डमरू नाद गर्जविला ॥ २९ ॥ डिम डिम डमर नाद घन गडाडी ॥ टण टण टणत्कारीं गगन गडाडी ॥ सप्तार्णवींची लहरी धडाडी ॥ तें विषाग्निभडाडी शेषवदनीं ॥ ३० ॥ ऐसा कल्पांत पाहोन अनिवार ॥ गडबडिला निशाचरपरिवार ॥ रक्तभोज रत्नासुर ॥ सैन्य भारेसीं सिद्ध झाले ॥ ३१ ॥ रक्तभोज ह्मणे रत्नासुरा ॥ आजि युद्ध न करावें महावीरा ॥ उदयीक करोनि घोरसमरा ॥ हिमकेदारा तोषवूं ॥ ३२ ॥ कैंचे कैफी कैंचे भंगाडे ॥ कवणाचा डमरु ऐसा

नाद गडाडे ॥ ही गोष्ट जाहली बहु अवघडे ॥ राक्षस जुंबाड वधूं आला ॥ ३३ ॥ काळभैरवादि अष्टभैरी ॥ उभा घनःशामबद्रिविहारी ॥ विषाग्नीच्या टाकिल्या लहरी ॥ तोचि भूधर अवतार जाणिजे ॥ ३४ ॥ ऐसें वदतां रक्तभोजन ॥ परिवारेसी असुरगण ॥ ह्मणती आजचि वेळ कठिण ॥ देवांसी युद्ध करावें ॥ ३५ ॥ ह्मणोनि मंडुकासुरा प्रबोधोन ॥ रत्नासुर रक्तभोजन ॥ युद्धासीं धांडिला अतिदारुण ॥ अजिंक्य ह्मणोन असुरांनीं ॥ ३६ ॥ रत्नासुर रक्तभोजन ॥ मंडुकासुरासी वदती वचन ॥ युद्ध करोनि निर्वाण ॥ बद्रिविहारा जिंकावें ॥ ३७ ॥ राक्षसी कर्तुत्वाच्या गतीं ॥ प्रबोधोनि नाना परिच्या कुमती ॥ युद्धासी धाडिला भद्रजोती ॥ हें ज्योतिस्वरूपें पाहिलें ॥ ॥ ३८ ॥ मंडुकासुराचें जन्मांतर ॥ शोधोन पाहील हिमकेदार ॥ तें शेषाप्रती भविष्योत्तर ॥ ज्योतिस्वरूप वदतसे ॥ ३९ ॥ समावतारींच्या कंदना ॥ श्रमीं झालासी सहस्रवदना ॥ चतुर्दशवर्षें उपोषणा ॥ करोनि इंद्रजित वधावा तुवां ॥ ४० ॥ माझें वचनासी निरंतर ॥ सादर असोन न करिसी अंतर ॥ द्वापारीं होऊन हलधर ॥ वडिलपणें प्रतिपाळ केला ॥ ४१ ॥ आतां भूभार हरावयासी ॥ यदर्थीं आह्मां उपदेश करिसी ॥ तीव्र करोन संग्रामासी ॥ निशाचरांसी वधावें ॥ ४२ ॥ श्रीरामकृष्णावतारीं ॥ दैत्य वधिले घोरसमरीं ॥ आतां मंडुकासुर तुझियेकरीं ॥ मरण पावेल समरंगणीं ॥ ४३ ॥ ऐसें असे गा भविष्योत्तर ॥ तुझिये हस्तीं मंडुकासुर ॥ मरण पावेल निर्धार ॥ युद्ध धुरंधर करोनिया ॥ ४४ ॥ परिसोन नाथमुखींचें वचन ॥ अवश्य ह्मणे सहस्रवदन ॥ चंड कोदंड शरासन ॥ सज्ज करोनि उठिला ॥ ४५ ॥ शेष आणि मंडुकासुर ॥ युद्धीं प्रवर्तले समरीं निकुर ॥ शेष वर्षला शरपंजर ॥ जेवीं जळधर गिरीवरी ॥ ४६ ॥ रत्नासुर ह्मणे रक्तभोजना ॥ अनिवारशक्ति सहस्रवदना ॥

मंडुकासुराहून सहस्रगुणां ॥ हस्तलाघव शेषाचें ॥ ४७ ॥ दिगंबर होऊन खळेश्वर ॥ निर्भय पातला तरींच येथवर ॥ संगें घेऊन फणिवर ॥ अगोचरपणीं पातला येथें ॥ ४८ ॥ इतर सर्पासारखी करणी ॥ याची असेल ऐसें भासतें मनीं ॥ परी हा नकळला सहस्रवदनी ॥ भूधरमणि रणदीक्षित ॥ ४९ ॥ ऐक रक्तभोजा यथार्थ वचन ॥ तुवां करावें तीव्र अनुष्ठान ॥ भद्रकाळीचें आवाहन ॥ सुवर्ण पिंपळातळीं करावें ॥ ५० ॥ सप्तदिवस करोनि उपोषण ॥ यथाविधि करावें होम हवन ॥ शत्रुपराभव शुभलक्षण ॥ तूं सर्व विचक्षण जाणसी ॥ ५१ ॥ जेवीं महिकावतीं बळीदान ॥ द्यावयालागीं आणिले रामलक्ष्मण ॥ तैसें यदर्थीं हा सहस्रवदन ॥ तोहा नाथनिरंजन रघुनाथ ॥ ५२ ॥ अठराचोक् युगबाहत्तरीं ॥ हा नाथ अवतरला प्रथमप्रहरीं ॥ आह्मां देखतां रावण सहपरिवारीं ॥ मारिला अठरावेळां जाणपां ॥ ५३ ॥ तोचि हा रामलक्ष्मण ॥ खळनाथ हा सहस्रफण ॥ होऊन सत्व रज तमो गुण ॥ ब्रह्मचर्यपण होऊन आला ॥ ५४ ॥ ऐकान रत्नासुराचे बोल ॥ रक्तभोजें मानिले अमोल ॥ जेवीं मद्यपी मदांधडोल ॥ तैसा तोषला मदगर्वित ॥ ५५ ॥ जेवीं शतमूर्खभाषणीं ज्यासी गणी ॥ प्रतिपाद्यकरी अगीर्वाणी ॥ कीं जेवीं सेविजे वांती श्वानीं ॥ तेवीं रत्नासुरवाणी रक्तभोजा ॥ ५६ ॥ असो तें अनुष्ठानीं रक्तभोजन ॥ बैसला शोणीतें करून स्नान ॥ घालोन प्रेतावरी पद्मासन ॥ तीव्र अनुष्ठान मांडिलें ॥ ५७ ॥ त्याचें अनुष्ठान पूर्ण होतां ॥ समरीं जिंकील खळनाथा ॥ हें जाणोन भविष्यार्था ॥ अनुष्ठान भंगिलें काळभैरीं ॥ ५८ ॥ तें रत्नासुर वधांतीं श्रवण ॥ एकोणिसावें अध्यायीं पंडितजन ॥ परिसावे हें व्यासवचन ॥ भविष्योत्तरींचें अवधारा ॥ ॥ ५९ ॥ असो रत्नासुर निशाचर परिवारीं ॥ युद्ध पाहतसे ठाकोन दूरी ॥ तो मंडुकासुर आणि शेषनिकरीं ॥ द्वं

द्र युद्धीं खवळले ॥ ६० ॥ अग्नि पर्वत.पवन पर्जन्यीं ॥ शरें व्यापिली महीगगनीं ॥ जेवीं शरदृतुअभ्रें वासर-
मणि ॥ लोपोनि जाय सर्वही ॥ ६१ ॥ वर्म कर्म निवारण ॥ नाना शस्त्रास्त्रीं शरसंधान ॥ दोघे ही रणमंडित सु-
जाण ॥ परस्परें खंडितीहे ॥ ६२ ॥ ऐसें युद्ध झालें दिवस चारी ॥ कल्पांत झाला संह्याद्रीवरी ॥ झुंजा प्रवर्तले
घोरांदरीं ॥ कवण कवणासी नाटोपे ॥ ६३ ॥ हें पाहोन फणिवर ॥ असंख्य वर्षला पावक शर ॥ तशांत ब्रह्मा-
स्त्र भयंकर ॥ सबीज मंत्रोन सोडिलें ॥ ६४ ॥ तें ब्रह्मास्त्र मार्तंडकिरणीं ॥ कडाडोन ब्रह्मांडभुवनीं ॥ पातलें मंडु-
कासुर लक्षोनि ॥ ह्रदयीं खडतरोन शिर उडालें ॥ ६५ ॥ ब्रह्मास्त्र घायीं शिर उडविलें ॥ तें पर्वतकक्षोदरीं प-
डिलें ॥ तेथें नाथें चक्रमारिलें ॥ चक्र तीर्थ बोलती कृतायुगीं ॥ ६६ ॥ श्रीनाथ झाला तृषाक्रांत ॥ ह्मणोनी ब्र-
ह्मास्त्रीं केला शिरःपात ॥ मंडुकासुराचा करोन घात ॥ तीर्थें त्रय निर्मिलीं ॥ ६७ ॥ मंडूकदेह पर्वतोदरीं ॥ पडि-
ला ह्मणोन बोलती मत्स्योदरी ॥ दुसरें बोलती नागझरी ॥ दक्षिणेसी नैर्ऋत्यकोनीं ॥ ६८ ॥ ब्रह्मास्त्रें उडालें मं
डूकशिर ॥ त्रिकुटशिखरीं पश्चिमोत्तर ॥ पडिलें तेथें त्रिधाकार ॥ जमदग्नितीर्थ पुराणीं ॥ ६९ ॥ प्राकृत बोलती ब्रे-
डूकवाव ॥ मंडूकासुर मस्तकाचा ठाव ॥ जाणावा शब्द अभिनव ॥ तोचि श्लोकार्थ पंडित हो ॥ ७० ॥ असो तो
तीर्थमहिमा पुढारीं ॥ सज्जनीं परिसावा विस्तारीं ॥ ह्मणोन विज्ञानाची वाग्दोरी ॥ उन्मेष तुरंगमेची फावली ॥
॥ ७१ ॥ तया उन्मेष तुरंगमावरी ॥ दक्षिणाधीशें केली स्वारी ॥ युद्ध करितां घोरांदरीं ॥ रत्नासुरासवें पुढारें ॥
॥ ७२ ॥ असो शेषहस्तकीं मंडुकासुर ॥ मरण पावला अतिदुर्धर ॥ घाबरा झाला निशाचरपरिवार ॥ रत्नासुर
तें खवळला ॥ ७३ ॥ कीं वृत्रासुरावरी देवेंद्र ॥ कीं तारकासुरावरी वीरभद्र ॥ तैसा नाथ प्रळयरुद्र ॥ रत्नासुर

वधोत्सव करी स्वशक्ति ॥ ७४ ॥ ऐसा तीव्र वीरश्रीघोष ॥ अष्टादशोध्यायीं विशेष ॥ श्रीनाथ चंडांशप्रकाश ॥
रणांवरींचा विलोकावा ॥ ७५ ॥ इति श्री केदारविजय विशेष ॥ श्रवणार्थी यांचे हरती क्लेश ॥ हें वदत्त क्रमण-
पदींचा शेष ॥ तोचि विशेषार्थ हरीत दुरित हरिनामें ॥ ७६ ॥ कीं ह्या केदारविजय सागरोदरीं ॥ हरिनामाच्या
पातल्या लहरी ॥ सुस्नात होईजे संत मुनिवरीं ॥ सप्तदशोध्याय गोडहा १७७ ॥ इति श्री केदारविजय भविष्योत्तर
केदारखंडे ॥ ब्रह्मांडपुराण विरचितायां ॥ रत्नासुर खळनाथ भाषण शेषहस्तीं मंडूकासुर वधोन्नाम सप्तदशोध्यायः ॥


अध्याय १८वा
श्रीरवळनाथ
रत्नासुर
रत्नासुर
चर्पटअंबा

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयजय केदार दक्षिण दीपा ॥ केतकी गंधार्चित सुरपादपा ॥ केयु-
रादि मणिज्वल चंद्रार्कवोपा ॥ केशरी कटतटीं पट साजिरा १ ॥ गौतमीतीर दक्षिण निवासा ॥ गौतमऋषि मा-
नस हंसा ॥ गौड गुर्जरी केदार बिभासा ॥ गौर व्रजांगना मनमोहना ॥ २ ॥ क्वचित्माणि गुणकथान्वया ॥ क्व-
चित् कवनार्थी चरितान्वया ॥ क्वचित्पर विहित चरितान्वया ॥ क्मपि परिणाम विधि हरिहरा ॥ ३ ॥ द्वीप
सप्तार्णवी अवर्णा ॥ द्विजपंक्ति शोभती सुहास्याकिरणा ॥ द्विजेंद्रारि पतिवरभूषणा ॥ द्विजपदलांच्छना अवधारी ॥
॥ ४ ॥ द्विरदमत्त दुर्जन दमना ॥ द्विविधा नकरीं माझियेमना ॥ द्वितीये पासोन निशाकर पूर्णा ॥ द्वीपांतरीं प्र
काश तैं मतिकरीं ॥ ५ ॥ ध्वजवज्रांकुश क्रमणचरणा ॥ ध्वनि उठली मुमुक्षु वांकी पैंजणा ॥ ध्वजा उभारिल्या
मार्तंडपर्णा ॥ धौतपितांबर नील हरिया ॥ ६ ॥ ॐ ऱ्हों श्रीज्योति स्वरूपा ॥ ॐ क्लीं श्रीजय दक्षिणदीपा ॥ ऱ्हां श्री
क्लीं रवाग्निरूपा ॥ श्रीरवळेश्वरायनमः ॥ ७ ॥ श्रीरवळेश रत्नावतारा ॥ रं रज तम सत्व ॐकारा ॥ वं विष्णु वष-
ट्कारा ॥ ळं ळकार त्रिशूलधर त्रयंबका ॥ ८ ॥ सातवे श्लोकापासोन आठवी ओंवी ॥ श्रीनाथ बीजाक्षरीं स्वयें गों-
वी ॥ यथानुक्रमें श्रेष्ठवर्णीं पढावी ॥ शूद्रें पढतां कष्ट असे ॥ ९ ॥ सहा पासोन ओंवी सात आठ ॥ याशूद्र लोकीं
करितां पाठ ॥ प्राप्तहोतील अपार कष्ट ॥ या मुळें बीजाक्षर पाठ न करावा ॥ १० ॥ ब्राह्मणीं ॐकार व्यंजनमात्रा ॥
चतुःषष्टीसी कळासूत्रा ॥ श्रीबगळा बाळा उपासकयंत्रा ॥ अर्ध मात्रा ब्रह्मास्मिया ॥ ११ ॥ ऐशिया युग्म ओंविया स
बीजाक्षरी ॥ अजपा गायत्रि वर्णोच्चारीं ॥ जपोन पूजिला दक्षिण केदारी ॥ काळभैरवें असुर जयार्थीं ॥ १२ ॥
असो ऐसें मनोल्हास ॥ काळभैरीनें दक्षिणाधीश ॥ पूजिल्या नंतरें चंडांश ॥ उदयाचळीं पातलाहो ॥ १३ ॥

ऐसा जाहला प्रातःकाळ ॥ तैं जागा झाला राक्षसपाळ ॥ वाद्यें गर्जवी संह्याद्रिमौळ ॥ निशाचर गर्जनें करोनि
या ॥ १४ ॥ मंडुकासुर रणकर्कशें ॥ घोर संग्रामीं मर्दिला शेषें ॥ दिगंबर होऊन आला दक्षिणाधीश ॥ संह्याद्री
वरी अष्टभैरीसी ॥ १५ ॥ रत्नासुर आणि ज्योतिस्वरूपें ॥ उत्तर निरोत्तर वदले कोपें ॥ चंद्रसेनेनें स्वप्न संतापें
॥ रक्त भोजासी कथियेला ॥ १६ ॥ हे कथा सप्तदशोध्यायीं ॥ सज्जनीं परिसली स्वस्थ ह्रदयीं ॥ संह्याद्रीं झाला
केदार विजयी ॥ मंडुकासुर वधितां शेषें ॥ १७ ॥ सूतवदत ऐसेंचि शौनक मुनेंद्रा ॥ अगस्ति वदे हेंचि लोपामु
द्रा ॥ जेवीं देव पातले तटीं समुद्रा ॥ मंथनार्थीं चतुर्दश रत्नाच्या ॥ १८ ॥ तेवीं संह्याद्री त्रिकुटपर्वतीं ॥ युद्ध
मंथनार्थीं दक्षिणपती ॥ पातला तें संत पंडितीं ॥ श्रीकेदार विजयार्थीं परिसावें ॥ १९ ॥ मंडुकासुर सहस्र वदन
॥ घोरयुद्धीं करी हनन ॥ तैं अस्ताचळीं वस्ती राहोन ॥ उदयाचळासी लगबगां येतेस ॥ २० ॥ सूर्य ह्मणे
गरुडाग्रजासी ॥ वेगीं चालवींगा रथासी ॥ जाणें संह्याद्री पर्वतासी ॥ श्रीनाथ पदासी पहावया ॥ २१ ॥ रक्ताक्ष
बीजाची संतती ॥ रत्नासुरादिक राक्षस जाती ॥ राक्षसयोनी पाप मती ॥ दक्षिणपति वधवील आतां ॥ २२ ॥
तो रण उत्साह पहावया ॥ वेगीं करीं अरुणोदया ॥ दक्षिणपतीसी सांगावया ॥ दक्षिणायनीं जात अद्यापी ॥
॥ २३ ॥ उत्तरायणीं पंथीं लागेल उशीर ॥ ह्मणोनि लगबगें सहस्रकर ॥ उठवोन दक्षिणायणीं सत्वर ॥ सांगे
दक्षिणपतीला २४ ॥ उदय माध्यान्ह सायंकाळीं ॥ युद्ध करितसों आह्मीं त्रिकाळीं ॥ अजिंक्य रक्ताक्ष बीजकुळी ॥
सह मुळीसी खंडावी ॥ २५ ॥ रत्नासुर आणि रक्तभोजन ॥ जंबुकादि करवीर चौघेजण ॥ हे वधिल्या निर्भयम
न ॥ ध्रुवप्रदक्षिणा करीन अकल्पीं ॥ २६ ॥ उत्तरायणीं दूर पंथ ॥ तो टाकोन वदावया स्वमनोगत ॥ दक्षिणाय

र्णी समीप स्वार्थ ॥ हेचि सांगावया पातलों ॥ २७ ॥ आतां आलस्य न करावा मनीं ॥ हेचि वारंवार तवपदीं विनवणी ॥ ऐसें कथोनि वासरमणी ॥ उदयाचळीं पातला ॥ २८ ॥ उदयाद्रीवरी देखोन रवी ॥ दैत्य तमातें समुळ नुरवी ॥ केदार विजयीं प्रताप मिरवी ॥ राक्षसांतकी रवि काळभैरव ॥ २९ ॥ असो सहस्र निशाचर परिवार ॥ रत्नासुर पातला घनघोर ॥ युद्ध करावया घोरांदर ॥ उभा राहिला रणरंगीं ॥ ३० ॥ विकटाट शब्द करोन गजरा ॥ ह्मणे परिसें हिमकेदारा ॥ आपुला नवदें मीं बडिवारा ॥ तुजसारखा निजमुखें ॥ ३१ ॥ तुझी प्रतिष्ठा भाविक भजनीं ॥ माया स्वरूपी जन मोहनी ॥ भाव दाविसी भक्ताभिमानी ॥ हरिकीर्तनीं राहसी उभा ॥ ॥ ३२ ॥ भोळ्या भाविका चाळविसी ॥ स्मरल्या ह्मणसी मीं उपवासी ॥ भाजीचें पान मागोनी खासी ॥ उच्छिष्ट न ह्मणसी शबरीफळ ॥ ३३ ॥ देह कर्वतिसी निर्भयपणीं ॥ तेंही टाकिसी नलगे ह्मणोनी ॥ ऐसी तुझी कथा पुराणीं ॥ भोळ्या भाविकांनीं परिसावी ॥ ३४ ॥ दुर्वासा करितां व्रत भंगे ॥ चक्र लाविसी तया मागें ॥ विघ्न देखोन अभंगे ॥ भुजंग शयनीं लोळसी ॥ ३५ ॥ दैत्य देखोन धुरंधर ॥ समुद्रीं झालासी मत्स्याकार ॥ कपटें वधोनि शंखासुर ॥ सवेंच कूर्म समुद्रमंथनीं ॥ ३६ ॥ हिरण्याक्ष आकर्षतां मही ॥ सूकर जाहलासी स्वदेहीं ॥ देह टाकोनि फिरसी विदेही ॥ हें तुजलागींच उत्तम दिसे ॥ ३७ ॥ हिरण्यकश्यपें खड्गप्रहरीं ॥ ताडितां स्तंभासी निजकरीं ॥ नरतनु मुख उत्कट केशरी ॥ स्तंभीं गुरगुरसी भयंकरें ॥ ३८ ॥ बळी याग करितां नर्मदा तीरीं ॥ याचक होवोन ब्रह्मचारी ॥ गेलासी भूमिदानाधिकारी ॥ ही नवलपरी कोणी वर्णावी ॥ ३९ ॥ क्षपिदान घेवोन सारी ॥ बळीसी घातलें पाताळ विवरीं ॥ पळोन जाईल ह्मणोन द्वारीं ॥ रात्रंदिवस तिष्ठत उभा ॥ ४० ॥ काम-

धेनु गाधिजें हरितां ॥ जाहला ह्मणसी कुटुंबघाता ॥ रागें वधसी आपुली माता ॥ रेणुके ऐसी माहामाया ॥ ४१
॥ न करावें तें कर्म करिसी ॥ गरीब मांडळीक राजे वधसी ॥ एकवीस आवर्तनें धरणीसी ॥ केली ह्मणसी वेद
वचनीं ॥ ४२ ॥ राज्य न करवें ह्मणोन जाणा ॥ सोडोन देसी अयोध्या पट्टणा ॥ चौदा वर्षें दंडकारण्या ॥ सेवि
लें हे कवण कीर्ती ॥ ४३ ॥ पंचवटिके राहातां वस्ती ॥ रावणें हरिली तुझी शक्ती ॥ तयेलागी करिसी खंती
॥ हाहा सीता ह्मणोनी ॥ ४४ ॥ साकडें पडतांची केवळ ॥ अठरा पद्मीं गोळांगुळ ॥ मेळवोनि भक्षिसी कं-
दमूळ ॥ रात्रंदिन केवळ पिलपसी ॥ ४५ ॥ तें राजपदवी सोडोन सारी ॥ जाहलासी नंदाचा खिल्लारी ॥
गोपाळ संगिया गोधनें चारी ॥ परस्त्री आणि गोरस चोरिसी ॥ ४६ ॥ जार चोरांमाजी शिखामणी ॥ हे तव
कीर्ति दशग्रंथीं पुराणीं ॥ माया टाकोन दोघीजणी ॥ पुतना आवडली बहु तुज ॥ ४७ ॥ सोळा सहस्र गो-
पांगना ॥ भोगोन मिरविसी ब्रह्मचर्यपणा ॥ सोंग संपादनीच्या खुणा ॥ जेवीं दाखविसी जनास बहुरूपी ॥
॥ ४८ ॥ बहुबोलणें बहु हासणें ॥ भोळ्याचें भक्षिसी भातुकें भाजिपानें ॥ उगेंचि मौन्यपणें बैसणें ॥ शक्ति
हीन ह्मणवोनी ॥ ४९ ॥ म्लेंच्छ मारावयासाठीं ॥ लटकीच दाखविसी हातोटी ॥ बैसावया तुरंग पृष्ठीं ॥ शक्ति
कैंची तुजलागीं ॥ ५० ॥ म्लेंच्छ वधावया खड्गधारण ॥ हें कैशावरोन असें प्रमाण ॥ तुज नाहींच देहाभिमान
ब्राह्मणें ताडितां लत्ताप्रहारें ॥ ५१ ॥ देही विदेहा वर्णादर्ण ॥ अनंतयुगीं करिसी भ्रमण ॥ त्यामाजी बाहत्त
रयुग प्रमाण ॥ वृत्ति शून्य होवोन फिरसी ॥ ५२ ॥ बहुत दिवस शोधितां तुजला ॥ बाहत्तर युगातें दृष्टि
पडला ॥ त्रेतायुगांतीं संबंध पडिला ॥ तुज मजला युद्धार्थी ॥ ५३ ॥ तेथें युद्ध घोरांदर ॥ करितां निवविलें

तव अंतर ॥ तेव्हां संकट पडिलें तुज दुर्धर ॥ मीं अजिंक्यसें कळलें तुजला ॥ ५४ ॥ शक्ति आणोन मजला समरीं ॥ मारविलेंसी हिमकेदारी ॥ तो मीं विरोध धरोनी अंतरीं ॥ संह्याद्रीवरी जन्मलों ॥ ५५ ॥ तुवां अनंत देह धरिले जाणा ॥ ते मज ठाउके शतानना ॥ सत्व रज तम ऐक्यत्व सगुणा ॥ होऊन त्रिगुणा त्रै मुर्ति जाहलासी ॥ ५६ ॥ माझा पराक्रम सहस्र नयना ॥ ठाउका असे तो मीं नवदें वचना ॥ तूं परमभ्याड अंतःकरणा ॥ काळ यवना पुढें पळसी ॥ ५७ ॥ जरासंधाचें भय दारुण ॥ जाणोन समुद्रीं करिसी पेण ॥ ऐसें संसारीं सदाल पोन ॥ प्रगटार्थीं वर्तणें तुजनाहीं ॥ ५८ ॥ आतां कवणाचा पुरुषार्थ थोर ॥ घेवोन पावलासी येथवर ॥ तरी कां ताडितां महिषासुर ॥ पर्वतातळीं पडिलासी ॥ ५९ ॥ बैसावया अश्ववाहनीं ॥ अभ्यास नसे तुज खड्गपाणी ॥ साणसी कांहो भूधरमणी ॥ हे तीव्र जघन असोनियां ॥ ६० ॥ असो तुझिये हस्तीं माझें मरण ॥ नाहीं ऐसें जाणसी खूण ॥ पतंग दीपासी आलिंगन ॥ देह शून्य कां कळोन होसी ॥ ६१ ॥ माझा वधोत्सव पाहवा ॥ हें पातलें तुझिया जीवा ॥ तें असाध्य गोष्टीचा ठेवा ॥ त्रिदश देवा नुमगेची ॥ ६२ ॥ त्रेतायुगींच्या पराक्रमासी ॥ ठाउकें असे अनुक्रमेसी ॥ उगेंचि बद्रिका श्रमासी ॥ जावें श्रमासी राखोनियां ॥ ६३ ॥ भस्मांकित जटाधारी ॥ खड्गपात्र डमरु शूळकरीं ॥ हीं चिन्हें देखिलीं बाह्यात्कारीं ॥ तव अंतरीचें सदाशिव जाणें ॥ ६४ ॥ बाहेर तापसाचें सोंग ॥ संपादणी बहुरूपी जनासी सांग ॥ कीं गारुडी करीं धरुन भुजंग ॥ घेवोन आलासी संह्याद्रीवरी ॥ ६५ ॥ कीं हातीं घेवोन अमृत बिंदू ॥ पातलासी चतुर्दश भुवनभेदू ॥ वधविसी जैसे सुंदोपसुंदू ॥ तैसा नसे मीं बळसिंधु असे ॥ ६६ ॥ ऐसें निंदा स्तवनोत्तर ॥ परिसोन कोपला करुणाकर ॥ आजपासोन

षष्ठम दिवशीं निशार्धपुर ॥ तुज वधीन एकविंशति घटीं ॥ ६७ ॥ ऐसा शब्दा शब्दीं उभयवर्गी ॥ वाग्वाद झाला वैरवर्गी ॥ ल्हुंडी पाश पट्टिश खड्ग ॥ घेवोन युद्धा प्रवर्तले ॥ ६८ ॥ पाश पट्टिश खड्गधारें ॥ ऐसें तीव्र युद्ध परम निकुरें ॥ झुंजा प्रवर्तले घोरांदरें ॥ उभयतां केलें एक दिवस ॥ ६९ ॥ दुसरे दिवशीं निरंजन ॥ तीव्र सज्जोन धनुष्यबाण ॥ रत्नासुरासी लक्षोन नयनें ॥ शर संधानीं वर्षला ॥ ७० ॥ तीव्र संधानी शर धुसर ॥ व्यापिली मही आणि गगनोदर ॥ शरीं लपविला दिवाकर ॥ जेवीं घनघोर शरदृतु ॥ ७१ ॥ ऐसें पाहोन रत्नासुरें ॥ शर चूर्ण केले गदाप्रहारें ॥ विकटाट शब्दें दशनि चावोन अधर ॥ घर्घराट शब्द परिसवी ॥ ७२ ॥ घर्घराट शब्द बाणपंजर ॥ उडविलें जैसें धान्य धुसर ॥ गदा घेऊन सामोर ॥ श्रीनाथा सन्मुख पातला ॥ ७३ ॥ गदा फिरवित गर्गरा ॥ आवेशें पातला समोरा ॥ हाणावेंच तंव हिमकेदारा ॥ घाव चुकविला ते वेळीं ॥ ७४ ॥ गदा प्रहार वांयां गेला ॥ गर्जोनि रत्नासुर बोलिला ॥ दिससी फार चांगला भला ॥ कां चुकविला गदाघावो ॥ ७५ ॥ चांग लाभलासी आज आमुतें ॥ चांगलें मानस युद्धीं न परतें ॥ चांगभला ह्मणविसी संग्रामहार्थें ॥ करिसील निजबळींतें पाहूं ॥ ७६ ॥ ते कौंस चाणूर नव्हे जाण ॥ हें रत्नासुर वज्रठाण ॥ मम श्रेष्ठबंधु रक्तभोजन ॥ अनुष्ठानीं बैसला असे ॥ ७७ ॥ तयाचें भंगितांचि अनुष्ठान ॥ पालथीं घालील चौदा भुवन ॥ आतां तरी जाय फिरून ॥ बद्रिका श्रामासीं परतोनियां ॥ ७८ ॥ नव्हें शिशुपाळ दंतवक्र ॥ नव्हे शष्टप शकटसूत्र ॥ वकासुराचे चिरिसी वक्र ॥ तैसा नसे मीं रत्नासुर ॥ ७९ ॥ ऐसा वदोन गगन गर्जनी ॥ असंख्य वर्षला शर संधानीं ॥ हें लक्षोन खड्गपाणी ॥ धनुष्य करींचें छेदिलें ॥ ८० ॥ जें जें रत्नासुर धनुष्य काढी ॥ तें तें नाथ

छेदोन महीं पाडी ॥ हें देखोन अतितांतडीं ॥ रत्नासुर खवळला ॥ ८१ ॥ सरला धनुष्य बाणाचा ओढा ॥ रत्नासुर बळी गाढा ॥ करकरां खावोन विक्राळदाढा ॥ मिशा पिळित नेत्र आरक्त ॥ ८२ ॥ विक्राळ वदनी नीळ वर्णी ॥ खदिरांगार श्रवती नयनीं ॥ ऐसा कृतांतचि घनगर्जनीं ॥ तोमर घेऊन निघाला ॥ ८३ ॥ तोमर घायीं रत्नासुर ॥ छेदोन टाकी शरपंजर ॥ तैं नवर्णवे भैरवाकार ॥ तेजो वधशक्ति सोडिली ॥ ८४ ॥ तेजोवध शक्ति कडकडाटी ॥ पातली करित तेज दाटी ॥ ते रत्नासुराच्या बैसतां मुगुटीं ॥ मुगुट पडिला किरिटासहित ॥ ८५ ॥ श्रीनाथें तेजोवध शक्ति ॥ सोडोन मुगुट पाडिला क्षितीं ॥ तैं रत्नें विकुरलीं संह्याद्रीपर्वतीं ॥ रत्नासुर मुगुटींचीं अपार ॥ ८६ ॥ रत्नमुगुट पडिला संह्याद्रीवरी ॥ तैं रत्नें विखरलीं गिरिकंदरीं ॥ ह्मणोन वदती रत्नागिरी ॥ तैं पासोन जन अद्यापी ॥ ८७ ॥ तेजोवध शक्तीनें मुगुट पडिला ॥ तैं रत्नासुर मस्तक उघडा झाला ॥ कवरी मस्तकीं सुटला ॥ ह्मणोन वधोत्सव केला स्वशक्ती ॥ ८८ ॥ तैं परीघ घेवोनियां हातीं ॥ रत्नासुर खवळला भद्रजाती ॥ गदा घेऊन दक्षिण हस्तीं ॥ दक्षिण पतीवरी धांवला ॥ ८९ ॥ भोवंडितां गदाप्रहार ॥ गर्जे चपळांवरीं रत्नासुर ॥ गदाघायीं धनुष्यशर ॥ चूर्ण करोनि टाकिलें ॥ ९० ॥ नाथें घेवोन खड्गत्रिशूळ ॥ युद्ध केलें रणतुंबळ ॥ तैं अमृतपात्रींचा बिंदुउसळे ॥ तेणें राक्षस दळेसी उठती ॥ ९१ ॥ घे घे वीरश्रीयेचे भर ॥ समरीं झुंझतां त्रिशुळधर ॥ श्रमी झाला हिमकेदार ॥ तीनराती युद्ध करितां ॥ ९२ ॥ अजिंक्य जाणोन रत्नासुर ॥ तैं डमर वाजविला भयंकर ॥ तो नाद भरोन ब्रह्मांडोदर ॥ श्री कमला श्रवणीं पातला ॥ ९३ ॥ चर्पट अंबेसी ह्मणे कमला ॥ श्रीकेदार युद्धीं बहु श्रमला ॥ डमर नादीं बाहिलें मजला ॥ असुर न शमला पराक्र-

मीं ॥ ९४ ॥ तुझे हस्तें रत्नासुर ॥ मरण पावेल निर्धार ॥ यालागीं जावोन अतिसत्वर ॥ साह्य होई केदारासी
॥ ९५ ॥ ऐसें परिसोनि चोपडाई ॥ निघाली शक्तिचमू समुदायीं ॥ संह्याद्रीवरी सूर्योदयीं ॥ चर्पटअंत्रिका पात-
ली ॥ ९६ ॥ परशराम गोरखनाथ ॥ नारदासहित व्यास समर्थ ॥ पातले जेथें श्रीरवळनाथ ॥ संह्याद्रिपर्वतीं यु
द्ध करिती ॥ ९७ ॥ नाभिका बादरायण ॥ ह्मणे ज्योतिस्वरूपा स्वस्ति कल्याण ॥ अंगीं वज्रकवच घालून ॥ मग
घोर कंदन करावें ॥ ९८ ॥ तूं विश्वकुटुंबी भगवान ॥ वर्तत अससी समसमान ॥ शत्रु मित्रचि होऊन ॥ तव प
दांघ्रीं लीन झाले ॥ ९९ ॥ सद्भक्तांसी भजनीं मुक्ती ॥ विभक्तां देसी विरोधशक्ती ॥ ह्मणोन अवतरसी निरंजनज्यो
ती ॥ पौगंडऋषिनंदन ह्मणविसी ॥ १०० ॥ कार्या कारणाचि ज्योति संभवा ॥ श्रीविमलांबुजी कर उद्भवा ॥ ब्रह्म
चारिया बटु भैरवा ॥ वज्रकवच धारणकरा ॥ १ ॥ ह्मणोन वज्रकवच घेवोन हातीं ॥ श्रीव्यासें लेवविलें नाथाप्र-
ती ॥ तें परिसावें संतश्रोतीं ॥ आधार युक्त सुविचारें ॥ २ ॥ शिखेमाजी रेणुकारमण ॥ मस्तकीं भाळ लोचन ॥
कपोल मंडित भगवान ॥ भ्रुवोर्मध्य मेदिनीपती ॥ ३ ॥ नेत्रीं ज्योतिस्वरूप जाणा ॥ कर्णयोर्कीर्ति वळ वर्धना ॥
कुंडलिनी कुशासना ॥ नाशिका विघ्न नाशका ॥ ४ ॥ उमानाथ ह्याधरा ॥ दंतयोर्धरणीधरा ॥ जिव्हायां वदे उच्चा-
रा ॥ हनुवटी हनुमत्प्रिया ॥ ५ ॥ ग्रीवायां नीलग्रीव हारा ॥ स्कंदौस्कंद प्रियकरा ॥ बाहो शास्त्रधृता डमरा ॥
हस्तौ डमर धारका ॥ ६ ॥ ह्रदय विश्वनाथ स्वरूपा ॥ उदरस्थो जनाधिपा ॥ नाभिपातो गुहाःकलापा ॥ करम-
ध्य कपोलिना ॥ ७ ॥ गुह्यागुह्य परप्रकाशा ॥ गुरुभ्यां उक्ष वाहन वासा ॥ जान्हो जान्हुसुता सहस्त्र शीर्षा ॥
जंघयो भुजंगम आकारा ॥ ८ ॥ गुल्फयो गुढ कर्ता ॥ पद्योवंद्य सुरार्चिता ॥ नखेषु रोमांकुरीं मंडिता ॥ व्यापक

सर्व सिद्धिपू ॥ ९ ॥ शेषारूढो लक्ष्मी रमणा ॥ त्रिशूलधरा हे त्रिलोचना ॥ उपवित धारणा चतुराननना ॥ जमद
ग्निरव अभिधाना खळेश्वरा ॥ ११० ॥ खड्गपाणि डमर शूल मंडिता ॥ तुरंग वाहना रणदीक्षिता ॥ भस्मांगाच्या
गाय लिंगांकिता ॥ श्रीनाथ मार्गाधिप स्वरूपा ॥ ११ ॥ हें पद्मपुराणीचे संमत्तें ॥ वज्रकवच श्रीनाथें ॥ लेखवि-
लें श्रीव्यास हस्तें ॥ राक्षस वधार्थी समरंगणीं ॥ १२ ॥ तो मींनव्हें सिंहिकासुर ॥ युद्धीं निववीन मीं तत्र अंतर
॥ हें परिसोन दक्षिणकेदार ॥ रत्नासुरासी वदतसे ॥ १३ ॥ मीं दृष्टि करीन खदिरांगार ॥ निमिष्यार्धीं जाळीन
ब्रह्मांडागार ॥ तेथें रक्तभोजासुर रत्नासुर ॥ तृणप्राय पामरा ॥ १४ ॥ जेवीं त्रेतायुगीं तूंतें समरीं ॥ संहारिलें म्यां
स्वशक्ति करीं ॥ तैसेंचि तुजला घोर समरीं ॥ स्वशक्तिकरीं संहारीन ॥ १५ ॥ तंव चर्पटअंबा ह्मणे असुरा ॥ श-
तमुख तुंचि परी काय केलेंसी खरा ॥ ह्मणोन शतमूर्खा मलिनांतरा ॥ सावध होई युद्धालांगीं ॥ १६ ॥ ज्योतिस्व
पाचे दृष्टिपुढें ॥ तव दोर्दंड जुंबाडे ॥ खंडितां रक्तगंगा भडाडे ॥ धडाडीन मीं संह्याद्रीवरी ॥ १७ ॥ ऐसें शक्ती-
च्या तीव्रोत्तरा ॥ परिसोन क्रोध नावरे रत्नासुरा ॥ विकटाट शब्द अंबरोदरा ॥ विदारोन प्रतिशब्दा ॥ १७ ॥
गदा घेवोन प्रचंड हातीं ॥ फिरवित पातला चक्राकृती ॥ ते शक्तिप्रहारें छेदोन क्षितीं ॥ गदा खंडोन पाडिली
॥ १९ ॥ गदा वांयां गेली थोर ॥ हें पाहोनि रत्नासुर ॥ भूमीसी घासोनियां कर ॥ तोमर घेवोन धांवला ॥ २०
तोमर घेवोन सहस्त्र धारी ॥ तळपोन उसळत अंबरीं ॥ तें चर्पटा सहस्त्रशरीं ॥ तोमर करींचा छेदिला ॥ २१ ॥
तोमर खंडोन शतखंड पडला महीं ॥ पट्टिश घेवोन उठिला पाहीं ॥ चपळाकार जाहला देहीं ॥ दाही दिशा उल्हाळत
॥ २२ ॥ अष्टप्रधानेसी भैरवदळ ॥ युद्धा प्रवर्तले सक्रोध काळ ॥ शस्त्रमंत्राग्नि कल्लोळ ॥ भयंकर प्रबळ झुंज-

ती ॥ २३ ॥ रत्नासुराचे सहस्त्र राक्षस ॥ काळभैरवें वधिले रोषें ॥ हें पाहोन निशाचरेश ॥ घोर संग्राम तीव्र केला ॥ २४ ॥ शकटभैरी मुढभैरी ॥ क्षतांग केले पट्टिश धारीं ॥ तैं विकळ पडितां महीवरी ॥ भैरव भार क्षोभला ॥ २५ ॥ जर्जर करोनि भैरवदळ ॥ पट्टिश चपळाधारी कल्होळ ॥ घर्घराट शब्द बंबाळ ॥ उसळोन अंबरीं तळपती ॥ २६ ॥ काळभैरवासी ह्मणे चोपडाई ॥ तुह्मीं स्वस्थ असावें गा त्द्दयीं ॥ कौतुक पाहोन येच समयीं ॥ एक ठायीं बैसोनियां ॥ २७ ॥ तें ऊर्ध्व करोनि पट्टिश हस्त ॥ उल्हाळ देवोन उसळत ॥ विकटाद्द शब्दें गर्जना करित ॥ चर्पट अंबेसी ऐक ह्मणे ॥ २८ ॥ बायकांनींकरावें कंदन ॥ हें कवणें शास्त्रीं असें प्रमाण ॥ पुरुषासवें निर्लज्जपणे ॥ नव्हे स्वधर्म स्त्रीयांचा २९ ॥ महा जरी पुरुषार्थ करणी ॥ केली जरी बायकांनीं ॥ तयांची कवण शिराणी ॥ वर्णावी तें सांगपा ॥ १३० ॥ स्त्रियेचे सवें करितां कंदन ॥ सर्व ठेविति मज दूषण ॥ ह्मणोन संशय मानितें मन ॥ चंद्रानने रणीहून जाईं ॥ ३१ ॥ ऐसें वदोन पट्टिश घेतलें करीं ॥ सन्मुख तळपें चक्राकारी ॥ हें पाहोन चर्पटा सुंदरी ॥ असूर सप्तशरीं विंधिला ॥ ३२ ॥ दोन रुतले भुजदंडीं ॥ युग्म शरिरीं दैउडे प्रचंडी ॥ भेदोन तृतीयपट्टिश खंडी ॥ चोपडाईनें करावें ॥ ३३ ॥ पट्टिश खंडिलें तीक्ष्ण बाणें ॥ भृशंडीश खंडिलें संक्रोणें ॥ सिंहनादीं घनगर्जनें ॥ शक्ति सन्मुख पातला ॥ ३४ ॥ शक्तिमंत्रास्त्र वर्षली समरीं ॥ तें निवारित भृशंडीश प्रहरीं ॥ जें जें वर्षती बाणधारीं ॥ तैं तें निवारित रत्नासुर ॥ ३५ ॥ तें ज्योतिस्वरूपाची खड्गलतिका ॥ शराग्नि वर्षली चर्पट अंबिका ॥ तैं रत्नासुर धरोन शंका ॥ भृशंडीशें छेदिले शक्तिबाण ॥ ३६ ॥ सक्रोध येवोन क्रोधाग्नि भाला ॥ उर्ध्व अंबरीं दैत्य उडाला ॥ शक्तीनें पंचशक्ती विंधिला ॥ भाला खंडिला पंचबाणीं ॥ ३७ ॥

सांग सैती बरची कटार ॥ लहुंडी मांडु दुधार ॥ चक्रें भिंडीं माळातिधार ॥ चौ धारें शतसहस्र धारी ॥ ३८ ॥ ऐसें अनेक शस्त्रांचे संभार ॥ युद्ध करित दैत्येंद्र घोरांदर ॥ कृतांत स्वरूपी रत्नासुर ॥ घनघोषीं झुंजतसे ॥ ३९ ॥ अनेकास्त्रें अनेकवर्णी ॥ युद्ध करितसे रणांगणीं ॥ ज्योतिस्वरूपांबरींची सौदामिनी ॥ असुरास्त्र संभार खंडिले-तिणें ॥ ४० ॥ सरली शस्त्र साधनाची घडिमोडी ॥ शर लावी श्रीवंध्या घन घडाडी ॥ भ्रांतिस्त्रीनें पाहतां पदीं वेगडी ॥ रत्नासुराचि पडतसे ॥ ४१ ॥ सरलें शस्त्रास्त्र अमोघ संधान ॥ कीं तैल नसतां दीप वाती भक्षण ॥ कीं व्युत्पन्न कळा रहित पुराण ॥ केवीं सांगेल विस्तारीं ॥ ४२ ॥ कीं सत्शिष्या पासून गुरूची महिमा ॥ नकळे मानवा अर्थांश महिमा ॥ तैसा रत्नासुर करावया संग्रामा ॥ स्तब्ध दृष्टि विलोकित समरंगणीं ॥ ४३ ॥ कीं ते सर्पदृष्टि अजा स्तब्ध ॥ तैसा झाला बुद्धि मंद ॥ कीं कृष्णपक्षीं पूर्ण चंद्र ॥ विचरतां रणवारीं क्षय पावला ॥ ४४ ॥ असो मोहन स्तंभन उच्चाटण ॥ रत्नासुर रणांगणीं करितां पठण ॥ हें चर्पट अबेनें लक्षोन ॥ विशाळ वर्णी जाहली ॥ ४५ ॥ हें पाहोन असुर तांतडी ॥ त्रिपुटिवरून घातली उडी ॥ ह्मैषा होऊन अंग प्रौढीं ॥ चर्पट अंबेवरी धांविन्नला ॥ ४६ ॥ रत्नासुर आणि दाक्षिणाधीशें ॥ युद्ध केलें चत्वारी दिवस ॥ शक्ति सवें सप्तदिवस ॥ युद्ध केलें रत्नासुरें ॥ ४७ ॥ चत्वारीदिवस आणि सप्तवार ॥ निरोदकी निराहार ॥ युद्ध करोन भयंकर ॥ पर्वताकार ह्मैषाझाला ॥ ४८ ॥ ह्मैषा होऊन भयंकर ॥ युद्ध करितसे रत्नासुर ॥ चर्पट अंबेनें पाहोन भयासुर ॥ होऊन अष्टायुद्धें धरियेलीं ॥ ४९ ॥ परीघ घालोन रत्नासुरा ॥ खड्गें छेदिलें मातंगशिरा ॥ तें कडकडाट चाविली
२० धरा ॥ रत्नासुरें समरंगणीं ॥ ५० ॥ मस्तक छेदितांचि खड्गधारें ॥ मातंग ग्रीवेंतून ह्य रत्नासुर ॥ खड्ग खेटक

घेवोन करें ॥ अंबिके वरी धांवला ॥ ५१ ॥ अष्टायुधेंसी भगवती ॥ विशाळ वदनीं विशाळाकृती ॥ होतां वावर झोटी धरोनी हस्तीं ॥ त्रिशुळि पदीं कटाक्ष रगडिला ॥ ५२ ॥ विक्राळ तनु विशाळाक्षी ॥ विकटाट लक्षी रौद्रीकटाक्षी ॥ विघट घुर्घुरी रुधिर भक्षी ॥ त्रिशूळ क्षतांच जाहला ॥ ५३ ॥ वर्षाऋतु श्रावणमासीं ॥ अर्धरात्रीं तिथि षष्टीसी ॥ श्रवण नक्षत्र तया समयासी ॥ एकवीस घटका विंशतिपळें ॥ ५४ ॥ चर्पट अंबे सर्वे विरोधें ॥ सप्त क्षियारात्रीं युद्ध क्रोधें ॥ करितां रत्नासुराची कंबधें ॥ तीन झाली समरंगणीं ॥ ५५ ॥ म्हैषा रत्नासुर होऊनी ॥ युद्ध केलें समरंगणीं ॥ ऐसी न वदली व्यासवाणी ॥ ऐसें गुणिजनीं न ह्मणावें ॥ ५६ ॥ जेवीं वाजीवाहन वदला मुनी ॥ तैसाचि भाव हा कल्पिजे मनीं ॥ परी हे म्हैषासुर मंथनीं ॥ ध्यानमूर्ति आहे अंबिकेची ॥ ५७ ॥ म्हैषासुर मंथनीं चर्पटअंबा ॥ प्रत्यक्ष असे शशांक बिंबा ॥ अनादिशक्तीच्या प्रतिबिंबा ॥ युगायुगीं पाहती महाजन ॥ ५८ ॥ म्हैषासुर मंथनीं चोपडाई ॥ अष्टायुधेसी जाज्वलाई ॥ जाहली ह्मणोन कथान्वयी ॥ रत्नासुरा स्वशक्ती नाथें वधविलें ॥ ५९ ॥ रत्नासुरासी स्वशक्तिकरें ॥ समरीं वधिलें हिमकेदारें ॥ रत्नासुररक्तें सह्याद्रिवर ॥ रक्तवर्णी तो रंगला ॥ ६० ॥ पीत आरक्त रंगले मृत्तिका पाषाण ॥ रत्नप्रभा दिसती सुवर्णवर्ण ॥ दुसरें सांगीतलें वरदान ॥ तें विस्तारें वदे रत्नासुर ऐका ॥ ६१ ॥ हे जगदंबे अनादिशक्ति ॥ माझी परिसावी विनंती ॥ श्रीनाथा सन्मुख माझी वस्ती ॥ अखंडित असावी ॥ ६२ ॥ माझिये नामाची हेनगरी ॥ नाम ठेवावें रत्नागिरी ॥ मनुष्यरक्त द्यावें तिळभरी ॥ एकदांतरी वर्षांत ॥ ६३ ॥ हे जगदंबेनें परिसोन वाणी ॥ तथास्तु ह्मणे कमलाक्ष कल्याणी ॥ रत्नागिरी नाम हें त्रिभुवनीं ॥ जाणोन विश्वयेती समारंभें ॥ ६४ ॥ तें पासोन वदती रत्नागिरी ॥

प्रख्यात नाम भरतखंडायीं ॥ षष्टी पूजेचे जे अधिकारी ॥ बगळाशक्ती बगाडी प्रिय मजला ॥ ६५ ॥ बगळाश क्तीची बगाड महिमा ॥ रक्तभोज वधांतीं सुगमा ॥ वदेल सूतऋषि सत्तमा ॥ शौनकासी विस्तारें ॥ ६६ ॥ असो चर्पट अंबेचे करें ॥ मृत्यु पावला रत्नासुर ॥ हें व्यासवाणी भविष्योत्तर ॥ तदनंतर रक्तभोज वधोत्सव ॥ ६७ ॥ असो रत्नासुर वधिला खळनार्थें ॥ ऐसा पडिला जन प्रख्यात ॥ ज्योतिस्वरूपेंचि मूर्तिमंत ॥ खड्गशक्ति समन्वित हा ॥ ॥ ६८ ॥ तेजोवधशक्तीनें मुगुट धरणीं ॥ पडिला रत्नासुराचा रणांगणीं ॥ तेव्हांचि भाविलें महाजनीं ॥ रत्नासुर मारिला खळनार्थें ॥ ६९ ॥ ऐसें जनवाक्य महाघनें ॥ गर्जती अद्यापि मनकल्पनें ॥ परी ते व्यासाचे मुख्यवचनें ॥ नाथें चर्पटशक्ति हस्तें वधविला ॥ ७० ॥ ह्मणोन खड्गधरिलें हातीं ॥ तेंचि चर्पटा प्रबळशक्ती ॥ असो रत्नासुर वधिला शक्तिहस्तीं ॥ अष्टभुजा भगवतीनें समरंगणीं ॥ ७१ ॥ आतां रक्तभोजन दक्षिणा धीशी ॥ घोर संग्रामीं विध्वंसी ॥ तो कथार्थ चतुरीं राजहंसीं ॥ एकोणिसावे अध्यायीं परिसावा ॥ ७२ ॥ संग्राम करील रक्तभोजन ॥ तो वीरश्रीकर शृंगार लेणें ॥ श्रोतीं श्रीमंतीं करावें श्रवण ॥ नाथ निरंजनाची पराक्रम प्रभा ॥ ७३ ॥ इतिश्रीकेदारविजय सारे ॥ श्रवण करितां संताप सारे ॥ हरती नामामृत तुषारें ॥ सोहं संसार सार करावा ॥ ७४ ॥ सारासार विचार विवरी ॥ बैसोन घटीं पल मानसीं आवरीं ॥ केदारविजय सरोवरीं ॥ सुस्नात चतुरीं होईजे ॥ ७५ ॥ संत मुनिजन पंडित सकळ बैसले विजय सरोवरपाळीं ॥ विद्वजन हंस मराळीं ॥ हरिनाम मुक्ताफळीं पूजिलें ॥ ७६ ॥ जे तत्वार्थ मौक्तिकाचे भोक्ते ॥ आत्मानुभवी लिप्तालिप्त ॥ विषयीं असोन सदैव विरक्त ॥ तेचि हरिभोक्ते वदावें ह्मणती ॥ ७७ ॥ जेवीं संसारीं व्यापकपणीं ॥ वर्तत तैसेंचि हरिभक्ति भजनीं ॥ वर्त्तावें काया वाचा मनें अंतःकरणीं ॥ अष्टादशोध्याय गोडहा ॥ १८ ॥ ओं. १७८

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय दक्षिणदिग्वधूवर भूषणा ॥ दक्षिणपति दक्षिणानना ॥ दत्तात्रय
पूर्वाभिमुख क्रमण चरणा ॥ दनुज दमना कुंकुमांकित पद मंडिता ॥ १ ॥ दक्षिणायनीं आला ज्योति स्वरूप ॥
दक्षिण दिग्विजय केला बळप्रताप ॥ दक्षिणदिग्वधूनें स्वयें साक्षेप ॥ दक्षिणादीप लाविला ॥ २ ॥ दक्षयज्ञ मं-
टपीं दक्षमखांतका ॥ दीक्षित आकारिया शतमखा ॥ दिली मुक्ति रत्नासुरा शतमुखा ॥ दिव्यशक्तिहस्तें नाथा
सन्मुख ॥ ३ ॥ ज्योतिर्मय आदिशक्ति ॥ जो नाम रूपा व्यक्ताव्यक्तीं ॥ जो सर्वथा पाणि वेदोक्तीं ॥ तेचि विशा-
ळाकृति झाली रणांगणीं ॥ ४ ॥ सुर नर किंनर गंधर्व ॥ सिद्ध साध्य मरुद्गण सर्व ॥ चर्पट अंबेचें अर्चन अपूर्व
॥ करितील तें पुढें परिसावें ॥ ५ ॥ असो चोपडाईचे निजकरें ॥ मृत्यु पावला रत्नासुर ॥ युद्धीं तोषविला हिम-
केदार ॥ रत्नासुरें चत्वारी दिनपर्यंत ॥ ६ ॥ शक्तिहस्तें रत्नासुर मरणा ॥ मध्यरात्रीं पावला जाणा ॥ हें परिसो-
न चंद्रसेना ॥ शोककरी आक्रोशें ॥ ७ ॥ शोकें संतप्त चंद्रसेना ॥ ह्मणे परिसें रक्तभोजना ॥ त्वां सप्तदिवस अनु-
ष्ठाना ॥ केलें कर्म हें फळासी आलें ॥ ८ ॥ तंव येरीकडे भैरवभारीं ॥ श्रीनाथ ह्मणे गंडभैरी ॥ रक्तभोजाचा हो-
म विध्वंस करीं ॥ सुवर्ण पिंपळातळीं बैसलासे ॥ ९ ॥ तयाचें भंगावया अनुष्ठान ॥ संह्याद्रिभोंवतें भैरवगण ॥
विशाळाकृति होवोन ॥ बैसावें रक्षण ममाज्ञा ॥ १० ॥ ऐसें ऐकतां काळभैरी ॥ गंडभैरव निघाला सपरिवारीं ॥
अदृश्य होवोन राजद्वारीं ॥ सुवर्ण पिंपळासी पातला ॥ ११ ॥ रुधिरोचन धीरोचन ॥ यांचीं प्रेतें घेऊन गुप्तप-
ण ॥ होमावरी टाकितां अवदान ॥ होमपात्रें भंगिलीं तें परिसावें पुढें ॥ १२ ॥ ऐसें विध्वंसिलें होमा ॥ तें रक्त-
भोजाची क्रोधाग्निगरिमा ॥ प्रदिप्त होतां तें रत्नासुराची भामा ॥ शोक संतप्त परिसवी ॥ १३ ॥ करुंनये तें क


अध्याय १९ वा.

र्से केलें ॥ जाणोनि आवडी विष भक्षिलें ॥ अग्रीं बैसोन मूळ खंडिलें ॥ मग शरीर वांचेल कैसेनी ॥ १४ ॥ जें जाहलेंतें बहुत बरवें ॥ हे प्रारब्धाची विचित्र ठेव ॥ त्रैलोक्यनाथ देवाधिदेव ॥ लक्ष्मी सहित पातला ॥ १५ ॥ अहंकृति करोन भरिलांभरी ॥ अव्हेरिला तो बद्रिविहारी ॥ याचें फळपावला स्वकांते सहित समरीं ॥ अविचार तरूचें फळभोगा ॥ १६ ॥ ग्राम केरली कमंडलु तीरीं ॥ कर्कोटक भैरव पातला गजरीं ॥ केरलेदेशीं वधिले करीं ॥ सहस्त्र निशाचर समवेत ॥ १७ ॥ अंधकासुर वधिला असुरदळीं ॥ शत निशाचर वधिले बळी ॥ पौरव वधिला पोरळीं ॥ कल्हाट भैरवें निजबळें ॥ १८ ॥ यवलोजी कर्कोट भैरवेश ॥ दैत्य वधिला यवनाश ॥ सहस्त्र राक्षसांचा करोन नाश ॥ भैरव तेथेंचि राहिला ॥ १९ ॥ केशिया राक्षस केशापुरीं ॥ होता निघाला करवीराज्ञें बाहेरीं ॥ युद्धासी करोन घोरांदरीं ॥ पाराशराचिये शेजारीं राक्षसवाडी भयंकर ॥ २० ॥ तया केशीयाचे त्रयसुत नामें कपर्दी ॥ सदैव देव दैत्यातें स्पर्धी ॥ तो वधिला संग्रामीं निशार्धीं ॥ प्राकृत राक्षस वाडी जयासी ह्मणती ॥ २१ ॥ हेतिप्रहेती केशिकुमर ॥ महा पराक्रमी धुरंधर ॥ त्याचा संग्राम होईल घोरांदर ॥ तो लक्ष्मी विजयीं परिसावा पुढें ॥ २२ ॥ त्या केशी कुमाराची तीव्र करणी ॥ लक्ष्मी विजयीं परिसावी श्रवणीं ॥ ह्मणोनि यदर्थीं पंडितजनीं ॥ संज्ञार्थ पद्मपुराणींचा परिसावा पुढें ॥ २३ ॥ असो भैरव दऱ्यांत दैत्य दुर्धर ॥ युद्धासी करोन घोरांदर ॥ दुर्धर नामा निशाचर ॥ दिग्गज भैरवें वधियेला ॥ २४ ॥ मंगासुर राक्षस सांगरुळीं ॥ वज्रभैरवें वधिला प्रबळी ॥ बोभाटभैरवें बोरपाडळीं ॥ बव्हासुरासी मर्दिलें ॥ २५ ॥ सांगरुळाचे पश्चिमगिरी ॥ तुंगभद्रासुर वधिला समरीं ॥ व्याघ्राईनें दैत्य वधीला वागरुनगरीं ॥ तुंगभद्राशक्तीनें निजबळें ॥ २६ ॥ तुंगभद्रा तेचि तुंब

जाई ॥ हें प्राकृतीं बोलती जनसमुदायीं ॥ करवीरा भोंवती नुत्पत्ति दिशादाहीं ॥ भैरव भारें व्यापिल्या ॥ २७ ॥ वीस सहस्रांवरि नवशत ॥ अंगारदैत्य मदोन्मत्त ॥ वधिला दानव खिंडींत ॥ गुढभैरवें प्रतापरुद्रें ॥ २८ ॥ जाज्वलासुरनाम जाफळीं ॥ दहासहस्र निशाचरदळी ॥ निगुढ भैरवें मारिले सकळी ॥ रण तुंबळ संग्राम करोनियां ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कंकासुरःपौरवाश्च कपर्दिनिशि गंधयोः ॥ हत्वाकमलभैरेण चत्वारी दैत्य दीक्षितं ॥ ॥ टीका ॥ पौरवासुर कंकासुर ॥ निशिगंधादि तिसरा असुर ॥ हे तिघेजण राक्षस क्रूर ॥ कमळभैरवें वधियले ॥ ३० ॥ तिघे वधिले त्रिस्थानीं जाण ॥ जाकळें केकळें नामाभिधान ॥ ठेवितां कमळभैरवें अभिन्न ॥ तैसेंचि प्राकृत बोलती अद्यापी ॥ ३१ ॥ करवीर रत्नाचळाचिया सभोंवती ॥ नाथें घातला बाणावर्ती ॥ तुमच्या आतां पुरुषार्थीं ॥ कवण तो येईल कार्यासी पुढें ३२ ॥ असो आतां तुमच्या विरोध धर्में ॥ तोचि करावा पूर्वक्रमें ॥ मीं जातें पति समागमें ॥ ज्योति स्वरूपीं मिळावया ॥ ३३ ॥ मम निजांतरींची अंतरमाळा ॥ घालीन जगदंबच्या गळां ॥ पति संगती सायोज्यडोळां ॥ क्रमण पदकमळा भोगीन ॥ ३४ ॥ असो रक्तभोजाची कांता ॥ जळसेना नवरस भरिता ॥ यादोघींची स्वात्म निवेदन कथा ॥ कोल्हासुर वधांतीं परिसावी ॥ ३५ ॥ ऐसीं वदतां चंद्रसेना ॥ क्रोध नावरें रक्तभोजना ॥ समाप्ति करावया अनुष्ठाना ॥ पूर्णाहुतीसी करोनि युद्दासीं येतसे ॥ ॥ ३६ ॥ शक्तिसह भैरवभारीं ॥ वार्त्ता आणिली विजयाकारी ॥ श्रमीं होतां बद्रीविहारी ॥ रत्नासुर नाटोपे ॥ ॥ ३७ ॥ क्षेषा होतां रत्नासुर ॥ युद्दासी करोनि परम निकुर ॥ चोपडाईनें वधिला निशाचर ॥ विशाळ स्वरूपी श्रावणषष्ठीसी ॥ ३८ ॥ राक्षस घात दक्षिण दीप ॥ मंद माजला युद्धसंकल्प ॥ तें चर्पटअंबा प्रळयरूप ॥ होऊन

रत्नासुरासी वधियेलें ॥ ३९ ॥ हा रत्नासुर वधोत्सव मदगर्व ॥ अष्टादशोध्यायीं कथिला सर्व ॥ तो संत सज्जनीं परिसिला अपूर्व ॥ आतां रक्तभोजाची संग्रामकरणी परिसावी ॥ ४० ॥ हें परिसोन जलधिजाकुमरी ॥ वाजविल्या प्रस्थान विजय भेरी ॥ निघाली भैरव दळेसी घनघोरी ॥ शक्ति परिवारी बळप्रतापें ॥ ४१ ॥ येऊन उतरली पाराशरी ॥ अति जाज्वल छपन्नकोटि परिवारीं ॥ पालाशरीदैत्य वधिला करीं ॥ तीव्र संग्राम करोनियां ॥ ४२ ॥ भैरवावर्त रत्नाद्रीं आणि करवीरीं ॥ घालोनियां क्षिराब्धीची कुमरी ॥ अष्टदिशा अष्टभैरी ॥ भैरव भारेसीं ठेविले ॥ ४३ ॥ भैरवावर्त करवीर आणि रत्नाचळा ॥ श्रीनाथ वदतसे क्षेत्रपाळा ॥ काळभैरवादि वीर घेऊन सकळां ॥ रक्तभोजाच्या कळा आकर्षाव्या ॥ ४४ ॥ पूर्ण होम विध्वंस करोनी ॥ रक्तभोज आतांचि उठवावा येक्षणी ॥ हवनदैवता क्षोभवोनी ॥ रक्तभोजासी वध माझ्याकरें ॥ ४५ ॥ ऐसें वदतां नाथराय ॥ गंडभैरवादि चतुष्टय ॥ काळभैरव प्रतापसूर्य ॥ गुप्त स्वरूपीं निघाले ॥ ४६ ॥ जेवीं वैवस्वत मन्वंतरीं ॥ कृतांत सचरे युगयुगांतरीं ॥ तैसे प्रवेशले राजद्वारीं ॥ जेथें रक्तभोज अनुष्ठानीं बैसला ॥ ४७ ॥ सुवर्ण पिंपळाचिये तळीं ॥ होमासी बैसला महाबळी ॥ तें उर्ध्व उडोनि रणमंडळीं ॥ गंडभैरीनें नवल केलें ॥ ४८ ॥ रक्तभोज कुमारांचीं कलेवरें दोनी ॥ होमावरी टाकिलीं रागेंकरूनी ॥ तैं रक्तभोजावरी भद्रकाळी क्षोभेनी ॥ त्याचें आयुष्य मांस भक्षिलें ॥ ४९ ॥ रक्तभोज अनुष्ठानीं ॥ न चळेचि हें काळभैरवें लक्षोनी ॥ लत्ताप्रहरें ताडितां चरणी ॥ होम द्रव्यें विध्वंसिलीं ॥ ५० ॥ दैवक्षोभ झालिया ॥ महदैश्वर्य जातसेलया ॥ तेव्हां संतति पावे समूळ क्षया ॥ देवी क्षोभली यासीच ह्मणावें ॥ ५१ ॥ बुद्धि जाय विषयकाळीं ॥ आप्त वर्गादिक हंसती सकळी ॥ कुळदैवता क्षोभे

प्रसन्न काळीं ॥ हाचि ईश्वर क्षोभ ह्मणावा ॥ ५२ ॥ त्यां सप्तदिवस अनुष्ठान ॥ करितां काळभैरवें कृतन्न ॥ होम विध्वंसिला दारुण ॥ समीप मरण आलें दिसतसे ॥ ५३ ॥ रत्नासुराची वरांगना ॥ सत्यचि वदली सारवचना ॥ आतां तीव्र करोन कंदना ॥ नाथ निरंजनासी जिंकावें ॥ ५४ ॥ असो भंगतां अनुष्ठान ॥ सक्रोध उठिला रक्तभोजन ॥ जेवीं घृतें सिंपितां हुताशन ॥ तैसा रागें राक्षस प्रदिप्त जाहला ॥ ५५ ॥ ऐसा रक्तभोज क्रोधायमान ॥ युद्धासी पातला घनगर्जन ॥ लक्षोन श्रीनाथनिरंजन ॥ शब्दांगार वर्षतसे ॥ ५६ ॥ त्याह्माळोनि पाहातां ज्योति स्वरूपा ॥ पाठीसी शक्ति असे वळप्रतापा ॥ पाहातां दिगंबर रूपा ॥ निर्विकारी दिसतसे ॥ ५७ ॥ रक्तभोजन ह्मणे हे दिगंबरा ॥ श्रीलक्ष्मीचा करोनि आसरा ॥ प्रवर्तलासी येथें येवोन निकरा ॥ कवणें विचारें सांगपां ॥ ५८ ॥ भगवें नेसोन प्रावर्ण ॥ खड्ग घेवोन विकोश वर्ण ॥ ब्रह्माचारीआश्रमासी घेवोन ॥ शस्त्रधरिसी हाचि मुख्य अधर्म ॥ ५९ ॥ निर्विकारी निरापेक्षा ॥ तरुतळीं वस्ती करतळीं भिक्षा ॥ भक्षोन असावें अपरोक्षा ॥ जन विक्षेपार्थी कां भ्रमसी ॥ ६० ॥ निष्प्रपंची निर्विकारी ॥ निरुपम त्रिगुण सगुण आकारी ॥ जनीं विजनीं ह्मणविसी ब्रह्मचारी ॥ सोळा सहस्र नोवरी वरोनियां ॥ ६१ ॥ ऐसी अनंत योग धारणा ॥ दांडुक विचरसी या त्रिभुवना ॥ भोळ्या भाविकांच्या भुलवोन मना ॥ भजनीं भावनेंसी भ्रमविसी ॥ ६२ ॥ माझा बंधु रत्नासुर ॥ तुजप्रती वदला विनयोत्तर ॥ बांधोन देतहोता मंदिर ॥ रत्नखचित दामोदरा तुजलागीं ॥ ६३ ॥ भूमी दान सर्वस्वें दिधली ॥ त्यासीच घातलें पाताळीं ॥ पळोनि जाईल ह्मणोनि निजबळीं ॥ द्वार रक्षित उभा अससी ॥ ६४ ॥ श्रियाळ राजा दानशूर ॥ शुद्ध सत्वाचा महागिरिवर ॥ तया दाविसी भजन मार्गाचे पसार ॥ सं-

कटथोर घालोनियां ॥ ६५ ॥ तयाश्रियाळाचा कुमर ॥ चांगुणे करवीं वधिलासी निकुर ॥ ओंव्या गावोन सुस्वर ॥ पाक करविलासी तिये करवीं ॥ ६६ ॥ संतति संपत्ति खंडोनि सारी ॥ बंदीं घातलेंसी कैलास विवरीं ॥ कण्या खासी निचा घरीं ॥ सदां संसारीं गोचर पणीं तूं ॥ ६७ ॥ निर्दय पणें भक्ताचे शरीरा ॥ कर्वत घालिसी हिमकेदारा ॥ तेंही टाकोन जासी माघारा ॥ सत्वधीरासी वृथा छळसी ॥ ६८ ॥ तुजवरी भक्तीं ठेवितां विश्वास ॥ निश्चयें करविसी अरण्य वास ॥ तेथवरी जावोन गौरवि विशेष ॥ धातु स्पर्श न करितां ॥ ६९ ॥ मी ते समयीं असतो जरि ॥ तरी सभेसी न येती लावण्य लहरी ॥ कैंचें द्यूत द्वैत हरी ॥ मज देखतां ऐसें न घडतें ॥ ॥ ७० ॥ आतां त्रयोदश वर्षा नंतरीं ॥ तुह्मांसी करीन राज्याधिकारी ॥ ऐसे शब्दब्रह्म हिमकेदारी ॥ तुझे पूर्वींपासोन मीं जाणें ॥ ७१ ॥ स्त्रीवियोगें वानर परिवारी ॥ होतासी पुच्छावर्त अंबरीं ॥ मींच येवोन गुप्त अंतरीं तुज मोहनास्त्री आकर्षिलें ॥ ७२ ॥ शेषासहित तुज बद्रिविहारी ॥ घेवोन पातलों निजमंदिरीं ॥ अगोचरपणीं हिमकेदारी ॥ महंकावतीतें बळी द्यावया ॥ ७३ ॥ तैं तुझ्या कैंपक्षी कैवारा ॥ येणें घडलें रुद्रावतारा ॥ ह्मणोन वांचलासी सौदागरा ॥ ते अवतारीं शेषासहित ॥ ७४ ॥ तोचि घडला यदर्थीं संबंध ॥ ह्मणोन वधिलासी माझा बंधू ॥ रत्नासुर आठवा प्रताप सिंधू ॥ अगस्ति शक्तिरूपें शोषविलासी ॥ ७५ ॥ मींकरितां शक्ति अर्चना ॥ गुंतलों होतो अनुष्ठाना ॥ ह्मणोन पावला बंधुमरणा ॥ ह्या तुज खुणा ठाउक्याअसती ॥ ७६ ॥ शोधकरितां बहुतेक दिवशीं ॥ आजि सांपडलासी मजदृष्टिसीं ॥ ऐसेंवदोन घनगर्जनेसी ॥ गर्जोन शरसनासीवोढिलें ॥ ७७ ॥ तैंचंडकोदंड मंडळाकारी ॥ आकर्णपर्यंत हिमकेदारी ॥ रक्तोद्भवासी दशशतसहस्रशरीं ॥ विंधिलें हुतांश वदनीं दारुण ॥ ७८ ॥ त्याशरा

ग्नीचीनिबिड जाळी ॥ रक्तभोजें खांडिली समुळीं ॥ हें लक्षोन क्रोधानळी ॥ जमदाग्नि अवतार खवळला ॥ ७९ ॥ ह्मणे रे रक्तभोजा अंतर मलिना ॥ महामूर्खा पिशिताशना ॥ तुज करावया शासना ॥ युगायुगीं मीं धुंडितसें ॥ ॥ ८० ॥ सरलें शिववरदाचें वारें ॥ मुनिजन भूसुर नरवर ॥ त्रासिले त्याचें फळ घे सारें ॥ घोरांधर युद्धीं आवडी ॥ ८१ ॥ कृतकर्म तें फळ भोगावें ॥ येथें कर्मासी शरण जावें ॥ तुज निमित्य खाग्निसंभवें ॥ सत्व रज तमीं आकारलों ॥ ८२ ॥ ऐसें वदोन खळनाथ ॥ धनुष्यीं बाण एकादशशत ॥ लावोन वोढिलें आकर्ण पर्यंत ॥ विद्युत्प्राय सोडिले ॥ ८३ ॥ अनेक मंत्रास्त्राचे कल्लोळ ॥ विद्युत्प्राय सोडिले प्रबळ ॥ तेणें रक्तोद्भव मर्दितां सकळ ॥ झाले असंख्य पुनरपी ॥ ८४ ॥ ते अनिवार प्रळय भाळी ॥ नाथांबरांतून कडाडली ॥ रक्तभोज गिरीवरि पडली ॥ कीं त्या एकादश चपळा प्रसवल्या ॥ ८५ ॥ भातडींचे काढिता शर ॥ धनुष्यीं लावितां एकादश हजार ॥ सोडितां लक्ष कोटि अर्बुद खर्व अपार ॥ ऐसा नाथ घन घोर वर्षला ॥ ८६ ॥ ऐसी नाथ संधान क्रिया गाढी ॥ अंगी आदळतां नेत्रीं झांपडी ॥ पडली रक्तभोजाची मुरकुंडी ॥ नाथशर प्रौढी करूनियां ॥ ८७ ॥ नाथ शरधारीं रक्तभोजन ॥ सर्वांग झाला रक्तवर्ण ॥ मही पडतां मूर्छित होऊन ॥ तें नवल वर्तलें तें ऐका ॥ ८८ ॥

श्लोक ॥ तीव्र शस्त्र प्रहराणि रक्त बिंदु पतीतौक्षितीन् ॥ रक्तोद्भव पुनर्जन्मं शतसहस्त्ररणदीक्षतं ॥ २ ॥ बिंदोद्भवं युद्धं नाथामृत पात्र कर संयुतान् ॥ रक्तबीज रुधिश्च उच्याटर्या च्याट चर्पटान् ॥ ३ ॥ टीका ॥ श्रीनाथ शस्त्रास्त्र प्रहारीं ॥ रक्तभोज क्षतार्त शरीरीं ॥ रक्तबिंदु पडतां महीवरी ॥ रक्तभोज शतकोटि खर्व निखर्व जाहले ॥ ८९ ॥ असंख्य होवोन रक्तभोजन ॥ वर्षत शस्त्रांचा प्रळय घन ॥ धनुष्यीं बहु

तीं शर संधान ॥ नाथनिरंजनावरी वर्षती ॥ ९० ॥ रक्तभोजाचे शस्त्रधुमर ॥ श्रीनाथें उडविले पवन शरें ॥ होवोन कल्पांत भैरवाकार ॥ दिव्यास्त्र संभार धनुर्ष्यीं लाविले ॥ ९१ ॥ अनेक मंत्राचे संभार ॥ चपळाकृति सोडिले अनिवार ॥ करितां रक्तोद्भवाचा संहार ॥ ते पुनरपि असंख्य जाहले ॥ ९२ ॥ रक्तोद्भव रण कर्कश ॥ असंख्य बाणीं होवोन शेष ॥ तयां सवें झुंजतां रण कर्कश ॥ दक्षिणाधीश श्रमी जाहले ॥ ९३ ॥ वज्र कवच यासाठीं जाणा ॥ व्यासें करविलें परिधाना ॥ तें अष्टादशोध्यायीं निरोपणा ॥ संत मुनिवरीं परिसिलें ॥ ॥ ९४ ॥ नाथअमृतपात्रींच्या तुषारें ॥ रक्तबिंदु ते मिसळतां सारे ॥ उठती रक्तभोज शतसहस्त्र ॥ ते तीव्र युद्ध करिती नाथासवें ॥ ९५ ॥ रक्तभोज सोडी षण्मुखास्त्र ॥ नाथ निवारी शक्त्यास्त्रें ॥ राक्षस मोकली पन्नगास्त्रें ॥ गरुडास्त्रें नाथ खंडितसे ॥ ९६ ॥ पर्वतास्त्र टाकितां असुरें ॥ नाथें खंडिलें वज्रप्रहारें ॥ मार्तंडास्त्र टाकितां निशाचरें ॥ सौदागर भंगित राहु अस्त्रीं ॥ ९७ ॥ असंख्य होवोन भस्मासुर ॥ केला रुद्राचा संहार ॥ रक्तोद्भव रणशूर ॥ धुरंधर योद्धा महाबळी ॥ ९८ ॥ अनंत ब्रह्मांडांच्या कोटी ॥ सांठविल्या असती ज्याचे पोटीं ॥ तो हा नाथधूर्जटि ॥ अमृतवाटी वामकरीं ज्याचे ॥ ९९ ॥ युद्धासी करितां अमृत तुषार ॥ रणीं पडतां रक्तभोज पसार ॥ उठोन घोर कंदनासी भयंकर ॥ करितां नाथ बहु श्रमी झाला ॥ १०० ॥ ह्मणोन नाथ हस्तींच्या अमृत पात्रा ॥ दिधलें अमरनाथाच्या करीं पवित्रा ॥ रक्तोद्भवाच्या मरणमंत्रा ॥ ज्योति स्वरूपासी वदली आकाशवाणी ॥ १ ॥ ह्मणे गा परिसें दक्षिण दीपा ॥ ज्योतिर्मय त्रिगुणात्मक स्वरूपा ॥ युद्धासी होय तव बळ प्रतापा ॥ अमृत ठेविंजे अमरांपासीं ॥ २ ॥ प्राकृतजन बोलती जो बीजकडा ॥ संह्याद्रि रत्नांकित प्रचंड हुडा ॥ जेथें स्वशक्ति रत्नासुराचा

केला रगडा ॥ पूर्वसी पद देहुडा अद्यापि ॥ ३ ॥ हे युगायुगीं प्रसिद्ध करणी ॥ लक्षिती प्रख्यात उमा क्रमण चरणीं ॥ असे जेथें विद्युत्पात ध्वनी ॥ झाली तेथेंचि अमृतपात्र ठेविलें ॥ ४ ॥ तो हाचि प्रसिद्ध अमरनाथ ॥ उत्तर भागीं असे विख्यात ॥ नाथजन्म कळावयालागीं बळ समर्थ ॥ रत्नागिरीवरी बीज पडली ॥ ५ ॥ ह्मणोन बीजकडा बोलती जन ॥ तोहा अमरनाथ त्रिदशगण ॥ विद्युत्पातीं तीर्थ रक्षोन ॥ राहिला अमरपात्र घेवोन करीं ॥ ६ ॥ ह्मणोन वामपात्रीं वामहस्तें ॥ अमृतपात्र घेतलें अमर नाथें ॥ असो तें नाथें बळसमर्थें ॥ डमर अनुहात गजर वाजविला ॥ ७ ॥ डमरनादें ब्रह्मांड गडाडी ॥ तें काळभैरव शतघन नादें कडाडी ॥ विषाग्नि धमित असे भडाडी ॥ शेषावतार सहस्र वदनें ॥ ८ ॥ विश्वकल्पांत जाहला वाटे ॥ कीं सप्तसमुद्रचि मिळाले एककोटें ॥ ऐसें श्रीनाथें बळ उद्भटें ॥ भुवनत्रयामाजी परीसविलें ॥ ९ ॥ तया नाथें महाकाळी ॥ ज्वालामुखी कंकाळी ॥ बगळा बाळा नृसिंहा कराळी ॥ चोपडाई विशाळहोवोन पातली ११० ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मास्त्रयो शोणित भोज हत्वान् रक्तोद्भवं दैत्य पुनर्भवायान् ॥ ततो श्वरं शोणित चार्व्हणाशन् उच्याटयों च्य टय चर्पटांश्च ॥ ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ चर्पटा छपन्नकोटि कात्यायनीसी ॥ विक्राळ जाहली रण कर्कशी ॥ रक्तबिंदु चाटितसे जिव्हेसी ॥ नृसिंहाननीं भयंकर ॥ ११ ॥ शक्ति परिवारीं चोपडाई ॥ वृक ऋक्ष व्याघ्राई वराही ॥ होऊन रक्तबिंदु चाटित रासाई ॥ श्रीनाथ समरंगणीं संग्राम करितां ॥ १२ ॥ असो अनेक रूपी रक्तभोजन ॥ रक्तापासोन जाहले निर्माण ॥ ते सर्व करितां घोर कंदन ॥ तीव्र शरसंधानीं वर्षती ॥ १३ ॥ अनेक रक्तोद्भव समरीं होऊन ॥ तीन दिवस संग्राम दारूण ॥ करितां श्रीनाथ निरंजन ॥ श्रमी झाला अपार ॥ १४ ॥ त्यावरी नाथें क्रोधायमा-

न ॥ सोडिलें ब्रह्मास्त्र कोटि रविकिरण ॥ संहारिले रक्तोद्भव जैसे अहिरावण ॥ असंख्यात न गणवे समरंगणीं ॥ ॥ १५ ॥ महीं पडतांचि रक्तथेंबा ॥ शक्ति परिवारेंसीं चर्पटअंबा ॥ चाटोन घेतसे जगदंबा ॥ रक्तभोज प्रतिबिंबासी भक्षिलें ॥ १६ ॥ असंख्यात बिंदु पडतां धरणीं ॥ शक्तिसमुदायीं रक्त चर्व्हाणी ॥ भक्षितां भासे ब्रह्मांड ग्रासिनी ॥ तेथें रक्तोद्भव कल्पिजे तृणाग्निसम ॥ १७ ॥ चर्पटा रक्त चर्व्हाणी घट घुंगरा ॥ यालागीं चोपडाई नाम अवसरा ॥ ह्मणती अद्यापि विश्वोत्तरा ॥ हे मात प्रख्यात भूमंडळीं ॥ १८ ॥ यदर्थी संशय पंडितजन ॥ नधरोनि मानिजे गुरुनाथवचन ॥ असो ब्रह्मास्त्रासी सोडोन ॥ रक्तोद्भव अनेक वधियेले ॥ १९ ॥ रक्तोद्भव वाधिला त्रय दिवसाचे अंतीं ॥ श्रीनाथ कल्पांत भैरवाकृती ॥ होतां ब्रह्मास्त्राच्या आवर्ती ॥ शोणितभोज पडियेला ॥ ॥ २० ॥ ब्रह्मास्त्रें करितां शिरःपात ॥ खंडोन पडिले चरणहस्त ॥ सिंदुरवर्णी जैसा पर्वत ॥ तैसा संह्याद्रीवरी पडियेला ॥ २१ ॥ शतसहस्र रक्तोद्भव ॥ रक्तापासोन जन्मले सर्व ॥ धनुष्य टणत्कारितां घंटारव ॥ घन मंडळीं परिसवी ॥ २२ ॥ बहु वदनें शरीरवर्ण ॥ वृक जंबूक व्याघ्र हारिण ॥ कस्तूरीमृग मत्तवारण ॥ होवोन बाण पर्जन्य वर्षती ॥ २३ ॥ अग्नि पर्वत मेघ प्रभंजन ॥ शर वर्षला जैसा प्रळय घन ॥ शरार्भ्रीं लोपोन मार्तंड किरण ॥ अष्टभैरींसी केदार गिरिवर लोपला ॥ २४ ॥ ऐसा अष्टभैरवनाथ गिरिवर ॥ रक्तभोजनाच्या शर धुमरें ॥ लोपतां कोपला करुणाकर ॥ भूधर मणीसी समरंगणीं ॥ २५ ॥ अनेक मंत्रास्त्रांच्या गुणीं ॥ शरलक्षोन योजिले हुतांश किरणीं ॥ ओढोन तीव्र आकर्ण किरणी ॥ वाधिले रक्तोद्भव समरंगणींचे ॥ २६ ॥ विंधोन पाडिले रक्तभोजन ॥ असंख्यात जैसे गंधमादन ॥ तें गणित करितां सहस्त्रवदन ॥ थकोन क्रमण पदीं राहिला ॥ २७ ॥ असो ऐसे

रक्तोद्भव सारे ॥ मर्दिल्या उठती अमृत तुषारें ॥ जेवीं काम क्रोध मत्स्य मगरें ॥ संसार सागरीं डहुळिती ॥ २८
आशा मनसा मत्स्य मगरी ॥ मोहती मंगळ दुर्मद नक्र जळचरी ॥ रक्तभोजांबुद्वींच्या लहरी ॥ संह्याद्री शिखरीं
घडकल्या ॥ २९ ॥ असो ऐसिया रक्तोद्भवातें ॥ संग्राम करितां दिनानाथें ॥ रक्तभोज वधिले असंख्यातें ॥ खड्ग
शरधारीं सर्वही ॥ ३० ॥ अनेकरूप जेंजें धरी ॥ तेंतें वधिलें खड्गधारीं ॥ होऊन कल्पांत भैरवाकारी ॥ हिमके-
दारीनें वधविले ॥ ३१ ॥ सर्व राक्षसरूपाचा अंतपुरला ॥ हें रक्तभोज मनीं समजला ॥ अष्टांगीं अष्टभाव तरु
झाला ॥ अष्टवर्ण समरंगणीं ॥ ३२ ॥ रक्तोद्भव रक्तबिंदूचा पसारा ॥ चोपडाईनें ग्रासिला सारा ॥ संकटीं पावली
युद्धीं अवसरा ॥ हिमकेदारासी समरंगणीं ॥ ३३ ॥ हें पाहोन रक्तभोजन ॥ अष्टधाझाला तरुवर वर्ण ॥ हें पाहो
न अतींद्रिय निरंजन ॥ आश्चर्य करीत मानसीं ॥ ३४ ॥ श्लोक ॥ ॥ रक्तोद्भवाष्टांग द्रुमाष्टकंच गोरोचनं चैद्य ग-
व्हाकचोरं कस्तुरिकादीय हरिचंदनानि श्रीखंड गंधाढ्य मनोहराणां ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ केवढी राक्षसी माया ॥
काय द्यावी शक्ति उपमा या ॥ अनायासी अयासी उपरमाया ॥ पाहतां उपमा दिसेना ॥ ३५ ॥ ऐसें कल्पोत्व रव-
ळेश्वर ॥ ह्मण आह्मींच त्रेतायुगीं दिधलावर ॥ हा अहिरावणाचा अवतार ॥ हाचि रक्तभोज काळभैरवा ॥ ३६ ॥
ऐसें वदोन श्रीकेदारें ॥ कोदंड टणत्कारीलें गजरें ॥ ब्रह्मास्त्र सोडिलें भयंकर ॥ तेणें रक्तभोज तरुवर अष्टखंडि-
ले ॥ ३७ ॥ असो रक्तभोज महापराक्रमा ॥ संग्राम करितां पावला श्रमा ॥ ब्रह्मास्त्रीं बोळविलें परंधामा ॥ प्रथ-
मा श्रमाच्या अध्वरानें ॥ ३८ ॥ दक्षिण दिग्वधू जयवार्ता शंखभैरी ॥ कल्हाटभैरव शकटभैरी ॥ गर्जत पात-
ले जयजयकारी ॥ श्रीलक्ष्मीसीं जावोन सांगती ॥ ३९ ॥ असाध्य रक्तभोज उत्पत्ती ॥ मरण पावला केदार हस्तीं

॥ प्रसन्न होवोन दक्षिणपती ॥ वरदोत्तरीं गौरविला ॥ ४० ॥ रक्तभोज रक्तबिंदुमाजी निर्माण ॥ होवोन असंख्य रक्तभोजन ॥ ते संहारिले शतकोटिगुण ॥ तैं रक्तभोजें काय केलें ॥ ४१ ॥ रक्तपडतांचि वसुंधरे ॥ अष्टांगीं झाला तरुवर ॥ रक्तचंदन कृष्णागर ॥ देवद्वारादि अष्टगंधें ॥ ४२ ॥ श्लोक ॥ ॥ हत्वा रक्तोद्भव रणधीरं रक्तबिंदु मही मिश्रितं रक्तचंदनतस्योद्भवं देवद्वार कृष्णागरात् ॥ ६ ॥ हरिद्रा केशर गव्हा कचोरं अष्टगंधाढ्य गोरोचन ॥ ततःब्रह्मास्त्र प्रयोगेन श्रीखंड गंधाढ्य वरदो भवेत् ॥ ७ ॥ टीका ॥ रक्तभोजाचें छेदितां शिर ॥ रक्तापासोन पादप झाले निशाचर ॥ रक्तचंदनगार देवद्वार ॥ कृष्णागरादि मघमघी ॥ ४३ ॥ कुंकुम गोरोचन गव्हला-कचोर ॥ कस्तूरिका नवकेशर ॥ मलयागारादि तरुवर ॥ रक्तोद्भव अष्टगंधीं ॥ ४४ ॥ ऐसे रक्तोद्भवाष्टांग तरुवर ॥ झाले देखोन बद्रिविहार ॥ ब्रह्मास्त्र सोडोन भयंकर ॥ रक्तोद्भव अष्टांग तरु खंडिले ॥ ४५ ॥ दक्षिणाधीशें ब्रह्मास्त्रें प्रचंड ॥ रक्तभोजद्रुमाचें शिरभुज दंड ॥ खंडिले अष्टांग द्रुम अखंड ॥ ह्मणोन अष्टगंधें बोलती ॥ ४६ ॥ रक्तोद्भव असुरतरूचें बंड ॥ श्रीनाथें केलीं अनंत खंड ॥ यास्तव वदती तें पासोनी श्रीखंड ॥ पुराण प्रसिद्ध युगायुगीं ॥ ४७ ॥ रक्तापासोन झाले असुरतरू ॥ ह्मणोन रक्तभोज निशाचरू ॥ उःशाप मागोन केले सुरतरू ॥ नवविध भक्तीसी रक्तभोजें ॥ ४८ ॥ श्रीनाथासी ह्मणे रक्तभोज़न ॥ माझे अष्टभाव तेचि अष्टद्रुमजाण ॥ ते तुज केले ब्रह्मार्पण तें श्रीनाथह्मणे तथास्तु ॥ ४९ ॥ अष्टभावाची अष्टांगें ॥ तींच होतील गा अष्टगंधांगें ॥ मृगमद तिलकांकित रंगें ॥ सुर नरवरां प्रिय होसी ॥ ५० ऐसें नाथ गौरवें वदे वरदवचन ॥ तैं मुक्ति पावला रक्तभोजन ॥ जयजयकारीं घनगर्जन ॥ पुष्पें वर्षती नाथावरी ॥५१ ॥ ऐसें वदतां शंखभैरी ॥ आनंदें भरली ज-

लधिजालहरी ॥ निघाली स्वसैन्यासी घनघोरीं ॥ रत्नागिरिवरासी पातली ॥ ५२ ॥ भैरव भारेसी शक्ति
परिवारीं ॥ लक्ष्मी पातली मंगळतुरीं ॥ आलिंगोन ब्रह्मचारी ॥ हिमकेदार गौरविला ॥ ५३ ॥ चांग भला
ह्मणे श्रीरवळनाथा ॥ चांग आह्मां लाभला पूर्वार्चिता ॥ चोपडाई तैसीच होय आलिंता ॥ आनंदें भारिलें
ब्रह्मांड भुवन ॥ ५४ ॥ चांग लाभलाशी आह्मां दक्षिणकेदारीं ॥ ऐसें वदली जलधिजालहरी ॥ ह्मणोनि
चांगभला हे भक्तवैखरी ॥ तें पासोन चांगभला ह्मणती भक्तजन ॥ ५५ ॥ ह्मणोन मधुमास वसंतीं मि
ळोन मेळा ॥ जयजयकारीं चांगभला ॥ अद्यापि बोलती महिमंडळा ॥ कीर्ति प्रख्यात त्रैलोक्ीं ॥ ५६ ॥
लक्ष्मी सहित हिमकेदारी ॥ अद्यापि राहिले रत्नागिरीवरी ॥ पुढील कथेची नवलपरी ॥ श्रोतीं मुनिवरीं परिसा-
वी ॥ ५७ ॥ रक्तोद्भवापासोन सुगंध तरुवर ॥ झाले अष्टगंधाढ्य नाथ वरदोत्तर ॥ तें संत पंडितीं सविस्तर ॥
विंशतीं अध्यायीं करावें श्रवण ॥ ५८ ॥ इति केदारविजयसागर ॥ नवरस पावले गजर ॥ मध्य रत्नागिरि मंदि
र ॥ रत्नाभरणीं भूषविला दृष्टांत रत्नीं ॥ ५९ ॥ तेथ संतमुनिजन ग्राहकें ॥ पातले मधुमास वसंतीं कौतुकें ॥ ह-
रिनाम सुधांबुधीचीं मोक्तीकें ॥ अमोल घेईजे एकोणिसावा गोडहा ॥ १६० ॥ इतिश्री केदार विजय ॥ भविष्यो
त्तर केदार खंड ॥ ब्रह्मांड पुराण विरचितायां ॥ रक्तभोज वधोन्नाम एकोनविंशतितमोध्याय गोडह ॥ १९ ॥
॥ श्रीनाथार्पण मस्तु ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ ओंवी ॥ १६० ॥ ॥ ॥ ॥ ॥

अध्याय २० वा.



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय भरतखंडाग्री दक्षिणदीपा ॥ भग्नकृत रत्नासुरवधोत्सव बळ
प्रतापा ॥ भक्त मनोरथी सुर पादपा ॥ भजकां प्रिय ज्योतिस्वरूपा जगविहारी ॥ १ ॥ वृषभध्वज वृष्णिकुला-
वतंसा ॥ वृंदावन विहारीया राजहंसा ॥ वृंदारकवंद्य अतसिकुसुम संकाशा ॥ व्रज विलासा त्रिगुणात्मका ॥
॥ २ ॥ ऐसा ज्योतिस्वरूप त्रिगुणावतारी ॥ रत्नासुर वधोत्सव स्वशक्ति निकरीं ॥ करोन रक्तभोज संहारी ॥
श्रीदक्षिणकेदारी विजयी झाला ॥ ३ ॥ हें परिसोन चमुसहित कमळा ॥ नाथासी ह्मणे तुह्मीं बहुत श्रमला ॥
अमृत पात्र घेईं अमला ॥ जें दिधलें अमृत नाथापासीं ॥ ४ ॥ अमरनाथ तोचि सहस्रनयन ॥ श्रीनाथासी
ह्मणे विनय वचन ॥ अमृतपात्र घेईं कृपाकरोन ॥ भक्तमनोरथ पुरवावया ॥ ५ ॥ अष्टप्रधानामाजी जो श्रेष्ठ
॥ काळभैरव बळवरिष्ठ ॥ नाथासीं ह्मणे सेवक एकनिष्ठ ॥ तोरण भैरव उभाअसे ॥ ६ ॥ हें पाहोन बद्रि विहारी
॥ क्रोधें संतप्त हृदयांतरी ॥ आकर्षिला नाथें पाशापंजरीं ॥ तो जमदग्नी तीर्थाचे पश्चिमेस असे ॥ ७ ॥ तो र-
णीं नये ह्मणोन् तोरणैया ॥ महाजन बोलती ऋषिवर्या ॥ असो रक्तभोज प्रतापसूर्या ॥ अस्त झाला अस्ताच
ळीं ॥ ८ ॥ हा कथार्थ परिसिला एकोणिसावा ॥ नाथ सह्याद्रीवरून घेईं विसावा ॥ तोचि अर्थ श्रोतियतें बरवा
ठसावा ॥ अष्टगंधार्थीं परिसावा वीसावियांत ॥ ९ ॥ सूत वदे शौनकऋषी ॥ समरीं वधिलें रक्तोद्भवासी ॥ तो
झाला रक्तचंदन अष्टगंधेसी ॥ हे तों सार वाणी परिसिलीहो ॥ १० ॥ मद्यमांस कर्दमीं झाले सुरतरुवर ॥ हे
वंद्य केले कवण्या विचारें ॥ ऐसी कल्पना माझे अंतरें ॥ कल्पिली ती परिहारीं ॥ ११ ॥ ऐकोन शौनकाचें उत्तर
॥ सुत ह्मणे शौनका तें भविष्योत्तर ॥ अष्टगंधोत्पत्तीचा विस्तार ॥ कथिला आतां सारांश वचनीं ॥ १२ ॥ परंतु

तुवां संदेह कांहो धरिला ॥ रक्तापासाव उद्भव ज्याला ॥ त्याणें परोपकारीं देह वेंचिला ॥ सहस्र जन्में रक्ताक्ष-बीज वंशजें ॥ १३ ॥ रक्तबीज वंशज अहिरावण ॥ ह्मणोन उत्तमांग रक्तभोजन ॥ विरोधभक्तितप केलें दारुण ॥ नाम रक्तभोजन पावला ॥ १४ ॥ काया वाचा मनें धनकामना ॥ अनंत जन्मीं केली कृष्णार्पणा ॥ ह्मणोन अष्टांग सुगंध पणा ॥ विरोध धर्मीं या देहा धरिलें ॥ १५ ॥ यास्तव अष्टभावाची अष्टगंधी ॥ स्वयंभ झालारक्तसंबंधी ॥ रक्तभोज होवोन आत्मशुद्धी ॥ रत्नासुराचा पौत्र निसिगंध ज्यापरी ॥ १६ ॥ पतितोद्धारक पतित पावन ॥ ऐसें यथार्थ भगद्वचन ॥ जेवीं चिताभस्म त्रिलोचन ॥ परम आवडी तयाची ॥ १७ ॥ भस्म धुसर भूषण ॥ नरमुंड माळेचें आभरण ॥ गजचर्म केलें परिधान ॥ त्यासी निंद्य कवणें ह्मणावें ॥ १८ ॥ हें भक्त अंमळातरींचीं वसनें ॥ गजचर्म व्याघ्रांबर कृष्णांजन ॥ हरिचंदनादि रक्तचंदन ॥ स्थावर जंगमादि विश्वजन सर्व ॥ १९ ॥ हें रक्तापासोन विश्वसारें ॥ निर्माण केलें जगदांकुरें ॥ स्थूळ सूक्ष्म गिरिस्थावरें ॥ त्रिगुणाकारीं हें जग आकारिलें ॥ २० ॥ असो रक्तोद्भव रक्तचंदन ॥ देवद्दार कृष्णागर हरिचंदन ॥ केशर कुंकुम कस्तुरी गोरोचन ॥ देवार्चनीं हे प्रिय धरिले ॥ २१ ॥ रक्तोद्भव झाले असुरतरुवर ॥ ते खंडी बद्रिविहार ॥ अष्टांगाचे अष्ट प्रकार ॥ अष्टभावींजो अवगला ॥ २२ ॥ कामा पासोन झाला मलयागर ॥ क्रोध देवद्दार कृष्णागर ॥ केश त्वचा कुंकुम केशर ॥ मद मत्सर गव्हला कचोरा ॥ २३ ॥ असो ऐसीं अष्टही अगाधें ॥ श्रीनाथवरदें केलीं अष्टगंधें ॥ रक्तभोज मधुरोक्तगंधें ॥ तो दिवानिसी गंध झाला पूर्वार्चिता ॥ २४ ॥ ब्रह्मास्त्रें खंडिला असुर तरुवर ॥ ह्मणोन श्रीखंड बोलती पुराणोत्तर ॥ अर्चनीं तोषवितां विधिहरिहर ॥ याची अष्टगंधीं पंडित हो ॥ २५ ॥

करोन चंदनाची कांडोरीं ॥ कठिणत्व उगाळिजे साहणेवरीं ॥ अष्टगंधाची नवलपरी ॥ तांम्रपात्रीं काढिजे ॥ २६ ॥ गंधाक्षतेसीं मंत्रोचारीं ॥ अर्चनीं तोषवावा बद्रिविहारी ॥ तैं कपाळींचें भस्म पुसोन दक्षिणकरीं ॥ तीर्थ कालवोन लाविजे गंधभाळीं ॥ २७ ॥ गंध साहाणेवरोनि लावितां ॥ रक्तची लाविलें निश्चयार्था ॥ इंद्रसंपदाजरी घरीं असतां ॥ लक्ष्मी जाईल षण्मासीं ॥ २८ ॥ ह्मणोन सज्जनीं हरिचंदनीं ॥ समर्पोनियां देवार्चनीं ॥ विष्णु निर्माल्य करीं कालवोनी ॥ मध्यागुलीनें लाविजे भाळीं ॥ २९ ॥ असो षट्कर्मँ आचरलीं याचिरीती॥ यथारुची विलास सुगंधार्चितीं ॥ संज्ञा दिधली ते संतश्रोतीं ॥ गुरुचारित्रीं परिसावी ॥ ३० ॥ शोणित कर्दमाचे विश्वांकुर ॥ इच्छामात्रें बद्रिविहार ॥ निर्मिले एकापासोन युग बाहत्तर ॥ अलंकार जैसा जगनग हेमीं ॥ ३१ ॥ सूत वदे शोनक प्रमुखां ॥ कथा ऐकें इतिहास परम कौतुका ॥ जळमय पृथ्वीमाजी नौका ॥ तैसा वटपत्रशयनीं बाळमुकुंद जो ॥ ३२ ॥ ब्रह्म प्रळयीं कश्यपसृष्टी ॥ बाळमुकुंद सांठवी पोटीं ॥ अनंतयुग झाल्या शेवटीं ॥ इच्छाझाली आदिपुरुषा ॥ ३३ ॥ अनंत ब्रह्मांडाच्या अनंत कोटी ॥ निर्मोन सांठवी विश्वआपुले पोटीं ॥ ऐसा अनादि पुरुष वटपत्र संपुटीं ॥ शयन केलें चिद्वट पर्यंकीं ॥ ३४ ॥ तैं आदिनाथाचे कर्णमुळीं ॥ द्वय असुर जन्मले महाबळी ॥ पंचमुख ब्रह्मा नाभिकमळीं ॥ देखोन खंदळीं मिसळले ॥ ३५ ॥ ब्रह्मदेव आणि मधुमूर ॥ युद्धासी करिती घोरांदर ॥ पंचशतसंवत्सर भयंकर ॥ संग्राम केला त्रिवर्गीं ॥ ३६ ॥ हें पाहोन निर्विकार ॥ सत्व रज तमीं घेवोन अवतार ॥ युद्धासी करावया घोरांदर ॥ तीव्र कंदनीं मिसळले ॥ ३७ ॥ मधुमूरु आदिनारायण ॥ प्रळय युद्ध करिती दारुण ॥ जैसा माध्यान्हीं चंडांशकिरण ॥ अंतरिक्षीं ज्यापरी ॥ ३८ ॥ निमिषार्धाचा भरविसांवा ॥

न घेतां युद्ध करिती देवाधि देवा ॥ मधुमूर प्रतापाचा दिवा ॥ प्रज्वाळिला त्रैलोकीं ॥ ३९ ॥ ऐसा संग्राम परम पुरुष ॥ दिव्य दहासहस्त्रवर्षें ॥ युद्धासीं केलें कृतांतवेष ॥ संग्राम रोषें करितसे ॥ ४० ॥ ऐसा त्रैलोक्यनाथ निरंजन ॥ युद्धासी केलें घनगर्जन ॥ दहासहस्र वर्षें देवांची गणन ॥ युद्धीं श्रमला ज्योतिस्वरूप ॥ ४१ ॥ ऐसें क्रोधें आदिनारायण ॥ सहस्त्रधारी सुदर्शन ॥ सोडोन प्रचंड विशाळ वर्ण ॥ मस्तकें दैत्यांचीं च्छेदिलीं दोनी ॥ ॥ ४२ ॥ मधुमूरु दैत्य दोघेजण ॥ विष्णुहस्तीं पावले मरण ॥ उभयतांचीं चर्में काढोन ॥ जळमयावरी पसरलीं ॥ ४३ ॥ सुदर्शन लागतांचि दैत्यकंठीं ॥ सुवर्णमय झाले तनुशिर मुगुटीं ॥ काया निर्मिलीहेचि पृथ्वीतटीं ॥ नामें तयाचीं परिसावीं ॥ ४४ ॥ पृथ्वी मही वसुंधरा ॥ उर्वी मेदिनी अवनीधरा ॥ कुंभिनी सीता क्षमा करा ॥ हीं नामें विष्णूनें ठेविलीं ॥ ४५ ॥ सृष्टिक्रमाचा गुरुशिष्य संवादु ॥ कथिला जो मद्विवेकसिंधू ॥ कार्याकारण महाकारण तत्वार्थबोधू ॥ श्रीमुकुंदराज वदतसे ॥ ४६ ॥ मधुमूरु अष्टगंधादि पर्याय ॥ शब्दस्पर्श रूप रस गंधान्वय ॥ वदला सृष्टिक्रमामाजी ज्योतिर्मय ॥ हें विवेक सिंधुमाजीं शोधिलें संतीं ॥ ४७ ॥ असो मधुमूरूसी वधिलें सुदर्शनें ॥ दुसरें विष्णुचें झालें सुदर्शन ॥ ह्मणोन द्वय शिरें झालीं कांचन ॥ तेंचि हेमाद्रि मेरु स्थापिले ॥ ४८ ॥ मधुमूरु मस्तक ब्रह्मांडथोर ॥ अखंड कनकपुष्प पर्वताकार ॥ तेंचि हेमाद्रि आणि हिमालयाशिखर ॥ बद्रिविहार अवतरला जेथें ॥ ४९ ॥ देवावतार वसावया सभोंवते ॥ तेचि एकवीस खड्ग समर्थ ॥ असो त्या मांस अस्थिचे पर्वत ॥ स्थळोस्थळीं करोन ठेविले ॥ ५० ॥ मेरुपृष्टींत असती अचळ ॥ स्थूळ दीर्घ लघु रत्नाचळ ॥ स्थावर जंगमादि सकळ ॥ पृथ्वीवरी दडपण ठेविले सारे ॥ ५१ ॥ वैद्यविद्या चिकित्सा संजीवनी मुळ ॥ वासना वा

ढविली तोचि द्रोणाचळ ॥ अरुणाचळ संह्यादि शेषाचळ ॥ मुख्य कनकाचळ मेरुतो ॥ ५२ ॥ मूरु मस्तक तोचि महामेरू ॥ मधुशिर तोचि हिमालय शिखरू ॥ जेथें विमलांबुजाचा पुत्र भैरवाकारू ॥ त्रिगुणगुणीं अवतरला ५३ ॥ ह्मणोन मधुमूरांतक मधुसूधन ॥ नाम ठेविलें व्यासवचन ॥ असो रक्तापासोन रजोगुण ॥ तृण पाषाण गिरिवर स्थावर ॥ ५४ ॥ अनादिमाया सत्वरजतम ॥ अणुरेणु व्यापक स्थिर जडजंगम ॥ जारज उद्भिज विहंगम ॥ जगद्रुमांकुरीं जो मुहूरला ॥ ५५ ॥ ऐसा अनादि पुरुष तोहा दक्षिणदीप ॥ रत्नागिरीवरी उजळला बळप्रताप ॥ रक्तोद्भव अष्टांग सुर पादप ॥ केले वरदी रक्तचंदनादि अष्टगंधीं ॥ ५६ ॥ ऐसा अवतार माळिकेचा मेरू ॥ बहात्तर युगींचा जो प्रथम प्रहरू ॥ तो हा अवतरला हिमकेदारू ॥ अष्टगंधाढ्य सुमनोहरी ॥ ५७ ॥ चिताभस्म प्रिय जेवीं गौरीहारा ॥ तैसें अष्टगंध प्रिय हिमकेदारा ॥ तेल फुलेल मलयागरा ॥ सौदागरासी बहु प्रियअसे ॥ ५८ ॥ मधुमूरमांस त्वचा पृष्टिवरुती ॥ स्थावरादि अठरा भार वनस्पती ॥ विस्तारल्या गिरिदेश रत्नाद्रि पर्वतीं ॥ लोकोपकारा कारणें ॥ ५९ ॥ उत्तम मध्यम तरुवर ॥ शस्त्रें खंडिती शिल्पकार ॥ लघुस्थूल उभविती मंदिर ॥ त्रिगुण खणीं नौखणीं उपरीपरा ॥ ६० ॥ तेथें नकरितां वास्तुशांती ॥ विज्ञानज्ञानीं न करिती वस्ती ॥ महीवरी बैसोन षट्कर्मासी नकरिती ॥ आसना विरहित विचक्षण ॥ ६१ ॥ ब्रह्माण क्षत्री वैश्य शूद्रादि ॥ वर्णाश्रमाची चत्वारी विधि ॥ स्नान करोनि आत्मशुद्धि ॥ भस्म विधिपूर्वक चर्चावें ॥ ६२ ॥ षट्कर्मचा विस्तार थोर ॥ गुरुचरित्रीं गंगाधराचा कुमर ॥ वदला आन्हिक संध्या निगमोत्तर ॥ तें कर्मनिष्ठविचक्षणीं शोधावें ॥ ६३ ॥ स्नानसंध्या देवतार्चनें ॥ भूमीवरी बैसोन न कीजे ब्राह्मणें ॥ ह्मणोन कुश अथवा कंत्र

ळासन ॥ घालून जपानुष्ठानीं बैसावें ॥ ६४ ॥ पाटावरीही घालोन आसन ॥ विचक्षण करीती स्वधर्माचरण ॥ असो श्रीखंड दिव्य चंदन ॥ श्रीनाथ निरंजनें प्रिय केला ॥ ६५ ॥ यदर्थी पंडितीं मन कल्पना ॥ न करोन कीजे सिंहावलोकना ॥ श्रवण केलें मधुमूरुमर्दना ॥ भविष्योत्तरार्थ हा निश्चयेसी ॥ ६६ ॥ अव्युत्पन्नजो अगीर्वाणी ॥ त्यासी अष्टगंधाचीनसे शिराणी ॥ प्रिय करिती हरिजन मनीं ॥ अष्टांगभाव अष्टगंधाचा ॥ ६७ ॥ ऐसा भविष्योत्तरार्थ कथारससागर ॥ रक्तोद्भव युद्धीं झाले सुरतरुवर ॥ ते ब्रह्मास्त्रीं खंडीले करुणाकर ॥ ह्मणोन श्रीखंड गंधाढ्य मनोहर बोलती ॥ ६८ ॥ रक्तभोजासी वरदोत्तरें ॥ गौरविलें दक्षिणकेदारें ॥ श्रीखंड गंधाढ्य सुमनोहरें ॥ ह्मणोन वंद्यझाले त्रैलोकीं ॥ ६९ ॥ ऐसी इतिहास कथा रसिका ॥ सूत सांगतसे ऋषिशोनका ॥ त्यावरी चिदांबरींची लावण्य लतिका ॥ दक्षिणपति लागीं गौरवीलें ॥ ७० ॥ अमृतनाथासहित त्रिदशगण ॥ नवनाथ कोटी सिद्ध षोडश मरुद्गण ॥ यक्ष राक्षस गंधर्व अंगारपर्ण ॥ श्रीनाथासी स्तुतिरत्नें पूजिती ॥ ७१ ॥ अष्टादशपद्मीं भैरवभार ॥ नवकोटि ऐसींहजार ॥ पैगंबर मीर अमीर ऋषेश्वर ॥ जयजकारीं गर्जती ॥ ७२ ॥ ब्रह्मऋषि नारद तुंबर ॥ दत्तात्रय व्यास भृगुकुमर ॥ ह्मणती धन्य दक्षिणकेदार ॥ विजयी झालासी रत्नागिरीवरी ॥ ७३ ॥ रत्नासुर वधोत्सव धृतावतारा ॥ रक्तोद्भव ब्रह्मास्त्रीं संहारा ॥ आतां करवीर कोल्हासुरा ॥ रक्तबीजासी वधिलेंसीं परिवारीं ॥ ७४ ॥ लक्ष्मीसहित हिमकेदारी ॥ रत्नागिरि बैसला भैरवभारीं ॥ तें वार्ता आणिली कल्हाटभैरीं ॥ शंखभैरी ही वदतसे ॥ ७५ ॥ विशाळीनाम निशाचरी ॥ सिंहासुर कासारतीरीं ॥ कोल्हासुरें धाडिली गजरीं ॥ दैत्यपरिवारीं निजबळें ॥ ७६ ॥ देविलास्य रत्नासुर ॥ रक्तभोज ह्येषासुर ॥ हे व

घिले हिमकेदारें ॥ परिसोन कोल्हासुर गजर्बाजिला ॥ ७७ ॥ तयानें धाडिला सिंहासुर ॥ विशाळी क्रुर भयंकर ॥ युद्धासी करावया घोरांदर ॥ कमंडलुतटाकीं उतरली ॥ ७८ ॥ ऐसें परिसोन हिमकेदारि ॥ लक्ष्मीसी ह्मणे हे न-वल परी ॥ आज्ञा द्यावी युद्धकरावया घोरसमरीं ॥ करवीरासी जावयालागीं ॥ ७९ ॥ सवाई ॥ ॥ दुर्घट संकट पातलिया निट तूट धीट त्या वधिसी निकरें ॥ हा रिपु दुर्गमी मींच पराक्रमीं तीव्र करोन वधीं स्वकरें ॥ ऐकतां कमला कंदनासी मला न उशीर तूं धाडींत्वरें ॥ जाय ह्मणे जलधि दुहिता चमूच्या सहिता असुरा वधीं रे ॥ १ ॥ ऐकोन उत्तर तो खळेश्वर कांस पितांबर कांसवरी खड्गत्रिशूल सुदिप्तरावपरि तो डमरु दिसे उर्ध्वकरीं ॥ देव भुजांत सुशोभित आयुध सज्जुनि बांधितसें कमरीं ॥ वाहुनियां स्वगणासी चला कंदनासी ही दुंदुंभिनादकरीं ॥ ॥ २ ॥ टीका ॥ ॥ कमला ह्मणे हे ज्योतिस्वरूपा ॥ दैत्यांतक ज्योतिस्वरूपबळप्रतापा ॥ भरतखंडाग्रीं श्रीदक्षिणदीपा ॥ रक्तोद्भवपादपा तरुक्रपाकुठारा ॥ ८० ॥ उत्पत्ति पालन संहार ॥ यांचा विचार सारासार ॥ जाणत अससी भविष्योत्तर ॥ करवीर कामाक्ष कोल्हासुराचें ॥ ८१ ॥ आह्मीं तुह्मीं एक विचारें ॥ घेवोन आपुलाली चमू भयंकर ॥ वाद्यध्वनि न करोन गुप्ताकार ॥ पूर्व उत्तर दक्षिण पश्चिम दिशा रोधाव्या ॥ ८२ ॥ ऐसा करोन दृढ विचार ॥ गुप्त घेवोन स्वसैन्यभार ॥ पूर्व पश्चिम दक्षिणोत्तर ॥ शक्तिपीरवारीं करवीर वेढिलें ॥ ८३ ॥ अष्टादश भैरवभारसहित ॥ केदार चालिला होवोन गुप्त ॥ नवनाथ करवीरा भोंवते फिरत ॥ पश्चिमदिशेसी पातला ॥ ॥ ८४ ॥ सिंहासुर महाबळी ॥ नाथासी देखिलें नेत्रकमळीं ॥ घर्घराटें देवोन आरोळी ॥ विशाळी सहित पातला ॥ ८५ ॥ सिंहासुरासी घालोन पाठी ॥ विशाळली दंत विकटी ॥ पर्वताकार कटतटी ॥ ताम्रदृष्टि शंखवर्णी ॥ ८६

तैं श्रीनाथ झाला सदाशिव ॥ गंगाधर भृंगी जटा नंदी सर्व ॥ त्राण रावणादि शिव पार्थिव ॥ विशाळीनें पाहिला ॥ ८७ ॥ ह्मणती आमुचें आराध्यकुळदैवत ॥ भोळानाथ उमाकांत ॥ हें कल्पोन निजांतरांत ॥ दंडवत घालितसे विशाळी ॥ ८८ ॥ नमस्कारोन शूलपाणी ॥ निरखोन रक्षिले लिंगार्चनीं ॥ तैं तो त्रैमूर्तींचा प्रतापतरणी ॥ भैरवांबरीं उगवला ॥ ८९ ॥ जमदग्निक्रोधाचा अवतार ॥ शेषारूढ त्रिशूल डमर ॥ चतुर्भुज शामसुंदर ॥ खड्ग शक्ति समन्विता ॥ ९० ॥ नंदीस्वरूपी तोचि तुरंगवहन ॥ संगें अष्टभैरव प्रधान ॥ ऐसें ओळखिलें विशाळीनें ॥ श्रीनाथनिरंजन क्षोभला ॥ ९१ ॥ चंड भुजदंड प्रचंडवर्णीं ॥ विशाळ अवगला खड्गपाणी ॥ युद्धासी करोन प्रतापतरणी ॥ दक्षिनायनीं उगवला ॥ ९२ ॥ संग्राम करोन घोरांदर ॥ विशाळी आणि सिंहासुर ॥ वधितां मागितला अक्षयीवर ॥ आमुचे नामाचें तीर्थ विशाळीचें करावें ॥ ९३ ॥ करहाटका हटकासुर ॥ हाटकोन मारिले दैत्य क्रूर ॥ हट्टी परम खळेश्वर ॥ हकाट भैरवदळभारीं ॥ ९४ ॥ हाकाटादि कल्हाटभैरी ॥ बोभाटभैरव शंखभैरी ॥ हे संवगडे श्रीकृष्णवतारीं ॥ वडजा वाकुडा गोमा पेंदा ॥ ९५ ॥ ते हेचि नटले भैरवाकारीं ॥ गुप्त प्रवेशती श्री करवीरीं ॥ ते येवोन वदती दैत्यदुरोक्ति सारी ॥ बद्रिविहारासी अष्टदिशेची ॥ ९६ ॥ तो अमंगळासुर मांगल्यवरि ॥ युद्धासी पातला घनघोरीं ॥ हा देविलास्याचा कुमारभारी ॥ पाताळविवरीं होता तो ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ देविलास्य क्रूरदैत्यं हत्वा कालरात्रि शक्तिप्रहरं ॥ दैत्य पुत्रान् यदन् श्रुत्वा अमंगलासुर युद्ध तुंबलं ॥ १ ॥ टीका ॥ तो हा देविलास्याचा कुमर ॥ महादुष्ट अमंगळासुर ॥ भैरवावतें रत्नागिरीवर ॥ जर्जर केला जयानें ॥ ॥ ९८ ॥ हें पाहोन चोपडाई ॥ युद्धासी धाडिली मंगळाई ॥ ते तीव्रशक्ति समुदायीं ॥ दैत्य लवलाहीं वेढिला ॥ ९९

अमंगळासुराचें घोरकंदन ॥ तें शक्तिअस्त्रीं झालें जीर्ण ॥ मंगळाईनें मस्तक छेदोन ॥ टाकितां नवल वर्तलें ॥ ॥ १०० ॥ मस्तकावीण दैत्यकबंध ॥ युद्धासीं करितसे चतुष्पाद ॥ राक्षसीमाया अप्रसिद्ध ॥ ब्रह्मादिकांसीं क-ळेना ॥ १ ॥ चतुष्पाद मस्तकावीण ॥ अमंगळासुराचा संग्राम दारुण ॥ करितां गर्जलें रत्नाद्रिपट्टण ॥ तें तु-काई रासाई व्याघ्राई पातल्या ॥ २ ॥ चत्वारी शक्तिसह मंगळाई ॥ तीव्र युद्धासीं शस्त्रघायीं ॥ क्षतांत्र झाला अ सुर देहीं ॥ तें पाशपंजरीं अकर्षिल्या ॥ ३ ॥ अमंगळाचे चत्वारीचरण ॥ महीसीं रुतले अतितीक्ष्ण ॥ हें अ द्यापि लक्षिती महाजन ॥ भूमीसीं क्षतें पडलीं अंगभारें ॥ ४ ॥ ऐसा मस्तकावीण अमंगळासुर ॥ युद्धासीं क रितसे घोरांदर ॥ झिंजाडोन पदें पाशपंजर ॥ लत्ताप्रहारें तडतडां तोडिले ॥ ५ ॥ लत्ता जानुजंघ घर्षले ॥ ते अंगभारें महीसीं रुतले ॥ हस्त चरण रक्तें बंबाळे ॥ होतां व्याकुळ असुर जाहला ॥ ६ ॥ दोन दिवस संग्राम भारी ॥ मंगळाईनें करोन निकरीं ॥ अमंगळासुर वधिला समरीं ॥ मंगळाईनें सक्रोधें ॥ ७ ॥ ऐसा भैरवभारीं चा समाचार ॥ अपुल्या दृष्टि पाहोन वदले साचार ॥ मृत्यु पावला अमंगळासुर ॥ युद्धासीं धुरंधर करोनिया ॥ ॥ ८ ॥ श्रीयालयापासोन कृष्णातीर ॥ लांबीरुंदी दशयोजनें भैरवभार ॥ उतरले सांगली पासोन जलालपूर ॥ जेथें ज्वाला नृसिंह असे रायबागीं ॥ ९ ॥ असो करवीराभोंवता परिघ ॥ नाथभैरवें वीर ठेविले अमोघ ॥ के-दारविजय कीर्तिचा ओघ ॥ गर्जत पातला भूमंडळीं ॥ १० ॥ तेथें सुस्नाथीं होवोन भैरवभार ॥ मांगल्य वां-टिती जयजयकारें ॥ सावध असती शक्तिपरिवारें ॥ स्थळोस्थळीं तव आज्ञेनें ॥ ११ ॥ ऐसें वदतां शंखभैरी ॥ आनंदें उचंबळली जलधिजा लहरी ॥ ह्मणे श्रीकेदार विजयाधिकारी ॥ या घोरांदरसागरीं तारक नौका ॥

॥ १२ ॥ असो जेथें वधिला सिंहासुर ॥ तेथेंचि गांव वसविलें सिंगणापूर ॥ विशाळीतीर्थ कासारतीर ॥ प्रयाग वटतीर्थ ह्मणती युगायुगीं ॥ १३ ॥ हाटकिले युद्धासीं यावें लवकर ॥ ह्मणोन नाम वदती हटकीश्वर ॥ ठेविलें दक्षिणकेदारें ॥ विशाळीयात्रा विशाळपर्वणीं ॥ १४ ॥ असो करवीराचे समोंवता ॥ नाथें घातला भैरवावर्ता ॥ शक्तिसमुदाईसीं अपरिमिता ॥ छप्पन्न कोटि कात्यायनीसीं ॥ १५ ॥ नवनाथ नवकोटि दुर्गा दारुण ॥ पश्चिम उत्तर पूर्व दक्षिण ॥ चत्वारीदिशा कृतांतवर्ण ॥ चत्वारी जळसेन ठेविले ॥ १६ ॥ काळभैरवाकार यंत्र ॥ करवीरा भोंवतें रंकभैरवसैन्यसूत्र ॥ नाथ फिरवितसे बीजमंत्रें ॥ महाकाळीसी ज्वालामुखी ॥ १७ ॥ हें पाहोनियां श्रीकमला ॥ ह्मणे केदारा सकोमला ॥ दैत्यांतक तूंचि गमला ॥ नाहींच श्रमलासी गमतसे ॥ ॥ १८ ॥ स्वरूप दावोन सदाशिवाचें ॥ तीर्थ निर्मिलें विशाळीचें ॥ शिरछेदिलें सिंहासुराचें ॥ सिंगणापूर वसविलें ॥ १९ ॥ आतां करवीर कांडींची कथा ॥ पद्मपुराणार्थी संत श्रोतां ॥ स्वस्थ परिसावी नवरसभरिता ॥ एकविंशती अध्यायीं विस्तारें ॥ १२० ॥ करवीर कामाक्ष योगदंडाचे वारे ॥ देवादिकासीं झगटले अनिवार ॥ शेळ्यामेंढ्या करी वारंवार ॥ शक्तिपरिवारांसीं स्वसामर्थें ॥ २१ ॥ तें संज्ञार्थ लक्ष्मी विजयान्वय ॥ महाराष्ट्र देशभाषा प्राकृत विनय ॥ श्रीनाथवरदोक्ति विरहित नये ॥ यदर्थीं मीं कवनकीर्ति नव्हें पंडितहो ॥ २२ येथें श्रोता वक्ता तर्कभाष्य व्याकरण ॥ अवघा श्रीगुरुनाथ निरंजन ॥ जो योगी मुनिमानस रंजन ॥ ॐ कार स्वर व्यंजन अर्धमात्रेसीं ॥ २३ ॥ इति केदारदिग्विजय ॥ श्रवणार्थीयांचा खंडित संशय ॥ त्रिविधसंताप हरोन निःसंशय ॥ विज्ञानऐश्वर्य पाविजे ॥ २४ ॥ तत्वानुभवी गुणगांभिर्य ॥ तेंचि केदारविजयांबरींचे सूर्य ॥

हरिनाम बाळ अरुणोदय ॥ आधीं करविती कथापंथीं प्रकाश ॥ २५ ॥ श्रीनाथ केदारविजय करवी ॥ कल्पनालेश ह्रदयीं नुरवी ॥ कीं हे हरिनामकुपिकीं रसायन भरवी ॥ विसावा घेवोन सेविजे विसावा गोडहा ॥ ॥ १२६ ॥ इति श्री केदारविजय ॥ भविष्योत्तर केदारखंड ॥ ब्रह्मांडपुराण विरचितायां ॥ अष्टगंधइतिहास कथन मंगळासुर वधोन्नाम विंशतितमो ध्यायः ॥ २० ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ श्रीमद्रवळनाथनिरंजना ॥ श्रीमुखचंद्रा चकोरान्वय सुजना ॥
श्रीमुखमंडित तुरंगवाहना ॥ श्रीमदानंदघना दक्षिणदीपा ॥ १ ॥ भ्रमरांकितकपोल मृगमदांकिता ॥ भ्रूकुटी द्वय
धनुमंडिता ॥ भ्रमरमुनिजन पदसंहिता ॥ भ्रूलतासंकेत दाविसी ॥ २ ॥ ऐसा देवाधिदेव ज्योतिस्वरूप ॥ शक्ति
चमूसीं बळप्रताप ॥ पातला पूर्वदिशेसीं गुप्त ॥ अलिप्त असज्जन दृष्टीसी ॥ ३ ॥ शिंगळद्वीपाचा राजा श्रीसिंग
॥ मानदेश कुतोहलगिरिवर शापदग्ध ॥ महादेवासीं अर्चूनि सांग ॥ द्वादशाब्धीं राहिला ॥ ४ ॥ चत्वारींविंशति
संवत्सरा ॥ शृंगराजा तपदुर्धरा ॥ करींचेंशृंग पडिलें वसुंधरा ॥ तेथें सिंगणापूर वसविलें ॥५॥ स्वल्प कांहीं उर-
ला दोष ॥ ह्मणोन पातला तपसायास ॥ कासारींचे दक्षिणतीरास ॥ शृंगराज तपकरी ॥ ६ ॥ ऐसें दारुण तप-
श्चर्य ॥ करितां भासे प्रतापसूर्य ॥ शृंगपाडमहदैश्वर्य ॥ शृंग नृपनाथ उद्धारिला ॥ ७ ॥ नाम ठेविलें शिंगणापू
री ॥ विशाळी उद्धार कासारतीरीं ॥ विशाळी यात्रेची नवलपरी ॥ विश्वोत्तरीं हे जगविख्यात ॥ ८ ॥ अष्टगंधा
चा संदेह निरसन ॥ कथिलें मधुमूरूचें आख्यान ॥ अमंगळासुर मंगळाईनें ॥ विंशतिअध्यायीं विस्तारें कथिये-
लें ॥ ९ ॥ आतांविंशतितमोध्यायीं ॥ नाथ निघाला शक्तिसमुदायीं ॥ करवीराच्या दिशादाहीं ॥ भैरवभारीं व्यापि
ल्या ॥ १० ॥ दक्षिणेसीं राहिली कात्यायनी ॥ पश्चिमेसीं महांकाळी रंकाळिनी ॥ उत्तरे चौसष्टयोगिनी ॥ ब्रह्मपू-
रींसीं सुरेंद्र राहिला ॥ ११ ॥ अष्टदिशेसीं अष्टबटुभैरव ॥ अष्टमासिद्धीसीं गंधर्व ॥ अष्टदिग्पाळ कल्हेश्वर सर्व ॥
करवीरदिशा रोधिल्या ॥ १२ ॥ करवीराचे अग्निकोणीं ॥ उज्वळांबा स्फुलिंग किरणीं ॥ ऐंद्रि पिंगाक्षी सिंदूरव-
र्णी ॥ माहिंद्री तुकाई फिरंगाई ॥ १३ ॥ शक्तिपरिवारीं विष्णुरमणी ॥ भैरवभारेसीं खड्गपाणी ॥ करवीरासीं आव


अध्याय २१वा
श्रीलक्ष्मी
कोल्हासुर
नाथ श्रीलक्ष्मीस राज्याभिषेक करितात.

तें घालोनी ॥ अगोचरपणीं राहिली पूर्वे ॥ १४ ॥ ऐसें अंगप्रत्यंग करवीराचें ॥ भार ठेविले सुरवरांचे ॥ वडन-
गेवरी शिवगणांचे ॥ मारासहित पार्वती राहिली ॥ १५ ॥ लक्ष्मीसहित अंशावतार ॥ घेऊन राहिला अलिप्ता-
कार ॥ करवीराचीं अष्टदिशेचीं द्वारें ॥ सुरशक्तिपरीवारें रोधिलीं ॥ १६ ॥ करवीर रोधोन शक्तिपरिवारीं ॥ ल-
क्ष्मी आणि हिमकेदारी ॥ बैसलीं एकांतमंदिरीं ॥ दीर्घ विचारीं वदतसे ॥ १७ ॥ तें वार्ता आणिली हाकाटभैरीं
॥ ह्मणे परिसें हिमकेदारी ॥ योगदंडाचा जो अधिकारी ॥ करवीरत्यानें नवल केलें ॥ १८ ॥ करवीरदैत्य देत्राव-
तार ॥ गयासुराचा सहोदर कुमर ॥ कोल्हासुराचा पुत्र करवीर ॥ यांचे युद्ध अतिदारुण ॥ १९ ॥ तयानें योग
दंड घेऊन करीं ॥ सव्य फिरविला शक्तिपरीवारीं ॥ तैसींच रूपें पालटलीं सुरवर भारीं ॥ अजा मेंढ्या ह्मैसी
जाहल्या ॥ २० ॥ कवण योगमायेची कळा ॥ देवकळा झाल्या विकळा ॥ शेळ्या मेंढ्या ह्मैसी जाहल्या ॥ नव-
कोटि कात्यायनींसीं ॥ २१ ॥ येथें यत्नराहिला सारा ॥ काय करावें सौदागरा ॥ योगदंडाचा नकळे मारा ॥ श्री
हिमकेदारा जाणपां ॥ २२ ॥ एवढी ज्यांची सामर्थकरणी ॥ चतुष्पादें केली शक्तिवाहिनी ॥ देव दैत्याहून सह-
स्रगुणीं ॥ उत्कर्षें करवीरासुर आगळा ॥ २३ ॥ शुक्राचार्यांचे आज्ञा अचळीं ॥ राज्य करित या भूमंडळीं ॥ वीर
शोधितां या समदळीं ॥ दुसरा न दिसे नाथराया ॥२४॥ ब्रह्मार्ध कल्पांत ज्यानीं ॥ राज्य केलें स्वधर्मसत्व गुणीं
॥ चत्वारीयुगीं तमोगुणीं ॥ राज्य केलें भरत खंडाग्रीं ॥ २५ ॥ बहात्तर युगाच्या प्रथम चरणीं ॥ तेचि द्वापारीं
प्रथमचरणीं ॥ तुह्मीं अवतरला खड्गपाणी ॥ पौगंडऋषी रमणीचे करतळीं ॥ २६ ॥ असो दुग्ध काढोन ज्यानीं
भरलें तळें ॥ नाम ठेविलें तयाचें दुधाळें ॥ तक्र शक्र दुर्लभ तेंचि ताकाळें ॥ पद्माळ घृतें भरी पद्माक्षीचें ॥ २७

॥ संध्याकाळीं दहीं दुग्ध घृत प्राशन ॥ करोन निर्भय करितीं शयन ॥ उषःकाळीं देवांश आज्ञाघेऊन ॥ निर्भय मनीं वनीं चारिती ॥ २८ ॥ संध्याकाळीं पाताळ विवरीं ॥ चतुष्पाद म्हैसी नेवोन दोहनकरी ॥ दधिं दुग्धाचीं तळीं कासारीं ॥ भरोनी निशाकाळीं सेवितसे ॥ २९ ॥ निशीतें प्रवेशतां पाताळ विवरीं ॥ हे करवीर योग दंडाची नवलपरी ॥ ऐसें परिसोन हिमकेदारी ॥ कमळेप्रती वदतसे ॥ ३० ॥ बहुत दिवस करितां विचार ॥ श्रमी झाले सुरवर भार ॥ शेळ्या मेंढ्या करोन करवीर ॥ योगदंडबळें वनांतरीं ॥ ३१ ॥ योगदंड दिधला कवणें यासीं ॥ याचा अन्वय मज विस्तारेंसीं ॥ हें ऐकोन ह्मणे परियेसीं ॥ श्रीलक्ष्मीसीं केदारवदे ॥ ३२ ॥ सत्वगुणीं गयासुर परोपकारी ॥ स्वदेह झिजवी चंदनापरी ॥ तयाचे निजांगावरी ॥ याग सुरवरीं मांडिला ॥ ३३ ॥ दिव्य दहासहस्र संवत्सर ॥ याग केला विधिहरिहर ॥ संतोष पावले सुरमुनिवर ॥ आर्यमागण पितृव्य गणेसीं ॥ ३४ ॥ विष्णुपाद जयाचे मस्तकावरता ॥ असे जो ब्रह्मकल्प पर्यंता ॥ तेथें पुण्यवंत वस्ती करितां ॥ त्यांसीं पुनर्जन्म पै नाहीं ॥ ३५ ॥ द्वादशलिंगांमाजीं जो प्रख्यात ॥ ज्योतिर्लिंग श्रीविश्वनाथ ॥ तो त्वां स्थापिला स्वहस्तें ॥ विष्णुपदेसीं ब्रह्मपदीं ॥ ३६ ॥ ऐसा पुण्यवंत गयासुर ॥ तयाचे शरीरावरी देवावतार ॥ अखंड असती धन्यजन्मांतर ॥ दैत्यवंश उद्धरिला ॥ ३७ ॥ तया गयासुराचे दोघे सहोदर ॥ कोल्हासुर पुत्र ज्येष्ठकरवीर ॥ दोघांचे दोन शतकुमर ॥ पाताळ विवरीं असती ॥ ३८ ॥ ते दोनशत दैत्यकुमर ॥ केशीराक्षसाचा कपर्दिक कुमर ॥ पूर्वी युद्धीं वधिले सारे ॥ शतसंवत्सर युद्ध करोनी ॥ ३९ ॥ हें ऐकोन लोपामुद्रा ह्मणे ॥ केशीराक्षसासीं काय कारण ॥ युद्ध करोन दारुण ॥ मारविलें करवीर हस्तीं ॥ ४० ॥ ऐकोन कांतेची सुरसवाणी ॥ कथा सांगे-

अगस्तिमुनि ॥ केशापूरपट्टणीं राक्षसवाहिनी ॥ केशीराक्षस राज्य करितसे ॥ ४१ ॥ नव्वद अक्षौहिणी राक्षसीसैना ॥ त्यांमाजीं श्रेष्ठ केशीराक्षस राणा ॥ करोनि पृथ्वी सर्व आकर्षणा ॥ देव धेनु ब्राह्मणांसीं उच्छेदिलें ॥ ४२ ॥ हें जाणोन कमळासन ॥ करवीर कोल्हासुरा बोधिलें वचन ॥ तुह्मीं आमुचे वरदपुत्र ह्मणोन ॥ राक्षसहननार्थीं जाईजे ॥ ४३ ॥ करवीराचे शतनंदन ॥ महायोद्धे दैत्य दारुण ॥ मेळऊन तुमचे आप्तगण ॥ केशीराक्षस वधावा ॥ ४४ ॥ ऐकोन ब्रह्मदेवाची वाणी ॥ करवीर कोल्हासुरतीव्र वाहिनी ॥ सज्योनि साठलक्ष मेघवर्णी ॥ अर्बुद एकदैत्य परिवार ॥ ४५ ॥ घाटो वाटीं गिरिकंदरा ॥ शोधोनि मारिलें निशाचरां ॥ वेढाघालोन केशापुरा ॥ कोल्हासुर सैन्य उतरलें चौफेरीं ॥ ४६ ॥ श्रीयालया पासोन ब्रह्मनाळीं ॥ उत्तरली तुंबळ फळी ॥ केशापुरीं चतुष्कोनीं निराळी ॥ करवीरभारेसीं उत्तरला ॥ ४७ ॥ आकर्षोन ऐसें केशापूर ॥ हें जाणी केशीनिशाचर ॥ युद्धासी पातला घनघोर ॥ मायारूपी राक्षस सैन्येसी ४८ ॥ द्विशत कुमरांसीं करवीरें ॥ राक्षसचमूवरी पातला गजरें ॥ लावोन रणवाद्य घोरांदरें ॥ दैत्य झुंझार्थीं प्रवेशला ॥ ४९ ॥ दैत्य राक्षसांचें कठोरघोरकर्म ॥ प्रवर्तले करावया घोरसंग्राम ॥ उभयसैन्यां जाहला विराम ॥ परिपूर्ण कामना न होती ॥ ५० ॥ राक्षसीं घेवोन पाषाण पर्वतशृंगें ॥ चूर्ण जाहलीं हाणितां समरंगणीं रागें ॥ जैसाकुंभ महीवरी पडतां भंगे ॥ तैं नाश होय जीवनघटासीं ॥ ५१ ॥ द्रुमविरहित झालें वन ॥ चूर्ण जाहले पर्वत पाषाण ॥ कोल्हासुराचे दैत्यदारुण ॥ राक्षस त्याहोन आगळा ॥ ५२ ॥ ऐसा शतवर्ष संग्राम थोर ॥ केला दैत्यराक्षसीं परमनिकुरें ॥ देव विमानीं भविष्य वदती सारें ॥ दैत्यराक्षसां अंत पुरला ॥ ५३ ॥ असो ऐसा संग्राम दारुण ॥ केलें शतवर्ष सक्रोधें उपोषण ॥ संहा

रलें उभय सैन्य ॥ रक्तगंगा ही लोटल्या ॥ ५४ ॥ शोणित महीवर वाहे धडाडीं ॥ दैत्यराक्षसां प्रेतांच्या दरडी ॥ उभयशब्दांचे घनगडाडीं ॥ जेवीं सातवाकुडीं घनघोर ॥ ५५ ॥ रक्तगंगा तुंबळपणीं ॥ प्रवाह लोटला प्रचंडधरणीं ॥ खळखळाट माजला सिंदूरवर्णी ॥ तो कृष्णासंगमीं मिळाला ॥ ५६ ॥ असो ऐसा उभयतां सैन्यभार ॥ जाहला ह्यहस्तीं करोनि संहार ॥ केशिया मारिला कोल्हासुर ॥ अठरादिवस युद्ध करोनी ॥ ५७ ॥ केशियाचा कपर्दिक कुमर ॥ पळोन जातां धरिला करवीरें ॥ शरणांगतासी वज्रपंजरें ॥ कोल्हासुर रक्षोन पाळिला ॥ ५८ ॥ केशिया मारोन कोल्हासुरें ॥ क्षेत्र वसविलें श्रीकरवीरें ॥ तें हेंचि करवीर कोल्हासुरें ॥ लक्ष्मीस पळविलें येथोन पूर्वीं ॥ ५९ ॥ ह्मणोन लक्ष्मीसहित रवळनाथ ॥ सैन्यसमुदायीं पातले बळसमर्थ ॥ हें जाणोन भविष्यार्थ ॥ तप मांडिलें करवीर कोल्हासुरें ॥ ६० ॥ नाथ लक्ष्मी येणार ह्मणोनि तपश्चर्ये ॥ बैसले पितापुत्र प्रताप सूर्य ॥ शतकोटि संवत्सर आचरले धैर्यें ॥ ते समयीं शंकर प्रसन्न जाहला ॥ ६१ ॥ शंकर ह्मणे हे करवीराक्षअसुरा ॥ प्रसन्न झालों अपेक्षित वरा ॥ जें मागसील तें देईन ये अवसरा ॥ केल्हासुरकुमरा परियेसी ॥ ६२ ॥ ऐसें वदतां शूळपाणी ॥ करवीर वदे गंभीरवाणीं ॥ जे योगमायेची विचित्र करणीं ॥ तो योगदंड दे मजलागीं ॥ ६३ ॥ सत्वगुणीं जन्म गयासुरा ॥ तैसाचि तूं योग्यहोसीं करवीरासुरा ॥ परी तूं कां मागसी तामस वरा ॥ कीं सुरनरवरां छळणार्थीं ॥ ६४ ॥ तुमचे पुत्र शतद्वय नम अरिंतें ॥ ते त्र्यमली निश्चित भरिंतें ॥ गयासुराची शक्त आदि कुमारीतें ॥ वदली देवांसीं युद्ध करूंनये ॥ ६५ ॥ गयासुरा तुह्मीं पूर्वीं दिधली भाक ॥ किमपि देवांसीं युद्ध न करावें देख ॥ हें तुह्मीं करितां मायीक ॥ कुटिल धरोनि मनांतरीं ॥ ६६ ॥ भगवंता गयासुराचें वचन ॥ स्वकुळेसीं

पावाल मरण ॥ योगदंड महीवरी ठेवितां जाण ॥ तुमचें मरण असे भक्तिहस्तीं ॥ ६७ ॥ पितया तुल्य ज्येष्ठबं-
धु ऐसें वदती चारीवेदु ॥ त्या गयासुराचा भगवंता शब्दु ॥ पावसी वधु शक्तिकरें समरंगणीं ॥ ६८ ॥ ऐसें गौ
रवोन वरदोत्तरीं ॥ योगदंड दिधला कामाक्षाकरीं ॥ ह्मणोन कामाक्षी राज्याधिकारी ॥ दुर्धरवरें माजला ॥ ६९ ॥
तो कामाक्ष कोल्हासुर ॥ अजिंक्य झाले अजरामर ॥ योगदंड योगशक्ति परिवार ॥ खिल्लारें केलीं तें पहासी ॥
॥ ७० ॥ हें ऐकौन त्रयमल्लीशक्ति ॥ नाथासी ह्मणे ऐक सुमती ॥ करवीराक्षातें वधीन स्वहतीं ॥ चिंता किमपि
न करावी ॥ ७१ ॥ ऐसें वदोन त्रयमल्ली ॥ वृद्धरूप घेवोन निघाली ॥ चालिली अत्मस्थिति पाउलीं ॥ कृतांत
सावुली ज्यापरी ॥ ७२ ॥ स्वसामर्थें पाताळविवरीं ॥ त्रयमल्ली जावोन अगोचरीं ॥ करवीराचे शतपुत्र करीं ॥ मा
रिले पूर्वी घोरसंग्रामीं ॥ ७३ ॥ कोल्हासुराचे ही द्वितीयसंबंधीं कुमर ॥ त्रयमल्लीनें वधिले निकुरें ॥ याचा पद्मपु
राणीं कथिला विस्तार ॥ तो लक्ष्मीविजयीं परिसा पुढें ॥ ७४ ॥ तो कथार्थ वदतां विस्तारीं ॥ ग्रंथ वाढेल जैसा
वट बीजांकुरीं ॥ असो वृद्धरूप धरोन कोल्हापुरीं ॥ प्रवेशली त्रयमल्ली ॥ ७५ ॥ भृगुऋषीचे आश्रम मंदिरीं ॥
त्रयमल्ली राहिली अगोचर खेचरी ॥ तें वार्ता आणिली महेश्वरीं ॥ करवीराक्षा सांगती तें ऐक लोपामुद्रे
॥ ७६ ॥ अष्टदिशा शक्तिपरिवारीं ॥ कल्लेश्वर सिद्धादि सुरवरीं ॥ व्यापिल्या पुनरपि भैरवभारीं ॥ कात्या-
यनीसीं उज्वलांबा ॥ ७७ ॥ उज्वलांबा विक्राळशरीरीं ॥ युद्ध केलें घोरसमरीं ॥ चत्वारीशक्ति खदिरां
गारीं ॥ शरधारीं वर्षती ॥ ७८ ॥ दिसती नदिसती क्षणएक प्रगट ॥ क्षणएक अदृश्य शब्द बोभाट ॥ भा
सा अभासीं महदारिष्ट ॥ बळवरिष्ठ दर्शविती ॥ ७९ ॥ सूक्ष्म बुद्धीं करितां शोधा ॥ पातले भासती

दारुण युद्धा ॥ रक्तभोज रत्नासुर वधा ॥ केला तो शक्ति चमूसीं पातले ॥ ८० ॥ ऐसी ऐकोन हे-रवाणी ॥ कोल्हासुर करवीर वदे वचनीं ॥ आतां सिद्धकरोन निजवाहिनी ॥ पंचगंगेवरी उतरावें ॥ ८१ ॥ दुश्चिन्ह दृष्टि पडलें मजला ॥ तूतें काहीं पूर्वीचा भाव हा उमजला ॥ ऐकोन ह्मणे अनर्थकारक मज समजला ॥ कोल्हासुर ह्मणे करवीरातें ॥ ८२ ॥ कोल्हासुरा वधोनि करवीरें ॥ निघाला तीव्र अभयोत्तरें ॥ योगदंड घेवोन अतित्वरें ॥ तैं मार्गीं अपशकुन झाले ॥ ८३ ॥ योगदंड घेवोन हातीं ॥ कामाक्ष खवळला भद्रजाती ॥ तैं वृद्धा शुभा वेंचित फिरती ॥ तिरडें रचिती दुरडी माजी ॥ ८४ ॥ शक्तिसहित भैरवभारीं ॥ कोट उतरला हिमकेदारी ॥ याचा शोध करावया गुप्तविचारीं ॥ कामाक्षासुर पातला येथें ॥ ८५ ॥ शुभावेंचून मार्गीं निवडी ॥ रचित त्रयमल्ली शुभेचि तिरडी ॥ तैं कामाक्षपद लागतां दुरडी ॥ शुभेची परडी विखुरली ॥ ८६ ॥ शुभा विखुरल्या देखोन निरवडी ॥ ह्मणे चांडाळा तुझी किरडी ॥ आंवळली आजि या माळमुरडीं ॥ शुभेची दुरडी कां विखुरली माझी ॥ ८७ ॥ बहुदिन करवीराचे नगरांत ॥ अखंड असें मीं आनंद भरित ॥ तंव कामाक्ष ह्मणे तूं कोण येथ ॥ कवण गृहीं वास्तव्य तुजला ॥ ८८ ॥ काय कारण वेंचिसी शुभांसीं ॥ मातें वदसी कां अशुभासीं ॥ वृद्धा होऊन वदसी सुभाषीं ॥ अझोनि तरी मजलागीं बोलें ॥ ८९ ॥ ऐकान कामाक्षाचें वचन ॥ त्रयमल्ली वदे क्रोधायमान ॥ शुक्राज्ञेनें भृगऋषीचें सदन ॥ सेविलें बहुकाळ पर्यंत ॥ ९० ॥ तयाच्या होमालागीं इंधना ॥ शुक्राज्ञेनें पातलें वना ॥ शुभा वेंचितां झालें ओसाना ॥ वृद्धपणत्वरीति नसे मजला ॥ ९१ ॥ बहुकाळींची मीं ह्मातारी ॥ भार्गवाचार्याचे निजमंदिरीं ॥ होमद्रव्य आणावया निजमंदिरीं ॥ शुक्राज्ञेनें आलें या-

ठयां ॥ ९२ ॥ शुभा आणावया शुक्राज्ञेनें ॥ पातलें तंव त्वां केलेंसी विघ्न ॥ आतां जातें रिक्त फिरोन ॥ आचार्यातें हें सांगावया ॥ ९३ ॥ शेळ्यां मेंढ्यांचें भक्षोन दूध ॥ तूं जाहालासी दुर्मदांध ॥ शुक्राचार्यासीं आर्धाच क्रोध ॥ करवीरा तूं करितहोतासी ॥ ९४ ॥ मीं रिक्त गेलिया साक्षेप ॥ परिसतां माझा खेद संताप ॥ तूतें आतांच देववील शाप ॥ भस्म तुजलागीं करवितें ॥ ९५ ॥ कां माझी विखुरली शुभेची दुरडी ॥ तैसीच तुझी मुरडीन नरडी ॥ माझिये दृष्टिपुढें तुझी किरडी ॥ या माळमुरडीवरी पडो ॥ ९६ ॥ मरमर कामाक्षा अधमासुरा ॥ ऐसी शक्ति क्रोधानळगिरा ॥ परिसोनियां दैत्यवरा ॥ दुश्चिन थरकंपित वदतसे ॥ ९७ ॥ शुक्राज्ञेची परिसोन प्रतापगरिमा ॥ ह्मणे वृद्धे अपराध करावे क्षमा ॥ तयांसीं न सांगावें माझिया नामा ॥ आचार्यासीं हें नव दावें ॥ ९८ ॥ ऐसें वदतां कामाक्षीअसुर ॥ त्यातें त्रय मल्लीदेत प्रत्युत्तर ॥ शुभेची दुरडी भरोन त्वर ॥ माझिये मस्तकीं वाहावी तुवां ॥ ९९ ॥ मीं बहुकाळींची ह्मातारी ॥ शुभेची दुरडी नुचले भारी ॥ तूं उचलोन देसी मम शिरावरी ॥ तैं जन्मवरी सुख भोगिसी ॥ १०० ॥ ऐसें वदतां वृद्धाकेनें ॥ कामाक्षीअसुर सुहास्य करोन ॥ शुभेचा हारा घे एका करानें ॥ तंव तो नूचले नढळेची ॥ १ ॥ त्रयमल्ली ह्मणे हें ऐक वीरा ॥ दंड जानूवरी अडवा ठेवीं बरा ॥ बैसोन उचलीं शुभेचा हारा ॥ द्वयकरां वांचून न उचले ॥ २ ॥ योगदंड न ठेवीं भूमीवरी ॥ बैसोन जानूवरी आडवा धरीं ॥ दुरडी उचलितां त्वां द्वयकरीं ॥ मीं ही उचलोन घेईन ॥ ३ ॥ ऐसें वदतां त्रयमल्लीनें ॥ दुरडी उचलिली द्वयकरानें ॥ मुखा आणिली महात्राणें ॥ परमकष्टें करोनियां ॥ ४ ॥ तैं त्रयमल्लीदृष्टि करडी ॥ मोडोन करवीरासुराची नरडी ॥ त्यावरी पालथी घालोनि दुरडी ॥ वरी उभीराहिली मूळ माया ॥ ५ ॥

उताणा पडतां करवीरासुर ॥ योगदंड पडला भूमीवर ॥ हें देखोन केला जयजयकार ॥ त्रयमल्लीनें चपलाकृती॥ ॥ ६ ॥ तो योगदंड घेवोन हातीं ॥ शेळ्या मेढ्या अमराकृती ॥ मग योगदंड घेवोन हातीं ॥ पहिलें ऐसा केला शक्तिपरिवारें ॥ ७ ॥ जैसे जात्यांत दाणें भरडी ॥ तैसी कामाक्षावरी फिरवित दुरडी ॥ ओंविया गातसे-परात्परवडी ॥ येई केदारा लक्ष्मी सहित ॥ ८ ॥ येई त्रिगुणरूपी सगुणावतारा ॥ खड्गपात्र त्रिशुल डमरुधरा ॥ जातीं दळोन कामाक्षासुरा ॥ शक्तीनें पीठ काढिलें योगदंड बळें ॥ ९ ॥ स्वादिष्ठ केला स्वयंपाक ॥ योगदंड रसोत्पत्तीचा देख ॥ पक्वानें निर्मिलीं रहस्य देख ॥ सेवावया विधि हरिहरा ॥ १० ॥ दैत्य कामक्रोधाचे तुंबळ ॥ कांडोन रणउखळीं केलें सोज्वळ ॥ दैत्यमद तृष्णा मैंद निर्मळ ॥ चाळोन सोहं सपीठ काढिलें ॥ ११ ॥ विरोध मार्गीचे फोडोन फणस ॥ बीज काढोनि भाजिलें कामाक्षा ऐसें ॥ रक्तबीज कानवला मुरडीला रोषें ॥ महाकाळीनें लक्ष्मीविजयीं ॥ १२ ॥ रक्तबीज रणधुमाळी ॥ करितां वधील त्यासीं महाकाळी ॥ ते कथाविस्तार रसोत्पत्ती सकळी ॥ लक्ष्मीविजयग्रंथीं परिसा पुढें ॥ १३ ॥ असो दैत्यपरिवारी नवचंडित कुष्मांड ॥ फोडोन सांडगे केले उदंड ॥ अमर्यादा चणीचे जे तीळवडे ॥ कृपातैलें तळिले अरुवारी ॥ १४ ॥ दैत्य सुकृत दुष्कृताचे पापड ॥ क्रियमाणसंचिताग्नि निवाडे ॥ भाजितां कंदनारंभी कडाडे ॥ चूर्ण जाहले ते रणपात्रीं वाढिलें ॥ १५ ॥ दुष्टभजनाची मिथ्या तें मेतकुट ॥ वासनात्मकींचें वांटोन तिखट ॥ वांटली सोहं भजना चोखट ॥ लोणचीं आंबे निंबाचीं ॥ १६ ॥ कोल्हासुर सेवकरीतीच्या शेवया ॥ श्रीकमलें करवीं अमल करवोनियां ॥ वेगीं येई श्रीनाथराया ॥ आतां सेवावयासीं विलंब नाहीं ॥ १७ ॥ ऐसा स्वयंपाक करोन सारा ॥ घेवोन येईजे शक्तिभैरवमारा ॥

कमळेसहित सौदागरा ॥ दक्षिणकेदारा येईपां ॥ १८ ॥ हा योगदंड रसोत्पत्तीचा स्वयंपाक सार ॥ केला ऐकोन दक्षिणकेदार ॥ कमळेसीं ह्मणे आतां सत्वर ॥ कोल्हासुरासीं वधावें अविलंबें ॥ १९ ॥ स्वसैन्यभारीं पंचगंगातीर ॥ रक्षित बैसला कोल्हासुर ॥ महापराक्रमी धुरंदर ॥ घोरांदर युद्धासीं पातला ॥ २० ॥ महारौद्री महाकाळी ॥ माहिंद्री महालक्ष्मी कंकाळी ॥ महासरस्वती नरसिंहा कराळी ॥ नवकोटि कात्यायनीसी उज्वलांवा ॥ २१ ॥ सिद्धलक्ष्मी जयलक्ष्मी ॥ कालिका महाकालिकासी संग्रामीं ॥ यांसवें कोल्हासर पंचगंगासंगमीं ॥ युद्धासीं तुंबळ करितसे ॥ २२ ॥ पर्वताकार कांचनरथीं ॥ कोल्हासुर बैसला भद्रजाती ॥ जेवीं अनंतउगवले गभस्ती ॥ रथ रण चपलांवरीं निरखितां ॥ २३ ॥ काळपाश यमपाश ॥ वरुणपाश त्रिशूल पट्टिश ॥ युद्धासीं करी खड्गविकोश ॥ लव अवकाश घेऊं नेदी ॥ २४ ॥ बाणवृष्टि करितां कोल्हासुर ॥ भयाभीत जाहला शक्तिपरिवार ॥ असुर खवळला जैसा वैश्वानर ॥ ब्रह्मप्रळय ज्यापरी ॥ २५ ॥ हें जाणोन वैष्णवीमाया ॥ धरिती जाहली सत्व रज तमीं काया ॥ ब्राह्मी रौद्री वैष्णवीया ॥ योनि मस्तकीं लिंगांकित ॥ २६ ॥ ब्रह्मा विष्णु श्रीशंकर ॥ यांचे हस्तें कोल्हासुर ॥ मरण न पावेल साचार ॥ ह्मणोन वरदिधला पूर्वीं ॥ २७ ॥ यास्तव पुरुषवेष टाकोन सारा ॥ बाहेर दाखविलें स्त्री आकारा ॥ यासाठीं महालक्ष्मी भयंकरा ॥ त्रिगुण नटनाटक नटलिसे ॥ २८ ॥ मस्तकीं भगवान्स्वरूपी भगमालिनी ॥ नागस्वरूपी पद्मयोनी ॥ लिंगस्वरूपी शूलपाणी ॥ ऐसी चिद्रत्नीं लावण्यखाणी अवतरली ॥ २९ ॥ असो महालक्ष्मी सवें सप्तदिवस ॥ कोल्हासुरानें युद्धकेलें विक्राळवेष ॥ तें महालक्ष्मीनें शेष ॥ चंडांश सुदर्शन सोडिलें ॥ ३० ॥ सरले योगदंडाचे वारे ॥ मृत्यु पावले कामाक्षादि सारे ॥ तुजलागीं वधावया निकरें ॥ बहुत

४३

दिवस शोधितसें ॥ ३१ ॥ असो सिद्धलक्ष्मी गर्जोन भयंकर ॥ सहस्त्रधारी सोडिलें तीव्र सुदर्शन निकरें ॥ छेदितां शिर पडलें वसुंधरे ॥ तें कोल्हासुर गर्जोन पाडियेला ॥ ३२ ॥ तेव्हां कोल्हासुराचे मुखांतून ॥ तेज निघालें दैदिप्यमान ॥ तें सिद्धमहालक्ष्मीचे अळंकार होवोन ॥ श्रीशरीरीं प्रवेशलें ॥ ३३ ॥ ब्रह्मा विष्णु आणि हरी ॥ श्रीवेष नटले स्त्री आकारीं ॥ ह्मणोन कोल्हासुर निजतेज अळंकारीं ॥ श्रीचिदानंदीं शोभला ॥ ३४ ॥ श्रीपद्म पुराणीं करवीरकांडीं विस्तारें ॥ कथार्थ कथिला सत्यवतीकुमरें ॥ तोचि लक्ष्मीविजयीं पंचदशोध्यायीं चतुरें ॥ परिसावा यदर्थीं कथार्थ फार वाढेल ॥ ३५ ॥ कोल्हासुराचा संग्राम अद्भुत ॥ वीररसोत्पत्तीचा रणपंडित ॥ तो लक्ष्मी विजयीं सावचित्त ॥ श्रोतीं संतीं परिसावा पुढारें ॥ ३६ ॥ ह्मणोन तो वटबीजकथांकुर ॥ हा एकविसावा अध्याय मानिजे पंडितवर ॥ असो लक्ष्मी आणि हिमकेदार ॥ त्रिमल्लीचें वचन ऐकोन पातले ॥ ३७ ॥ लक्ष्मी ह्मणे त्रयमल्ली त्रिपुर ॥ महापराक्रमी दोघे असुर ॥ पुण्यश्लोक जैसा गयासुर ॥ तैसें यांसीं वरदान द्यावें ॥ ॥ ३८ ॥ जैसें गयेसी गयावर्जन ॥ करिती सुरमुनि गुणिजन ॥ उद्धरती पितृव्य कोटि गुण ॥ गयासुर पुण्यें करोनियां ॥ ३९ ॥ गयासुराचे हेचि उभयबंधु ॥ सत्व धैर्याचे प्रतापसिंधु ॥ गयासुराचा वरदशब्दु ॥ गोविलें नाथासीं विदित असे ॥ ४० ॥ जैसी गायासुराचे नांवे गया ॥ मुक्तिपद दायक अवघियां ॥ काशी मनकर्णिका त्रिवेणिया ॥ जगदोद्धारक गयासुराचेनीं ॥ ४१ ॥ तैसेंचि दो नामाचें एक नगर ॥ क्षेत्र वसविलें श्रीकरवीर ॥ प्राकृत बोलती कोल्हापुर ॥ जन कलयुगीं अद्यापी ॥ ४२ ॥ रुद्रगया जयंतीतटीं काशीखंडीं ॥ तैसेंचि दक्षिणप्रयाग हे भरतखंडीं ॥ करवीरमहिमा काशीखंडीं ॥ अपार पंडितीं पहावा ॥ ४३ ॥ काशी प्रयाग महिमा अपार ॥

श्रवणार्थी व्हावे तीनसंवत्सर ॥ तैसेंचि करवीर काशी कोल्हापूर ॥ काशीहून विस्तार जत्र आगळा ॥ ४४ ॥ ऐसें गयासुरासीं वरदान ॥ आह्मींच दिधलें अकल्पीं प्रमाण ॥ तें तुवां न करावें अप्रमाण ॥ करवीर कामाक्षरांतकें ॥ ४५ ॥ तूं जें मागसी वरदान ॥ तेंचि आह्मीं पुरवूं सन्मानें ॥ सिद्ध साध्य मरुद्गण ॥ तव आज्ञा लक्षित उभे तिष्ठती ॥ ४६ ॥ ऐसें लक्ष्मीसहित केदार वचन ॥ त्रिणामल्लीनें परिसोन ॥ वदतसे प्रसन्न सुहास्य किरण ॥ तें सुरवरगणीं परिसावें ॥ ४७ ॥ मुक्तमंडपीं मज नेणतां ॥ कुष्मांड कासया भेदित होतां ॥ इच्छितवर मातें देतां ॥ प्रार्थना करितां क्षेत्रासीं यावें ॥ ४८ ॥ मातें न विचारितां तुह्मींच प्रबळ ॥ मुक्तमंटपीं बैसोन सकळ ॥ विदारावया कुष्मांडफळ ॥ विलंब कांहीं न केला तुह्मीं ॥ ४९ जें जाहलें तें बहुत बरवें ॥ मान्य केलें माझिये जीवें ॥ नवरात्रीं अर्चन सुरवर सर्वे ॥ मातें पूजावें येवोनियां ॥ ५० ॥ तथास्तु ह्मणे श्रीकेदार ॥ महापराक्रमी करवीर कोल्हासुर ॥ तव कृपा कटाक्षीं झाला संहार ॥ प्रणव बीजाक्षरें अहमस्मितें ॥ ५१ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ हे त्वां निर्मिले त्रिगुणाकार ॥ यक्ष सिद्ध विद्याधर सुरवर ॥ वेदपुरुष तुझेनि जाहला ॥ ५२ ॥ ऐसें स्तवन कमला श्रीनाथ ॥ करोन केला प्रणिपात ॥ पूजा आरंभिली सावचित्त ॥ श्रीलक्ष्मीकेदारें आवडीनें ॥ ५३ ॥ त्रिणामल्ली अनादि श्रीभगवती ॥ श्रीनाथ स्तवनीं तोषली भक्तीं ॥ आश्विनशुद्ध पंचमी तिथीं ॥ कुष्मांडभेदन तवाज्ञेनें ॥ ५४ ॥ लक्ष्मी तीर्थी करोन स्नान ॥ तर्क तीर्थीचें अघमर्षण ॥ करोन त्रयमल्लीचें पूजन ॥ लक्ष्मी दर्शन तदनंतर घ्यावें ॥ ५६ ॥ तीर्थयात्रा पंचक्रोशी ॥ करितां संपूर्ण होय षण्मासीं ॥ जैसे लागती दिवस गयावर्जनासी ॥ तैसाचि करवीरक्षेत्रमाहिमा असे ॥ ५६ ॥ करवीर उत्तरद्वार महाजन ॥ करोन त्रि-

णामल्लीचें दर्शन ॥ घेतां अघटित असे पुण्य ॥ दर्शन न घेतां यात्रा निर्फळ ॥ ५७ ॥ करवीर क्षेत्रीं शक्ती परिवार ॥ महाकाळी कराळी नंदिकेश्वर ॥ ब्राह्मीं रौद्री उत्तरेश्वर काशी विश्वेश्वर रंकभैरव ॥ ५८ ॥ दत्तदिगंबर अत्रिकुमर ॥ अष्टपीठांबरीसीं लंबोदर ॥ प्रल्हादतीर्थ असंख्य लोणार ॥ करवीर दक्षिणप्रयाग तीर्थमहिमा ॥ ५९ ॥ करवीरकांडीं पद्मपुराणीं ॥ तीर्थमहिमा काशीखंडीं व्यासमुनी ॥ वदला तो महापंडित जनीं ॥ विस्तार पहातां ऐसेंचि असे ॥ ६० ॥ असो करवीरयात्रा पंचक्रोशीं ॥ शक्तिपरीवारें सिद्धसाध्येसीं ॥ यवोन सन्मानें नमिती त्रिणामल्लीसी ॥ तव कृपेनें संपूर्ण यात्रा जाहली ॥ ६१ ॥ असो ऐसें देवर्षि सुरवर ॥ लक्ष्मीसहित हिमकेदार ॥ त्रिणामल्लीचें आज्ञोत्तर ॥ वंदोन सुरवर निघाले ॥ ६२ ॥ जयलक्ष्मीसीं घनगर्जन ॥ दुंदुभिनादें करपट्टण ॥ प्रवेशली कमला सुरवरगण ॥ जेवीं तारका वेष्टित निशाकरमणी ॥ ६३ ॥ तैसी पातली महाविष्णु रूपिणी ॥ अठरापद्म भैरव चमूसीं खड्गपाणी ॥ स्वयें अभिषेकिली राज्यासनीं ॥ कनकाभरणीं वारिजाक्षीतें ॥ ६४ ॥ कांहीं दिवस करोनि वास ॥ लक्ष्मीसीं वदे दक्षिणाधीश ॥ आज्ञा देईं मज संतोष ॥ बद्रिकाश्रमासीं जावया ॥ ६५ ॥ सप्तद्विपामाजीं जंबुद्वीप ॥ भरतखंडाग्रीं झाला कर्मलोप ॥ तो उजळिला तव कृपावलोकनें दीप ॥ बळ प्रतापार्क दशखंडातें ॥ ६६ ॥ झालें संपूर्ण अवतार चरित्र ॥ सुखें रक्षावें करवीरक्षेत्र ॥ तवगुणकथानक बीजमंत्र ॥ अखंडित ल्हदय पत्राक्षरीं संरक्षितसें ॥ ६७ ॥ आतां असोंद्यावी दया ॥ माझें भाग्य पातलें उदया ॥ ह्मणोनि तवकृपेनें दिग्विजया ॥ पावलों त्रैलोक्यीं अहमास्मितें ॥ ६८ ॥ ऐसें वदोन दक्षिणाधीश ॥ भैरवभारीं मंगळघोष ॥ निघोन चालिला जैसा चंडांश ॥ उत्तरायणीं उत्तरावया रत्नागिरीवरी ॥ ६९ ॥ लक्ष्मी तैसीच

पाठी लागे ॥ पातली रत्नागिरिवरासीं वातवेगें ॥ मजला टाकोन मागें ॥ तूं कां जासी ब्रद्रिकाश्रमा ॥ ७० ॥ तुजवीण करवीर राज्यासन ॥ वाटे विषप्रयोगाहून सहस्रगुण ॥ जें तूं सांगसील वचन ॥ तितुकेंचि ऐकोनि तूंतें तोषवीन मीं ॥ ७१ ॥ मीं करवीरीं राहिलें जाणोन ॥ विभक्त दनुज करितील धांवणें ॥ मातें नेतील चोरून ॥ शंकासुरें वेद जैसे नेले ॥ ७२ ॥ ह्मणोनि युगायुगीं चंचळपण ॥ क्षणभरी वस्ती करूंनये करावें भ्रमण ॥ अनंत युगावर्तीं किती फिरणे ॥ त्या माजीं प्रमाण बहात्तर युग संख्या ॥ ७३ ॥ गजारूढ मातें मेदिनीपती ॥ कांहीं दिवस संभ्रमेसीं मिरविती ॥ दुर्मदांध होवोन दुरोक्तीं फिरविती ॥ निंदा कुटिळोक्तीं करिती समदर्शना ॥ ७४ ॥ असो हे नृप स्वधर्मीं भ्रष्ट ॥ झाल्या नंतरें महादारिद्य ॥ पातल्या विभक्त नष्टांसीं त्यजोन स्पष्ट ॥ बद्रिकाश्रमासीं कीं त्वां जावें ॥ ७५ ॥ असो ते बोलण्याचे बोल सखोल ॥ तुजविण मानिजे सर्व फोल ॥ तव संगती अमोल ॥ होऊन सच्चिदानंद डोलतसे ॥ ७६ ॥ त्रैलोकींचें अधिपत्य ॥ अंगीं असोन मजलागीं निमित्य ॥ ठेविसी जावयाचें अगत्य ॥ काय कारण सांगपां ॥ ७७ ॥ कलंकी अवताराचें दाखवी चिन्ह ॥ धरावें खड्ग विकोशवर्ण ॥ दक्षिणाधिपत्य दक्षिणानन ॥ हयवाहना दैत्य दलभंजना ॥ ७८ ॥ दक्ष दिग्वधु वरानना ॥ ठेऊन पूर्वेसीं देहुंड्याचरणा ॥ दावीं विश्वा धर्माचरणा ॥ दीनोद्धारणा दिनानाथा ॥ ७९ ॥ करवीरावरी दृष्टिसारी ॥ ठेऊन असावें हिमकेदारी ॥ मजला रक्षावया दिवाशार्वरी ॥ दक्षिणकरींशस्त्र धरावें ॥ ८० ॥ तूं केव्हां जासी बद्रिकाश्रमासीं ॥ तरी मींही येतें समागमेंसी ॥ तुजवीण हे दक्षिण परदेशी ॥ कवण रक्षिल मजला ॥ ८१ ॥ कमल विमलांबुजनयना ॥ ह्मणे नाथा मुनिमानसरंजना ॥ अकारादिक्षकार स्वरव्यंजना ॥ रक्तभोज गंजना अवधारीं ॥ ८२ ॥

अष्टगंधाब्ज प्रियकरावा केशराजी ॥ रत्नागिरीसीं झाल्या तुझीं राजी ॥ तरीच मी जाईन करवीराजी ॥ तुह्मीं
रत्नागिरीवरीं विराजीत असावें ॥ ८३ ॥ आपण राज्य करावें रत्नागिरीवरी ॥ भरतखंडाग्रीं दक्षिणोत्तरीं ॥ पूर्व
पश्चिम दिशाचत्वारी ॥ तव आज्ञा वरदोत्तरीं मानिती ॥ ८४ ॥ मीं तुझीच योगमाया आज्ञांकित ॥ हें त्रिवारो-
त्तर मानिजे शाश्वत ॥ भक्तांचे पुरवोनियां मनोरथ ॥ हरिनामध्वज उभारीं रत्नागिरीं ॥ ८५ ॥ त्रिभुवनींचि
भूसुरवर ॥ घेवोन थाट निशाणाचे भार ॥ ढोल दमामे मंगळतुरे ॥ समारंभेसीं आवडी येती ॥ ८६ ॥ चांगभ-
ल्याचा जयजयकार ॥ भक्तमिळोन करिती अपार ॥ शुक्लपक्ष मधुमास वसंत कुसुमाकर ॥ पर्व पौर्णिमेचें तया दि
नीं ॥ ८७ ॥ तूं भक्ताभिमानाचा बडिवार ॥ मज बहु सांगसी सविस्तार ॥ करावया दीनपतितोद्धार ॥ अव
तरसी युगायुगीं ॥ ८८ ॥ हरावया भक्तांच्या संसारश्रमा ॥ ह्मणोन सोडिलें बद्रिकाश्रमा ॥ तूं गेलिया निजा
श्रमा ॥ मग भक्तांच्या श्रमासीं कवणें हरावें ॥ ८९ ॥ सारांश गा हिमकेदारा ॥ उदास न करावें निजांतरा ॥
राज्य करावें रणरंगधीरा ॥ श्रीरत्नाचळीं प्रतापें ॥ ९० ॥ तुझें न भंगीं मीं आज्ञा वचन ॥ ह्मणोन दिधलें ध्रुव
प्रमाण ॥ ऐकोन ऐसें हास्य वदनें ॥ सन्मानिली श्रीलक्ष्मीसीं ॥ ९१ ॥ राजोपचारीं करोन पूजा ॥ आधीं
पूजिली अष्टभुजा ॥ जी चिन्मात्रिका प्रणव बीजा ॥ पावक तेजा चोपडाई ॥ ९२ ॥ जयकोटि चंद्रार्क मय-
संते ॥ जय पौगंडऋषे मानसहंसे ॥ जय विमलांबुज कराब्ज विकोशे ॥ रत्नासुर विध्वंस भरतखंडाग्रीं ॥ ९३
॥ तुझी आज्ञा घेवोन शिरीं ॥ त्रिशतमुखींचे विधिहरहरी ॥ ज्योतिस्वरूप हा त्रिगुणावतारी ॥ विमलांबुजक-
रीं त्वां जन्मविला ॥९४॥ तवाज्ञेचा हा नाथ गिरिवर ॥ वेष्टित भैरवशक्ति तरुवर ॥ नवनाथ षोडश सिद्धशाखा प्रसर

॥ संग्राम फळभारीं लखिन्नला ॥ ९५ ॥ कीं तव कृपाकटाक्षांचा शर ॥ सोडितां पौगंड ऋषेश्वर ॥ रक्तभोज रत्ना
सुर ह्मैषासुर ॥ घोर संग्रामीं वधियेले ॥ ९६ ॥ यास्तव जयलक्ष्मीसीं जयजयकारीं ॥ सुरवर मिळाले विजयद्वारीं
॥ शक्ति दळेसीं भैरवभारीं ॥ रत्नागिरिकंदरीं गजरझाला ॥ ९७ ॥ श्रीमहालक्ष्मी करवीर वासिनी ॥ चर्पटेसीं ना-
थ वस्त्राभरणीं ॥ पूजोनी विजया दशमीसीं दिव्य सुमनीं ॥ शक्ति परिवारीं गौरविली ॥ ९८ ॥ सिंहासनारूढ देवी
॥ लक्ष्मीनें पूजिली शांभवी ॥ खळनाथ जैसा द्वादशरवी ॥ कीं द्वादश लिंगांकित अर्चनीं ॥ ९९ ॥ ऐसा पूजोन र-
वळनाथ ॥ आनंद भरला ब्रह्मांडांत ॥ तंव पातल्या अकस्मात ॥ जळसेना आणि चंद्रसेना ॥ २०० ॥ महापतिव्रता
या दोघीजणी ॥ स्वयें पातल्या स्वात्मनिवेदनीं ॥ महापूजेच्या अर्चनीं ॥ ज्योतिस्वरूपीं मिळतील या ॥ १ ॥ या दो-
घी पतिव्रतेसाठीं ॥ उत्तरेहूनि नाथ पातला भेटी ॥ त्यासीं मुक्ति देवोन रत्नाद्रिदरकुटीं ॥ रहिवास केला दिनानाथें ॥
॥ २ ॥ यांचें पवित्र आख्यान ॥ बाविसावे अध्यायीं करावें श्रवण ॥ संत श्रोतीं गुणिजनें ॥ कथानुसंधान परिसावें ॥
॥ ३ ॥ इतिश्रीकेदार विजय निधी ॥ कमला घेवोन अष्टमासिद्धी ॥ केदार स्थापिला राज्यपदीं ॥ श्रीरत्नागिरीवरीं सु
खरोत्साहीं ॥ ४ ॥ रत्नासुर वधोत्सवकृत रक्तभोज दमनें ॥ हे कीर्तिघोष प्रसिद्ध घनगर्जनें ॥ परिसोन पातले महा
नुभवजन ॥ चातक वर्णी अपार ॥ ५ ॥ नवनाथ वरद शिखामणी ॥ चिद्गगनींचा जो सुधाकर मणी ॥ रत्नागिरीं उद-
य पाहोनी ॥ हरिजन चकोरा आनंद झाला ॥ ६ ॥ कीं हा केदार विजय तरुवर ॥ दृष्टांतरूपें फुल्लाभार ॥ हरिनामीं फ
ळला घनघोष अपार ॥ ध्यावा एकविशंती अध्याय गोडहा ॥ २०७ ॥ इतिश्रीकेदारविजय करवीरपद्मपुराणे केदार
खंडविरचितायां काशीखंड यथार्थ करवीर कोल्हासुरवधोन्नामएकविंशतितमोध्यायः ॥ २१ ॥ ॥ ओं० २०७ ॥

केदार ॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ कामांकुश कल्हार आयुधधरा ॥ काम क्रोध आकर्षक कुंजरा ॥ विजय.
कास्मीरदुकुल परिधानकरा ॥ कामनिष्कामीं वरदायका ॥ १ ॥ काया वाचा मानस विवरा ॥ कांहीं मीं नेणेंचि
१३० गीर्वाण गिरा ॥ काळसार्थक करीं केदारा ॥ काळचक्राग्नि निवारीं ॥ २ ॥ काषायवास पितांबर धरा ॥ कार्या कार- अ.२२
ण ज्योतिर्मय शरीरा ॥ कांचन सर्वजना प्रियकरा ॥ काळचक्राग्नि प्रवर्तका ॥ ३ ॥ खाणोन असुरचमू समूळ गि
डदा ॥ खड्गी घालोन समरीं किडदा ॥ खाणोन पाताळीं करवीर सुत शतहिडदा ॥ खाणी चत्वारीं बिडिदा ऐसें
करिसीं ॥ ४ ॥ गांधर्वगायनीं निगमागमा ॥ गाती गीतगोविंद प्रियकर सुगमा ॥ गाती नारद तुंबर प्रेमा ॥ गा
र होवोन तिष्ठसीउभा ॥ ५ ॥ घालिसी माया भ्रांती जनीं ॥ घाबऱ्या करिसी व्रज गौळणी ॥ घागरी फोडोन
दहीं दूध लोणीं ॥ घालिसी वदनीं सर्वही ॥ ६ ॥ नागफणीं फणाग्रीवरीं नटणें ॥ नादें मुरलीच्या गोधना वळणें
॥ नाना विलासी गोपी मोहनें ॥ नादब्रह्मीं भुलविला गोपीकदंब ॥ ७ ॥ चांगला भला हा पूर्ण कामीं ॥ चांग
लाभला आमुतें स्वधर्मीं ॥ चांगभला बोलतां होय अजन्मी ॥ चारीभुजायुध मंडिता ॥ ८ ॥ छाया शरीरीं साक्षी
भूता ॥ छाटी वशिष्ठाची कृतोप सविता ॥ छांदस योगमाया चेष्टिता ॥ छंदांसियस्य पर्णानि ॥ ९ ॥ जांबुद्वीपा
माजी भरतखंडीं ॥ जाज्वल दैत्यदुरित खंडी ॥ जाळिला कामाक्ष करवीर योगदंडीं ॥ जाग्रति स्वप्नसुषुप्ति व्यति
रिक्ता ॥ १० ॥ झांकिला नव झांकसी रविप्रकाशा ॥ झारा निगमागमार्थ सौरसा ॥ झापाळ वटबीजांकुर महदा
काशा ॥ झाड खंडीं न सापडसी ॥ ११ ॥ यावच्चंद्र द्विव्यकिरणा ॥ या विधि हरहरीं अपर्णारमणा ॥ याग योग १३०
सिध्यर्थ संस्थापना ॥ याजोपयाज ऋषेश्वर वरदा ॥ १२ ॥ टाळिसी भक्तांच्या महत्संकटा ॥ टाळी वाजवितां ह-


अध्याय २२वा.
लक्ष्मीनें श्रीकेदारास राज्याभिषेक केला.
रत्नासुर व रत्नभोज ह्यांच्या स्त्रिया सती जातात.

रिकीर्तनीं हर्ष मोठा ॥ टाकिल्या विषमता हरिनामीं नसेचि तोटा ॥ टाणें टोणियासी विघडिसी ॥ १३ ॥ नारद
तुंबर सनत्सुजात वरदा ॥ नादगळा ल्हदयीं गुंपी पदा ॥ नाना स्वरूपीं नटसी सदां ॥ न्यायीं पंडित समदर्शनीं
प्रियकरा ॥ १४ ॥ ढाळिती रत्नदंडी चामर ॥ ढवलरंगी सुमनोहर ॥ ढाल फिरंग त्रिशुल धरिलाकरें ॥ ढाणकेली
दैत्यांची ॥ १५ ॥ डांभिक भजनीं उपहासकरा ॥ डाकिनी तीर्थी धाडोन धरी लिंगाकारा ॥ डाव घावीं दैत्य सं-
हार करा ॥ डमरत्रिशूल खड्गधारिया ॥ १६ ॥ तारावया भक्तजनांसीं ॥ तात्पर्यातें अवतरलासी ॥ तापत्रय ल्हद-
यींचें निववासी ॥ तावन्मात्रें तव स्मरणीं ॥ १७ ॥ स्थावर जंगमादि मेरु आकारा ॥ स्थापिलीं सुरपदीं ज्योति-
र्लिंगें बारा ॥ था थै थौं गीत गान प्रियकरा ॥ थांग नलगे तवगुण कथनीं गातां ॥ १८ ॥ दानवांतक दनुज द-
मना ॥ दहा अवतारीया श्रेष्ठ हयवाहना ॥ दारिद्य दुःखार्णववारीं घटनंदना ॥ दाविसी विश्वरूप यशोदेशी ॥ १९
॥ धाता हरहरि स्वावतारा ॥ धांवसी द्रौपदीचे कैवारा ॥ धाले ऋषि जेवितां आहारा ॥ धाकें पळविसी नकळतां ॥
॥ २० ॥ नागर नटनाटक मलयागरा ॥ नाम सुधाकर भक्त मानस चकोरा ॥ नामगुण रहित परात्परा
नाशिवंत काया अजरामर वरदा ॥ २१ ॥ पापताप संताप हारका ॥ पावनकरिसी चतुर्दश लोकां ॥ पांवा वाजवोन भुल-
विसी राधिका ॥ पाहतां तटस्थ झालेसुरनर भूचर ॥ २२ ॥ फांसाटाकोन हरविसी डावा ॥ फार अपराधि करोनकौरवां ॥
फाल्गुनाकरवीं वधिलें सर्वां ॥ फावल्यासारखी करिसी करणी ॥ २३ ॥ बाळदिवाकर मंडितचरणा ॥ बाळाबगळा उपास
काचरणा ॥ बाराज्योतिर्लिंगाक्षीं अवतारधारणा ॥ बाणासुरभुजखंडणा अनिरुद्धवियोगें ॥ २४ ॥ भास्करवंशज भरताग्र
जा ॥ भारतींसमुद्रीं नौकाविजयध्वजा । भाताअक्षयीं देवोनभीमानुजा । भारफेडिसी महीचा शतंभीष्म ॥ २५ ॥ यालागीं

अवतरलासी गोकुळीया ॥ याव्रजांगना भूलवोनियां ॥ याति अयाति अयाचित सदया ॥ यास्तव श्रृंगार कारका ॥ २६॥ राजीवलोचना विराजिता ॥ राजी परम रत्नादि अजिता ॥ राजी करितां करविराजिता ॥ राज्या बसविसी स्वराज्यकारका ॥ २७ ॥ मातंग मननोत्कट झैषासुर दमना ॥ मांदार रत्नखचित सिंहासना ॥ माया मानस वेषा हव्यवाहना ॥ मन्मथ लोकेश करुणानिधि ॥ २८ ॥ वातांबु पर्णाशनीं त्हदय निवासा ॥ वारिजाक्षी प्रियमानसहंसा ॥ वाल्मीक त्हदयीं शतकोटि मंत्रप्रकाशा ॥ वासरमणी वंशजनिकेतना ॥ २९ ॥ साचारी चतुर्दशमुद्रा प्रियकरा ॥ सातवें अब्धीं मंदरोद्धरा ॥ साम दाम भेद दंड प्रियकरा ॥ सायासीं अयासी शिक्षाकरिसीं ॥ ३० ॥ लाक्षागृहीं खनकप्रेरक विधी ॥ लाज राखिलीसी छळितां द्रौपदी ॥ लाविला तव ध्यास पदोपदीं ॥ लाभलासी आह्मांसीं हिमकेदारी ॥ ३१ ॥ शाखा आश्वलायन तुरंगमा ॥ शाण्णवभेद यजुः सामअथर्वण आगमा ॥ शारदे पौर्णमेसी षोडश सहस्त्ररमा ॥ शाश्वत प्रिय लीन झाल्या तवचरणीं ॥ ३२ ॥ लांगूल आकर्षविसी पुष्कर विमाना ॥ लाभ देसी भक्तांसी कल्पद्रुम सुगमा ॥ लाविसी विश्वासीं भक्तजना ॥ लहान स्थूल दीर्घ सूक्ष्म व्यापका ॥ ३३ ॥ हरिहर ब्रह्मारवाग्नि अवतारा ॥ हरिलें रक्तभोजादि रत्नासुरा ॥ हरिनामाचा घोष नगारा ॥ हरिखें वाजविसी चैत्रीं रत्नागिरीवरीं ॥ ३४ ॥ अकार क्षकार स्वरव्यंजना ॥ दीर्घ ऱ्हस्व पदादि रचना ॥ काना वेलांटी अर्धमात्रा उच्चारणा ॥ अर्थांतर विवर्णा स्वात्मबोधका ॥ ३५ ॥ क्षरांबुधीं वदत केदारविजया ॥ क्षालन पापासी होय श्रवणार्थीया ॥ क्षात्रांबरींच्या तरुण अरुण उदया ॥ क्षंतमपराधी त्रिजगत्पते ॥ ३६ ॥ क्षराक्षरीं स्वर भूषण ॥ गीर्वाण प्राकृतीं संबोधन ॥ वदती श्रीनाथ निरंजन ॥ तैसेंचि साक्षात्कारीं लिहितसे यदर्थी ॥ ३७ ॥

शुद्धाशुद्धीं भेदीं अभेदा ॥ परोक्ष अपरोक्ष विज्ञानपदा ॥ विचरितार्थ विवरी नाथशुभदा ॥ बत्तिसाक्षरीं सुमनोह-
रीं ॥ ३८ ॥ ऐसा बत्तीसाक्षरीं कलशकुमर ॥ सुमनोहर गुंफिले सुमनाकार ॥ कंठीं घालितां संत मुनिवर ॥ क-
थानुसंधान परिमळ सेवा ॥ ३९ ॥ ऐसीं कलशोद्भवासी विनियोत्तरा ॥ लोपामुद्रा ह्मणे हे मुनिवरा ॥ सर्वे घेवोन भै
रवभारा ॥ गेला करवीरासी दक्षिणपती ॥ ४० ॥ शक्ति दीपिका धरोन हातीं ॥ दैत्य वधिले महायत्नीं ॥ को-
ल्हासुराचे त्हदयांतूनि दीप्ती ॥ चिदांश तेजें निघाली ॥ ४१ ॥ कोल्हासुर मस्तक पडतां धरणीं ॥ तेज निघालें
मार्तंड किरणीं ॥ कीं ते अनंत उगवले वासरमणी ॥ प्रकाशें महीसी व्यापिलें ॥ ४२ ॥ करवीर आणि कोल्हासुर ॥
हे पुण्यश्लोक द्वय शरीर ॥ ह्मणोनि प्रकाश महीअंबर ॥ एक मुहूर्त पर्यंत व्यापिला ॥ ४३ ॥ ऐसें तेज महद्भुत ॥
प्रवेशलें श्रीचे मुखांत ॥ कोल्हासुराचें तप सामर्थ्य ॥ गयासुरा सारखें गमतसे ॥ ४४ ॥ कीं काकविष्टेंत झाला
पिंपळ ॥ तयासी कोणी ह्मणावें अमंगळ ॥ मर्कटवंशी हनुमंतबाळ ॥ त्यासी गोळांगुळ कैसें ह्मणावें ॥ ४५ ॥
तैसेंचि कोल्हासुर हा करवीर ॥ तिसरा पुण्यवंत गयासुर ॥ देह झिजविला परोपकार ॥ बाहात्तरयुगीं अद्यापी
॥ ४६ ॥ ऐसियापरी करवीरोद्धारा ॥ करोन सौख्य दिधलें ऋषिगोभूवरां ॥ वाजवी दैत्यावरीं नगारा ॥ रत्नागि
रिवरासी नाथआला ॥ ४७ ॥ लक्ष्मी आली तयापाठीं ॥ नाथासी बोधोन सारगोष्टी ॥ बैसविला रत्नाद्रिराज्यपटीं
॥ खळनाथासीं लक्ष्मीनें ॥ ४८ ॥ हे एकविंशति अध्यायींची कथा ॥ तुवां परिसविली प्राणनाथा ॥ पुढील वि-
स्तारवदतां ॥ जेणें श्रोता वक्ता समाधान ॥ ४९ ॥ परिसोन कांतेची संतोषवाणी ॥ कथा परिसेहो जीर्णपुराणीं
॥ श्रवण करितसे अगस्तिराणी ॥ भविष्योत्तरींची अवधारीं ॥ ५० ॥ रत्नाचळीं रत्नाभरणीं ॥ रत्नकोंदणीं दि-

व्य सिंहासनीं ॥ रत्नोज्वलें चंद्रार्ककिरणीं ॥ रवळेश्वरासीं अभिषेकिलें ॥ ५१ ॥ स्तवन करिती सुरवर ॥ कांचनपुष्पें वर्षती अपार ॥ विजयी झाला दक्षिणकेदार ॥ भरतखंडाग्रीं रत्नागिरीवरीं ॥ ५२ ॥ श्रावणशुद्ध षष्ठीसी ॥ करिती शक्ति अर्चनेंसी ॥ शुकसनकादि ब्रह्मर्षी ॥ ऐसियां पातली नवलपरी ॥ ५३ ॥ रत्नासुराची जे वरांगना ॥ जयेचें नाम चंद्रसेना ॥ रक्तभोजाची ही जळसेना ॥ त्यादोघी महा पतिव्रता पातल्या ॥ ५४ ॥ जैसी शुद्धशांति कीं विरक्ती ॥ कीं योगेश्वरासी वरी शांती ॥ तैशा पातल्या ह्या द्वयशक्ती ॥ चंद्रसेनेसीं जळसेना ॥ ५५ ॥ चंद्रसेनेहुनि नवलपरी ॥ जळसेना लावण्यलहरी ॥ स्वदेहीं जळ झाली ते अवसरीं ॥ कनकपात्रीं तें ऐका ॥ ५६ ॥ अष्टांगांचीं अष्टगंधें ॥ झालीं रक्तोद्भवाची स्त्री संबंधें ॥ एकत्र करोन जळसेना सुगंधें ॥ अष्टगंधाद्यें मिसळली ॥ ॥ ५७ ॥ तो चंद्रसेनेचा ज्येष्ठदेवर ॥ रक्तभोज अष्टगंधाकार ॥ नाथें केला वरदोत्तर ॥ जळसेनेसाठीं पंडितहो ॥ ॥ ५८ ॥ नामासारखी जयाची करणी ॥ कीं प्रभावेष्टित वासरमणी ॥ कीं पुष्पजैसें सुगंधवर्णी ॥ किंवा षोडश चंद्रमा ॥ ५९ ॥ तैसी रक्तोद्भवाची राणी ॥ जळसेना स्वदेहीं सुगंधपर्णी ॥ झाली देखोन सत्वगुणी ॥ अक्षयीं सुवासिनी पतिसंगें ॥ ६० ॥ हें चंद्रसेनेनें देखोन नयनीं ॥ सुवर्णपिंपळाचे पर्णद्रोणीं ॥ भरिलें चंद्रसेनेचें सुगंध पाणी ॥ त्रिशतसाठीं द्रोणीं आवडीनें ॥ ६१ ॥ कनकपात्रीं अष्टगंध ॥ कालवोन जळसेना जळसुगंध ॥ परिमळ द्रव्यें जीं रक्तोद्भवीं अगाध ॥ तींच चंद्रसेनेनें घेतलीं ॥ ६२ ॥ रत्नासुर मुगुटींचीं रत्नें त्रिशतसाठी ॥ नाथांवरें दिव्य झाली विषकताटीं ॥ जळसेना जळ झाली कांचनघटीं ॥ तें घेवोनि पातली शक्ति दर्शना ॥ ६३ ॥ त्रिशतसाठीं शमीचीं पत्रें ॥ तितकेचि त्रिगुण दुर्वांकुर ॥ त्रिशतसाठीं तुंवळ अखंडाकार ॥ घेवोनशक्ति पूजोन वंदि-

ली ॥ ६४ ॥ जयजय वो अनादिशक्ती ॥ विश्वव्यापके व्यक्ताव्यक्तीं ॥ भावें पूजितां नवविधभक्तीं ॥ ॐकारबी-
जाक्षरीं आदरें ॥ ६५ ॥ तुझिया नेत्रकृपाकटाक्षीं ॥ विश्वकुटुंब पाळिसी लक्षानुलक्षी ॥ तुज वांचून पक्षी संरक्षणीं
॥ ब्रह्मांडवृक्षीं अलेना ॥ ६६ ॥ ऐसें मानसपूजेचे अवसरीं ॥ पूजिली चर्पटअंबा खेचरी ॥ तनमनधनेसीं निवेद
न करी ॥ ते नवलपरी परिसावी ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्तोमितां परमां भक्तिं चंद्रसेना सुतेजसं ॥ स्वात्मनिवे
दनं त्वत्पद्म मालातंतु त्रिंशतसाठी आकारजाः ॥ १ ॥ कोटिचंद्रार्क सम प्रभान् चंद्रसेना करितां सतीन् ॥ रक्ता
सुर जीवन्मुक्त देहीमान् वरदाईनी ॥ २ ॥ टीका ॥ ॥ चंद्रसेना करितां स्तवन ॥ अष्टभावीं उपरमोन ॥ देहझा-
लां तंतुवर्ण ॥ कोटिचंद्रार्क कांतीसी ॥ ६८ ॥ कोटीचंद्रार्क एकत्र उगवले ॥ तैसे सतीचे देहभाव झाले ॥ देह-
तंतु आकारले ॥ शक्तिअर्चनार्थी श्रावणषष्ठीतें ॥ ६९ ॥ जैसें कोल्हासुराचें तेज अंबरीं भरलें ॥ तें लक्ष्मीमुखांत
प्रवेशलें ॥ तैसें चंद्रसेनेचें तेज कोंदलें ॥ तोंपावेतों अंगिकारिलें चर्पट अंबेनें ॥ ७० ॥ जळसेना झाली सुगंध
पाणी ॥ चंद्रसेना झाली पोंवतें चंद्रार्ककिरणीं ॥ ऐसें पाहोन त्रिदशगणीं ॥ शक्तिअर्चनीं तोषविली ॥ ७१ ॥ ध
न्य उभयतांचें जन्मांतर ॥ चंद्रसेना त्रिशतसाठीं पोंवतेंपदर ॥ तैसीच जळसेना झाली नीर ॥ तेंचि हें पोंवतें
शोभे श्रीदेवीवरी ॥ ७२ ॥ जळसेना झाली सुगंधजळा ॥ पोंवतें अवगली चंद्रसेना माळा ॥ ते घातली जगदं-
बेच्या गळां ॥ जयजयकारीं सुरवरवृंदीं ॥ ७३ ॥ जळसेनेच्या जळें करूनी ॥ चंद्रसेना पोंवतें भिजवोनी ॥ षो-
डशोपचारीं पूजा करोनी ॥ चतुःषष्ठि कला पात्रांसीं अर्पिली ॥ ७४ ॥ तें विशाळस्वरूपी चर्पटअंबा ॥ रत्नासुर
४५ वधांतीं चंद्रार्कबिंबा ॥ झाला प्रकाश अविलंबा ॥ दैदिप्यमानीं अर्धरजनीं ॥ ७५ ॥ श्रावणशुद्ध षष्ठीसीं ॥ पूजा

करिती अर्धनिशीं ॥ शुचिर्भूत मानस उपवासीं ॥ ७६ ॥ तीनशें साठी दुर्वांकुर ॥ तितुकींचि शमीपत्रें सुंदर ॥ रक्तचंदन अष्टगंधादि देवद्वार ॥ सुमनोहर अर्चिती ॥ ७७ ॥ सुवर्णपिंपळाचीं पर्णें ॥ अणोनि त्रिशत करोन द्रों ण ॥ त्यांत जळसेनेचें घालोन जीवन ॥ अष्टगंधार्चन करावें ॥ ७८ ॥ त्रिशतसाठी आरत्या करोनी ॥ तीनशेंसा ठी रत्नपूजा बांधोनी ॥ तीनशेंसाठी सुवर्ण पर्णद्रोणीं ॥ जळसेनाजीवनीं भरियेलें ॥ ७९ ॥ ह्मैषासुर मातंगमथ नी ॥ अभिषेकिली जळसेनेच्या जीवनीं ॥ विधिपूर्वक पूजाकरोनी ॥ अमरेंद्र गंधर्व स्तवन करिती ॥ ८० ॥ जं- गीढोलाची अखंड ध्वनी ॥ अनेकवाद्यघोष न माये गगनीं ॥ तैं चंद्रप्रकाशपोंवतें घेवोनी ॥ सुरवरगणीं निजह- स्तीं ॥ ८१ ॥ त्रिदशगणादि चतुःषष्ठी ॥ यक्षिणी प्रसिद्ध अंत्रपीठीं ॥ उदय उदय ह्मणोन कंठीं ॥ चर्पट अंबेच्या घातलें मुनिजनगुणीं ॥ ८२ ॥ तशांत झाली रत्नासुर मातंगमथनी ॥ संतोषली अष्टगंधार्चनीं ॥ ह्मणे परिसावें सुरवरगणीं ॥ वाक्य माझें यथार्थ ॥ ८३ ॥ रक्तभोज उद्धरिला अष्टगंधें ॥ जळसेना पावन झाली जळसुगंधें ॥ एकपिंड ह्मणोन पूर्वसंबंधें ॥ जळहोतां सुगंधपर्णी उद्धारिली ॥ ८४ ॥ रत्नासुराच्या तामसगुणीं ॥ गौरविला ना- थें वरदवाणीं ॥ पशुमस्तक तुजलागीं जनीं ॥ समारंभेसीं देती महाजन ॥ ८५ ॥ सजीवमनुष्याचें रक्त ॥ स्वल्प भरतां तव दंतांत ॥ तूं तृप्त होसी आनंदभरित ॥ कलियुगीं प्रथमचरणारंभीं ॥ ८६ ॥ बाळा बगळामुखी वैरा- ळी ॥ कोळिकांच्या उच्छिष्ठ चांडाळी ॥ शकटभैरी बगाडी पशुमस्तकाचा बळी ॥ देती हे भूमंडळीं मात प्रख्यात ॥ ८७ ॥ लोहकंटक विकटवर्ण ॥ तेचि रत्नासुराचे उदरीं कंटकान्वय दशन ॥ नाथासीं महाजनीं नवस करोन ॥ समारंभेसीं गळ टोंचिती ॥ ८८ ॥ ह्मणोन बगाड घ्यावयालागीं ॥ कारण प्रसिद्ध हें कलियुगीं ॥ नाथा सन्मु-

ख दक्षिणभागीं ॥ रत्नासुरासीं मुक्ति दिधली ॥ ८९ ॥ भक्तजनासीं जो नवस आवडे ॥ नाथ पुरवित वाडेकोडें ॥ ह्मणोन घेती गुगुळबगाडें ॥ हें प्रत्यक्ष जन निवाडे पाहाती ॥ ९० ॥ असो ही अनंतभक्ताची नवसकरणी ॥ मायावेषी लीलावतारी खड्गपाणी ॥ प्रश्न करितसे अगस्तिराणी ॥ कलशोद्भवातें तें ऐका ॥ ९१ ॥ लोपामुद्रा ह्मणे हे अगस्तिऋषी ॥ उत्तरमान साहून विशेषीं ॥ दक्षिणप्रयाग करवीरकाशी ॥ उत्तरद्वारीं रत्नाद्रीं सुवर्णपिंपळ असे ॥ ९२ ॥ तो सुवर्णपिंपळ कोठें असे ॥ हा संदेह धरिला मम मानसें ॥ हा कथार्थ अंबरींचंडाशें ॥ श्रवण मंदिरीं प्रकाशवी ॥ ९३ ॥ ऐकोन कांतेची अमलवाणी ॥ कथा सांगे अगस्तिमुनी ॥ रामक्षेत्रीं दंडकारण्यीं ॥ दंडनाथ तुज दाखविला जो ॥ ९४ ॥ दंडनाथाचे पर्वतोदरीं ॥ सुवर्णपिंपळ जटाधारी ॥ जैसी वाराणशी मोक्षपूरी ॥ सुवर्णाचा वटपिंपळ ॥ ९५ ॥ जंबुद्वीपामाजीं भरतखंडांतरीं ॥ पंचगंगेंच्या उत्तरतीरीं ॥ राज्य करित बद्रिविहारी ॥ सुरवरपरिवारीं भैरवाकृति जोंउगवला ॥ ९६ ॥ रत्नासुरवधोत्सव दनुजदमन ॥ समरीं मर्दोन रक्तभोजन ॥ करवीरीं लक्ष्मीसीं स्थापोन ॥ रत्नागिरिवरासीं नाथ आला ९७ ॥ लक्ष्मीसीं ह्मणे जगदंबा ॥ रत्नागिरिची अभिनव शोभा ॥ देखोन हें स्थळ राक्षसीरत्नप्रभा ॥ येथें इच्छिती तरीच वसवया ॥ ९८ ॥ काळभैरवासीं दीर्घायुषी ॥ मार्कंडेय महातपोरासी ॥ वदत कथा विस्तारेंसीं ॥ तें चतुरीं राजहंसीं पुढें परिसावें ॥ ९९ ॥ असो श्रावणशुद्ध षष्ठीसी ॥ शक्तिअर्चन ब्रह्मर्षि ॥ करोन सुरवरीं अर्धनिशीं ॥ जयजय कारीं गर्जती ॥ १०० ॥ राज्यपटीं बैसल्या नाथ ॥ पुरविले देवीचे मनोरथ ॥ तें कमळभैरवें दंडवत ॥ श्रीदक्षिणपतीसीं घातला ॥ १ ॥ नमस्कारोन हिमकेदारा ॥ दक्षिणायनीं प्रतापदिनकरा ॥ कमळभैरवह्मणे विनयोत्तरा ॥ परिसावेंगा दीनबंधो ॥ २ ॥ चंद्रसेनेचा सहोदर ॥ एकाक्षदेशींचा जो नृपव-

र ॥ खेचर नामा निशाचर ॥ पुष्करविमानीं जो वधियेला ॥ ३ ॥ त्याच्या पूर्वजान्वयाची करणी ॥ विदित करावी आमुच्या श्रवणीं ॥ एकादशी कवणाची नंदिनी ॥ कवण वंशीं देशीं जन्म झाला ॥ ४ ॥ रत्नासुर वधांतीं आह्मां कारणे ॥ एकादशीचें आख्यान ॥ सांगतों ह्मणोन वदला वचन ॥ सोळावेअध्यायीं अठरा श्लोकीं ॥ ५ ॥ परिसोन कमळभैरवाचें उत्तर ॥ एकादशीचें आख्यानविस्तार ॥ वदेल दक्षिणकेदार ॥ तें त्रिंशती अध्यायीं परिसावें ॥ ६ ॥ इतिश्रीकेदारविजयतारू ॥ श्रवणार्थी पावें भवसिंधु पारू ॥ साहित्य रत्नांचा सौदागरू ॥ हरिनामाचा मलयागरू संतार्जवी ॥ ७ ॥ कीं हे केदारविजयवल्ली ॥ हरिनामें सुरवाडली ॥ श्रवणमंडपीं अमुप फुलली ॥ व्यासघनरसें भरली अखंड ॥ ८ ॥ ते प्रश्नाच्या सूर्य किरणीं मुहुरली ॥ दृष्टांतरूपीं पाल्हाळिली ॥ संतचरणीं लवोन फळासीं आली ॥ हरिनामसुधा सेवोत अध्याय बेवीसावा गोडहा ॥ १०९ ॥ इतिश्रीकेदारविजय ॥ श्रीरत्नागिरिविराजित ॥ सिंहासनारूढ श्रीनाथ शक्तिअर्चन चंद्रसेना जळसेना भविष्योत्तर केदारखंड विरचितायां ॥ द्वाविंशतितमोध्यायः ॥ २२ ॥ श्रीनाथार्पण मस्तु ॥ ओंव्या ॥ १०९ ॥ ॥ ॥


अध्याय २३वा
मृदमीन्यदैत्य
एकादशीदेवी

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीरवळनाथायनमः ॥ जय पंचगंगातट विहारा ॥ पंचशतकोटिमही विस्तीर्ण त्त्हृदयस्थ प्रखरा ॥ पंचक प्रंचवीस आकारा ॥ पस्तीस पात्रांतरीं व्यापका ॥ १ ॥ गंगाधरा गौरीरमणा ॥ गर्गाचार्य दीर्घायु मनरंजना ॥ गंधमाल्यांबरधर वसना ॥ गंभीर वाद्यध्वनी प्रियकरा ॥ २ ॥ कमलदलाक्ष अनंत लोचना ॥ कमलप्रियमानस मोहना ॥ कर्नाटक नटणीय संगीत रचना ॥ कृतयुगादिचत्वारी धृतावतारा ॥ ३ ॥ दक्षिण दिग्विधू वरानना ॥ दक्षिणायनीं दैत्यदमना ॥ दैदीप्यमान रत्नाभरणा ॥ दिव्यसिंहासनादि ईश्वरा ॥ ४ ॥ रत्नोद्भासित रत्नांकिता ॥ रत्नकोंदणीं रत्नखचिता ॥ रत्नसिंहासनीं मंडिता ॥ रवळनाथा दक्षिणमुखीं ॥ ५ ॥ ऐसा अनादिप्रकृतीश्वर ॥ सिंहासनीं उपविष्ट हिमकेदार ॥ पृष्ठभागीं काळभैरव रणधीर ॥ अष्टभैरव दोनी भागीं दोहींकडे ॥ ६ ॥ श्रीकरवीरपूर निवासिनी ॥ श्रीरवळनाथासीं सिंहासनीं ॥ अभिषेकिलें मंगळध्वनीं ॥ जळसेनेच्या सुगंध जीवनीं न्हाणिला ॥ ७ ॥ अष्टगंधीं मिसळली जळसेना ॥ पोंवतें झाली चंद्रसेना ॥ तें केदारकंठीं घालोन अर्चना ॥ सप्तमीसीं सुरनरवरीं अर्चिलें ॥ ८ ॥ सुवर्ण पिंपळाचीं पानें आणोन ॥ त्रिशतसाठी करोन द्रोण ॥ त्यांत जळसेनेचें भरोन जीवन ॥ तीनशें साठी तंडुल दुर्वा ॥ ९ ॥ त्रिशतावरी साठ आरतिया ॥ घेवोन सुरनर किन्नरी जाया ॥ कुरवंडी करोन हरिखें काया ॥ श्रीनाथ पायांवरून बळिहरी ॥ १० ॥ हे बावीस अध्यायाची सुरस कथा ॥ विस्तारीं परिसे संतश्रोता ॥ कमळभैरवासीं होय वदता ॥ श्रीरवळनाथ आवडीनें ॥ ११ ॥ अगस्ति वदत स्वकांतेसी ॥ तें परिसावें सज्जन राज हंसीं ॥ हरिदिनीं मौक्तिकें जागरणेसीं ॥ श्रवणानन कल्पोन सेविजे ॥ ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुरा कल्पक्षये लोकान् कुंभदैत्य महाद्भुतं ॥ मृदमीन्यमहा दैत्यान् हिरण्याक्ष प्रपौत्र-

कं ॥ १ ॥ जितेंद्रियं तपश्चर्यं दिव्यशत संवत्सरं ॥ वृषभध्वज वरंदत्वा त्रैलोक्य वशयं कुरू ॥ २ ॥ मातृ पितृ
रहितं जन्म बाल कौमारीयो नन ॥ शक्तिहस्तें रणें मृत्यु मृदमीन्य समायुधं ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्व कृता
युगाचे अंतीं ॥ कुंभक दैत्याचा वंशज कुमती ॥ मृदमीन्य महाप्रताप मूर्ती ॥ द्वादशार्ककांति जापरी ॥ १३ ॥
पंचकोटि मही विस्तीर्ण ॥ कनकाद्रिशृंग शोभायमान ॥ ज्याच्या एक आज्ञेचा पट परिधान ॥ केला महीनें आ-
वडीसीं ॥ १४ ॥ असो जितेंद्रियें तो तपाचरणीं ॥ आचरला दारुण पंचाग्नि ॥ संवत्सर दहासहस्त्र गणनीं ॥
निराहारी निरोदकी ॥ १५ ॥ ऐसें तीव्र तपाचरणा ॥ पाहोन पातला कैलासराणा ॥ ह्मणेरे हिरण्यक्षप्रपौत्रा नि
धाना ॥ इच्छित कामनेसीं पुरवूं आलों ॥ १६ ॥ परिसोन पशुपतीचें वरदवचन ॥ मृदमीन्यें घातलें लोटांगण
॥ कोणाचे हस्तें नसावें मरण ॥ यक्ष राक्षस देव सुरवरादिक ॥ १७ ॥ स्वसामर्थ्यें त्रिभुवनासीं ॥ एकलेनि जिं-
कावें अनायासीं ॥ मृत्यु नसावा सायासीं ॥ ऐसें वरदान मजदेईं ॥ १८ ॥ ब्रह्मां शंकर आणि हरी ॥ संग्रामीं
कदा मीं नये हारी ॥ युद्धासीं करितां जरी श्रीहरी ॥ मजलागीं न संहारीच कदाकाळीं ॥ १९ ॥ परिसोन मृद-
मीन्याची मात ॥ उत्तर वदे उमाकांत ॥ ह्मणे जे जे दारुण करिती तीव्र तप ॥ ते ते अमरणासीं इच्छिती ॥
॥ २० ॥ दीर्घ न पाहतां विचार ॥ होऊं ह्मणती अजरामर ॥ शुंभ निशुंभादिदशकंधर ॥ दुरोर्कीं तपगर्वीं पाव
ले मरण ॥ २१ ॥ विष्णूसीं आचरितां विरोधधर्मीं ॥ वध पावाल तुह्मीं घोरसंग्रामीं ॥ न जाणतां विष्णुभयाची
ऊर्मी ॥ सहकुळेसीं भस्म व्हाल ॥ २२ ॥ हिरण्याक्षादि हिरण्य कश्यपें ॥ कंस चाणूर भस्मासुरादि साक्षेपें ॥
दंतवक्र शिशुपाळ प्रतापें ॥ हे विष्णुहस्तें मरण पावले ॥ २३ ॥ ऐसे रामकृष्णा अवतार अनंत केले ॥

घेवोन दैत्य मारी वैकुंठपाळ ॥ तारावया सद्भक्त सकळ ॥ अवतार धरी हरि युगायुगीं ॥ २४ ॥ बरें झाले त्या-
चें भविष्यकर्म ॥ तैसा तुझा तपाचा धर्म ॥ असो तूं आजि होवोन सार्वभोम ॥ राज्यकरीं गा चतुर्दशभुवनीं
॥ २५ ॥ जे मायबापाविण जन्मेल कुमरी ॥ तीच तुझा संहार करी ॥ विष्णूसीं विरोध करितां समरीं ॥ शक्तिक
रीं मृत्यु पावसी ॥ २६ ॥ मृदमीन्यदैत्य वरदोत्तरें ॥ ऐसा गौरवोन गौरीहरें ॥ अदृश्य झाला अपर्णावर ॥ कप-
र्दीक विरूपाक्ष ॥ २७ ॥ लाहोन शिववरदाचें बळ ॥ असुरभार मेळविले सकळ ॥ जेवीं सप्तार्णवींचें जळ तुंब-
ळ ॥ युगांतीं पसरे ज्यापरी ॥ २८ ॥ तैसा मेळवोन असुरभार ॥ पृथ्वी जिंकी मृदमीन्यअसुर ॥ स्वर्गापवर्ग
सुरवर खेचर ॥ पदच्युत केले सर्वही ॥ २९ ॥ त्रैलोक्यींचे महाजन समस्त ॥ झाले मृदमीन्याचे आज्ञांकित ॥
घेवोन कनक रत्नपर्वत ॥ पादपूजनासीं आर्पिती ॥ ३० ॥ दिग्विजयी ऐश्वर्यनिधि ॥ भोगित खंडोन मदांधबुद्धी ॥
पराभवोन आधि व्याधी ॥ सुबुधांबुधीं राज्य करितसे ॥ ३१ ॥ ऐसा हा बहु दिवस सुविचारें ॥ हिरण्याक्षाच्या पौत्रकु
मरें ॥ राज्य केलें सद्बुद्धि सागरें ॥ तेव्हां दुर्धरवरें डहुळला ॥ ३२ ॥ जेवीं अमर्याद सिंधुपाणी ॥ युगांतरीं प-
सरें या मेदिनीं ॥ तैसा मृदमीन्य दुष्टाचरणीं ॥ दुष्कृतांबुधीं क्षार झाला ॥ ३३ ॥ घेवोन असुर गणाचे भार ॥ वे-
ढिला कैलासगिरिवर ॥ हें देखोन श्रीशंकर ॥ पळोन गेला वैकुंठा ॥ ३४ ॥ आपुलें घालोनिया ठाणें ॥ तेथोन
निघाला घनगर्जनें ॥ वेढितां देखोन वैकुंठभुवन ॥ तें विष्णु घनगर्जनें निघाला ॥ ३५ ॥ मृदमीन्य आणि वै-
ठभारी ॥ यद्धासीं निघाले घोरांदरीं ॥ आजिंक्य दैत्य दुर्धरवरीं ॥ माजला तो नाटोपे ॥ ३६ ॥ युद्धीं नाटोपे दैत्य
सबळ ॥ हें जाणोन वैकुंठपाळ ॥ गुप्त होवोन टाकिलें स्थळ ॥ चंचळपणें फिरतसे ॥ ३७ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्व-

र ॥ यानीं सेविलें घोरकातार ॥ हें जाणोन मृदमीन्य असुर ॥ शोधित शोधित चालिला ॥ ३८ ॥ मंत्राक्ष जा-
णों मृदमीन्य असुर ॥ तपाचरला शतसंवत्सर ॥ विष्णु प्रगटो ह्मणोन तप खडतर ॥ केलें दारुण शतवर्षें ॥ ३९ ॥
हें देखोन पुंडरीकाक्ष ॥ प्रगट झाला तो प्रत्यक्ष ॥ ह्मणे तामसा साक्षेपदक्ष ॥ होईं सावध युद्धार्थी ॥ ४० ॥ ऐ-
सें पाहोन कुंभानुजकुमर ॥ विष्णूसीं करोन नमस्कार ॥ युद्ध करावया धुरंधर ॥ सिद्ध झाला निजबळें ॥ ४१ ॥
तुझिया कृपाकटाक्ष शरपंजरीं ॥ संह्याद्रिनिर्मी रणमंदिरीं ॥ तेथें विश्राम पावोन निर्धारीं ॥ तुझिया शेषशयना-
तळीं ॥ ४२ ॥ निरोदकी निराहारी ॥ जितेंद्रिय राहिलों सदाचारी ॥ ऐसें गर्जोन घनघोरीं ॥ शर संधानीं वर्ष-
ला ॥ ४३ ॥ अग्नि पर्वत पर्जन्यधारीं ॥ मृदमीन्य वर्षला खदिरांगारीं ॥ वैकुंठपाळ शराब्धिलहरीं ॥ असुरशर-
जाळ निवारिलें ॥ ४४ ॥ परिघ खड्ग त्रिशूळ तोमर ॥ मांडु सांग कटारी खंजीर ॥ पाश पट्टिश क्षीद्रुधार ॥ त्रि-
धारी त्रिंशतसहस्त्रधारी ॥ ४५ ॥ ऐसा मृदमीन्य दुष्टासुर ॥ युद्धासीं केलें घोरांदर ॥ तें वदतां सविस्तार ॥ क-
था अपार वाढेल ॥ ४६ ॥ ऐसा संग्राम दारुण ॥ पांचशतसहस्त्रवर्षें जाण ॥ युद्ध करितां लक्ष्मीरमण ॥ श्रमी
झाला अपार ॥ ४७ ॥ मृदमीन्य जाणोन अजरामर ॥ तंव त्हृदयीं योजी मुरलिधर ॥ मागें परतला तैसाचि अ
सुर ॥ पाठी लागला अल्पायु ॥ ४८ ॥ मनोवेगें कमळारमण ॥ पातला श्रीरंग पट्टण ॥ तेथें झाला शेषशयन ॥
श्रम परीहार्थी निजेला ॥ ४९ ॥ तंव तृतीयप्रहरीं पातला असुर ॥ निद्रिस्त देखोन कमळावर ॥ मृदमीन्य शब्द
वदे भयंकर ॥ घनघोरें परिसवी श्रीहरीतें ॥ ५० ॥ दीनजन गरीबजे अनाथ ॥ यांचा पहासी बहुत अंत ॥ वि-
घ्न देखोनियां अद्भुत ॥ सर्पशयनीं कां दडसी ॥ ५१ ॥ निगमीं मिमांसवदनीं न सांपडसी ॥ अदृश्यरूपीं सदा द

डसी ॥ अभेदभक्ति अनुभवीं अतुडसी ॥ खेद संताप दवडसी हरिजनांचे ॥ ५२ ॥ तुझे दर्शनालागीं मुनिवरीं ॥ ध्यानस्थ बैसले गिरिकंदरीं ॥ निरोदकी निराहारी ॥ तयांतें दर्शन होय तुझें ॥ ५३ ॥ तैसा मीं मृदमीन्य नव्हे जाण ॥ तीव्र युद्धीं तुज जिंकीन जाण ॥ संग्राम करोन अतिदारुण ॥ मिरवीन प्रताप आपुला ॥ ५४ ॥ ऐसा प्रळय घोर गर्जिन्नला ॥ विष्णुअचळशयनीं स्वस्थ निजेला ॥ तेव्हां चिच्छक्ति मेघ गर्जिन्नला ॥ आकारिला वेष कौमारिचा ॥ ५५ ॥ विष्णु श्रवणांतून लावण्यपुतळी ॥ बाळअरुणोदयाहून बाहेर आली ॥ चिद्गगनीं प्रकाशें उजळली ॥ असुरदीपकस्नेह हरणार्थी ॥ ५६ ॥ हें देखोन मृदमीन्य असुर ॥ चमत्कारिला तो निजांतर ॥ ह्मणे हे बाळकौमारी सकुमार ॥ या घोरकांतारीं कां फिरसी ॥ ५७ ॥ कवण जननी तूतें प्रसवली ॥ या घोरकांतारीं टाकोनि गेली ॥ जे नऊमास श्रमोन माउली ॥ प्रसवोन वंध्या मज वाटे ॥ ५८ ॥ कीं तूं ऋषेश्वराची दुहिता ॥ कीं यक्ष राक्षसी गधर्वकांता ॥ कीं सिद्ध साध्य आराध्य देवता ॥ किंवा कवण अवस्था मनासीं घडली ॥ ॥ ५९ ॥ तव स्वरूपांवरींचा वासरमणी ॥ उगवला भासे सहस्र किरणीं ॥ तुझें कीर्तिमुख पाहतां अतःकरणीं ॥ चित्रवर्णीं लिहिलें पुर्वी चित्रगुप्तें ॥ ६० ॥ कीं कवण दुःखावस्था घडली दारुण ॥ कावेरीतीरीं करिसीभ्रमण ॥ तुझ्या चिंतावर्नीचा हुताशन ॥ शांत करिन धनघोरें ॥ ६१ कवण हेतु मनकल्पना ॥ श्रवणा परिसवीं नामाभिदाना ॥ जेणें ऐकतां संतोष मना ॥ ऐसें करावें शहाणिये ॥ ६२ ॥ ऐसी परिसोन असुरवाणी ॥ क्रोधें संतप्त झाली अंतःकरणीं शिनीवाली पासोन राकाकिरणी ॥ तैसी वृद्धि पावत चालिली ॥ ६३ ॥ ह्मणेरे हिरण्याक्षपौत्रकुमरा ॥ फार त्रासिलें भूसुरनरवरां ॥ श्रमी केलेसी विधि हरिहरा ॥ यालागीं पातलें या ठायीं ॥ ६४ ॥ घोरसंग्राम करो दारुण

श्रमी केलासी पद्मारमण ॥ पांचसहस्र वर्षें करितां कदन ॥ ह्मणोनि निद्रिस्थ झाला शेषशयनीं ॥ ६५ ॥ यास्तव पातलें या ठायां ॥ तूं तें मोक्षपदीं स्थापाया ॥ पातलें त्वरित दैत्यतनया ॥ प्रतापशौर्या दाखवीन समरीं ॥ ६६ ॥ ऐसें शक्तीचें तीव्रोत्तर ॥ परिसोन खवळला प्रचंड असुर ॥ शक्तीशीं ह्मणे तूं बाळसकुमार ॥ केवीं साहसील शरासनांसीं ॥ ६७ ॥ चातुर्य भरिते मृग डोळसे ॥ तुज सवें युद्धासीं उपजे आळस ॥ तव सौंदर्यामृत कनक कलश ॥ भरिला तो केवीं भंगूं रणीं ॥ ६८ ॥ बाळकौमारीसीं कैसें संहारावें ॥ कामिनी सवें युद्ध कैसें करावें ॥ ॥ हे कल्पना माझिये जीवें ॥ कल्पिली यथार्थ जाणपां ॥ ६९ ॥ स्त्रीहत्या महादोष ॥ कवण करी मनोल्हास ॥ बायका सवें युद्ध करितां निर्दोष ॥ पराक्रमी पुरुष दूषण ठेविती ॥ ७० ॥ तुझें नेत्र कटाक्ष शरासन ॥ भेदिजेतील ऋषि मुनि वनचरगण ॥ घेसी हिरोन सुकृतकांचन ॥ तपाचरण चळविसी ॥ ७१ ॥ योगीमानस मनमोहनी ॥ ठकविसी दैत्य अमृतपानीं ॥ स्त्रीचरित्राची काहाणी ॥ स्वल्प श्रवणीं ऐकपां ॥ ७२ ॥ सहस्र किरणांची वरांगना ॥ अतिसौंदर्य निशाकर किरणा ॥ सूर्यकिरणीं शुष्कपर्णा ॥ शुभांगीची कृशांगी जाहली ॥ ७३ ॥ सूर्यसंगती कांहीं दिवस ॥ क्रमल्या नंतर झाली उदास ॥ सूर्यतेजें पावली त्रास ॥ पतिव्रता सुनीति सूर्यपत्नी ॥ ७४ ॥ ती हे त्वष्टाप्रजापतीची दुहिता ॥ सुनीति जाणा सूर्यकांता ॥ रतिसंगमीं करी आकांता ॥ असो तत्वार्थ परिसें लोपामुद्रे ॥ ७५ ॥ तियेचे उदरीं सूर्यवीर्यें ॥ कृतांत जन्मला प्रताप सूर्य ॥ जो यमधर्मराज अध्वर्य ॥ जनसंहारक युगायुगीं ॥ ७६ ॥ असो सूर्यअस्ताचळ मंदिरीं ॥ कांतिसहित निद्रा करी ॥ तंव अर्कपत्नी स्वमनांतरीं ॥ योजोन काय करितसे ॥ ७७ ॥ कृतांतासीं निजऊन सेजारीं ॥ यमुना तपतिया कुमरी ॥ बोधोन गुप्त स्वविचा-

रीं ॥ प्रवाहस्वरूपीं वर्तावें ॥ ७८ ॥ मातवचन वंदोन शिरीं ॥ तपती मिळाली पश्चिमसागरीं ॥ मथुरा वृंदावन कुंजविहारी ॥ कालिंदीनीरीं प्रख्यात जो ॥ ७९ ॥ स्वसामर्थ्यें शरीरछाया ॥ निर्मोन केली लावण्यजाया ॥ नाम ठेविलें तयेचें छाया ॥ त्वष्टाप्रजापतीनें ब्रह्मांडपुराणीं ॥ ८० ॥ आपण होऊन अश्विनी ॥ अखंड विचरी ब्रह्मार ण्यीं ॥ वनोपवनीं चौदाभुवनीं ॥ सगुणाकृती फिरतसे ॥ ८१ ॥ तंव येरीकडे सूर्यमंदिरीं ॥ छायानाम लावण्यलह- री ॥ अनुभवितां सहस्रकरीं ॥ गरोदर सुंदरी झाली ॥ ८२ ॥ मार्तंडवीर्यें छायेउदरीं ॥ प्रथमपुत्र जन्मला भा- स्करीं ॥ मंद पिंगलाक्ष निलांजन शौरी ॥ शनैश्वरनाम जयासी ह्मणती ॥ ८३ ॥ बारा राशीस शनेश्वर भोगी ॥ राज्याधिकारिया करी जोगी ॥ अराज्याधिकारिया संजोगी ॥ न सोडित विधिहरिहरा ॥ ८४ ॥ वैधृती कन्या व्यतिपात कुमर ॥ तिसरा श्रेष्ठ शनेश्वर ॥ हे छायेउदरीं प्रताप दिनकर ॥ पर्वकाळीं जगदोद्धारिती ॥ ८५ ॥ अस्ताचळींचे दैत्य दमुनी ॥ निजमंदिरीं पातला वासरमणी ॥ सापत्नभाव देखोन नयनीं ॥ स्तब्ध दृष्टि विलो- की सूर्य ॥ ८६ ॥ यमावरी छाया करी क्रोध ॥ उगेंची ताडी निरापराध ॥ हे सापत्नभेद अपवाद ॥ लक्षोन सूर्य अंतरीं विचारी ॥ ८७ ॥ आपुली नव्हे ही वरांगना ॥ ऐसें भासलें सूर्य मना ॥ तैं क्रोध भरीत अंतःकरणा ॥ सहस्र किरणीं पातला ॥ ८८ ॥ सत्यसांग कवणाची सुंदरी ॥ वनदेवता कीं यक्षिणी निशाचरी ॥ असत्य वदतां शापवैश्वानरीं ॥ दग्ध करीन क्षणार्धें ॥ ८९ ॥ ऐकोन सूर्यमुखींचें उत्तर ॥ छाया भयाभीत झाली अपार ॥ तंव ज्येष्ठ कांतेनें छायाकार ॥ करोन सुंदर मज केलें ॥ ९० ॥ तवकांतेची शरीरछाया ॥ काढोन केली माझी सुंदर काया ॥ तुझी केली मज पवित्र जाया ॥ त्वष्टाप्रजापतीनें आवडी ॥ ९१ ॥ ऐसें परिसोन सूर्य अंतरीं ॥ अपरोक्ष

ज्ञानीं विचार करी ॥ ह्मणे हे वरांगना नव्हे दुसरी ॥ छायानामें ठेवोन गेली ॥ ९२ ॥ शोधोन पाहतां आत्मज्ञानीं ॥ स्वकांता कांतारीं झाली अश्विनी ॥ तिचा शोध करावया लागोनी ॥ उत्तरायणीं जातसे अद्यापी ॥ ९३ ॥ स्वभार्या देखोन अश्विनी उत्तम ॥ सूर्य झाला दिव्य तुरंगम ॥ संयोग करितां सुखसंभ्रम ॥ दिव्यकुमर दोघे जन्मले ॥ ९४ ॥ परम औषधींचें रसायन ॥ अश्वदेह मनुष्याचें वदन ॥ अमृतोद्भव हस्तस्पर्शन ॥ तेचि वैद्यराज देवांचे ॥ ९५ ॥ तेचि अश्विनी कुमार जाण ॥ सूर्यापासोन निर्माण ॥ झाले प्रत्यक्ष नक्षत्र वर्ण ॥ महाजन लक्षिती युगायुगीं ॥ ९६ ॥ सप्तविंशति नक्षत्र गणीं ॥ अश्विनीकुमार हे श्रेष्ठपणीं ॥ अमृतसिद्धियोग भोमाश्विनी ॥ हें ज्योतिःशास्त्रीं विश्वामित्रें निर्मिलें ॥ ९७ ॥ असो ऐसें स्त्रीचरित्र ॥ प्रख्यात असे सर्वत्र ॥ तैसें मजवरी योजिसी यंत्र ॥ तो तुझा मंत्र यंत्र मीं जाणतसें ॥ ९८ ॥ मीं मृदमीन्य अमल शरीरीं ॥ जितेंद्रिय सदाचारी ॥ ऐसा शब्द घनघोरीं ॥ मृदमीन्य दैत्य करितसे ॥ ९९ ॥ ते विष्णुकर्णोद्भवींची कुमरी ॥ विशाळ झाली प्रचंड शरीरीं ॥ कोदंड आकर्षोन शरधारीं ॥ दैत्यगिरिवरावरी वर्षली ॥ १०० ॥ हें देखोन कुंभानुज पौत्र कुमर ॥ असंख्यात वर्षला पावकशर ॥ छेदितां शक्तीच अपारशर ॥ दिग्देशांतरीं कोंदले ॥ १ ॥ तंव दैत्य शरांचीं निबिड जाळीं ॥ व्यापितां नभांतरीं महीमंडळीं ॥ तीं शक्तीनें खंडोनी भूमंडळीं ॥ पाडिलीं ते संख्या न करवे ॥ २ ॥ जें धनुष्य दैत्य काढी ॥ तें तें शक्ति खंडोन पाडी ॥ शक्तिबाण कडकडाडी ॥ येतां झांपडी दैत्यांसीं पडिली ॥ ३ ॥ शक्तीहस्तें सजोन मरण ॥ मृदमीन्य सोडोन पळतसे समरंगण ॥ पाठी लागोन शक्ति दारुण ॥ संग्राम करित दैत्य चालिला ॥ ४ ॥ गेला एकाक्ष देशांत ॥ युद्धासीं केलें अत्यद्भुत ॥

अकरादिवस अपर्याप्त ॥ शक्तीसवें केलें संग्रामासी ॥ ५ ॥ विष्णुआज्ञेनें शक्तीहस्तीं ॥ सुदर्शन पातलें दैदिप्य- कांती ॥ सहस्रधारेनें दैत्यशांती ॥ एकाक्षदेशीं करावी ॥ ६ ॥ एकाक्षदेशीं निराळोत्तर ॥ सुदर्शन घेवोन स- हस्रधार ॥ वधिला मृदमीन्य दुष्ट असुर ॥ यक्षराजया सहित ॥ ७ ॥ मृदमीन्य आणि यक्षेश्वर ॥ मृत्यु पावले श क्तिकरें ॥ ते दिवशीं एकादशी एकषष्ठी घटकाभर ॥ तेच साधनी ह्मणावी ॥८ ॥ असो मृदमीन्य आणि एकाक्ष खेचर ॥मरण पावले शक्तिकरें ॥ हें पाहोन ब्रह्माहारिहर ॥ जयजयकारें गर्जती ॥ ९ ॥ स्तवन करिती वृंदारक ॥ उपडिला त्रैलोक्यचा कंटक ॥ सुखी केले चतुर्दशलोक ॥ चिन्मात्रिके या त्रिजगासी ॥ १० ॥ ब्रह्मदेव ह्मणे हे विश्वजननी ॥ संकटीं सुरकुळतारिणी ॥ दुरितदानव निर्दाळणी ॥ शांत होईं जननीये ॥ ११ ॥ प्रगट करावें ना माभिधान ॥ कांहीं तत्पदार्थाची द्यावी खूण ॥ जेणें उद्धरे हें त्रिभुवन ॥ महिमा होय पुराणीं ॥ १२ ॥ परिसोन पद्मोद्भवाची वाणी ॥ शक्ति वदे वरद वचनीं ॥ दैत्य वधिले एकादशीदिनीं दोन्ही ॥ ह्मणोन एकादशी आजि करावी ॥ १३ ॥ एकाक्षराजयासहित मंथन ॥ मृदमीन्याचें केलें मर्दन ॥ यांस पूर्वीं दिधलें वरदवचन ॥ ह्मणोन अवतरलें विष्णुश्रवणीं ॥ १४ ॥ माझें नाम एकादशी ॥ प्रगट झालें एकाक्षदेशीं ॥ यास्तव पंधरावे दिवशीं ॥ उपोषित असावें मुनिसुरवरीं ॥ १५ ॥ दशमीस असावें एकभुक्त ॥ एकादशीस असावें उपोषित ॥ द्विजपंक्ती सीं घेवोन सावचित ॥ साधन द्वादशीस साधिजे ॥ १६ ॥ ॥ श्लोक॥ ॥ एकादश्यां विशेषेण कर्तव्यं भोजन द्व यं ॥ रात्रौ जागरणं कुर्यात् दिवाच हरि कीर्तनं ॥ ४ ॥ तैलस्त्री मधु माषान्नं परान्नं कांसभोजनं ॥ दिवासुप्तं पुन- र्भुक्तं द्वादश्यां अष्ट वर्जयेत् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ दशमीचिये दिवशीं ॥ एकभुक्त करावी राजसीं ॥ उपोषण करावें

एकादशीसीं ॥ द्विजपंक्तीसीं साधनी भोजन कीजे ॥ १७ ॥ एकादशीचें महाव्रत गहन ॥ कर्तव्य द्वय भोजन ॥ त्याचा भाव असे भिन्न ॥ तें विचक्षण जाणती ॥१८॥ द्वादशीसीं तैलपक्वान्न ॥ मधुमाषान्न करूंनये भक्षण ॥ न करावें तयेदिवशीं शयन ॥ रात्री मैथुन न करावें ॥ १९ ॥ कांसपात्रीं न किजे भोजन ॥ गणान्न न सेविजे प्रतिलक्षण ॥ एकादशीस जे सेविती अन्न ॥ तें खरमांसा सारिखें जाणावें ॥२०॥ ऐसें माझें व्रताचरण ॥ करील जो निष्काममनें जाण ॥ तयासीं वस्ती वैकुंठभुवन ॥ अक्षयीं पावे जन्मवरी ॥ २१ ॥ ऐसें एकोन ब्रह्मदेव ॥ व्रताचरती विवुधसर्व ॥ असो एकादशीसपूजी गणगंधर्व ॥ विमानयानीं वाहिली ॥ २२ ॥ अमरेंद्रपूरीं अमरगणीं ॥ पूजिली एकादशी ते हरिदिनीं ॥ तेथोनि पूजिली ब्रह्मभुवनीं ॥ जयजयकारीं चतुराननें ॥ २३ ॥ वैकुंठभूवनीं मधुकैठभारीं ॥ एकादशी पूजिली षोडशोपचारीं ॥ तैसीच कैलासगिरीवरी ॥ पूजासन्मानासीं पावली ॥ २४ ॥ तैं विष्णूनें पाचारून गरुडासी ॥ पृथ्वीवरी धाडिलें सुपर्णासी ॥ रुक्मांगदाप्रती सांगोन एकादशी ॥ तें पासोनि व्रताचरणीं जन लाविले ॥२५॥ ऐसें एकादशीमहाव्रत ॥ करिती महाजन नवरसभरित ॥ कमळभैरवासी दीनानाथ ॥ एकादशीकथा वदत विस्तारें ॥२६॥ ह्मणोन चैत्रमधुमासिये ॥ यात्रा मिळती कृतनिश्चयें ॥ द्वादशीसीं नैवेद्य घेवोन स्वयें ॥ मजलागीं समर्पिती कमळभैरी ॥ २७ ॥ दशमी एकादशी आणि द्वादशी ॥ पर्वणी चतुर्दशी आणि पौर्णिमेसी ॥ नैवेद्य मजला समारंभेसी ॥ अर्पिती गा कमळभैरवा ॥ २८ ॥ असो शुक्लपक्ष मधुमास वसंतीं ॥ निशाण दुंदुंभि वाजविल्या संतीं ॥ तयातें देवोन धनसंपत्ती ॥ प्रतिवर्षीं आणवीं मम दर्शना ॥ २९ ॥ द्वादशीचें महदाख्यान ॥ पुढें परिसावें सावधान ॥ सत्ताविसांत यमाईदर्शन ॥ करितां श्रवण संदेह हरती ॥३०॥

लोपामुद्रेसीं वदे अगस्ती ॥ कथा विस्तारें ते संतश्रोतीं ॥ परिसतां सकळ संताप हरती ॥ बोबड्याबोला बृह-स्पति धन्य ह्मणे ॥ ३१ ॥ इति केदार विजय सिंधू ॥ गुरुनाथकृपेचा उगवला पूर्णेंदू ॥ तेथील हरिकीर्तनाचा अमृतबिंदू ॥ हरिजन आनंदें सेविती ॥ ३२ ॥ कीं हरिनामाच्या सुमनकळिया ॥ सोहं तंतूसीं गुंफिल्या सगळि-या ॥ माळाकार करोन संतगुणवर्यां ॥ गळां घालिताहोय सुमनोहरि ॥ ३३ ॥ पौर्णिमा रविवारीं अरुणोदया ॥ होतां त्रय आवर्तनें केदारविजया ॥ दुष्टकाळ पावे सकळ क्षया ॥ महदैश्वर्यासीं देतसे दीनानाथ ॥ ३४ ॥ एकाग्र चित्तीं अर्थांतरीं ॥ भक्तीनें केदारविजय पठण करी ॥ तयांचें अखंड निजमंदिरीं ॥ हिमकेदारी नांदतसे ॥ ३५ ॥ सारांश भक्तिप्रेमाचें हें बोलणें ॥ हें जाणती आत्मानुभवी विचक्षण ॥ संतपदीं लोटगांण ॥ हरिहरासीं घालित-से आवडी ॥ ३६ ॥ क्षणएकजरी संतचरणीं भक्ति जडे ॥ तरीच श्रीगुरुनाथ जोडे ॥ हरिनाम सेवितां अधिक होय गोड ॥ त्रिविंशति अध्याय सेवोत गोडहा ॥ १३७ ॥ इति केदारविजये अगस्ति लोपामुद्रा संवादे ॥ भवि ष्योत्तर केदारखंड करवीरकांड ॥ विरचितायां ॥ मृदमीन्यवध एकादशीव्रत कथनोन्नाम त्रिविंशतितमोध्यायः ॥ ॥ २३ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ श्रीशुभंभवतु ॥ ओंव्या ॥ १३७ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीदक्षिणकेदारेश्वरायमनः ॥ जय कुदरी नैरिदान्वय संकेता ॥ कुंभिनी वाहना जंघाधृता ॥ कुशावर्ती हेमाश्वत्था ॥ कुष्मांड भेदन प्रियकरा ॥ १ ॥ कुंज जननीधर श्रवणीं मंडित कुंडला ॥ कुंडली निपरा चंद्रार्धि मंडला ॥ कुरंग नंदिनी तिलकांकित कपोला ॥ कुसुंबी हेमांवर परिधाना ॥ २ ॥ कुपोदकीं तव पादोद्भवीं सगरोद्धारका ॥ कुशलमस्तु चतुर्दशलोका ॥ कुडी वासना दशमुख रुखा ॥ कुठार जहालासी रामायणीं ॥ ३ ॥ कुंकुमांकित क्रमणचरणा ॥ कुंजमाताधर चपळ जघना ॥ कुतर्क दैत्य कुटिळ दमना ॥ कुसुम अतसिसंकाश ज्योतिस्वरूपा ॥ ४ ॥ कुकर्म पाखांड दैत्य दमना ॥ कुंभकर्णाग्रजकृतशासना ॥ कुमति ऐरावण रक्तभोजना ॥ कुर्मावलोकी चिद्दटछायीं विश्वांकुरा ॥ ५ ॥ कुश्चित गणिका उद्धारणा ॥ कुब्जा कुबडी तनु सुधारणा ॥ कुब्जाबीजा सुधाकर किरणा ॥ कुरुकुशला विलासका ॥ ६ ॥ कुडी वासना विवर्जिता ॥ कुलीन अकुलीन वर पंडिता ॥ कुडियनीर कुदरी प्रक्षाळिता ॥ कुशलत्वें रथीं जुंपिसी पार्थाचे ॥ ७ ॥ कौमुदी शास्त्रार्थ प्रसिद्ध विवरा ॥ कौमोदकी गदापाणिविवरा ॥ कौशिकसृष्टि प्रचंड प्रखरा ॥ कौसल्यानंदना मखरक्षणा ॥ ८ ॥ कुंतीनंदन प्रियपाळणा ॥ कौरव गोग्रहणीं विटंबना ॥ कंसचाणूरकृत मर्दना ॥ कौतुक दाविसी हरिविजयीं ॥ ९ ॥ कृत त्रेत युगादि द्वापारीं ॥ कृतांतभगिनीतट विहारी ॥ क्रमणपद ठेवोन दे हरी ॥ कृत संकेत व्रजमोहना ॥ १० ॥ कृष्ण शुक्लपक्ष प्रवर्तका ॥ कृपाण पट्टिश धृत खेटका ॥ ऋतु शतमखादि अभिषेका ॥ कृपाकरीं केदारविजय विरचितां ॥ ११ ॥ ऐसा अनादि त्रिजगत्पत्ती ॥ सत्व रजतम त्रिगुणमूर्ती ॥ अवतरला संह्याद्रिपर्वतीं ॥ हरिजनातें सांभाळावया ॥ १२ ॥ कमळभैरवासीं केदार ॥ लोपामुद्रेसीं कलशकुमर ॥ नारदासीं मार्कंडेयो मुनिवर ॥ केदारविजय


अध्याय २४वा.
१४ रत्नें
जालंधर दैत्याचा वध.
श्रीविष्णु
वृंदा.

विस्तारितसे ॥ १३ ॥ एकाक्षदेशींचा जो नृपवर ॥ चंद्रसेनेचा जो सहोदर ॥ तयानें दिव्य सहस्त्र संवत्सर ॥
श्रीशंकर प्रसन्नकेला ॥ १४ ॥ शंकरें दिधलें वरदान ॥ अयोनि संभवशक्ति दारुण ॥ विष्णुश्रवणीं जन्मतां
पावसी मरण ॥ सृदमीन्य संग्राम एकाक्षदेशीं ॥ १५ ॥ ह्मणोन सृदमीन्य संगतीं ॥ मरण पावला शक्तिहस्तीं ॥
हे मत्स्यपुराणीं सृदमीन्य उत्पत्ती ॥ प्रतापशांती वदली असे ॥ १६ ॥ असो विष्णुकर्णोद्भवीचे करीं ॥ सृदमीन्य
मर्दिला एकाक्षनगरीं ॥ तें एकादशीचरित्र विस्तारीं॥ तेविसावें अध्यायीं परिसीलें ॥ १७ ॥ कलशोद्भवाची ऐसी
कथा ॥ परिसोन वदे हे ऋषिसमर्था ॥ चंद्रसेना पतिव्रता ॥ तैसीच दुसरी जळसेना ॥ १८ ॥ महापतिव्रता दो
घीजणी ॥ आणि मागें परिसिल्या पुराणीं ॥ परि चंद्रसेनेंहून ऐकिली श्रवणीं ॥ नाहीं अद्यापि मुनिवरा ॥ १९
॥ चंद्रसेनेहून दुसरी ॥ ऐसी नसे या महीवरी ॥ हें ऐकोनि अगस्ति मुनिवरीं ॥ भार्येप्रती अनुवादिलें ॥ २० ॥
असो एकादशीकथाविस्तार मुनी ॥ ऐसाचि वदला मत्स्यपुराणीं ॥ संज्ञा दिधली पंडितजनीं ॥ विकल्प मनीं न
धरावा ॥ २१ ॥ एकादशीची कथा विस्तार ॥ तेविसाध्यायीं कथिला सार ॥ चंद्रसेनेहून थोर ॥ नवल दुसरें
पाहे पां ॥ २२ ॥ अगस्ति ह्मणे स्वकांतेसी ॥ मार्कंडेय ह्मणे नारदासी ॥ तेचि संतसज्जन राजहंसीं ॥ हरिना-
मक्षीरसेविजे ॥ २३ ॥ पूर्वी कैलासगिरीवरी ॥ पार्वतीसहित त्रिपुरारी ॥ राज्यकरित अकल्पवरी ॥ निरामय
शरीरा आकारोनियां ॥ २४ ॥ ऐसें असतां बहुतेक दिनीं ॥ तंव तेथेंचि पातला नारदमुनीं ॥ भिक्षा देईमां श्री
भवानी ॥ अविलंबेसी जननीये ॥ २५ ॥ तैं ऊर्ध्वरेत त्रयंबकें देखा ॥ पर्णद्रोणीं घालोन कौतुका ॥ ठेविलें तें
परम आटका ॥ पार्वतीतें ठाउकें नाहीं ॥ २६ ॥ असो ऐकोनि नारदवाणी ॥ शैल्यजा पातली अंतरसदनीं ॥ ऊ

र्ध्वरेत द्रोण करीं घेवोनि ॥ भिक्षा घाली नारदातें ॥ २७ ॥ भिक्षा घेवोन श्रीनारदें ॥ ऊर्ध्वपंथीं जात आनंदें ॥ तों द्रोण पडिला समुद्रामध्यें ॥ नारदहस्तींचा अवचिता ॥ २८ ॥ ईश्वराचें ऊर्ध्वरेत ॥ पडलें जेव्हां समुद्रांत ॥ तें खळबळीला सरितानाथ ॥ तैसीच गर्जना करित अद्यापी ॥ २९ ॥ ऐसीं क्रमिल्या शतसहस्र वर्षें ॥ समुद्रीं जन्मला ईश्वरांशें ॥ कोटिचंद्रार्कमय प्रकाशें ॥ ऊर्ध्वरेतें जन्मला ह्मणोनी ॥ ३० ॥ जळीं जन्मला ईश्वरकुमर ॥ यालागीं नाम जालंदर ॥ ठेविलें घोषें मंगळतुरें ॥ सुरवर मुनिजन आवडी ॥ ३१ ॥ विमानीं दाटले सुरगण ॥ पुष्पें वर्षती सर सघन ॥ यक्ष सिद्ध साध्य मरुद्गण ॥ गंधर्व तुंबर पातले ॥ ३२ ॥ शक्तिपरिवारेंसी भवानी ॥ नवकोटि मातृका कात्यायनी ॥ पातल्या बैसोन पुष्पकयानीं ॥ जेथें जालंदर जाज्वल जन्मला ॥ ३३ ॥ अव्याऐशीं ऋषिगण गंधर्व ॥ यक्ष राक्षस विबुध सहस्र सर्व ॥ ज्याचा समुद्रीं जाहला उद्भव ॥ ह्मणोन जालंदर नाम ठेविलें ॥ ३४ ॥ ऐसा गौरवोन जालंदर ॥ स्वस्थाना गेलिया सुरवर ॥ दिवसेंदिवस झाला थोर ॥ जालंदर तो समुद्रपुत्र ॥ ३५ ॥ त्रयंबककुमर जालंदर ॥ तीव्र तपाचरला धुरंधर ॥ दिव्य दहा सहस्र संवत्सर ॥ पंचाग्नि साधन आचरला ॥ ३६ ॥ शीत उष्ण पर्जन्य धारा ॥ जालंदरें साहोन आपुले शरीरा ॥ योगाभ्यासीं अचळ लक्ष संवत्सरा ॥ हिमालय शिखरीं आचरला ॥ ३७ ॥ अतींद्रिय जितेंद्रिय निराहारी ॥ छत्तीसलक्ष संवत्सरीं ॥ तीव्र तपाच्या वैश्वानरीं ॥ एकाग्र मनांतरीं सुजे पार्थी ॥ ३८ ॥ तप्तलोह स्तंभांतरीं ॥ तप केलें शतकोटि संवत्सरीं ॥ दारुण तपोवनाच्या वैश्वानरीं ॥ देह भस्म केला जयानें ॥३९॥ पुनरपि होवोन दिव्यदेही ॥ जालंदर होवोनियां विदेही ॥ तीव्रतपाचरला पांहीं ॥ देवांचीं दिव्य पस्तीसवर्षें ॥ ४० ॥

ऐसें तीव्र तपाचरण ॥ जालंदर वर्तला दारुण ॥ हें पाहोन अपर्णारमण ॥ चतुराननासहित वरदार्थी पातला ॥ ॥ ४१ ॥ शंकर आणि चतुरानन ॥ ह्मणती अद्भुत तव तपाचरण ॥ पाहोन निवालें अंतःकरण ॥ वरदान द्याव-या तुज पातलों ॥ ४२ ॥ जेंजें इच्छिसि निरंतरा ॥ तेंतें पावसी जालंदरा ॥ हे परिसोन अभयगिरा ॥ जालंदर-स्वयें वदतसे ॥ ४३ ॥ देवांदैत्यांमाजी अग्रगणी ॥ आजिंक्य व्हावें मीं रणांगणीं ॥ कांता द्यावी लावण्यखाणी ॥ ज्याची शिराणी होय युगायुगीं ॥ ४४ ॥ महासती पतिव्रता ॥ जैसी विष्णूची लक्ष्मीकांता ॥ निजात्मज्ञानीं नवरस भरिता ॥ ईश्वरसत्ता मज देईं ॥ ४५ ॥ ऐसें वदतां जालंदर ॥ तथास्तु ह्मणे विधि हर ॥ आजिंक्य हो-ऊन पृथ्वीवर ॥ राज्य करीं गा चतुर्दशभुवनींचें ॥ ४६ ॥ परी विष्णूसीं करिसी विरोध ॥ तात्काळ पावसील प्रा-णवध ॥ परपुरुषें स्पर्शतां तव कांता त्या अपराधें ॥ मृत्यु पावसी तात्काळ ॥ ४७ ॥ वृंदा परपुरुषाचे संबंधीं ॥ गमन करितां पदोपदीं ॥ पुण्य जोडिलें तें विशाळ बुद्धीं ॥ तें दग्ध होईल क्षणार्धें ॥ ४८ ॥ जालंदर गौरवोन मधुरोत्तरीं ॥ स्वस्थाना गेले विधि मदनारी ॥ नारदासीं दीर्घायु शरीरी ॥ मार्कंडऋषि वदतसे ॥ ४९ ॥ ते सप्त मोध्यायीं शिवरात्री कथा ॥ कर्णिकरमणी पतिव्रता ॥ मालतीयोग स्वर्गप्राप्ता ॥ हूहू गंधर्व उद्धारिला ॥ ५० ॥ मालतीहून नवल जाणा ॥ चंद्रसेनेहून जळसेना ॥ त्यांच्या पतिव्रतपणाच्या आख्याना ॥ कथिलें बेवीसावे अ-ध्यायीं ॥ ५१ ॥ सप्तमोध्यायींचे अंतरीं ॥ मालतीची परिसली नवलपरी ॥ जळसेना हे सुगंध लहरी ॥ ज्योति-सौदागरीं मिळाल्या ॥ ५२ ॥ जळसेनेहुनि शतगुणी ॥ चंद्रसेनेची तैसीच करणी ॥ या दोघींहून सहस्रगुणीं ॥ जालंदररमणी जाणपां ॥ ५३ ॥ नारद ह्मणे मार्कंडऋषी ॥ जालंदर जन्मला प्रतापराशी ॥ तयाच्या सकळ आ-

चरणासीं ॥ विदित असे मजलागीं ॥ ५४ ॥ वृंदा कवणाची असे कुमरी ॥ केधवां जालंदराची जाहली नोवरी ॥ ते आद्यंत कथा सविस्तारीं ॥ हें दीर्घायुषी सांगिजे ॥ ५५ ॥ ऐकोन नारदाचें वचन ॥ दीर्घायु करि हास्यवदन ॥ वदत तैसाचि घटनंदन ॥ लोपामुद्रेसीं विस्तारीं ॥ ५६ ॥ जळापासाव झाला जालंदर ॥ ह्मणोन जाज्वल तप धुरंधर ॥ केलें सेवून गिरिकंदर ॥ ईश्वरसत्ता पावलातो ॥ ५७ ॥ उत्तर पूर्व दक्षिण ॥ जिंकोन केलें नृपांचें दमन ॥ दैत्य राक्षस जिंकोन दारुण ॥ दधिसमुद्रतटीं राहिला ॥ ५८ ॥ दधिसमुद्र जालंदरा ॥ पाहोन आनंदला निजांतरा ॥ वस्ती वोपोन सुवर्णनगरा ॥ बद्धहस्तीं वदतसे ॥ ५९ ॥ माझी कन्या लावण्यपेटी ॥ शोधितां न मिळे महीशतकोटी ॥ देवां दुर्लभ देखिजे दृष्टी ॥ तेहे गोरटी देतसें तुजला ॥ ६० ॥ धनरत्नाचिये खाणी ॥ अपरमित विचित्ररंगी शिराणी ॥ वृंदा करोनि पट्टराणी ॥ राज्य करीं चतुर्दशलोकीं ॥ ६१ ॥ त्रैलोकींचें सौंदर्य एकवटलें ॥ हिंडतां लावण्यस्थळीं बहु वठलें ॥ मम कन्यके देहीं दाटलें ॥ वर कामनार्थी तटलें अंनिक्रारीं ॥ ६२ ऐसें वदतां दधिसागर ॥ अवश्य ह्मणे जालंदर ॥ हळदी लाविली मंगळतुरें ॥ देवकप्रतिष्ठा मंटपस्थानीं प्रतिष्ठिली ॥ ६३ ॥ आधीं देवोन शेवती ॥ दोभागीं चामरें ढाळिती ॥ मिरवत आणिला ज्या नवऱ्याप्रती ॥ नांदीश्राद्ध रीति तैं केली ॥ ६४ ॥ तैं विष्णु आपण अगोचर दृष्टी ॥ आड झाला अंतरपटीं ॥ प्रकृत्ति प्रवृत्तीची राहटी ॥ त पासोन प्रवृत्ति सृष्टि पडियेली ॥ ६५ ॥ विष्णूसीं न पडावा अंतर शेवटीं ॥ ह्मणोन सबाह्यांतरीं पल्लवीं गांठी ॥ देऊनि मंत्राक्षताचि वृष्टी ॥ मस्तकीं करी प्रकृत्तिपुरुष ॥ ६६ ॥ ऐसें वृंदा जालंदर लग्न ॥ जाहलें संपूर्ण विधि विधान ॥ आंदण वोपिलें नवनिधान ॥ अमोल्य सिंधुगर्भिंचें ॥ ६७ ॥ चारी दिवस करोन पूजर ॥ जाळं-

द्रासी अर्पिली आत्मजा ॥ पूर्ण झाला मनोरथ माझा ॥ वरासी कन्या निरविली ॥ ६८ ॥ कांहीं दिवस करोन वस्ती ॥ वृंदेसहित सुखसंपत्ती ॥ भोगितअसतां प्रतापमूर्ती ॥ भद्रजाती जालंदर ॥ ६९ ॥ रक्ताक्षबीजाचा प्रपौत्र ॥ रक्तबीज असे करवीरक्षेत्र ॥ शुंभ निशुंभ कुमरगोत्र ॥ सुंदोपसुंद चंडमुंडादी ॥ ७० ॥ महिषासुरादि भस्मासुर ॥ मत्तमातंग असुरभार ॥ माहुरादिक तुळजापूर ॥ या सकळांसीं बोलाविलें ॥ ७१ ॥ असो नवांकित सभामंटपीं ॥ जालंदर बैसला कृतांत स्वरूपी ॥ कोटीचंद्रार्क कांतीदीप्ती ॥ जालंदर भूपति बैसला ॥ ७२ ॥ चंडमुंडादि रक्तबीज ॥ मधुकैटभारी असुरफौज ॥ पातले जैसे उन्मत्तगज ॥ तेणें जालंदर सभा विराजित ॥ ७३ नवग्रहादिक थोर ॥ बैसले जेथें जालंदर ॥ सार्वभौमपदाधिकार ॥ जालंदर पावला महत्व ॥ ७४ ॥ तें सवेंघेवोन असुर सेना ॥ जालंदर निघाला घनगर्जना ॥ चतुःसमुद्र करोन स्नाना ॥ पृथ्वी जिंकिली निजबळें ॥ ७५ ॥ पंचशतकोटि मही विस्तीर्णी ॥ ज्याची सत्ता असे त्रिभुवनीं ॥ जैसा नवखंडीं वासरमणी ॥ प्रतापी प्रकाशें जालंदर ॥ ७६ ॥ सर्व जिंकोनि नरसुरवर ॥ घेवोन धनरत्नाचे डोंगर ॥ पातले दधिसागरतीर ॥ सुवर्णनगर कांचनमय ॥ ७७ ॥ दिग्विजयी प्रस्थान भेरी ॥ वाजविल्या दधिसागरतीरीं ॥ जेवीं अमृत मंथनार्थी असुरारी ॥ तेवीं जालंदर शोभला ॥ ७८ ॥ नाना वाद्यांचे घनघोरीं ॥ वाद्यध्वनीसीं महागजरीं ॥ जालंदरदैत्य सहपरिवारीं ॥ मंगळघोषें श्वशुरा भेटला ॥ ७९ ॥ सुवर्ण रत्नमंटपांतरीं ॥ जालंदर बैसला सहपरिवारीं ॥ जैसी शोभा सीतास्वयंवरीं ॥ नृपवर अमरीं विराजित ॥ ८० ॥ जालंदराचे सन्निधानीं ॥ सिंहिकासुत बैसले दोनी ॥ केतु राहु द्वय नामाभिदानीं ॥ विपरित लक्षोन जालंदर

ह्मणे ॥ ८१ ॥ राहूसीं ह्मणे जालंदर ॥ काय झालें तुमचे चरण कलेवर ॥ श्रीमुख झालें अजरामर ॥ कवणें विचारें सांगपां ॥ ८२ ॥ केतूसीं कां नाहीं मस्तक ॥ कीं उपजत गर्भाचें असे कौतुक ॥ तुज न देखों चरण हस्तक ॥ कवण्या कर्मे सांगपां ॥ ८३ ॥ ऐसें वदतां जालंदर ॥ राहुवदन प्रत्योत्तर ॥ पूर्वी देव दानवांचें युद्ध फार ॥ चतुर्दश रत्नास्तव होतसे ॥ ८४ ॥ दैत्य नाटोपती अमरांसीं ॥ ह्मणोन चतुर्दश रत्नांसीं ॥ समुद्रीं टाकिलें अप्रयासीं ॥ ऐसें बहुतकाळ ठेविलें ॥ ८५ ॥ दैत्य आपुल्या निजबळें ॥ वश केलें मही मंडळ ॥ अमृत संजीवनी करतळामळ ॥ शुक्राचार्यें संपादिली ॥ ८६ ॥ शुक्राचार्य बळाचेनि पाडें ॥ अजिंक्य दैत्य बळी गाढे ॥ जाहले ते दैत्य जुंबाडे ॥ संग्रामहोडे जिंकिती ॥ ८७ ॥ असो चतुर्दश रत्नांचा ठेवा ॥ समुद्रीं पडतांच त्रिदश देवां ॥ क्लेश भोगितांच तैं वासुदेवा ॥ इंद्रें संताप तें कथियेले ॥ ८८ ॥ इंद्रासीं ह्मणे मधुसूदन ॥ हिरण्य पौत्रासीं जावें शरण ॥ सुरअसुर समुदाय घेऊन ॥ समुद्र मंथन करावें ॥ ८९ ॥ तेव्हां चतुर्दश प्राप्त रत्नें ॥ होतील तुह्मांसीं महद यत्नें ॥ येरवीं होतांचि दुष्टस्वप्नें ॥ सावध सुजाण पैं होती ॥ ९० ॥ आपुल्या कार्या कारण ॥ स्वशत्रूसीं जावें शरण ॥ कार्य साधिती विचक्षण ॥ दीर्घ अवलोकन करूनियां ॥ ९१ ॥ निधान साधावयालागीं ॥ अहोरात्र कष्टती योगी ॥ कीं आत्मानुभवी चित्सुख भोगी ॥ विज्ञान वितरागी अहंब्रह्म कल्पी ॥ ९२ ॥ सी सुरेंद्र हें थोरपण ॥ एकीकडे ठेविजे आच्छादून ॥ सेवकांचा सेवक होवोन ॥ अलभ्यलाभ साधिजे ॥ ९३ ॥ साहाणेंसी चंदनापरी झिझावें ॥ तैसें साधुजनांसीं निववावें ॥ टांकियाचे जैं घाव सोसावे ॥ तरीच पावावें देवपण ॥ ॥ ९४ ॥ असो ऐसि या सुविचारा ॥ बोधिलें धरीं परम चतुरा ॥ बळीसीं सांगोन सारासारा ॥ कार्य साधें ऐसें

करीं ॥ ९५ ॥ परिसोन जगज्जनकाची वाणी ॥ शीघ्र निघाला वज्रपाणी ॥ पातला तैं त्र्बळी वैसला सिंहासनीं ॥ जेवीं निशाकिरमणी गगनोदरीं ॥ ९६ ॥ इंद्रासीं देखोन बळीनें ॥ प्रत्युत्स्थानीं गौरवून ह्मणे ॥ कां झालें आपुलें येणें ॥ विसरोन वैर संबंधासी ॥ ९७ ॥ सर्व सोडोन अभिमान ॥ किमर्थ आलेती असन्मानें ॥ हे सहस्त्राक्षा करोन श्रवण ॥ विस्तारेसीं मजसांगें ॥ ९८ ॥ परिसोन बळीरावाचें उत्तर ॥ उत्तर निवेदी सुरेश्वर ॥ ह्मणे अमृता विणें सर्व अमर ॥ श्रम आपार पावले ॥ ९९ ॥ क्षमा करोन सर्व अपराधू ॥ श्रेष्ठ आपणचि करुणा सिंधू ॥ अंतरीं सोडोन निषेधू ॥ धाकुटे बंधु प्रतिपाळीं ॥ १०० ॥ जे आहली ते उत्तम करणी ॥ द्वेष टाकावा अंतःकरणी ॥ समुद्र मंथनासीं करोनि ॥ चतुर्दश रत्नें वाटोन घ्यावीं ॥ १ ॥ तुह्मां अह्मांतें विरोध गोष्टी ॥ जाहल्या चतुर्दश रत्नासाठीं ॥ बंधु मर्यादेसीं पडली तुटी ॥ आज पर्यंत स्वामियां ॥ २ ॥ आतां सर्व द्वेष टाकोन मना ॥ समुदायीं उठावें मंथना ॥ दैत्येंद्र हास्य करोन वदना ॥ सुरेंद्रासीं वदतसें ॥ ३ ॥ भला हे सहस्त्रनयना ॥ दीर्घ दृष्टि सिंहावलोकना ॥ करोन पातलासी सद्बासना ॥ अकल्प कल्पना खंडिली ॥ ४ ॥ असो दैत्य मिळोन उद्भट ॥ घनघोर सैन्य संघाट ॥ चातुरंग चमू समुद्रींचे लोट ॥ क्षीराब्धितट नीट पातले ॥ ५ ॥ अपार दैत्य जगजेटी ॥ अमरेंद्रा सहित देव तेतीस कोटी ॥ कुंजर भेरींचिये बोभाटीं ॥ समुद्रतटाकीं उभय उत्तरले ॥ ६ ॥ दैत्य अमर राहून सिंधुदरडी ॥ रवी केली मंदराचळाची करडी ॥ वासुकीची करोन बारडी ॥ तैं विष्णूनें मुराडिली गोष्टि ऐका ॥ ७ ॥ सुरवरांसीं ह्मणे पद्मारमण ॥ श्रेष्ठांग धरावें वासुकी वदन ॥ पुच्छाग्र धरोन दैत्यांनीं ॥ समसमान मंथन करावें ॥ ८ ॥ परिसोन विष्णूचें दैत्यें वचन ॥ वृषपर्वा झाला क्रोधायमान ॥ विष्णूसीं वदे घनगर्जन ॥

धिःकारोन ते समर्थी ॥ ९ ॥ आह्मीं श्रेष्ठ प्रतिष्ठित जाण ॥ असोनि अमरां धाकुटेपण ॥ तयांसीं श्रेष्ठ विभाग काय ह्मणोन ॥ देसी आह्मां देखतां धाकुटियां ॥ १० ॥ मूळ पासोन वैर संबंधु ॥ आचरोन ह्मणविसी अनाथबंधु ॥ हा तुजलागीं उत्तम शब्दू ॥ विरोध उपजविसी देवांतें ॥ ११ ॥ हितोपदेशें हितशत्रुवत ॥ अमर वर्तती तुझे-चि चित्तें ॥ ह्मणोन आज पावेतों अनर्थ ॥ देव भोगिती तव योगें ॥ १२ ॥ आह्मीं मुळींच प्रताप दिनकर ॥ असोन आच्छादिती अमरांचे कर ॥ कमी जाणोन सर्व सुरवर ॥ श्रेष्ठत्व देसी तूं तयांतें ॥ १३ ॥ तरी तुह्मींच करा समुद्रमंथन ॥ वांटोन द्यावी चतुर्दश रत्नें ॥ अंध झालीं असोन सहस्र नयनें ॥ तव ज्ञानांजन लेवोनियां ॥ १४ ॥ वृषपर्वा वदतां ऐसें ॥ उत्तर दिधलें जगन्निवासें ॥ विसरोन बोलिलों मीं ऐसें ॥ श्रेष्ठांग धरावें ह्मणो-नियां ॥ १५ ॥ सुरेंद्रें दिधलें जें जें वचन ॥ तें तें सत्य करावें त्रिदशगण ॥ पुच्छाग्रीं धरावें सहस्रनयनें ॥ श्रे ष्ठांग धरावें दैत्यांनीं ॥ १६ ॥ ऐसें ऐकोन असुरेश्वर ॥ वासुकीवदन दनुज कुमर ॥ धरितां तें पुच्छाग्र अमर ॥ जयजयकारें गर्जती ॥ १७ ॥ काळानळांतून देव ॥ कडेसी काढी वासुदेव ॥ त्रिजगीं धन्यकेलें सदैव ॥ रमा धवें आवडी ॥ १८ ॥ असो दैत्य देव तेतीसकोटी ॥ मंथन करिती परमहटीं ॥ तों कनकाद्रि चालिला समुद्र तळवटीं ॥ देव दानवां सहित ॥ १९ ॥ तें अमर ह्मणती कैठभारी ॥ कनकाद्रि चालिला सिंधूदरीं ॥ हें परिसोन वैकुंठ विहारी ॥ क्षीरसागरीं कुर्म जाहला ॥ २० ॥ तें कनकाचळाचिये तळवटीं ॥ कूर्म हरि होऊन वाढवी पृष्टी ॥ तें देव दैत्यांचिये थाटी ॥ मंथन आरंभ मांडिला ॥ २१ ॥ कनकाचळाची प्रचंडरवी ॥ देव दानवीं जय जय रवी ॥ समुद्रीं चक्राकृति फिरवि ॥ हरिहर शब्दें करोनियां ॥ २२ ॥ घुसळितां अमृतसे मंदराचळ ॥

खळबळिलें तैं सिंधूजळा ॥ तेव्हां वासुकिचे मुखाग्नीच्याज्वाळा ॥ सिंधूजळातें मिसळती ॥ २३ ॥ वासुकीचे विषान
ळाच्या भडाडीं ॥ सिंधूपाणी कढतसें कडकडाडीं ॥ दानव दग्धकेले विषाग्नि धडाडी ॥ फणिवदनाग्नि करोनियां ॥
॥ २४ ॥ दानव दग्धले सर्व विषानळें सकळ ॥ या संकटापासोन काढितां सबळ ॥ तुजखेरीज कनवाळ ॥ कव-
ण तो सांगें मृडहरा ॥ २५ ॥ पोळले विषाग्नीनें दानवसारे ॥ सदाशिवातें कांहीं तरी नवसारे ॥ ज्याच्या स्मरणें
भवकांसारसारें ॥ मृगजळ तुषार होय असंसारिया ॥ २६ ॥ हरहर शंभो शूळपाणी ॥ आमुचे दग्धले चरण पाणी
॥ घेऊन विकोश करीं चक्रपाणी ॥ विषमूळकंदरी परिहारीं ॥ २७ ॥ भवांबुधींचें करितां मंथन ॥ सत्यसद्बुद्धीचे
त्रिदशगण ॥ कामक्रोधादि निशाचर गण घेऊन ॥ तृष्णेच्या परिवारा सहित ॥ २८ ॥ पातले ते भवसागरती
रा ॥ धैर्य मंदराचळ करोन बरा ॥ बारडी केली भुजंगम आकारा ॥ कुंडलिनी ह्मणती त्यासीं योगी ॥ २९ ॥
असो सत्य सद्बुद्धीचे सुरवर ॥ काम क्रोध तृष्णा असुरभार ॥ संसारसागर मथितां सारासार ॥ कंदर्प सर्प ग-
र्जिन्नला॥ ३० ॥ अषचित विषाग्नीची लहर ॥ पडली काम क्रोध दैत्यांवर ॥ आशा मनसा मद मच्छर वैश्वानर ॥
जाळील क्रोध परिवारा ॥ ३१ ॥ हें पाहोन महद्भुत ॥ काम चिंतील अनुहात उमाकांत ॥ त्रिपुटीहून चंद्रार्ध घे-
ऊन त्वरीत ॥ श्रीगुरुनाथ पावला ॥ ३२ ॥ गुरुनाथकृपे भवांबुधी ॥ जाहला मंथिता सच्चिदाब्धी ॥ विषय काळ
कुटाच्या खंडिल्या व्याधी ॥ मृत्यु दारीद्र्य नासिलें ॥ ३३ ॥ ऐसें देव दानव करितां कंदन ॥ विषयविषाग्नीनें
विषम दैत्यगण ॥ दग्धतां स्मरती अपर्णारमण ॥ धांवोन आला समुद्रतीरा ॥ ३४ ॥ प्राशितां महादेवें विषानळा
॥ तैं देव दानव मंथन सकुळा ॥ करितां चतुर्दश नवनीत गोळा ॥ होऊन चौदाही बाहेर पातलीं ॥ ३५ ॥ का-

मधेनुआदि रत्नें चौदाहीं ॥ बाहेर पातलीं दैदिप्य पाहीं ॥ वांटोन घ्यावयाची सत्वराही ॥ ब्रहस्पति देवांसीं वां
टितसे ॥ ३६ ॥ कामदुधा वसिष्ठासीं हर्षी ॥ दिधली रंभा ऐरावत अमृतकलशा ॥ पारिजातादिक त्रिदशां ॥ दे-
ऊन शचिवर पूजिला ॥ ३७ ॥ हरिधनु कौस्तुभ दक्षिणावर्त ॥ लक्ष्मीस देऊन लक्ष्मीकांत ॥ पूजिला अमरीं
वैकुंठनाथ ॥ दिनकरांते सप्तमुखी दिधला ॥ ३८ ॥ कल्पद्रुम आणि धन्वंतरी ॥ बृहस्पतीनें ठेविले चिदांबरीं ॥
विद्याभ्यास करावया घरीं ॥ चंद्र राहिला बृहस्पतीचे ॥ ३९ ॥ देखोन चंद्र कल्पद्रुम ॥ बृहस्पतीकांतेसी उपज-
ला काम ॥ इच्छितां चद्रांग भुजंगम ॥ दंशतां क्षयरोगी जाहला ॥ ४० ॥ असो तोहा आकाशीं चंद्रमा ॥ कल्प
द्रुमादि विषानळ गरिमा ॥ सुरा ठेविली दैत्योत्तमा ॥ चतुर्दशरत्नें यापरी ॥ ४१ ॥ येरीति घेतलीं चतुर्दशरत्नें॥
सुरादैत्यांसीं दिधली प्रयत्नें ॥ हें लक्षोन बुद्धिकृतघ्ने ॥ दैत्य समुदाय क्षोभला ॥ ४२ ॥ आह्मां श्रेष्ठांचे साक्षीक-
रोन ॥ रत्नें वांटावीं कनिष्ठानें ॥ ऐसें असोन अचळवचन ॥ ह्मणोन मंथना आह्मीं पातलों ॥ ४३ ॥ आह्मां विर-
हित कुटिळपणीं ॥ रत्नें वांटिलीं सांगा कवणी ॥ अतितीव्र सज्जोन वाहिनी ॥ वज्रपाणि धरारे धांवा ॥ ४४ ॥
वृषपर्वा ऐसें वदतां रोषें ॥ युद्धा पातले रणकर्कशें ॥ संग्राम करी धराधीश ॥ सुरेश्वरासीं पराभविलें ॥ ४५ ॥
हिरोन घेतला सुधाकलश ॥ मागें परतला दैत्यरोष ॥ हें पाहोंन हाहा क्लेश ॥ विष्णूसीं सुरेश वदतसे ॥ ४६ ॥
मातें पराभवोन तीव्र जाती ॥ युद्धा घेवोन दैत्यजाती ॥ स्वधामासीं क्रोध चित्तीं ॥ धरोन दैत्य परतले ॥ ४७॥
श्रम पावलों सुधेसाठीं ॥ अहोरात्रीं झालों कष्टी ॥ कैसा अमृत घट शेवटीं ॥ वैरियाकरतटीं लागला ॥ ४८ ॥
आतां कायकरूं देवादिदेवा ॥ यदर्थीं वदावें वासुदेवा ॥ आमुचा प्रारब्धाचा ठेवा ॥ कैसा रमाधवा सांगपां ॥ ४९

विष्णु ह्मणे हे सहस्रनयना ॥ क्षणैक धीरधरोन आवरींमना ॥ सुधाकुंभ घेवोन येतो सुजाणा ॥ मोहिनीरूपासीं धरोनियां ॥ ५० ॥ विष्णु मोहिनी स्वरूप जेव्हां नटला ॥ त्रैलाक्यसौंदर्य एकवटला ॥ तेव्हां घुंगरुनाद पैजणीं उमटला ॥ कीं विरहसमुद्र फुटला दैत्यभूमी ॥ ५१ ॥ जगन्निवास जगन्मोहन ॥ जंघ जानु पयोधर पीन ॥ जलज ज्वाला जलजघर्ण ॥ जलज लोचन श्रीहरी ॥ ५२ ॥ ऐसा त्रिभुवनेश्वर मनमोहरी ॥ पुष्पें वेंचितसे वनगंव्हरीं ॥ हें लक्षोन असुर भारीं ॥ जयजयकारें गर्जिन्नले ॥ ५३ ॥ वृषपर्वा ह्मणे हे लावण्यलहरी ॥ किमर्थ फिरसी या घोरकांतारीं ॥ चाल माझिया हेम मंदिरीं ॥ इंद्राहून शतगुणीं संपदाभोगीं ॥ ५४ ॥ वृषपर्वा वदत विनय वचना ॥ ते मोहिनी करी हास्यवदना ॥ ह्मणे दैत्येंद्रा माझिये मना ॥ आवडी असे तवबोला ॥ ५५ ॥ तुझिये ऐसें माझे मनीं ॥ वर्ततअसे सहस्रगुणीं ॥ परीमुखचंद्रमा कां म्लन किरणीं ॥ कवण्या विचारें सांगपां ॥ ५६ ॥ तुह्मीं आणि त्या सुरवरां ॥ मंथन करितां कां पातला निकरा ॥ मुळापासोनि वैराकारा ॥ तुह्मांसीं अविचारीं वर्तती अमर ॥ ५७ ॥ हें नारदमुखीं मजलागीं पहिलें ॥ समुद्रमंथनार्थीं आला हें कळलें ॥ ह्मणोनि कौतुकार्थीं येथें पातलें ॥ असुरेश्वरा सुजाणा ॥ ५८ ॥ तुह्मां बळियांसीं अखंड विरोधू ॥ करितां अमर पावती वधू ॥ सहस्र नयन असोन अंधू ॥ केवीं कळोन झाला कळेना ॥ ५९ ॥ ऐसें वदतां जगमोहनी ॥ दैत्य चमत्कारिले समस्त मनीं ॥ ह्मणती उत्तमांगी शुभकल्याणी ॥ परचित्त परीक्षणीं तूंचि सांगपां ॥ ६० ॥ माझिये मनींची फार असे आवडी ॥ तूंचि अमृत घेऊनि आह्मांसीं वाढीं ॥ बैसवोन सुरांसुरांच्या परवडी ॥ सुधा वाढीं मम वल्लभे ॥ ६१ ॥ विष्णूसीं लाभली रमावल्लभा ॥ इंद्रातें प्राप्त झाली रंभा ॥ ईश्वरें आह्मांतें चंद्रार्कबिंबा ॥ निर्मोन तुजलागीं धाडिलें येथें ॥ ६२ ॥

तरी सुधाकुंभ रंभोरुहाती ॥ घेवोंन आदरें आपुले हातीं ॥ वाढितां तूं प्रेमें शुचिर्भूतीं ॥ आह्मांतें आनंदाब्धी उचंबळे ॥ ६३ ॥ वृषपर्वा वदतां ऐसी वाणी ॥ अवश्य ह्मणे सारंगपाणी ॥ देव दैत्यें यावें स्नान करोनी ॥ अमृतपानीं तोषवीन ॥ ६४ ॥ ऐसें परिसोन दानववीरीं ॥ सुधाकुंभ देवोन मोहनीकरीं ॥ ते वदे स्नान करोन सुरासुरीं ॥ परिसोनि सभागारीं बैसले ॥ ६५ ॥ सुधाकलश घेवोन हातीं ॥ दैत्यासीं घालून भ्रांती ॥ ह्मणे अमृत वाढावयाची युक्ती ॥ कवणें रीति सांगपां ॥ ६६ ॥ दैत्येंद्र ह्मणे हे शुभानने ॥ चातुर्यभरिते नवनिधाने ॥ त्रिदश गणेसीं आधीं अमृतपान ॥ करोनि पश्चात आह्मीं तुह्मीं ॥ ६७ ॥ ऐसें वदतां दैत्येंद्र जाती ॥ अमृतकलश घेवोन स्वहस्तीं ॥ पातली अमरांचिये पक्तीं ॥ अमृत वाढावया आदरें ॥ ६८ ॥ सुधावाढितां देवांसी ॥ पीतांबर लोळे भूमिकेशी ॥ तें मस्तकावरोन स्कंदप्रदेशीं ॥ पदर पडिला मोहिनीचा ॥ ६९ ॥ सुनीळ कुंतळ भ्रमरवर्णी ॥ माणिगण गुंफिले भुजंगमवेणीं ॥ भ्रुकामुकी शरसंधानीं ॥ दैत्य कुरंग मन वेधिलें ॥ ७० ॥ जगन्मोहिनीचें दिव्य स्वरूप ॥ दैत्येंद्र लक्षितां ल्हदयीं कंदर्प ॥ दंशक दंशितां भव रज्जुसर्प ॥ विषय विगलित झाले ॥ ७१ ॥ आधींच दैत्य त्यामाजी दुराभिमानी ॥ तशांत मदांध झाले मद्यपानीं ॥ त्यावरी विष्णुमोहिनीची झडपणी ॥ दैवयोगें असुरांसी जाहली ॥ ७२ ॥ मोहिनीचे नवयौवन ॥ अंगप्रत्यंगीं अवयवपूर्ण ॥ लक्षिले अंबरांतूनि गौरवर्ण ॥ कीं कनक कुंभचंचळांवरीं ॥७३॥ ऐसी मोहमतंग गजगामिनी ॥ कीं लावण्य गगनींची सौदामिनी ॥ त्योनवाढितां अमृत सुपाणी ॥ नासाग्रीं मुक्ताफळ झळकतसे ॥ ७४ ॥ सुधा वाढितां त्रिदशपंक्ती ॥ द्विजराजमुखी गजराजगती ॥ मृगराजकटी किंकिणीच्या दीप्ती ॥ वांकी तोडर चंद्रार्कप्रभा ॥ ७५ ॥ हें पाहोन सिंहिकासुतें ॥ देवस्वरूप धरोन

निरुतें ॥ बैसला चंद्रार्क मध्य आलिसें ॥ असुरसुरनरां नकळतां ॥ ७६ ॥ तें अमृत ओगारित मोहिनी ॥ पातली जे शशि वासरमणी ॥ तें अमृत वोपिलें राहूचे पाणीं ॥ श्रीहरीतें नकळतां ॥ ७७ ॥ अमृतबिंदु राहुकरीं ॥ मोहनीस नकळतां तो स्वीकारी ॥ हें पाहोन चंद्र दिवाकरीं ॥ भ्रुसंकेत दाविला मोहिनीतें ॥ ७८ ॥ जाणोन चंद्रार्क संकेती ॥ श्रवणीं सुदर्शन कुंडलाकृती ॥ तेंचि सोडोन देदिप्यकांती ॥ राहुमस्तकासीं छेदिलें ॥ ७९ ॥ अमृत सेविलें दैत्यभावें ॥ यालागीं शिरच्छेदिलें वासुदेवें ॥ अमर जाहले सुदर्शनोद्भवें ॥ गर्जना करित गेले गगनोदरीं ॥ ८० ॥ कैंची कामिनी देखोनि भुलला ॥ हाचि विष्णु मोहिनी अवगला ॥ इचें लावण्यपाहोन उगेंचि फुगला ॥ परी अमृत न लाभे तुह्मांतें ॥ ८१ ॥ ऐसें गर्जतां सिंहिकासुत ॥ तें विष्णूनें अमरनाथातें ॥ बोधोन सुधाकुंभ स्वहस्तें ॥ देवोन स्वर्गासीं पळविला ॥ ८२ ॥ सुरापानीं असुर रत ॥ होवोन नाचती समस्त ॥ तें राहूची ऐकोनिमात ॥ असुर आद्भुत खवळले ॥ ८३ ॥ जेवीं कल्पांत सिंधुजळ ॥ महीवरी पसरिजे सप्तावर्णव सकळ ॥ ते दैत्य करावया रणतुंबळ ॥ सैन्यभार सिद्ध जाहला ॥ ८४ ॥ दायादभावाचा वैर संबंधू ॥ स्मरोन दैत्र दानव उभय बंधू ॥ युद्धीं मिसळले प्रताप सिंधू वीरश्रीलहरीं गर्जन माजलें ॥ ८५ ॥ तें सुपर्णावरी बैसोन मुरारी ॥ वेगीं संचरे गगनोदरीं ॥ युद्ध करितां रणचत्वारीं ॥ काळनेमी असुर निमाला ॥ ८६ ॥ असो ऐसें असुर सुरवर ॥ युद्ध करितां श्रमले फार ॥ तेव्हां बिधीनें धाडिला आपुला कुमर ॥ संग्राम समयीं नारद ॥ ८७ ॥ एकें बळिया असुरेश्वरा ॥ सर्व कळलें समाचारा ॥ युद्ध समाप्त करावें चतुरा ॥ सावित्रीयाग करावया ॥ ८८ ॥ नर्मदातटाकीं करावा शतमख ॥ तें सहज होतील अमर परांग्मुख ॥ तेव्हां बश होईल यदुकुळटिळक ॥ द्वारपाळ

हरि होईल तुझा ॥ ८९ ॥ ऐसें बोधोन असुरेश्वरा ॥ मागें परतविलें दळभारा ॥ तैं पासोन चंद्र दिवाकरा ॥ राहु केतु नाम द्वय ग्रहणीं ॥ ९० ॥ ह्मणोन चंद्रार्क कष्टती ग्रहणीं ॥ हें प्रत्यक्ष देखिजे नयनीं ॥ ऐसी आमुची अजन्मकाहाणी ॥ जालंदरा नरसुरेंद्रा ॥ ९१ ॥ अमृत प्राशितां अमर होणें ॥ ऐसें होतें बहुतेक दिनें ॥ सुधा सेवितां विच्छिन्हें ॥ बळेंचि सुदर्शनें द्विविधा केलें ॥ ९२ ॥ यास्तव नाहीं चरण पाणी ॥ हे विधि लेखनाचि शिराणी ॥ प्राप्त जाहली पूर्वाचरणीं ॥ दैवी करणी विचित्र ॥ ९३ ॥ ऐसें परिसोन राहूचें वचन ॥ जालंदर जाहला क्रोधायमान ॥ चंड मुंडादि मधुकैठ भंजन ॥ रक्तबीजादिक बोलाविले ॥ ९४ ॥ पूर्वी रक्तबीजासीं धाडिलें कस्वीरा ॥ राज्य करित हरोनि खेचर भूचरां ॥ महाकाळीनें करोन घोरसमरा ॥ रक्तबीजासीं वधियेलें ॥ ९५ ॥ चंडमुंडादि मधुकैठभा ॥ मत्तमातंग शुंभनिशुंभा ॥ हे काम क्रोध मद मत्सर दंभा ॥ यांनीं मानसतुळजापुर घेतलें ॥ ९६ ॥ यांचा वीररसाद्भुत प्रतापतरणी ॥ उगवला असे लक्ष्मी विजयगगनीं ॥ श्रवण करितसे अगस्तिराणी ॥ अष्टादशाध्यायीं संपूर्ण ॥ ९७ ॥ घस्मरु जावोन वैकुंठभूवना ॥ भेटोनि पत्र दिधलें मधुसूदना ॥ जालंदर श्वशुराचे करोन कंदना ॥ चतुर्दशरत्नें आणिलीं पूर्वीं ॥ ९८ ॥ त्यांच्या कंदनारंभीं प्रतापकरणी ॥ तुळजामहात्मीं श्रीव्यासवाणी ॥ वदली सप्तशीतीपद्मपुराणीं ॥ सुजाण सुचक हे संज्ञा ॥ १९९ ॥ असो जालंदर प्रतापतरणीं ॥ प्रकाश व्यापिला चतुर्दशभूवनीं ॥ विष्णूसीं पत्र पाठविलें तत्क्षणी ॥ भेटीसीं यावें स्वपरिवारें ॥ ॥ २०० ॥ भुजंगावरी करोन स्वारी ॥ मग आमुचे पत्रार्थासीं श्रवण करीं ॥ शुदर्शन घेवोनियां करीं ॥ येऊनि मजकरीं सत्वर यावें ॥ १ ॥ न यालं पत्रदर्शनीं ॥ सैन्यासीं येणें घडेल अर्धक्षणीं ॥ सहस्र कार्यासीं

विसर्जोनी ॥ भेटीसीं यावें कृपानिधी ॥ २ ॥ जालंदराची प्रतापगरिमा ॥ पत्रार्थीं श्रवण करितां श्रमा ॥ विष्णु पावता जाहला विरामा ॥ स्थावरजंगमादि सुरवर ॥ ३ ॥ राहूची परिसोन सुकृत विटंबना ॥ जालंदर खवळला हुतांश किरणा ॥ ज्याची वृंदा पट्टराणी जाणा ॥ पतिव्रता जी प्रख्यात ॥ ४ ॥ ऐसे चिंतार्णवीं पडिले सुरवर ॥ तंव इकडे काय करी जालंदर ॥ वेषधारी श्रीशंकर ॥ जाहला वृषभध्वज अवतारी ॥५॥ होऊन स्वयें शूलपाणी ॥ शिवगणासीं पातला कैलास भुवनीं ॥ पार्वती देखोन एकांत सदनीं ॥ जालंदर त्रिपुरांतक वदतसे ॥ ६ ॥ कामचेष्टित संभाषणीं ॥ आजि का झालां खड्गपाणी ॥ ह्मणे कां वो वैकुंठ भुवनीं ॥ फार दिवस राहिला होता ॥ ॥ ७ ॥ काय करितसे जगन्नाथ ॥ आदि सांगावें जी निवांत ॥ मग करीन मीं पूर्णमनोरथ ॥ हें यथार्थ जाणें गंगाधरा ॥ ८ ॥ ऐसें अपर्णाचें उत्तर ॥ परिसोन मायीक जालंदर ॥ तो ह्मणे जाहला विरहज्वर ॥ विष्णु विलास क्रीडा लक्षोनियां ॥ ९ ॥ विरहानळ भगावतार ॥ कदापि न होय अविचार ॥ अंतरीं करितां दीर्घ विचार ॥ ही जालंदर करणी समूळ जाणिली ॥ १० ॥ मायादुरितदैत्य भंजनी ॥ प्रति बिंब ठेऊन कैलास भुवनीं ॥ पातली वैकुंठासीं श्रीभवानी ॥ जालंदर करणी समूळ कथियेली ॥ ११ ॥ तैं विष्णु ह्मणे हे जगदंबे ॥ अवतार धरावे चंद्रार्क बिंबे ॥ मधुकैभाठदि शुंभ निशुंभ ॥ अष्टादश भुजदंडीं खंडावे ॥१२॥ जाज्वल जालंदर परीवार ॥ जाचील अष्टपीठींचे ऋषि मुनिवर ॥ ज्वाला मुखीसी अष्टपीठीं अवतार ॥ जालंदरापरिवारेसी वधावें ॥१३॥ जाणोन विष्णूच्या भविष्योत्तरा ॥ घेऊन नवकोट चामुंडा परिवारा ॥ पार्वती पातली माहुरा ॥ तुळजापुरा तदनंतर ॥ १४ ॥ श्रीभवानीनें मधुकैठभ ॥ चंडमुंडादिक शुंभ निशुंभ ॥ हे जालंदराचे दुर्धर स्तंभ ॥ अष्टपीठांवर मंटपीं

टेंकले ॥ १५ ॥ तें शक्तिकुठारें खंडिले उदंड ॥ सप्तशृंगीं दनुज प्रचंड ॥ भक्षिले करीं जेवीं इक्षुदंड ॥ दैत्यबंड जुंबाड खंडिला ॥ १६ ॥ अनेक शक्तिपीठें असती भूमंडळीं ॥ श्रीव्यासें कथिलीं जाज्वल सकळीं ॥ तीं पद्मपुराणीं रुद्रयामेळीं ॥ विस्तारेसीं वर्णिलीं ॥ १७ ॥ तुळजामहात्म्यींचा वदतां विस्तार ॥ कथार्थ वाढेल यदर्थीं फार ॥ ह्मणोन संज्ञार्थ हा पंडित चतुर ॥ पद्मपुराणांतरीं पाहोत ॥ १८ ॥ असो जाज्वल जालंदर घेवोन सेना ॥ विष्णुसहित कैलासराणा ॥ वेढोन करितसे घोरकंदना ॥ शतसंवत्सर गणना प्रतापी ॥ १९ ॥ विष्णु ह्मणे हे अपर्णावरा ॥ तुह्मीं जावें वाराणसीपुरा ॥ युद्धीं गोंवावें जालंदरा ॥ पांचसहस्र संवत्सर ॥ २० ॥ जालंदर होवोन सदाशिव ॥ पार्वतीसीं दाविला तुमचाभाव ॥ तैसा आह्मीं अभिप्राय ॥ जालंदर होऊनि जातसों ॥ २१ ॥ वृंदा जालंदराची राणी ॥ पतिव्रतेमाजी अग्रगणी ॥ ह्मणोन समदळीं प्रतापतरणी ॥ अजिंक्य जालंदर सुरनरां ॥ २२ ॥ तुमचें ऊर्ध्वरेत समुद्रजीवनीं ॥ पडतां जन्मला जाज्वल तरणी ॥ ह्मणोन अजिंक्य रणांगणीं ॥ हुतांशकिरणी जालंदर ॥ २३ ॥ शंकर ह्मणे हे मधुसूदना ॥ जालंदर कैसेनि पावेल मरणा ॥ श्रमलों शतवर्षें करोन कंदना ॥ तो प्रथम दिवसाहोन आगळा ॥ २४ ॥ जैं शिनीवाली पासोन वृद्धिआगळी ॥ राके पर्यंत षोडशकळी ॥ प्रकाश मिरवी रणमंडळीं ॥ देव दैत्यदळीं ऐसा न देखों ॥ २५ ॥ आह्मीं श्रमलों शतसंवत्सर ॥ चंद्रवृद्धिपरी जालंदर ॥ युद्ध करितसे घोरांदर ॥ निराहारी निरोदकी ॥२६॥ आह्मांसारखा युद्धीं श्रमला ॥ परीजालंदर अधिक मज गमला ॥ कीं पवनें हुतांश भुजंगम फुलला ॥ नाहींच उगवला रणांगणीं ॥ २७ ॥ ऐसें वदतां महादेवें ॥ जालंदर ऊर्ध्वरेतें समुद्रीं संभवें ॥ आश्चर्यें बोले रमारमण जीवें ॥ ह्मणोन अभंग असे संग्रामीं ॥ २८ ॥ आणखीं नव-

ल ऐकावें महेशा ॥ वृंदा वश होईल परपुरुषा ॥ तेव्हां तो पावेल प्राणनाशा ॥ घोरसंग्रामीं जालंदर ॥ २९ ॥
ऐसें परिसोन त्रिपुरांतक ॥ विष्णु ह्मणे पाहीं रणकौतुक ॥ जालंदरासीं करितां देख ॥ युद्धारंभ वाराणशीपुरीं ॥
॥ ३० ॥ अदृश्य होऊन शंकर सारंगपाणी ॥ पातले मनकर्णिके तटणीं ॥ हें जाणोन जालंदर मनीं ॥ घन ग-
र्जनीं निघाला ॥ ३१ ॥ सैन्य परिवारीं घनघोर ॥ वेढिलें वाराणशी मोक्षपुर ॥ जालंदर आणि श्रीशंकर ॥ दारु
ण संग्रामीं मिसळले ॥ ३२ ॥ तैं विष्णु पातला समुद्रतीरा ॥ जेथें जालंदराची असे दारा ॥ वृंदासती परम च
तुरा ॥ चतुर्दश भुवनीं जे दुर्लभ ॥ ३३ ॥ नगराबाह्यप्रदेशीं ॥ उभाराहिला दिगंबरवेषीं ॥ लीलावतारी हृषिके
शी ॥ ब्रह्मादिकांसीं अगोचर ॥ ३४ ॥ ऐसे जाहले शतसंवत्सर ॥ ग्रामाबाहेर मुरलीधर ॥ तीव्र उभा हें सविस्तार
॥ परिचारीका वृंदेसीं वदती ॥ ३५ ॥ वैराग्य अंबुधींचा सुधाकर ॥ शतवर्षें उभा दिगंबर ॥ निरोदकी निराहार ॥ नि
रपेक्षित मानसीं ॥ ३६ ॥ परिचारिकेची परिसोन वाणी ॥ वृंदा उठली तेचि क्षणी ॥ पातली जेथें अनुष्ठानीं ॥ दिगंब
रपणीं मुरलीधर ॥ ३७ ॥ वृंदा लक्षितां दिगंबरा ॥ साष्टांग घाली नमस्कारा ॥ ह्मणे सर्व व्यापक जगदीश्वरा ॥ का
य लागे तुज सांगणें ॥ ३८ ॥ दिगंबर ह्मणे महासती ॥ जयवंत होवोन तुझा पती ॥ क्षतांग होवोन मध्यरात्री ॥
येईल आतां सुजाणें ॥ ३९ ॥ पाशुपतास्त्रीं होऊन जर्जर ॥ अर्धनिशींत येईल जालंदर ॥ तव दर्शन होईल दि-
व्यशरीर ॥ हें निर्धारः शुभानने ॥ ४० ॥ ऐकोन दिगंबराचें वचन ॥ वृंदा जाहली हर्षायमान ॥ ह्मम
कांत आलिया आपुलें दर्शन ॥ देई मजलागीं स्वामियां ॥ ४१ ॥ ऐसें बोलोन महा सती ॥ पातली
आपुल्या मंदिराप्रती ॥ चंदनागर सुगंध जाती ॥ पुष्प याती बहु वर्णी ॥ ४२ ॥ सुवर्णमंचकीं करून

शयनां ॥ शृंगारमंडिन शशांकवदना ॥ चारुहासीनी कुंदरदना ॥ खंजिरीटनयना हर्षांतरीं ॥ ४३ ॥ ॥ आनंदभरित ऐसी मृगाक्षी ॥ बैसली भ्रतारआगमनअपेक्षी ॥ हें जाणोन संसारसाक्षी ॥ प्रत्यक्ष जालंदर अवगला ॥ ४४ ॥ शतवीरांचे दळभारीं ॥ जालंदर पातला महागजरीं ॥ अर्धनिशाजाहलियावरी ॥ जालंदर ग्रहद्वारीं पातला ॥ ४५ ॥ हें लक्षोन परमचतुरी ॥ पंचारती घेवोन करीं ॥ बाहेर येवोन वरप्रियकरीं ॥ ओंवाळिती घनतनमनें ॥ ४६ ॥ जालंदराधरोनि निजकरीं ॥ घेवोन पातली अभ्यंतरीं ॥ अवलोकितां क्षतांग शरीरी ॥ दिव्य देह जाहला ॥ ४७ ॥ तुमच्या वियोगें चिंतातुर ॥ रात्रंदिवस होतां फार ॥ तैं मातें पाचारोन दिगंबर ॥ तुमचें आगमनोत्तर कथियेलें ॥ ४८ ॥ मध्यरात्री क्षतांग रमणे ॥ देखिसील वो शुभानने ॥ तें प्रत्यक्ष तुमचे चरणें ॥ पूर्वपुण्यें जोडिलें पुनरपी ॥ ४९ संचित क्रियमाण पुनरागमन ॥ दिगंबरवाक्य हें विधिलेखन ॥ सत्य झालें पुर्वपुण्यंजाण ॥ ह्मणोन आलिंगन दिधलें ॥ ५० ॥ जालंदरासीं धरोनि निजकरीं ॥ निद्रिस्थ झाली मंचकावरी ॥ विरहार्णवींच्या पातल्या लहरी ॥ जालंदर सागरीं अपार ॥ ५१ ॥ जेवीं शतमुखीं भागीरथी ॥ रत्नाकराचें चुंबन करिती ॥ कीं सप्तमुखीं गौतमीप्रीती ॥ किंवा उभयमुखीं कृष्णा चुंबी सागरा ॥ ५२ ॥ कीं सुरतानंद कमलसरोवरीं ॥ जालंदरभ्रमर वृंदाभ्रमरी ॥ होवोन रमतां पुढिलार्थ चतुरीं ॥ वदतां गुणिजनीं वारिलें ॥ ५३ ॥ असो जालंदर स्वरूपी कैठभारी ॥ सती भोगिली चमत्कारीं ॥ परि भय उपजलें अंतरीं ॥ श्रीहरीतें तें ऐका ॥ ॥ ५४ ॥ पतिव्रता भयकोंब उगवला ॥ तेणें विष्णु निस्तेज जाहला ॥ शाप देईल आंतां मजला ॥ ह्मणोन गुप्त जाहला मुरलीधर ॥ ५५ ॥ कीं सुरतश्रमाच्या निद्रार्णवीं ॥ समूळ बुडाली स्वधर्मठेवी ॥ कीं देही असोन विदेही

॥ तत्वानुभवी बालोन्मत्त ॥ ५६ ॥ कीं भक्तिप्रेमाची घेवोन धणी ॥ कीं समाधिस्थ योगी अचळ आसनीं ॥ सावध होय हरिकीर्तनीं ॥ तेवीं वृंदा जाग्रत जाहली ॥ ५७ ॥ वृंदा होवोन जाग्रत ॥ पाहोन टकमकां होय चकित ॥ कोठें नदिसे स्वकांत ॥ दृष्टांत किंवा साक्षांतीं ॥ ५८ ॥ स्वप्नावस्था ह्मणावी जरी ॥ तरी संग घडला सबाह्यांतरीं ॥ नाना विलासीं सुरतोपचारीं ॥ पतिमंचकावरी मी रमलें ॥ ५९ ॥ स्वप्न अथवा भय जागृत ॥ कवणा विचारितां नये हा सिद्धांत ॥ लटकें ह्मणावें तरि परिवारयुक्त ॥ मिरवत आला नगरगर्भीं ॥ ६० ॥ क्षतांग जाहला जालंदर ॥ हें विश्वमुखींचें उत्तरोत्तर ॥ परिसीलें अभिनव थोर ॥ प्रारब्धरेषा नटळेची ॥ ६१ ॥ ऐसा करितां दीर्घ विचार ॥ भ्रांती पडली अविकार ॥ ह्मणे हें कर्म अनुचित फार ॥ घडलें वाटे मजलागीं ॥ ६२ ॥ परपुरुषाचा अंगिकार ॥ म्यां करावा तेव्हां तरी हा विचार ॥ भ्रांतिस्थ व्हावें अविकार ॥ ह्मणोन क्रोधांगार नेत्रीं सांडितसे ॥ ६३ ॥ रागें पातली दिगंबराजवळी ॥ जैसी कोपली भद्रकाळी ॥ शब्दांगार टाकितां बाळाबगळी ॥ हें दिगंबरा अवधारीं ॥ ६४ ॥ त्रिपुरांतक आणि जालंदर ॥ युद्ध करिती ते भयंकर ॥ तें मी पाहोन येतसें सत्वर ॥ लिंगदेहें करोनियां ॥ ६५ ॥ ऐसें कथोन दिगंबरा ॥ वृंदा गेली काशीपुरा ॥ तैं विष्णूनें सतीच्या शरीरा ॥ दग्ध केलें ग्रामस्थ हस्तीं ॥ ६६ ॥ एकाएकी वृंदा प्राणा ॥ सोडोन गेली वैकुंठभुवना ॥ यास्तव वृंदेचें प्रेत करावें दहना ॥ आप्तजनांनीं अविलंबें ॥ ६७ ॥ ऐसें वदतां दिगंबर ॥ बिल्व तुळसी गंधचंदनागार ॥ प्रदीप्त करोन वैश्वानर ॥ वृंदा शरिरासीं भस्मकेलें ॥ ६८ ॥ येरिकडे वृंदेनें लिंगदेहीं ॥ जालंदरा पाहतांचि हस्तपाईं ॥ खंडोन पडिला जैसा अही ॥ देखोन स्वदेहीं गजबजली ॥ ६९ ॥ तैं मनोवेगाहून मागें परतली ॥ दिगंबरापासीं धावोन

आली ॥ ह्मणे कुटिला भ्रांति त्वां घातली ॥ मम मति भ्रमली तव संगें ॥ ७० ॥ तूं परब्रह्म श्रीभगवंत ॥ हें नाम तुझें व्यर्थ ॥ माझें पतिव्रतपणाचा महापर्वत ॥ चूर्ण केलासी क्रीयाभ्रष्टा ॥ ७१ ॥ माझिया क्रोधाग्नीच्या ज्वाळीं ॥ भस्म करीन हे पृथ्वी सकळी ॥ त्यांत तुझा कितुका केवा वनमाळी ॥ क्रोधें संतप्त थरकली ॥ ७२ ॥ आतां दुर्धर शाप देईन तुजला ॥ हें विष्णु ऐकोन गजबजिला ॥ ह्मणे क्षमाकरीं वो मजला ॥ होणार भाव तो चुकेल कैसा ॥ ७३ ॥ हें परिसोन वृंदा ह्मणे मुरारी ॥ मच्छापें जडत्व होईं झडकरीं ॥ तूं श्रीविष्णु दीनोद्धारी ॥ ह्मणोन शिळाउत्तम पूज्य होईं ॥ ७४ ॥ ऐक आतां पुरुषोत्तमा ॥ शिळा होईं उत्तमोत्तमा ॥ ऐसें परिसोन सर्वोत्तमा ॥ ह्रदयीं आनंद पूर्ण भरिला ॥ ७५ ॥ वृंदेसीं ह्मणे मधुसूदन ॥ तूं होईं तरु पूज्य सर्वा वर्ण ॥ तुळसी होऊन नामाभिदान ॥ वंद्यहोईं त्रैलोक्यीं ७६ ॥ ह्मणोनि उपासना निशिभार्गव ॥ अर्चन करिती तुज वैष्णव ॥ तुळसीदळ अर्पितां वासुदेव ॥ सोडविला भीमकीनें नारदा पासोनी ॥ ७७ ॥ कनकरत्नांचे गिरिवर ॥ तुकितां न तुळेचि मुरलीधर ॥ तो तुकासीं आला तुळसीपत्रें ॥ वृंदाभक्तिप्रियकर ह्मणोनी ॥ ७८ ॥ यास्तव वृंदेच्या उत्तम क्षोभें ॥ शिळा गंडकीच्या तदारंभें ॥ स्वमूर्ति निर्मिल्या पद्मनाभें ॥ मत्स्य कूर्म दश विधि हयग्रीव ॥ ७९ ॥ गौस्तनीं कांचनीं चक्रांकित ॥ चारी प्रकार लक्ष्मी कांत ॥ षोडश चक्रादि सीताकांत ॥ छत्राकारी दधिवामन ॥ ८० ॥ हिरण्यगर्भ राधादामोदर ॥ त्रिविक्रम लक्ष्मीनृसिंह श्रीधर ॥ शंखचक्र गदाधर शेषशयनीं सुवर्णाकार ॥ संकिरण वदनींचे शालिग्राम ॥ ८१ ॥ चतुर्दशचक्रा पर्यंत ॥ शेषशायी नामें अनंत ॥ ऐशा शालिग्राम मूर्ति प्रख्यात ॥ गंडकीमहात्म्यीं परिसावें ॥ ८२ ॥ हे कथा केदारखंडीं पद्मपुराणीं ॥ कार्तिकमहात्म्यीं अग

स्तिराणी ॥ श्रवण करवितसे अगस्तिमुनी ॥ जळसेनेहून वृंदा आगळी ॥ ८३ ॥ ह्मणोन कार्तिकमासीं वृंदावनीं
॥ लग्न लागतें मंगळध्वनीं ॥ हें प्रत्यक्ष वर्तिजे जनीं ॥ तुळसीलग्न विधिपूर्वक ॥ ८४ ॥ असो सारांश वृंदाजालं
दर ॥ धन्य दोघांचें जन्मांतर ॥ मुक्ति पावला शंकरकरें ॥ वृंदा त्रिगुणमंजरी तुळसी जाहली ॥ ८५ ॥ यद्भावना
कुंभार्कें चेतसा ॥ घट भंगितां दिवाकर अलिप्त तसा ॥ तेवीं वृंदापरपुरुषा ॥ ऐक्य जाहली चिद्विलासीं ॥ ८६ ॥
जो यदर्थीं संशय मानील मनें ॥ तेणें पहावें पद्मपुराण ॥ कार्तिकमाहात्म्यीं ऐसीच खूण ॥ श्रीव्यासें गजानना
हस्तें लिहिली ॥ ८७ ॥ जाहलें रहस्य वृंदाख्यान ॥ पुढें परिसावें स्वस्थमन ॥ द्वादशज्योतिलिंगें संस्थापन ॥ ना
थ स्थापील तें परिसावें ॥ ८८ ॥ इति श्री केदार विजय उदधी ॥ श्रवणें सुस्नार्थी यांचे आधि व्याधी ॥ हरोनि
यावें सुखसंवादीं ॥ हरिखें निजानंदीं डोलती ॥ ८९ ॥ करितां केदारविजय श्रवण ॥ दुरितदुष्कृत होय दहन ॥
हरिनाम सुधा घ्या रसायण ॥ हरिजन सुमनें सेविती ॥ ९० ॥ कीं ह्या केदारविजयजलजजीवनीं ॥ विराजे गि
रा भ्रमरवर्णी ॥ झुकारवंत हरिनाम दिवस रजनी ॥ चत्वारी विंशतिअध्याय गोडहा ॥ ९१ ॥ इति श्रीकेदारवि
जय केदारखंड ॥ पद्मपुराण भविष्योत्तर ॥ गंडकी महात्म्य विरचितायां ॥ जालंदर वध वृंदा उद्धारणो नाम ॥
चत्वारी विंशतितमोध्याय गोडहा ॥ २४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥ ओंव्या ॥ २९२ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीखळनाथायनमः ॥ जय ज्योतिस्वरूपा लिंगांकितांगा ॥ ज्योतिर्मय भस्मांकित उत्तमांगा ॥ ज्योतिःशास्त्रीं प्रखर अभंगा ॥ जंघाग्रीं भुजंगम मंडित चरणा ॥ १ ॥ जन्म संकल्पायुगल्पा ॥ जन्मांतरोद्धारका मनसंकल्पा ॥ जगज्जनक जगहारक विकल्पा ॥ जगदांकुरी सुमनोहरी ॥ २ ॥ ऐसा निर्गुणमंदिरीं ज्योतिस्वरूप ॥ चिद्रत्नागिरि दक्षिणदीप ॥ भरतखंडाग्रीं लाविला साक्षेपें ॥ श्रीलक्ष्मीनें आवडी ॥ ३ ॥ दुष्कृत राक्षसतमाची दाटी ॥ झाली रत्नाद्रीं दरिकंदरीं त्रिपुटी ॥ ह्मणोनि त्रैलोक्यनाथ राज्यपटीं ॥ बैसविला श्रीलक्ष्मीनें आवडी ॥ ४ ॥ लोपामुद्रा ह्मणे अगस्तीतें ॥ ज्योतिलिंग ह्मणावया कारण किमर्थ ॥ जमदग्निख प्राशिला, खळनाथें ॥ पूर्वी तुह्मींच कथिलें मजलागीं ॥ ५ ॥ ज्योतिलिंग हें नामाभिदान ॥ ठेविलें ह्मणसी व्यासवचन ॥ हें विस्तारीन वदें ज्ञान ॥ ज्योतिलिंग हें कां ह्मणती ॥ ६ ॥ दक्षिणायनीं दक्षिणदेशांतरीं ॥ येवोन दैत्य मारिले रत्नागिरीं ॥ ह्मणोन विश्व बोलती दक्षिणकेदारी ॥ दक्षयज्ञांतक हा अवतरला ॥७॥ दीनबंधु हाचि दीनानाथ ॥ ह्मणोन नाम याचें आदिनाथ ॥ ज्योतिलिंग हें नाम विश्वप्रघात ॥ व्यासवचनार्थ कैसा तो विस्तारीं ॥ ८ ॥ लोपामुद्रीवाच ॥ ॥ श्लोक ॥ द्वादश ज्योतिर्लिंगश्च श्रीरत्नाद्रि प्रतिष्टितं ॥ पुजइत्वा केन मार्गं कथयामि विधिपूर्वकं ॥ १ ॥ जटासंयुक्त अश्वत्थं औंदुंबर अशोकद्रुमैः ॥ नाना विहंगम भ्रमणंच अष्टतीर्थं कथमेवच ॥ २ ॥ टीका ॥ अगस्ति ह्मणे हे शुभानने ॥ ऐक आतां सावधान मनें ॥ द्वादश ज्योतिलिंगांचीं पूर्वींच केलीस्थापनें ॥ उत्तरेहूनि येतां घृष्णेश्वरादि त्रयंबका ॥ ९ ॥ बद्रिकाश्रम सोडोन नाथ निघाला ॥ दैत्य मारोनि स्वधर्मस्थापिला ॥ द्वादशलिंगें स्थापोनि चांगला भला ॥ चांग लाभला आह्मातें रत्नागिरीवरी ॥ १० ॥ स्थापिलीं नाथें येते समयीं ज्योतिलिं


अध्याय २५वा
१२ ज्योति लिंगस्थापना

गें बारा ॥ ह्मणोन ज्योतिलिंग हें नाम सौदागरा ॥ श्रुति बोलती नाथ निरंजन जगवनज्यारा ॥ यास्तव सोदा-
गर नाम जनप्रख्यातीं ॥ ११ ॥ द्वादश ज्योतिर्लिंगें अष्टतीर्थ ॥ हें भविष्योत्तरपुराणींचें संमत ॥ काशीखंडाचा हा
मतितीर्थ ॥ श्रीकेदारखंडीं ऐसेंचि मुनि वदला ॥ १२ ॥ करवीरकांड एकलक्ष साठीशत ॥ हा भविष्योत्तरपुराणीं
चा सिद्धांत ॥ वदला सत्यवतीचा सुत ॥ केदारविजयीं वदवीतसे ॥ १३ ॥ ऐसें श्रीनाथ वरदायक चरितांमृत
॥ अगस्तिवदे लोपामुद्रेप्रत ॥ तें चतुर तत्वानुभवी संत ॥ स्वस्थचित्तें परिसोत ॥१४॥ यदर्थीं साक्षात्कार झाला
मजला ॥ तेव्हां भविष्योत्तरार्थ नाथें उमजविला ॥ कपित्थनगरासीं जाईं वहिला ॥ हें त्रिवारवेळां कथियेलें ॥
॥ १५ ॥ जालंदरशापस्थितिसंहार ॥ विष्णुप्रयत्नीं श्रीशंकर ॥ करितां द्वंदा झाली तरुवर ॥ प्रख्यात विष्णुतु-
ळसी प्रियकर ॥ १६ ॥ जालंदरासीं सिंहिकानंदन ॥ विस्तारोन कथिलें समुद्रमंथन ॥ हें चोविसाध्यायींचें निरू-
पण ॥ संत गुणिजनीं परिसीलें असे ॥ १७ ॥ आतां द्वादश ज्योतिर्लिंगें॥ नाथें स्थापिलीं श्रीरत्नाद्रीं निजांगें ॥
रत्नागिरिभूषित स्थावरजंगमें ॥ पंचगंगासंगमीं उद्धरिलीं ॥ १८ ॥ अगस्ति ह्मणे हे लोपामुद्रे ॥ कथा परिसें भ
क्तमनआरद्रे ॥ तुझेनि संवाद शरचंद्रे ॥ भक्त चकोर वृंद तोषवीं ॥ १९ ॥ संह्याद्रि हेचि रत्नागिरिकंदरीं ॥ शो-
भायमान बहु तरूवरीं ॥ वाढिन्नले चुंबितगगनोदरीं ॥ सुगंध लहरीसीं सुरवाढले ॥ २० ॥ शमी वदरी औदुंबर
॥ पंचक पालाशत गर खदिर ॥ बिल्व अच्युत कृष्णागर ॥ श्वेत मंदार निवडंग देवद्वार ॥ ऐन करंज कुडे भोक-
री ॥ २२ ॥ धामण कुंद हिवर हिंगण ॥ पायरी पिंपरी गुगुळी गोधन ॥ सालफळी पांगिरा सागवान ॥ गगनचुं
वित सघन दाटले ॥ २३ ॥ यावनीं बहुतस्याः करवंदी ॥ त्या लवोन भजनीं महीतें वंदिती ॥ तेथें चिलारी

पातली संवादी ॥ जांभळी तोरण दहींवडीतें आदरें ॥ २४ ॥ जेवीं आग्रह करिती लौकिकजनीं ॥ भोजना यावें ह्मणोनी ॥ पदरकरातें ओढिती ओढोनी ॥ गृहा यावें ह्मणोनियां ॥ २५ ॥ ते भेटती प्रियकरी ॥ तैसी तरुवरातें धरी चिलारी ॥ सूर्यकांत अर्जुन द्रुम बदरी ॥ नाना परीच्या दिव्यौषधी लतिका ॥ २६ ॥ दापाळ सेवती दवने वनें ॥ कमळें विकसलीं सुर्य किरणें ॥ अनेक वर्णी पुष्पें विचित्र पवनें ॥ मघमघित दशदिशा ॥ २७ ॥ असो ऐसे वनगंव्हरीं ॥ चतुष्पादांची भीडभारी ॥ वृक जंबूक व्याघ्र केसरी ॥ विषाळ शरीरीं वाढले ॥ २८ ॥ अपार चतुष्पादांची जाती ॥ विचित्रवर्णी विचरती ॥ खळखळां उदकाचे पाट जाती ॥ मेघवृष्टि समृद्धि जळपानीं ॥ २९ ॥ कृष्णपिंपळ जटाधारी ॥ होईल पुढील कलियुगामाझारीं ॥ तेंचि तत्वानुभवीयातें सुवर्णाकारीं ॥ सदैव अखंडित दिसतसे ॥ ३० ॥ हें परिसोन अगस्तिदारा ॥ ह्मणे सुवर्णपिंपळ दाखवीं मुनिवरा ॥ तैं हातीं धरोन प्रियकर चतुरा ॥ सुवर्णपिंपळ दाखविला ॥ ३१ ॥ रत्नासुराचे सुवर्णमंदिरीं ॥ रत्नखचित नवरत्नें गोपुरीं ॥ सुवर्णपिंपळ जटाधारी ॥ जेथें रत्नासुरवैरी नांदतसे ॥ ३२ ॥ गोदावर्या दक्षिणतीरीं ॥ पंचगंगेच्या उत्तरतीरीं ॥ रत्नाचळाचिये गिरिकंदरीं ॥ सुवर्णाचा अश्वत्थ ॥ ३३ ॥ सुवर्णपिंपळ प्रसिद्धजनीं ॥ ग्रंथ्यात असे हे व्यासवाणी ॥ काशीखंडीं जयमिनी ॥ कनकपिंपळ आख्यान कथितसे ॥ ३४ ॥ करवीराचिये उत्तर द्वारीं ॥ संह्याद्रीचे पर्वतोदरीं ॥ सुवर्णपिंपळाची नवलपरी ॥ या द्वापारीं कैंची मुनिवरा ॥ ३५ ॥ जयमिनीच्या शिष्य कौंडिण्यी ॥ ह्मणे कैंचा पिंपळ देखिला नसे कोणी ॥ लटकीच लाघवी वाणी ॥ भविष्योत्तर पुराणींची ह्मणविता ॥ ३६ ॥ तरी मीं जावोन रत्नागिरीं ॥ पाहोन येतों कैशापरी ॥ इतर पिंपळ कीं सुवर्णाकारीं ॥ हे जयमि-

नी निर्धारें ॥ ३७ ॥ सत्य असे सुवर्णपिंपळ ॥ तरीच पुराण श्रवण करावें सकळ ॥ येरवीं सर्वथा हें निर्फळ ॥ बहिश्वरी बाळ ह्मणावें ॥ ३८ ॥ जयमिनी शिष्य वदोन ऐसें ॥ कौंडिण्य पातला मनोल्हासें ॥ जेथें वास्तव्य दक्षिणाधीशें ॥ साम्राज्य विशेषें करितसे ॥ ३९ ॥ दक्षिणप्रयाग करवीर काशी ॥ यात्रा करोनि पंचक्रोशी ॥ पातला रत्नागिरिवरासी ॥ कृष्णापिंपळ पाहिला ॥ ४० ॥ रत्नखचित रत्नागिरी ॥ हेही गोष्टि मिथ्यासारी ॥ हेमपिंपळाची ऐसी मात खरी ॥ जयमिनीची मिथ्या वैखरी जाहली ॥ ४१ ॥ जयमिनीचें असत्यवचन ॥ करावें ह्मणोन असत्यपणें घेवोन ॥ पांचखडे रत्नेंसी गमन ॥ काशीपट्टणी शनैःशनै पातला ॥ ४२ ॥ येवोन वंदिलें जयमिनीसीं ॥ तुमची आज्ञा वंदोन शिरीं ॥ गेलों करवीरक्षेत्रा षण्मासीं ॥ करोन रत्नागिरिवरासी पातलों ॥ ४३ ॥ तरु वृक्षें पाषाण सारे ॥ कैंचा पिंपळ सुवर्णाकार ॥ कैंचि रत्नखचित गिरिमंदिरें ॥ पाषाणागार परिणामीं ॥ ४४ ॥ ऐसी मात ऐकोनि अभिनवीं ॥ जयमिनी पडिला चिंतार्णवीं ॥ ह्रदयीं चिंतितां प्रकाश मिरवी ॥ श्रीव्यास रवि उगवला ॥ ४५ ॥ छळिलें जाणोन कुटिळभावें ॥ ह्मणोन पातला श्रीव्यासदेव ॥ तेथील ओळखण आणितां अभिज्ञव ॥ विस्मित भूदेव मानिती ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विजयद्वार कुशावर्ते हेमाश्वत्थ नीलपर्वते ॥ स्नान कपिल तीर्थायां पुनर्जन्म नविद्यते ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ विजयद्वारीं कुशावर्त निर्मळ ॥ नीलपर्वतोदरीं सुवर्ण पिंपळ ॥ सुस्नाथियां कपिलतीर्थीं सकळ ॥ पुनर्जन्मा न येती प्राणी ॥ ४७ ॥ ऐसी ऐकोन व्यासवाणी ॥ पर्णरत्नांची ग्रंथिका श्रीव्यासचरणीं ॥ ठेवितां वाराणशीच्या महाजनीं ॥ कौंडिण्यासीं बाष्कळता आणिली ॥ ४८ ॥ अपर्याप्त बाष्कळपणीं ॥ वदला वास्तव कौंडणी ॥ ह्मणोन व्यासें नाम पालटोनी ॥ बाष्कळऋषि ठेविलें ॥४९ ॥

हें देखोन कौंडणी ॥ व्यासासीं वदे करजोडोनी ॥ क्षमस्वापराध बादरायणी ॥ दीनवाणीं वदतसे ॥ ५० ॥ श्री
व्यासवदे अभयवचन ॥ ऋषितर्पणीं तुझें नाम उच्चारण ॥ करूनि ब्राह्मण करितील ब्रह्मयज्ञ ॥ आज पासोनि
षट्कर्म आचरितां ॥ ५१ ॥ यास्तव सारासार करोन संबोधन ॥ शास्त्रार्थींचें करोन मथन ॥ दैवी वर प्रसादैक
ग्रंथार्थ वचन ॥ हें अपरोक्ष विज्ञानी जाणती ॥ ५२ ॥ यालागीं दीर्घ सिंहावलोकन ॥ न करितां ग्रंथार्थासीं दूष
ण ॥ न ठेविती तत्वानुभवीय विज्ञान ॥ केदारविजयीं न पाहतां ॥ ५३ ॥ हस्त न टेकवे गगनोदरीं ॥ अंत न
लागे शोधितां सागरीं ॥ श्रीगुरुनाथ विजययज्ञमंडपांतरीं ॥ कुटिळश्वानपुत्राचेनी न निघवे ॥ ५४ ॥ ऐसा पूर्ण
केदारविजयनिधी ॥ तेथें कैंची दुषणव्याधी ॥ हरिनामामृत दिव्यौषधी ॥ सेवितां विषमउपाधी हरपती ॥ ५५
॥ असो यावरी कलशकुमर ॥ स्वकांतेसीं वदे अमलोत्तर ॥ द्वादशज्योतिर्लिंगांचा आकार ॥ करोन श्रीनाथें
अंगीं स्थापिलीं ॥ ५६ ॥ श्रीशैल्य शिखरं दृष्ट्वा ॥ पुनर्जन्म नव्हे मानवा ॥ ह्मणोन ज्योतिर्लिंगें स्थापिलीं अ-
भिनवा ॥ सद्भक्तांनुभवा कारणें ॥ ५७ ॥ कलीयुगीं शतायुष्य नरा ॥ अशक्त अल्पायुष्य शरीरा ॥ होतील ह्मणो
नि ज्योतिर्लिंगें बारा ॥ रत्नागिरीवरी स्थापिलीं पंडित हो ॥ ५८ ॥ तीं बारालिंगें द्वादश श्लोकीं ॥ नाथें स्थापि-
लीं दुर्लभ या भूलोकीं ॥ तें श्रवण करोन पूजावीं पुण्यश्लोकीं ॥ लोपामुद्रेसीं विलोकीं अगस्ति ह्मणे ॥ ५९ ॥
रत्नासुर वधोत्सव करोनी ॥ विजयी झाला खड्गपाणी ॥ निगमचौघडा मंगळध्वनी ॥ चतुर्दश भुवनीं गर्जतसे
॥ ६० ॥ प्रथम ज्योतिर्लिंग बद्रिकेदारी ॥ स्वयें नाथें स्थापिला आपुले करीं ॥ पूर्वाभिमुख जळधारी ॥ षोडशो
पचारीं पूजिला ॥ ६१ ॥ गंगोत्री चपलचारीमहापहारी ॥ काशीपूरीं त्रिपथगामिनी तीर्थेसारीं ॥ मंत्रोत्तरींच

मन कर्णिक विश्वेश्वरीं ॥ तो विश्वनाथ शक्तिसन्मुखीं ॥ ६२ ॥ दधि मधु घृत शर्करीं ॥ पंचामृतेसीं पंचधारीं ॥
मधुपर्केसीं अभिषेक करी ॥ काळभैरी खळनाथ आज्ञेनें ॥ ६३ ॥ चर्पटअंबेच्या सन्मुख प्रसिद्ध ॥ जो श्रीरामे
श्वर सेतुबंध ॥ तो हा रामलिंग नवविध ॥ यथाविधि स्थापिला ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बद्रिनिवास वरपांडव
वंदितांघ्रीं हेमाचलं अचलराज्य परायणेन ॥ श्रीव्यास शौनकऋषिगण पूज्य देवं प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्यो-
तिलिंग ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ बद्रिकेदार पांडवार्चिता ॥ हेमाचलादि नारायणा सुरवंदिता ॥ श्रीव्यास शौन
कऋषि पूजिता ॥ प्रभातें ज्योतिलिंग स्मरोन पूजावा ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पौलस्ति संतिजयंकृत सेतुबं-
धन रामेश्वरो वीर प्रसिद्ध सुदक्षिणेन ॥ श्रीरामनाम त्रयोदश मंत्रासारं प्रातर्भवामिस्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ५
॥ ॥ टीका ॥ ॥ पौलस्ति संत क्षपाकर ॥ जो कां सेतुबंध रामेश्वर ॥ तो असे चिद्रत्नाद्रि सभा ह्मणती प्रा-
कृत सदर ॥ तयापाठीं रामलिंग प्रतिष्ठिला ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीनर्मदातट अपर्णावरभूमितांगं वेरू-
ळ घृष्णेश्वर देवराजं ॥ ॐकार विजपि अकार मकार देवं ॥ प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ६ ॥ ॥
टीका ॥ ॥ श्रीनर्मदातीर जो निवासी ॥ तोचि गणेशदरींत बद्रिवृक्षीं निवासी ॥ महंकाळ स्थापिला कपिलाश्र
मापासीं ॥ यमाईसन्मुख नंदिकेश्वर जो ॥ ६७ ॥ कर्पूरतीर्थ कर्पूरगौर ॥ कलीयुगीं बोलती मुनिद्विजवर ॥ तोचि
घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाकार ॥ भक्तांसाठीं स्थापिला कपिलतीर्थीं ॥ ६८ ॥ कृतायुगीं ज्योतिलिंग रौप्यवर्णी ॥ त्रे-
तायुगीं झाला सुवर्णवर्णी ॥ द्वापारीं झाला ताम्रवर्णी ॥ लोहवर्णी कलियुगांत असे ॥ ६९ ॥ कृतीं रौप्यवर्णी घृ-
ष्णेश्वर ॥ पालटले त्रेतायुगीं परिसाचतुर ॥ आवडी ठेविलें कर्पूर गौर ॥ ह्मणोन कर्पूरगौर जनप्रवृत्ती पडियेली

॥ ७० ॥ नीलपर्वत निनाईपासीं ॥ त्र्यंबकेश्वर गौतमींसीं ॥ अवढ्यानागनाथ लेणियासीं ॥ पांडव आश्रमीं विराजित ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीगौतमी चपललोल प्रवाह सारं दत्वाच गौतममुनेश्वर त्रिंबकेन ॥ कुशात्ततिप्रद सत्य मुखांबु धेयं प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ७ ॥ सौराष्टदेश वर मंडित पून्यमानं श्रीसोमनाथ मुखपंकज भालनेत्रं ॥ स्वर्गापि दुर्लभ हर्ष स्मरन्निधानं प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ८ ॥ ॥ ॥ प्राकृत श्लोक ॥ ॥ नरदेहग्रामीं विषकुंड सुधारसाचें ॥ श्रीनागनाथ कुलदैवत फार साचें ॥ षडाक्षरीं परममंत्र चिन्मयासी ॥ बोधी मला सकळाभिष्ट परत्रयासी ॥ १ ॥ ॐकार बीजपि अकार मकार जाणा ॥ श्रीकार शक्ति नागनाथ गकार राणा ॥ थकित थैव इतिमंत्र स्फुरन्मनाचे ॥ बोधान्वई वदनीं घे हरिनाम वाचे ॥ २ ॥ रकारं विषयार्था गहन परमार्थांतरीं ठसे ॥ गकारा नागेंद्र स्थल अमल नरदेह विलसे ॥ स्तन्नागनाथं गुरुवरद सदा ध्यायीं मनसा ॥ आशा तृष्णा दंडी पुनित हरिनामामृत ठसा ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सिंधुराज वधिला पूर्वदिशे ॥ कुंडलिनी तीर्थीं सिद्देशें ॥ तोचि परळी वैजनाथ विशेषें ॥ विषकुंडापुढें अवढ्या नागनाथ ॥ ७२ ॥ विषकुंडीं श्रीनागनाथ ॥ नरदेहग्रामीं असे प्रख्यात ॥ तयाचे उत्तरभागीं जळसेन तळ संदेत ॥ श्रीखळेनाथें स्थापिला ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशैल मल्लिकार्जुन नीलकंठं श्रुत्वा मुनेंद्रगण किन्नर पूजितेन ॥ कृत्वा पूजार्चनविधि अमरांकितेन प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ श्रीशैलराज मल्लिकार्जुन ॥ संह्याद्रीच्या पुच्छाग्रीं दक्षिण ॥ तोचि पुष्कर तीर्थीं नवनिधान ॥ मल्लिकार्जुन विजयद्वारा पुढें ॥ ७४ ॥ कृतायुगीं पुष्कर कुशावर्ती दक्षिणकाशी ॥ स्नानार्थीं द्वापारीं पापनाशी ॥ त्रेतायुगीं ह्मणती पुष्करासी ॥ कलीयुगीं वद

ती गौमुख ॥ ७५ ॥ पुष्करतीर्थ तेंचि गौमुख जाण ॥ गोम्यासावंत्यासाठीं नाथें आपण ॥ ज्योतिर्लिंग स्थापिलें तोचि मल्लिकार्जुन ॥ त्याचें चरित्र तेतीसाध्यायीं परिसावें ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूमीउद्भव चपल डाकिनी भिंडिमाला भीमातीरींच भीमशंकर द्वादशश्च ॥ यद्वादशश्च शिवलिंगप्रकाशं प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ १० ॥ विद्वान्पूजाकृतापि द्वादश ज्योतिर्लिंगं कीं द्वादशार्कमयतेज कलावतारं ॥ रत्नाचळाग्रीं वटुभैरव खळेशदेवं प्रातर्भवामि स्मर द्वादश ज्योतिर्लिंगं ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ मत्स्योदरी पासोन आठधनुष्य ॥ मट वाल बोलती प्राकृतमनुष्य ॥ तेंचि डांकिनीतीर्थ पंचांश ॥ भीमाशंकर तोचि पश्चिमें ॥ ७७ ॥ ऐसींहीं द्वादश ज्योतिर्लिंगें ॥ नाथें स्थापिलीं भक्ताभियोगें ॥ तींच अगस्तीनें निजांगें ॥ स्वकांतेसहित पूजिलीं ॥ ७८ ॥ लोपा मुद्रा ह्मणे उत्तमोत्तर ॥ हा द्वादशार्कमय कलावतार ॥ द्वादशज्योतिर्लिंगांचा अवतार ॥ मातें विस्तारें कथियेला ॥ ७९ ॥ बद्रिकाश्रमाहून नाथमुनिवरा ॥ येतयेतां स्थापिलींलिंगें बारा ॥ तयावरी रत्नासुर वधोत्सव करोनि सारा ॥ झाला रत्नसिंहासनाधिकारी ॥ ८० ॥ बाराज्योतिर्लिंगें अकिंचनजनां ॥ दर्शन घ्यावया कदापि घडेना ॥ ह्मणोन द्वादशलिंग संस्थापना ॥ नाथें केली रत्नागिरीवरी ॥ ८१ ॥ बाराज्योतिर्लिंगें स्थापिलींह्मणोनी ॥ ज्योतिर्लिंग नाम हें व्यासवचनीं ॥ ठेविलें तैसेंचि तुमच्या वदनीं ॥ ऐकतां संदेह निरसला ॥ ८२ ॥ आतां अष्टतीर्थें कवणें परी ॥ सुस्नात होवोनि दक्षिणकेदारी ॥ पुजावा कैसा षोडशोपचारीं ॥ अकिंचन जनांची विधिसांगा ॥ ८३ ॥ आणि चत्वारीयुगीं चारनांवें ॥ घृष्णेश्वर महादेव ॥ तैसाचि कपित्थनगरीं योगीराव ॥ श्रीसिद्धराज प्रख्यात ॥ ८४ ॥ षोडशसिद्धांत शिखामणी ॥ विराडसिद्ध चंडांशाकिरणीं ॥ बहात्तर युगींचे प्रथम चरणीं ॥ चत्वारीयुगीं

जो अभिनव ॥ ८५ ॥ चत्वारी युगाचीं नांवें चारी ॥ बिराडसिद्धाचीं ऐकावीं चतुरीं ॥ हे संज्ञा भविष्योत्तरीं ॥ कृतायुगीं आधी माधव जाणा ॥ ८६ ॥ त्रेतायुगीं झाला बाळकृष्ण ॥ हें सिद्धा नामाभिदान ॥ द्वापारीं आदि वस्व जाण ॥ कलियुगीं विराडसिद्ध ह्मणती ॥ ८७ ॥ जे यया त्रिभुवनीं भुवनेश्वरी ॥ पलुश्री पद्मावती दुसरी ॥ ऐसा अनादि सिद्धराज कपित्थ नगरीं ॥ षोडशसिद्ध मंडळीं पूज्यमान ॥ ८८ ॥ नवनाथ सोळासिद्ध त्यामाजीं श्रेष्ठ बिराडसिद्ध ॥ हें पद्मपुराणीं व्यासोत्तर प्रसिद्ध ॥ बाहत्तरयुगींचा सिद्धेश्वर ॥ ॥ ८९ ॥ केदारखंडीं भविष्योत्तरीं ॥ ऐसीच व्यासांबुधींच्या लहरी ॥ पातल्या केदारविजय गंगातीरीं ॥ बाहत्तर युग ह्मणोनि गर्जतसे ॥ ९० ॥ ज्याचें विकल्प मानील मन ॥ त्याणें पाहावें भविष्योत्तरपुराण ॥ बाहत्तरयुगाचें केले प्रमाण ॥ केदारनाटकीं कथिलेंअसे ॥ ९१ ॥ तत्वानुभवी ब्रह्मवेत्ता ॥ श्रवणार्थी पावे संतोष चित्ता ॥ येथें श्रोता वक्ता अर्थ लिहिता ॥ संशय हरिता खळनाथ ॥ ९२ ॥ अर्थांतर विवरार्थ संकल्पा ॥ आब्रह्मास्मितत्पर्यंत अकल्पा ॥ सहस्त्रदळीं पर्यंक मनतल्पा ॥ अकल्पितार्थांतर विचरिता ॥ ९३ ॥ पद्मपुराणार्थ रुद्रयामळ ॥ शास्त्रज्ञ मतितार्थ करतळामळ ॥ कर्ता यदर्थी खळेश अमळ ॥ केदारविजय मंत्रमाळा विस्तारी ॥ ९४ ॥ पंचतत्वापासौन पंचवीस ॥ द्विदळा षोडश सहस्त्रदळीं प्रकाश ॥ श्वेत पीत नीळ भ्रमराकृति खळेश ॥ चिद्रूट बीजांकुर सुमनोहरि ॥ ९५ ॥ असो पंचतत्वैक पंचवीस ॥ अध्यायीं भरिला नवविध रस ॥ तैसाचि उत्तराध्यायीं पस्तीस ॥ तीर्थ प्रयाग समसाम्य अवधारा ॥ ९६ ॥ असो अष्टादिशे अष्टभैरव ॥ अगस्ति नामाभिदान सर्व ॥ लोपामुद्रेसीं दाखवी अपूर्व ॥ पूजा करोन अगस्तिऋषी ॥ ९७ ॥ नंदी तुळसी वृंदावन ॥ तयांसीं आधीं करोनि न

मन ॥ केदारतीर्थी करोन स्नान ॥ षट्कर्मादि विधियुक्त ॥ ९८ ॥ शंखभैरीचें करोन पूजन ॥ सव्य घालोन वृंदा वन ॥ नंदीशृंगावरी अंगुष्ट तर्जनी ठेऊन ॥ केदारेश्वरासीं पाहावें ॥ ९९ ॥ पत्र पुष्प फल जीवन ॥ यथा मिलि तोपचार द्रव्येण ॥ विधिपूर्वक अकिंचनजन ॥ भोळाशंकर पूजिताती ॥ १०० ॥ श्रीमंतें षोडशोपचारीं पूजावा ॥ गीत नृत्य नैवेद्य समर्पावा ॥ सव्य नंदिकेश्वर घालावा ॥ वृषणासीं स्पर्श करूनि नंदीच्या ॥ १ ॥ तेथोन वं- दोनि अर्चावी अनादिशक्ति ॥ चर्पट अष्टभुजा श्रीभगवती ॥ षोडशोपचारीं नवविधभक्ति ॥ अगमोत्तरीं पूजावी ॥ २ ॥ चतुःषष्ठी कलसूत्रें ॥ अजपा गायत्री अगममंत्रें ॥ यथाशक्ति जळ फळ पुष्प पत्रें ॥ समर्पावीं जगदंबे ॥ ३ ॥ अंबेसीं नमोनियां मस्तकीं ॥ तदनंतर वंदिजे शक्तिपर्यंकीं ॥ सुवर्णभैरव शक्तिसन्मुखीं ॥ उत्तराभिमुख कु वेर अवतार ॥ ४ ॥ तेथोनि यावें भुजंगासना ॥ हरिखें घालिजे लोटांगणा ॥ मस्तकीं वंदिजे क्रमण चरणा ॥ न वनाथ निधाना पूजावें ॥ ५ ॥ वाजीवाहन दैत्यभजंन ॥ रत्नासुर वधोत्सव कृतभूषण ॥ रक्तभोजाचें करोन ह नन ॥ जय पावला दक्षिणकेदार ॥ ६ ॥ निर्गुणात्मकें निर्विकारा ॥ त्रिगुणात्मक अक्षराच मकारा ॥ रकार ब्रह्म जमदग्नि रवावतारा ॥ लकार शिश्य व्हदयं विष्णू ॥ ७ ॥ तें नाथ ह्मणे हे कलशकुमरा ॥ उदार धीर गुणगंभी- रा ॥ विषयार्णववारी शापादपि प्रखरा ॥ तव चरणांकित मी युगायुगीं ॥ ८ ॥ तव कृपादीपिका शक्तिबंबाळें ॥ हातीं घरोन भरतखंडाग्रीं पातलों बळें ॥ अदानवी करोनि भूमंडळ ॥ रत्नागिरीवरी मोळ वळंघलों ॥ ९ ॥ रक्त भोजादिक रत्नासुर ॥ कोल्हासुर पुत्रादि करवीर ॥ देविलाख्यादि ह्मैषासुर ॥ हे स्वशक्तिकरें वधियेले ॥ ११० ॥ दैत्यविरोध भजनाची गरिमा ॥ वधावितां पावलों परम श्रमा ॥ दैवयोगें तव पादपद्मा ॥ लक्षितां सर्व श्रमासीं

विसरलों ॥ ११ ॥ ऐकोन खळनाथ मुखींचें वचन ॥ हांसोनि वदे कलशनंदन ॥ तूं त्रैलोकींचें जीवन ॥ सहस्र वदनें न वर्णवे तुजला ॥ १२ ॥ तवगुण कथामृत लेश ॥ दशशतवदनीं सेवोन विशेष ॥ वर्णितां द्विजिव्हा झाला शेष ॥ अशेष चरणीं राहिला ॥ १३ ॥ हे वद्रिविहारा त्रैलोक्यनाथा ॥ दीनबंधु नाम मिरविसी अनाथ नाथा ॥ अंबऋषिस्तव होसी देहधारिता ॥ दशावतार मालिका शिखामणी ॥ १४ ॥ तूं किशोर निश्चय चिद्वान् ॥ व्यापकत्व घठमटीं अणुरेणु ॥ गोचर अगोचर आवडी चारि धेनू ॥ अनुहात नादशिंगी वेणुवाजविसी ॥ १५ ॥ मायावेषा निर्गुणरूपा ॥ ज्योतिर्मय सच्चिदानंदा दक्षिणदीपा ॥ उदयास्त रहित ज्योतिस्वरूपा ॥ तुज विश्वरूपा कायवर्णूं ॥ १६ ॥ ऐसें स्तवोन नाथभक्ति ॥ भावें वंदोन दक्षिणपति ॥ बाहेरनिघाला अगस्ती ॥ बाळभैरवासीं पूजिलें ॥ १७ ॥ बाळभैरव तोचि बादलभैरी ॥ तयापुढें प्रधान काळभैरी ॥ दानव कोथळासुर यानेंच वधिले करीं ॥ रत्नासुरपुत्र पुष्करादिक ॥ १८ ॥ तो हा नाथाच्या पृष्ठभार्गीं ॥ काळभैरव उभा असे भुजंगीं ॥ दुर्घट संकट भवभय भंगी ॥ श्रीनाथ पूर्व चरणीं शुभांगीं निर्जरादर्कीं ॥ १९ ॥ पूर्व चरणोद्भवी गंगा देव्हडेपायीं ॥ तीर्थवासी झाली सटवाई ॥ काळभैरव आज्ञेनें नित्य जाई ॥ पांचवी पूजा घ्यावयासी ॥ २० ॥ हा परशुराम रेणुकासुत ॥ तयापुढें दक्षिणेसीं अत्यद्भुत ॥ हा नाथासन्मुख गोरखनाथ ॥ जयासीं अनादिनाथ कलियुगीं ह्मणती ॥ २१ चर्पट अंबेचें हें तीर्थ परम ॥ शक्ति वामभागीं अति उत्तम ॥ तेंचि कोटितीर्थ ह्मणोन नाम ॥ स्वकांतेसीं दाखवी अगस्ती ॥ २२ ॥ दक्षिणेसीं चवाटा तोचि विकटाटभैरी ॥ शकटभैरी बागड वगळेच्या सेजारीं ॥ चौसष्ट्योगीणीच्या वाटेच्या वाटे माझारीं कंकाळ वेताळसहित कोटितीर्थी ॥ २३ ॥ कोटितीर्थीं करोन स्नान ॥ रामेश्वराचें क

रोन पूजन ॥ चर्पट अंबेचें करोन अर्चन ॥ पुनरपि श्रीनाथ वंदावा ॥ २४ ॥ सव्य घालोन नंदिकेश्वरा ॥ येवोन वंदावें दत्तदिगंबरा ॥ तेथोन पातला कर्पूरगौरा ॥ वंदोन कांतेसीं दाखवी ॥ २५ ॥ भार्येसहित कर्पूरतीर्थी ॥ स्नानकरोनि मुनि अगस्ती ॥ घृष्णेश्वर कर्पूरतीर्थी ॥ तेथेंचि वस्ती करी मुनेंद्र ॥ २६ ॥ ते कथा पुढील संतश्रोतीं ॥ तीर्थ माहिमा वदले अगस्ती ॥ ते षड्विंशती अध्यायीं कथासंतीं ॥ नवरसभरित परिसावी ॥ २७ ॥ इति केदार विजय सागर ॥ त्यांत पस्तीस खणाची नौका सुंदर ॥ तयांत विचित्र रत्नेंसौदागर ॥ भरी अपार नाना आख्यानीं ॥ २८ ॥ तत्वानुभवी यांचीं शब्दरत्नें ॥ अमोल्य गुंफिलीं गुरुनाथकृपे प्रयत्नें ॥ सत्समागमीं संबोधनीं अप्रयत्नें ॥ प्राप्त झालीं पूर्वार्चितें ॥ २९ ॥ भगवत्प्रसादें जगदांकुर ॥ भरतखंडाग्रीं दक्षिणोत्तर ॥ भस्म धुसर लिंगाकार ॥ भवानीशंकर जाहला ॥ ३० ॥ असो पस्तीसखणांतरीं ॥ चिद्रत्नें केणें भरोन ज्योतिसौदागरीं ॥ त्यावरी हरिनाम कीर्तिध्वज उभारी ॥ पंचविंशतितमोध्याय गोडहा ॥ १३१ ॥ इतिकेदार विजय ॥ भविष्योत्तर केदार खंड ॥ पद्मपुराण विरचितायां ॥ द्वादश ज्योतिर्लिंग रत्नाद्रि स्थापना ॥ अगस्ति लोपामुद्रा संवादोनाम ॥ पंचविंशतितमोध्यायः ॥ २५ ॥ श्रीद्वादशज्योतिर्लिंगार्पणमस्तु ॥ ओंव्या ॥ १३१ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय भरतखंडाग्री दक्षिणदीपा ॥ भारद्वाजादि ऋषिगणसकृपा ॥ भक्तानुग्रह ज्योतिस्वरूपा ॥ भजनमार्गीं उद्धारीं ॥ १ ॥ जांबुनदद्वीपीं भरतखंडातें ॥ जागृति दिसे स्वप्न सुषुप्तिरहितें ॥ जातब्रह्मा अजातें श्रीरवळनाथें ॥ जाज्वलदैत्य रत्नागिरीं वधिले ॥ २ ॥ गोदावर्या दक्षिणतीरविहारा ॥ गोपाळबाळविलासी अगोचरा ॥ गोविंद कृष्ण गदाधरा ॥ गोरसचोर गोडित गोरक्षका ॥ ३ ॥ गोमतीविलासी गोवर्धनोद्धारका ॥ गोपीमानस संतोषका ॥ गो भूसुर प्रतिपालकनायका ॥ गोकर्णेश्वरस्थापका विनायककरीं ॥ ४ ॥ ऐसा रज तम सत्व आकार ॥ जमदग्निरवावतार ॥ धरोनि अवतरला बद्रिविहार ॥ दक्षिणकेदार रत्नागिरिवरी ॥ ५ ॥ त्रैमूर्तींचा अवतार ॥ दक्षिण दिग्मुखी सौदागर ॥ ह्मणोन निगमभूपतींचें नगर ॥ शतसहस्र संविता करिती गर्जना ॥ ६ ॥ दीर्घायु आदि गर्गाचार्य ॥ मांडव्य पाराशर गौतमऋषिवर्य ॥ अगस्त्यादि प्रतापशौर्य ॥ श्रीनाथगुणवर्यासीं वर्णिती ॥ ७ ॥ वाराणशी महामोक्षपुरी ॥ जेथें जयमिनी कथाविस्तारी ॥ सुवर्ण पिंपळ रत्नखचित रत्नागिरी ॥ अक्षयीं तेथें कथियेला ॥ ८ ॥ ऐसी ऋषिमंडळीं व्यासवाणी ॥ विस्तारिली भविष्योत्तरपुराणीं ॥ असत्य ह्मणतां श्रीव्यासमुनी ॥ कौंडण्यासीं बाष्कळ नाम ठेविलें ॥ ९ ॥ रत्नाद्रीतें जावोनि अश्वत्थपर्णें ॥ काशीसीं आणि दुराभिमानें ॥ तीं व्यासाचे कृपावलोकनें ॥ पाहातां सुवर्णपत्रें रत्नें जहालीं ॥ १० ॥ ॥ जे रत्नागिरीचे आणिले खडे ॥ ते ठेविले जगद्गुरु पुढें ॥ ते श्रीव्यासें पाहतां काशीजन निवाडे ॥ अमोल्य रत्नें ह्मणती सह्याद्रींचीं ॥ ११ ॥ आश्चर्य ह्मणती सुरनरवर ॥ तयावरी अगस्तिमुनिवर ॥ द्वादश ज्योतिलिंगांचा वदला विस्तार ॥ स्वकांतेसीं आवडी ॥ १२ ॥ स्थापिलीं ज्योतिर्लिंगें बारा ॥ यालागीं ज्योतिलिंग नाम सौ-

अध्याय २६ वा.



दागरा ॥ ऐसा निगमभूपतीचा नगारा ॥ अनंतयुगायुगीं गर्जतसे ॥ १३ ॥ भगवत्प्रसादें द्वादशलिंगादि ॐकार ॥ स्मरारीच जाहला सुरतोपचर ॥ भगवत्स्वरूपी अपर्णावर ॥ भर्गावतार हीं केलीं द्वादशलिंगें ॥ १४ ॥ तींहीं द्वादशलिंगेंवारा ॥ स्थापिलींनाथें शौनकमुनिवरा ॥ यास्तव दक्षिणकेदारा ॥ ज्योतिलिंग ऐसेंबोलती ॥ १५ ॥ हें पंचविंशतितमोध्यायीं ॥ कथा परिसिली केदारविजयीं ॥ अगस्तीनें अष्टतीर्थमहिमा पाहीं ॥ जाणोन कर्पूरतीर्थी उतरला ॥ १६ ॥ कर्पूरतीर्थ घृष्णेश्वर ॥ कृतायुगीं होता रौप्याकार ॥ बहात्तरयुगाचें प्रथमप्रहरांतर ॥ कर्पूरवर्ण घृष्णेश्वरअद्यापी ॥ १७ ॥ कर्पूरवर्ण घृष्णेश्वर ॥ द्वादशलिंगांमाजीं प्रखर ॥ जाणोन अगस्तिमुनिवर ॥ त्रिरात्र वस्ती राहिला ॥ १८ ॥ यथानुशक्ती मिलितोपचार ॥ कर्पूरगौर घृष्णेश्वर ॥ आचमन करोन अगस्तिमुनिवर ॥ नागझरीं सुस्नात झाला ॥ १९ ॥ विजयद्वारीं घृष्णेश्वर ॥ पूजितां लोपामुद्रा वदेउत्तर ॥ कायकारण विजयद्वार ॥ विश्वनाथ कां बोलती ॥ २० ॥ लोपामुद्रा वदेसुमती ॥ तयेसींवदे ऋषिअगस्ती ॥ रत्नासुरादि करवीर भद्रजाती ॥ स्वशक्तिकरीं वधविले केदारें ॥ २१ ॥ दैत्य वधोन दिग्विजयीं ॥ नाथझाला शक्तिसमुदायीं ॥ हें जाणोन लक्ष्मीनें हृदयीं ॥ ज्योतिलिंगासीं गौरवोन वदतसे ॥ २२ ॥ विजयादशमीसीं भैरवभारीं ॥ वस्त्रेंदिधलीं विजयद्वारीं ॥ विजयेश्वरस्थापून हिमकेदारी ॥ विजय झाला ह्मणोनी ॥ २३ ॥ श्रीनाथ निघाला सीमाउलंघना ॥ करावें जें शमीपूजना ॥ तंव मुक्ति पावावयालागीं जाणा ॥ यमघंट दैत्यतस्कर जाहला ॥ २४ ॥ विजयदशमीतें अस्तमानीं ॥ श्रीनाथ परतला शमी पूजोनी ॥ तंव तुरंग हरिला तस्करगणीं ॥ हे खड्गपाणीनें ऐकिले ॥ २५ ॥ शिबिकेंत बैसोन केदारदेव ॥ तस्कर वधिला सक्रोध उद्धव ॥ घोडा आणिला न भरतां लव ॥ तंव तेथें अवचित चिरिली अभिनव देहुडी ॥ २६ ॥

नेत्रीं नलागतां पातियापात ॥ चवाटेपासीं पातला खळनाथ ॥ कुरवंडी करोन अपरमित ॥ ओंवाळोन दोंभागीं टाकिली ॥ २७ ॥ विकटाटभैरवीयात्रा आषाढमासीं ॥ करिती ग्रामदेवतेसीं अर्धनिशीं ॥ ते चतुरें आणावें मानसीं ॥ उत्तराध्यायीं निवाडें ॥ २८ ॥ ऐसें सांगोन स्वकांतेसी ॥ अगस्ती मयुरतीर्थासी ॥ पातला प्राकृतमोळवणेसीं ॥ जन बोलती अद्यापी ॥ २९ ॥ तेथोन मत्स्योदरीचें करोन स्नान ॥ मंडुकासुराचें कबंधोद्धारण ॥ करोन डाकिनीतीर्थीं स्नानपान ॥ गुढभैरवतीर्थीं पातला ॥ ३० ॥ तेथोन कल्मषपाद पापनासी ॥ तीर्थीं पातला अगस्तिऋषी ॥ रत्नाचळाचे पश्चमवाटेसी ॥ प्राकृत नाम बोलती पांढरवन ॥ ३१ ॥ तेथें भार्येसहित करोन स्नान ॥ यथाविधि करोन धर्मदान ॥ तैं लोपामुद्रा वदे वचन ॥ कल्मषपादपापनासी कां ह्मणती ॥ ३२ ॥ ऐकोन कांतेची संतोषवाणी ॥ कथा सांगे अगस्तिमुनी ॥ काश्मिरदेशींचा भूपाळगुणी ॥ स्वकीयराज भूमंडळीं ३३ ॥ तयाचे नंदनाचाकुमर ॥ कमळसेन प्रतापशूर ॥ दानोदकाचा क्षीरसागर ॥ आडवा केला या महीवरी ॥ ३४ ॥ ऐसा राजा प्रजास्वधर्मीं ॥ पाळित असतां नित्य स्वसुताहून सत्कर्मीं ॥ तैं विषमकाळाचिये वर्मीं ॥ शांडिल्य ऋषेश्वर पातला ॥ ३५ ॥ तो अन्न मागे उतावेळ ॥ येरी ह्मणे क्षणएक होईं निश्चळ ॥ शांडिल्यसह दुर्वास क्षोभोनि प्रळयानळ ॥ शापदुर्धर दिधला रायातें ॥ ३६ ॥ हें पाहोन कमळसेन ॥ घेवोन करांजुळीं जीवन ॥ निरापराधें शाप तीक्ष्ण ॥ मातें कां तपसामर्थ्यें ताडिलें ॥ ३७ ॥ मीही तयातें शापोत्तर ॥ तीव्र देतसें स्फुलिंगाकार ॥ तैं पुरोहित ह्मणे धरावा धीर ॥ गो द्विजांवरी क्रोध न करावा ॥ ३८ ॥ हें पुरोहिताचें स्वहितवचन ॥ एकतां क्रोध गेला वितळोन ॥ तेव्हां शापपाणी पडलें कलिवरा वरोन ॥ अकस्मात चरणावरी रायाच्या ॥ ३९ ॥ तात्का-

ळ झाला बुद्धिभ्रंश ॥ कल्मषपादनामीं ब्रह्मराक्षस ॥ होऊन वदे न मागें मी विशेष ॥ संतोषें उःशाप देईजे ॥
॥ ४० ॥ ऐकोन कमळसेनाचें वचन ॥ कृपेनें द्रवलें दुर्वासमन ॥ खळनाथ येईल दक्षिणेजाण ॥ तैं अगस्ति पा
राशर एकत्र होती ॥ ४१ ॥ होतां तयांचें दिव्यदर्शन ॥ दिव्यदेह पावसील सायोज्यस्थान ॥ ऐसें कथूनि तपो-
धन ॥ निजाश्रमीं गेले उभयतां ॥ ४२ ॥ कल्मषपाद ब्रह्मराक्षस ॥ होवोन सकळजीवांचा करी ग्रास ॥ पाप जो
डिलें सायास ॥ मेरुतुल्य कळेना ॥ ४३ ॥ तैं विचित्र प्रारब्धाची गती ॥ तीर्थस्नानासीं पातला अगस्ती ॥ हें पा
होन पापमूर्ती ॥ ब्रह्मराक्षस पातला ॥ ४४ ॥ असो अगस्ति करितां देवार्चनातें ॥ तंव पाराशर पातला अवचितें
॥ उभय भेटतां तैं अकस्मात ॥ कल्मषपादराक्षस पातला ॥ ४५ ॥ घर्घराट करोन शब्दकल्होळें ॥ अगस्तिपायां
वरून लोळे ॥ शरीर टाकोन विशाळ ॥ दिव्यदेह पावला ॥ ४६ ॥ दिव्यदुंदुभि वाजती गजरीं ॥ पुष्पें वर्षती
सुमनांवरीं ॥ अगस्तिपदरजाची ऐसी थोरी ॥ कमळसेन उद्धरिला ॥ ४७ ॥ असो कल्मषपादनिशाचर ॥ उद्धरो
न अगस्तिमुनिवर ॥ तंव द्वंदखिल्लारिया मनोहर ॥ कृष्णव्रतारींच्या ह्या गौळणी ॥ ४८ ॥ ह्मणोन वदती ताका-
री तुपारी ॥ हे प्रसिद्ध मात चराचरीं ॥ पावनाई व्याघ्राई ताम्राई सारी ॥ विश्व परिवारि बोलती ॥ ४९ ॥ हें
लोपामुद्रेसीं दाखवी धरोन हातीं ॥ जमदग्नितीर्था पातला अगस्ती ॥ मंडुकासुरमस्तक पडलें ज्याक्षितीं ॥ तेथें
तीर्थें दोन जाहलीं ॥ ५० ॥ चक्र मारिलें नाथें ह्मणोनी ॥ चक्रतीर्थ रामतीर्थ हीं दोन्हीं ॥ जमदग्नितीर्थ प्रख्या
त पुराणीं ॥ बेडुकबाव ह्मणती कलियुगीं ॥ ५१ ॥ असो जमदग्नितीर्थीं करोन स्नाना ॥ रामलिंगाचें करोन पूजना
॥ तदनंतर सव्य करोन प्रदक्षिणा ॥ महादेव चर्पट अंबा नमावी ॥ ५२ ॥ पुनरपि करोन केदारदर्शन ॥ महंका

ळीचें करोन पूजन ॥ तुकाई मंगळाई अर्चोन ॥ विद्युत्पाततीर्थीं पातला मुनी ॥ ५३ ॥ सातशेंसमीर अमीर पैगं-
बर ॥ तेंवि सातसैंदव बोलती प्राकृतनर ॥ श्रीनाथाचे ते सिलेदार ॥ छडीदार त्रिपुटीवरी पश्चिमेसीं ॥ ५४ ॥
लोपामुद्रेसीं कलशकुमर ॥ ह्मणे हो ऐक नवलथोर ॥ बद्रिकाश्रमीं तो त्रिगुणी सगुणाकार ॥ हिमकेदार अवतरला
जयार्थीं ॥ ५५ ॥ कीं पौगंडऋषीचीं कोदंड शरासनें ॥ योगमायेनें आकर्षितां आकर्णें ॥ विमलांबुज करापासो-
न सुटतां त्रिशत शरवदनें ॥ ब्रह्मभुवन गर्जत पातला यागिरीं ॥ ५६ ॥ बद्रिकाश्रमीं नाथ जन्मतां ॥ तें रत्ना-
गिरीवरी मिद्युत्पाता ॥ जाहला प्रियत्वा अभंगपर्वता ॥ भंग जाहला तें हेंचि तीर्थ ॥ ५७ ॥ असो तो विद्युत्पा
त जाहला यागिरीवरी ॥ ह्मणोन इजकडा बोलती जनउत्तरीं ॥ अमृतपात्र अमृत नाथकरीं ॥ त्यासीं युद्धसमयीं
दिधलें श्रीनाथें ॥ ५८ ॥ असो रत्नाद्रिचे उत्तरादिशेंत ॥ विद्युत्पाततीर्थीं अमरनाथ ॥ स्नानार्थी यांचें हरी दुरित
॥ अमरनाथ पूजावा अष्टतीर्थावरती ॥ ५९ ॥ तेथोन निघाला भार्येसहित ॥ चंपकारण्यीं कल्होळतीर्थ ॥ तेथें
स्नान करोन ऋषिसमर्थ ॥ यमाई लोटांगणीं वंदिली ॥ ६० ॥ षोडशोपचारीं करोन पूजा ॥ ह्मणे पूर्णकरीं मनोर
थ माझा ॥ मनकर्णिका जन्हुऋषितनुजा आजिच भेटेसें करीं ॥ ६१ ॥ विश्वजननी यमायेमाय ॥ तापत्रयें ताप-
लों करूं काय ॥ जान्हवीवियोगें जीवजाय ॥ तंव तुझेपाय अत्रचट लागले भाळीं ॥ ६२ ॥ श्रीभगवती मोहमा-
ये ॥ ब्रह्मांडोदरीं दुःख माझें नमाये ॥ हरिहर ब्रह्मा याचे माये ॥ योगमाये कौमारी ॥ ६३ ॥ ॐकारबीजाचें अ-
खंड आवर्ण ॥ अतसिपुष्पाचिये कार्याकारण ॥ ब्रह्मा विष्णु त्रिलोचन ॥ तुज पासोन ज्यांनां भले मानिति ॥
॥ ६४ ॥ तुझें करितां अपारस्तवन ॥ शेष भागला सहस्रवदन ॥ लज्जायमान होऊन अधो वदन ॥ ऊर्ध्व नकरी

क्रमपदीं दडला ॥ ६५ ॥ तुझें भंगितां आज्ञावचन ॥ भगांकित जाहला शचिरमण ॥ पंचवदनाचा चतुरानन ॥
तव आज्ञाभंगें जाहला चतुर्मुख ॥ ६६ ॥ तुझी आज्ञा भंगितां विधीनें ॥ मृगनक्षत्र जाहला अज्ञानें ॥ मानपूजो
पचारअधान ॥ जाहला तव आज्ञा भंगेंदोषें ॥ ६७ ॥ विष्णु करी अश्वमेध ॥ तयाचा न बोलतां केला मस्तक-
छेद ॥ तो हा सूर्य उदयास्तु प्रसिद्ध ॥ विष्णुमस्तक लोकानुग्रहार्थीं ॥ ६८ ॥ तेव्हांच कृपा उपजली तुजला ॥
विष्णुकबंधीं हयग्रीव केला ॥ अवतारचरित्रींनवस चुकांवेला ॥ ह्मणोन झाला हयग्रीव ॥ ६९ ॥ लिंगपतन त्रयं-
बकासीं ॥ जाहलीं तो तव आज्ञाभंगदोषीं ॥ तुझी निजखूण भंगिता क्लेशीं ॥ कष्टले अपराधी हरिहर ॥ ७० ॥
अहंब्रह्मास्मि गर्वाभिमान ॥ मी एक ब्रह्म श्रेष्ठ पूर्ण ॥ जाणोन तुवां शतमुखी ब्रह्मे दाखऊन ॥ योगमाये ऐसें
त्वां नवल केलें ॥ ७१ ॥ पंचवदना पासोन सहस्रवदन ॥ ब्रह्मे केलेसी शतनिर्माण ॥ हें जाणोन हरिहरमन ॥
विश्वजन तुज वर्णिती ॥ ७२ ॥ पश्चाताप पावोन मन ॥ तुझें वंदितां आज्ञावचन ॥ त्रैलोक्यीं पावले सन्मान ॥
सत्यलोकीं कैलासी वैकुंठीं ॥ ७३ ॥ तुझें कृपामृत चित्घन ॥ विश्व सृजितसे चतुरानन ॥ तैसाचि विष्णु प्रति-
पाळण ॥ शिव संहार करित तव आज्ञें ॥ ७४ ॥ द्विपदा त्रिपदा चतुष्पदी ॥ त्रिपदागायत्रि वेदांतीं पंचपदी ॥
द्विपदा ही सहस्रदळीं षट्पदी ॥ परापश्यंति व्यापके ॥ ७५ ॥ असो ऐसें स्तवनोत्तरीं ॥ पूजिली यमाई विश्वंभ-
रीं ॥ पाहिमां मूळमाये प्रकृतेश्वरी ॥ विश्वोद्धारीं अवतरलीस ॥ ७६ ॥ जान्हवीवियोगें श्रमलों अपर्णे ॥ मन स्व-
स्थ करीं वो चंद्रार्ककिरणे ॥ तव चरणतीर्थ घेतां अंतःकरणें ॥ निववोन संतोष पावलों ॥ ७७ ॥ ऐकोन अग-
५४ स्तीमुखींचें वचन ॥ जगदंबा करी हास्य वदन ॥ हिमवंतीचें करोन स्नान ॥ गणेश पूजोन मुरलीधर पूजावा ॥

॥ ७८ ॥ हिमवंतीचें जेस्नान करिती ॥ तयांचे सर्व संताप हरती ॥ द्वादशवर्षांनंतर कल्होळ तीर्थी ॥ श्रीभागीरथी येतसे ॥ ७९ ॥ ऐसी वदतां आदिभवानी ॥ तैसाचि ऋषि आणि ऋषि पत्नी ॥ हिमवंती इत्यादि कपिलतीर्थी अघमर्षणीं ॥ अगस्ति करि स्नानदान ॥ ८० ॥ कपिलतीर्थी करोन स्नान अमळ ॥ येवोन वंदिला महंकाळ ॥ यमाई सन्मुख नंदीकंकाळ ॥ नांदिकेश्वर ज्योतिर्लिंगें स्थापिला ८१ ॥ कपिलाश्रमीं राहोनियां एकराती ॥ पुढें गंतव्य करी नीलपर्वतीं ॥ भार्येसहित मुनि अगस्ती ॥ नीलतीर्थी सुस्नात झाला ॥ ८२ ॥ निनादी निंबाई नीलांवरी ॥ शक्ति पूजोन अमळोत्तरीं ॥ लेणियासीं पातला सुमनोहरी ॥ द्विरावर्ती करोन ये माघारा ॥ ८३ ॥ वंदोन एकवीरा लोटांगणीं ॥ चंपकवनीं विश्वजननी ॥ पुनरपि स्तवोन विनयवचनीं ॥ अगस्तीसीं वंदे लोपामुद्रा ॥ ८४ चर्पट अंबा श्रीरवळनाथ ॥ त्याभोंवता अष्टादश भैरवावर्त ॥ दत्तात्रयादि मुनिवर संत ॥ भूषित परिवारीं भक्तांच्या ॥ ८५ ॥ ज्वालामुखीसीं महंकाळी ॥ राजसरासाई वडजाई सकळीं ॥ पूर्व उत्तर दक्षिण पश्चिमोत्तरीं प्रबळी ॥ शेवताई ताम्राई व्याघ्राई ॥ ८६ ॥ खर दूषण तेचि खदिरांगार खंदारी ॥ खरसुंडसिद्धें वधिलें समरीं ॥ तो खरसुंडसिद्ध त्रिकुटाशिखरीं ॥ टोणपीघस्त फिरे गोरीभोंवता ८७ ॥ घस्त फिरती दिवारात्रीं मीर अमीर ॥ यांनामीं ह्मणती टोणपीर ॥ हें प्रत्यक्ष ह्मणती विश्वोत्तर ॥ यदर्थी संदेह चतुरीं न धरावा ॥ ८८ ॥ ग्रामदेवता लघु स्थूळ सूक्ष्म सकळ ॥ चवाठा विकटाट कंकाळ वेताळ ॥ नाथाज्ञेनें सर्वकाळ ॥ नगरगर्भी सावध असती ॥ ८९ ॥ नवलक्ष ऐशींहजार ॥ तेचि सात सैद पीर पैगंबर ॥ घस्त फिरती नवगृह सप्तवार ॥ रत्नागिरीवर नाथआज्ञें ॥ ॥ ९० ॥ चर्पटअंबिकेसहित कमलेसी ॥ ब्रह्मचारी त्रिगुणकेशी ॥ राज्यकरित बद्रिनिवासी ॥ दक्षिणदिशे भरतखंडा

ग्रीं ॥ ९१ ॥ श्रीनाथ सत्व रज तम आकारी ॥ ब्रह्मचर्य जमदग्नि अवतारी ॥ राज्य करित सह्याद्रिगिरीवरी ॥ विजयदशमीस विजयझाला ॥ ९२ ॥ सीमा उल्लंघोन पातला गजरीं ॥ वाद्यध्वनीसीं मंगळतुरीं ॥ पातला मिरव त सुरनरवरीं ॥ छत्र चामरीं शोभायमान ॥ ९३ ॥ मिळोन नगरींच्या नारी ॥ काया कुरवंडी करोन स्वकरीं ॥ द्वैतदेह ओंवाळोन टाकिती दूरी ॥ पंचप्राण आरती ओंवाळिती ॥ ९४ ॥ पंचप्राणांच्या करोन वाती ॥ प्रकाश करोन स्वयंज्योती ॥ ओंवाळितां आरंभीं पुष्पें हस्तीं ॥ घेवोन चिरोनि टाकिती देहुडीं ॥ ९५ ॥ वाम दक्षिणहस्तीं चिरोनी ॥ देहुडीं टाकिती द्वयकरानीं ॥ पंचारती मग ओंवाळोनी ॥ आरती करिती तदनंतर ॥ ९६ ॥ ऐकोन कांतेची संतोषवाणी ॥ अगस्ति वदे विस्तारोनी ॥ ह्मणे ऐक स्वस्थ श्रवणीं ॥ कथा पुराणीं सुजाण ॥ ९७ ॥ भीमाशंकराहूनि शक्ति परिवारीं ॥ पातली मूळपीठासी भैरवभारीं ॥ अंवदासुर वधोन घोरसमरीं ॥ श्रीमूळ निवासिनीनें स कोपें ॥ ९८ ॥ खळनाथ तेथेंचि जगदंबा ॥ मूळपीठनायका शशांकबिंबा ॥ पूजोन पातला अविलंबा ॥ येथें वधार्थी खळनाथ ॥ ९९ ॥ रक्तभोजादि रत्नासुरीं ॥ युद्ध करोन घोरांदरीं ॥ कोल्हासुरासीं सहपरिवारीं ॥ शक्तिकरीं वधविलें तें कथियेलें ॥ १०० ॥ मणिमल्लादि दैत्य प्रबळ ॥ मार्तंडहस्तीं वधविले सकळ ॥ दैत्य राक्षसां करोनि निर्मूळ ॥ वधिले आपार भरतखंडाग्रीं ॥ १ ॥ सुरवरजनीं जयजयकार ॥ लक्ष्मीसहित झाला गजर ॥ रत्नपीठीं खळेश्वर ॥ अभिषेकिला लक्ष्मीनें ॥ २ ॥ पटीं अभिषेकिला खड्गपाणी ॥ ही वार्ता मूळपीठ निवासिनी ॥ परिसतां विषाद वाटला मनीं ॥ ह्मणे विष्णुरमणी नवल केलें ॥ ३ ॥ मज न कळतां राज्यासनीं ॥ कैसा बैसविला खड्गपाणी ॥ मज वांचून विष्णुरमणी ॥ अघटितकरणी केवीं करी ॥ ४ ॥

॥ निष्कर्मी निरोपचारी ॥ निर्गुणात्मैक त्रिगुणब्रह्मचारी ॥ निरामय शरीरी या राज्याधिकारी ॥ केला कैसा न विचारितां ॥ ५ ॥ भरतखंडाग्रीं रत्नाद्रिपर्वत ॥ रत्नांकित सुशोभित ॥ म्यां येवोन नाथास सावचित्त ॥ श्रेष्ठ-राज्यपदीं बैसवावा ॥ ६ ॥ लहान थोर मिळोन सकळीं ॥ विचार करोन सुरवरपाळीं ॥ ऐशा दीर्घ विचारें सुका-ळीं ॥ विबूधीं सर्वविचार करावा ॥ ७ ॥ मृषा भासे लौकिककरणी ॥ विरुद्ध कां आचरला खड्गपाणी ॥ खळ-नाथा वांचोन राज्यासनीं ॥ रत्नाचळमंडळीं कवण दुसरा ॥ ८ ॥ हें जाणोन बरवी संसारसाक्षी ॥ राज्यपदीं स्थापील अलक्षलक्षी ॥ सर्व विबुधांचा नाथ कैं पक्षी ॥ मीच अपेक्षीं कैसी निवडील ॥ ९ ॥ ह्मणोन मुळपीठीं यमाई ॥ रुसोन राहिली संतापल्हदयीं ॥ हें परिसोन चोपडाई ॥ श्रीनाथासीं वदतसे ॥ १० ॥ ऐक श्रीपुराणपु-रुषोत्तमा ॥ सर्वव्यापक स्थावर जंगमा ॥ अनादिमायेच्या ल्हदयपद्मा ॥ भ्रमराकृति जगदांकुरा ॥ ११ ॥ यमाई ल्हदयीं संदेहलहरी ॥ पातली दीर्घ प्रबळ कल्पना बरी ॥ ती परिहारावी हिमकेदारी ॥ मूळपीठासी जावोन स-न्मानें ॥ १२ ॥ सर्व अपराध करावे क्षमा ॥ ऐसें वदावें भक्तकाजकल्पद्रुमा ॥ श्रीनाथ ह्मणे तव गुणमहिमा ॥ निगमागमा अगोचर ॥ १३ ॥ भक्तजन समुदायीं भैरवभारीं ॥ समारंभें जातसे राजोपचारीं ॥ जगदंबेच्या भेटी-ची नवलपरी ॥ संतमुनिवरीं पुढें परिसावी ॥ १४ ॥ शुक्लपक्ष मधुमास वसंती ॥ यात्रासमारंभ मुनिमानस वसं-तीं ॥ करावया येती रत्नाचळ पर्वतीं ॥ परिवारेंसीं महाजन ॥ १५ ॥ तें परिसावें पुढारीं ॥ संत महंत पंडित चतुरीं ॥ श्रीमुळपीठा जाईल हिमकेदारी ॥ महदैश्वर्यासीं तें ऐका ॥ १६ ॥ इतिश्री केदारविजयनिधी ॥ सर्वें घेवोन अष्टमासिद्धी ॥ मूळपीठा जाईल सहविबुधी ॥ अनादिमायेतें भेटावया ॥ १७ ॥ कीं त्या अभेदभक्त प्रवा-

हलोटीं ॥ देव घेवोन तेतीसकोटी ॥ श्रीनाथ येईल मूळपीठीं ॥ द्विज भेरी बोभाटीं गजर श्रवणीं ॥ १८ ॥ ते परिसतां अभिनव गोडी ॥ जाणोन हरिनामसुधा आवडी ॥ धरोन हरिनामाची सांगडी ॥ भवसिंधु पैल थडिये पाविजे ॥ १९ ॥ इतिश्री केदारविजय परम ॥ श्रवणार्थीं यांचा संसारश्रम ॥ हरे सारांश हरिनाम ॥ सर्व्वीसा-वाध्याय गोडहा ॥ १२० ॥ इतिश्री केदारखंड भविष्योत्तरपुराण ॥ श्रीनाथ सीमाउल्लंघन यमघंट वधाय ॥ अष्टती-र्थ अगस्ति लोपामुद्रा संवादे ॥ षड्विंशतितमोध्यायः ॥ २६ ॥ श्रीनाथार्पण मस्तु ॥ ओंव्या ॥ १२० ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयजयाजी खळेश्वरा ॥ जयकारका जगदांकुरा ॥ जलजलोचन ज-
लजावरा ॥ जलजोद्भविया उपवितधरा ॥ १ ॥ अतसिकुसुम जलजवर्णा ॥ अतसिका भास चंडांशकिरणा ॥ अ-
खिल अनिल कुवलय नयना ॥ अंतरचमेलीहार प्रियकरा ॥ २ ॥ आजानुबाहु शुंडामंडिता ॥ अमल दमल मंद-
स्मित अखंडिता ॥ आभाळ लोचन रणपंडिता ॥ अश्वारूढा दनुज दमना ॥ ३ ॥ दीनानाथा दीनोद्धारी ॥ दिध
ली भक्तांसीं सुवर्णपुरी ॥ दीर्घदृष्टि दीर्घशरीरी ॥ दितिकुळ संहारकारका ॥ ४ ॥ जलधि जनकासीं जो होय वै-
री ॥ ते हेचि कथा भविष्योत्तरीं ॥ तीर्थमहिमा वदली सारी ॥ कल्मषपाद राक्षस उद्धारिला ॥ ५ ॥ हें षड्विंश
ति तमोध्यायीं ॥ कथा परिसिली स्वस्थह्रदयीं ॥ खळनाथासी चोपडाई ॥ सारासार कथितसे ॥ ६ ॥ विजयद
शमी सीमाउल्लंघन ॥ तुरंगमहरतां यमघंट मरण ॥ नाथहस्तें पावला जाण ॥ अद्यापि दक्षिणद्वारीं तस्करअसे ॥
॥ ७ ॥ असो संवत्सर प्रतिपदेपासोन महाजन ॥ यात्रेसीं येती घनगर्जन ॥ नानापरी वाद्य चंद्रानन ॥ तंत
वितंत सुस्वरीं ॥ ८ ॥ वांके तुतारे मृदंग करणे ॥ मेघडंबर मार्तांडपणें ॥ निशाणें दाटली चंद्रार्ककिरणें ॥ अति
विस्तीर्ण साजिरीं ॥ ९ ॥ पूर्व पश्चिम दक्षिण उत्तरीं ॥ यात्रा पातली प्रचंडगजरीं ॥ चढतां रत्नागिरीची पायरी
॥ भीड भारी होतसें ॥ १० ॥ दशमी पासोन पौर्णिमेसी ॥ भक्तजन करिती उत्साहासी ॥ पालखी निघाली ससा
रंभेसी ॥ श्रीमूळपीठासीं जावया ॥ ११ ॥ अमरेंद्रा सहित सिद्धचारण ॥ यक्ष किन्नरादि मरुद्गण ॥ अष्टादश भै
रीसीं विश्वजन ॥ सह परिवारीं निघाला ॥ १२ ॥ अबीर गुलालाचिये थाटी ॥ चांग भल्याचिये बोभाटी ॥
निशाण दुंदुभीचिये घनदाटी ॥ पृथ्वी रंगली गुलालीं ॥ १३ ॥ असो भक्तमहाजन परिवारीं ॥ मदहर्देश्वर्यें हिमकेदारी


अध्याय २७ वा
यमाई देवीची यात्रा.

निघाला तैं तेज दाटलें अंबरीं ॥ छत्र चामरीं घनघोर ॥ १४ ॥ गगनगर्जें मगळतुरीं ॥ ऐसा मूळपीठाचे सेजारीं
॥ पातला गर्जत बद्रिविहारी ॥ श्रीमूळपीठगिरीवरीं वळंघितां ॥ १५ ॥ हें जाणोन श्री.भवानी ॥ समीप येतां खड्गपा
णी ॥ कपाटलाविलें तेचिक्षणीं ॥ मृषा क्रोधें जगदंबेनें ॥ १६ ॥ रुसली जाणोन जगदंबा ॥ भक्तजन परिवारें ना
थ उभा ॥ द्वारीं तिष्ठत हे महा अंबा ॥ कां हो निष्ठुर कृतयुगाहूनी ॥ १७ ॥-त्रैलोक्यराज्यधर मूळपीठिके ॥ अ-
नादिमाये श्रीरेणुके ॥ तुज वांचून अर्धघटिके ॥ त्रिगुणात्मक हीं बापुडीं ॥ १८ ॥ तूं दृष्टि करीसी जरी वांकुडी ॥
पाडिसी एकवीसस्वर्ग उतरंडी ॥ दशवतार हे परवडी ॥ उदय ह्मणोन नाचविसी युगायुगीं ॥ १९ ॥ शक्ति घेवो
नियां नवकोटी ॥ आपणचि राहिली मूळपीठीं ॥ तुझी आज्ञा वंदोन मुगुटीं ॥ दनुजकपटी तव कृपे वधियले ॥ २०
क्षमस्वमपराध त्रिपुरभैरवी ॥ चिद्रत्नागिरीं तव प्रताप मिरवी ॥ उदय करोन प्रकाशकृतरवी ॥ कृपाकर ठेवीं
माझिये शिरीं ॥ २१ ॥ ऐसें स्तवन श्रीकेदारें ॥ करितां अमळ विनयोत्तरें ॥ कल्पनाकपाट उघडिलें सत्वरें ॥
उदय हास्य सुधाकर तैं केला ॥ २२ ॥ कीं कल्पना निवाली समूळ हरली ॥ कीं मूळपीठांतूनि षोडशकळी ॥ पू-
र्णचंद्रमुखी लावण्यपुतळी ॥ भक्तनक्षत्रमंडळीं विराजे ॥ २३ ॥ ऐसें लक्षोन आदिमाय ॥ जिचें ब्रह्मांडघटीं तेज
नमाय ॥ अष्टभावें पीठीं उपरमाय ॥ हे मायमाया अभयसदया ॥ २४ ऐसी मोहमाया श्रीभगवती ॥ षोडशोप
चारीं दक्षिणपती ॥ पूजीली राजोपचारें महाशक्ति ॥ सौभाग्यद्रव्यें विधियुक्त ॥ २५ ॥ दिव्यगंध हरिचंदन ॥
दिव्यपीतांबर करविला परिधान ॥ दिव्यालंकार कंठाभरण ॥ दिव्यसुमनीं पूजिली ॥ २६ ॥ हारिद्रा कुंकुम मंडित
५५ कपिला ॥ शोभे भ्रमरांकित केशरीभाळा ॥ बालार्ककांति तये पद कमला ॥ वांकी वाळे पैंजण गर्जती ॥ २७ ॥

श्रीनाथें ऐसें अर्चनान्वयें ॥ पूजिली महागुणिजन समुदायें ॥ आज्ञा मागोन महदैश्वर्यें ॥ रत्नागिरीसीं नाथ आ
ला ॥ २८ ॥ ऐसेंचि तीनवर्षीं हिमकेदार ॥ समारंभेसीं सौदागर ॥ मूळपीठासीं जातसे परिवार ॥ राजोपचारीं
पूजावया ॥ २९ ॥ प्रत्यक्ष युगायुगींची कीर्ती ॥ कलियुगारंभीं प्रख्यात लक्षिती ॥ शुक्लपक्ष मधुमासवसंतीं ॥ सं-
तजन येती यात्रेसीं अपार ॥ ३० ॥ श्रीमूळपीठासीं चैत्रमासीं ॥ नाथ भक्तजन परिवारेसीं ॥ जातसे यमाइ द-
र्शनासीं ॥ प्रतिसंवत्सरीं आदरें ॥ ३१ ॥ श्रीरवळनाथ मधुपर्कविधी ॥ राज्योपचारीं पूजिली विबुधी ॥ आनंदें
अनादिनिजानंदी ॥ महानंदीं वदतसे ॥ ३२ ॥ यमाई ह्मणे दक्षिणपती ॥ तुह्मीं नयावें मूळपीठाप्रती ॥ मी ये-
तसें मधुमासवसंतीं ॥ रत्नाद्रीं वस्ती करावया ॥ ३३ ॥ कैसी पाहूं रत्नागिरी ॥ यात्रा मिळते अपरंपारी ॥ कृ-
ष्टी होतो हिमकेदारी ॥ प्रतिवर्षीं येतां मूळपीठा ॥ ३४ ॥ केसें आनंदीआनंद वचन ॥ श्रीकेदारें करितां श्रवण ॥ आ
नंदे कोंदोन ब्रह्मांडभुवन ॥ सज्जनमनीं संचरला ॥ ३५ ॥ असो श्रीकेदारासीं यमाई ॥ निघाली गजर शक्तिस-
मुदायीं ॥ मिरवत चालिली छत्रछायीं ॥ सुरोत्सायीं विकर्ण लोटती परौती ॥ ३६ ॥ ऐसा मिरवत त्रिगुणाव-
तारी ॥ महदैश्वर्यें कनकाद्रिविहारी ॥ पातला रत्नागिरिसेजारीं ॥ जाफळ ह्मणती प्राकृतजन ॥ ३७ ॥ हिमाचळ
अचळ लहरी ॥ ठेविलिया पाताळविवरीं ॥ हिमभैरव स्थापी त्यावरी ॥ सुचिकाग्रीं छिद्र असे त्यापदीं ॥ ३८ ॥
तया छिद्रांतून हिमाची लहरी ॥ सुटतां सुचिकाग्रावरी ॥ पृथ्वीवरी व्यापिली ते सारी ॥ ह्मणोन शीत उष्ण ग्री
ष्मकाळ थोडा ॥ ३९ ॥ असो ऐसा दक्षिणाधीश ॥ उदयापातला रत्नाद्रींचंडांश ॥ चंपकारण्यीं यमाई संतोष ॥
राहिली अनादि आनंदस्वरूपी ॥ ४० ॥ मूळपीठाहूनि आदिशक्ती ॥ सन्मानेसीं रत्नाद्रिपर्वतीं ॥ नाथें आणितां

स्वयंभाकृती ॥ यमाई भगवती प्रगटली ॥ ४१ ॥ यमाईनें सोडोन मूळपीठ ॥ रत्नाद्रीं स्वयंभ जाहली प्रगट ॥ हे त्रिभुवनीं कीर्ति उद्भट ॥ जाहली सूर्यप्रभेसारिखी ॥ ४२ ॥ ऐसी वार्ता विश्वश्रवणीं ॥ भूमंडळीं परिसोन महाजनीं ॥ गृहीं संवत्सरप्रतिपदा करोनी ॥ रत्नागिरि जावया सिद्ध जाहले ॥ ४३ ॥ अवळा वृद्ध महाजन ॥ यात्रेसीं निघाले घनगर्जन ॥ थाट दाट उद्धट निशाण ॥ विचित्र बहुरंगी अपार ॥ ४४ ॥ दुंदुभि हलगियाचे जोड ॥ आरंभीं वाद्यें शक्ट झांगड ॥ निगमचौघडे गगनगडाड ॥ चांगभला गडाडी त्या रत्नागिरीं ॥ ४५ ॥ संध्याकाळीं हिमकेदारी ॥ महदैश्वर्यें निघाली स्वारी ॥ चिंतामणि मनसंतोष तुरंगावरी ॥ बैसतां गुलालांबरीं शोभला ॥ ॥ ४६ ॥ वारणेच्या दक्षिणोत्तरीं ॥ यात्रा उतरली अपारी ॥ एकादशीचे दिवाशार्वरीं ॥ चांगभलागजर परिसविती ॥ ४७ ॥ ऐशा रत्नागिरीच्या दशदिशां कडोनी ॥ यात्रेसी पावले घनगर्जनीं ॥ रत्नागिरीच्या चतुष्कोनीं ॥ चढतां निशाणदाटी जाहली ॥ ४८ एकादशीस महाजन अर्धरजनीं ॥ दशमीस पातले हरिदिनीं ॥ लागलीवाजंत्रांची ध्वनी ॥ विचित्रवर्णी अपार ॥ ४९ ॥ पुढें काळभैरवाचा भार ॥ पृष्ठीं षोडशसिद्ध पैगंबर ॥ नवनाथादि द्विरदकुंजर ॥ सुवर्णदंती मिरवती ॥ ५० ॥ तेतीसकोटि सर्व अमर ॥ चाचर खेचर भूचरवर ॥ ह्मणती चांगभल्याचा जयजयकार ॥ हिलाल उजळिले अनंतभक्ती ॥ ५१ ॥ असंख्य वाद्यध्वनि शब्दउद्भट ॥ चांगभल्याचा किलकिलाट ॥ गुलाल हिलालादि दाट ॥ निशाणें अचाटथाट अपार ॥ ५२ ॥ सुवर्णदंड धरोन निजकरीं सत्यबोधें अद्वय छडीदारी ॥ विषय गलवलाकरोन दूरी ॥ ज्योतिस्वरूप पाहा साक्षेपें ॥ ५३ ॥ जो कळोन पडला विषय कंदरीं ॥ दांभिक भजनगृहीं बैसला भारी ॥ दृष्टि न राखेच परमेश्वरीं ॥ संसारकांता

रीं धुंडितसे ॥ ५४ ॥ मी करितों संसारसार ॥ ऐसा जयाचा दुष्ट अहंकार ॥ तयासीं न दिसे दक्षिण केदार ॥ विषमबुद्धि दुस्तर ह्मणोनी ॥ ५५ ॥ विश्वकुटुंबी परमेश्वर ॥ ऐसा ज्याचा दृढनिश्चयोत्तर ॥ तोचि लक्षील हिमकेदार ॥ महाजन समुदायीं यात्रेमाजीं ॥ ५६ ॥ छत्र चामर विराजमान ॥ मेघडंबर मार्तांडवर्ण ॥ सदर सभेंत बैसला चंडांशकिरण ॥ नाथनिरंजन भक्तपरिवारीं ॥ ५७ ॥ कीं नक्षत्रमंडळीं निशाकरमणी ॥ कीं ग्रहमंडळांत वासरमणी ॥ कीं अमरांत जैसा वज्रपाणी ॥ तैसा नवनाथ शिखामणी शोभला ॥ ५८ ॥ किंवा केदारसिंधोदरीं ॥ पस्तीसखणांच्या नौकांतरीं ॥ वस्तु भरिल्या हरिजन परिवारीं ॥ नामध्वज उभारिले बहुवर्णी ॥ ५९ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र ॥ ध्वजपताका उपमे चतुःसमुद्र ॥ एकत्र मीनले भक्तजनचकोर ॥ श्रीनाथ पूर्णचंद्र पहावया ॥ ६० ॥ ह्मतापदीपिका अनंत हिलाल ॥ बादलभैरवें केला बंबाळ ॥ गुलालीं जाहले ईश्वरलाल ॥ कीं बाळदिवाकर ज्यापरी ॥ ६१ ॥ कीं सिंधुगर्भींचे जलतरंग ॥ गर्जत आले अंतरंग ॥ कीं गर्जत गगनीं घनमतंग ॥ गुलालरंगें महाजन रंगले ॥ ६२ ॥ कीं नाथ घनमंडळींचे भुजंग ॥ कीं क्रमणपदकमळीं झाले भ्रृंग ॥ संत गुणिजन पद्मसारंग ॥ गर्जती दंग होवोनि अपार ॥ ६३ ॥ पुढें चालती मनपवनतुरंग ॥ गुलालें रंगलें उत्तमांग ॥ चालती मुनिजन महासंघ ॥ चामर धवलरंगी वारिती ॥ ६४ ॥ असो ऐसा सुरवरोत्सवीं ॥ द्वादशी चतुर्दशी अरुणोदयीं ॥ होता सुरनर संतसमुदायीं ॥ छत्रचामरें श्रीनाथ शोभला ॥ ६५ ॥ पौर्णिमेसी महदैश्वर्य ॥ अभिजित समयीं माध्यान्हींसूर्य ॥ पातला निघाला द्वादशार्कमय ॥ ज्योतिर्लिंगाक्ष जो हस्तनक्षत्रीं ॥ ६६ ॥ मधुमास पौर्णिमेसीं माध्यान्हीं ॥ हस्तनक्षत्रीं शिबिकायानीं ॥ बैसोनियां खड्गपाणी ॥ निघाला घनघोर भक्तपरिवारीं

॥ ६७ ॥ ऐसा निघाला श्रीनाथ दिनकर ॥ थाट दाट निशाणांचेभार ॥ छत्र चामरें चंद्राकार ॥ शुद्धांबर चक्राकृति वारिती ॥ ६८ ॥ मयुरपिच्छें सुवर्णाकारी ॥ नानावर्णी लाविलीं हेमांबरीं ॥ दोभागीं वारिती नवलपरी ॥ कामांकुशैकलहरी ऊर्ध्व धरूनी ॥ ६९ ॥ कनकांबराचा ध्वज सुंदर ॥ पुढें चालिला मत्तकुंजर ॥ तयापाठीं तुरंग मनोहर ॥ चिंतामणी मनसंतोष हे दोनी ॥ ७० ॥ कीं चतुर्विधभक्ति मुक्तीचे हे तुरंग ॥ कीं मीन पिपिलिकान्वय विहंगें दंग जाहले गुलालरंग ॥ कीं ते निगमागमीचे घनमतंग ॥ दोभागीं नाथाचे चालती ॥ ७१ ॥ ऐसे दोभागीं वेदतुरंग ॥ दंग झाले गुलालरंग ॥ पालखीमाजीं बैसला ज्योतिर्लिंग ॥ ज्याणें ज्योतिर्लिंगें स्थापिलीं बारा ॥ ७२ ॥ असो ऐसा महाजन समुदायीं ॥ देवाधिदेव जातसे यमाई ॥ रुसली ह्मणोन नाना उपायीं ॥ नाथ पातला मंगळतुरीं ॥ ७३ ॥ घ्यावया यमाईचें दर्शन ॥ नाथ यदर्थीं कार्याकारण ॥ हा जनप्रघात पडिला हे पंडितजन ॥ विपरीतार्थ न ह्मणोत ॥ ७४ ॥ ब्रह्माविष्णु श्रीशंकर ॥ त्रैमूर्ति होवोनि एकाकार ॥ चौथा जमदग्नि अवतार ॥ ह्मणोन पूर्णब्रह्मचारी खळनाथ ॥ ७५ ॥ ब्रह्मा शंकर आणि हरी ॥ चवथा जमदग्नि खावतारी ॥ हे चारी एकत्राचे अधिकारी ॥ बद्रिविहारी ब्रह्मचारी आश्रमीं ॥ ७६ ॥ येथें विवाहाचें कर्म ॥ कल्पितां यदर्थीं घडे अधर्म ॥ हें भविष्योत्तर पुराणींचें वर्म ॥ प्रथमाश्रमी हा खळनाथ ॥ ७७ ॥ बाहत्तर युगाचे प्रथमप्रहरीं ॥ प्रथमाश्रमी हाचि ब्रह्मचारी ॥ पातला महदैश्वर्यैंबद्रिविहारी ॥ बिराडसिद्धही कपित्थनगरींचा ॥ ७८ ॥ सिद्धांत शास्त्र सिद्धान्वयपंथ ॥ श्रीनाथ वदला भविष्योत्तरार्थ ॥ पद्मपुराणांतरीं हेंचि संमत ॥ भविष्योत्तरीं ऐसेंचि असे ॥ ७९ ॥ येथें कल्पना पंडितजनीं ॥ दीर्घ न पाहतां सिंहावलोकनीं ॥ न धरितील हे असज्जनीं ॥ हा भाव तत्ववेत्ते जा-

णती ॥ ८० ॥ अनंतब्रह्मांड जो रची मनसंकल्पीं ॥ जो सहस्रशतार्धं निजला तल्पकीं ॥ तें हें ज्योतिरूप अखं
ड अकल्पीं ॥ त्याही वेद न कल्पी विवाहकर्में ॥ ८१ ॥ निर्गुण निरूपम निष्कामाय ॥ निंदा स्तवन द्वेष हार-
काय ॥ निगमागम्य निःप्रपंचाय ॥ निर्विकल्पाय तो हा दक्षिणदीप ॥ ८२ ॥ ऐसा अनादिज्योतिस्वरूप ॥ ब्रह्म
चर्याश्रमीं दक्षिणदीप ॥ कीं भक्तीं उजळिला साक्षेप ॥ भरतखंडार्थी रत्नाद्रीवरी ॥ ८३ ॥ ह्मणोन येथेंचि वाहूकार्या ॥
कैसी नाथासी होईल भार्या ॥ ह्मणावें सांग ऋषिवर्या ॥ ब्रह्मचर्याश्रमीं नाथ असतां ॥ ८४ ॥ लोपामुद्रेसीं अग
स्तिमुनी ॥ वदत ऐसीच कथा पुराणीं ॥ प्रथम ऋषीसीं वदे नारदमुनी ॥ तदाधारवाणी वदतसें ॥ ८५ ॥ असो
अव्युत्पन्न अगीर्वाण ॥ यदर्थी संशय कल्पील मन ॥ त्यांणीं पाहतां भविष्योत्तरपुराण ॥ संदेह हरोन होय मनो
हरी ॥ ८६ ॥ सारांश ब्रह्मचारी रवळनाथ ॥ चालला असे स्थितीसीं मिरवत ॥ प्रेमगुलाल अबीर घेवोन हस्तें
॥ घालावया लगबगां नाथ चरणीं येती ॥ ८७ ॥ तंव देवापासोन जातां निवाडें ॥ अडवा जनसमुदाय मागें
पुढें ॥ बहुत करितां जरी गडबड ॥ बाह्यात्कारीं देव दृष्टि पडेना ॥ ८८ ॥ प्रयत्नीं तपांच्या सायासीं ॥ श्रमी हो
तां अप्रयासीं ॥ अपरीयाप्त मदमत्सरांसीं ॥ त्यांसी सहसा देव दृष्टीपडेना ॥ ८९ ॥ जरी अचळ असेल पूर्वा-
र्चित ॥ तरी कृपा करील सद्गुरुनाथ ॥ हें जाणोन भक्तमनोगत ॥ अकल्पित दर्शन देतसे ॥ ९० ॥ पाहावयाला
गीं ज्योतिस्वरूप ॥ योगी निघाले मनसंकल्प ॥ नाना व्रत अवघड तप ॥ तीव्र साक्षेपें आचरले ॥ ९१ ॥ निरोदकीं
निराहारी ॥ भस्मांकित जटाधारी ॥ तिष्ठत राहिले शतसंवत्सरीं ॥ ऊर्ध्वमुख हस्त उभारोनी ॥ ९२ ॥ ऐसी
दारुण तपश्चर्या ॥ करितां भासती प्रतापसूर्या ॥ हें जाणोन महदैश्वर्या ॥ जनसंबंधें वेष्टिती ॥ ९३ ॥

ह्मणती सिद्ध महामुनेंद्र ॥ येथें पातला धराअमरेंद्र ॥ क्रोधें जैसा वीरभद्र ॥ परिचित परिदीक्षित नसे ॥ ९४ ॥
ऐसे अनेकमखाधारी ॥ परमहट्टी युद्धाधारी ॥ पातले स्वर्गाचिये द्वारीं ॥ परी कनकाद्रि तेथें नसे ॥ ९५ ॥ म-
नांत विचारी तैं योगेंद्र ॥ हे नाशिवंत इंद्रचंद्र ॥ त्रैलोक्यनाथाचे पदारविंद ॥ सेविती मिलिंद होवोनियां ॥ ९६
॥ सायोज्य साम्राज्य पदाधिकारी ॥ तो या स्वर्गसंपत्तीस धिःकारी ॥ असुरसंपत्तीस कैसा अंगिकारी ॥ हें तों सर्वथा
घडेना ॥ ९७ ॥ असो हे हट्टनिग्रह अवस्था ॥ विषयानुसक्ति होय समस्तां ॥ परि दीनानाथ पाहवयाचि आस्था
॥ सद्भक्तां वांचोन असेना ॥ ९८ ॥ ऐसे सद्भक्त अपार ॥ पहावया निघाले हिमकेदार ॥ टाकोन आशातृष्णे
चा कारभार ॥ सौदागर लक्षिती आवडी ॥ ९९ ॥ जनसमुदाय संबंधींलोक ॥ यात्रेमाजीं मिळती सकळिक ॥
ह्मणोनि पातले दांभिक ॥ कामक्रोधकुरीं बैसोनियां ॥ १०० ॥ एक वासना धरोनि नारीहस्तीं ॥ नाथयात्रेमा-
जी फिरती ॥ परी देवदर्शन न घेती ॥ अहंकृतीं घुमती घरोघरीं ॥ १ ॥ कुंटेळ मर्कट घेऊन करीं ॥ नाचविती
अहंममतेच्या द्वारीं ॥ एक मनतोता घालोन ज्ञानपंजरीं ॥ पातले हिमकेदारदर्शना ॥ २ ॥ परी महासन्यासी
उघडे ॥ बोध अफीम मलंग सेवडे ॥ परमार्थधारणा चरीत्र बडबडे ॥ ते भंगडे पातले नाथभेटी ॥ ३ ॥ एक जा
गृतीचीया भरें ॥ शोधित चालिले गिरिकंदरें ॥ एक स्वप्नाचिये कांतारें ॥ धुंडिती साक्षेपें नाथराया ॥ ४ ॥ एक
सुषुप्तीचिये अंधारीं ॥ भ्रमोन राहिली नवकंदरीं ॥ एक सुषुम्ना लंघोन उन्मनिद्वारीं ॥ साक्षात्कारमंदिरीं नाथ
पाहती ॥ ५ ॥ एक स्फुरणतुरंगीं बैसोनि निमाले ॥ एक वंदनकर्मीं लीन झाले ॥ एक कीर्तनीं रस सेवोनि धा-
५६ ले ॥ एक पादसेवोनि निवाले नाथचरणीं ॥ ६ ॥ एकीं नाथ पूजिला अर्चनीं ॥ एकीं सख्य केलें समदर्शनीं ॥

एकीं स्वात्मनिवेदनीं ॥ हा खड्पाणी वशकेला ॥ ७ ॥ ऐसें संतपदीं ज्ञानांजन ॥ संसारयात्रीं दाटिले घन ॥ तशांत ब्रह्मवेत्ते विद्वजन ॥ श्रीनाथनिरंजन सदैव पाहती ॥ ८ ॥ जे आशेचे अन्नत कुटिळ मनीं ॥ त्यांसींदृष्टि न पडे खड्पाणी ॥ ज्यांसीं प्रिय सत्समागम संघटनीं ॥ त्यांसीं महाजनदाटणीं नाथ भेटे ॥ ९ ॥ असो ऐसा हिमकेदारी ॥ महदैश्वर्य भक्तपरिवारीं ॥ पातला चंपकवनांतरीं ॥ जेथें यमाई अवतरली ॥ १० ॥ श्रीनाथ पातला हरिजनमेळीं ॥ हें जाणोन त्हदयकमळीं ॥ आडवी दिधली कपाटफळी ॥ दृष्टि लागेल ह्मणोनियां ॥ ११ ॥ किंवा रुसली जगदंबा ॥ कीं लक्षूनि महाजनकदंबा ॥ कीं अनादिकोटि चंद्रबिंबा ॥ ह्मणोन कपाट प्रतिबिंबा दर्शवी ॥ १२ ॥ अनादिस्वरूपी अनादिशक्ती ॥ अनंत मायारूपीं व्यक्ताव्यक्ती ॥ स्थूल सूक्ष्म परा पश्यंती ॥ मध्यमा वैखरी अहंमस्मिता ॥ १३ ॥ जयाचें स्वरूप वर्णितां गाढें ॥ वेद वरळती बोबडें ॥ व्याकरणशास्त्रीं पडिलें कुवाडें ॥ अष्टादश शब्द उगेंचि वडबडती ॥ १४ ॥ ब्रह्माविष्णु आणि त्रयंबक ॥ जयेचे उदरीं जन्मले बाळक ॥ तेही उत्पति पालन संहारक ॥ कौतुकार्थ खेळवी पाळखातें ॥ १५ ॥ पतीसीं नेणतां जाहली गरोदर ॥ बीज आकारिलें जगवट बीजांकुर ॥ पतिव्रतपणाचा पायीं तोडर ॥ ब्रह्मांडोदरीं गर्जतसे ॥ १६ ॥ पाहवा निश्चय यमाई निर्धारीं ॥ नव्हे पुरुष ना नपुंसक नारी ॥ अगोचर गोचर बाह्यांतरीं ॥ आदिकौमारी हे निगमागर्मी ॥ १७ ॥ ब्राह्मी रौद्रीच वैष्णविये ॥ वदती व्यतिरिक्त मिमांस अन्वयें ॥ जेवीं शिनीवालीसी चंद्रान्वयें ॥ दावी दृष्टांत नये ज्यापरी ॥ १८ ॥ ऐसिया द्वैत कपाटांच्या झडपा ॥ लागल्या विकल्पीं संकल्पा ॥ ह्मणोन हरिजनीं दक्षिणादिपा ॥ घेऊन आले पंडितहो ॥ १९ ॥ असो ऐसा भक्तजनकैवारी ॥ मिरवत आला हिमकेदारी ॥ येऊन बैसला

सदर सभेवरी ॥ यमाईच्या सन्मुखीं ॥ २० ॥ नाथबैसतां समास्थानीं ॥ हें पाहोनियां भवानी ॥ लौकिकार्थ हा उघडजनीं ॥ दाखविला तो ऐका ॥ २१ ॥ जेवीं साठवर्षांनीं होईजे बाळ ॥ माता त्यातें न पाहे वेळोवेळ ॥ जननी दृष्टि उतावेळ ॥ तात्काळिक लागती ॥ २२ ॥ तैसा भाव कल्पोनि मनीं ॥ विद्या अविद्या कपाटें दोनी ॥ लाविली सविद्याभ्यासनीं ॥ यमाईनें आवडी ॥ २३ ॥ ज्योतिस्वरूप परब्रह्मपुतळा ॥ त्रिगुणात्मक घनसांवळा ॥ कासे कसोनि पीतांबर पिंवळा ॥ मंदस्मित मुखकमला सुंदर ॥ २४ ॥ ऐसा लावण्यपुत्र मूळॐकार ॥ त्रैलोकींचा जो राज्याधिकार ॥ माजीं दृष्टि परमखडतर ॥ ह्मणी लागेल देवासी ॥ २५ ॥ ह्मणोन न पाहेचि मी तूंपण ॥ उडवोनि अक्षयीं असे सुखसंपन्न ॥ तें प्रार्थना करोनि हरिजन ॥ दैत्यकपाटासीं उघडिलें ॥ २६ ॥ पुत्र देखो न जोडगा ॥ जेवि माता हर्षे अंतरंगा ॥ तैसें लक्षोन ज्योतिलिंगा ॥ स्वयंभ यमाई आनंद निजानंदीं ॥ २७ ॥ अमरेंद्रादि मुनि हरिजन ॥ ऋषिगण गंधर्व विद्वजन ॥ षोडशोपचारीं करोन अर्चन ॥ वस्त्रांभरणें समर्पिलीं ॥ २८ ॥ परिधान करविलें कनकांबर ॥ चिद्रत्नांचे अळंकार ॥ अष्टगंध चंपक मौक्तिकहार ॥ आपाद पर्यंत रुळती ॥ २९ ॥ ऐसी अनादिशक्तीची विचित्र खाणी ॥ उघडिली हे अवचिता खड्गपाणी ॥ प्रथकाकार जाहला त्रिगुण अगुणी ॥ तो अग्निपुराणींचा युग्मश्लोकार्थ परिसावा ॥ ३० ॥ लोपामुद्रा ह्मणे अगस्ती ॥ खळनाथ प्रथमाश्रमांबरींचा गभास्ति ॥ पृथकाकार सूर्य झाला अगस्ति ॥ धनंजयऋषि कारणें ॥ ३१ ॥ ब्रह्माविष्णु श्रीशंकर ॥ कैसेझाले पृथकाकार ॥ हें ऐकोन लोपामुद्रेचें उत्तर ॥ कलशकुमर वदे तें ऐका ॥ ३२ ॥ तीर्थें करित धनंजयऋषी ॥ पातला भार्येसहित वैतर्णीसीं ॥ तों या भेटली समारंभेसीं ॥ तयासीं धनंजय वदतसे ॥ ३३ ॥ कासयाचा समारंभ भारी ॥

केदार नाना ध्वज उभवोन कनकांबरीं ॥ दुंदुभिनाद भरला अंबरीं ॥ तेणें हे रत्नागिरि कंदरी दणाणिली ॥ ३४ ॥ विजय.
हे ऐकोन धनंजयवाणी ॥ तयातें वदती सारांशवचनीं ॥ श्रीमूळपीठाहून आणिली भवानी ॥ खळनाथें आवडी
१६७ नें ॥ ३५ ॥ ते हेचि रेणुकासुत युगांतीं ॥ युद्धीं जमदग्नीच्या खावर्ती ॥ श्रमतां ऋषीनें परशरामहस्तीं ॥ मायाम अ.२७
स्तक उडविलें ॥ ३६ ॥ जमदग्नीचा रामें पण नेमस्त केला ॥ ऋषिअंतरात्मा स्वस्थ केला ॥ शक्तिप्रतापार्क अ-
स्त केला ॥ जाणोनि जमदग्नी ह्मणे मागें वरा ॥ ३७ ॥ ऐकोन जमदग्नीचें वचन ॥ वंदोन वदे रेणुकानंदन वि
श्व जाहलें हें शक्तिहीन ॥ शून्य त्रिभुवन जाहलें ॥ ३८ ॥ शक्तिविरहित कैंचें ज्ञान ॥ कैंचा परमार्थ शास्त्रपठण ॥
शक्तिविना तीर्थाटन ॥ संग्राम दारुण कोण करील ॥ ३९ ॥ शक्तिविरहित गृहस्थाश्रमा ॥ करितां व्यर्थ पावि-
जे श्रमा ॥ मायेविरहित हरिहर ब्रह्मा ॥ आकारितील कैसेनी ॥ ४० ॥ आतां सर्व अपराध करावा क्षमा ॥ माये
सीं उठवोन दिजे क्षेमा ॥ संध्याकाळींच्या करोन होमा ॥ रामासीं आराम करावें ॥ ४१ ॥ ऐकोन परशरामाचे बो
ल ॥ जमदग्नी चित्तांत डोले ॥ ह्मणे हा रामांबुधी सखोल ॥ यांत परशराम जन्मला ॥ ४२ ॥ ह्मणे ऐकें भृगुकु
ळटिळका ॥ तुवा होमावी ही रामा पावका ॥ हे दिव्य देह धरील तैं रेणुका ॥ तेव्हां हे रत्नागिरीवरी भेटेल ॥
॥ ४३ ॥ जाणोन पुढील भविष्यासीं ॥ होमीं घातलें रेणुकेसीं ॥ तैं भवानी वदे अनादिवेषीं ॥ परशरामातें आ-
दरें ॥ ४४ ॥ ह्मणे पुत्रा ऐक गोष्टी ॥ तूं चाल मीं येतें तुझे पाठी ॥ मातें पाहसी फिरोन विषम दृष्टी ॥ तरी मी
तुझी भेटी न घेई ॥ ४५ ॥ ऐसी वदोन ज्वालामुखा ॥ नाभीपर्यंत बाहिर रेणुका ॥ निघाली न धरोन मनीं नि-
शंका ॥ तैं धरोन आशंका रामें पाहिली ॥ ४६ ॥ रामें फिरोन पाहतां मागें ॥ रेणुका राहिली तेथेंचि रागें ॥ ये १६७

तां मज नये नग्न अंगें ॥ मातापूर माहूर यालागीं ह्मणती ॥ ४७ ॥ असो राम ह्मणे आदिमाये ॥ कां हो निष्ठुर झालीस माये ॥ ममदुःख ब्रह्मांडघटीं नमाये ॥ दावीं पाय अंबिके ॥ ४८ ॥ ऐसें ऐकोनियां भगवती ॥ ह्मणे मीं द्वापाराचिये अंतीं ॥ भेटेन तुज संह्याद्रिपर्वतीं ॥ खनासुर वधोत्सव जाहलिया ॥ ४९ ॥ ह्मणोनि रेणुकेची क्रोधदृष्टी ॥ जाहली ते समयीं आतां समदृष्टी ॥ होईल यास्तव जातसें भेटी ॥ चांगभल्याचे किलकिलाट ॥ ५०॥ भंगोन रेणुकेचें वचन ॥ फिरोन पाहिलें भृगुनंदने जाण ॥ ह्मणोन भगवती क्रोधेंकरोन ॥ कृतायुगीं राहिली माहुरीं ॥५१॥ जालंदराचि दुर्धर सेना ॥ चंडमुंडादि मधुकैटभभंजना ॥ वधावया होवोन सिंहवदना ॥ त्रेतायुगीं पातली तुळजापूरीं ॥ ५२ ॥ तेथेंचि सीता होवोन तुळजाई ॥ दाशरथासीं भेटतां तुकाई ॥ तें राम ह्मणे येथें आलीसी तूं कायी ॥ महादेवासीं नविसंबें ॥ ५३॥ तें सक्रोधें तैसीच परतली ॥ श्रीमूळपीठासीं आली ॥ नाम त्रिविधा जाहली ॥ यमाई तुकाई मोकळाई ॥ ५४ ॥ हेजाणोन श्रीनाथें ॥ संभ्रमें आणिली रत्नागिरितें ॥ रुसली ह्मणोन जगदंबेतें ॥ समजावया जात पौर्णिमेसीं ॥ ५५ ॥ ब्रह्मा विष्णु श्रीशंकर ॥ चवथा जमदग्नीरवावतार॥ एकत्र होतां प्रथकाकार ॥ होय तो पाहावया जातसे ॥ ५६ ॥ महाजन बोलती विवाह कार्य ॥ होतसे पोर्णिमेसीं महदैश्वर्य ॥ हें पाहवया अति आश्चर्य ॥ यात्रा समुदायेसीं पातली ॥ ५७ ॥ परी याचा भाव भिन्नचि असे ह्दया ॥ तो परिसे गा धनंजया ॥ भोगोन अहंगोपस्त्रिया ॥ ब्रह्मचर्याश्रमीं हाच की कृष्णनाथ ॥ ५८ ॥ कीं साठ सहस्त्र खंडी षड्सान्न ॥ भक्षोन दुर्वास उपोषण ॥ तैसा श्रीनाथनिरंजन ॥ निगम प्रमाण हें करितसे ॥ ५९ ॥ जेवीं षण्मासांची करोनि राती ॥ तृप्त केल्या कृपामृतीं ॥ एकदांचि सोळासहस्त्र युवती ॥ वरिल्या वेदश्रुति प्रथ

काकार ॥ ६० ॥ तैसीच हे नवलपरी ॥ श्रीनाथनिरंजन ब्रह्मचारी ॥ ब्रह्मा शंकर आणि हरी ॥ हीं प्रथकस्वरूपें धरियेलीं ॥ ६१ ॥ चवथा जमदग्नीरवावतार ॥ खड्ग स्वरूपीं क्रोधाकार ॥ होऊन जमदग्नीऋषेश्वर ॥ श्रीरेणुकेसीं भेटला ॥ ६२॥ उभयतां बैसलीं एकांतीं ॥ हें जाणोन पातला दक्षिणपती ॥ तें पाहोनियां कपाटहातीं ॥ यमाईनें लाविलें ॥ ६३ ॥ त्रेतायुगीं अंतर पडला ॥ यास्तव अंतरपाट दिधला ॥ जन लौकीकत्रयीं प्रघात पडला ॥ तो-हा अंतरपाट उघाडिला ज्योतिर्लिंगें ॥ ६४ ॥ असो ब्रह्मा विष्णु पशुपती ॥ त्रिविधा होऊन दक्षिणपती ॥ वंदि-ली जमदग्नीयुक्त भगवती ॥ मंगळतुरीं घनघोर ॥ ६५ ॥ पुनः संधान संलग्नीं ॥ ऐक्य रेणुका जमदग्नी ॥ जाहलीं तो हाचि क्रोधाग्नी ॥ सेवितां खळनाथ नामें दक्षिणपती ॥ ६६॥ ऐसा दंपत्ययुक्त दक्षिणपती ॥ प्रथकाकार जाहला त्रिगुणाकृती ॥ गौतम अहिल्या वसिष्ठ अरुंधती ॥ अनंतचैतव्यत्वा देखसी धनंजया ॥६७॥ ऋषिपंक्तीसीं तें नवलपरी ॥ नाथ ही बैसला ब्रह्मचारी ॥ तप्त होऊन हिमकेदारी ॥ तुजला दर्शन देतसे ॥ ६८ ॥ तैसेंचि स्वरूपकारण्यीं ॥ जाहलें तें पाहावें श्रवणसदनीं ॥ बैसोन सख्य करावें क्रमणचरणीं ॥ स्वात्मनिवेदन वर्नीं नाथ पाहवा ॥६९॥ हे जमदग्नी रेणुका स्वयंवरकथा ॥ सहज आलीया दृष्टांता ॥ विकल्प न मानिजे संतश्रोता ॥ प्राकृतकविता ह्मणोनी ॥ ७० ॥ गीर्वाणशब्द कनकनगजडित ॥ लेणें करिती श्रीमंत ॥ तयांचे मोल करिती बोलोन प्राकृत ॥ ॥ महापंडित निजमुखीं ॥ ७१ ॥ असो ही कथा अग्निपुराणीं ॥ जमदग्नीची रेणुकाराणी ॥ जाहली तेचि चंपकारण्यीं ॥ यमाई स्वयंभ प्रगटली ॥ ७२ ॥ या सप्तविंशाति अध्यायांत ॥ यमाई दर्शना खळनाथ ॥ पातला जनसमुदायीं समस्त ॥ अग्निपुराणांत युग्म श्लोकीं ॥ ७३ ॥ आज्ञा मागोनि यमाईसी ॥ नाथ

जाऊन बैसला सद्रसभेसीं ॥ निरोप द्यावया निजभक्तांसीं ॥ तें अष्टविंशतितमोध्यायीं परिसावें ॥ ७४ ॥ सुवर्ण पिंपळ जटाधारी ॥ तेथें पूजेसीं अनंताकारी ॥ ते कथाअठ्ठाविसाव्याच्या अंतरीं ॥ श्रोतीं पुढारीं परिसावी ॥ ७५ ॥ इति श्री केदारविजयलीला ॥ हरिनामाच्या सुमनमाळा ॥ गुंफोन हरिमति मननिर्मळा ॥ जगदंबेच्या गळां घातली ॥ ७६ ॥ कीं हा केदारविजय सिंधू ॥ तेथें हरिनारायण उगवला पूर्णेंदु ॥ तेथील हरिनामामृत बिंदू ॥ अर्चनीं सेवावा सत्ताविसावा गोडहा ॥ १७७ ॥ इति श्री केदारविजय ॥ केदारखंडविरचितायां ॥ श्रीनाथ यमाई दर्शन भवती ॥ यात्रा वर्णननाम सप्तविंशातितमोध्यायः ॥ २८ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ओंव्या ॥ १७७ ॥ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीदक्षिणकेदारेश्वरायनमः ॥ कैलासवासिया कंदर्पदहना ॥ कैवल्यदायका कमलनयना ॥ कै-
टभमधुदनुजदमना ॥ कैवारिया हरिजनांचा ॥ १ ॥ खेरहिंगण हरिचंदना ॥ गैन करिसी राक्षसहनना ॥ गाया
राखसि कुंजवना ॥ गोराजिया क्षमाकरा ॥ २ ॥ घे घे घरांत हिंडसी सैरा ॥ नैचि गोपिका हे कणसुंदरा ॥ चै
ललाम हरिप्रियकरा ॥ चैतन्यरूपी हिमकेदारा ॥ चैत्रमासीं सुकरोत्सवा ॥ ३ ॥ छेमला छेयी छाकरा ॥ जैतपाळ
राज प्रियकरा ॥ जैमिनीहृदय संदेहहारा ॥ झै झंकार मात्र विवरा ॥ आयैयेरा अवतारी ॥ ४ ॥ यैयामि पूजाकृ-
तार्थ परमा ॥ यैं शुक्रतिकृत उपरमा ॥ येठें तिष्ठे समानक्रमा ॥ डैडो ढोढीढै विजया ॥ ५ ॥ नैमित्यानंद नित्य
नूतना ॥ नैमिष्यारण्यीं ऋषितत्वबोधना ॥ नैव जानामि तव गुणगहना ॥ नैवो ऐकवचत्वमपि रहिता ॥ ६ ॥ थै
थै ताल करतळी अचला ॥ थैथै स्थावर जंगम अमळा ॥ दैदैया मतिकर सोज्वळा ॥ ॥ दैवयागें आ-
दैवत अर्चन कर्त्तारा ॥ ७ ॥ धैंदूध संचित क्रियमाण चोरा ॥ धैर्याधैर्य करिसी धनुर्धरा ॥ धैर्यस्तंभ विदारण सं
हारा ॥ धैधैर्य कृतार्थ गहना ॥ ८ ॥ पैंजणवांकी क्रमणचरणीं ॥ फैफै फकिका कृतार्थ चरणीं ॥ बै बोधातत्वे सं-
बोधनी ॥ बैयो नारायणो हरी ॥ ९ मैमे भोमी भयानक वीरा ॥ भैरवाकृति विधि हरिहरा ॥ भैरव कल्पांती र-
वावतारा ॥ भय चकितय खळनाथा ॥ १० ॥ मैयाये यमाई संतोषका ॥ मैत्रयोऋषि इतिहास वर्धका ॥ मैषासु
र वधोत्सव दैत्यांतका ॥ मैनागिरीवर मंडना ॥ ११ ॥ रोहे हां बीजाक्षर स्वरव्यंजना ॥ वैकुंठवासी लक्ष्मीरमणा
॥ विनतासूनु प्रियकर वहना ॥ वैजयंतीहार सुमनो भरणा ॥ वैवस्वत मन्वंतरोद्धारका ॥ १२ ॥ लै लोलिंबराज १६९
वरदा ॥ लैलीलावतार शुभदा ॥ लै लोमेश अचळ भयदा ॥ लैलो लिंगाक्ष अंगांकिता ॥ १३ ॥ हैब्रह्न दैत्यद


अध्याय २८वा
(कपिलमुनीनें सगरास
शापदिला.)
सगरराजा
यज्ञाश्व
सगरयज्ञ

र्पभंजना ॥ हेमवतीतीर विहार जीवना ॥ हारा न होसी कुंजवना ॥ हैकहैक ह्मणता गोधनें वळसी ॥ १४ ॥ क्षका
रक होसी अक्षैक साक्षै ॥ क्षराक्षरी व्याप्त अपरोक्षै ॥ क्षतमपराध क्षालक्षै ॥ क्षमपक्षै अपेक्षित मनमोहरा ॥ १५
ऐसा दीनानाथनिरंजन ॥ भक्त मयूरमय वारित नर्तन ॥ वाद्यें गर्जतीं घनघर्जन ॥ महाजनेसीं रत्नागिरीं ॥ १६
यमाई मृषाभाव रुसणें ॥ ह्मणोन कपाट दिधलें जाण ॥ रुसावयास कारण कवण ॥ यदर्थीं पंडितजनें कल्पिली
॥ १७ ॥ न विचारितां जनक जननीतें ॥ पुत्र आपुल्या स्वमतें वर्ते ॥ मृषा क्रोध लौकिकातें ॥ कौतुकार्थ माय
दावी ॥ १८ ॥ तैसेंच वर्तला खड्गपाणी ॥ नविचारितां सिंहासनीं ॥ लक्ष्मीनें अभिषेकिला ह्मणोनी ॥ भवानी रुस
ली पंडितहो ॥ १९ ॥ सारांश यदर्थीं व्यासवाणी ॥ वदली भविष्योत्तरपुराणीं ॥ नविचारितां विष्णु रमणी ॥ श्रीना
थासीं राज्यासनीं बैसविलें॥२०॥ह्मणोन सोडोन रत्नागिरिवरा ॥ गेली नाहीं पार्वती करवीरा ॥ ह्या प्रसिद्ध व्यासोत्तरा॥
करवीर महात्म्यीं परिसावें ॥ २१ ॥ असो यमाई रुसली हे नवलपरी ॥ भविष्योत्तर सिंधोदरीं ॥ व्यासवाणीच्या पा-
तल्या लहरी ॥ केदारविजय तटाकीं गर्जती ॥ २२ ॥ असो हे अविद्येचे संतापसारे ॥ अव्युत्पन्न भाषणाचे पसारे ॥ ह-
रिनामामृत तुषारें ॥ दक्षिणकेदार वारील ॥ २३ ॥ हें सप्तविंशतितमोध्यायीं ॥ कथा परिसिली केदारविजयीं ॥ ना-
थ निघाला भक्तसमुदायीं ॥ स्वयंभ यमाई जेथें चंपकारण्यीं ॥ २४ ॥ पूजा करोनि राजोपचारीं ॥ नाथ निघाला
जयजयकारीं ॥ वाद्य ध्वनींसीं घनघोरीं ॥ त्रिकुटशिखरीं मिरवला ॥ २५ ॥ नाना वाद्यध्वनीसीं मिरवत ॥
पणवान् गोमुख तंत वितंत ॥ छत्र मेघडंबर शिरीं मिरवत ॥ सदृश सभे बैसले ॥ २६ ॥ रंभा उर्व-
शी तिलोत्तमा ॥ लावण्य स्वरूपी उत्तमोत्तमा ॥ नट नाट्य वैतालिक ललामा ॥ सप्तस्वर मंडितान्वय क-

रिती ॥ २७ ॥ हिलाल लाविले चंद्रज्योती ॥ बाण सक्रोध नळे उडती ॥ सुस्वर नगरनारी ओंवाळिती ॥ ज्योति-
स्वरूपासीं महाजन ॥ २८ ॥ गीत संगीत रसोत्पत्ती ॥ सहाराग छत्तीसभार्या सहिती ॥ गंधर्वगायनें रंजविती ॥
निरंजनचित्तीं संतोषे ॥ २९ ॥ जंगीढोल वाजंतरें चंग ॥ करताल अलगुजा टाळ मृदंग ॥ रुमाल उडती पंचरं-
ग ॥ मुनिवर भ्रृंग भ्रमताती ॥ ३० ॥ ऐसे नानापरीं उपचारीं ॥ संतोष पावला बद्रिविहारी ॥ विडे वांटती सह
परिवारीं ॥ खाद्य खजूंरी गुड शर्करा ॥ ३१ ॥ कुंजर झुलती झलव्य ऐसे ॥ महाप्रसाद वांटिला विशेषें ॥ आ-
ज्ञा दिधली रवळेशें ॥ आपुल्या गृहासीं जावया ॥ ३२ ॥ सद्भक्तांसीं देवोनि निरोप ॥ सदरेहून उठला दक्षि
णदीप ॥ निजमंदिरीं ज्योतिस्वरूप ॥ विश्रामतल्पीं विराजे ॥ ३३ ॥ ऐसी कथा अगस्तिऋषी ॥ विस्तारें सांगें
स्वकांतिसीं ॥ वंदोन स्वयंभ यमाईसीं ॥ अगस्ति तळ संदेसीं निघाला ॥ ३४ ॥ तळसंदेचा जळसेंदुसेन ॥ हें
उत्तरसमुद्राचें स्थान ॥ शत धनुष्यावरी तेथोन ॥ कलेश्वर भक्तीं वंदिला ॥ ३५ ॥ पूर्वसमुद्रीं जालसेन ॥ तोचि
अतकीरचा जळसेन ॥ शतधनुष्य करून गणन ॥ कलेश्वर पूजिला ऋषिवरें ॥ ३६ ॥ तेथोनि पातला करवीरा
सीं ॥ यात्रा करोन पंचक्रोशी ॥ तीर्थविधि रुद्र गयेसी ॥ करोन गोकुळ सिरगांवासीं पातला ॥ ३७ ॥ गोकुळ
सिरगांवींचा जळसेन ॥ तया तीर्थीं करोन स्नान ॥ जळसेन यथाविधि पूजोन ॥ तेथून शतधनुष्य कलेश्वर ॥
॥ ३८ ॥असो गोकुळसिरगांव तो दक्षिणसागर ॥ जळसेन पूजि कलशकुमर ॥ लक्ष्मीस येवोन नमस्कार ॥
भार्ये सहित पुनरपि केला ॥ ३९ ॥ येथोन पश्चिमेस अगस्तिऋषी ॥ पातला जळसेन पूजनासीं ॥ अर्चन करू-
न यथाविधीसीं ॥ पश्चिम दिशा ते पश्चिमसमुद्र ॥ ४० ॥ पश्चिम दिशेचे नैऋत्यकोनीं ॥ कलेश्वर शतधनुष्य

प्रमाणी ॥ कलेश्वरातें वंदोनमुनी ॥ लक्ष्मी वंदिली पुनरपी ॥ ४१ ॥ विधियुक्त पूजोन विष्णुरमणी ॥ क्षेत्रप्रदक्षिणा करोनी ॥ तयानंतर ऋषिसहपत्नी ॥ त्र्यमळीसीं वंदिलें ॥ ४२ ॥ यथामिळितोपचारीं ॥ पूजोन त्र्यमळी खेचरी ॥ अगस्ति ह्मणे विनयोत्तरीं ॥ मम विनंति परिसावी ॥ ४३ ॥ करवीर क्षेत्रींचीं सर्व तीर्थें ॥ पुराण प्रसिद्ध जीं विख्यातें ॥ तीर्थराज महासमर्थ ॥ षण्मास पर्यंत आचरलों ॥ ४४ ॥ यात्रा करोन पंचक्रोशी ॥ पातलों तुझे दर्शनासीं ॥ ह्मणोन दीर्घदंड नमस्कारासीं ॥ अगस्तिऋषि करितसे ॥ ४५ ॥ दक्षिणप्रयाग रुद्रगया ॥ ऐशा करवीर महात्म्यींच्या अन्वया ॥ व्याससमत्तें परिसोन सदयत्हृदया ॥ आचरलों संपूर्ण जगदंबे ॥ ४६ ॥ परी काशी वियोगाचा संताप ॥ जाळितसे हुतांश स्वरूप ॥ हें ऐकोनियां साक्षेप ॥ वदे त्र्यमळी ऋषितें ॥ ४७ ॥ आतां करवीर उत्तरद्वारा ॥ जावें शीघ्र रत्नागिरीवरा ॥ पुनरपि जमदग्नि अवतारा ॥ हिमकेदारासीं वंदावें ॥ ॥ ४८ ॥ काशीवियोग प्रळयानळ ॥ शांत करील नलगतां वेळ ॥ ऐसें परिसोन ऋषि स्नेहाळ ॥ रत्नाचळासीं पातला ॥४९॥ पुनरपि कर्पूरतीर्थीं स्नान ॥ भार्येसहित ऋषीनें करून ॥ धृष्णेश्वर कर्पूरवर्ण ॥ यथाविधि पूजिला ॥ ॥ ५० ॥ तेथून पातला केदारतीर्थीं ॥ तेंच रेतकुंड जाणिजे संतीं ॥ जैसी बद्रिकाश्रमीं आचमन रीती ॥ तैसी करावी सुरवरनरीं ॥ ५१ ॥ कृत त्रेत द्वापारीं ॥ संकल्प असती अगमोत्तरीं ॥ कलयुगीं जंबुद्वीप भरतखंडांतरीं ॥ वैवस्वत मन्वंतरीं संकल्प ॥ ५२ ॥ असो संकल्प विकल्पाचें पाणी ॥ द्वयहस्तें सोडोन द्यावें सव्यपाणीं ॥ आचमन करावें वामकरें करोनी ॥ तदनंतर करावें निजमुखें ॥ ५३ ॥ ऐसें प्राणापान व्यानीं ॥ आचमन करावें भिन्नाभिन्नी ॥ आर्घ्यी सव्यकर त्यावरी वास करानीं ॥ मग हस्त रहित मुखानें करावें ॥ ५४ ॥ विधि संकल्प करो-

न आचमनें ॥ तया नंतर अगस्तिऋषीनें ॥ भार्यें सहित करोन स्नानें ॥ षट्कर्मादि विधानें साधिलीं ॥ ५५ ॥ तुळसी वृंदावन नंदिकेश्वर ॥ सव्य घालोनि बद्रिविहार ॥ वंदिला महादेव लिंगाकार ॥ जो बद्रिकाश्रमाहून आणून स्थापिला ॥ ५६ ॥ तयास वंदून लोटांगणीं ॥ तयावरी रत्नोत्कट महिषामथनी ॥ पूजिली अष्टभुजा भवानी ॥ लक्ष्मीसखी चर्पटअंबा ॥ ५७ ॥ तेथून वंदिला दीनानाथ ॥ जो त्रयदेवात्मक समर्थ ॥ ब्रह्मा विष्णु हर मूर्तिमंत ॥ ब्रह्मचारी अवतारीया ॥ ५८ ॥ ऐसा नवनाथ शिखामणी ॥ ऋषीनें पूजिला नवविधसुमनीं ॥ ह्मणे ज्योतिस्वरूपा परिसें श्रवणीं ॥ गोष्ट अंतःकरणींची माझिये ॥ ५९ ॥ जान्हवी वियोगें मम मानस ॥ तीर्थयात्रें न पावें संतोष ॥ हें परिसोन दक्षिणाधीश ॥ अगस्तीसीं वदतसे ॥ ६० ॥ विप्रकुळांमाजीं निर्दोष ॥ कपिलमुनि महाविशेष ॥ जो बाहत्तर युगींचा चंडांशु ॥ तो सिद्धराज कपित्थनगरीं ॥ ६१ ॥ साठसहस्त्र सगरकुमर ॥ महायोद्धे रणरंगधीर ॥ अधःपातीं पडले सर्व ॥ ते उद्धरती जान्हवी आणलीया ॥ ६२ ॥ ही सर्व कथा विदित तुजला ॥ परी सिद्धाश्रमा जाय वहिला ॥ तेथें भेटेल जान्हवीबाळा ॥ अंशुमान नृपवर आणावयालागीं ॥ ६३ ॥ तो येईल दोनप्रहरीं ॥ त्वरीत तुह्मीं जावें कपित्थनगरीं ॥ ऐसें वदतां हिमकेदारी ॥ अगस्ति तेथून निघाला ॥ ६४ ॥ अगस्ति गेलिया कपित्थनगरीं ॥ काळभैरव हिमकेदारी ॥ अंशुमान नरेंद्र नृपवरीं ॥ काय कारण तप करावया ॥ ६५ ॥ कपिलाचार्य कपित्थनगरीं ॥ समाधिस्थ युगें चत्वारी ॥ बाहत्तरयुगांची नवलपरी ॥ सगर उद्धरले त्याचेनीं ॥ ६६ ॥ हे कैसे कथान्वयाचे उद्भव ॥ वदावे ह्मणे काळभैरव ॥ सूत शौनकातें कथा सर्व ॥ सगर गर्वोत्सवपात ऐकावया ॥ ६७ ॥ सगरकुमर ऐकोदर ॥ यूथप् यूथप् रणरंगधीर ॥ संख्या जाण साठसहस्त्र ॥

रणदीक्षित सर्वही ॥ ६८ ॥ प्रचंड पराक्रमी विशाळबुद्धी ॥ अपरोक्षज्ञानी सखोल उदधी ॥ अष्टमासिद्धि नव
निद्धी ॥ ज्याचे गृहीं दासीरूप ॥ ६९॥ त्या ऐसियाच्या प्रताप दिनकरा ॥ कपिलमुनिवरा लौकिकगिरा ॥ झग
टतां साठसहस्त्र प्रभाकरा ॥ लोपले कपिलोत्तर आमाळीं ॥ ७०॥ असो ऐसे महायोध ॥ ज्यानीं आरंभिला अश्व
मेध ॥ यज्ञकंकण बांधिलें प्रसिद्ध ॥ सेनासिद्ध केली जयांनीं ॥ ७१ ॥ ज्यांची प्रतिज्ञेची अलोटरेषा ॥ नुलंघवे
त्रिदशां ॥ ह्मणती त्रैलोक्य तीनदिवसां ॥ जिंकून येऊं अस्तमानीं ॥ ७२ ॥ आधीं जिकावें स्वर्गभुवन ॥ तया नं
तर अर्धक्षण ॥ नभरतां जिंकू मृत्युभुवन ॥ नंतर सहस्त्रवदन पाताळींचा ॥ ७३ ॥ ऐसी जनकास प्रतिज्ञा करू-
नी ॥ निघाले साठसहस्त्र निशाक्रमूनी ॥ दिव्यौषधी शस्त्र संधानी ॥ कीं अश्विनी कुमर सर्व भासती ॥७४॥ जै
सा गगनीं संचरे चंडकिरण॥ पुढें चालिला शामकर्ण॥ साठसहस्त्रांचें घालोन आवर्ण॥ कीं सेनार्णवींच्या लहऱ्या
उसळती स्वर्गीं ॥ ७५ ॥ कीं जैसे चतुःसमुद्राचे लोट ॥ तैसे भयंकर सैन्याचे संघाट ॥ गर्जत पातले वैकुंठपीठ
॥ स्वर्गवाटा रोधिल्या ॥७६॥ सगर सैन्यार्णवाच्या लहरी ॥ झगटल्या चौफेर स्वर्गद्वारीं ॥ हें देखोन शतमखाधि
कारी ॥ सहस्त्रनयन गडबडला ॥ ७७ ॥ इंद्र ह्मणे ब्रहस्पतीसीं ॥ सगररायें शामकर्णासीं ॥ सोडिलें त्रैलोक्य जिं
कावयासीं ॥ इंद्रपदासीं घ्यावया ॥ ७८ ॥ अश्वमेध शत करूनी ॥ वरिष्ठ होती यात्रिभुवनीं ॥ ऐसें भासे माझे
मनीं ॥ अंगिरातनया जाणपां ॥ ७९॥ ऐसें वदतां सहस्त्रनयन ॥ ब्रहस्पति बोले सारवचन ॥ ह्मणे ऐक भविष्य
चिन्ह ॥ होणार खूण परिसावी ॥ ८० ॥ अमानुष्य हे सगरकुमर ॥ मूर्तिमंत विष्णु अवतार ॥ जे कल्पिती नि-
जांतर ॥ सिद्ध करतील सूर्योदयीं ॥८१॥ हे अजिंक्य संग्रामीं ॥ युद्धीं करितील तुह्मांस श्रमी॥ कार्य साधावें स्व

कृतकर्मीं ॥ तें अनुक्रमीं अवधारीं ॥ ८२ ॥ शामकर्ण नेऊन पाताळभुवनीं ॥ जेथें बैसला कपिलमुनी ॥ तो अश्व बांधावा अलिप्तपणीं ॥ हें वज्रपाणी जाणपां ॥ ८३ ॥ तरीच वारेल महदारिष्ट ॥ हें नकरितां पावसी कष्ट ॥ सहस्र गोष्टींची एकगोष्ट ॥ शचिवरा स्पष्ट निर्धारीं ॥ ८४ ॥ ऐसें परिसोन देवेश ॥ निराळोद्भवास बोधोन सारांश ॥ अश्वचोरिलाजेवीं काळपाश ॥ अकळा कृतांत जीवजयापरी ॥ ८५ ॥ असो तुरंग पाताळविवरीं ॥ नेऊन बांधिला शतमुखचोरीं ॥ कपिलमुनिवरा सेजारीं ॥ शामकर्ण बांधिला ॥ ८६ ॥ तंव इकडे वर्तली नवलपरी ॥ गडबड झाली सगरां भारीं ॥ ह्मणती शामकर्ण नेला चोरीं ॥ कवण विचार कळेना ॥ ७७ ॥ हें ऐकोन अघटित कर्मा ॥ विश्वावसु सागरनामा ॥ खवळला दारुण संग्रामा ॥ करावयासीं प्रतापें ॥ ८८ ॥ चंड कोदंड प्रचंड वर्णी ॥ धनुष्य ओढिलें तीव्र आकर्णीं ॥ बाण लाविले हुतांशकिरणी ॥ साठसहस्र कुमरीं ॥ ८९ ॥ साठसहस्रांचें तीव्रोत्तर ॥ वीरश्रीय गर्जती घनघोर ॥ डळमाळिले मेरुमंदार ॥ ब्रह्मांड एकसरें तडकलें ॥ ९० ॥ जेवीं तप्त करितां पंचदुधाणी ॥ उतोन चालिलें स्फुलिंगाकिरणीं ॥ तैसें क्षीरार्णवीचें पाणी ॥ कडकडोन गगनीं उसळत ॥ ९१ ॥ कीं प्रळयकाळींच्या सौदामिनी ॥ अनंत पडल्या स्वर्गभुवनीं ॥ हें लक्षोन वज्रपाणी ॥ थर कंपित जाहला ॥ ९२ ॥ हस्त जोडोन सहस्रनयन ॥ सवें बृहस्पतीतें घेऊन ॥ येऊन विनवी दीनवदन ॥ विश्वावसु नरवरा ॥ ९३ ॥ तुह्मींतरी सद्वंश सगरनिधी ॥ अपरोक्षज्ञानी विषाळबुद्धी ॥ आह्मीं दीन सर्व अपराधी ॥ निरापराधी सबाह्यांतरीं असों ९४ ॥ स्वर्गभुवनीं शामकर्ण ॥ नाहीं नाहीं हें त्रिवारवचन ॥ तस्करानें करोन हरण ॥ पाताळभुवनीं नेला असे ॥ ९५ ॥ बृहस्पति ह्मणे ऐक राया ॥ तुह्मीं आरंभिलें धर्मकार्या ॥ तेथें विघ्नकरावया ॥ कवणा असे सामर्थ्य ॥ ९६ ॥ उत्तम सर्प शिखामणी ॥

देखोन घेतां उन्मतपणीं ॥ वस्तु नपावे परी प्राणहानी ॥ मरण होय रोकडें ॥ ९७ ॥ पंचाननाची अंगना ॥ बळें करोनि करितां हनना ॥ तेणें घेतलें अमंत्रणा ॥ कृतांतसदना भोजनार्थी ॥ ९८ ॥ कळोन आवडी विषभक्षण ॥ त्यांचा वांचेल कैसा प्राण ॥ कुष्मांडाची तुळा करोन ॥ कैलासभुवन केवीं पावे ॥ ९९ ॥ कांता विकोन बाजारीं ॥ मग गृहस्थाश्रम कैसाकरी ॥ वृक्ष खांदीं बैसोन मूळखंडी कुठारीं ॥ मगकैसावांचे सांगपां ॥ १०० ॥ कीं आपण शक्तिहीन गर्भांध ॥ बलवंतासीं करी विरोध ॥ कीं पंडितांसवें करीवाद ॥ निराक्षरीय सिद्धझाला ॥ १ ॥ कीं पथ्याचें पैंशून्यजनी ॥ चोहटा करितां षट्कर्णी ॥ तयाचे परिणामाची शिराणी ॥ शासन पुराणीं वदली असे ॥ २ ॥ आपले घरचा यज्ञ नारायण ॥ ठेविला कनकांबरीं बांधोन ॥ तो करील समूळ दहन ॥ तैसा शामकर्ण कल्पिला असे ॥ ३ ॥ तुह्मीं आमुचे यजमान ॥ आह्मीं याचकदेव ब्राह्मण ॥ धर्म यज्ञादिक विधान ॥ करितां संतुष्ट हरिहर ॥ ४ ॥ ऐकोनि बृहस्पतीची वाणी ॥ साठसहस्र सगरगुणी ॥ ह्मणती अभय तुजवज्रपाणी ॥ चिंत्तानकरीं मानसीं ॥ ५ ॥ जावोनियां पाताळभुवना ॥ शिक्षाकरूं सहस्रवदना ॥ ह्मणोन उतरले मृत्युभुवना ॥ सगरराज साठसहस्र ॥ ६ ॥ साठसहस्र रथ घडघडाट ॥ चूर्ण होती गिरिदरकुट ॥ ज्यांच्या रथचक्राचा चपेट ॥ रत्नाकर महोदधी झाला ॥ ७ त्या कथेची रसोत्पती ॥ पुढें परिसावी संत महंतीं ॥ करोन स्थीर मनोवृत्ती ॥ केदारविजय परिसावा ॥ ८ ॥ इतिश्री केदारविजय ध्वजीं ॥ हरिनाम मुद्रांकित विराजी ॥ नारायण कृपानुग्रह बीजीं ॥ प्रसिद्ध अठ्ठाविसावा गोडहा ॥ १०९ ॥ इतिश्री केदारविजय केदारखंड ॥ भविष्योत्तर पुराण ॥ विरचितायां ॥ सगर अश्वमेध आरंभोन्नाम अष्टविंशती तमोध्यायः ॥ २८ ॥ ओंव्या ॥ १०९ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीदक्षिणकेदारेश्वरायनमः ॥ पन्नग पन्हैया क्रमणचरणीं ॥ ऐयैय अनंत वासरमणी ॥ उ
गवले सारीगमपधनैय्या कीर्तनीं ॥ सदय त्दद्गगनीं सुमनोहरीं ॥ १ ॥ शैय्याकार भुजंग शयना ॥ संह्याद्रि द्वादश-
लिंग स्थापना ॥ शैल्यरमणा त्दद्यार्चना ॥ शेष वासुकी हार विराजिता ॥ २ ॥ राका शिनीवाली अयनवर्धका
॥ रातोत्पलदल मृगांकरेखा ॥ राईरखुमाई मनवेधका ॥ राम कृष्ण अवतारिया ॥ ३ ॥ ऐसा देवाधिदेव अना-
दि सगुण ॥ रत्नागिरीवरी मुखमंडन ॥ ऐसें वदतां कथारस संपूर्ण ॥ पस्तीस श्रवणपात्रीं भरिला ॥ ४ ॥ तीर्थें
करोनि अगस्तिऋषी ॥ पुनरपि रत्नाद्रिपर्वतासीं ॥ वंदोन नाथ सद्भक्तीसीं ॥ साष्टांगेसीं आवडी ॥ ५ ॥ अश्वमे-
धासी सगररायें ॥ आरंभिलें जैं प्रतापसूर्यें ॥ स्वर्गास गेला महदैश्वर्यें ॥ साठसहस्र सैन्यभार ॥ ६ ॥ शामकर्णा
सीं अलिप्तपर्णी ॥ पाताळीं बांधिला देवीं चोरोनी ॥ हें परिसोन कृतांतवर्णी ॥ सगरराज क्षोभला ॥ ७ तयाचा
केला शांत क्रोधाग्नी ॥ रहस्य भाषणीचें संबोधोनी ॥ ते उतरलिया मृत्युभुवनीं ॥ अमरेंद्रभुवन सोडोनियां ॥ ८
॥ हा अठ्ठाविसावे अध्यायीं कथारस ॥ संतीं सेविला मनोल्हास ॥ सूत शौनकातें वदतसे ॥ कथाकल्मष नाशि-
नी ॥ ९ ॥ सगरसेना रथघडाडी ॥ चालतां शतमेघ घडाडी ॥ जेवीं कल्पांत वीज तडाडी ॥ पर्वतदरडी घडाडीं
चूर्ण होती ॥ १० ॥ पाताळासीं जावयासत्वर ॥ मार्ग पाहती रणरंगधीर ॥ पृथ्वी हिंडतां चौफेर ॥ नवल वर्तलें
तें ऐका ॥ ११ ॥ साठसहस्र सगरवीर सारा ॥ चालतां रथचक्राचे भारा ॥ द्विभाग जाहली वसुंधरा ॥ एक
सरें रथापाठी रथ फिरतां ॥ १२ ॥ जेवीं चिखली रुततां कुंजरचरण ॥ ते भरियेले उदकीं पूर्ण ॥ तैसा रथचक्र
तळींचा मार्ग पूर्ण ॥ जळ विस्तीर्ण भरियेलें ॥ १३ ॥ सगररथ चक्रातळींचे बिंदु ॥ ह्मणोनि नांव ठेविलें सप्त-


अध्याय २९वा
महादेवा
च्या जटेंतू
न गंगेचा
मवाह
भगीरथ
श्रीविष्णु

सिंधु ॥ ऐसे साठसहस्र सखेबंधु ॥ सगरराजे बळी गाढे ॥ १४ ॥ सगरबळार्णवींचें आगर ॥ यालागीं नामें ते सप्तसागर ॥ या समान योद्धे धुरंधर ॥ सूर्यवंशीं दुसरे नाहींत ॥ १५ ॥ पृथ्वीचिया सभोंवती ॥ प्रदक्षिणा केल्या सप्तावृत्ती ॥ अयूथप यूथप प्रतापमूर्ती ॥ चंडांशुवंशीं प्रचंड ॥ १६ ॥ ज्यांचीये रथचक्रोद्भवें ॥ जाहले सप्तावृत्ति सप्तार्णव ॥ त्यांच्या रथचक्रांचें मानसर्व ॥ कथिलें असे भविष्योत्तरीं ॥ १७ ॥ असो हे कल्पांतभैरवराज ॥ साठसहस्र सूर्यवंशज ॥ हस्तिदंती कुदळी घेवोन सुतेज ॥ खनन करिती महीचें ॥ १८ ॥ साठसहस्र घेऊन कुदळी ॥ महीवरी मारितां भूडळमळी ॥ सहस्रवदन डळमळी ॥ अतिशयेसीं खनन करितां ॥ १९ ॥ शेष होऊन चिंताक्रांत ॥ ह्मणे झाला पृथ्वीचा अंत ॥ ऐसा नदेखिला आकांत ॥ प्राणांत समय पातला ॥ २० ॥ इंद्रें आपुली राखिली प्रतिष्ठा ॥ आह्मांवरी घातलें महदारिष्टा ॥ पृथ्वीचिया नृपश्रेष्टां ॥ करून कुचेष्टा चेष्टविलें ॥ २१ ॥ असो सक्रोधें खणतां सगरीं ॥ साठसहस्र पाताळ विवरीं ॥ प्रवेशले परम निकुरीं ॥ जेथें शामकर्ण बांधिला असे ॥ २२ ॥ तेथें कपिलाचार्य महामुनींद्र ॥ समाधिस्थ अखंड चित्समुद्र ॥ कीं ते द्वादशार्क एकादश रुद्र ॥ अनंत अवतरले एकस्वरूपीं ॥ २३ ॥ त्वंपद तत्पद असिपद ॥ चार भक्ति मुक्तीसीं अभेद ॥ ज्याचे वंदोन चरणारविंद ॥ दशावतार मिलिंद गुंजती ॥ २४ ॥ ऐसा कपिल महामुनी ॥ समाधिस्थ अचळ अनुष्ठानीं ॥ बहात्तरयुगींचा वासरमणी ॥ उदयास्त रहित अक्षय ॥ २५ ॥ षोडश सिद्धांमाजीं श्रेष्ठ ॥ बिरडासिद्ध तोहा कपिल मुनिवरिष्ठ ॥ सिद्धराज रवळनाथ चमू वरिष्ठ ॥ पातले शक्तिसमुदायीं अग्रगणी ॥ २६ ॥ अव्युत्पन्नीचे अगीर्वाणी ॥ यदर्थीं संशय घेतील मनीं ॥ बाहत्तरयुगाचे प्रथम चरणी ॥ कपिलाचार्यासीं नाथ पातला ॥ २७ ॥ ज्योतिस्वरूपाचे

अंतःकरणीं ॥ कपिलाचार्य चंडांशु किरणी ॥ हें न पाहोन दीर्घलक्षणीं ॥ शास्त्रार्थ संधानीं वर्षले ॥ २८ ॥ आमु
च्या आणोन शामकर्णा ॥ आपण बैसला अनुष्ठाना ॥ शस्त्रघायीं करावें चूर्णा ॥ ह्मणोन शस्त्र खणखणा वर्षती
॥ २९ ॥ तीं शस्त्रें चूर्ण झालीं सकळ ॥ सगरशक्ति जाहल्या विकळ ॥ कपिलमुनि जैसा अचळ ॥ शरजाळवा
तें चळेना ॥ ३० ॥ तैं नेत्र उघडितांचि मुनिवर ॥ अवलोकितां जैसे वैश्वानर ॥ वर्षतां पर्जन्य खदिरांगार ॥ स
गरा गिरीवरी वर्षला ॥ ३१ ॥ कपिलाचार्य क्रोधानळें ॥ दग्ध जाहलीं सगरकुळें ॥ साठसहस्त्र कुप सकळें ॥ गं
गातटीं सोरमपुरीं ॥ ३२ ॥ हें पाहीलें प्रत्यक्ष स्वनयनें ॥ हें पद्मपुराणींचें संबोधनें ॥ सोरमपुरीं कपिलाश्रमें ॥ भगीरथ
तिष्ठत उभाअसे ॥ ३३ ॥ सूतातें ह्मणती शौनक ॥ पितृव्य नसतां जन्मलों कैसा देख ॥ ते कथान्वय रसकौतु
क ॥ श्रवणवदनीं प्राशवीं ॥ ३४ ॥ सूत ह्मणे शौनकमुनी ॥ सुमतीनामें सगरराणी ॥ होती सप्तमासांची गर्भिणी
॥ ती पूर्णमासीं प्रसूत जाहली ॥ ३५ ॥ तो अंशु नामक सगर कुमर ॥ चंडांशुवंशीं प्रतापदिनकर ॥ दिवसें दि
वस जाहला थोर ॥ महा धुरंधर प्रतापी ॥ ३६ ॥ एके दिवशीं जननीसीं आदर ॥ विनवितसे जोडोनि कर ॥
क्षमा करोन मजवर ॥ विनंति एक परिसावी ॥ ३७ ॥ आमुचे पितृव्य बळसागर ॥ साठसहस्त्र रणशूर ॥ काय
जाहले ते सकळ एकवीर ॥ जन परिवार सर्वही ॥ ३८ ॥ ऐकोन पुत्रमुखींची वाणी ॥ अश्रु लोटले मातृनयनीं ॥ सर्व
कथिली पूर्वजकरणी ॥ कपिलाश्रम पर्यंत ॥ ३९ ॥ अंशुमान ह्मणे वो जननीये ॥ कोठें आहेत कपिलाचार्य ॥ तेथें
जाऊन तपश्चर्य ॥ करोन ऋषि तोषवीन ॥ ४० ॥ ऐकोन पुत्राचें वचन ॥ ह्मणे तूं सुकमार किशोर पूर्ण ॥ कै-
सें करोन अनुष्ठान ॥ प्रसन्न करिसी ऋषींतें ॥ ४१ ॥ साठसहस्त्र स्त्री कदंब ॥ त्यांमाजीं तूं एक जननार्कबिंब ॥

आह्मांस देऊनं ते पाहावया सांव ॥ कैलासा गेले सर्वही ॥ ४२ ॥ तुजवरी ठेवीं दृष्टी ॥ काळकर्मू सहस्रकोटी ॥ आह्मां अंधाचि एककाठी ॥ दूर ठेविल्या कवणगती ॥ ४३ ॥ अंशुमान वदे हेमाये ॥ मी जातसें तपश्चर्ये ॥ जेथें असती कपिलाचार्य ॥ तें स्थान मातें सांगपा ॥ ४४ ॥ सुमती ह्मणे ऐक कुमरा ॥ प्रवेशावें पाताळविवरा ॥ तुवां जावें कपित्थनगरा ॥ सिद्धेश्वर अर्चनार्थी ॥ ४५ ॥ तोचि कपिलाचार्यमुनी ॥ चत्वारी वेद समाधिस्थगणी ॥ कृतायुगीं बोलती ब्रह्मार्पणी ॥ त्रेतींरघुनंदन द्वापारीं कृष्ण बोलती ॥ ४६ ॥ भिल्लाटग्रामीं भुवनेश्वरी ॥ प्रसिद्ध असे सिद्धेश्वरी ॥ सोरमक्षेत्रीं अभिमासुवरी ॥ नरवरीं पूजिला कपिलाचार्य ॥ ४७ ॥ आदिब्रह्मेश्वर द्वापारीं ॥ विराडसिद्ध भुवनेश्वरी ॥ ऐसे कपिलाचार्य ब्रह्मांवरीं ॥ देवसमाधिअगरीं उगवला ॥ ४८ ॥ तुवां जावोन कपित्थनगरा ॥ आराधावें सिद्धेश्वरा ॥ दंडकारण्य कांतारा ॥ शोधोनि सिद्धाश्रमीं असावें ॥ ४९ ॥ वंदोनियां मातेचे चरण ॥ ह्मणे तुझें वचन वेद प्रमाण ॥ माताज्ञा घेऊन तत्क्षण ॥ कपित्थनगरा पातला ॥ ५० ॥ तेथें केलें तपसहस्रवर्ष ॥ जाणोन वदे श्रीसिद्धेश ॥ कैलासा जाऊन व्योमकेश ॥ गंगा विशेष देईल जाण ॥ ५१ ॥ तव पूर्वज साठहजारीं ॥ सिद्धरति गंगामृत तुषार ॥ ऐसे सिद्धाचे वरदोत्तर ॥ परिसोन राव तोषला ॥ ५२ ॥ अंशुमान गेला कैलासगिरिवरा ॥ आराधोन श्रीशंकरा ॥ दहासहस्रवर्षां नंतरा ॥ अयुष्यें गतायु जाहला ॥ ५३ ॥ हे वसिष्ठ ऋषीस कळली खूण ॥ पाताळीं सगरस्त्रियांचें दर्शन ॥ घेतलें अंशुमान तपाचरण ॥ ह्मणे चिंता न करीं डोळसा ॥ ५४ ॥ कुसुमती सुमती दोघी जाया ॥ अनुष्ठान करोन निर्मळकाया ॥ दहासहस्रवर्षें तपश्चर्या ॥ कुसुमती सुमती करिती ॥ ५५ ॥ कुसुमतीस दिधला स्त्रीलिंग मंत्र ॥ सुमतीतें दिधला सूर्यमंत्र ॥ कुसुमती

जाहलिया ऋतुपात्र ॥ सुमतीसीं पूर्वमंत्र रमावें ॥ ५६ ॥ उभयतीं पुरुष भावें रमावें ॥ कुसुमती उदरीं गर्भसं-
भव ॥ हा होईल सूर्यवंशज नांव ॥ भगीरथ ऐसें ठेविजे ॥ ५७ ॥ ऐसें सांगोन वसिष्ठमुनी ॥ आश्रमा गेला अ-
स्तमानी ॥ उभयतां करितां सुख मैथुनीं ॥ पुरुष स्त्रीकार संभोग ॥ ५८ ॥ असो तोंचि घटित दिन ॥ नवमास
जाहले पूर्ण ॥ पुत्र प्रसवली नवनिधान ॥ परि नवल परी परिसावी ॥ ५९ ॥ बत्तीस लक्षणी बाळार्ककळा ॥ अ-
स्थि मांसाचा शुद्धगोळा ॥ हें पाहाती तों तेचि वेळा ॥ वसिष्ठ तेथें पातला ॥ ६० ॥ वसिष्ठें मंत्रोन प्रोक्षितां पा
णी ॥ जपोनियां मंत्र संजीवनी ॥ अस्थि जडल्या कनक कोंदणी ॥ विश्वकर्में जयापरी ॥ ६१ ॥ पुत्र देखोन प्र-
तापवंत ॥ वसिष्ठ ह्मणे ऐकमात ॥ आत्म विख्याती भगीरथ ॥ ब्रह्मकल्पांतीं कीर्ति ज्याची ॥ ६२ ॥ स्वर्गास जा
वोन स्वदेह अचळीं ॥ गंगा आणील यामहीतळीं ॥ उद्धरील पितृव्यकुळी ॥ जे पाताळी पडियेली ॥ ६३ ॥ क-
पिलथनगरास जाईल आधीं ॥ सिद्धाश्रमीं तपाची समृद्धी ॥ वर देतांचि अनादिसिद्धी ॥ आदिमाधवमूर्ति भगी-
रथा ॥ ६४ ॥ आशीर्वाद घेऊन सिद्धाश्रमीं ॥ भगीरथ जाईल कैलासधामीं ॥ दहासहस्र वर्षें तप धर्मीं ॥ जोभ
वकर्दमीं अलिप्त ॥ ६५ ॥ श्रम देखोन भगीरथाचे ॥ रोमांच उभारिले अंगीं शिवाचे ॥ ह्मणे गंगा नेऊन पितृग
णाचे ॥ उद्धार करिजे जगदोद्धारा ॥ ६६ ॥ गंगा येईल अखंड भूमंडळी ॥ त्यावीत्वां घालितां कमंडळीं ॥ तरीच
जाईल हे वेल्हाळी ॥ हा निर्धार जाण भगीरथा ॥ ६७ ॥ ऐकोन शंकराचें वचन ॥ भगीरथ पातला ब्रह्मसदन
॥ दहासहस्र वर्षें जाण ॥ तपाचरण सांग केलें ॥ ६८ ॥ भगीरथास ह्मणे चतुरानन ॥ ब्रह्मकमंडलु उत्थापन ॥
करून हें तपाचरण ॥ तेथें ही दहासहस्र आचरावें ॥ ६९ ॥ ब्रह्माह्मणे भगीरथराया ॥ फार श्रमलास सदय ह

दया ॥ ऐरावती जाईल आणावया ॥ तो कमंडलु घेईल मस्तकीं ॥ ७० ॥ पुनरपि पातला अमरेंद्र भुवना ॥ ऐराव
ती प्रीत्यर्थ अनुष्ठाना ॥ दहासहस्र वर्षें गणना ॥ तेथें दारुण केलें तपासी ॥ ७१ ॥ ऐरावतीतें इंद्रें दिधला ॥ भ
गीरथ घेऊन निघाला ॥ ब्रह्मदेवापासीं आला ॥ ऐरावतीसीं भगीरथ ॥ ७२ ॥ ब्रह्मदेवा सहित ऐरावत ॥ कमं
डलु मस्तकीं शोभिवंत ॥ घेऊन पातला भगीरथ ॥ उमाकांत बैसला ॥ ७३ ॥ शंकरें तयाचे पाहोन कष्ट ॥ गंगा
जटेंतून केली प्रगट ॥ ब्रह्मकमंडलु गंगामृतें निघोट ॥ ऐरावत मस्तकीं ठेविला ॥ ७४ ॥ ब्रह्मकमंडलूसीं भागीर
थी ॥ आणिली मेरु मस्तकावरती ॥ कलियुगींची पहावया रीती ॥ मस्तक ऊर्ध्व करोन पाहिलें ॥ ७५ ॥ लागतां
कलियुगाचा पवन ॥ गंगा कंटाळली अंतःकरणीं जाण ॥ ह्मणे भगीरथा धन्य धन्य ॥ तूंच एक त्रैलोक्यीं ॥ ७६
तुझियेसाठीं भूतळवटा ॥ येणें घडलें सत्वनिष्ठा ॥ येरवीं कली पापपुरुषाचे अरिष्टा ॥ कळोन पदरीं केवीं बांधूं
॥ ७७ ॥ गंगा आदळतां घंटारवीं ॥ कमंडलु भंगिला स्वभावीं ॥ निर्जरोदकीं त्रिगुण भावीं ॥ तीनभागीं
चालिली ॥ ७८ ॥ गंगा झाली त्रिविधवर्णी ॥ एकओघ गेला नंदनवनीं ॥ तेथील नाम मंदाकिनी ॥
त्रिदशगणीं ठेविलें ॥ ७९ ॥ द्वितीय ओघ पाताळगर्तीं ॥ गेला झाली भोगावती ॥ तिसरा प्रवाह
भागीरथी ॥ पुराणार्थीं जगप्रसिद्ध ॥ ८० ॥ सगरकूपीं सौरमक्षेत्रीं ॥ गंगा जळें भरिली पवित्री ॥ उद्ध
रिली सर्व धरित्री ॥ ऐसा प्रताप सूर्यवंशीचा ॥ ८१ ॥ ऐसा तुझा वंशज कुमर ॥ सगरराज वंश नि
र्धार ॥ ऐसें वसिष्ठ मुनिवर ॥ जातक वर्णोन निघाला ॥ ८२ ॥ ऐसें भगीरथाचें जनन ॥
पूर्वाध्यायीं वदलों जाण ॥ हा इतिहास वसिष्ठ वचन ॥ पद्मपुराणींचें संमत ॥ ८३ ॥भागीरथीची म.

हिमा गहन ॥ स्थळोस्थळीं पूज्यमान ॥ गौतमी कृष्णावेण्या जाण ॥ द्वादश वर्षां येतसे ॥ ८४ ॥ दक्षिणेसीं काय कारण भागीरथी ॥ यावयालागीं परमार्थी ॥ जान्हवी योगें श्रमी अगस्ती ॥ ह्मणोन कन्यागती गौतमीस येत ॥ ८५ ॥ सत्समागमी अखंड भागीरथी ॥ तैसीच गुरुचरणीं अक्षयीं वस्ती ॥ त्यांहून माता पितृव्यभक्ती ॥ भागीरथी प्रत्यक्ष जाणिजे ॥ ८६ ॥ नमातुः पर दैवतं ॥ ऐसें वेदश्रुति संमत ॥ गुरुनाथ पदरज करी पुनीत ॥ होती संत मानव अनुतापीं ॥ ८७ ॥ ॥ सूतासीं ह्मणती शौनकमुनी ॥ काळभैरवासीं खड्गपाणी ॥ अगस्ति वदे जमदग्नी ॥ कथामृत हें विस्तारीं ॥ ८८ ॥ शौनक वदे सूताप्रती ॥ संत महिमा न नेणवे सुमती ॥ संतांसंगें भागीरथी ॥ प्रत्यक्ष कैसीओळखावी ॥ ८९ ॥ ऐसा करितां संवाद सुरेख ॥ तंव पातला एक महापुरख ॥ भार्ये सहित उत्तरदेख ॥ देशाहून पातला ॥ ९० ॥ त्याचें नाम धनंजय ॥ सर्व जाणता तत्वान्वय ॥ श्रमी जाहला न टाकी धैर्य ॥ भार्ये सहित हिंडला ॥ ९१ ॥ कंदमूळ फळ जीवन ॥ सेवून कंठिती काळ कठीण ॥ उभयतां घातलें लोटांगण ॥ ह्मणती धन्य दिवस आजीचा ॥ ९२ ॥ स्तुति केली विनयोत्तरीं ॥ समूळ बुडालों भवसागरीं ॥ काय दोष जन्मांतरीं ॥ केले नेणवे ऋषिवर्या ॥ ९३ ॥ ऐकोन दंपत्यांची वाणी ॥ ऋषि कळवळला अंतःकरणीं ॥ ह्मणोन उत्तम निर्दोषमनीं ॥ पूर्वाचरणीं तूं असती ॥ ९४ ॥ संचित क्रियमाण प्रारब्धयोगीं ॥ प्राप्तजाहलिया कलेवर भोगी ॥ एक चित्त उभयवर्गी ॥ असतां न बाधे त्रिविधताप ॥ ९५ ॥ तुमची प्रारब्धाची विचित्र करणी ॥ स्वस्थ परिसावें उभयतां श्रवणीं ॥ अनंतव्रत आचरीतां खड्गपाणी ॥ दर्शन देईल दंपत्यस्वरूप ॥ ९६ ॥ तयाची सांगतो मी खूण ॥ उभयतीं राखावें प्रमाण ॥ यथा मिळीतोपचारें करून ॥ अनं-

तार्चन करावें ॥ ९७ ॥ बद्रिकेदारेसीं चतुरानन ॥ बद्रिनारायण तोचि लक्ष्मी रमण ॥ एकत्र अवतरले त्रिगुण-
गुण ॥ कार्या कारण द्विजवरा ॥ ९८ ॥ रत्नागिरीचे दरकुटीं ॥ सुवर्ण पिंपळाचिये तळवटीं ॥ उतरोन वंदावा
धूर्जटी ॥ जो त्रिगुणगुणीं अवतरला ॥ ९९ ॥ तयातें देऊन आमंत्रण ॥ चौदादंपत्यें यावीं घेऊन ॥ पुजाविधि
करोन श्रवण ॥ हे बद्रिनारायण अवधारीं ॥ १०० ॥ ऐसें सांगोन त्रिवारा ॥ मग करून नमस्कारा ॥ तदनंतर
स्वयंपाक करा ॥ अमल चितें दंपत्यें ॥ १ ॥ देव येती तुमचिये बिराडीं ॥ तें खूण राखावी आवडी ॥ ब्रह्मापूजा
सांगेल आवडी ॥ भूमी शासन करिता हे खूण जाणा ॥ २ ॥ विष्णु आणि सदाशिव ॥ दंपत्य होऊन येतीलदे
व ॥ ऐसे तीन महिने विधीहरि शिव ॥ भोजना येतील तव गृहीं ॥ ३ ॥ तिघां दंपत्यांचे पाय मही ॥ न लाग-
ती हे खूण राखावी ॥ हें पाहिल्यावरी तेचि समयीं ॥ अनंत शेषशायी कृपा करील ॥ ४ ॥ हें तुमचें प्रारब्ध
लेखन ॥ लिहिलें असे चतुराननें जाण ॥ त्रिमूर्ति दंपत्य होऊन ॥ रत्नाचळीं दर्शन देतील ॥ ५ ॥ पूर्वजन्मीं
देवऋषींनीं ॥ ब्रद्रिकाश्रमीं केली ह्मणोनी ॥ सर्व दैत्य खड्गपाणी ॥ छेदून परिहार करील ॥ ६ ॥ पूर्वसुकृत तुम
चें अचळ ॥ येथोन झालें आतां सुफळ ॥ खंडिला येथोन कष्टकाळ ॥ नाथचरणकमल देखिल्या ॥ ७ ॥
ऐसें वदतां शौनकऋषी ॥ आनंद झाला धनंजयासीं ॥ भार्यें सहित लोटांगणासीं ॥ सूतादि शौनकासीं वंदीले
॥ ८ ॥ स्तवन करिती विनयोत्तरीं ॥ आह्मांतें तारीलें भवसागरीं ॥ ब्रह्मा शंकर आणि हरी ॥ भेटलेच गा वाटे
तव प्रसादें ॥ ९ ॥ नमस्कारोनि ऋषिवर्य ॥ क्षिप्रेसहित धनंजय ॥ निघाला नाचत सदय ह्रदय ॥ संतोषें
करोन कोंदला ॥ १० ॥ आतां धनंजय अनंतव्रत ॥ पूजा करील सावचित्त ॥ तोषोन दाखवील मदनांत ॥ त्रै-

 लोक्यनाथ प्रत्यक्ष ॥ ११ ॥ इतिकेदारविजय निधान ॥ सांपडलें श्रवणीं मननीं पठण ॥ संग्रह करितां शुभक-
ल्याण ॥ हरिजन पावती अक्षयीं ॥ १२ ॥ इतिकेदारविजय निगमचौघडी ॥ हरिनाम नाद श्रोत्र कपाट उ-
 घडी ॥ भवबंधन बेडी तोडी ॥ एकोणतीसावा गोडहा ॥ ११३ ॥ इतिकेदारविजय भगीरथजन्म कथनोन्ना-
म एकोनत्रिंशततमोध्यायः ॥ २९ ॥ ओंव्या ॥ ११३ ॥ श्रीनाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥ ॥ ॥



अध्याय ३० वा.
कौ·पत्नी
कौंडिण्य ऋ.
वृद्धब्राम्हण.
वृषभ. धेनु.

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयदाक्षिण दिग्बंधु अवलोकना ॥ दक्षिणाधीशा
मनमोहना ॥ दनुजदमना मधुसूदना ॥ दलशत सत्व रज तम प्रकरणी ॥ १ ॥ भद्रावतारिया प्रभाकरा ॥ भरत
खंडीं कनकाद्रिविहारा ॥ भैरवाकृति सौदागरा ॥ भक्तवत्सला दीनबंधु ॥ २ ॥ ऐसा पुराण पुरुषोत्तम स्वरूप ॥ र
त्नाद्रिमंदिरीं दक्षिणदीप ॥ निरसी संसार त्रिविधताप॥ अजपाजप कृत्य सिध्यर्थी ॥ ३ ॥ करवीराहून कलशकुम-
र ॥ रत्नागिरीं पातला सत्वर ॥ वंदोनि पुनरपी हिमकेदार ॥ गेला कपित्थनगरासीं ॥ ४ ॥ साठीसहस्र सगर-
राज ॥ सूर्यवंशींचे शिरताज ॥ तयांनीं अश्वमेधारंभ काज ॥ गेले स्वर्गासीं इंद्रभुवना ॥ ५ ॥ भगीरथ जन्मांत-
रींचें कथन ॥ भागीरथीचें आगमन ॥ कुसुमतीसीं वदला भविष्यचिन्ह ॥ वसिष्ठऋषि विस्तारीं ॥ ६ ॥ हें एकोणतीसावे
अध्यायीं निरोपण ॥ संत मुनिजनें केलें श्रवण ॥ धनंजयासीं अनंतव्रताचरण ॥ शौनकानें खूण दाखविली ॥ ७
धनंजय द्विजवरा क्षिप्राकांता ॥ उभय पातली संह्याद्रिपर्वता ॥ सुवर्णपिंपळ नदिसे शोधितां ॥ जाणोन मनीं गज
बजिलीं ॥ ८ ॥ केवढा पूर्वार्चित ठेवा ॥ सुवर्ण अश्वत्थ नहोय ठावा ॥ धांव पाव देवाधिदेवा ॥ आत्मानुभवा ऋ
षिवर्या ॥ ९ ॥ ऐसें परिसोन सूत शौनकें ॥ वसिष्ठापासीं पातले अर्धघटकें ॥ ब्रह्ममूर्ति स्वरूप त्रिगुणात्मकें ॥ रत्ना
गिरीवरी प्रगटला ॥ १० ॥ वसिष्ठऋषि सूत शौनका ॥ पाहोनियां धनंजय देखा ॥ भार्येसहित ऋषिपादुका
॥ मस्तकीं वंदिल्या उभयतीं ॥ ११ ॥ अरुंधति ह्मणे वसिष्ठासीं ॥ हें दंपत्य कवण तापसी ॥ पूर्वार्चित उत्तम
असोन यांसीं ॥ कासया श्रमासीं भोगिती ॥ १२ ॥ परिसोन अरुंधतीची वाणी ॥ वदत उत्तर वसिष्ठमुनी ॥ ध-
नंजयसंताप अंतःकरणीं ॥ अनंतार्चनीं हारपतील ॥ १३ ॥ शौनक ह्मणे तथैव स्वामी ॥ हें पहिलेंचि वदलो आ

केदार ह्मीं ॥ अनंतव्रत करितां स्वधर्मी ॥ श्रमी न होसी धनंजया ॥ १४ ॥ ऐकोन ऋषिश्वराचे बोल ॥ धनंजय ह्मणे विजय.
हें नकरवे मोल ॥ तव वचनांबुधी सखोल ॥ पाहतां येती डोल प्रेमाचे ॥ १५ ॥ अनंतव्रताचें कैसें आचरण ॥
१७८ पूर्वी केलें असे कवण ॥ हें वदावें विस्तारोन ॥ मज कारणें ऋषिवर्या ॥ १६ ॥ शौनकातें वसिष्ठ ह्मणे ॥ यासी अ.३०
कथावी अनंताचरणें ॥ शौनक ह्मणे परिसे श्रवणें ॥ भार्ये सहित धनंजया ॥ १७ ॥ पूर्वी जान्हवीदक्षिणतीरीं ॥
धर्मराज स्वधर्माचारी ॥ जरासंध वधोन भीमकरीं ॥ कृष्णयुक्तीनें बाहुबळें ॥ १८ ॥ खंडोन नृपांचीं बंधनें ॥ करो
न राजसुययज्ञ कुरुनंदनें ॥ अग्रपूजेच्या मानें ॥ देवें शुशुपाळ मारिला ॥ १९ ॥ राजसुययज्ञ सभास्थानीं ॥ दुर्योध
न पातला मानहानी ॥ यास्तव द्यूतीं राज्य हरोनी ॥ पांडव गेले प्रतिज्ञेसीं ॥ २० ॥ काम्यकवनीं असतां धर्मे
॥ राक्षस वधिले पराक्रमें ॥ हिंडतां क्मीर जटासुर अधमे ॥ वधिले भीमसेनें निजबळें ॥ २१ ॥ गंधर्वी धरोन
नेता दुर्योधना ॥ तें पांडवीं जिंकिलें अंगारपर्णा ॥ दुर्योधनाच्या दुराभिमाना ॥ खंडोनि स्वसदना धाडिला ॥ २२
ऐसे पराक्रमी पांडव बळी ॥ वनीं वसती ऋषिमंडळीं ॥ धर्म ह्मणे हे वनमाळी ॥ या काळानळीं पोळलों ॥ २३
ऐकोन धर्ममुखीचीं उत्तरें ॥ उत्तरें वदे अमृतोत्तरें ॥ अनंतव्रत केलिया संतापसारे ॥ जन्मांतरींचे हारपती ॥ २४ ॥ ध
र्म ह्मणे हे वासुदेवा ॥ अनंत कोणते स्थळीं पाहवा ॥ कीं गिरिकंदरीं शोधावा ॥ हें आत्मानुभवा आणून देईं ॥
॥ २५ ॥ अनंतव्रत कैसें करावें ॥ कीं शेष तक्षक अनंत नांवें ॥ भिन्नाभिन्न फळें देवें ॥ कीं सर्व देवचि आर्चावे
॥ २६ ॥ पूर्वी कवणासीं फळलें व्रत ॥ कवण देशीं कवणात्वदत ॥ अनंत कीं स्वमनोरथ ॥ पूर्ण होती आचरतां ॥ १७८
२७ ॥ ऐसें ऐकतां मधुकैठदमन ॥ ह्मणे ऐकेंगा सावधान ॥ पूर्वी सत्ययुगामाजीं जाण ॥ धर्म परायण वेद पु-

रुष ॥ २८ ॥ ऐकोन युधिष्ठिराचें वचन ॥ कृष्ण सांगे अनंतार्चन ॥ सूत शौनकांतें करि कथन ॥ धनंजयातें र-
त्नागिरीवरी ॥ २९ ॥ पूर्वी कृतयुगातें जाण ॥ सुमंत ब्राह्मण नामाभिदान ॥ चतुर्वेदीं अध्यायन ॥ ब्राह्मण अरण
जटाक्रमादी ॥ ३० ॥ सुमंताची भार्या दुःसीलादुर्गुणी ॥ कर्कशा चंडी कलह करणी ॥ दुर्मुखी दुरोक्ति संभाष-
णी ॥ वक्र भ्रूकुटी कुटिल व्हदयी ॥ ३१ ॥ भ्रतार शयनीं जैसी डांकिनी ॥ भोजनीं भासे कडुवट पर्णी ॥ कार्य खं-
डाव्रया जैसी सौदामिनी ॥ भाषणीं कर्कशा जाणा ॥ ३२ ॥ तियेचि कन्या नामें सुशीला ॥ गृह मज्जनीकृत सु
शीला ॥ तुळसी वृंदावन रेखी सुशीला ॥ स्वस्तिकांसह पद्मांनीं ॥ ३३ ॥ रंगमाळा वृंदावनीं ॥ घाली सप्तरंगां
गणीं ॥ लावण्य सरिता मंदाकिनी ॥ नंदनवनीं जैं प्रवाहे ॥ ३४ ॥ ऐसी सुशीला उत्तमगुणी ॥ द्वितीये पासोनि
निशाकरमणी ॥ वृद्धि पावे षोडश किरणीं ॥ तैसी यौवनीं प्राप्तजाहली ॥ ३५ ॥ कन्या देखोन सुलक्षण ॥ सुमंत
पावला समाधान ॥ भ्रतार कामनेचा सुधाकरकिरण ॥ संकल्पांबरीं लक्षिला ॥ ३६ ॥ चढला तारुण्यनदीचा
पूर ॥ रिघत रतिसंगमसागर ॥ अपेक्षित हें जाणोन निजांतर ॥ बरवा विचार आरंभिला ॥ ३७ ॥
ऐसा सुमंत विचार विवरीं ॥ वर्तत असतां दिवाशार्वरी ॥ तंव कौंडिण्यऋषि ते अवसरीं ॥ गृहांगणद्वा-
रीं पातला ॥ ३८ ॥ अर्घ्य पाद्य पूजादि सुखभोजन ॥ करोन विचारिलें आगमन ॥ सुमंत जाणोन
भविष्यचिन्ह ॥ सुमुहूर्त पाहोन एके दिवशीं ॥ ३९ ॥ कौंडिण्यासीं विधिविधान ॥ सुमुहूर्तें लाविलें
लग्न ॥ अर्थी दिधलें कन्यादान ॥ शतक्रतु समान मानूनी ॥ ४० ॥ कौंडिण्य मानसलीला ॥
एकत्वासी पातली सुशीला ॥ जेवीं प्रख्यात लोकलीला ॥ गुणवंत देखोन जांवई ॥ ४१ ॥ जामात

कन्या आनंदभरित ॥ देखोन संतोषला सुमंत ॥ ह्मणे हाचि लक्ष्मीकांत ॥ गुणवंत देखोन जांवई ॥ ४२ ॥ असो ऐसे दिवस कांहीं ॥ कौंडिण्य राहिला श्वशुरग्रहीं ॥ आज्ञा मागोन निघाला पाहीं ॥ भार्येसहित कौंडिण्य ॥ ४३ ॥ सुमंत ह्मणे दुशीलेतें ॥ जामात कन्या प्रभातें ॥ जातील तीं स्वग्रहातें ॥ तरी सामोग्री सांगातें देईजे ॥ ४४ ॥ ऐसें परिसोन सुमंत वचन ॥ सापत्नभाव मनीं धरून ॥ चिंध्याचिरगुट्यांचें दिंड बांधोन ॥ शांकिनी तंडुळ दिधले ॥ ४५ ॥ हें देवोन कन्येपासीं ॥ निजली लाऊन कपाटासीं ॥ तें सूर्य पातला उदयाचळासीं ॥ सुशीलेसीं कौंडिण्य निघाला ॥ ४६ ॥ सुशीलेसीं कौंडिण्य सुमती ॥ बैसोनिया वृषभरथीं ॥ निघाला हर्षें स्वग्रहाप्रती ॥ तें माध्यान्हीं गभस्ती पातला ॥ ४७ ॥ उष्ण लागतां शरीरीं ॥ कौंडिण्य उतरला गंगातीरीं ॥ स्नान संध्यादि षट्कर्में सारी ॥ छाया तरुतळीं बैसोनी ॥ ४८ ॥ गंगा जीवनीं सुशीला स्नान ॥ करितां स्त्री कदंबास देखून ॥ हें सुशीलेनें पाहून ॥ देवांगनेसीं विचारी ॥ ४९ ॥ कासयाचा समारंभ केला ॥ कां स्त्रिकदंब झाला गोळा ॥ ऐसें ऐकोन सुशीलेला ॥ अप्सरा बोलती आदरें ॥ ५० ॥ हे सुशीले सगुणसरिते ॥ हे मदनंतव्रत नवविध भरिते ॥ हरिगुण कथामृत चरित्रें ॥ स्विकार असे जाणिजें ॥ ५१ ॥ शुक्लपक्ष चतुर्दशी ॥ व्रत करावें भाद्रपदमासीं ॥ पूजावें षोडशोपचारेंसीं ॥ पंक्तीसीं घेऊन दंपत्य आदरें ॥ ५२ ॥ आणोनि चतुर्दश ग्रंथी दोरक ॥ सुशीलेसीं दिधलादेख ॥ चतुर्दशवर्षें अर्चितां कौतुक ॥ श्रीलक्ष्मीकांत तयाघरीं ॥ ५३ ॥ चतुर्दश ग्रंथींचीं चतुर्दशरत्नें ॥ सुशीलेनें करबंधन करोन ॥ पातली जेथें पतिकौंडिण्य ॥ छाया तरुतळीं बैसला ॥ ॥ ५४ ॥ गोरथत्वरें संजोगोन ॥ त्यावरी बैसलीं दोघेजण ॥ कांते सहित कौंडिण्य ॥ ग्रामापासीं पातला ॥ ५५

॥ हें जाणोन नगरवासी ॥ आडवे पातले सन्मानेंसीं ॥ नगरगर्भीं संभ्रमेसीं ॥ मिरवत मंदिरासीं आणिले॥५६॥ ॥ अष्टैश्वर्यं अष्टमासिद्धी ॥ संपदा भरली नवमानिधी ॥ धनधान्यांची समृद्धी ॥ मदनंतसिद्धी अपार ॥ ५७ ॥ गो वृषभ ह्मैसी खिल्लारें ॥ धनधान्यांचीं भांडारें ॥ भरलीं नवरत्नखणी मंदिरें ॥ कनकांबरें बहुरंगी ॥ ५८ ॥ ऐसे लोटले कांहीं दिवस ॥ स्वधर्माचरणीं मनोल्हास ॥ वर्तत असे ऋषिविलास ॥ सारासार जाणुनियां ॥ ५९ ॥ तें विषमकाळाचा दैवयोग ॥ बलात्कारें जाहला संयोग ॥ विषयगंधीं जैसा सुगंध ॥ डोलवी अंग प्रत्यंगासीं ॥ ॥ ६० ॥ असो ऐसा मुनिविकारी ॥ निद्रिस्थ सुवर्णमंचकावरी ॥ जाहला सुशीले सेजारीं ॥ कीं शैल्यापरी निजेला ॥ ६१ ॥ निद्रा सुवर्ण जाहल्या नंतर ॥ जागा जाहला ऋषेश्वर ॥ निद्राभरें सुशीले स्त्री सेजार ॥ ऋषि अंगावर पडियेला ॥ ६२ ॥ कामांकुश कमल कनकवर्णीं ॥ ऋषीनें डवचिलें कठोरपणीं ॥ गडबडोन उठितां हस्तीणी ॥ सुशीला कर मंडित दोरक ॥ ६३ ॥ अनंत दोरक स्फुलिंगवर्णी ॥ सुरंग मंडित करकंकणीं ॥ तें लक्षोन ऋषि कौंडिण्यी ॥ सुशीलेसीं वदतसे ॥ ६७ ॥ दोरकग्रंथी सुरंगाकारी ॥ कासयाचा तुझिये करीं ॥ स्त्रीचे चरित्राची नवलपरी ॥ विचित्र संसारी ऐकिजे ॥ ६५॥ अनेक स्त्रियांच्या जाती ॥ जार चोराची संगती ॥ वश करण्याची ऐसी रीती ॥ लक्षितां ऐसेंचि भासतसे ॥६६॥ कुटिळ भाव त्वां धरियेला ॥ वश करावयालागीं मजला ॥ हा निश्चयार्थ उमजला ॥ तव भाव समजला कुटिळत्वें ॥६७॥ कौंडिण्य ऋषीची ऐकोन वाणी ॥ सुशीला कंपित जाहली मनीं॥ ह्मणे स्वामी अंतःकरणीं ॥ सहसा नाहीं द्वयभाव ॥६८॥ माहेराहून येतां मार्गीं ॥ मदनंत लाधला सन्मार्गीं ॥ नाहीं वर्तलें असन्मार्गीं॥ अनंतव्रत आप्तवर्गीं दिधलें ॥६९॥ ऐसें ऋषीनें परिसोनियां ॥ ह्मणे अनंत सह

सा माया ॥ मूर्खत्व ऐसेंचि निर्दया ॥ स्त्रीणां दोषा स्वभाव रीती ॥ ७० ॥ कैंचा दोरक मदनंत जाण ॥ कैंचा अनंत कुटिळपण ॥ मज सर्वस्वें वशीकरण ॥ ह्मणोनि दोरक बांधिला ॥ ७१ ॥ ऐसें वदोन ऋषीश्वरीं ॥ सुशीलेचा हस्त धरोन करीं ॥ दोरक तोडोन वैश्वानरीं ॥ टाकिला तें सुशीला दुःखी ॥ ७२ ॥ हा हा करोनि घेतला हातीं ॥ अनंत संसार्णव तारणार्थी ॥ अवतरलासी या त्रिजगतीं ॥ कां उपेक्षिलेसी मजलागीं ॥७३॥ ऐसें वदोन सुशीला ॥ क्षुवोनि अमलेश लीला ॥ दधि घृतदुग्धें भिजविला ॥ बांधोन ठेविला अंतरगृहीं ॥ ७४ ॥ ऐसी लोटली दुष्कृतरजनी ॥ उदया पातला वासरमणी ॥ संपदा गेली हरपोनी ॥ कौंडिण्याची सर्वही ॥ ७५ ॥ दैवीक्षोभ होतां जाण ॥ पूज्यस्थानीं पावे अपमान ॥ आप्तवर्गीं वैर धारण ॥ हाचि ह्मणावा ईश्वरीक्षोभ ॥ ॥ ७६ ॥ पूर्वार्चित धनाची जोडी ॥ दुष्कृत तस्कर हरोनि विघडी ॥ प्राप्त अप्राप्तीची परवडी ॥ होतां ईश्वर क्षोभला ॥ ७७ ॥ देवार्चनासीं कंटाळे ॥ सत्संगतीचा मानी विटाळ ॥ संतनिंदाकरीं सर्वकाळ ॥ ही कळा प्राप्त ईश्वरी क्षोभें ॥ ७८ ॥ तारुण्यकाळीं निमाली जाया ॥ वृद्धालयीं पुत्र होय निर्दया ॥ अंती बुद्धिभ्रंश व्हावया ॥ तोचि ह्मणावा ईश्वरी क्षोभ ॥ ७९ ॥ असो ऐसा अनंत क्षोभ ॥ ऋषिबुद्धि संपदा क्षयारंभ ॥ जाहल्या उगवला व्रतलोपकोंब ॥ ऋषिमन कंदरीं वाढला ॥ ८० ॥ दैवहत जाहला ऋषेश्वर ॥ आचरतां दायाद वैराकार ॥ धिःकारिती नारीनर ॥ हा हा ह्मणती कठिणोत्तरीं ॥ ८१ ॥ विश्वोत्तरींचे शर खडतर ॥ भेदिलें ऋषीचें निजांतर ॥ जनापवाद शरांगार ॥ सबाह्य पोळलों रोमांचित ॥ ८२ ॥ कौंडिण्य ह्मणे सुशीलेसीं ॥ विश्राम न पावे कचितलेशीं ॥ अष्टौ प्रहर असो क्लेशीं ॥ हें काय कारण सांगपां ॥ ८३ ॥ ऐसें वदतां मुनिवर ॥

सुशीला वदे विनयोत्तर ॥ अनंत क्षोभला तुह्मांवर ॥ ह्मणोन कोशभांडारें हारपलीं ॥ ८४ ॥ अनंत दैवीसंपत्ती ॥ तुह्मांसी प्राप्त जाहली होती ॥ तैं विषम काळाचिये गती ॥ सुमतीते कुमती जाहली ॥ ८५ ॥ जेव्हां अनंत करील दया ॥ तेव्हांचि होईल भाग्योदया ॥ हरिकीर्ति मानितां प्रयागगया ॥ सद्यत्नदया मदनंत भेटे ॥ ॥ ८६ ॥ परिसोन सुशीलेची वाणी ॥ कौंडिण्य निघाला तेचक्षणीं ॥ प्रवेशला घोरकाननीं ॥ निर्भयमनीं भूसुरेंद्र ॥ ८७ ॥ निसेदकी निराहारी ॥ मम पाहीं मदनंता या कातारीं ॥ स्थावर जंगमासीं विचारी ॥ अनंत पाहिला यामार्गीं ॥ ८८ ॥ वटपिंपळ औदुंबर ॥ यांतें घालोन नमस्कार ॥ तुह्मीं देखिला तरी निर्धार ॥ अनंतदेव ह्मणती जया ॥ ८९ ॥ पारिजातक कदंब मलयागर ॥ राम कृष्ण तुळसी श्वेत मांदार ॥ यांतें प्रदक्षिणा करोन सहस्र ॥ ह्मणे अनंत तुह्मीं पाहिला ॥ ९० ॥ सर्वांभूतीं भगवंत ॥ हे तंव तत्वार्थ बोधार्थ ॥ भगवद्गीतेचा मथितार्थ ॥ सुरतरूसीं अनंत विचारी ॥ ९१ ॥ ऐसा विचारित वन गंव्हरीं ॥ कौंडिण्य प्रवेशला गिरिकंदरीं ॥ अच्युत वृक्षासीं सामोपचारीं ॥ ऋषि तेव्हां पुसतसे ॥ ९२ ॥ देखिलें तुवां अनंत स्वरूपा ॥ सत्य वदावें अच्युत पादपा ॥ आम्रवृक्ष ह्मणे तुझिया कृपेबापा ॥ अनंत दृष्टि प्राप्त होवो ऋषिवर्या ॥ ९३ ॥ तुझिये योगें अनंत दर्शना ॥ होईल ऐसें भासते मना ॥ अनंत भेटल्या तुजकारणें जाणा ॥ आमुचें सुकृताचरण विचारीं ॥ ९४ ॥ पत्रीं पुष्पीं अखंडसुफलीं ॥ प्रफुल्लित असें सर्वकाळीं ॥ स्पर्श न करिती कोणी करतळीं ॥ कवण कर्में हें विचारावें ॥ ९५ ॥ काय मीं केला असे दोष ॥ कां नकरिती हस्तस्पर्श ॥ केव्हां करिसीं निर्दोष ॥ कीं ऐसेंचि असावें अधर्मीं ॥ ९६ ॥ वृक्षवंशज परोपकारी ॥ असोनि झालों अनोपकारी ॥ केधवां अनंत करिल परोपकारी ॥ हें विचारीं ऋषिवर्या ॥ ९७ ॥ ऐ-

सें वदतां अच्युत तरू ॥ व्हदयीं द्रवला करुणाकरू ॥ अवश्य ह्मणोन ऋषेश्वरू ॥ निघताझाला पुढारीं ॥ ९८॥
निर्जलवनीं भेटली गाय ॥ उभी उभी ह्मणोन बोंभाय ॥ नमस्कारोन चत्वारीपाय ॥ अनंत माये देखिलासीं ९९
एकपदा द्विपदा त्रिपदादेवी ॥ चतुष्पदादि पंचपदी सदैवी ॥ अजपाजपा तत्वानुभवी ॥ चित्सुखसागरीं नंदिनि-
ये ॥ १०० ॥ ऐसें वदतां कौंडिण्यऋषी ॥ धेनु वदे ऋषेश्वरासीं ॥ आमुची दशा कां ऐसी ॥ हें अनंतासीं विचा
रावें ॥ १०१ ॥ तृण असोन नये वदनीं ॥ आपुलें पय आपणचि प्राशोनी ॥ हिंडतसों दुर्धर अरण्यीं ॥ कवणा-
गुणें विचारीं देवा ॥२॥ कवण कर्में दुर्धर अरण्यीं ॥ असे परी लक्ष्मीची धाकुटी भगिनी ॥ सांग ऋषेश्वरा तया
लागुनी ॥ हे तव करणी नसावी ॥ ३ ॥ तुझें नाम आधींच शोभिवंत ॥ त्यांत पातला मधुमास वसंत ॥ संवाद त
त्वीं सतत येसंत ॥ भ्रमराकार गुंजती ॥ ४ ॥ ऐसे धेनूनें स्वसंताप ॥ कौंडिण्यासीं कथिले समस्त ॥ अनंता वि
चारीं कवणें कर्म लोप ॥ हे साक्षेपें घडियेले ॥५॥ कौंडिण्य ह्मणे परिसोन बरवें ॥ अनंत भेटल्या पूर्व दैवें ॥ वि
चारीन तव आर्जवें ॥ जन्मांतर हें निश्चयेसी ॥ ६ ॥ कथोनि ऐसें पुढारें गमन ॥ शोधित चालिला ब्रह्मारण्य ॥
तंव उभय सरोवर मिश्रित जीवन ॥ परस्पर मिसळती आवडी ॥ ७ ॥ हंस कारंडक चक्रवाके ॥ कमळें विकास
ती चंद्रार्कें ॥ जळ मिश्रित उभय वापिके ॥ लक्षोन जवळी पातला ॥ ८ ॥ ह्मणे देखिला काय मदनंत ॥ तरी
मज दाखवावा यथार्थ ॥ ऐसें वदतां योगेश्वर सुत ॥ उभय पुष्कर्णी बोलती ॥९॥ देखिले नसे अनंतद्वय ॥ आमुचा
पूर्वार्चनाचा ठेवा ॥ विचारीं भेटल्या देवाधिदेवा ॥ कवण कर्मोद्भविल्या वनीं ॥ १० ॥ अवश्य ह्मणोन चालिला
पुढारें ॥ मार्गीं नंदीचा सहोदर ॥ भेटतां तयासीं सुविचार ॥ कौंडिण्यऋषि वदतसे ॥ ११ ॥ जरी देखिलें असे-

ल अनंतासीं ॥ सत्य सांगावे तरी आह्मांसी ॥ वृषभ ह्मणे कौंडिण्यासीं ॥ नाहीं अनंत देखिला ॥ १२ ॥ तुह्मांतें भेटेल जरि अनंत ॥ अमुचें विचारीं पूर्वार्चित ॥ कवण कर्मी असों लिप्त ॥ हे ऋषि समर्था विचारावें ॥ १३ ॥ अवश्य ह्मणोन कौंडिणी ॥ पुढें चालिला दुर्धरारण्यीं ॥ मनुष्य स्वप्नीं ही नदिसे कोणी ॥ भयानक वनीं प्रवेशला ॥ १४ ॥ पुढें भेटले खर कुंजर ॥ तेथोन पुढें चालिला सत्वर ॥ स्थावर जंगमादि तृणतरुवर ॥ यांते ऋषिवर वदतसे ॥ १५ ॥ जेवीं दाशरथी श्रीराम ॥ वनीं हिंडे मनोभिराम ॥ ध्वनि उठती विराम ॥ द्रुम पाषाण कवळितां ॥१६॥ हे सीते ह्मणोन ध्वनी ॥ उठली एकसरें निरंजनीं ॥ तैसा द्विज विचरे विजनीं ॥ हा हा अनंत ह्मणोनियां ॥ १७ ॥ अनंत अनंत ऐसी वाणी ॥ हिंडतां शिणला अंतःकरणीं ॥ विकळ होवोन पडिला धरणीं ॥ स्वासनिवेदनीं झाला एकला ॥ १८ ॥ हें पाहोन अनाथनाथें ॥ वृद्ध स्वरूपीं पातला तेथें ॥ स्वयें उठविला रमाकांतें ॥ कृपावलोकनें हस्तस्पर्शें ॥ १९ ॥ उठोन बैसतां वृद्धार्कबिंब ॥ देखिला ब्रह्मारण्यींचा कोंब ॥ हे ज्योतिर्मय स्वरूपीं स्वयंभ ॥ अनंत कोठें देखिला ॥ २० ॥ दर्शनीं पावलों समाधान ॥ दुष्काळीं मिळालें मिष्टान्न ॥ किं दरिद्रिया सापडे धन ॥ अप्रयासीं निजगृहीं ॥ २१ ॥ कीं गुरुनाथ कृपेचें ज्ञानांजन ॥ घालितां नेत्रीं शुद्धाचरण ॥ सांपडलें नवनिधान ॥ अकल्पित निजांगणीं ॥ २२ ॥ कीं अकल्पित पातला कल्पतरू ॥ कीं अवचित झाला भवनदी पारू ॥ ऐसा अनंत जगदांकुरू ॥ कौंडिण्य मुनिवरासीं भेटला ॥ २३ ॥ खंडला एथोन कष्टकाळ ॥ सुमति राखावी गा निश्चळ ॥ लक्ष्मी पावसील अचळ ॥ सद्भावबळें करोनियां ॥ २४ ॥ तें निरोपण रसाळ गहन ॥ एकतीसावे अध्यायींचें विचित्र कथन ॥ धनंजय करितां अनंतार्चन ॥ त्रिमूर्ति पृथक् प्रकृत्ति आका

रिल्या ॥ २५ ॥ तें परिसा सावचित ॥ संत महंत सगुणीं आलंकृत ॥ चित्त करोनि सोमकांत ॥ हरिनाम चकोरातें सेवावें ॥ २६ ॥ इतिश्री केदारविज [illegible] गहन ॥ ओ[illegible]ला हरिनाम संकीर्तन ॥ मयूर होऊन नाचे हरिजन ॥ आवडी तिसावाध्याय गोडहा ॥ १२७ ॥ इतिश्री केदारविजय ॥ भविष्योत्तर केदारखंड विरचितायां ॥ अनंत व्रतविधि धनंजय सूत शौनक संवादे ॥ त्रिंशतितमोध्याय गोडहा ॥ ३० ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ श्रीराम जयराम ॥ ओंव्या ॥ १२७ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥


अध्याय ३१वा
श्रीविष्णु
अंबरीष
दुर्वासऋषि
भोजनसमारंभ
अंबरीष

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जयजय ज्योतिस्वरूप रूपा ॥ जय कल्याणकारका अकल्पा ॥ ज
य विजनीं हरिजनसंकल्पा ॥ जय पूर्ण कराविता श्रीगुरुनाथा ॥ १ ॥ दक्षिणपदांकित ह्रदय भृगुलांछना ॥ दक्षिणा
धीशा पुरुषोत्तम पुराणा ॥ दक्षमखांतक हयवाहाना पद्मपुराणा ॥ दर्शवी संज्ञार्थ व्यास वदला ॥ २ ॥ ऐसा दी-
नानाथ तूं दीनतारक ॥ हरिनामीं निर्मित सहस्त्र दीपक ॥ पस्तीस खणांवरीं उपरीं चंद्रार्क ॥ प्रकाशक ज्यो-
तिस्वरूपा ॥ ३ ॥ वसिष्ठादिक सूत शौनकमुनी ॥ धनंजयासीं विस्तारोनी ॥ वदले अनंतव्रत कृताचरणी ॥ कौं
डिण्यासीं वृद्धार्कदेवें ॥ ४ ॥ अनंत वियोगें कौंडिण्यऋषी ॥ भ्रमोन पडला तो महीसीं ॥ हें जाणोन कनकाद्रि-
वासी ॥ वृद्धार्कद्विज होवोन ऋषीतें भेटला ॥ ५ ॥ हे त्रिंशतितमोध्यायीं ॥ कथा परिसिली केदारविजयीं ॥ ऋ
षीतें भेटला कृपेनें शेषशायी ॥ ब्राह्मणरूपें वनांतरीं ॥ ६ ॥ वृद्धार्के ब्राह्मण ह्मणे ऋषेश्वरा ॥ कां प्रवेशलासी
घोरकांतारा ॥ कैंचा अनंत चतुर्दशग्रंथीं दोरा ॥ कुटिळ कारक नारीकरींचा ॥ ७ ॥ कौंडिण्य नाम ऐकिलें होतें
कर्णीं ॥ तो म्यां देखिला आजिनयनें ॥ सुशील कुटिळ अंतःकरणें ॥ तूं तें वशीकरण केलेंचि होतें ॥ ८ ॥ तुझि-
या प्रारब्धाची सीमा ॥ धन्य ह्मणोनि पावलासीं भ्रमा ॥ त्यागोन सर्व सुख गृहस्थाश्रमा ॥ पूर्वार्चितें पावलासीं
याठायीं ॥ ९ ॥ तुह्मीं ऋषेश्वर अपरोक्षज्ञानी ॥ काय कारण फिरतां वनीं ॥ तुमच्या तपाच्या तीव्र आचरणीं ॥
अष्टमासिद्धिनव गृहीं होत्या ॥ १० ॥ त्यांसीं टाकोन फिरतां विजनीं ॥ ऐसें वदतां वृद्धार्कब्राह्मणीं ॥ हें परिसो
न सद्गदमनीं ॥ कौंडिण्यऋषेश्वर वदतसे ॥ ११ ॥ ह्मणे देवा भूसुरवरा ॥ कल्पनाकार मानस विवरा ॥ जगनगेहे
मीं अलंकारा ॥ यद्भावनाकार विरचिता ॥ १२ ॥ भयकृत भयार्णव मंथना ॥ भक्ताभिमानिया कमळारमणा ॥

भक्त भावार्थी अवतारिया स्वधर्म संस्थापना ॥ विभक्त उत्थापना करुणानिधी ॥ १३ ॥ ऐसा भावार्थ विनयोत्तरें ॥ वर्णोनियां अमलांतरें ॥ दीर्घदंड नमस्कारें ॥ ऋषेश्वरें वंदिला आवडी ॥ १४ ॥ वृद्धब्राह्मण ह्मणे ऋषीतें ॥ श्रमीं झालासीगा अपरमीत ॥ कौंडिण्यातें धरोन हस्तें ॥ ह्मणे अनंत तुज दाखवितों ॥ १५ ॥ ऋषिसहित गिरिकंदरीं ॥ प्रवेशले दोघे पर्वतविवरीं ॥ निद्रिस्थ झाला शेष मंचकावरी ॥ दहा सहस्र योजनें श्रीअनंत ॥ १६ ॥ अनंतनामीं जो अनंत शयन ॥ करितां अनंत चंद्रार्ककिरण ॥ प्रकाश कोंदला ब्रह्मांड भूवन ॥ हें देखोन ऋषि नयना झांपडपडली ॥ १७ ॥ तें ज्ञानदृष्टि देवोनि ऋषीतें ॥ मस्तकीं ठेविला वरदहस्त ॥ ह्मणे सावध होऊन सहाजणाचे सुचितें ॥ अनंत स्वरूपीं सुख भोगीं ॥ १८ ॥ हे ऐकोन वरदवाणी ॥ अनंतरूप कोंदलें हृदय भुवनीं ॥ निमग्न झाला समाधिशयनीं ॥ अनंत स्वरूपीं कौंडिण्य आनंदला ॥ १९ ॥ ह्मणे स्वामी दीनबंधु ॥ भक्ताभिमानिया करुणासिंधु ॥ विभक्तनिशा नासोनि पूर्णेंदु ॥ सद्भक्त चकोर वृंद तोषवीं ॥ २० ॥ तुज कारणें शोधितां विपिन ॥ मार्गीं भेटले साहीजण ॥ धेनु वृषभकुंजर जाण ॥ आम्रवृक्षादि वापिका दोनी ॥ २१ ॥ यांचि कैशी जन्मावळी ॥ कळविलें दुष्कर्माचिये मेळीं ॥ तें सांगावें वनमाळी ॥ त्यांचा कर्मलोप सुफळ करावा ॥ ॥ २२ ॥ परिसोन कौंडिण्याच्या सारांश वचना ॥ तुवां मार्गीं केल्या ज्याज्या विचारणा ॥ तयांच्या ऐकेंगा सुकृताचरणा ॥ गोवृषभ वापिकेचे अवतारी ॥ २३ ॥ प्रथम भेटला जो आम्रतरू ॥ तयाचा ऐक केवढा अविचारू ॥ चौदाविद्या चौसष्ठीचा प्रकारू ॥ तो बुद्धिसमुद्रीं असे आठवा ॥ २४ ॥ चतुर्वेदाध्यायन सर्वकाळ ॥ रस चत्वारी ज्याला करतळामळ ॥ परी विद्यार्थी यांसी न वदेचि अळुमाळ ॥ कुटिळ भावें करोनियां ॥ २५ ॥

कोणतें ही विद्याधन ॥ केलें नाहींच ब्रह्मार्पण ॥ बंधूसीं उपदेश केला पूर्ण ॥ ह्मणोनि पिंगळा झाला तो आम्र-
वृक्षीं ॥ २६ ॥ एक झाला आम्रवृक्ष ॥ हें त्वां देखिलें प्रत्यक्ष ॥ धेनु भेटली आपुलें पय भक्ष ॥ तिचा स्वपरोक्ष
भाव ऐकें ॥ २७ ॥ मिष्टान्न आणि कदान्न ॥ स्वयंपाक निर्मी भिन्नभिन्न ॥ उत्तम पदार्थ ठेवी झांकोन ॥ भक्षाव-
या आपणा ॥ २८ ॥ ऐसी सर्व विषयीं स्वपर भावना ॥ तयेनें धरिली अंतःकरणा ॥ जन्मवरी वंचका चरणा ॥
करितां पय प्राशन आपुलें करी ॥ २९ ॥ ज्या तुज भेटल्या वापिका दोन्ही ॥ त्यापूर्व जन्मींच्या एकोदर बहि-
णी ॥ स्नान करोन तीर्थ पर्वणीं ॥ परस्परें वायन दानें आपणचि घेती ॥ ३० ॥ अपरोक्ष न केलें धर्मदान ॥ ह्म
णोनि वापिका झाल्या जाण ॥ सदा करितां स्वार्थीदान ॥ ह्मणोन जळपान न करिती जीवजंतु ॥ ३१ ॥ वृषभ
हिंडत रानोरान ॥ कदापि नये वदनासीं त्याच्या तृण ॥ तो पूर्वजन्मींचा राजा दुराभिमान ॥ ब्राह्मणासीं दान दे
त अकारण वस्तूचें ॥ ३२ ॥ निर्जलवापिकेची कंटक वाटिका ॥ ब्राह्मणासीं वांटी अर्थ स्फटिका ॥ दर्पणाच्या ध-
नासीं सोडित उदका ॥ ब्राह्मणासीं घेई दान ह्मणतसे ॥ ३३ ॥ भूमी दान दिधलें ब्राह्मणासीं ॥ न होय तेथें क
चित् पिकासीं ॥ तृणा वांचोन तेथें पेरितां सायासीं ॥ आष्टादशांतील धान्य बीज न अंकुरे ॥ ३४ ॥ ह्मणोनियां
तयावनांतरीं ॥ राजा झाला वृषभाकारी ॥ जो खर देखिलासीं पुढारीं ॥ तो तव सक्रोध जाणपां ॥ ३५ ॥ तया-
वरी भेटला जो कुंजर ॥ तोचि तुझा गा मदमत्सर ॥ विभक्त भजनांचें सुटलें वारें ॥ ह्मणोन भ्रमलासीं विकल्प
विजनीं ॥ ३६ ॥ पश्चात्तापाची जे दीपिका ॥ तुवां हातीं धरितां देखा ॥ मी पातलों अति कौतुका ॥ या अनंत
रूपासीं दाखवावया ॥ ३७ ॥ काम क्रोध मद मत्सरा ॥ भजनमार्गीं लावीं स्वस्थांतरा ॥ विकल्प बुद्धीचा मोडो-

न थारा ॥ श्रीमदनंत दोरक पूजावा ॥ ३८ ॥ आतां तुझें कष्टकाळ ॥ खंडील मदनंत कृपाळ ॥ जे तुज मार्गी भेटले सकळ ॥ त्यांसी हेंचि सांगोन उद्धार करावा ॥ ३९ ॥ शुक्लपक्ष चतुर्दशीला ॥ भाद्रपदमासीं सह सुशीला ॥ श्रीमदनंत नवशीला ॥ तो पूजावा यथाविधीसीं ॥ ४० ॥ आदिमध्य अवसानीं ॥ अनंत उद्यापन करावें ज्ञानीं ॥ चौदा दंपत्यें तोषवोन भोजनीं ॥ चौदा वायनें अपूपाचीं अर्पावीं ॥ ४१ ॥ क्षीर अपूप पक्वान्न ॥ हें चतुर्दश वायनदान ॥ मदनंत प्रीत्यर्थ करावें आर्पण ॥ चतुर्दशवर्षें पर्यंत ॥ ४२ ॥ मुख्य न घ्यावें परान्न ॥ श्राद्धादिक गर्भादान ॥ रजश्वलोत्सव चौलोपनयन ॥ हें अन्न ग्रहण न करावें ॥ ४३ ॥ ऐसें मदनंत अनुष्ठान ॥ आचरितां पाविजे जय कल्याण ॥ चौदावर्षें अनंतार्चन ॥ करितां संताप सर्व हरपती ॥ ४४ ॥ अंतीं पावे मोक्षपदवी ॥ पुनर्जन्माचा लेश पुरवी ॥ हें व्रत केलें असे पूर्वीं ॥ कुबेर आदिं भुसुरवरीं ॥ ४५ ॥ ऐसें सांगोन निश्चयाला ॥ वृद्ध ब्राह्मण गुप्तजाहला ॥ कौंडिण्य अंतरीं चमत्कारिला ॥ अनंत लीलावतारी हा निश्चयार्थ ॥ ४६ ॥ ऐसे पाहोन साक्षात्कार ॥ आश्रमा पातला ऋषेश्वर ॥ आम्रवृक्ष गो वृषभ कुंजर ॥ वापिकादिकां पूर्व सुकृतार्चनें निवेदिलें ४७ ॥ पश्चात्ताप पावतां तयांला ॥ सहज स्थितीनें उद्धार झाला ॥ तैं कौंडिण्यऋषि आश्रमा आला ॥ महानंदें करोनियां ॥ ४८ ॥ व्रत करोन चौदावर्षें सुरस ॥ अखंड पावला स्वर्गवास ॥ पुनर्वसुनक्षत्र होऊन स्वर्गीवास ॥ हें अद्यापि लक्षिती युगायुगीं ॥ ४९ ॥ सप्तविंशति नक्षत्रांत ॥ पुनर्वसु नक्षत्र असे प्रख्यात ॥ पुनर्जन्म नहोय कौंडिण्यऋषीप्रत ॥ ह्मणोनि पुनर्वसु नक्षत्र झाला ऋषी ॥ ५० ॥ ऐसी अनंत अर्चन कथा ॥ श्रीकृष्ण सांगे पंडुसुता ॥ ऐसेंचि धर्मराज करितां व्रता ॥ चतुर्दशवर्षें विधिपूर्वक ॥ ५१ ॥ अनंतव्रताचिये स्वधर्में ॥ बंधुवध करो-

नियां धर्में ॥ हस्तनापुरींचें सार्वभौम पदनेंसें ॥ पावला ही स्याति असे ॥ ५२ तयाचे पूर्वीं कौंडिण्यऋषी ॥ अनंतार्चनीं झाला स्वर्गवासी ॥ पुनर्वसु नक्षत्र होऊन आकाशीं ॥ राहिला अद्यापि पंडितहो ॥ ५३ ॥ सूत ह्मणे धनंजयासीं ॥ तूं ही ऐसेंचि पावसी जयासी ॥ आमंत्रण देवोन मूर्तित्रयांसीं ॥ मग स्वयंपाक कार्यासी करावें ॥ ५४ ऐकोन शौनकाच्या उत्तरा ॥ आमंत्रण दिधलें त्रिगुणावतारा ॥ हें जाणोनि भविष्योत्तरा ॥ सौदागर त्रिगुण झाले तें ऐका ॥ ५५ ॥ भक्त प्रियकर त्रिगुणावतारी ॥ एकरूप जाहला बद्रिविहारी ॥ दैत्य मारोन रत्नागिरीवरी ॥ साम्राज्य करितसे ॥ ५६ ॥ सत्य करावया वसिष्ठवचन ॥ यालागीं त्रिविध जाहला बद्रिनारायण ॥ हरिहर आणि चतुरानन ॥ वेगळाले झाले धनंजयास्तव ॥ ५७ ॥ सावित्री सहित चतुरानन ॥ लक्ष्मी सहित लक्ष्मी रमण ॥ पार्वती सहित त्रिलोचन ॥ दंपत्य होवोन पातले ॥ ५८ ॥ त्रिमूर्ति होवोनि प्रथक्‌कार ॥ पातले ऋषीवरांचे सामोर ॥ आशीर्वाद करोन जयजयकार ॥ वसिष्ठापासीं बैसले ॥ ५९ ॥ धनंजयाची जे कां दारा ॥ क्षिप्रा नाम परम चतुरा ॥ तितें शौनक पाहोन उत्तरा ॥ ह्मणे सर्व स्वयंपाक शाकाकरीं ॥ ६० ॥ तैं वसिष्ठ ह्मणे हे शुभानने ॥ भ्रतार सहित मंगळस्नानें ॥ करोन करावीं अनंतार्चनें ॥ यथाविधि पूर्वक मिलितोपचारीं ॥ ६१ ॥ परिसोनि वसिष्ठाचें वचन ॥ तैलाभ्यंगीं करोनि स्नान ॥ सुवर्णपिंपळातळीं स्वस्तिक काढोन ॥ शंखपद्मेसीं रंगमाळा ॥ ६२ विचित्रवर्णीं अष्टगंधीं ॥ अष्टदळ रेखिलें जळसुगंधीं ॥ त्यावरी बैसविला नवनाथ नवनिधी ॥ जोकरुणाब्धि स्वळनाथ ॥ ६३ ॥ असो सर्व शाकेसीं सर्व पाक ॥ वसिष्ठापासीं ठेविला देख ॥ तैं वसिष्ठें मंत्रोनि उदक ॥ सर्व शाकपाकीं प्रोक्षिलें ॥ ६४ ॥ छाटी झांकोन सर्व पाकीं ॥ वसिष्ठ बैसला अति कौतुकीं ॥ नाथ ह्मणे धनंजया

विलोकीं ॥ सत्समागम महिमेसी ॥ ६५ ॥ नजाणें सत्समागम महिमेला ॥ तो सजीव असोनियां मेला ॥ जैसा कंटकवृक्षीं पडुनि अहिमेला ॥ ह्मणोनियां रमेला नाथ वदतसे ॥ ६६ ॥ ऐक धनंजया साव-धमतीं ॥ संतसमागमीं कैवल्य प्राप्ती ॥ त्याच्या घरीं अखंडित करी वस्ती ॥ चतुर्विधमुक्ति धनंज्या ॥ ६७ ॥ सूत शौनक वसिष्ठादि अरुंधती ॥ शुक सनकादिक ब्रह्ममूर्ती ॥ नारदादि विदेह स्थिती ॥ ज्यांनीं विरक्तीसीं व-रियेलें ॥ ६८ ॥ कुशावर्ती गौत्तमऋषी ॥ बैसला असे अनुष्ठानासीं ॥ जेथें काळभैरवें पुष्करासी ॥ वधिलें तैं पु-ष्करतीर्थी गौतम असे ॥ ६९ ॥ पुष्करतीर्थाचीं नामे चत्वारी ॥ चत्वारीयुगीं भिन्नाकारीं ॥ कृतायुगीं पुष्कर्णी वि जयद्वारीं ॥ त्रेतायुगीं पुष्करतीर्थ बोलती ॥ ७० ॥ द्वापाराचिये प्रथमचरणीं ॥ विजयतीर्थ ह्मणती पद्मपुराणीं ॥ द्वापारार्धीं गौतममुनी ॥ गोमुखनाम ठेवितसे ॥ ७१ ॥ गोमुखतीर्थ गौतमानें ॥ नामठेवितां वदती महाजनें ॥ तो हा गौतम पूजार्थी पातला सन्मानें ॥ धन्य भाग्यवंत धनंजया ॥७२॥ असो स्नान करोनि धनंजयें ॥ पूज्यास नीं बैसला सह भार्यें ॥ श्रीरवळनाथ ब्रह्मचर्या ॥ पूजाविधी सांगितला धनंजयासीं ॥७३॥ अहिल्येसह गौतम सावित्री सह चतुरानन ॥ अपर्णे सहित त्रिलोचन ॥ एक पंक्तीसीं लक्ष्मीरमण ॥ चत्वारी दंपत्यें बैसविलीं ॥ ७४ ॥ अ-सो विधियुक्त अनंताचीपूजा ॥ करोन ह्मणे पुरला मनोरथमाझा ॥ पात्रें मांडिलीं सुतेजा ॥ तैं वसिष्ठ ह्मणे क्षिप्रे सी ॥ ७५ ॥ अन्नपूर्णेचें करोन पूजन ॥ मग ओगरावें मिष्टान्न ॥ हें परिसोन वसिष्ठवचन ॥ सुवर्ण अश्वत्थपात्रें विस्तारिलीं ॥ ७६ ॥ षड्रस भरोन कनकवाटीं ॥ भक्ष भोज्यादिक सुवर्णताटीं ॥ वाढितां पात्रीं ठेवी अमृतवाटी ॥ वामहस्तींची केदार ॥ ७७ ॥ तेथें घालितां सर्व पदार्थ ॥ वाटी न भरेचि हे ऋषिसमर्थ ॥ हा देखोन नाथा-

चा संकेत ॥ क्षिप्रेसीं वसिष्ठ वदतसे ॥ ७८ ॥ तुझेसाठीं प्रथ्‌काकार ॥ झाले ब्रह्माविष्णु महेश्वर ॥ चवथा जमद
ग्नि अवतार ॥ तो हा खळेश स्वरूपीं आकारला ॥ ७९ ॥ महदाकाश पर्यंत ज्योतिर्लिंग ॥ मायायोगें झाला
द्वादशांग ॥ भगवंत आकारला अभंग ॥ ह्मणोन द्वादशलिंगें स्थापिलीं प्रथ्‌काकारीं ॥ ८० ॥ अपर्णेसीं आणि
भगवंता ॥ एकरूपीं असोनि नसे अभेदता ॥ ह्मणोन पार्थाचिया मनोरथा ॥ कृष्णें सुभद्रा होवोनि पुरविलें ॥
॥ ८१ ॥ तैसाचि अपर्णा होवोन श्रीहरी ॥ करोनि द्वादशलिंगांकारी ॥ पृथ्वीवरी लीलावतारी ॥ नाथें स्थापिलीं
द्वादशलिंगें ॥ ८२ ॥ जेवीं बळिभद्र आठव्या अवतारीं ॥ पूर्णब्रह्म श्रीकृष्ण ब्रह्मचारी ॥ तैसाचि श्रीनाथ हा ब्र
ह्मचारी ॥ भैरवाकारीं नटला असे ॥ ८३ ॥ ज्योतिर्लिंगें स्थापिलीं श्रीनाथें बारा ॥ ह्मणोन गर्जत निगम नगारा
॥ यास्तव ज्योतिर्लिंग दक्षिण केदारा ॥ नाम असे श्रुतिसंमते भविष्योत्तरीं ॥ ८४ ॥ यदर्थीं विकल्प मानील
मन ॥ तेणें पाहावें भविष्योत्तर पुराण ॥ ही वेदार्थींचि खूण ॥ निश्चयार्थीं जाणिजे पंडित हो ॥ ८५ ॥ ऐसा जो
ज्योतिर्मय शरीरी ॥ अवतरला ज्योतिर्लिंगाकारी ॥ तो हा रत्नाद्रीं हिमकेदारी ॥ पाहोनि सावध वाढीं वसिष्ठ
ह्मणे ॥ ८६ ॥ धनंजय सोडी संकल्पपाणी ॥ सूत शौनकादि गौतम हे तीन्हीं ॥ अरुंधती वसिष्ठेसीं चत्वारी मि
ळोनी ॥ एक पंक्तीसीं बैसले ॥ ८७ ॥ संकल्प विकल्प सोडितां जळ ॥ भोजना बैसले नाथादि ऋषि सकळ ॥
एकशत कीं दशशत दळ ॥ भोजना बैसले कळेना ॥ ८८ ॥ वसिष्ठ ह्मणे हो ज्ञानडोळसे ॥ सावध वाढीं निशा-
करदशे ॥ क्षिप्तविक्षिप्ताचा सबाह्यांतरीं स्पर्श ॥ न करींरूप रस गंधीं विचरावें ॥ ८९ ॥ ऐकोनि गुरुनाथाची खू-
ण ॥ क्षिप्रा होवोन सावधान ॥ अन्न ओगरोनि परिपूर्ण ॥ आधारपात्रीं पर्याप्त केलें ॥ ९० ॥ नाथहस्तींच्या क-

नकपात्रीं ॥ अमृत भरलें अगममंत्रीं ॥ सत्रावी वाढितां उन्मनि सूत्रीं ॥ सहस्रचक्रीं पर्याप्त जाहली ॥ ९१ ॥
असो ऐसे नवरस भोजनीं ॥ बैसोनि नवविधि नवचक्रासनीं ॥ नवनाथेसीं नवांशेखामणी ॥ नवार्णव जपानुक्रम
संतुष्टे ॥ ९२ ॥ ऋषिपंक्तीसीं खड्गपाणी ॥ भोजन केलें त्रिविधगुणीं ॥ विडे दिधले कर्पूरचिन्हीं ॥ मृगजळजीव-
नीं भिजवोनियां ॥ ९३ ॥ धनंजय जाणून ऋषीची खूण ॥ धांवोन धरिले श्रीनाथचरण ॥ ह्मणे तूंचि अनंत न
वनिधान ॥ ह्मणोनि निगमप्रमाण करितसे ॥ ९४ ॥ वसिष्ठ गौतम सूतशौनक मुनी ॥ धनंजय अरुंधती वंदी
साष्टांग नमनीं ॥ त्यावरी नमिला त्रिगुणगुणी ॥ खड्गपाणी जो आकारिला ॥ ९५ ॥ श्रीनाथ ह्मणेगा धनंजया ॥
इहलोकीं भोगोन ऐश्वर्या ॥ परलोकीं निजपदीं अक्षया ॥ भोगिसीं सुख गा जीवलगा ॥ ९६ ॥ वसिष्ठ ह्मणे गा
ज्योतिस्वरूपा ॥ त्रिभुवन पालकाक्ष अरूपा ॥ अगमनिगमी अजपीजपा ॥ अमल कमलदळीं भ्रमरागिरावर्णा ॥
॥ ९७ ॥ ऐसें स्तवोन देवांसीं ब्रह्मर्षि ॥ गेले शीघ्र बद्रिकाश्रमासीं ॥ श्रीनाथ वदे धनंजयासीं ॥ अक्षयसुख-
तुज प्राप्त होका ॥ ९८ ॥ जंववरी होता प्रगटनाथ नाथ ॥ तंववरी प्रगट दृष्टिपडे अश्वत्थ ॥ अदृश्य रूपीं प
वता अनाथनाथ ॥ इतर वृक्षां सारिखा पिंपळ होय ॥ ९९ ॥ हें जाणोन शौनकमुनी ॥ धनंजयासीं वदत सुवच
नीं ॥ सुवर्णपिंपळ ओळखावा जनीं ॥ जो कृष्णपिंपळ जटाधारी ॥ १०० ॥ कृष्णपिंपळ जटाधारी ॥ तोचि क-
ल्पिजे त्रिगुणावतारीं ॥ सत्संगतीची नवलपरी ॥ सहस्र नयनासीं दिसेना ॥ १ ॥ कृत त्रेत युगादि द्वापारीं ॥
भक्तांसीं तारिलें भवसागरीं ॥ अंबऋषीस्तव देहधारी ॥ कनकाद्रि विहारी जाहला ॥ २ ॥ मत्स्य कूर्म वरा-
ह देव ॥ नृसिंह वामन बटुभार्गव ॥ राम कृष्ण कलंकी भैरव ॥ तो हा हयवाहन दक्षिणपती ॥ ३ ॥


अंबऋषीसाठीं हा देहधारण ॥ ऐसें तुझें अंतःकरणीं जाण ॥ कल्पिलें तेंचि विवर्ण ॥ करावें विस्तारें आदरेंसीं ॥ ४
व्रतानां उत्तम साधनी द्वादशी ॥ करित आसतां अंबऋषी ॥ व्रत आचरितां बहुतेकदिवशीं ॥ दुर्वासऋषि पात
ला ॥ ५ ॥ स्नान संध्या देवतार्चन ॥ सर्व सारिलें अंबऋषीनें जाण ॥ पात्रीं ओगारिलें परमान्न ॥ पक्कान्नादिक
सर्वही ॥६॥ तें साधनीचे उतावेळ ॥ दुर्वास पातला प्रळयानळ ॥ ज्यांच्या ह्रदयाग्नींच्या ज्वाळा प्रबळ ॥ क्षणक्षणा ज्या
ज्वल उसळती ॥ ७ ॥ आला दुर्वास हें जाणोनी ॥ थरकंपित अंबऋषि झाला मनीं ॥ सत्वर पातला धांवोनी ॥
लोटांगणीं ऋषि वंदिला ॥ ८ ॥ अंबऋषि ह्मणे दुर्वासमुनी ॥ पात्रें वाढिलीं उत्तम मिष्टान्नीं ॥ अर्धघटिका उरली
साधनी ॥ तेंसमयें साधिलें पाहिजे ॥ ९ ॥ साधनी साधनाचा कृतनिश्चय ॥ तुह्मीं सर्व जाणते ऋषिवर्य ॥ व्रत
भंगाचा संशय ॥ घडे असा नकरावा ॥ १० ॥ दुर्वास ह्मणे मी करोनि स्नान ॥ शीघ्र येतों न भरतां क्षण ॥ अं
बऋषि ह्मणे पातलें विघ्न ॥ काय होईल कळेना ॥ ११ ॥ साधनी समयीं नये दुर्वास ॥ आतां विचार कोणता करा-
वा विशेष ॥ भोजन करितां नये सारांश ॥ व्रत भंग दोष घडतसे आह्मां ॥ १२ ॥ ऐसें भगवंतीं सांकडें ॥ क-
ठीण मांडिलें दोहींकडे ॥ धर्म शास्त्रार्थीचे निवाडे ॥ अंबऋषीनें शोधिले सर्वही ॥ १३ ॥ दुर्वासऋषिची क्रोधा-
ग्निगारिमा ॥ साहों नशके हरिहर ब्रह्मा ॥ अंबऋषीची सत्वमाहिमा ॥ नकळे गुणासिमा तयाची ॥ १४ ॥ विष्णु
तीर्थ घेऊन आधीं ॥ पारणें करावें तुळसीपत्र त्रिशुद्धीं ॥ साधनी साधावयाची दिव्यौषधी ॥ दुर्वास आधीव्या-
धीचें हें वर्म ॥ १५ ॥ ऐसें कल्पोनि चित्तातें ॥ अंबऋषि श्रीविष्णु तीर्थातें ॥ घेतां तें पातला अकल्पितें ॥ दु-
र्वासऋषि स्नान करोनि ॥ १६ ॥ दुर्वास बैसतांचि पूजास्थानीं ॥ तें अंबऋषीस लक्षिलें नयनीं ॥ दुर्वास समज

ला अतींद्रियज्ञानीं ॥ ज्ञानचक्षु करोनियां ॥ १७ ॥ दुर्वास ह्मणे अंबऋषीतें ॥ आह्मांसीं धाडोनियां स्नानातें ॥ तुवां केलें पारण्यातें ॥ हें कवण संमतें सांगपां ॥ १८ ॥ माझिये आज्ञेचा अचळ मेरू ॥ नुलंघेची कदापि सहस्रकरू ॥ मी आलिया वांचोनि साधनी घटिकाभरू ॥ कैचें सामर्थ्य घटिकेतें ॥ १९ ॥ पश्चात् करावया भोजन ॥ ऐसा नसे दुर्वासजाण ॥ आतां घेईं शाप वचन ॥ महादुर्धर दशजन्म ॥ २० ॥ ही ऐकोनि शापवाणी ॥ विष्णु गजबजिला अंतःकरणीं ॥ चक्र प्रेरिलें कृतांत वर्णी ॥ श्रीविष्णूनें सक्रोधें ॥ २१ ॥ तें चक्र काळाग्नि भयंकर ॥ दुर्वास लक्षितांचि सामोर ॥ तेव्हां पळतसे पवनाकार ॥ चक्र पाठीं लागलें ऋषीच्या ॥ २२ ॥ पांचशत कोटि महीविस्तीर्ण ॥ दुर्वास हिंडला नलागतांक्षण ॥ ऐसें षण्मास करितां भ्रमण ॥ सप्तार्णवीं सप्तावर्ती केल्या ॥ २३ ॥ चतुर्दश भुवनीं दुर्वास ॥ पळतां पावला बहुत्रास ॥ चक्राकार कृतांतवेष ॥ पाठीं लागलें नसोडी ॥ २४ दुर्वास ह्मणे हे लक्ष्मीरमणा ॥ याकाळचक्राग्नीं पडिलों भ्रमणा ॥ अंबऋषीची केली छळणा ॥ ह्मणोनि हें फळ पावलों ॥ २५ ॥ विष्णु भक्तांचें करितां छळण ॥ ह्मणोन नऊखंड पृथ्वी पळणें जाण ॥ लागलें मजलागीं अचळपण ॥ केव्हां करिसी श्रीकरधरा ॥ २६ ॥ गुरुतल्पक विश्वासघात ॥ ब्रह्मद्वेषी भंगितजो विष्णुव्रत ॥ ऐसीं पापें असंख्यात ॥ मजलागीं घडलीं श्रीहरी ॥ २७ ॥ अंबऋषीचिया कैवारा ॥ सुदर्शन धाडिलें सहस्र धारा ॥ आमुच्या करावया संहारा ॥ द्वैतांतरासीं कां केलें ॥ २८ ॥ एके मायेचीं द्वय लेकुरें ॥ एक सत्वगुणी एकतमी अवकळकार ॥ उभयतीं महदन्याय करितां थोर ॥ शिरछेद नकरि माय त्यांचा ॥ २९ ॥ मृषाभावें ताडन करि ॥ परी माया समान दोघांवरी ॥ द्वैतार्थाची नवलपरी ॥ जननी अंतरीं असेना ॥ ३० ॥ ऐसी असोन विश्वजननी ॥

कां मज उपेक्षिले निर्दयपणीं ॥ या काळ चक्राग्नि पासोनी ॥ कवण सोडवील मजलागीं ॥ ३१ ॥ ऐसें ऐकोन दुर्वास वचन ॥ धांवोनि आला जगत्र जीवन ॥ ह्मणे अंबऋषीसीं जाई शरण ॥ तेव्हांचि काळचक्राग्नींत न पड सी ॥ ३२ ॥ साधनी पासोन दुर्वासें ॥ केले जाण अहंकृतीच्या सरोषें ॥ तें पासोन उपोषित असे ॥ अंबऋषि अचळा सनीं बैसला ॥ ३३ ॥ विष्णु सहित दुर्वासमुनी ॥ पातला अंबऋषीचें भुवनीं ॥ तंव चक्रपातलें घन गर्जनीं ॥ दुर्वासावरी घनघोरें ॥ ३४ ॥ तंव विहंगम मार्ग क्रमोनि भारी ॥ अंबऋषी बैसला ब्रह्मांडागारीं ॥ अर्ध मात्रा चंद्राकारी ॥ सेवितां अमृत तुषारीं तोषला ॥ ३५ ॥ असो अंबऋषीच्या समाधी अंवरीं ॥ गर्जलें विष्णुचक्र श्री मणीपूरीं ॥ तें जागृत होवोन नमस्कारी ॥ श्रीहरितें अंबऋषी आदरें ॥ ३६ ॥ अंबऋषि ह्मणे हे दीनानाथा ॥ प तितोद्धारिया बळसमर्था ॥ पुरविसी भक्तांच्या मनोरथा ॥ निजांगें कष्टोनियां ॥ ३७ ॥ हेजलधिजावरा जलजव- र्णा ॥ जलजवत बिंदु इंदुकिरणा ॥ तें दुर्वासऋषीनें केलें नमना ॥ अंबऋषीतें साष्टांगीं ॥ ३८ ॥ अंबऋषीचे कृपाव लोकनें करून ॥ कृतांतचक्र गेलें फिरोन ॥ दुर्वास ह्मणे धन्यधन्य ॥ तूंचि अंबऋषी ॥ ३९ ॥ विष्णु दुर्वास अंबऋषि ॥ त्रिवर्ग बैसले भोजनासीं ॥ तृप्ति पावला दुर्वासऋषी ॥ भक्त प्रेमरसीं अपार ॥ ४० ॥ भोजन झालिया संतोषीं ॥ दुर्वास गेले निजाश्रमासीं ॥ परी दुर्वास शापवचनासीं ॥ असत्य नोहे सर्वथा ॥ ४१ ॥ त्रैलोक्यनाथें दशजन्म ॥ अंबऋषीस्तव घेतले अजन्म ॥ वासुदेव अनिरुद्ध प्रद्युम्न ॥ ध्यातां पुनर्जन्म नघडें प्राणिया ॥ ४२ ॥ यालागीं दहा अवतार देव ॥ धरी अंबऋषीस्तव वासुदेव ॥ अनंत व्रत आणि साधनी व्रतयाची ठेव ॥ शौनकें दिधली धनंजयासीं ॥ ४३ ॥ संत समागमीं अनंतव्रत ॥ चौदावर्षें जे आचरत ॥ त्यांचिया घरीं अखंडित ॥ वस्ती

श्रीलक्ष्मीनाथ करितसे ॥ ४४ ॥ इतिश्री केदारविजयानंद ॥ श्रवणार्थी यांचे कूमतिकंद ॥ छेदितां विषमतेसीं तें अरविंद ॥ सच्चिदानंद प्रकाशे ॥ ४५ ॥ श्रीमदानंदघन हरिनारायण ॥ हे अवतरले त्रिगुणी नवनिधान ॥ तत्पदांघ्रीं सरोजीं भ्रमर हरिकीर्तन ॥ गर्जत एकतीसावाअध्याय गोडहा ॥१४६॥ इतिश्रीकेदारविजय ॥ केदारखंड भविष्योत्तरपुराण ॥ केदारखंड विरचितायां दुर्वास अंबऋषि साधनीव्रत ॥ अनंतार्चन धनंजय चारितांमृत कथनोन्नाम एकत्रिंशतितमोध्यायः ॥ ३१ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ शुभंभवतु श्रीरामजयराम ॥ ओंव्या ॥ १४६ ॥ ॥

अध्याय ३२ वा.



॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ जय केदार सगुणनिधी ॥ जय सुरवरार्चित सद्बुध्दी ॥ तत्वगुण श्रवणार्थी यांच्या आधिव्याधी ॥ हरोन भवनदी पार करविसी ॥ १ ॥ श्रीरवळेश्वरा अनादिनाथा ॥ त्रिभुवनेश्वरा बळसमर्था ॥ सद्भक्तांच्या सुमनोरथा ॥ पूर्ण करिसीं युगायुगीं ॥२॥ कृतायुगारंभी अंबऋषीपासीं ॥ प्रगटलासी साधनी द्वादशीसीं ॥ अनंतव्रत सांगितलें कौंडिण्यऋषीसीं ॥ वसिष्ठऋषीनें जेकथियेलें धनंजया ॥३॥ हे एकतीस अध्यायाचीकथा ॥ क्वचित शब्दें विस्तार पुरता ॥ अर्थांतर स्वमनोगता ॥ श्रीनाथहस्तें लेखन करी ॥ ४॥ ॥ श्लोक ॥ प्रल्हाद नारद पाराशर पुंडरीक व्यासांबरीष शुक भीष्म दालभ्यान् रुक्मांगदार्जुन वसिष्ट विभीषणादि पुण्यामान् परम भागवतान् स्मरामि ॥१॥ ॥ टीका ॥ ॥ अनंत अवतारीं अनंत भक्तां ॥ तारोनि वधिले दैत्याअभक्तां ॥ श्रीकारक होसी सुलभ विरक्ता ॥ विषयसक्तांसीं दुर्लभ ॥ ५ ॥ व्यक्ताव्यक्ति अनंतस्वरूपा ॥ मायामानस सबळ प्रतापा ॥ रत्नागिरीवरी दक्षिणदीपा ॥ हरिसंकल्पा प्रकाश करिसी ॥ ६ ॥ दीनानाथ दीनबंधु ॥ भक्तांसीं करुणाकर कृपासिंधु ॥ ऐसा पतितपावना शब्देंदु ॥ जन्मला हरीजन चकोर जीववावया ॥ ७ ॥ कृतायुगीं तुझियें भजनीं ॥ प्रल्हाद तारला हरिस्मरणीं ॥ हिरण्यकश्यपाचिया तीव्राचरणीं ॥ स्फुलिंगाकिरणी रक्षियेलें ॥ ८ ॥ विषप्रयोग प्रल्हादासी करवितां ॥ अमृत केलेंसी अनाथ नाथा ॥ त्यावरी शस्त्रें ताडण करितां ॥ पुष्प लतिका झालासी ॥ ९ ॥ पर्वतपातीं रक्षिलें तया ॥ उदकीं तारिलें नाथराया ॥ भक्तवचन सत्य करावया ॥ हिरण्य कश्यप ह्मणे पुत्रासीं ॥ १० ॥ ह्मणेरे तुझा कोठें असे देव ॥ त्याचा मातें दाखवीं ठाव ॥ सर्वांघटीं व्यापक वासुदेव ॥ तूंते अहंभावें कळेना ॥ ११ ॥ सर्वांतरात्मा सर्वांघटीं ॥ व्यापकत्व स्थिर चरपटीं ॥ मृत्तिकादि कांचन स्फटिक

घटीं ॥ जैसी व्यापक सुर्यप्रभा ॥ १२ ॥ सर्वसाक्षी सर्वोत्तम ॥ ऐसें वाक्य गर्जे निगम ॥ जगाचें जीवन ह्मणो न नाम ॥ जगज्जीवना कां नेणसी ॥ १३ ॥ साशत्रु कामाचे परी तूं निष्कामी ॥ न ठेविसीं चित्तासीं धरोन ईर कामीं ॥ वासना वाढविसी कां रिकामी ॥ दुरोक्ति षट्कर्मी मदांध ॥ १४ ॥ ऐसा वदे प्रल्हाद पित्याला ॥ तें सत्य नवाटें कदापी त्याला ॥ तो तीव्र भाषणीं त्याला ॥ शस्त्र घेवोन वदतसे ॥ १५ ॥ सर्वाठायीं व्यापक भगवंत ॥ कैसा असे तो दाखवीं त्वरित ॥ मज सामोर यास्तंभांत ॥ कैसा वसे तो मज दाखवीं ॥ १६ ॥ स्तंभीं दिसतसे मजलागीं जाण ॥ हें स्वपितयासीं वदतां सुजाण ॥ तें दैत्यें घेतलें उड्डाण ॥ सिंहासना वरोनियां ॥ १७ ॥ खांबासीं हाणितां खड्गधारीं ॥ स्तंभ तो कडाडिला गगनोदरीं ॥ अवतरोन तैं नरकेसरी ॥ स्तंभ विदारोनि दैत्यवधियेला ॥ १८ ॥ न गेहीं न बाहेरीं न मंदिरीं ॥ न दिवा न माध्यान्हीं नशार्वरीं ॥ ह्मणोन ग्रहउंबरीं ॥ आडवें धरोन दैत्यासीं वधियेलें ॥ १९ ॥ तैं हिरण्यकश्यपाचें ह्रदय विदारी ॥ सजीवें अजीवें न मरे निर्धारीं ॥ अस्तमानीं नरकेसरी ॥ नखें उदरीं रोवोन वधिला दैत्य ॥ २० ॥ ऐसा असुरवध करोन निकरीं ॥ भक्तासी केला राज्याधिकारी ॥ समारंभी चक्रवर्ती सुखसागरीं ॥ त्यातें केलेंसी निकेतना ॥ २१ ॥ रुक्मांगदादि मयूरध्वज ॥ हरिश्चंद्रादिक सूर्यवंशज ॥ ज्यांचे स्वर्गीं लागले ध्वज ॥ युगायुगीं अद्यापि प्रख्यात ॥ २२ ॥ ध्रुव स्थापिला अचळपदीं ॥ उपमान्यासीं दिधला क्षीराब्धी ॥ हूहू गंधर्व सोमदंती पारधी ॥ मालती सहित उद्धरिला ॥ २३ ॥ प्रल्हाद नारद पराशर पुंडरीक ॥ व्यासांबरीष सुत शौनक ॥ वसिष्ठ दाल्भ्य बिभीषण शुक ॥ धर्मार्जुन सख्यार्चनी ॥ २४ ॥ ताम्रध्वजादि मयूरध्वज ॥ नीलध्वजादि भगीरथ भारद्वाज ॥ त्रिशतमुखी दृढधन्वा हंसध्वज ॥

हे अभेद भक्तीसीं तारिले ॥ २५ ॥ पुण्य श्लोकी नळ नैषध ॥ ज्याचे नाम घेता दिव्यौषध ॥ भवरोगीयाची ह-
रोन व्याध ॥ स्मरणीं मृत्यु दारिद्य नासती ॥ २६ ॥ आहिल्या द्रौपदी सीता मंडोदरी ॥ उखा तारा द-
मयंती सुंदरी ॥ जेवीं परापश्यंति मध्यमा वैखरी ॥ शुचिष्मंत करिती ब्राह्मीमुहूर्ती ॥२७॥ ऐसे अमळ अनंत भक्त
॥ त्रयदेवात्मक मूर्तिमंत ॥ एकरूपीं अवतरले त्रेत द्वापारांत ॥ तारावया विश्वजनांसीं ॥ २८ ॥ कृतयुगाहूनि उ
त्तम हा कली ॥ ही कीर्ति भागवतीं ऐकिली ॥ ज्यांची हरिनामीं वाणी असे रंगली ॥ तेचि सदय ल्हदयीं
नर धन्य ॥ २९ ॥ वालाकोळी पापरासी ॥ संतसमागमीं झाला वाल्मीकऋषी ॥ कथिलें शतकोटि भविष्या
सीं ॥ जें त्र्यंबकें वांटिलें त्रयलोकां ॥ ३० ॥ समुद्रें हारितां अंडज कुमर ॥ त्यासीं शिक्षा करोन आणिले सत्वर॥
उष्णोदकीं पडतां दुर्धर ॥ शीतळ केलें तुवां नाथराया ॥ ३१ ॥ कुरंग कुरंगिणी पाडसा सहिते ॥ अग्निचक्रीं
कोंडली स्मरतां तुतें ॥ पर्जन्य पाडोनि त्या दीनानाथें ॥ मुक्त केलेंसी तयांतें ॥ ३२ ॥ चतुष्पादामाजीं कुंजर ॥
दुर्मदांधबुद्धि अरण्यचतुर ॥ असतां कवणपुण्यें गजेंद्रोद्धार ॥ दीनानाथें तुवां केलासी ॥ ३३ ॥ हें शौनकासी ध
नंजय ॥ वंदोनि वदतसे सदय ल्हदय ॥ गजेंद्रोद्धार ऐकावा दृढनिश्चय ॥ धनंजयासीं वदतसे तें ऐका ॥ ३४ ॥
द्रविडदेशींचा नृपती ॥ इंद्रद्युम्न प्रतापमूर्ती ॥ तयाचा धाकुटाबंधु कुमती ॥ चंद्रद्युम्न जाणपां ॥ ३५ ॥ हाहा हू
हू गंधर्व दोनी ॥ ऋषि शापोक्ति मानव योनी ॥ पावले द्रविड देशीं राज्यासनी ॥ उभयबंधू राज्यकरिती ॥३६॥
सहस्रस्त्रीयेसी जलक्रीडणें ॥ करावया पातलें उन्मत्तपणें ॥ विवस्त्र स्त्रियेसी मदांदपणें ॥ रतिविलास करिती उ-
न्मत्तपणीं ॥ ३७ ॥ पूर्वसमुद्र सिंधोदरीं ॥ भागीरथीच्या दक्षिणतीरीं ॥ कपिलाश्रमाच्या सेजारीं ॥ मदांधबुद्धि वि

चरती ॥ ३८ ॥ तेथेंचि बैसला विश्वामित्र ॥ एकत्र मीनले द्वादशमित्र ॥ शीघ्रकोपाचे बीजमंत्र ॥ विश्रामले ज्यादेहीं ॥ ३९ ॥ हरिश्चंद्रादिक नृपवरीं ॥ ज्याचे क्रोधाग्नि शरीरांगारीं ॥ अळंकारोनि सबाह्यांतरीं ॥ जाणोन राज्याधिकारी केले अचळ ॥ ४० ॥ विश्वामित्राचे उतरतां कसीं ॥ अचळपदीं हरिश्चंद्रासीं ॥ स्थापिलें तोचि पूर्व समुद्र संगमेसीं ॥ भागीरथी तटाकीं बैसला ॥ ४१ ॥ तंव विचित्र प्रारब्धाची सीमा ॥ उल्लंघोनि उपहासिलें ऋषिसत्तमा ॥ जळ सिंपि चेलललामा ॥ भुजा भुजंगमा उभारोनियां ॥ ४२ ॥ अंग प्रत्यंगींचें पाणी ॥ ऋषींवरी पडलें उद्धटपणीं ॥ तंव ह्रदयीं धडकला क्रोधाग्नी ॥ विश्वामित्राच्या तेधवां ॥ ४३ ॥ ह्मणेरे इंद्रद्युम्न मदोन्मत्ता ॥ कुंजर होवोनि पुरवी आस्था ॥ चंद्रद्युम्ना नक्र होईं तत्वता ॥ गंडकीनदीमाजीं विचरावें ॥ ४४ ॥ तुह्मां दोघा वैर संबंधु ॥ होय ऐसें ऐकोनि उभयबंधु ॥ येवोन वंदिला करुणासिंधु ॥ उद्धार समर्थें करावया ॥ ४५ ॥ विषयानुरक्त होवोनी ॥ उपहासीलें वारांगनीं ॥ ते क्षमा करावी स्वामीनीं ॥ उद्धारावें दीनातें ॥ ४६ ॥ तव शापानुग्रह रोषें ॥ आह्मांतें भेटे द्वारकाधीश ॥ ऐसें भासतसे विशेष ॥ तें ऋषिसमर्थें पूर्ण करावें ॥ ४७ ॥ दोघे बंधु करितां प्रार्थना ॥ कृपा द्रवली अंतःकरणा ॥ ह्मणे ऐकें उःशाप वचना ॥ नियमाचें शाश्वत ॥ ४८ ॥ विरोध कराल उभयबंधु ॥ प्राणांत समयीं करुणासिंधु ॥ धांवोन येईल अनाथबंधु ॥ अक्षयीं पदीं स्थापील तुह्मांसी ॥ ४९ ॥ वैर संबंधाचे सौरसें ॥ गंडकीमाजी सहस्रवर्षें ॥ युद्ध कराल आपुले दोषें ॥ तंव द्वारकाधीश उद्धरील तुह्मांसी ॥ ॥ ५० ॥ ऐसें वदतां शापशब्द ॥ तात्काळ पावले प्राणवध ॥ इंद्रद्युम्न झाला द्विरद ॥ सहस्र कुंजर परिवारी ॥ ॥ ५१ ॥ नक्र होऊन चंद्रद्युम्न ॥ गंडकीमाजी झाला जन्म ॥ वैर संबंध व्हावया अजस्र ॥ देह धरिले यामुळें ॥

॥ ५२ ॥ नक्र गंडकी जळांत ॥ गजेंद्र बाहेर मदोन्मत्त ॥ फिरत असतां पूर्वार्चित ॥ सह परिवारीं संतोषें ॥
॥ ५३ ॥ पूर्व जन्माचि आठवण ॥ नक्रासीं असे मात्र जाण ॥ कुंजरासीं पडिले विस्मरण ॥ विषयार्णवीं विचरतां ॥ ५४ ॥ गोड तेंचि झालें कडुवट ॥ विषय कडु तेंचि मानिती मिष्ट ॥ काम क्रोध षड्रिपु विवर्जित श्रेष्ठ ॥ ऐसा नसे या त्रिभुवनीं ॥ ५५ ॥ वातांबु शुष्कपर्णासीं भक्षण ॥ जितेंद्रिय संवत्सर गणन ॥ अचळ करितां तपार्चन ॥ तयाचें मानस विषय अपेक्षी ॥ ५६ ॥ विषय केवळ विषवल्लरी ॥ ऐसें विचक्षण जाणोन अंतरीं ॥ तेंचि सेविती अमृतापरी ॥ सुजाण सुचक शुचिष्मंत ॥ ५७ ॥ जे षड्रिपूसीं आवड ॥ तेचि विषयरूपीं षड्रसीं सेविती गोड ॥ तें काम क्रोध भुजंग जंबाड ॥ व्हदयपेटारामाजीं फुपाटती ॥ ५८ ॥ त्यासीं सन्मानें प्रतिष्ठान्वय मलयागरा ॥ कवाळितां भय भाजन नारीनरां ॥ उपजतां ह्मणती ऐसिया मुनिवरा ॥ अपेक्षित तोंचि पुरवावें ॥ ५९ ॥ ऐसें महा संमत्त महंत ॥ प्रस्तुत जिव्हाशिस्नांकित ॥ शब्दब्रह्म वैराग्य असंख्यात ॥ बोलती स्मशानवैरागी ज्यापरी ॥ ६० ॥ ऐसे विषयासक्त महाजन ॥ वेष्टिले माया स्वपर भावनें जाण ॥ हे चतुष्पादामाजीं तो अग्रगण ॥ मदोन्मत्त कुंजरामाजींहा ॥६० ॥ ऐसा सहस्र कुंजरपरिवारीं ॥ गजराज विचरे गंडकीतीरीं ॥ गंडकीमाजी मूळवैरी ॥ असे गजेंद्र मात्र जाणतसे ॥ ६२ ॥ गजेंद्र गंडकीचें पाणी ॥ नसेवी कदापि स्ववदनीं ॥ हें लक्षोनि परिवारजनीं ॥ गजेंद्रातें वदतसे आदरें ॥ ६३ ॥ अमृतमय गंडकीजीवन ॥ काहो न करितां तुह्मीं प्राशन ॥ शरीर गेलें सर्व वाळोन ॥ तनु प्रक्षाळण न करितां ॥ ६४ ॥ ऐकोन स्वकीय जनांचें आग्रह वचन ॥ गजेंद्र वदे सखेद वचन ॥ मद्रिपु गंडकी असे ह्मणोन ॥ यास्तव गंडकीं तोय न सेवीमी ॥ ६५ ॥ पूर्वजन्माचा वैर संबंधु

॥ तो नक्र आमुचा धाकुटाबंधु ॥ महापराक्रमी प्रताप सिंधु ॥ तो वधील जळ सेवितां तात्काळ ॥ ६६ ॥ ऐसी वदतां गजेंद्रमात ॥ वदती उत्तर स्वकीय आप्त ॥ आह्मीं सहस्र नाग बलोन्मत्त ॥ नक्रासीं वधूं निजबळें जळसेवितां ॥ ६७ ॥ अमुचे शतसहस्र परिवारापुढें ॥ नक्र एकटें मशक बापुडें ॥ शुंडादंडीं अंगप्रौढें ॥ नक्रास्थि पिष्टवत् करोन टाकूं ॥ ६८ ॥ तुमचे दायाद बंधु सहोदर ॥ श्वशुर शालक दौहित्र ॥ भगिनी पुत्र पौत्रादि कलत्र ॥ दोन सहस्र नवनागबळी ॥ ६९ ॥ हें सर्व मारील जेव्हां नक्र ॥ तेव्हांचि तुह्मांसीं गंडकी अ-वक्र ॥ यःकश्चित कथ्यते तक्र ॥ नक्र शक्रकीं सांगपां ॥ ७० ॥ ऐसें वदतां गजेंद्रभारी ॥ गजराज निघाला कुं-जर परिवारीं ॥ गर्जत पातला गंडकीतीरीं ॥ द्विरदभारा सहित सर्व ॥ ७१ ॥ इंद्रद्युम्न गजराज लीला ॥ पौरजें वेष्टित प्रवेशे सलीला ॥ हा नक्रें गजशब्द तीव्र ऐकिला ॥ धांवोन आला धरावया ॥ ७२ ॥ नक्र गर्जनेचा घोष ॥ ऐकोनि द्विरद पातले शेष ॥ जन्मांतराचा धरोन द्वेष ॥ गंडकीमाजी क्लेश भोगितसे ॥ ७३ ॥ मी कोण कोठी-ल असें कवण ॥ कळोन झालासी कैसा नेण ॥ हे देहधारी कवण्यागुणें जाण ॥ परिवार देखोन भुललासी ॥ ॥ ७४ ॥ ऐसें वदोनी शब्द निग्रहा ॥ पायीं झोंबला नक्रग्रहा ॥ गजेंद्रासीं वोढितां स्वग्रहा ॥ ह्मणे अति आग्रहा न करावें ॥ ७५ ॥ तुमची आमुची दुर्धर योनी ॥ भोगितां वर्जावी यदर्थीं कोणी ॥ हें दीर्घ विचारोनि अंतःकर्णीं ॥ अंतीं गृहासीं आलें पाहिजे ॥ ७६ ऐसें वदोनी वोढितां पायीं ॥ नेला वोढित अगाधडोहीं ॥ परिवार वो-ढिती धरोनी स्वदेहीं ॥ शुंडा करोनी कंकणाकारी ॥ ७७ ॥ गज परिवारा सहित देखा ॥ गजेंद्र आकर्षिला न धरोनी शंका ॥ हें जाणोनी विषयीलोकां ॥ भय आशंका उपजली ॥ ७८ ॥ अचाट नक्राचें अतुर्बळ ॥ गात्रें झा-

र्ली सर्व निर्बळ ॥ गजेंद्रातें नक्र भेटला काळ ॥ हें निश्चयें जाणिविलें परिवारीं ॥ ७९ ॥ एकासाठीं बुडावें सकळें
॥ हें विचारिजे विवेक कुशळें ॥ गजेंद्र सोडोनि द्यावा सकळें ॥ कळोनि आत्मघात कैसा करावा ॥ ८० ॥ कांता
सुत पुत्र पौत्रीं कुमरीं ॥ सोडोनि जावें जळा बाहेरी ॥ हें जाणोनि गजेंद्रपरिवारीं ॥ निश्चय केला त्यागाचा ॥
॥ ८१ ॥ दिव्य सहस्र संवत्सर ॥ युद्ध करी इंद्रद्युम्न कुंजर ॥ जर्जर झाला कुंजर ॥ तें गजेंद्र सोंडेला जळामा-
जी ॥ ८२ ॥ जेवीं निर्माल्य टाकी जळांतरीं ॥ तैसा गजेंद्र भवसागरीं ॥ सोडोनि आप्तजन परिवारीं ॥ मृषा क-
रिती शोकातें ॥ ८३ ॥ हें देखोनि इंद्रद्युम्न ॥ ह्मणे हा हा झाला व्यर्थ जन्म ॥ पुनः पुनः प्राणि जन्मोनि जन्म
॥ संसार कर्मीं वेष्टिले सारे ॥ ८४ ॥ कैंचें घर कैंचें दार ॥ कवणाचे सुत कुमरी कुमार ॥ कवणाची जाया सुंदर ॥
स्वशुर शालक सखेबंधु ॥ ८५ ॥ गजेंद्र ह्मणे निजांतरीं ॥ व्यर्थ बुडालों या संसारीं ॥ आत्महित विसरलों मदां
ध शरिरीं ॥ या गृहपंजरीं कोंडलों ॥ ८६ ॥ न जाणोनियां सारासार ॥ भोगिती रति विषयांचे पसार ॥ प्राप्त
झाला संतापसार ॥ दुरित भरित संसारिकावर्तीं ॥ ८७ ॥ संसारिक जनांचीं सुमनोत्तरें ॥ विज्ञानीं जाणती ख
दिरांगारे ॥ अज्ञान मानिती सुमनाकारें ॥ विषय मननें करोनिया ॥ ८८ ॥ दुःखमुळ हा संसारसिंधु ॥ तेथें वि
षय कामनेचा इंदु ॥ जन्मतां विषम भावनेचा बिंदु ॥ असज्जन आनंदु सेविती ॥ ८९ ॥ कीं संसार पहा दुःखा
ची काहणी ॥ अशा तृष्णा मद मत्सराची शिराणी ॥ निद्रिस्थ होतां खदिरांगार अंथरुणीं ॥ विश्राम प्राणि
यालागीं कैंचा ॥ ९० ॥ अनृत कुटिळोक्तिच्या कुपिका भरोनी ॥ ठेविल्या दुर्व्यसनीं मद्यें करोनी ॥ तें प्राशन क
रितां अव्युत्पन्नीं ॥ तेथें समदर्शनीं कायकीजे ॥ ९१ ॥ ऐसा अव्युत्पन्न अगीर्वाणी ॥ निंदा द्वेश दुराभिमानी ॥

तशांत मदमत्सर दंशकफणी ॥ दंशतां मनीं व्याकुळलों ९२ ॥ ऐसे अनेक रीति अनुतापें कुंजर ॥ तापोनि अंतरीं झाला जर्जर ॥ नक्ररूप अहंममता पाशपंजर ॥ या लिंग देहासीं वेष्टिलें ॥ ९३ ॥ हे नारायणा दीनोद्धारी ॥ दिनानाथा मधुकैठभारी ॥ तुज वांचोनि भव सागरीं ॥ मज कवण तारी सांगपां ॥ ९४ ॥ नवुमास मातेचिया उदरीं ॥ उकडलों मळमूत्राचिये वैश्वान्नरीं ॥ ध्यात होतों तुज अंतरीं ॥ सोहं शब्दें करोनियां ॥ ९५ ॥ दृष्टीसीं न पडे नाथनिरंजन ॥ यालागीं त्रिमास करीं रुदन ॥ तेंही विसरलो जाण ॥ बाळ प्रौढ विषय कीशोरीं ॥ ९६ ॥ दिवसें दिवस खेळकर ॥ होतां अवघाचिपडे विसर ॥ प्रौढ झाल्या वैश्वानर ॥ विषय हुंकार धडाडी ॥ ९७ ॥ मीच श्रेष्ठ मीं सत्कर्मी बहुश्रुत ॥ मीं पराक्रमी रणपंडित ॥ मज वेगळा या ब्रह्मांडात ॥ चतुर श्रीमंत असेना ॥ ९८ ॥ चतुर्दश विद्याकळा प्रवीण ॥ माझें ब्रह्मलिख्य लेखन ॥ न्याय नीति तर्क भाषण ॥ माझें शहाणपण नये कवणा ॥ ९९ ॥ म्यां हींच उत्तम कर्मे केलीं ॥ म्यांच हीं रंगमहालें उभाविलीं ॥ माझें पाहोनि सर्व सिकलीं ॥ माझा मी चतुर शाहाणा ॥ १०० ॥ म्यां जमा खर्चाची केली उगवणी ॥ परी अढथळा न पडेचि कांगां झणी ॥ जन्मकर्माची नवकीर्द लावणी ॥ शाहणपणीं घरींच म्यां केली ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सराची झाडी ॥ वाढविली यत्नें वासनेच्या दरडी ॥ तयांचें शरीर छायेचे सुरवाडी ॥ द्वेष पर्जन्यीं वाढल्या ॥ २ ॥ अहं ममतेचे तंदुळ ॥ नव कीर्दीत पेरीले सकळ ॥ ते अद्यापी नाहीं उगवले ॥ ह्मणोनी नवल करितसें मी ॥ ३ ॥ म्यांच पेरिले चतुरपणीं ॥ अद्यापी न उगवले न ह्मणतीच कोणी ॥ जन्म जमाखर्चाचि सिराणी ॥ विषय मद शरीरीं अपर्याप्त ॥ ४ ॥ ऐसें अहं ममताचरण ॥ पूर्वी पासोन आजन्म करण ॥ ऐसें जालें माझें मदोन्मत्तपण ॥

दिनानाथा ज्योतिर्मया ॥ ५ ॥ विषयरूप नक्र हाचि भवार्णवीं ॥ मातें आतां समूळ बुडवी ॥ जेवीं व्याघ्र धेनू सीं तीव्र अडवी ॥ मग धेनूनें काय करावें ॥ ६ ॥ दायादगणीं देवोनी भरंवसा ॥ बळेंचि वोपिलें नक्र ग्रासा ॥ हें तुज ठाऊकें द्वारकाधीशा ॥ कां अजुन करुणा नयेचि ॥७॥ चतुरंगुल प्रमाणा ॥ नाशाग्र उरलें मधुसूदना ॥ पतित पावना हरिनारायणा ॥ दीनोद्धारा दीनवंधु ॥ ८ ॥ दीनवंधु नामाचा तोडर ॥ पायींगर्जे निगमोत्तराकार ॥ अनाथनाथ ऐसा बडिवार ॥ शेष वर्णितां भागला क्रमण चरणीं ॥९॥ ही विनय परिसोनि गजेंद्र वाणी ॥ गड बडोनि उठिला शेषशयनावरूनी ॥ पितपट लोळतसे पवन कीरणीं ॥ लक्ष्मी ह्मणे कवण कार्याचि लगवग असे ॥ १० ॥ हस्ती अक्षर दोन प्रमाण ॥ हकार लक्ष्मीपासीं ह्मणे ॥ गजेंद्रापासीं तीकार वदे वचन ॥ ऐसा मधुसूदन चपळलें ॥ ११ ॥ सिंधुजापासीं ह्मणे तो हा ॥ कुंजराप्रती अंती आलों पहा ॥ श्रीहरी धांवला मनोपमहा ॥ अधिक शतसहस्र गुणेंसी ॥ १२ ॥ गजेंद्राचे कैवारासाठीं ॥ विष्णु चालिला न भरतां त्रुटी ॥ पवन गरुड तिघे पाठीं ॥ धावतां मार्गीं थकोनि राहिले ॥१३॥ दिव्य देवांचीं सहस्र वर्षें ॥ गजेंद्र युद्धीं श्रमला विशेषें ॥ हें जाणोनि द्वारकाधीशें ॥ धांव घेतली विकोश सुदर्शन घेवोनी ॥ १४॥ कुंजरें दिव्य सहस्र संवत्सर ॥ युद्ध केलें कैसें ह्मणतील चतुर ॥ निरोदकी निराहार ॥ नक्र गजेंद्रें संग्राम केला ॥१५॥ ऐसेंचि गीता पंचरत्नीं ॥ सहस्र वर्षें युध्याची सिराणी ॥ वदली ऐसीच व्यासवाणी ॥ भविष्योत्तर पुराणीचा निश्चयहा ॥ १६ ॥ असो तैं हा दिनानाथ ॥ मनोवेगाहून अपर्मित ॥ गजेंद्र दुःखी जाणोनि पातला त्वरित ॥ सुदर्शनहस्त उभारोनी ॥ १७ ॥ गंडकी तटाकीं सहस्रचरण ॥ ठेवोनि मारिलें सुदर्शन ॥ तेव्हां खळवाळिलें गंडकी जीवन ॥ सुदर्शन प्रहारें करोनियां ॥

॥ १८ ॥ शिळा गंडकीच्या तदारभ्यें ॥ स्वमूर्तिच केल्या पद्मनाभें ॥ कीं वृंदा सतीच्या शापशुभें ॥ सुफळ केला ग
जेंद्रोद्धारीं ॥ १९ ॥ उत्तमशिळा पूज शुभदा ॥ तुवां व्हावें श्रीगोविंदा ॥ ऐसे वदली वाक्यवृंदा ॥ जालंदर वधांतीं
चोविसाव्याध्यायीं ॥ २० ॥ तें सत्य करावया गजेंद्र समयीं ॥ शिळागंडकीच्या जाहला स्वदेहीं ॥ ह्मणोनि शालि
ग्राम झाले पाहीं ॥ बहुवर्णीचे कांचन चक्री ॥ २१ ॥ सुदर्शन झगटतां सुदर्शन ॥ मत्स्य कुर्म वराह दधि वाम-
न ॥ षट्चक्री सीताराम मधुसूदन ॥ दामोदर त्रिविक्रम पद्मनाभ ॥ २२ ॥ श्रीधर लक्ष्मी नृसिंह राम ॥ चतुर्द-
शचक्री अनंत नाम ॥ गोस्तनीं लक्ष्मी नारायण ॥ उपमें चक्रांकित कांचन संनिभ ॥२३॥ हिरण्यगर्भ वासुदेव ॥
राधादामोदर हयग्रीव ॥ सुवर्ण चक्रांकित अनुभव ॥ लघु स्थूल बहुवर्णी ॥२४॥ शंख चक्र पद्मनाभ गदाधर ॥ शेष
पर्यंकी कनकांबर ॥ सुवर्णरेषा चक्राकार ॥ हे श्रीकालिका शालिग्राम ॥२५॥ असो हा गंडकी महात्मींचा विस्तार॥
वदला श्रीव्यास मुनिवर ॥ वदनांतूनि सुवर्ण मासाभार ॥ मूर्ति पासाव निघे तोळ्या पर्यंत ॥ २६ ॥ असो हे
बोल गंडकींत मारोनी चक्र ॥ बाहेर काढिले गजनक्र ॥ हें स्वर्गीं पाहोनि देवचक्र ॥ दिव्यसुमनीं वर्षले ॥ २७ ॥
दिव्यदेह करोनियां करी ॥ आरूढ करविला विमानांतरीं ॥ नक्र पडे गंडकी बाहेरी ॥ हें देखोनि हरीतें नक्र हां
सतसे ॥ २८ ॥ ह्मणे नवल आजी अघटित ॥ ऐसें नदेखिलें आजन्मांत ॥ त्वंन्नाम पतितपावन होय त्वरित ॥ ऐ
सें ऐकिलें युगायुगीं ॥ २९ ॥ जेजे तुझे स्मरण करिती ॥ त्यातें वैकुंठीं करविसी वस्ती ॥ सारांश तव नाम घोष
कीर्ती ॥ करितां उत्तमगती पाविजे ॥ ३० ॥ त्वंन्नाम स्मरणें व्हावे पापक्षय ॥ पतित स्थापावा पदीं अक्षय ॥ त
व दर्शन घेतां नरकालय ॥ जावया कारण दिसतसे ॥ ३१ ॥ तुझें नाम मात्र पतितोद्धार ॥ तव दर्शनें पावावें

यमनगर ॥ हेंचि यथार्थ वदावें साचार ॥ मग पुढारें गंतव्य करावें ॥ ३२ ॥ असो तव दर्शनाचा ऐसाचि महि-
मा ॥ नक्रेंचि जावें यमाच्याग्रामा ॥ जेजे पाहती तुझे मुखपद्मा ॥ त्यांनीं वैवस्वत धामासींच जावें ॥ ३३ ॥ स्ना
न संध्यार्पणादि तपें ॥ गजेंद्रें नकेलीं आयासें अथवा साक्षेपें ॥ तुझीं हीं नजाणें नामरूपें ॥ त्रैलोक्य दीप तूंचि
ह्मणोनियां ३४ ॥ तूं निर्गुण निर्विकारी ॥ ज्योतिस्वरूप व्याप्त जगदांकुरीं ॥ हें गजेंद्र नजाणेचि तूं त्रिगुणाव-
तारी ॥ सबाह्यांतरीं जाणपां ॥ ३५ ॥ तूं कोण हें गजअजाण ॥ असें असोनि तूं आलासीं धांवोन ॥ येवढा बो
ल गजाचा परिसोन ॥ मज विरहित विमानीं त्या बैसविसी ॥ ३६ ॥ ऐसी नक्राची परिसोनि वाणी ॥ हा
स्य करोनि चक्रपाणी ॥ दोघांसीं बैसवोनि विमानीं ॥ वैकुंठभुवनीं स्थापिले ॥ ३७ ॥ ऐसें गजेंद्र उद्धारातें ॥
केलें असे दिनानाथें ॥ पुढिल भक्त चरितामृतें ॥ तेतीसाव्याध्यायीं परिसावीं ॥३८॥ बत्तीस लक्षणी दक्षिणपती
॥ भक्तांस्तव झाला सगुणाकृती ॥ बत्तिसाक्षरीं गातां तव गुणकीर्ती ॥ बत्तिसाध्याय सुमनोहरीं ॥ ३९ ॥ गीता
पंचरत्नीं गजेंद्रोद्धार ॥ ऐसेंचि वदला सत्यवतीकुमर ॥ असो कृत त्रेत द्वापार ॥ दीनोद्धार केला गणिकादि
सर्वही ॥ ४० ॥ इति केदार विजय निधान ॥ गजेंद्रोद्धार सावधान ॥ श्रवणार्थीं पावे समाधान ॥ हें श्री
व्यासवचन श्रीकारक ॥ ४१ ॥ केदारविजयीं गजेंद्रमोक्ष ॥ वदावांकिन्निमित्य वदतील दक्ष ॥ हरिजनाचा
नाथ कैंपक्ष ॥ धरोनि संदेह निवारी ॥ ४२ ॥ ज्योतिर्मय हें अनादिस्वरूप ॥ आकारिलें त्रयदेवात्मक स-
गुणरूप ॥ जमदग्नि अवतार दक्षिणदीप ॥ भरतखंडाग्रीं उजळिला ॥ ४३ ॥ ब्रह्मा विष्णु उमाकांत ॥ ए-
क रूपी झाला तोची दीनानाथ ॥ हें संमत ब्रह्मांडपुराणांत ॥ ऐसेंची भविष्योतरीं वदला मुनी ॥ ४४ ॥

उत्पत्ति पालन संव्हार ॥ वेगळाला होता त्रिगुणाकार ॥ तो ऐकेठायीं वाढला कारभार ॥ भैरवाकार होवोनि दीनानाथ ॥ ४५ ॥ ह्मणोनि शतमुख ब्रह्मा शतमुखहरी ॥ शिवादिहे त्रिगुणावतारी ॥ सृष्ठिक्रम मूळ मायेचा जो आकारी ॥ तो हा भैरवाकृती रत्नागिरीवरी अवतरला ॥ ४६ ॥ यास्तव करिजे वरद चरिता ॥ हरिनाम रसायणीं नवरस भरिता ॥ सेवितां निरसे भवभय चिंता ॥ बत्तिसाध्यायार्थ गोडहा ॥ १४७ ॥ इतिश्रीकेदार विजय ॥ भविष्योत्तर केदार खंड ॥ गंडकी महात्म्य विरचितायां ॥ गजेंद्रोद्धार कथनोन्नाम ॥ द्विात्रिंशतीतमोध्याय गोडहा ॥ ३२ ॥ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ओंव्या ॥ १४७ ॥ ॥ ॥ ॥ ॥


अध्याय ३३ वा.
जयरामसांवताची स्त्री.
गोमासांवत याचा जन्म
जयरामसांवत.
श्रीशैल्य मल्लिकार्जुनयात्रा.

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकेदारेश्वरायनमः ॥ जय केदार सगुणनिधी ॥ ज्योतिर्मय मात्रा हेचि दिव्यौषधी ॥ सेवितां अखंडित आधिव्याधी ॥ मृत्यु दारिद्र्य नाश होय ॥ १ ॥ निर्गुण निर्विकारा ॥ निष्प्रपंच रज सत्व तम-आकारा ॥ निगमागमी अर्थांश विवरा ॥ निमिषार्ध परेसी स्वरव्यंजना ॥ २ ॥ नित्यानंद श्रीकरधरा भूसुरवरा ॥ निद्रा स्वप्न क्षुदा रहित आचरीं ॥ निरस सुरस रसिक गिरा ॥ निर्मळांतर कर्त्तारा कवन चरिता ॥ ३ ॥ ऐसा दिनानाथ पुराणपुरुष ॥ रत्नागिरीवरी दक्षिणाधीश ॥ विराजित प्रभा ते जैसे चंडांशु ॥ द्वादश एकत्र उगवले ॥ ४ ॥ द्वादशार्कमय द्वादशलिंगें ॥ नाथें स्थापिलीं भगवद्भूषितांगें ॥ जंघ जानु जंघ्रनी भुजंग ॥ पदतळीं सुरंग रंगला ॥ ५ ॥ भक्त मानस सरोवरींचा हंस ॥ तो हा प्रख्यात दक्षिणाधीश ॥ अवतरला त्रिगुणगुणात्मक अंश ॥ भक्त गुणिजन तारावया ॥ ६ ॥ अपारभक्त तारिले महीं ॥ मोजितां संख्या नकळे कांहीं ॥ चतुर्वेदादि शास्त्रें सा ही ॥ तुज वर्णितां स्तब्ध झालीं ॥ ७ ॥ कृतायुग त्रेतादि द्वापारीं ॥ भक्त तारिले त्रिगुणावतारीं ॥ गजेंद्र नक्रा-सीं उद्धरोनि हरी ॥ वैकुंठागारीं बैसविले ॥ ८ ॥ गजेंद्रोद्धार बत्तिसाध्यायीं ॥ संतीं परिसिला केदारविजयीं ॥ श्रो-तीं सादर होवोनि ह्रदयीं ॥ सद्भक्त चरितांमृत सेवावें ॥ ९ ॥ कलियुगीं भक्त अपार ॥ झाले सिद्ध त्यांतील प्र-सिद्ध चतुर ॥ श्रवण करितां संतापसर्व ॥ हरिकीर्तनीं हरपती ॥ १० ॥ उदया येतांचि दिनकर ॥ महाद्वारीं सं-त मुनिवर ॥ दर्शन घ्यावया प्रेमादर ॥ श्रीनाथापासीं पातले ॥ ११ ॥ मुखमार्जन करोनि नाथ ॥ उभा राहि-ला प्रेमभरीत ॥ भक्तांसीं लक्षित त्रैलोक्यनाथ ॥ कुर्मदृष्टि करोनियां ॥ १२ ॥ महा मुद्गलभट ब्राह्मण ॥ आधीं करवितो पंचांग श्रवण ॥ तिथिवार नक्षत्र ग्रहगण ॥ शुभ श्रीकारक तुज असती ॥ १३ ॥ सेनान्हावी पातला जा

ण ॥ दावितसे सदय ह्रदय दर्पण ॥ गोऱ्या कुंभारें कलश घेऊन ॥ अमल गंगोदक आणिलें स्नाना ॥ १४ ॥
शुद्ध सत्वाचा पितांबर ॥ परिधान करविला प्रभाकर ॥ पदतळीं रंगला अरुणाकार ॥ पूर्ण चरण देवडिया ॥ १५
॥ नवार्णव नवनाथा केशरी ॥ टिळक रेखी गोरखनाथ आदरीं ॥ नामदेव वस्त्रें परिधान करी ॥ दिव्यभक्ति लला-
मे मोलागळीं ॥ १६ ॥ चिद्रत्नांचे अळंकार ॥ घेवोनि नरहरी सोनार ॥ लेववीतसे राजोपचार ॥ ॲंकार लकार
अर्धमात्रेसीं ॥ १७ ॥ चरण संपुष्ट रोहिदास ॥ पुढें ठेवी मनोल्हास ॥ स्तुतिकरी कूर्मदास ॥ नामदेव जेव ह्मण-
तसे ॥ १८ ॥ हार तुळसी गुंफोनि सुमनकळीं ॥ घेवोन पातला सावंता माळी ॥ वसिष्ठादिक सप्तऋषि सकळीं
॥ पुष्पांजुळी समर्पिल्या ॥ १९ ॥ भानुदास कुळ भुषण ॥ पूर्णानंद आनंदघन ॥ गीत नृत्य संगीत गायन ॥
श्रीजयदेव करितसे ॥ २० ॥ भानुदास कुळ भूषण मणी ॥ एकनाथ अपरोक्ष ज्ञानी ॥ ज्याची भागवतीं परम
शिराणी ॥ अठ्ठाविसाव्याध्यायीं अपूर्व असे ॥ २१ ॥ जीवन्मुक्त मुक्तेश्वर ॥ वामन कलियुगीं व्यासावतार ॥ कालि-
दास श्रेष्ठ कवेश्वर ॥ भोजरायापासीं कालिका वरदी ॥ २२ ॥ जयदेव पंडित पाराशरी ॥ भोजरायाचे निज मं-
दिरीं ॥ ऐश्वर्यासीं राजोपचारीं ॥ दंपत्ययुक्त नांदतसे ॥ २३ ॥ गांधर्व कौशल्य सगुणनिधी ॥ राजापाळितसे स
न्मानविधी ॥ राजकांतेच्या संवादीं ॥ जयदेवकांता येतसे ॥ २४ ॥ तंव विचित्र प्रारब्धाचीगती ॥ जयदेवकांता प
द्मावती ॥ गीत विनोद अनेकरीती ॥ राजपत्नीसीं करितसे ॥ २५ ॥ तव अघटित वार्ता घेवोनि देखा ॥
राजकांतेसीं वदे दूतिका ॥ या शहरामाजी कौतुका ॥ नवल देखिलें अवधारा ॥ २६ ॥ सहगमनाची अ-
पूर्व विधी ॥ देखिली ऐकिली नाहीं कधीं ॥ तळहातीं होम करोनि आत्मशुद्धी ॥ अग्निकाष्टें भक्षिलीं सतीनें ॥ २७ ॥

याचेंचि नांव सहगमन ॥ पुसील्या ह्मणती महाजन ॥ तंव कांता ह्मणे धन्य धन्य ॥ तीच पतिव्रता सिरोमणी ॥ २८ ॥ भोजरायाची दारा ॥ परमाश्चर्य करी चतुरा ॥ ऐसी नसेल या वसुंधरा ॥ द्यावया उपमा नसे सतीला ॥ २९ ॥ हें परिसोनि पद्मावती ॥ ह्मणे ही नव्हे सहगमनाची रीती ॥ भ्रतार पंचप्राण ज्योती ॥ प्रयाणीं आत्मस्थिति मावळावी ॥३०॥ त्यांचें नांव सहगमन ॥ हें ऐकोनि भोजकांताजाण॥ पद्मावतीसीं वदे वचन ॥ ऐसी कवण न देखों ॥ ३१ ॥ पद्मावती ह्मणे तुमचे नगरीं ॥ एखादि असेल पतिव्रता नारी ॥ तिचेनियोगें यापराशरीं ॥ राज्य कर्त्तिसा दिसतसे ॥ ३२ ॥ हें पद्मावतीचें उत्तर ॥ परिसोनि कुटिळ धरी अंतर ॥ जयदेव कांतेसीं पाडोनि विसर ॥ दुर्धर विचारें वर्त्तली॥३३॥ जयदेवा सहित नृपवर सैन्य भारीं॥ प्रवेशलिया वनगंव्हरीं॥ तंव राजकांतेनें स्वमंदिरीं ॥ नवल करणी केली ती ऐका ॥ ३४ ॥ सरक्त करोनि प्रावर्ण ॥ सेवकांसीं सांगितली जयदेवाची खूण ॥ त्यावरी राजकांतेनें बोलावोन ॥ पद्मावतीसीं आणिलें ॥ ३५ ॥ संवाद करितां एकांता ॥ तंव राजदूत पातला अवचिता॥ जयदेवासीं मृत्युव्यथा ॥ प्राप्त झाली व्याघ्रबळें ॥ ३६ ॥ हें ऐकितां पद्मावतीनें जाण ॥ तात्काळ सांडिला आपुलाप्राण ॥ प्रेत स्वरूपी सती लक्षून ॥ भोजकांता गडबडिली ॥ ३७ ॥ विनोद केला कुटिळ पणीं ॥ कैसी तात्काळ पावली प्राणहानी ॥ चिंताक्रांत आपुले मनीं ॥ शोक करी आक्रोशें ॥ ३८ ॥ येरिकडे नरेंद्र दळभारीं ॥ मार्गें परतला घनघोरीं ॥ तैं जयदेवाचे अंतरी ॥ शोक काद्रव्य झोंबला ॥ ३९ ॥ जयदेव ह्मणे भोजराया ॥ दुश्चिन्ह पातलें ल्हदयालया ॥ गृहीं श्रमी असेल भार्या ॥ हेंचि मजला गमतसे ॥ ४० ॥ ऐसा जयदेव चिंतावर्त्ती ॥ भ्रमत पातला स्वगृहाप्रती ॥ तंव दृष्टि न पडेचि पद्मावती ॥ पंचारती घेवोन नित्य ये

सामोरी ॥ ४१ ॥ ती कां न ये गजराज गामिनी ॥ ह्मणोनि प्रवेशला आपुले सदनीं ॥ हस्त फिरवोनि सतीच्या वदनीं ॥ कां न वदसी वचन शुभाननें ॥ ४२ ॥ कांहो रुसलीस मजवरी ॥ कीं कवणें तांडलें कठिणोत्तरीं ॥ हालवोनि पाहातां अचेतन शरीरीं ॥ तंव धैर्य धरोनि निजांतरा ॥ ४३ ॥ वृंदावनीं आणोनि कांता ॥ शरण गेला श्रीभगवंता ॥ रमारमणा अनाथनाथा ॥ श्रीअनंता येई या आकांतीं ॥ ४४ ॥ पद्मावतीस वृंदावनीं बैसवोनी ॥ श्रीजयदेव हस्तपाद प्रक्षाळूनी ॥ उभा राहिला करजोडोनी ॥ निर्मळमनीं उत्तरामुख ॥ ४५ ॥ हे मधुकैठभा नरकादि शासना ॥ मदन जनका शेषशयना ॥ राधामानस मनमोहना ॥ कुंजवन विहारिया ॥ ४६ ॥ शाम सारंग गौडी गुर्जरी ॥ भैरव केदार बारी असावरी ॥ सहाराग छत्तिसा सुंदरी ॥ गीत संगीत गायनादि नायकेसी ॥ ४७ ॥ विमानीं नायकांचें अलापन ॥ खंडितां नायकांचें स्वरभूषण ॥ सप्तस्वर गंधर्व गायन ॥ करितां अनाथ शिखामणी तोषला ॥ ४८ ॥ भक्तप्रेम रसोत्पत्ती ॥ पाहोनि तोषला वैकुंठपती ॥ उठविली देवें पद्मावती ॥ जीचेनि गीत गोविंद प्रख्यात झाला ॥ ४९ ॥ जे जे समयीं रागरागिणी ॥ त्या त्या नायिका स्वरालंकार व्यंजनी ॥ चत्वारी विंशती गांधर्व गुणीं ॥ वर्णितां खड्गपाणी तोषला ॥ ५० ॥ ब्रह्मादि पदरज वांछित ॥ कदापी तयासीं नोव्हे प्राप्त ॥ तो श्रीजयदेव पंडित ॥ पद्मावतीसीं उठवी हरिकीर्तनीं ॥ ५१ ॥ ऐसे अपार भक्तजन ॥ अनंतावतारी लीलेनें तारीजण ॥ जेवीं प्रभातें लोकोपकारा कारण ॥ चंडांशु कीरण ज्यापरी ॥ ५२ ॥ बेदरींच्या अविंधानें ॥ जयरामसावंत्या कारणे ॥ करवीराचे दिधले ठाणें ॥ देशमुखींचें अक्षयीं ॥ ५३ ॥ जयरामचंद्र रणशूर ॥ सवें घेवोनि दळभार ॥ पातला करवीर कोल्हापुर ॥ राज्य केलें बहु दिवस ॥ ५४ ॥ सर्व संपत्ति

भरली घरीं ॥ परी पुत्रसंतान नाहीं उदरीं ॥ ह्मणोनि रमानाम सुंदरी ॥ भ्रताराप्रती वदतसे ॥ ५५ ॥ पुत्रसंतान नसतां पोटीं ॥ योग्य नोहें त्रैलोक्यांतील गोष्टी ॥ अनेक संसारिकांच्या राहटी ॥ निर्फळ सेवटीं शोधितां तु ॥ ५६ ॥ तुमचें कुळदैवत श्रीनाथ ॥ असोनि केलें कां अनाथ ॥ पुत्रकामनेचा मनोरथ ॥ पूर्ण न करीच कां ॥ मचा ॥ ५७ ॥ पुत्रकामनार्थी द्रव्य सकळ ॥ खर्चोनि निर्मिलें सावतळ ॥ स्नान करोनि मन निर्मळ ॥ दर्शन त्रिकाळ करितसा ॥ ५८ ॥ काया वाचा धन संपत्ती ॥ अर्पूनि अर्चितां एकचित्तीं ॥ द्वादश वर्षांची त्रिरावर्ती ॥ तरी वंशउत्पत्ति कां न होय ॥ ५९ ॥ नाथ दर्शनासीं नग्नचरणीं ॥ छत्तीसवर्षें जातसा अनवाणीं ॥ कां कृपा न करीच खड्गपाणी ॥ नवनाथ सिखामणी जो रत्नागिरीचा ॥ ६० ॥ ऐकोनि कांतेची विनयवाणी ॥ जयराम सावंत वदत वचनीं ॥ सुपुत्र पात्रे पूर्वार्चनीं ॥ यदर्थी संदेह न धरावा ॥ ६१ ॥ एकचित्त उभय आह्मीं ॥ असावें अखंडित चित्त ईश्वरकामीं ॥ तरीच त्रैलोक्यनाथ अनाथ स्वामी ॥ निपुत्रिकांसीं सुफळ कर्त्ता ॥ ६२ ॥ ॥ आमुचें पूर्व जन्मांतर ॥ असेल तैसेंचि होय साचार ॥ दारासुत संपतीचे पसार ॥ अचळ नाथार्चनीं पाविजे ॥ ६३ ॥ जरी असेल अमुचें अचळ सुकृत ॥ पूर्ण होतील तव मनोरथ ॥ श्रीनाथ पुत्र देईल गुणवंत ॥ देवभक्त तुजलागीं शुभाननें ॥ ६४ ॥ ऐकोन भ्रतार मुखीचें वचन ॥ रमा वदे हास्य वदन ॥ मागावें श्रीनाथासीं वरदान ॥ वंध्या लांछनार्थी स्वामीया ॥ ६५ ॥ आतां उभय मिळोनि रत्नागिरी ॥ जाऊन आर्जवूं हिमकेदारी ॥ हें ऐकोनि प्रियेची वैखरी ॥ अवस्य ह्मणोनि निघाला ॥ ६६ ॥ जयराम सावंत सह पत्नी ॥ शीघ्र निघाला तत्क्षणीं ॥ आपुली नामाची पुष्कर्णी ॥ तेथें सुस्नात जाहला पैं ॥ ६७ ॥

सुस्नात होवोनि कुशावर्तीं ॥ प्राकृत कुशरें जयासी ह्मणती ॥ औंदुंबरतीर्थीं भागीरथी ॥ असे त्यासी बोलती उं
बरण ॥ ६८ ॥ पुष्करतीर्थीं करोनि स्नान ॥ मयुरतीर्थीचें करोनि अघमर्षण ॥ प्राकृत बोलती मोळवण ॥ त्यापु-
ढें मत्स्योदरींसीं सुस्नात झाला ॥ ६९॥ मत्स्योदरींसीं बोलती जन मंडुकदरा॥ तेथेंही स्नान करोनि जवरामदा-
रा ॥ तेथोनि डाकिनीतीर्थीं त्रिंबकेश्वरा ॥ वंदीलें त्यासीं मटवाल प्राकृत बोलनी ॥ ७० ॥ निगुडभैरव तीर्थीं क
रोनी स्नान ॥ त्यावरी पापनाशीचें करोनि अघमर्षण ॥ कालियुगीं जन बोलती पांढरवर्ण ॥ जेथें कल्माषपाद रा
क्षस उद्धारिला ॥ ७१ ॥ त्यावरी शरद्तु शारदातीर्थीं ॥ रत्नाद्रि मस्तकाहूनि उत्तरपंथीं ॥ विद्युत्पाताहूनि सरस्व-
ती ॥ शारदातीर्थ कृतसंगम ॥ ७२ ॥ शारदातीर्थीचा महिमा गहन ॥ सारकाळ बोलती प्राकृतजन ॥ त्यावरी
नील पर्वत सोमेश निनाई दर्शन ॥ घेवोनि अवंढ्या नागनाथ पूजिला ॥ ७३ ॥ पुष्करतीर्थीचे पूर्वेकडे ॥ व्याघ्र
तीर्थ असे देहुडे ॥ व्याघ्राई असे तयापुढें ॥ कुशावर्ता वरोनि सावनळ्यासीं पातला ॥ ७४ ॥ पुनरपी सावतळ्यां
त करोनि स्नान ॥ भार्येसहित निघाला घेवोन सुमन ॥ रत्नागिरीसी येवोन ॥ श्रीनाथ निरंजन पूजिला ॥७५॥
यथाशक्ति मिलितोपचारीं ॥ पूजिला सद्भक्तीं हिमकेदारी ॥ बद्धहस्तें विनयोत्तरीं ॥ स्तुतिरत्नें समर्पिलीं ॥ ७६
लक्षचौऱ्यांशी योनि आंत ॥ विषयी भ्रमे पुर्वार्चित ॥ फिरतां क्रियमाण सांचित ॥ हा नरदेह अवचित लाधला
॥ ७७ ॥ हा नरदेह दुर्लभ अवचटीं ॥ पावलों गा तव कृपामृतदृष्टीं ॥ पुत्रसंतान देवोन पोटीं ॥ धन्य यासृष्टींत
करावें मातें ॥ ७८ ॥ नसतां भक्ताचिये प्रारब्धीं ॥ नूतन निर्मूनि देतसे सिद्धी ॥ हा तव महिमा त्रिपदी पंचप-
दीं ॥ तूंचि भक्तां कृपानिधी होसी ॥ ७९ ॥ वंध्या शब्द माझिये माथां ॥ बैसला गा अनाथनाथा ॥ दक्षिणपाति

बळसमर्था ॥ वंध्याशब्दार्था परिहारीं ॥ ८० ॥ जयरामसावंताची दारा ॥ ऐसें वदतां अमलगिरा ॥ श्रीनाथ ह्मणे श्रीकरवीरा ॥ उद्यीक येणें माझें असे ॥ ८१ ॥ शुचिर्भूत असावें अमलमनीं ॥ कुटिलभाव समूळ त्यजोनी ॥ निर्मळ असावें उपोषणीं ॥ अर्धरजनी पर्यंत ॥ ८२ ॥ स्वपर भावाचें लक्षण ॥ चित्तातें नाणिजे अर्धही क्षण ॥ तरीच पुत्र देईन शुभ लक्षण ॥ देवभक्ति निधान तुजलागीं ॥ ८३ ॥ श्रीनाथमुखींचें वरदवचन ॥ वंदोनि घातलें लोटांगण ॥ पल्लवीं शकुनगांठी बांधोन ॥ तें गमन केलें करवीरासी ॥ ८४ ॥ नगर श्रृंगारिलें बहुकुसरीं ॥ गुढिया तोरणें घरोघरीं ॥ सडे घातले कुंकुमकेशरीं ॥ कस्तुरी कर्दम मिश्रित करोनियां ॥ ८५ ॥ भांडार फोडोनि दिधलें ब्राह्मणा ॥ उभयतीं करोनि मंगळस्नाना ॥ परिधान करोनि कनकाभरणा ॥ वाट पाहाती श्रीनाथाची ॥ ८६ ॥ हें जाणोनि हिमकेदारी ॥ स्वेततुरंगमीं करोनि स्वारी ॥ निघाला सवेग मंदवासरीं ॥ करवीरासीं जावयालागीं ॥ ८७ ॥ अर्धरजनीमाजीं नाथ ॥ रणांगणातें अकस्मात ॥ उतरलासे आकाशपंथें ॥ भक्तमनोरथ पुरवावया ॥ ८८ ॥ देखोनि अंगणीं नाथराया ॥ वंदोनि पूजिलें क्रमणपायां ॥ ओंवाळोनि माझीकाया ॥ तुज वरोनि सांडितों ॥ ८९ ॥ ऐसें वदोनि जयराम रामा ॥ पूर्णकरी भक्तकाम कल्पद्रुमा ॥ तुझ्या वेदाज्ञेची नुलंघावया सीमा ॥ कवण पुरुषार्थी या महीं असे ॥ ९० ॥ असो ऐसा दक्षिणपती ॥ पूजिला उभयतीं परमभक्तीं ॥ श्रीनाथ जेवोनि झाला तृप्ती ॥ महाप्रसाद दिधला रमेला ९१ ॥ तो प्रसाद घेवोन जयरामनारी ॥ ह्मणे यानें काय होतें हिमकेदारी ॥ षड्रसपक्वान्नें आमुचेंघरीं ॥ नित्य नूतन सेवितसो ॥ ९२ ॥ अन्न भक्षिल्या जरी पुत्र होती ॥ तरी तुह्मांसी कां येतों काकुलती ॥ भोळा माझा जयरामपती ॥ चांगलाभला संगतीं भेटलासी ॥ ९३ ॥ बरें जेंजें हो-

णार कर्म ॥ तेंचि घडों कां सुखसंभ्रम ॥ ऐसे वदतां जयराम ॥ भार्येप्रती वदे अवधारीं ॥ ९४ ॥ जो नाथ देई
ल प्रसाद ॥ तोचि सेवीं होवोनि अभेद ॥दूषण न ठेवीं निंदानुवाद ॥ भेद स्त्रीविवाद करोनियां ॥ ९५ ॥ ऐको
नि उभयतांच्या बोला ॥ श्रीनाथ बैसला होवोनि अबोला ॥ स्वमनीं ह्मणे तव गुण अमोला ॥ न करवेचि सहस्र
वदना ॥ ९६ ॥ ह्मणेरे ऐक जयरामसावंता ॥ कुटिळत्व धरोनि कामीचित्ता ॥ प्रसाद सेविलासी जो त्वां निंदि-
तां ॥ तैसेंचि पावाल पुत्रफळ ॥ ९७ ॥ ऐसें वदोनि सौदागर ॥ तुरंगावरी झाला स्वार ॥ पावला श्रीरत्नागिरी-
वर ॥ श्रीकमळेसीं विचारोनियां ॥ ९८ ॥ असो तोचि दिवस धरोनि गणन ॥ झाले नऊमास संपूर्ण ॥ पुत्र झा
ला विरहित करचरण ॥ जेवीं निर्मळ वरवंटा ॥ ९९ ॥ हें देखोनियां रमाचित्तीं ॥ ह्मणे धन्य धन्य दक्षिणपती ॥
तव सेवेचि फलश्रुति ॥ ऐसीच असे सांगपां ॥ १०० ॥ जेवीं पीठातें रोवितां बोटा ॥ तेवीं मुखी नेत्रीं दिसे गो
मटा ॥ तुजवरी घातलें संकटा ॥ ह्मणोनि वरवंटा आह्मासीं दिधला ॥ १ ॥ आमुचे पूर्वार्जित बहुखोटें ॥ यालाग
गीं ऐसें बाळ असे बोखटें ॥ जन्मलें त्यातें करील गोमटें ॥ कवण नाथराया तुजाविण ॥ २ ॥ ऐसें करोनि क्षिप्ता
क्षिप्त ॥ वरवंटा घालोनि पाळण्यांत ॥ आणिला रत्नाद्रि पर्वतातें ॥ एक मनुष्यहस्तें राजाज्ञें ॥ ३ ॥ पुष्करतीर्थीं
ठेवोनि बाळ ॥ मनुष्य गेले उतावेळ ॥ तेव्हां लोटला सायंकाळ ॥ तें बाळभावें रुदनकरी ॥ ४ ॥ ह्मणे दिनाना-
था पावगा हरिहरा ॥ पूर्णब्रह्म जमदग्नी अवतारा ॥ स्थापिलींसी द्वादशलिंगें बारा ॥ ह्मणोनि ज्योतिर्लिंग नामासीं
मिरविसी ॥ ५ ॥ तुमच्या त्रेतायुगाच्या वचनासीं ॥ धरोनि जपत होतों गर्भवासीं ॥ आजी उपेक्षोन परेशी ॥ पु
ष्करतीर्थीं टाकिलें ॥ ६ ॥ हें जाणोनि चर्पटांबा ॥ पाळण्यावरी मधुकदंबा ॥ निर्मोनि श्रववितां मधुथेंबा ॥ क्षुधा-

निवारण केली ते समयीं ॥ ७ ॥ नाथासीं ह्मणे चोपडाई ॥ तुह्मीं बहुत कठोर ऱ्हदयीं ॥ क्रोध धरितां यासीं कशा पायीं ॥ हें निश्चयें सांगा मजलागीं ॥ ८ ॥ त्रेतायुगींचा हा गुहक ॥ हा भक्तराज परम देख ॥ याचे करचरण रहित कौतुक ॥ कां विपरितार्थ तुह्मीं केला ॥ ९ ॥ तुझें नाम तरी दिनानाथ ॥ असोनि कां न धरिसी यासीं सनाथ ॥ तूं अलक्ष अक्षयीं योगिया आदिनाथ ॥ भक्त मनोरथार्थीं अवतरलासी ॥ १० ॥ फार भक्तांसीं छळसी वृथा ॥ बहुत अंत पाहसी रवळनाथा ॥ अनंत अवतार चरित्र कथा ॥ भक्तांसीं अर्थ स्वार्थासीं चाळविसी ॥ ११ ॥ सद्भक्तांचा अंत न पाहवा आतां ॥ विज्ञानीयाची दवडावी संसारचिंता ॥ आपुला भक्त जाणोनियां संत महंता ॥ हातीं निवडीं आवडीं ॥ १२ ॥ सायुज्य साम्राज पदासीं ॥ तुझेनि न देववे सद्भक्तांसीं ॥ तुझी भक्ति देवोन हरिजनांसीं ॥ संतापासी निरवीत जावें ॥ १३ ॥ ऐसें वदोनि रवळेश्वरा ॥ घेऊनि पातली जयराम कुमरा ॥ कृपावलोकन करितां चरण करा ॥ दिव्यदेह बाळक तो झाला ॥ १४ ॥ थोर जाहला ईश्वरभक्त ॥ नाम ठेविलें गोमासावंत ॥ विसरला पितृव्याचें संमत ॥ अवघा श्रीरवळनाथ मायबाप ॥ १५ ॥ ऐसे झाले कांहीं दिवस ॥ गोमासावंत ह्मणे ऐकगा नवलविशेष ॥ तूं नव्हे बरवा दक्षिणाधीश ॥ तो मी सांब मरंचि नोहे जाणा ॥ १६ ॥ कीं दशरथ वियोगें संतापसारा ॥ तुज आठविला ह्मणोनि स्तब्धांतरा ॥ होऊन न बोलसी सौदागरा ॥ तव विश्वपसारा ऐकिला पूर्वीं ॥ १७ ॥ बाहत्तर युगांचें प्रथमचरणीं ॥ अवतरला तुह्मीं खड्गपाणी ॥ तेचि अष्टादश भैरव बाहिनी ॥ अष्टादश पद्में चित्रकूटीं पातला ॥ १८ ॥ अठराचोक बाहत्तरीं ॥ बहात्तराचे प्रथम प्रहरीं ॥ तुह्मीं अवतरतां बद्रिविहारी ॥ ऱ्यां निश्चयोत्तरीं गोविलें तुह्मां ॥ १९ ॥ तूं माझी जनक जननी रघुनाथा ॥ होवोनि

पाळावें अनाथ नाथा ॥ तें सत्य करोनि आतां खळनाथा ॥ दाखवावें मजलागीं ॥ २० ॥ असो हे रामावतारीं-
चें बोल ॥ वाल्मीक शब्दाब्धींचे सखोल ॥ त्वंन्नाम मंत्रोक्तिविण कवनफोल ॥ ह्मणोनि तवगुण अमोल सहस्र-
शीर्षा ॥ २१ ॥ तूं पूर्ण ब्रह्मचारी बद्रिविहारी ॥ द्वादशार्कमय कलावतारी ॥ द्वादशलिंगांकित आकारी ॥ रसच-
त्वारी संमते स्थापिलींसीं ॥ २२ ॥ ह्मणोनि तूं पूर्णब्रह्म चांगलाभला ॥ पूर्वार्चित आह्मांसी चांग लाभला ॥ या-
स्तव भक्त वदती चांगभला ॥ ज्योतिलिंगा दीनोद्धारी ॥ २३ ॥ गोष्पद करिसी मज हा भवार्णव ॥ काळक्रमणे
सीं संसारार्णव शेतव ॥ शरीर कृषकरावया सिद्धानुभव ॥ मजजन्म संभव नघडवीं ॥ २४॥ ऐसी गोमा वदेवाणी
॥ कांहो न बोलाचि खड्गपाणी ॥ स्वयें शुद्धशेत करावेंऐसें मनीं ॥ हेंचि बहुपरी मानसा गमतसे ॥ २५ ॥ स्वदेह
शुद्धकृषिकर्म ॥ करितां खंडे संसार दुष्कर्म ॥ सत्यबीज पेरिल्या स्वधर्म ॥ भवकर्दमीं त्या अलिप्तकरावें ॥ २६ ॥
स्वधर्मकृषा न करितां न नासे दुर्भिक्षा ॥ हें जाणसी सहस्रबाहु सहस्राक्षा ॥ तुजसारखा असोनि धनिक अधोक्षा
॥ मग आह्मीं कां भिक्षा मागावी ॥ २७ ॥ तूं दीनानाथ भक्तकैवारी ॥ पतितपावन दीनोद्धारी ॥ ऐसें वदतां रस
चत्वारीं ॥ ह्मणोनि पुष्पार्कवारीं भक्तयेती अपार ॥ २८ ॥ ऐकोनि गोमाचीवाणी ॥ नाथ ह्मणे शुद्धबीज पेरावें
मनीं ॥ संचित क्रियमाणाची करोनि लावणी ॥ कामक्रोध मदमत्सर झाडी तोडावी ॥ २९ ॥ आशातृष्णा कुंदा
हराळी ॥ खाणोनि करावी कृषिदेह निराळी ॥ दुर्व्यसनाची कापोनि तराळी ॥ षट्कर्मे त्रिकाळींचीं करावीं ॥ ३० ॥
ऐसीकृषि करोनि शुद्धबाळा ॥ त्यांत पेरींगा निर्मळ राळा ॥ सारांश दुर्व्यसनात्मक तराळा ॥ दुरी करोनि करावें
संसारशेत ॥ ३१ ॥ ऐकोनि निरंजनाची वाणी ॥ गोमाह्मणे ऐक खड्गपाणी ॥ तुजवांचोनि ऐसी न करवे करणी

॥ नवकीर्द लावणीची आह्मांते ॥ ३२ ॥ तूं आह्मांसीं होसील वांटेकरी ॥ तरीच ऐसें शेत करवेल हिमकेदारी ॥ आग्रह जाणोनि अनाथ कैवारी ॥ शेतकरी झाला खळनाथ ॥३३॥ गोमियाचा भाव बैल सोज्वळ ॥ धरोनि कृषि केली निर्मळ ॥ गोमिया हस्तें पेरिलें राळे ॥ जेवीं कनकरज झळकती ॥ ३४ ॥ गोमियाचें भाग्य गोमटें ॥ भक्ति प्रेमरसीं लविनलीं लोंबटें ॥ भजनमार्गीं घनथेंबुटें ॥ त्वरेनें आलीं पक्कदशे ॥ ३५ ॥ नवविध भजनाचें करोनि खळ ॥ धैर्यतिवडा रोवोनि सोज्वळ ॥ त्यांत घालोनि मळिले राळे ॥ जन्ममरण पातीं मन बैल फिरवोनियां ॥ ३६ ॥ अचाट पिकतां विचारोनि देवा केलीरासी ॥ तैं देव पातला गुप्तवेषीं ॥ धान्य घालींगा आह्मांसीं ॥ मग राळेरासी मोजावी ॥ ३७ ॥ गोमा ह्मणे अझूनि कोणी ॥ सेविली नसे घरिचियानीं ॥ तूं कैंचा पातलासी येक्षणीं ॥ जा परतोनि फिरोनयेईं॥३८॥ वांटेकरीयासी नेणतां ॥ कैसेंद्यावें धान्यआतां ॥ नाथह्मणे मजदिधल्या चित्ता ॥ संतोषेल वांटेकरी ॥ ३९ ॥ ह्मणे केवढा हा परमार्थी ॥ ऐसीयासींच ह्मणावें स्वार्थी ॥ मम वांटेकऱ्याचा अर्थार्थीं ॥ संबंधनसे तूं जाय परतोनियेईं ॥४०॥ ऐसें वदतां सावंत गोमा ॥ तैं नाथ ह्मणे शेत करावयाची झाली सीमा ॥ परतोनि पाहतां आधीं महिमा ॥ राळे रासीच देखिली ॥ ४१ ॥ हें नाथासीं सांगावया जात उतावळें ॥ कां खडेझाले सर्व राळे ॥ कोणती देवसकी चुकलीनकळे ॥ हे श्रीनाथमायबापासीं वदतसे ॥ ४२ ॥ श्रीनाथमम मायबापा ॥ चुकवीं संसार जन्मखेपा ॥ म्यांराळेरासी मोजितांमापा ॥ विपरित ऐसें न देखिलें ॥ ४३ ॥ खडेझाले सर्वराळे ॥ कष्टझाले माझेनिर्फळ ॥ तुजविण मनकामना सुफळ ॥ कवणकर्ता या जगीं ॥४४ ॥ ह्मणोनि विद्युत्पाताचे अलिकडे ॥ राळे रासीचे झाले खडे ॥ यास्तव राळे राशी नाम निवाडें ॥ प्राकृतबोलती कलियुगींजन ॥ ४५ ॥ विद्युत्पात नामें तोचि विजकडा ॥ उत्तरदिशे रत्नाद्रीं झाला झ


गडा ॥ तेथेंचि रक्तभोजाचा होतांरगडा ॥ राळे रास अद्यापी बोलती ॥ ४६ ॥ असो आतां नाथराया ॥ स्वस्थ न वाटे माझीया ल्हदया ॥ आतां धाडीं पायां पडावया ॥ मल्लिकार्जुनाच्या मजलागीं ॥ ४७ ॥ उद्विग्न झालें मम मानस ॥ माझिये जीवें घेतला त्रास ॥ प्राण होत कासावीस ॥ मल्लिकार्जुन दर्शनीं तीर्थ यात्रे ॥ ४८ ॥ ऐसा गोमा लडिवाळपणीं ॥ नाथासीं वदतां मृदुभाषणीं ॥ कां रे बा उदास होवोनी ॥ जाईन ह्मणसी मल्लिकार्जुना ॥ ४९ ॥ या रत्नागिरीवरी सर्व दैवत ॥ प्रत्यक्ष असती गा जागृत ॥ तूं कां जासी उदास चित्त तें मजप्रती सांगपां ॥ ५० ॥ त्रेतायुगाचा जो संकेत ॥ बोलिलों तें करीन सत्य ॥ मल्लिकार्जुनासीं जावया अगत्य ॥ यदर्थी कारण कांहींच असेना ॥ ५१ ॥ गोचिड असोनि गोस्तनीं ॥ त्यांसीं इच्छा नसे कां पय प्राशनीं ॥ कीं कल्पतरु असोनि अंगणीं ॥ भिक्षाटणीं इच्छा करितसे ॥ ५२ ॥ कीं कामधेनू असोनि घरीं ॥ तक्रासी फिरे दारोदारीं ॥ चिंतामणि अखंडित असोनि करीं ॥ चिंता करी मानवी जैसा ॥ ५३ ॥ लक्ष्मी नारायण पातला भेटी ॥ जाणोनि ऐसें ल्हदय संपुटीं ॥ दारालावोनि आडवी ताटी ॥ मग गिरिकपाटीं कां निघावें धनार्थीयें ॥ ५४ ॥ धरीं रे पूर्वजन्माची आठवण ॥ जन्मासीं आलों कोठील कोण ॥ संचित क्रियमाणाचें ठेवण ॥ जाणोनि नेणता कां होसी ॥ ॥ ५५ ॥ पितृ आज्ञेनें चित्रकूटासीं ॥ पातलों तंव तूं भेटलासी ॥ पार केलें नदीतीरासी ॥ नावेमाजी बैसवोनियां ॥ ५६ ॥ जेवीं दशरथ आह्मांसी जनक ॥ तैसा तूं मानिलासी गुहक ॥ तेव्हां वदलासी अतिकौतुक ॥ पुत्र भावें प्रतिपाळावें ॥ ५७ ॥ म्यां ही तूतें दिधलें वचन ॥ रत्नासुर वधांतीं तुजलागीं जनन ॥ झालिया पुत्रवत पालन ॥ मीं करीन हें त्रिवाचा ॥ ५८ ॥ माझी अखंड करोनि भक्ती ॥ सेवटीं पावसी उत्तमगती ॥ ऐसें वदतांचि

दक्षिणपती ॥ गोमासावंत वदतसे ॥ ५९ ॥ ह्मणे देवाधिदेवनाथा निरंजना ॥ जाईन मी मल्लिकार्जुन दर्शना ॥ श्रीशैल्य पाहावा ही वासना ॥ त्रेतायुगींची पुरवावी ॥ ६० ॥ श्रीशैल्य शिखरंदृष्ट्वा ॥ पुनर्जन्म न मानवा ॥ ह्मणोनि माझिया जीवींचा ठेवा ॥ पूर्वार्चितांचा असे तो पूर्णकरीं ॥ ६१ ॥ सावंतांचेया आग्रहासी ॥ जाणोनि वदे तयासी ॥ तुवां जावोनि बावड्यासी ॥ सामोग्री घेवोन येईजे ॥ ६२ ॥ सामोग्री घेवोनि वृषभ दोन्ही ॥ ठेविली पहिलीच सांगोनी ॥ ते तूं जाईजे घेवोनी ॥ मल्लिकार्जुनासीं आवडी ॥ ६३ ॥ ऐसी ऐकोनि सारवाणी ॥ गोमा पातला बावड्यासीं तत्क्षणीं ॥ कुणबी उपनाम उलफे ह्मणोनी ॥ तयाच्या घरीं गेला गोमा ॥ ६४ ॥ वृषभ गोण्या दोन भरोनी ॥ ठेविल्या त्या शीघ्र दर्शनीं ॥ दिधल्या गोम्यासी आणोनी ॥ येरु घेवोनि निघाला ॥ यात्रा समागमें प्रयाण ॥ करितां झाला अस्तमान ॥ रत्नागिरी भोंवतें करि भ्रमण ॥ षण्मासापर्यंत यात्रा समवेत ॥ ६६ ॥ कृष्णा भीमा संगमीं स्नान ॥ तुंगभद्रा निवृत्ति संगम स्थान ॥ घांटपामल प्रहरीचें अघमर्षण ॥ हयग्रीवा कृष्णा गुप्त जेथें झाली ॥ ६७ ॥ तेथेंचि पातली गंगानाम कृष्णा ॥ स्नानार्थी यांची हरे आशातृष्णा ॥ त्रिविध तापाचिये शितोष्णा ॥ हरले सर्व गोमियाचे ॥ ६८ ॥ ऐसा दुराग्रहीं पडोनि भ्रमा ॥ पुष्कर तीर्थी उतरला गोमा ॥ तीर्थ विधि करोनि उत्तमा ॥ व्याघ्रपाद ऋषितीर्थ वंदिलें ॥ ६९ ॥ सह्याद्रीच्या पृष्ठभागीं ॥ अरुणाचळ दक्षिणांगीं ॥ शेषाचळाचे मध्यगर्भी ॥ श्रीशैल्य मल्लिकार्जुन पूजिला ॥ ७० ॥ पुष्करतीर्था पासोनि शोभिवंत ॥ सिद्धेश्वराचे पर्यंत ॥ तोचि परळी वैजनाथ ॥ प्राकृत सिद्दयाची सुळकी बोलती ॥ ७१ ॥ सिद्दयाचे सुळकिचा अर्थ ॥ कानडे शब्दे करावा पंडित ॥ मुळ शब्द हा लटिकानप्रघात ॥ शेषाद्रिपर्वत नाथ वदतसे ॥

॥ ७२ ॥ असो सिद्धाश्रमीं ऐसियांत ॥ नाथें स्थापिला परळी वैजनाथ ॥ ऐसीं द्वादशलिंगें खळनाथें ॥ स्थापि-
लीं पंचविंशती अध्यायीं ॥ ७३ ॥ स्थापिलीं ज्योतिर्लिंगें बारा ॥ तीं निरोपिलीं संतमुनिवरां ॥ पंचविंशती अध्या
यीं अगस्तीची अमृतगिरा ॥ लोपामुद्रेसीं विस्तारें कथियेली ॥ ७४ ॥ ऐसें द्वादश ज्योतिर्लिंगार्चन ॥ सांगित-
लें गोमियासी विविधान ॥ सह्याद्रि हेंचि श्रीशैल्य गहन ॥ ऐसें भासलें गोमियातें ॥ ७५ ॥ असो गोमाकरितां
मल्लिकार्जुनाचीपूजा ॥ संकल्प सांगे दक्षिणराजा ॥ तीर्थमहिमा सांगोनि वोजा ॥ ब्रह्मचारीस्वरूपीं खळेश्वर ॥
॥ ७६ ॥ पादुका भ्रमरांबिका व्याघ्रपादतीर्थ ॥ ॥ पंचमुखी हनुमंत पाताळगंगागुप्त ॥ राजराजेश्वर कृष्ण अश्वत्थ
॥ यांसीं प्रदक्षिणेच्या रीति कथियेल्या ॥ ७७ ॥ यथाशक्ति करून ॥ नीळगंगेचें करोनि स्नान ॥ नीलांबरीचें घेई
दर्शन ॥ नाथ ह्मणे गा हेचिनिनाई ॥ ७८ ॥ ऐसी सांग झाली षण्मासयात्रा ॥ तंव निद्रा आली जयरामपुत्रा ॥
तें आकर्षिलें मायार्णव सूत्रा ॥ खड्गपात्र ज्यानीं करीं धारियेलें ॥ ७९ ॥ असो गोमासावंत पुष्कर तीर्थीं ॥ मल्लि-
कार्जुनाची यात्रा करोनि पुरती ॥ निद्राकरितां सुर्यास्तीं ॥ तें जागृत झाला लगबगें ॥ ८० ॥ रमेचा पुत्र गोमा
सावंत ॥ सूर्यास्तीं झाला जाग्रत ॥ तंव देखिला रत्नागिरिपर्वत ॥ हें दक्षिणद्वार पुढें विजयद्वार ॥ ८१ ॥ गोमा
ह्मणे आपुले मनीं ॥ स्वप्न पडलें तरी ह्मणावें ह्मणी ॥ जागृत झाला तंव वासरमणी ॥ अस्ताचळीं अद्यापी
दिसतसे ॥ ८२ लटकी पडली भ्रांतीमनीं ॥ षण्मास फिरविलें या मेदिनीं ॥ रत्नाद्री भोंवतें मज फिरवोनी ॥
भ्रमवोनि आणिलें यागोमुखतीर्थां ॥ ८३ ॥ केउते हय वृषभ गेले सुटोनी ॥ उतरली यात्रा नदिसे कोणी ॥ हें
जाणोनि अंतःकर्णीं ॥ आश्चर्य करित मानसीं ॥ ८४ ॥ ब्रह्मचारी हा ज्योतिस्वरूप ॥ पुजार्चनीं सांगितला शुद्ध

संकल्प ॥ खंडावया माझा विकल्प ॥ यास्तव मायाकृतसंकल्प दाविला ॥ ८५ ॥ गोम्या सावंत्यासाठीं जाण ॥ पूर्वींच स्थापिला मल्लिकार्जुन ॥ द्वादशलिंगांचें संस्थापन ॥ केलें तैसें न्यायथार्थ कथिलें असे ॥ ८६ ॥ असो आतां विचार सारा ॥ जावोनि पुसावें श्रीकेदारा ॥ ह्मणोनि पातला विजयद्वारा ॥ विजयश्वरासीं वंदिलें ॥ ८७ ॥ सव्य घालोन चर्पटांवा ॥ महादेव वंदिला चंद्रार्कबिंबा ॥ जे पाळितसे विश्वकुटुंबा ॥ ते अनादि जगदंबा वंदिली ॥ ॥ ८८ ॥ स्तवोनि अनादि भगवती ॥ त्यावरी वंदिला दक्षिणपती ॥ ह्मणे अनाथनाथा स्वयंज्योती ॥ परब्रह्ममूर्ति ब्रह्मचारिया ॥ ८९ ॥ ऐसें स्तवन नाथरायें ॥ परिसोनि गोमाकवळिला बाहें ॥ सायुज्यपदा देवोन निश्चयें ॥ सुखी ठेविला निजपदीं ॥ ९० ॥ ऐसे तारिले अनंतभक्त ॥ भूमंडळावरी प्रख्यात ॥ पुढील कथा सावचित्त ॥ संत श्रोतीं परिसावी ॥ ९१ ॥ इति केदार विजयध्वजीं ॥ संतचरित्र मंत्राक्षरांच्या बीजीं ॥ हरिनाम सुमतीच्या लेखन सहजीं ॥ करवी नाथ निरंजने शेषशायी ॥ ९२ ॥ कीं हा केदारविजय सिंधोदरी ॥ हरिनामांच्या पातल्या लहरी ॥ सुस्नात होतां विकल्प हरी ॥ तेतीसाध्यायार्थ गोडहा ॥ १९३ ॥ इति श्री केदारविजय भविष्योत्तर ॥ केदारखंड विरचितायां ॥ भक्त गोमाचरित्र श्रीशैल्य मल्लिकार्जुन दर्शन यात्रा वर्णननाम ॥ त्रयास्त्रिंशतीअध्याय गोडहा ॥ ३३ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीदक्षिणपतयेनमः ॥ जयजयाजी दक्षिणपती ॥ जयजयाजी श्रीआनंदमूर्ती ॥ जयजयाजी सच्चिदानंद सगुणाकृती ॥ जयश्रीहरिनारायणा गुरुनाथा ॥ १ ॥ जयजया कनकाद्रि विहारा ॥ जयजया ज्योतिसौदागरा ॥ जयखड्गपात्र त्रिशूलधरा ॥ जयकारका करुणानिधी ॥ २ ॥ अगमनिगमाक्षर स्वर व्यंजना ॥ अनंत स्वरूपा नाथनिरंजना ॥ अतींद्रिय योगीमानस मनरंजना ॥ रक्तभोज भंजना करुणार्णवा ॥ ३ ॥ द्वैत रजनीचर दुष्कृत दहना ॥ देदिप्यमान चंडांशुकीरणा ॥ द्वैत व्यतिरिक्त भाषणा ॥ देवार्चिता त्रिगुणावतारा ॥४॥ दीनानाथा प्रताप दिनकरा ॥ दिव्यमंडित कपोलमंडित नवकेशरा ॥ दीर्घ स्थूल सूक्ष्म रूपा दिगंबरा ॥ दिव्य रत्नांकित सिंहासनीं शोभलासी ॥ ५ ॥ ऐसा त्रिविक्रम त्रिगुणावतारी ॥ भक्तजनांचा परम कैवारी ॥ सभक्त तारिले भवसागरीं ॥ अनंतयुगामाजीं बाहत्तर प्रमाण ॥ ६ ॥ श्रीमत्केदारविजयाधिकारी ॥ पस्तीस अध्यायांचा प्रचंडगिरी ॥ हरिनामकीर्ति ध्वज उभारी ॥ चिद्रत्नाचळीं भरतखंडाग्रीं ॥ ७ ॥ कीं पस्तीसाध्यायांतरीं सप्तद्विप प्रकाश ॥ जाहला सातापांचा पस्तीस ॥ ह्मणोनि श्रीनाथें छत्तिस ॥ केदार विजय होय विरचिता ॥ ८ ॥ कृतायुगादि युगचत्वारीं ॥ भक्त तारिले भवसागरीं ॥ शुक सनकादिक व्यासकरीं ॥ अपार भक्त तारिले ॥ ९ ॥ देवाधीदेव त्रैलोक्यनाथ ॥ रत्नागिरिवरी राज्यकरित ॥ पाहोनि सद्भक्त प्रेम भारित ॥ पूर्ण मनोरथ करिसी भक्तांचा ॥ १० ॥ असो पूर्वाध्यायीं सिंहावलोकन ॥ करोनि आवरावें सावधान ॥ धीटपाट वरदी कवींद्रगण ॥ कथानुसंधान परिसावें ॥ ११ ॥ हस्तचरणा विरहित जोउपजला ॥ वरवंट्या सारिखा ऐसा झाला ॥ त्यासीं दिव्यदेह आकारिला ॥ कुमर आपुला ह्मणोनियां ॥ १२ ॥ तो जयराम सावंताचाकुमर ॥ करवीराचा देशमूख प्रवर ॥ तयाचा गोमा-


अध्याय ३४वा.
निशिगंध
राक्षस
श्रीनाथ
ना-स्त्री-
नाकजी पाटील.
श्रीनाथ
म्हैस.

सावंत पुत्र ॥ प्रियपात्र श्रीनाथाचा तो होय ॥ १३ ॥ श्रीनिवास बावडेकर ॥ उलफे उपनाम प्रियकर ॥ तयासी सांगोनि केदार ॥ उलपा दिधला दोन गोण्या ॥ १४ ॥ तो घेवोनि सावंत गोमा ॥ मल्लिकार्जुनासीं जातसे संभ्रमा ॥ नाथें घालोनि तयासीं भ्रमा ॥ रत्नाद्रीभोंवता षण्मास फिरविला ॥ १५ ॥ तयाच्या फेडावया संदेहा ॥ दाविला प्रगटार्थ मल्लिकार्जुन देहा ॥ स्थापिला त्याच्या कथान्वया ॥ संतीं विस्तारें परिसिलें ॥ १६ ॥ हें कथामृत तेतीसाध्यायीं ॥ संतीं सेविलें केदारविजयीं ॥ पुढिल भक्त चरितान्वयीं ॥ श्रोतीं सादर असावें ॥ १७ ॥ अग्निपुराणींचे श्लोक ॥ रत्नासुर प्रपौत्रस्य निसिगंध महासुरान् ॥ चत्वारिदिन पर्यंतं नाथ निशिगंध समायुधं ॥ १ चंद्रसेनानुजं गेहे गत्वा पुष्करवरांगना ॥ गर्भिणी प्रसूत काल प्राप्तं निशिगंधजनं भवेत् ॥ २ ॥ टीका ॥ सुतह्मणे हे शौनकमुनी ॥ भुललों श्रीनाथाचे कथाश्रवणीं ॥ विसर पडला माझिये मनीं ॥ कथा पुराणींची रसिक परिसें ॥ १८ ॥ पुष्करराक्षस महाक्रूर ॥ काळभैरवें वधितांचि वृषभाकार ॥ जाहला ह्मणोनि गोमुख आकार ॥ तेंचि पुष्करतीर्थ जाणावें ॥ १९ ॥ तो पुष्कर रत्नासुराचा कुमर ॥ त्याची कांता झाली गरोदर ॥ रत्नासुरवधांतीं माहेर ॥ करावया ठेविली श्वशुरें ॥ २० ॥ पूर्वींच महिषासुरानें भविष्यवाणी ॥ जाणोनि रत्नासुराची स्नुषा गर्भिणी ॥ पुत्र होईल ब्रह्मज्ञानी ॥ खड्गपाणी वशकरील ॥ २१ ॥ हें जाणोनि अमृतगिरा ॥ स्नुषा धाडिली माहेरा ॥ ते पावली एकाक्षनगरा ॥ रत्नासुर वधोत्सवा पूर्वीं ॥ २२ ॥ चंद्ररेखा लावण्यरासी ॥ प्रसूत झाली पूर्णमासीं ॥ पुत्र झाला प्रतापरासी ॥ निशिगंध नामासीं ठेविलें ॥ २३ ॥ ईश्वरभक्त निशिगंधू ॥ महापराक्रमी प्रतापसिंधू ॥ चंद्ररेखांवरींचा उगवलाइंदू ॥ षोडशकीरणीं साजिरा ॥ २४ ॥ चंद्ररेखीचा निशिगंध कुमर ॥ दिवसें दिवस झा

ला थोर ॥ जैसा प्रतिपदे पासोनि निशाकर ॥ तैसा द्वादश संवत्सरांचा जाहला ॥२५॥ दायादिक आप्तजन वदती वाणी ॥ तव द्वय पितृव्य वधोनी ॥ राज्य घेऊनि साम्राज्यपटीं खड्गपाणी ॥ बैसेना उभाअसे रत्नागिरीं ॥ २६ ॥ सुत ह्मणे हे शौनकमुनी ॥ श्रीनाथ उभा कां सिंहासनी ॥ उभा रहावया क्रमण चरणी ॥ कवणाचा मार्ग लक्षित उभा असे ॥ २७ ॥ परिसोनि शौनकाच्या अमृतोत्तरा ॥ सूत हर्षें करोनि निजांतरा ॥ वदत तैसेंचि परमचतुरा ॥ लोपामुद्रेसीं अगस्ती ॥ २८ ॥ महाभक्त निशिगंध समर्थ ॥ आतां येईल ह्मणोनि दीनानाथ ॥ उभा राहिला प्रेमभरित ॥ क्रमणपद कमलें पूर्व दक्षिणे ॥ २९ ॥ कल्पांत भैरव नाथरावो ॥ रणीं मागें न ठेवीच पावो ॥ दैत्य राक्षसां युद्धाचा अभिप्रावो ॥ असा यावयाचा भाव सुचविला ॥ ३० ॥ दक्षिण दिग्वधू महालक्ष्मी ॥ असुरीं हिरोनि नेली संग्रामीं ॥ ह्मणोनि खड्गडमरु धरोनि करपद्मीं ॥ क्रमणपद्मीं उभाअसे यासाठीं ॥ ३१ ॥ कीं भक्त आलिया घ्यावया भेटी ॥ सद्भक्त क्षुधार्थी तोषवावया साठीं ॥ प्रेमें उभा राहिला जगजेटी ॥ वामहस्तीं अमृतवाटी घेतली ॥ ३२ ॥ कीं समुद्र मंथन करोनि बळसमर्थ ॥ चतुर्दश रत्नामाजीं जें अमृत ॥ वांटिलें त्याचा हा संकेत ॥ दावितसे या त्रिजगासीं ॥ ३३ ॥ ह्मणोनि त्रैलोक्य नाथ संपुटीं ॥ वामहस्तीं धरोनि अमृतवाटी ॥ वांटिलें सरां असुरां दीर्घ दृष्टीं ॥ विकल्प सिंहिकासुतासीं वधोनियां ॥ ३४ ॥ विकल्पस्वरूपा सिंहिका कुमरा ॥ संहारिलें सुदर्शन खड्गधारा ॥ द्विजेंद्रतोचि तुरंगम विहारा ॥ ह्मणोनि मंदवासरीं अद्यापि ॥ ३५ ॥ कीं अभेद भक्तांचिये साठीं ॥ उभा असे रत्नाद्रीचे त्रिपुटीं ॥ हें जाणोनि विचित्ररंगी निशाणकाठी ॥ महाजन दुंदुभी बोंभाटीं चैत्रमासीं ॥ ३६ ॥ ऐसा राजा हिमकेदारी ॥ राज्य करितसे रत्नागिरिवरी ॥ ऐसें वदतां आत्मजन नरीं ॥ धिःकारोनि

तपश्चर्येसीं आचरला ॥ ३७ ॥ निरोदकी निराहारी ॥ द्वादशाब्धि पवन आहारी ॥ नित्यस्नान खदिरांगारीं ॥ शि वार्चनारंभीं करितसे ॥ ३८ ॥ करोनि नित्य अग्निस्नान ॥ सद्भक्ती करीत शिवार्चन ॥ निष्कामबुद्धि मनासीं करो ॥ श्रीशिवपूजन करितसे ॥ ३९ ॥ ऐसें पाहोनि सदाशिव ॥ प्रसन्न होवूं आला यास्तव ॥ वर माग ह्मणतांचि देवाधिदेव ॥ निशिगंध भावें वदतसे ॥ ४० ॥ काया कुरवंडी करोनियां ॥ ओंवाळोनि सांडिजे तुजव रोनियां ॥ ऐसी वासना असे ह्वदया ॥ ते त्वां सिद्धीनेली पाहिजे ॥ ४१ ॥ तव चरणारविंदीं चित्तसुमन ॥ अखं डित असावें खंडोनि द्वैतपण ॥ सदैव तुझी सेवा घडावी अवंचकपण ॥ ऐसें वरदान मजलागीं देई ॥ ४२ ॥ ऐकोनि निशिगंधाचें वचन ॥ हर्षें वदे अपर्णारमण ॥ भलारे भला तूं अगर्वितपण ॥ असुर योनींत एक सुरत- रू ॥ ४३ ॥ नाहीं राक्षस तमाची गरिमा ॥ पितृद्वेष न धरिलासी आह्मां ॥ परी तुवां करोनि घोर संग्रामा ॥ मु क्ति घ्यावी श्रीनाथहस्तें ॥ ४४ ॥ भक्ति प्रेम मनोरथाची सेना ॥ समरीं तोषवावें नाथनिरंजना ॥ ऐसी तुझिया विधिलेखना ॥ असे निशिगंधा जीवलगा ॥ ४५ ॥ विमलाबुज करोद्भवींचा जोशर ॥ जो पौगंडऋषीचा कुमर ॥ जयासीं नाम असे रवळेश्वर ॥ तो तुज मुक्ति देणार रत्नागिरिवरी ॥ ४६ ॥ ऐसी परिसोन शिववरदवाणी ॥ नि शिगंध निघाला तत्क्षणी ॥ द्वादशवर्षा नंतर पितृदर्शनीं ॥ परम संतोषें पातला ॥ ४७ ॥ नवविध भजनाचिये रथीं ॥ त्यांत बैसोनि निशिगंध महारथी ॥ घेवोनि सेना चतुर्विधमुक्ती ॥ अभेद भजन संग्राम इच्छोन आला ॥ ॥ ४८ ॥ ऐसा निशिगंध पातला घन गर्जन ॥ हें जाणोनि नाथ निरंजन ॥ युद्धासीं खवळला करुणाघन ॥ श्री नाथ निशिगंध युद्ध करिल ॥ ४९ ॥ निशिगंधें नवरस भजनान्वया ॥ हातीं रहणीं कार्मुकीं प्रेमशर लावोनियां ॥ आक-

षोंनि वोढिले श्रवणालया ॥ कीर्तन श्रवणालया पर्यंत ॥ ५० ॥ खङ्गशूळ परिघ तोमर ॥ पर्वत पन्नगास्त्र वातवै-श्वान्नर ॥ भजनास्त्र सोडितां निशिगंध असुर ॥ निवारिलीं तीं सर्वजाळीं ॥ ५१ ॥ निशिगंधाचें अचळसुकृत ॥ ह्मणोनि नाथासवें प्रेमभरित ॥ युद्ध केलें चत्वारी दिनपर्यंत ॥ तें सीमा उल्लंघनाचे समयीं ॥ ५२ ॥ नवविध भजन मार्गींचीं चक्रासनें ॥ सर्व घेवोनि निशिगंधानें ॥ अनुहात इच्छाशक्तीसीं त्रिलोचनें ॥ घेवोनि निजठाणें बैसविलें ॥ ५३ ॥ भ्रुवोर्मध्य अग्नीचक्रासनीं ॥ गोलाटी उलटामार्ग रोधोनी ॥ सहस्र दळाचिये कीरणीं ॥ स्वेत पीत नीळवर्णीं देखिला ॥ ५४ ॥ ऐसा नवरस संग्राम प्रेमभर ॥ तीव्र तपाचरणाचार शरांगार ॥ श्रमी केला सौदागरें ॥ हरिचंदानागर मघसघी ॥ ५५ ॥ असो सप्तमी पासोनि विजयादशमी ॥ श्रीनाथ युद्धासीं झाला श्रमीं ॥ हें चोपडाईनें देखोनि वाङ्नेमी ॥ श्रीनाथासीं हस्त संकेत दाखवी ५६ ॥ नागवल्लीदळ धरोनि हातीं ॥ चिरोनि सव्य अपसव्य टाकिलें क्षिती ॥ हें लक्षोनि खळनाथें चित्तीं ॥ शिव-वरदोक्तीतीं समजला ॥ ५७ ॥ असो निशिगंध धरोनि हयचरणीं ॥ सहस्र फेरे स्वदेहा भोंवता फिरवोनी ॥ चिरोनि टाकिला देहुडे धरणी ॥ सव्य अपसव्य दोहींकडे ॥ ५८ ॥ विजयद्वारीं वधिला निशिगंधासुर ॥ विजयी झाला खळेश्वर ॥ देव वर्षती पुष्पसंभार ॥ मंगळारतीसीं ओंवाळिती ॥ ५९ ॥ ते दिवशींच घोडाहारिला यमघंट तस्करें ॥ तो वधिला खळेश्वरें ॥ तो षड्विशंतीं माजी विस्तारें ॥ कथिलाअसे संपूर्ण जाणतसा ॥ ६० ॥ असो निशिगंध ऐसियापरी ॥ नाथें वधिला विजयद्वारीं ॥ ह्मणोनि मंगळारती करिती सुर नर नारी ॥ पुष्पें चिरोनि टाकिती देहुडीं ॥ ६१ ॥ ह्मणोनि निशिगंधाचें सुमन ॥ चिरोनि टाकिती सव्यसाची करोन ॥ हें युगायुगीं पाहती कलियुगींजन ॥ अद्यापी लक्षिती पंडितहो ६२॥

हे संज्ञा पुण्यश्लोकीं भविष्योत्तर ॥ वदला श्रीव्यास मुनिवर ॥ पुष्करपुत्र निशिगंध सुमनाकार ॥ नाथ वरार्चनानें झाला चक्रवर्ती ॥ ६३ ॥ ऐसा तो रत्नासुराचा पौत्र ॥ निशिगंध सुमन झाला पवित्र ॥ धन्य निशिगंधाचें जन्मपत्र ॥ श्रीनाथ पद्मपात्र जाहला ॥ ६४ ॥ ऐसे अभेद भक्त थोर ॥ तारी हा हिमकेदार ॥ भक्ति पाहोनि परम उदार ॥ धनसंपत्ति संतती देतसे ॥ ६५ ॥ कऱ्हाडकाच्या देशांतरीं ॥ कृष्णा ककुत्पत्तीचे उत्तरतीरीं ॥ प्रसिद्ध किवळनाम नगरी ॥ साळुखे निर्धारीं उपनाम ॥ ६६ ॥ तेथील पाटिलकीचें वतन ॥ नावजी साळुखे याचें असे जाण ॥ साळोखे पडिलें नामभिन्न ॥ ससे ऐसें असे पूर्वीचें ॥६७॥ दायादबंधु किवळ नगरीं ॥ सुखी नांदती सहपरिवारीं ॥ धनधान्य गोवृषभ खिल्लारी ॥ सर्व असती आनंद भरित ॥ ६८ ॥ त्यामाजी कांहीं उत्तम दिवस ॥ कुटुंबीं नावजी नांदे संतोष ॥ तो विषम काळाचें सौरस ॥ कष्टविशेष भोगिती ॥ ६९ ॥ केदाराचा परम भक्त ॥ नावजी ससा असे विरक्त ॥ किवळाहून नित्य येत ॥ रत्नागिरिसीं अणवाणी ॥ ७० ॥ चरण संपुष्टा विरहिता ॥ नावजी येत रत्नाद्रिपर्वता ॥ अमलचित्तीं रवळनाथा ॥ नित्य पूजोनि येघरासीं ॥ ७१ ॥ द्वादशाब्धिड्य करितां सेवा ॥ परी न उघडे संचित क्रियमाण ठेवा ॥ हें जाणवतां देवाधिदेवा ॥ करोनि पूर्णपणें अवलोकी ॥ ७२ ॥ अष्टादश धान्यातूनि एक ॥ गृहांत नाहींच निष्टंक ॥ अष्टमी शिवरात्र एकादशी व्रतादिक ॥ एकत्र घडती अखंडित ॥ ७३ ॥ जेव्हां श्रीनाथ देईल अन्नें ॥ कुटुंबेसीं सेवी समाधानें ॥ निजध्यास लागला अखंडित मनें ॥ श्रीनाथ निरंजन चरणाचा ॥ ७४ ॥ अरुणोदयीं करोनि स्नान ॥ पत्र पुष्प फल जीवन ॥ यथाशक्ति मिलितोपचारेण ॥ रत्नागिरिसीं येवोनि पूजा करी ॥ ७५ ॥ पूजोनि ज्योतिसौदागरा ॥ संध्याकाळीं जातसे

६१

घरा ॥ तैं नावजी सशाची जे कां दारा ॥ मार्ग लक्षित बैसतसे ॥ ७६ ॥ नावजीचे चौघे कुमर ॥ पितृभक्ती-
सीं परम सादर ॥ धुंडोनि सकळ कांतार ॥ तृण धान्य घेवोनि घरासीं येती ॥ ७७ ॥ औदुंबराची पक्व उंबरें ॥
करवंदे जांबळादिक ठेवरें ॥ कोंवळीं अथवा असोनि निबरें ॥ चौघेही कुमर आणिती ॥ ७८ ॥ वरवडे आणि
पांढर फळी ॥ मेळवोनि आणिती निशाकाळीं ॥ तृण धान्यादि आणोनि सकळीं ॥ स्वयंपाक करावया लागीं सा-
क्षेपें ॥ ७९ ॥ अनेक रीतिची रानभाजी ॥ पक्व करिती अलवण जी ॥ आवडी कुटुंबीं नावजी ॥ सेवोन काळक्र-
मितसे ॥ ८० ॥ किवळाहून रत्नागिरीला ॥ नित्य येतसे नाथासीं पूजावयाला ॥ संध्याकाळीं जातसे स्वगृहा-
ला ॥ संतोष भरित अखंडित ॥ ८१ ॥ गृहीं असे एक वांझ ह्मैसी ॥ ती भाड्यानें दिधली असे लोकांसीं ॥ ती-
चे धान्य वेतन षण्मासासीं ॥ धान्य एकमण आणोनि द्यावें ॥८२॥ त्याचा सणावारीं करोनि पाक ॥ कुटुंबेसी सेवी
ती सकळिक ॥ ऐसा कठिण काळ कंठिती देख ॥ परम सुखासीं कल्पोनी ॥ ८३ ॥ ऐसी लोटलीं द्वय द्वादशवर्षें
॥ अखंडित असे चित्तीं संतोषें ॥ त्हृदयांतरीं दक्षिणाधीशा शाविशेषें ॥ नविसंबेचि सर्वथा ॥८४॥ प्रयासीं अथवा अप्र-
यासीं ॥ अरण्यधान्य मेळवोनि भोजनासीं ॥ करितसे नावजी कुटुंबेसीं ॥ समाधानें आवडी ॥ ८५ ॥ असो ऐ-
से कांहीं दिवस ॥ लोटल्या नंतर मनोल्हास ॥ निघाला पूजनार्थी विशेष ॥ दक्षिणाधीशासीं आदरें ॥ ८६ ॥
येवोनि वंदिलें श्रीरवळनाथा ॥ क्रमण चरणीं ठेवोनि माथा ॥ ह्मणे कृपाळुवा बळसमर्था ॥ अनाथासीं सनाथ क
रावें ॥ ८७ ॥ एके दिवशीं एवोनि घरा ॥ अवलोकावें कुमरीकुमरा ॥ भाजीभाकरी जेवावी उदारा ॥
स्वकांतेनें उत्तम केली असे ॥ ८८ ॥ शुद्ध स्वयंपाक केला स्वकांतेनें ॥ तो तुह्मीं सेवावा हें इच्छिलें मनें ॥ ती इच्छा

पुरवींगा तूं आनंदानें ॥ परंतु यावया कृपण कां होसी ॥ ८९ ॥ ऐकोनि नावाजीची वाणी ॥ उत्तर वदे खड्गपाणी ॥ तूं भेटतोसीं प्रतिदिनीं ॥ ग्रहासी यावें कींनिमित्य ॥ ९० ॥ येतां श्रमतोसीं तूं अणवाणी ॥ ह्मणोनि तुवांचि न यावें प्रतिदिनीं ॥ मी तुझिया ह्रदय भुवनीं ॥ अखंडित वसतसें ॥९१॥ तुझिया कांतिच्या दर्शना ॥ रिक्त कैसें यावें सुजाणा ॥ यास्तव नावजी सखया निधाना ॥ यावयाचा अनमान असे ॥ ९२ ॥ आह्मीं निस्प्रह ब्रह्मचारी ॥ दिगंबर जोगी जटाधारी ॥ धन नसे आमुचे पदरीं ॥ हें तुजलागीं विदित असे ॥ ९३ ॥ तुझिया घरींचे कष्ट काळ ॥ परस्परें ऐकिले म्यां सकळ ॥ जेव्हां तुझा सरेल विषमकाळ ॥ तेव्हां दया करील भगवान ॥ ९४ ॥ तव कष्टकाळ ऐकोनि भारी ॥ मीं विकळ झालों बहु अंतरीं ॥ तुझ्या संसाराचें वोझें शिरीं ॥ मीं दिवारात्रीं वाहतसें ॥ ९५ ॥ परी माझा यत्न नसेचि सखया ॥ जेव्हां भगवान करील दया ॥ तेव्हांचि तुझें भाग्य येईल उदया ॥ बोलोनि वांया काय येरवीं ॥ ९६ ॥ पिशाच्च आणि बालोन्मत्त ॥ अफिमी भंगड कैफी अवधूत ॥ यांची करितां संगत ॥ कुटुंब घात होवूं पाहें ॥ ९७ ॥ आमुची केली जैं पासोनि संगती ॥ तैं पासोनि श्रम झाले हें जन बोलती ॥ हेंही ऐकोनि मजला खंती ॥ वाटती गा जीवलगा ॥ ९८ ॥ तुझी कांता भागीरथी ॥ अखंड कष्टावी अहो राती ॥ हें तों नसेचि माझें चित्तीं ॥ परी यदर्थीं यत्न कांहीं चालेना ॥ ९९ ॥ तूं ह्मणसी आह्मांसी राज योगी ॥ सायोज्य सांम्राज्य निमित्य भोगी ॥ परी विषयीं असे मीं विरागी ॥ सर्व संग परित्यागी त्यासी मी अंकित ॥ १०० ॥ या रत्नागिरीचा मी राज्याधिकारी ॥ ऐसें येत असेल तव अंतरीं ॥ मी उभा असे रत्नसिंहासनावरी ॥ अशाश्वत पद हें ह्मणोनि येथें न बैसें ॥ १ ॥ जेवीं कमळ नातळे जळातें ॥ तैसें या रत्नाद्रीं

सरोवर क्रमणपद कमळातें ॥ ठेवोनि मी उभाअसे दुष्टखळातें ॥ वधावयाशस्त्र घेवोनि दक्षिण करीं ॥ २ ॥
ह्मणोनि खड्ग घेवोनि दक्षिणकरीं ॥ दुष्टमारोनि भक्तांचें रक्षणकरी ॥ रत्नासुरादिक म्यां तीक्ष्णकरीं ॥ स्वशक्ति प्र
हारीं वधविले ॥ ३ ॥ जरी आमुचे गांठीं असतें धन ॥ तरी कां खातों भाजीचें पान ॥ कण्या भक्षोनि कंठी हा
काळ काठिण ॥ शबरीफळें का भक्षितों ॥ ४ ॥ कासया कांखेसीं घालोनि झोळी ॥ भिक्षार्थीं हिंडतसें या भूमंड-
ळीं ॥ काढितसें उच्छिष्ट पत्रावळी ॥ हें पोट जाळितसें तरी न भरे ॥ ५ ॥ निचाहून निच चाकरी ॥ केली सम-
रीं चरवे दारी ॥ तुरंगम जुंपोनि तीव्र रहंवरीं ॥ परिहारोनि तयांच्या श्रमातें ॥ ६ ॥ ऐशा अनेक सेवा यदर्थ
॥ करोनि तोषविला नर पार्थ यथार्थ॥ परी माझ्या परिणामाचा ठेवा॥ कोणीही हातीं नधरीच ॥ ७ ॥ ऐसी माझी
माया नावजी ॥ कवणातें ही न करित वाजी ॥ काय सांगु सखया नावजी ॥ हें विश्व अभावीं सर्व सुजाण ॥
॥ ८ ॥ असो जरी आह्मीं असावें घरभारी ॥ तरी तव कुटुंब ठेवितों मासचारी ॥ परी संसारिकाचे शेजारीं ॥
अलिप्तपणें ब्रह्मचारियें असावें ॥ ९ ॥ समर्थाचि करितां सेवा ॥ तरी तो देता विषय धनाचा ठेवा ॥ परी तुम-
च्या पूर्वार्चिताचा ठेवा ॥ कैसा असेतो भगवान जाणें ॥ १० ॥ असो दिगंबराची संगती ॥ केलिया प्राप्त होय मात्र
विभुती ॥ यालागीं कुटुंबी जे जन असती ॥ सावधवृत्ति करोनि असावें ॥ ११ ॥ तुमच्या हरावे संसार श्रमा ॥
तरीच यावें तव आश्रमा ॥ ह्मणोनि माझीये ह्रदयीं संशय भ्रमा ॥ विषय कर्दमासीं अलिप्तमीं ॥ १२ ॥ कैंचा
देव कैंचा धर्म ॥ सुखें करावें सोहं संसार कर्म ॥ हें तुजलागीं मीं सांगतां वर्म ॥ परी विषय दुर्गम विकारीया॥
॥ १३ ॥ असो आतां नावजी सुजाणा ॥ कृषी नास्ती दुर्भिक्ष असे निधाना ॥ बरें एखादेदिवशीं तुझिया सद-

ना ॥ येणें घडेल भगवत्कृपे ॥ १४ ॥ आतां तुह्मीं जावें आपुलिया घरा ॥ सुचिर्भूत असावें अंतरा ॥ हें परिसोनि संतुष्टांतरा ॥ किवळग्रामीं नावजी पातला ॥ १५ ॥ नावजी गेलिया किवळनगरीं ॥ श्रीनाथ चित्तीं विचारकरी ॥ फार कष्टला निजांतरीं ॥ चत्वारी विंशती संवत्सरपर्यंत ॥ १६ ॥ कुटुंबेसीं अनन्य शरण ॥ नावाजी आला मजलागीं जाण ॥ त्याचे कष्टकाळ जैं न हरणें ॥ तैं मातें देव कवणें ह्मणावें ॥ १७ ॥ ऐसें कल्पोनि निजांतरीं ॥ नाथ निघाला मंद्वासरीं ॥ भस्मांकित हयवाहन जटाधारी ॥ त्रिशुल डमर पात्र करीं शोभलें ॥ १८ ॥ गेला किवळ नगराप्रती ॥ अलख निरंजन दक्षिणपती ॥ नगर प्रवेशला दिगंबराकृती ॥ तुरंगम बांधोनि मळ्यांत ॥ १९ ॥ नावजी सशाचिये घरा ॥ कोणी कडोन जावें सत्वरा ॥ ह्मणोनि श्रीनाथ नारीनरा ॥ पुसतसे आवडी ॥ २० ॥ तों नावजीचा दायादबंधू ॥ काळोनाम कुमति कंदू ॥ स्वगृहांगणीं उभा तंव अनाथबंधू ॥ देखोनि लोकरीति वदतसे तयाला ॥ २१ ॥ ह्मणे कवण देशिया दिगंबरा ॥ पातलासीं कवणाच्या मंदिरा ॥ श्रीनाथ ह्मणे नावजी पाटील श्रेष्ठ त्याच्या घरा ॥ जाणें असे आह्मां लागीं ॥ २२ ॥ तैं काळोजीससा ह्मणे हांसोनि ॥ नावाजीस काय करिसी घेवोनी ॥ बैसका टाकोनि कनकासनीं ॥ कां इच्छिसीं कलंदर आसना ॥ २३ ॥ नावजीचें घेतांचि दर्शन ॥ तात्काळ ते दिवशीं घडे उपोषण ॥ मत्कुण पिसवासी नाहीं पारणें ॥ तेथें जेवण कैंचें तयाघरीं ॥ २४ ॥ बरवड्याची भाकरभाजी ॥ तयासीं मिळतां बहुत होयराजी ॥ तूं पातलासी तयामाजीं ॥ परी नमिळे कांजी तुजलागीं ॥ २५ ॥ नेसावयासी नाहीं वसना ॥ तेथें कैंचें तेलमाखणा ॥ दीपा विरहित स्मशाना ॥ सारखें दिसतसे मंदीर ॥ २६ ॥ तूं राजयोगी ब्रह्मचारी ॥ तो तंव नावजी भिकारी ॥ तेथें नमिळे सिळी भाकरी ॥

द्वादशवर्षें राहतां तुह्मीं ॥ २७ ॥ आमुच्या मंदिरा चालवेगीं ॥ अचळ राजोपचार भोगीं ॥ निरापेक्षी तूं विरागी ॥ आजी यावें आमुचें गृहासीं ॥ २८ ॥ काळोजीचें ऐकोनि उत्तर ॥ तयासीं ह्मणे खळेश्वर ॥ केदारभजनीं तो तत्पर ॥ नावजी मित्रतो परम भक्त आमुचा ॥ २९ ॥ तयासाठींच पातलों येथें ॥ नाहीं तरी कारण कांहीं नव्हतें ॥ साळोख्याचें कुळदेवत ॥ श्रीकेदारलिंग रत्नागिरीचा ॥ ३० ॥ भागीरथी तयाची भार्या ॥ ज्येष्ठस्नुषा गोदावर्या ॥ तयाचे गृहस्थितीची चर्या ॥ दुर्लभ असे त्रैलोकीं ॥ ३१ ॥ तयाचा भाव न कळे तुह्मां ॥ व्यर्थ लिंपला विषय कर्दमा ॥ दायादयोगें अहंभ्रमा ॥ स्वपर भावना विकल्पान्वयी ॥ ३२ ॥ ऐसें वदोनि हिमकेदारी ॥ पातला नावजीचे द्वारीं ॥ अलख जगावत खावतारी ॥ ॐ कार बिजीं गर्जिन्नला ॥ ३३ ॥ गृहीं नसतां गृहस्वामी ॥ नाथ पातला प्रथमाश्रमीं ॥ तें भागीरथीनें संकीरण आश्रमीं ॥ डमर नादासीं परिसिलें ॥ ३४ ॥ अलख शब्द ऐकोनि श्रवणीं ॥ बाहेर पातली नावजी रमणी ॥ मस्तक ठेवोनि श्रीनाथ चरणीं ॥ अमल जीवनीं चरण प्रक्षाळिले ॥ ३५ ॥ बैसवोनि जीर्ण कंबळासनीं ॥ पूजिला पत्रपुष्प फळ जीवनीं ॥ ३६ ॥ स्वस्थ बैसोनि कंबळासनीं ॥ नाथ निरंजन वदे वाणी ॥ ह्मणे नावाजी कोठें गेला अझोनी ॥ नयेचिकां सदनासीं लौकरी ॥ ३७ ॥ ऐसें वदतां दक्षिणपती ॥ उत्तर वदे भागीरथी ॥ ह्मणे स्वामीयां देहाचा गृहपती ॥ करहाटकास गेला असे बाजारा ॥ ३८ ॥ ते येतील अस्तमानीं ॥ ऐसी ऐकोनि सुरसवाणी ॥ ह्मणे उत्तम शुभ कल्याणी ॥ क्षुधा लागली मजलागीं ॥ ३९ ॥ करोनि सर्व स्वयंपाक ॥ अपक्व पक्वीं सर्व शाक ॥ मातें समर्पितां सुखदायक ॥ सर्वश्रम माझे परिहरती ॥ ४० ॥ ऐसें ह्मणतां दक्षिणाधीश ॥ भागीरथी ह्मणे बहु अवस्य ॥ चित्तीं स्मरोनि श्रीखळेश ॥ ह्मणे विशेष नलगे सांगणें कांहीं ॥ ४१ ॥ हें परिसोनि गृहदेवारीं ॥ येवोनि

प्रार्थी विनयोत्तरीं ॥ धांव पाव हिमकेदारी ॥ तूं सर्वांतरीं व्यापक ॥ ४२ ॥ तुझे रत्नागिरीचा हादिगंवर ॥ क्षुधार्थी होवोनि पातला फार ॥ गृहीं धान्याचा विचार ॥ सर्व तुजला ठाऊक असे ॥ ४३ ॥ ऐसें विनवोनि देव्हारियाच्या केदारा ॥ बाहेर पातली नावजीची दारा ॥ धांव पाव येसमयीं उदारा ॥ सौदागरा येसंकटीं ॥ ४४ ॥ जेष्ठपुत्राची कांता गोदावरी ॥ उसणें आणावया धाडिले नगरीं ॥ ते हिंडोनि पातली आपुल्या घरीं ॥ श्वश्रुसीं मागें विस्तार ॥ ४५ ॥ उसणें मागतांचि अनुक्रमी ॥ तें ह्मणती घाल कवणें जन्मीं ॥ ऐकोनि ऐसें नाथ अजन्मीं ॥ निद्रिस्थ उठोनि बैसला ॥ ४६ ॥ शोधितां सर्वग्राम सायंकाळ ॥ झाला परी नमिळेचि तंडुळ ॥ हें जाणोनि दीनदयाळ ॥ भागीरथीतें वदतसे ॥ ४७ ॥ कांहो स्वयंपाक नकरिसी माये ॥ तुझी कीर्ति या त्रिभुवनीं नमाये ॥ काय देऊं उपमाये ॥ क्षुधा फार मजलागली ॥ ४८ ॥ तंव ते समयीं नावाजीससा ॥ गृहांगणासी येतांचि दक्षिणार्धेशा ॥ लक्षोनि ज्योतिर्मय परेशा ॥ लोटांगणीं वंदिला ॥ ४९ ॥ त्राहें त्राहें अनाथनाथा ॥ कृपा करोनि आलासीं समर्था ॥ पूर्ण माझिया मनोरथा ॥ श्रीरवळनाथा केलेंसी ॥ ५० ॥ ऐसें ऐकोनि श्रीनाथ ह्मणे ॥ देव असतों तरी कां दारोदारीं फिरणें ॥ भिक्षा मागावया कारणें ॥ कैंचा रवळनाथ कोठील ह्मणसीं ॥ ५१ ॥ आह्मी गोसावी मठवेशधारी ॥ प्रस्तुत असों रत्नागिरी ॥ आमुची पूजाकरिती वर्णचारी ॥ श्रीरवळनाथाचे गोसावी ह्मणाानि ॥ ५२ ॥ ऐसें बोलोनि कुटुंबासी भ्रांती ॥ घालोनियां दक्षिणपती ॥ तें विसरला संज्ञा पूर्वार्चिती ॥ मायाजाळीं कवळतां ॥ ५३ ॥ संसार विषयी सर्वजन घटमठीं पूर्ण ॥ व्यापकत्व नाथ जैसा चंडांशु कीरण ॥ तैसा देव देहीं ज्योनि दुराभिमान ॥ श्रीभगवान स्वरूप नकळेची ॥ ५४ ॥ विषम भावनेचे विकार ॥ ज्योतिर्मय स्वरूपाचा दिसे आकार

॥ निर्गुंग निरुपमनिर्विकार ॥ तोहा सगुण सागर सर्वांघटीं ॥ ५५ ॥ असो हे बोलण्याची ठेवी ॥ ठेविली विचक्ष
णीं सोहं भावीं ॥ निजठेव हे देवाधिदेव सदैवी ॥ आत्मानुभवी सांपडे ॥ ५६ ॥ यापरी गमला सर्वांसी भाव ॥
श्रीनाथ कौतुक दाखवी अभिनव ॥ नावजी तुवां स्वस्थ बैसावें ॥ श्रमलासीं अपूर्व याजस्रीं ॥ ५७ ॥ घ्यावया त
व वर्तमानातें ॥ मज धाडिले श्रीरवळनाथें ॥ ह्मणोनि कारण यावया येथें ॥ आमुचे यदर्थी जाणपां ॥ ५८ ॥ तु-
मचे बहुत कष्टकाळ ॥ येथोनि खंडतील सकळ ॥ ऐसें वदत होता नाथ कृपाळ ॥ तुमचा नाथ कनवाळु असे ॥
॥ ५९ ॥ परी कांहो नकरीच स्वयंपाका ॥ हें ऐकोनि नावजी पातला शंका ॥ कांतेसी ह्मणे परम कौतुका ॥ कास
या केला विलंब ॥ ६० ॥ तैं नावजीस वदे केदार ॥ ह्मैस असोनि गृहीं सुंदर ॥ कांहो अझूनि नकाढिसी धार ॥
येवोनि फार वेळझाला ॥ ६१ ॥ भागीरथी ह्मणे श्रीनाथास ॥ ही जन्माची वांझ ह्मैस ॥ दंत नाहींत इच्या मु-
खास ॥ भगवान स्वरूपासीं अनृत न वदों ॥ ६२ ॥ श्रीनाथ ह्मणे आग्रह नकिजे वायां ॥ न करोनि दुभावें मे
रीमय्या ॥ आपण ह्मैशीची पाठ थापटोनियां ॥ ह्मणे धार काढावी सत्वर ॥ ६३ ॥ हस्तें स्पर्शतांचि हिमकेदारी ॥
पान्हा फुटला स्तनीं चत्वारी ॥ हें देखोनियां नवलपरी ॥ स्नुपा गोदावरी करितसे ॥ ६४ ॥ जितुकें धुध पाहि-
जे मना ॥ तितुकेंचि द्यावें हे नाथ वासना ॥ ह्मैशीची करितां ऐसी भावना ॥ स्नुषा दोहनातें करोनि रांझणभरी
॥ ६५ ॥ गोरस भरोनि गृह वसरीला ॥ ठेवी घागर रांझण चरवीला ॥ अनंत ह्रदयीं नाथ संचरविला ॥ सर्व श्र
म परीहारिला श्रीनाथें ॥ ६६ ॥ तंव नाथें त्रिशूळ घेवोनि करीं ॥ सहज रोंविला नावजी द्वारीं ॥ तें त्रिशूळ गेला पैंवां
तरीं ॥ नाथें उपडोनि काढिला ॥ ६७ ॥ तंव गोधूम धान्यांचीं द्वय कोठारें ॥ वदनें उघडोनि हिमकेदारें ॥ ह्मणे

धान्याचा संग्रह असोनि वरें ॥ कांहो स्वयंपाकासी उशीरकेला ॥ ६८ ॥ मीं परदेशींचा दिगंबर ॥ असें ह्मणो-
नि माझी दृष्टी खडतर ॥ लागेल ह्मणोनि काढिली नाहीं धार ॥ धान्य कोठारें म्यांच उघडिलीं ॥ ६९ ॥ मज
लौकर भोजन करावें ॥ लागेल ह्मणोनिया तंडुलांचीं पेंवें ॥ न उघडावी ऐशाभावें ॥ तुमची माया न कळेची ॥
॥ ७० ॥ मीं भक्षिन तीनशेर ॥ त्रिरात्र राहिल्या साचार ॥ येवढ्यासाठीं चार प्रहर ॥ मज उपोषित ठेविलें ॥
॥ ७१ ॥ हे असत्य तुमची गोष्ट ह्मणसी ॥दुभवि केली वांझ महिषी ॥ असो तुह्मां संसारिकांसी ॥ काय अह्मां-
सी कारण ॥ ७२ ॥ ऐसीं धनलुब्धाचें लक्षण ॥ संग्रही असोनि धनधान्यें ॥ अतिथी आलिया विन्मुख हो
णें ॥ ही प्रारब्धगति तुमची विचित्र ॥ ७३ ॥ तुमचे देवाचें भजन करितों ॥ रात्रंदिवस यामहीवरी फिरतों ॥ भि
क्षामागुन उदर भरितों ॥ भक्तांचे श्रम परिहारितों श्रीनाथाचें नाम घेवोनी ॥ ७४ ॥ हें पाहोनि स्नुषागेली आ-
नंदें उतरंडी ॥ त्यासर्व तंडुळे भरोनि भरली दुरडी ॥ सुवासाची झाली परवडी ॥ तें नाथ कैवाडीयांची नवदवें
॥ ७५ ॥ सर्व पाकाची करोनि तयारी ॥ अनेक शाका कोशिंबिरी ॥ वाढिलीं पात्रें परोरी ॥ हिमकेदारासीं जे
व ह्मणती ॥ ७६ ॥ आश्चर्य करीत नावजीची गृहणी ॥ चत्वारी कुमर कन्या भगिनी ॥ ह्मणती हा योगी
निधानमणी ॥ हाचि खळनाथा सारिखा अस ॥ ७७ ॥ शुद्धभावाचे आसनीं ॥ आदरें बैसवोनि खड्गपाणी ॥
सर्व पाकाच्या पक्वानीं ॥ वामपाणीं पात्रीं वोगारिलीं ॥ ७८ ॥ नाथपंक्तीसीं जेवोनि सारीं ॥ धन्य झालीं
यासंसारीं ॥ मीं सांगतों तैसीच कृषि करावी सुविचारीं ॥ दुर्भिक्ष नासे शेत केलिया ॥ ७९ ॥
कृषि नाशी दुर्भिक्ष सारें ॥ हरती सर्व दुःख संतापपसारे ॥ त्याचा धन्य होय संसाररे ॥ तो संसारीं अ

सोनि होय असंसारी ॥ ८० ॥ त्यांत वर्षाची कौल लावणी ॥ दिवाणाची घ्यावी ह्मणी ॥ जें पिकेल त्यामेदिनीं ॥ तें राशी मळोनि करावी ॥ ८१ ॥ राशी माथा करोनि वांटणीं ॥ भरोनि सर्व शकट वृषभगोणीं ॥ दिवसा आणाव्या प्रख्यात जनीं ॥ भय नाहीं तुज त्रिभूवनीं निर्धारें ॥ ८२ ॥ हीं सत्य मानी माझीं निश्चयोत्तरें ॥ शेत करावें वदल्या प्रकारें ॥ ऐसी खुण सांगोनि खळेश्वरें ॥ अदृश्य झाला ते समयीं ॥ ८३ ॥ अदृश्य झाला ह्मणोनि नाथ ॥ आश्चर्य करिती कुटुंबीं समस्त ॥ ह्मणे हा गोसावी नव्हे दिनानाथ ॥ आमुचे मनोरथ पुरवूं पातला होता ॥ ८४ ॥ तो आह्मीं मानिला वेषधारी ॥ मुंडीजटा भंगड ब्रह्मचारी ॥ ऐसे फिरती देशांतरीं ॥ श्रीभगवान स्वरूपासीं धरोनियां ॥८५॥ नावजी ह्मणे ऐक कांते मात ॥ तुह्मांसी नाथें घातली भ्रांत ॥ वांझ ह्मैस दुभविली निभ्रांत ॥ हें नाथाविण सामर्थ्य कोणासीं ॥ ८६ ॥ उगाउगींचि मारितां भूमीसीं त्रिशूळ ॥ पैंवेंचि करोनि भरिले तंडूळ ॥ सर्व तुमचा फेडिला दुष्काळ ॥ दीन दयाळे माझिये नाथरायें ॥ ८७ ॥ असो नाथ गेलियावरी ॥ दिवाणापासीं विनयोत्तरीं ॥ ह्मणे स्वामी आमुच्या इनामाभितरीं ॥ औत धरावयासी आज्ञा दीजे ॥ ८८ ॥ तैं दिवाणाचा घेऊन कौल ॥ नावजीनें शेत अळुमाळ केलें ॥ आवुतें आणिलीं मागोनि सकळ ॥ बहु प्रयत्नीं औत धरियेलें ॥ ८९ ॥ एकतास लावितां इनामशेतीं ॥ तैं हंडे लागले नांगरदातीं ॥ तेव्हां नाडा तुटतांचि अवचितीं ॥ उचलोनि आणिले सातही हंडे ॥ ९० ॥ नावजी सहित चौघे कुमर ॥ येवोनि पाहती सादर ॥ प्रकाश पडला पृथ्वीवर ॥ हंडे लागले मोहरांचे ॥ ९१ ॥ सद्बुद्धीचें करोनि खळ ॥ धैर्य तिवडा रोवोनि अचळ ॥ धान्य कल्पोनि मोहरा सकळ ॥ हंडे वोतोनियां जन्म मरण पाती फिरविल्या ॥ ९२ ॥

आशामनसा वैतेवारा ॥ पाचारोनि दिधल्या धान्य मोहरा ॥ वासना तराळणीच्या अंतरा ॥ शांत केले धनधान्य देवोनी ॥ ९३ ॥ सात गाडे धान्य भरोन ॥ घरासी आला घेऊन ॥ देवाचा वांटा अर्धा काढोन ॥ अर्धा उरला तो संसारासीं खर्चिलसे ॥ ९४ ॥ चौखणाची उभवोनि उपरी ॥ सभा निर्मिली कनकांवरी ॥ सप्तरंगी विचित्राकारी ॥ शिल्पकारीं केली कारागिरीनें ॥ ९५ ॥ हें पाहोनि महाजनीं ॥ ह्मणती यासी प्रसन्न झाला खड्गपाणी ॥ चोविसवर्षे सेवा करितां अनवाणी ॥ नवनाथ सिखामणी तोषला ॥ ९६ ॥ धन्य नावजीचें जन्मांतर ॥ संतति संपत्तिचा सागर ॥ करी श्रीनाथ सौदागर ॥ दायाद कुटिल अंतरीं कल्पिती ॥ ९७ ॥ हें लक्षोनि दायादगणीं ॥ ग्रामस्थ कुटिल कुलकर्णी ॥ करहाटकासी जावोनी॥हें विस्तारें वर्त्तमान कथियेलें ॥ ९८ ॥ आमुचे इनामांत पूर्वीं सुकृतधन ॥ वडिलें ठेविलें होतें अच्छादून ॥ तें नावजीनें सातही हंडे काढुन ॥ बलात्कारें आणिले घरासी ॥ ९९ ॥ तें अर्धें घेवोनि धन्यानीं ॥ नावजीस सिक्षा बरवी करोनि ॥ बांधोनि आणावा या सभास्थानीं ॥ हेचि विनंती सत्य करावी ॥ २०० ॥ ऐकतां दायाद गणाचें उत्तर ॥ अकबर शाहाचा वंशजकुमर ॥ दूत प्रेरीले यवन खडतर ॥ जाज्वल्ल्य शंभर अविवेकी ॥ १ ॥ ते अविवेकी अविंध शत ॥ नावजीस तीव्र हस्तें अकर्षित ॥ ह्मणे आह्मीं घेवोनि येत होतों रस्त ॥ करहाटकासीं साक्षेपें ॥ २ ॥ ह्मणोनि शकटीं भरोनि धनधान्य ॥ नावजीनें कुरी जुंपोन ॥ मोहरा पेरीत चालिला जाण ॥ करहाटकाचे पर्यंत ॥ ३ मोहरा पेरिल्या त्याभणंग जनीं ॥ वेचों घेतल्या सर्वांनीं ॥ ह्मणे नावजी सारखा भक्तगुणी ॥ देखिला नाहीं खळनाथाचा ॥ ४ ॥ आश्चर्य करिती ऐसें महाजन ॥ पातला करहाटकाचें अविंदस्थान ॥ तेव्हां द्रव्य घेतलें हिरोन ॥ नावजीस कारागृहीं घातले ॥

॥ ५ ॥ हें जाणोनि हिमकेदारी ॥ तुरंगमात्वरी मंदवारीं केली स्वारी ॥ पातला नाथ करहाटकपूरीं ॥ मध्यरात्रीं अविंध महालीं ॥ ६ ॥ निद्रिस्थ अविंध मंचकावरी ॥ होता तेथेंचि बद्रिविहारी ॥ येवोनि अविंधा धरोनि करीं ॥ तीव्र महीवरी पाडिला ॥ ७ ॥ शत प्रतोद पृष्ठीवरुते ॥ मारिले मोजोनि दिनानाथें ॥ ह्मणे माझ्या परम नावजी भक्तातें ॥ कां रे कारागृहीं घातलासीं ॥ ८ ॥ जितुक्या घेतल्या धन मोहरा ॥ तितुक्या झाडोनि देईं लौकरा ॥ माझा परम गुप्त मारा ॥ तुज सारिख्या पामरासीं कळेना ॥ ९ ॥ लौकर नावजी किवळ नगरा ॥ गौरवोनि लावीं अविंधा पाखरा ॥ ऐसा चमत्कार दाखवोनि पुरा ॥ अदृश्य झाला दीनबंधू ॥ १० ॥ तैं सावध होवोनि अविंध जाणा ॥ नावजीस आणिलें सभास्थाना ॥ देवोनियां वस्त्राभरणा ॥ किवळ नगरासीं धाडिला सन्मानें ॥ ११ ॥ नावजीच्या दायादगणा ॥ शिरछेद करावयासीं आज्ञा दिधली जाणा ॥ तैं नावजीनें करोनि प्रार्थना ॥ दायाद शिरछेदनीं सोडविलें ॥ १२ ॥ ऐसा परम केदारभक्त ॥ नावजी नांदे किवळांत ॥ धनधान्य संपत्ति संतत ॥ रत्नमंदिरें महदैश्वर्यें ॥ १३ ॥ देवाकारणें देउळ कांचनमय ॥ निर्मिलें जन करिती महदाश्चर्य ॥ भक्तराज गुण गांभिर्य ॥ श्रीनाथ वरदभक्त हा नांदतसे १४ ॥ घेवोनि असंख्य धनाची राशी ॥ कुटुंबेंसी आला रत्नागिरिवरासीं ॥ देवालय बांधोनि सुवर्ण कलशी ॥ दक्षिणाधीशा पूजितसे ॥ १५ ॥ राजोपचारीं करोनि पूजा ॥ ह्मणे पूर्ण झाला मनोरथ माझा ॥ मजला देवनाहीं दुजा ॥ तुज विरहित नाथराया ॥ १६ ॥ आतां चलावें कनक सदना ॥ तुजसाठीं केली चातुर्य रचना ॥ ज्या ज्या तूं सांगसीं भावना ॥ वर्तूं त्या त्या रीतीनें स्वामिया ॥ ॥ १७ ॥ परिसोनि बोले नाथवचन ॥ पुत्र पौत्रीं धनधान्य होईल संपूर्ण ॥ वृद्धि पावसी जैसा शशिकिरण ॥

दिवसें दिवस जैसा आगळा ॥ १८ ॥ इहलोकीं भोगोनि सुख ॥ परलोकींही पावसी सौख्य ॥ सत्संगतीसीं घडोनि ऐक्य ॥ अखंडित सखया तुज असो ॥ १९ ॥ ऐसें लाहोनि वरदान ॥ वंदोनि भक्ती क्रमण चरण ॥ नावजी निघाला उल्हासमन ॥ किवळ नगरासीं पातला २० ॥ श्रीनाथ होतां ऐसा परम कृपाळ ॥ खंडोनि गेला महादुष्टकाळ ॥ नांदतसे क्षेम कल्याण कुशळ ॥ भागीरथीरमण किवळ नगरीचा ॥ २१ ॥ कृतयुगादि युगचत्वारी ॥ भक्त प्रियकर बद्रिविहारी ॥ नांदतसे रत्नागिरीवरी ॥ त्रिगुणावतारी ज्योतिस्वरूप ॥ २२ ॥ सन्मार्गी वेंचोनि नावजीनें धन ॥ अखंड करी अन्नसंतर्पण ॥ सदैव करिता हरिकीर्तन ॥ दोष दारुण नासती ॥ २३ ॥ इति केदार विजय कलश ॥ भक्तचरितांमृत विशेष ॥ भरोनि ठेविला सेवितां संतोष ॥ कलिकल्मषदोष नासती ॥ २४ ॥ कींहाकेदार विजव सारंग ॥ रंजवी हरिजन विस्मित अंतरंग ॥ हरिनामीं कैवारिया ज्योतिर्लिंग ॥ चत्वारी त्रिंशतितमोध्याय गोडहा ॥ २२५ ॥ इति श्रीकेदार विजय भविष्योत्तरपुराण केदारखंड विरचितायां ॥ नावजी भक्त दरिद्रहरणोन्नाम चतुः त्रिंशतीतमोध्यायः ॥ ३४ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीरवळेश्वरायनमः ॥ जय उपमन्य परमसिद्ध क्षीरसागरा ॥ उत्तान पादपुत्रा अचळ प-
दाधिकारा ॥ उद्यन्मार्तंड यावस्थिरकरा ॥ उग्रसेन राज्याभिषेका ॥ १ ॥ उद्धव गोपिका कामपूरिता ॥ उत्तंकऋ-
षिमन संतापहारका ॥ उमगतां नुमगिसी निगमाश्रिता ॥ उल्हास मानस कारका सगुणनिधी ॥ २ ॥ उकार
मकार साकारी गुणकारका ॥ उरगारि वहना विश्वपालका ॥ उर्ध्व विहंगममार्ग पिपीलिका ॥ उमाकांत योग सि
द्धान्वया ॥ ३ ॥ उपपितांबर काश्मिर धरा ॥ उल्कापात प्रदर्शक रत्नासुरा ॥ उन्मेषतुरंगर्मी भूषित सुमनोहरा ॥
उत्थापना दैत्य कार्या कारणा ॥ ४ ॥ उलुपीरमण नरावतारा ॥ उपलव्य नगरीं शिष्टाई सागरा ॥ उखळीं वि
मलार्जुन बंधनोद्धारा ॥ उद्धारिले अरिष्टप शकटसूत्रा ॥ ५ ॥ उपमेसी तुझिया कैंची उपमा ॥ उगेंचि मान्य पडि-
लें निगमा ॥ उच्चस्वर अरणपद जटादिक्रमा॥ उत्तीर्ण न होती दशग्रंथत्रयीं ॥ ६ ॥ ऐसा आगममंत्रास्मित परमे
श्वर॥ निरामय निर्विकारी जो जगदांकुर॥ दुरित दनुज करी संव्हार॥ श्रीदक्षिणपति रत्नाद्रीं अवतरला ॥ ७ ॥ ॐ
नमो रकार ब्रह्म परायणा ॥ वकार विष्णु हरिनारायणा ॥ लकार श्रीसदाशिवगुरु आनंदघना ॥ उमाकांता गुरु-
नाथा ॥ ८ ॥ जयजयापुराण पुरुषोत्तमा ॥ जय पुरातन पूर्वार्चिता सादरसुगमा ॥ जय हरिभक्त जनांच्या पूर्ण-
कामा ॥ जय आगमा निगमांगा सगुणनिधी ॥ ९ ॥ कृतयुगीं तारिले सद्भक्तां ॥ मार्दिलें घोरसमरीं तीव्र विभक्तां
॥ परम प्रियकर होसी विरक्तां ॥ हरिभोक्ता ह्मणती जेसर्व विषयी ॥ १० ॥ कृतयुगादि त्रेत द्वापार कली ॥ प्रेमर
सें शबरीचीं बोरें चाखिलीं ॥ कृष्णावतारीं गोपोच्छिष्ट गोकुळीं ॥ आवडी फार त्यांची तुज ॥ ११ ॥ जे तव भ-
जनासीं समूळ चुकले ॥ ते सायोज्य सांम्राज्यपदासीं मुकले ॥ विषय भोगितां सर्व ठकले ॥ चौऱ्यांशीं भकले तु


अध्याय ३५
तेतीस कोटी देव केदारनाथाची स्तुति करितात.
श्रीकेदारनाथ.
संत कीर्तन करितात.

जविण गुरुनाथा ॥ १२ ॥ श्रेष्ठत्व शास्त्रार्थी भारिभरली ॥ आत्मानुभव रससेवोनि नाहीं मुरली ॥ ती चौऱ्यांशीं लक्षयोनि वृथा फिरली ॥ अहं ममतेनें अंतरली श्रीगुरुनाथा ॥ १३ ॥ जे स्वधर्ममार्ग चालतां चळली ॥ त्या अहंकृती तरूची पत्रें गळलीं ॥ जे निंदा द्वेषाग्निमाजी जळली ॥ ते परधर्मीं मळली नाथराया ॥ १४ ॥ जो भवसागर नाहींच उतरला ॥ शब्दब्रह्म वदाव्या जो अंतरला ॥ तो आत्महितार्थासीं सर्व अंतरला ॥ नाहींच हरला भेदभाव ज्याचा ॥ १५ ॥ ऐसे भेदवादी क्लेश विषम मनाचे ॥ बहुत दुर्व्यसनावर्ती पाशमनाचे ॥ पडतां कवण वर्जील दूत संयमनाचे ॥ तुजविण हरि जनांचे नाथराया ॥ १६ ॥ असो ऐसे सर्प वृश्चिकादिक हरि जन॥ तारिले सद्भक्त कृपावलोकन ॥ काम क्रोध रत्नासुर रक्तभोजन ॥ कृपाकटाक्षशरें वधोनि तारिले ॥ १७ ॥ धन धान्य अपरमित ॥ संपत्ति संतति सत्संगत ॥ नावजीस देवोनि साळंकृत ॥ सार्वभौमपद दिधलें ध्रुव निश्चयें ॥ ॥ १८ ॥ नावजीचे हरोनि सकळक्लेश ॥ संपत्तिसमुद्र दक्षिणाधीश ॥ हा चत्वारी त्रिंशती अध्यायीं विशेष ॥ भक्तिरस सेविला श्रोतेजनीं ॥ १९ ॥ येथोनि अवतार चरित्र उदय ॥ झाला जैसा प्रतापसूर्य ॥ चिद्रत्नागिरी द्वादशलिंगार्चन मुनिवर्य ॥ करी कीं द्वादशार्क एकत्र उगवले ॥ २० ॥ रत्नांकित नक्षत्रीं हेंचि नभमंडळ ॥ कीं रत्नसिंहासनीं नाथस्वरूपीं रविमंडळ ॥ दुरित दैत्याभ्र वारोनि निर्मळ॥ श्रीनाथचरणीं रंगला अरुणापरी ॥ २१॥ नवनाथ प्रियकर खळनाथ ॥ नवार्णवजपा अजपाकृत ॥ नवचंडीतें नवविधि अर्चन करिती भक्त ॥ वदेल कमळ भैरव पूजितां ॥ २२ ॥ नवकिशोर मंडित कपोला ॥ नवरात्रातें पूजितसे कमळा ॥ नवसुरवर सुवर्ण कमळा॥ आणोनि सुवर्ण कमळा पूजावांधी ॥ २३ ॥ कपिलाश्रमींचीं सुवर्णकमळें ॥ कमळ भैरवें घेवोनि अमळें ॥ निर्म

ळ पूजाकरितां अमरपाळें ॥ सकळ महाजन परिवारेसीं आदरें ॥ २४ ॥ प्रतिपदेपासूनि देव जागरीं ॥ कमळपूजा करिती सुमनोहरीं ॥ उत्तर पूजेची नवलपरी ॥ हरिजन परिवारी अर्चितां ॥ २५ ॥ ऐसी सुवर्ण कमळांची पूजा ॥ नवचंडींत करिती दक्षिणराजा ॥ संतोष पावता इच्छित काजा ॥ पूर्ण करितसे सद्भक्तांच्या ॥ २६ ॥ ह्मणोनि आतां कलियुगांत ॥ विचित्रांवरांचीं कमळें करित ॥ पूजा बांधिती नवरस भरित ॥ भक्त मनोरथ सिध्यर्थीं ॥ २७ ॥ ऐसा दिनानाथ गुणसागर ॥ भक्तजड जंगम मलयागर ॥ श्रीज्योतिर्मय सौदागर ॥ पूर्णब्रह्में ब्रह्मचारी ॥ २८ ॥ ज्योतिस्वरूपाचा प्रताप रवी ॥ रत्नागिरींअंबरीं प्रकाश मिरवी ॥ अवतारधरी जेथें पूर्वी ॥ बद्रिकाश्रमीं त्रिगुणात्मक ॥ २९ ॥ सूत ह्मणे हे शौनकमुनी ॥ संशय कल्पिला अससील मनीं ॥ त्रिगुणात्मक कवणा पासोनि ॥ त्रय त्रिंशतमुखीं एकत्ररूपी हा रवळनाथ ॥ ३० ॥ श्रीज्योतिर्मयाचीं द्वादशांगें ॥ झाली अनादि माये संगें ॥ त्याचिनाथें द्वादशज्योतिर्लिंगें ॥ स्थापिलीं ह्मणोनि ज्योतिर्लिंग बोलती ॥ ३१ ॥ ऐसें तुंवा कल्पिलें चित्तीं ॥ पुनरपी ऐकें तेंचि सारांशमती ॥ बाहत्तर युगाचें प्रथम भरती ॥ योगमायांबरीं नाथ उगवला ॥ ३२ ॥ ब्रह्मा विष्णु श्रीशंकर ॥ हे आदिमायेचे त्रयकुमर ॥ कवणे दिवशीं विकार ॥ आदिमायेनें विचारिलें बोलतां ॥ ॥ ३३ ॥ तें गुरुगुह्य अवद्यजपतां ॥ क्षोभली आदिकुमारी अबोलतां ॥ शतमुखब्रह्मां झाली निर्मिता ॥ पंचमुखा होन आगळा ॥ ३४ ॥ विष्णु शंकर हे दोन्ही ॥ निर्मिले दुसरे प्रतापतरणी ॥ ऐसी योगमायेची अचाट करणी ॥ पाहोनि विष्णु विरंची गडबडले ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रकार रजब्रह्मास्मिनुध्यमरजनी अजन्मि प्रियकरं ॥ वकारयाद्दिष्णु परम प्रियसत्वार्थ विवरं ॥ तमस्या रुद्रस्मिन् त्रिगुणगुणयो ज्योंतिरूपस्वरूपं नमस्ते पौगंड

तनये पदचंडांशु किरणं ॥ १ ॥ अलक्षं अचर अगोचरवरं गोसावि आलक्षसं ॥ लक्षालक्ष सुलग्नदीपकलीकां नि
रंजनं नमोश्रीयात् ॥ तद्भासप्र निरंजनै प्रकाश जिवसं त्रैगुण आसी शिवं ॥ शिवस्थात् जननं परेशवरदं चैत-
न्य जठरोद्भवं ॥ २ ॥ तत्पुरुषाप्रति सुंदरी प्रसुतयो ॐकार जन्माक्षरं ॐकारोद्भव धूर्जटीश्वर महा रौद्रंरवं विष्णुत्रै
॥ विष्णुनाथ सरोज विश्व सुजितां पिंडांड ब्रह्मांडकं ॥ यं एकं घृतचंड ज्योतिस्वरूपं ब्रह्मा हरि शंकरं ॥ ३ ॥
पौगंडश्च महाऋषिस्तप दारुणभाचरेत ॥ आदिकौमारि प्रित्यर्थं कृत्वानुष्ठान तीव्रतां ॥ ४ ॥ यःश्लोक त्रय
देवत्री भाणान् सत्वे रजश्चास्तम दिव्यौ जामदग्नि भैरव रूपं ज्योतिर्मयं चाद्रूपं प्रख्यातं हरिकीर्तिघोष
मखिलं अग्नीपुराणोत्तरं ॥ यद्भविष्ये हरिचंदनागर कथा गंधाढ्य सुमनोहरी ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ हे
श्लोक अग्निपुराणाचे रसचत्वारी ॥ मातें बोधिले कालिंदीचे उत्तर तीरीं ॥ तें विस्मर्ण जाहलिया हरिद्वारीं
॥ पुनरपि नाथें अजन्म कथियेला ॥ ३६ ॥ तेथेंही कांहीं दिवस करोनि वस्ती ॥ गमन केलें दक्षिणपं-
थीं ॥ उल्लंघोनि यमुना भागीरथी ॥ स्वगृहाप्रती पातलों ॥ ३७ ॥ पाहोनि स्वगृहींच्या तापत्रया ॥ अ-
मान्य केलें केदारविजय ल्याहावया ॥ हें जाणोनि क्षतांग करोनि माझीकाया ॥ मज रत्नाद्रीं आणिलें श्रीनाथें ॥
॥ ३८ ॥ रिकामें करोनि संवत्सर विकारी ॥ मातें केलें केदार विजयाधिकारी ॥ हे अजन्म जन्मकथागृह भांडारीं
॥ तिसरे न देव जागरीं कथियेलें मजला ॥ ३९ ॥ सूत ह्मणे हे शौनकऋषी ॥ कथा हे ऐकिली सविस्तारेसीं ॥
अयोनी संभव नाथ रायासीं ॥ झाला तो पुराणार्थीं दर्शविला ॥ ४० ॥ तें पुनरपी ऐकें सारांश कृतयुगांतीं ॥
पौगंडऋषि अतींद्रिय मूर्ती ॥ पुत्र कामनेच्या परम अर्थीं ॥ तप केलें बद्रिकाश्रमीं ॥ ४१ ॥ एक ब्रह्मकल्प तपा

चरण ॥ केलें पौगंडऋषीनें जाण॥ पुनरपी सृष्टि रची चतुरानन ॥ यथापूर्वं मधुमुरु मथितार्थीं ॥४२॥ तें विष्णु च्या घटी सहस्रांतीं ॥ निमिष्यार्धकाल होय पाशुपती ॥ अनादिमायेसीं तें वदतां सुमती ॥ आह्मीं कवणे रीती वर्तावें ॥ ४३ ॥ सत्व रज तमोगुण ॥ दुसरे केलेसीं निर्माण ॥ शतमुखांचा केला चतुरानन ॥ प्रतिसृष्टि केवीं कल्पिसी ॥ ४४ ॥ तें शंकर ह्मणे अनादि देवी ॥ तव कल्पद्रुमाची अचळ ठेवी ॥ माझिये अंतरात्मीं अनुभवी ॥ सत्यसत्य हो त्रिवाचा ॥ ४५ ॥ ऐकोनि शंकराचीवाणी ॥ योगमाया संतोषोनी ॥ ब्रह्मा विष्णु त्रिगुणगुणी ॥ होवोनि अयोनि जन्मावें ॥ ४६ ॥ त्रिगुणगुणाचा कुळदीप ॥ पुत्र कामनेचा संकल्प ॥ धरिला पौगंडऋषीनें ब्रह्मकल्प ॥ बद्रिकाश्रमीं अचळ मनीं ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पौगंडश्च ब्रह्मकल्पं कृत्वानुष्ठान दारुणं ॥ ब्रह्मा विष्णु तपश्चैकं पुत्र वत्सलदीप्सितं ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं नित्य करिजे प्रातःस्नान ॥ षट्कर्मादि तपाचरण ॥ करितां भक्ति तृष्णा चढे विज्ञान ॥ तेवीं तत्वानुभवी रस सेविजे ॥ ४८ ॥ एक साक्षी पुनः पुनः वदतां अखंडित ॥ दुषण न ठेवी महाजन पंडित ॥ वमना समान ह्मणतील अपंडित ॥ परी हरि नाथ रणपंडित हें विचरितां ॥ ४९ ॥ जेवीं मधुमाक्षिका सेवोनि रस ॥ वमन करिती मनोल्हास ॥ त्या मधुबिंदुचा भरोनि कलश ॥ देवांसी अभिषेक करोनि सेविती ॥ ५० ॥ तें उच्छिष्ठ न ह्मणती जन ॥ आवडी सेविती विचक्षण ॥ तैसें पस्तीस अध्यायींचें यथानुसंधान ॥ गोड वाटे दृष्टीतें ॥ ५१ ॥ नवमास भरतां जन्मल्या प्राणी ॥ मधुबिंदु घालिती त्याचे वदनीं ॥ तोरस सेवितां जन्म विसर्जनीं ॥ होय निरोगी बाळक ॥ ५२ ॥ ऐसें विषयरसांचे कुरस ॥ संसारिक मानिती अमृतासरस ॥ परीते परिणामीं विरस ॥ परमहंस मानिती ॥ ५३ ॥ तैसी

नव्हे हे नाथजन्मीची सिराणी ॥ हे भविष्योत्तरार्थ अग्निपुराणीं ॥ वदली द्विवार व्यासवाणी ॥ ह्मणोनि अजन्म काहणी पस्तीसाध्यायीं ॥ ५४ ॥ केदारविजय अध्यायांचीं पस्तीस पात्रें ॥ वामहस्तें नाथें धरिलीं चिन्मात्रें ॥ तीं पूर्ण करावया संत सत्पात्रें ॥ घेती अपूर्ण पूर्ण करावया ॥ ५५ ॥ कथानुसंधान सारांश मती ॥ अनुक्रमें यावयालागीं अगस्ती ॥ वदत कथा भार्येप्रती ॥ ते संत श्रोतीं परिसावी ॥ ५६ ॥ एकब्रह्म कल्प पर्यंत ॥ पौगंडऋषि तपाचरत ॥ सत्व रज तमाचें त्रिशत ॥ एकरूपीं अवगले ॥ ५७ ॥ ह्मणोनि शतमुख ब्रह्मा शतमुखहरी ॥ शिवादि झाले त्रिगुणावतारी ॥ यास्तव अवतरले बद्रिविहारी ॥ पौगंडऋषि कांतिच्या करांजुळीं ॥ ५८ ॥ पौगंडऋषीची जे कां राणी ॥ विमलांबुजाक्षा लावण्य खाणी ॥ शनिप्रदोष व्रताचरणीं ॥ ब्रह्मार्धदिन पर्यंत व्रत केलें ॥ ५९ ॥ तैं त्रिगुण मुर्तीची प्रताप गरिमा ॥ एकत्र होहूनि अप्रतिमा ॥ विमलांबुजेच्या करपद्मा ॥ माजीं पावलों देदिप्यमान ॥ ६० ॥ असो अनादि शक्तीची आज्ञा वंदोनि ॥ देह धरिले त्रिगुण सगुणी ॥ अयोनि संभवखड्गपाणी ॥ विमलांबुजाक्षी कराब्जीं जन्मला ॥ ६१ ॥ विमलांबुजाक्षा कर सरोजीं ॥ नाथ जन्मला विमला विमलाब्जीं ॥ शामसुंदर चतुर्भुजी ॥ ॐकार बीजीं अवतरला ॥ ६२ ॥ हे संज्ञा अग्निपुराणीं ॥ सज्जनीं पाहावी शोधोनी ॥ तुर्या वस्ती संबोधनी ॥ हा अजन्म जन्म कथियेला ॥ ६३ ॥ नवरात्रीचे षष्ठमदिनीं ॥ हे अजन्म संज्ञा खड्गपाणी ॥ वदला यथार्थ हा संशयमनीं ॥ असज्जनीं सुजनीं न घ्यावा ॥ ६४ ॥ हे रसचत्वारी श्लोकार्थ वाणी ॥ अयोनि जन्मला हे व्यासशब्दाची शिराणी ॥ दूषण न ठेविजे पंडितजनीं ॥ दीर्घ न पाहातां ग्रंथार्थीं ॥ ६५ ॥ श्रीनाथाचा जन्मकाळ ॥ तृतीयोध्यायीं कथिला सकळ ॥ तो ऐकोनि संत श्रोतीं मराळ ॥ श्रीनाथ ज-

न्म मुक्ताफळ शृंगारिला ॥ ६६ ॥ ऐसी हे अजन्माची नवलपरी ॥ बद्रिकाश्रमाहूनि हिमकेदारी ॥ पातला भरत खंडाग्रीं रत्नागिरी ॥ श्रीकमलेसीं भैरवदळभारें ॥ ६७ ॥ मारोनि रत्नासुर रक्तभोजन ॥ चिद्रत्नागिरी घालोनि ठाण ॥ राज्य करित नाथनिरंजन ॥ त्रिकुट शिखरीं मुनिजनरंजन साक्षभूत ॥ ६८ ॥ तें हें केदार विजय कथन ॥ पूर्णतेस आलें निरूपण ॥ संतसज्जनीं करितां श्रवण ॥ जयकल्याण पावती ॥ ६९ ॥ संत श्रोतीं विचक्षण ॥ केदारविजय गुण निधान ॥ पस्तीस अध्याय परियंत सिंहावलोकन ॥ प्रथमोध्याया पासोनि करावें ॥ ७० ॥ प्रथमोध्यायींचें निरूपण ॥ आदि वंदिला गजानन ॥ सरस्वती संत सभा हरिनारायण ॥ ग्रंथारंभी पूजिले ॥ ॥ ७१ ॥ श्रीनारदें तिरस्कारिलें अगस्ति कुमरा ॥ सक्रोधें पातला तो नर्मदातीरा ॥ दीर्घ वाढोनि टेंकला अंबरा ॥ परशरामें सागर सारिला ॥ ७२ ॥ समुद्रासीं रक्षिलें वाळवीनें जाण ॥ हें प्रथमोध्यायींचें रसाळ कथन ॥ संत श्रोतीं करितां श्रवण ॥ विस्तारेंसीं कळिलें असे ॥ ७३ ॥ माध्यान्हीं अस्त चंडांशु कीरण ॥ झाला विंध्याद्रि मस्तकीं जाण ॥ हें प्रथमाध्यायीं केलें श्रवण ॥ संत महंत गुणिजनीं ॥ ७४ ॥ आतां द्वितीयोध्यायीं कथासार ॥ त्रिकाळीं युद्ध घोरांदर ॥ रक्तबीजाक्ष धुरंधर ॥ दिवाकरासीं संग्राम करी ॥ ७५ ॥ त्रिकाळ राक्षसांच्या युद्धावर्ती ॥ श्रमी झाला छायापती ॥ पराभविल्या त्रिदशपंक्ती ॥ सूर्य कैवारासी जे जे गेले ॥ ७६ ॥ ब्रह्मराक्षस संग्राम पाशपंजरीं ॥ सूर्य गुंतोनि पडिला विंध्याद्रिशिखरीं ॥ तैं आकाशवाणी झाली घनघोरीं ॥ अजपा गायत्री पुरश्चरणीं जपावी ॥ ७७ ॥ त्रिकाळीं संध्या करावी ब्राह्मणें ॥ यथाकाळीं द्यावें अर्घ्यदान ॥ तैं मुक्त होईल सहस्र कीरण ॥ हे विस्तारें श्रवण केलें संतीं ॥ ७८ ॥ दुष्कृत भारें वसुंधरा ॥ घाबरी झाली शौनक मुनिवरा ॥ गाय होवोनि

गेली अमरेंद्रपुरा ॥ सुरेंद्रासीं सांगावया विस्तारें ॥ ७९ ॥ सुरेंद्र बोधोनि हे मेदिनी ॥ बद्रिकाश्रमासीं मही धाडो
नि ॥ इंद्रगेला काशीपट्टणीं ॥ विश्वनाथासीं वदावया ॥ ८० ॥ अगस्तीसीं बोधोनि मधुरवचनीं ॥ मुक्त कराव-
या वासरमणी ॥ दक्षिणेसीं धाडिलें त्यामृदुभाषणी ॥ तें संतसज्जनीं श्रवणीं परिसीलें ॥ ८१ ॥ तत्वबोधा-
न्वय विस्तार ॥ त्रिकाळ युद्ध करी निशाचर ॥ दक्षिणेसी धाडितां वदला कलश कुमर ॥ भागीरथी आगमन क-
थिलें विस्तारें ॥ ८२ ॥ हें द्वितीयोध्यायींचें निवेदन गहन ॥ संतगुणिजनें ऐकिलें श्रवणें जाण ॥ आतां त्रितीयोध्यायीं
चें अवधान ॥ देवोनि संज्ञार्थ परिसावा ॥ ८३ ॥ विश्वनाथासीं वंदोनि भावें ॥ नर्मदेसीं यात्रया कलशोद्भव ॥
उत्तर मानस करोनि सर्व ॥ नर्मदा तटाकीं पातला ॥ ८४ ॥ तें अगस्तीतें वंदितां विंध्याचळ ॥ शयन तयासीं
करविलें अचळ ॥ तें मुक्त करितां रविमंडळ ॥ विश्व व्यापारीं आचरती ॥ ८५ ॥ महीची ऐकोनि विनवणी ॥ यो
गमाया अवतरवी खड्गपाणी ॥ पौगंडऋषि जनक विमलांबुजाक्षा जननी ॥ ब्रह्मकल्प तपाचरणी जन्मे अजन्मीं ॥ ८६
॥ योगमायेची आज्ञा घेवोन ॥ त्रिशतमुखाचे तिघेजण ॥ एकरूपी आदिमायेनें करोन ॥ अवतारार्थी आज्ञादिधली
॥ ८७ ॥ त्रिमूर्तीचा घेवोनि एकअवतार ॥ षोडशसिद्ध नवनाथ भैरवाकार ॥ दक्षिणेसींजावें वधावया दैत्यभार ॥ राज्य
करावेंगा रत्नागिरीचें ॥ ८८ ॥ ऐसें ऐकोनि निरामयींचें आज्ञावचन ॥ सत्यकरावया सत्वरजतमोगुण ॥ ज्योतिस्वरूप
चिदांबराहून ॥ विमलांबुजाक्षा करतळीं एकवटले ॥ ८९ ॥ ज्योतिर्मय निर्गुण तेचि झाले सगुणी ॥ पौगंडऋषि कांते-
च्याकराब्ज गगनीं ॥ उगवलानाथ चंडांशुकीरणीं ॥ बद्रिकाश्रमीं अवतरला ॥ ९० ॥ शनिप्रदोष व्रताचरण सुफळीं ॥
पौगंडऋषीच्या करांजुळीं ॥ जन्मली मूर्ति हे तनु सांवळी ॥ ब्रह्मकुळीमाजी श्रेष्टत्वें ॥ ९१ ॥ ह्मणोनि ब्रह्माचारी हें ना-

माभिधान ॥ अष्टावतारांतरीं प्रमाण ॥ असो बद्रिकाश्रमीं अवतार दारुण ॥ रत्नाद्रीं विद्युल्लता पडियेल्या ॥ ९२ ॥ मृग नक्षत्र झाला पद्मोद्भव ॥ अश्वमेध अवतरला हयग्रीव ॥ असो नाथ अजन्मीचा संभव ॥ श्रोतीं अभिनव परिसिला असे ॥ ९३ ॥ जो निष्कलंकी असोनि अजन्म ॥ अनंत अवतारांमाजी दशजन्म ॥ धारिता जाहला परम ॥ निगम प्रमाण करितसे ॥ ९४ ॥ जो खंडी सर्व जन्मावळीला ॥ तो कैसा सांपडेल जन्मजन्मावळीला ॥ विषद् अर्थ प्राकृतमनीं कसा कळविला ॥ श्रीनाथ जन्मावळी पत्राक्ष उकली अगस्ती ॥ ९५ ॥ हे त्रितीयोध्यायींची-कथा ॥ विस्तारें परिसले संतश्रोता ॥ गाधिज पावला ब्रह्मत्वा ॥ गोहरणोत्सव करोनियां ॥ ९६ ॥ जमदग्निक्रोधाचा विभागकेला ॥ पांचजणांतें बांटोनि दिधला ॥ हा चत्वारी अध्यायीं अर्थ लिहिला ॥ श्रीकेदारें सांगोनि मजलागीं ॥ ९७ ॥ शक्तिसहित भैरवभारीं ॥ नाथ उत्तरला हरिद्वारीं ॥ हे चतुर्थ अध्यायीं नवलपरी ॥ संतश्रोतीं परिसीली ॥ ९८ ॥ हरिद्वाराहूनि हिमकेदारी ॥ शक्ति चमूसीं भैरवदळ भारी ॥ नामाभिदानी प्रसिद्ध नगरी ॥ गंगातीरीं उत्तर तटाकीं उत्तरले ॥ ९९ ॥ गंगातीरीं सोरमक्षेत्रीं ॥ श्वेत वराह कपिलाश्रम पवित्रीं ॥ वस्ती करिता झाला केदारमंत्री ॥ रुधिरोद्गारी राक्षस वधोनियां ॥ १०० ॥ हे पंचमोध्यायींची सुरस कथा ॥ नारदें कथिली तीव्र विद्युत्पाता ॥ उत्तरभागीं रत्नाद्रि होय भंगता ॥ तें श्रोतीं श्रवण केलें विस्तारें ॥ १ ॥ सोरमाहूनि पातले काशी ॥ स्नान करोनि मनकर्णिकेसी ॥ एक मंडळ करोनि मनकर्णिके वस्तीसीं ॥ शक्तिचमू भैरवेसीं राहिला ॥ २ ॥ नाथें स्थापोनि विश्वनाथ ॥ द्वादश लिंगामाजी मोक्षपद समर्थ ॥ तेथोनि निघाले वनोपवनें लंघित ॥ महावनातें पातले दळभारीं ॥ ३ ॥ कालिंदीचे उत्तर तीरीं ॥ महावनीं भूधरावतारी ॥ बळिभद्र देखोनि नम-

स्कारी ॥ श्रीकेदारासीं साष्टांग ॥ ४ ॥ तयांतें घेवोनि सांगातीं ॥ वृंदावनीं करोनि वस्ती ॥ तेथें राहुनि तीनराती ॥ नंतर वेत्रवती तीरा पातले ॥ ५ ॥ तेथें राहोनि तीन दिवस ॥ निघाले दळभारें जैसे चंडांशु ॥ नर्मदा तटाकीं उतरले हर्षें ॥ लक्ष्मी सहित खळेश्वर ॥ ६ ॥ हा षष्ठमोध्यायीं कथारस ॥ संतीं सेविला सावकाश ॥ हुहु सोमदंती गंधर्वीश ॥ उद्धार होईल शिवाख्यानीं ॥ ७ ॥ षष्ठमोध्यायीं ऐसी वाणी ॥ सर्व परिसिली संतगुणिजनीं ॥ आतां विकर्णिक कांता लावण्यखाणी ॥ जीचि शिराणी सुरनरवरां ॥ ८ ॥ पंचमृगांश गंधर्व ॥ मालती योगें उद्धरिले सर्व ॥ शिवरात्री कथा ऐकिली अपूर्व ॥ सप्तमोध्यायीं विस्तारें ॥ ९ ॥ नर्मदेहूनि प्रयाण केलें ॥ तपती सूर्यकन्यातटीं सुस्नार्थी उतरले ॥ वाल्मिकाश्रमीं विश्रामले ॥ दोन प्रहर दिवसांतीं ॥ १० ॥ तेथोनि घृष्णेश्वरासीं देखा ॥ स्थापोनि पातले पंचवटिका ॥ भूधरावतार वदत टीका ॥ षोडश सिद्ध धाडिले पुढारीं ॥ ११ ॥ शतव्याघ्राचीं कबंधें ॥ संव्हारिलीं सोहं सिद्धें ॥ नाम पावला सोनारसिद्ध ॥ खंदार लकणासुर वधोनियां ॥ १२ ॥ पुरंदरा पासोनि कुतोहलगिरीं ॥ ते मानदेशीं नामशिगणापुरी ॥ ऐसियास्थानीं बद्रिविहारी ॥ भैरव दळ भारेसीं उतरला ॥ १३ ॥ वंगभस्म करोनि लवण खदिरांगारा ॥ वधिले युद्धीं करोनि मारा ॥ त्रेतायुगींच्या दूषण खरा ॥ वधिलें निकुरें केदारें ॥ १४ ॥ हे वार्त्ता ऐकोनि विजयोत्तरीं ॥ नाथें वाजविल्या प्रस्थान भेरी ॥ पंचवटीहूनि हिमकेदारी ॥ अष्टमोध्यायीं पातले ॥ १५ ॥ सोर ऐसा उत्तरादि शब्दें ॥ सोनार ह्मणजे शतव्याघ्र कबंधें ॥ वधिलीं सिद्ध परिवारीं सक्रोधें ॥ द्वंद्व युद्ध करोनियां ॥ १६॥ सोनार सिद्ध स्थापोनि सोनारीं ॥ श्रीसहित नाथ निघाला घनघोरीं ॥ हारिखें पातला गंगाद्वारीं ॥ तीनराती वस्ती करोनियां ॥ १७ ॥ तेथोनि निघाले घन गर्जने ॥

पातले डाकिनी तीर्थस्थान ॥ सूर्यकिरण झाले हयग्रीवा पासोन॥ बाहत्तर प्रथम प्रहरीं जो आला ॥ १८ ॥ भै
रवभार सज्योनि नामाभिदानी ॥ गौरविली भैरव वाहिनी ॥ वीरकंकणासीं सर्वीं बांधोनी ॥ श्रीनाथ बैसला भै
रव सभागारीं ॥ १९ ॥ श्रीलक्ष्मीसीं खड्गपाणी ॥ विचार करोनि एकांत भुवनीं ॥ तोरण भैरवासीं प्रबोधोनी
॥ संह्याद्रीसीं धाडिला ॥ २० ॥ युद्ध करोनि तोरण भैरवासीं ॥ भेद करोनि नेले रत्नागिरीसीं ॥ हें नवमाध्यायीं-
च्या कथार्थासीं ॥ संत सज्जनांसीं निवेदिलें ॥ २१ ॥ गुंफोनि सप्तविंशती नक्षत्रमाळा ॥ घालोनि बद्रिनाथाच्या
गळां ॥ रत्नासुरें बोधोनि विचार कुशळा ॥ अवतारींचीं वर्म कर्में विस्तारिलीं ॥ १२ ॥ रक्तभोजाचा जो नंदन ॥
महापराक्रमी धीरोचन ॥ रत्नासुराचे आज्ञेनें जाण॥ गेला भीमाशंकरापासीं ॥२३॥ वरिवरि वृंदावन उत्तमंदिसे ॥
अंतरीं शोधितां केवळविष ॥ प्रतापदावोनि उत्कर्ष ॥ उर्द्धपंथें तो उडोनि गेला ॥ २४ ॥ वेषपालटोनि रुधिरोच-
न ॥ सिष्ठाईचें मधुरवचन ॥ नाथा सन्मुख उभाराहोन ॥ स्तंभासीं टेकोनि वदोनि गेला ॥ २५ ॥ त्यावरी गण-
पतीस छळिलें दशकंदरें ॥ तैं गणेश कोपोनि निजांतरें ॥ प्राणलिंग दिधलें गौरिहरें ॥ तें या महीवरी लंबोदरें
स्थापिलें ॥ २६ ॥ गोकर्ण स्थापिला लंबोदरें ॥ तयाची महिमा सविस्तार ॥ संत पंडित महंत चतुरें ॥ परिसि-
ली असे दशमोध्यायीं ॥ २७ ॥ मार्तंड भैरवासी वीरकंकण ॥ श्रीखळनाथें स्वयें बांधोन ॥ सप्तकोटीगण देऊन
॥ मणिमल्ल मर्दनासीं धाडिलें ॥ २८ ॥ कानडा शब्द पडिलासेजन प्रघातीं ॥ सप्तकोटीसी यळकोट ह्मणती ॥
बारामल्लारा पासोन शस्त्र घातीं ॥ मणिमल्ल मर्दिला परिवारा सहित ॥ २९ ॥ त्यावरी भैरव चमूसीं संघटा ॥ ना
थ पातला श्रीमूळपीठा ॥ अवंदासुर उपडोनि कांटा ॥ अकंटकी केलें कृष्णातीर ॥ ३० ॥ ध्रिम्रासुरादि दैत्य दैं-

त्यसकळ ॥ नाथें वधिले दनुज सबळ ॥ भीमाशंकरापासोन स्थळोस्थळ ॥ शोधोनि दैत्य दीर्घ विशाळमारिले
॥ ३१ स्थळ शुद्ध करोनि गिरिकंदरें सारीं ॥ श्रीनाथ निघाले शक्तीपरिवारीं ॥ घनघोरें दळबादल भेरी ॥ श्री
यालय नगरासीं उत्तरले ॥ ३२ ॥ हे एकादशोध्यायींची कथा ॥ विस्तारें परिसे संतश्रोता ॥ त्यावरी लक्ष्मी-
वदे खळनाथा ॥ दैत्य वधार्था योजोनि धाडावें ॥३३॥ ह्मणोनि काळरात्रीसीं तीव्र धाडी ॥ तें देविलाख्यासीं का
ळाग्निधाडी ॥ तिनें युद्ध करोनि काढिली दैत्यांचीं आतडीं ॥ देविलाख्य मस्तक उडविलें ॥ ३४ ॥ तें जावोनि प
डिलें रत्नागिरीवरी ॥ वदलें संग्राम करणी सारी ॥ हाकथार्थ द्वादशोध्यायींचे अंतरीं ॥ असे तो केला श्रवण सं
तमुनिवरीं ॥ ३५ ॥ त्रयोदशोध्यायीं कुंभासुर ॥ काळभैरवें वधिला फोडोनि उदर ॥ तया पासोनि दानव कूतोह-
लासुर ॥ उद्भवले घोर संग्रामीं ॥ ३६ ॥ तेही वधोनि काळभैरवें ॥ त्यावरी इंद्रायणीतें देवें ॥ ह्मैषासुराच्या मनी
चा भावें ॥ तया वधार्थीं इंद्रायणी धाडिली ॥३७॥ नाथें हीं जावोनि शक्ति परिवारीं ॥ ह्मैषासुरासीं वधिलें पाठारीं ॥
इंद्रायणीच्या निजकरीं ॥ घोर संग्रामीं वधिला दैत्य ॥३८॥ जैसे चौदाभुवनींचे महाजन ॥ करिती अनेक रीतीचें भा
षण ॥ तैसें चौदाव्याचें निरूपण ॥ संतमुनिजनीं श्रवण केलें असे ॥३९॥ पंचदशोध्यायीं सिंधुराज ॥ युद्धीं खवळला
उन्मत्तगज ॥ तो वधिला काळभैरवें दिग्गज ॥ गंडभैरवें निनाई सिद्धेश्वरें ॥ ४० ॥ सिंधुराज पराक्रमाची करणी ॥
झाली अद्भुत समरंगणीं ॥ गंडभैरवानें वधिला समरंगणीं ॥ काळखड्ग घेवोनि करीं ॥ ४१ ॥ आतां षोडशोध्या-
यीं बत्तीसाक्षरीं ॥ प्रथम वर्णिला बद्रिविहारी ॥ काळभैरव गंडभैरव अंजनीकुमरीं ॥ पुष्कर विमान भंगिलें ॥४२॥ उ
७२ कार मातृका बत्तिसाक्षरीवर्णीं ॥ कीर्ति उद्भट मृदुभाषणी ॥ अंगींची मळी काढोनी ॥ नाथें निर्मोनि रत्नाद्रि धा-

डिला ॥ ४३ ॥ हे कथा सप्तदशोध्यायीं ॥ परिसिली मुनिजन समुदायीं ॥ आतां अष्टादशांतील कथान्वयीं ॥ सं
तीं ह्रदयीं धरावी ॥ ४४ ॥ अष्टादशाचे सातवें श्लोकीं ॥ बीजाक्षर न ह्मणावें शूद्रलोकीं ॥ उच्चारितां होय दुःखी
॥ हें निश्चयेंसीं श्रीनाथ ह्मणे ॥ ४५ ॥ चारी दिवस नाथरायें ॥ युद्ध केलें प्रतापशौर्यें ॥ चर्पटअंबा रणगांभिर्यें ॥
नाथासीं साह्य झाली रणांगणीं ॥ ४६ ॥ जाज्वल होतां चोपडाई ॥ ह्मैसासुर झाला रत्नासुर देहीं ॥ मर्दिला त्रि
शूल खड्ग घायीं ॥ हें अष्टादशोध्यायीं परिसिलें ॥ ४७ ॥ एकोणिसांत रक्तभोजन ॥ घोर संग्रामीं पातला मरण
॥ रक्ता पासोनि उद्भवले दारुण ॥ संहारिले ते अष्टांग विषयी ॥४८॥ खळनाथें रक्तभोजना ॥ थोर संग्रामीं केले
हनना ॥ तें विस्तारें झाले श्रवणा ॥ संत महंत गुणिजनांसीं ॥ ४९ ॥ विंशती अध्यायीं इतिहास कथन ॥ अष्ट
गंधाचा संदेह हरण ॥ मधुमुरूचें जनन मरण ॥ संतीं श्रवण केलें असे ॥ १५० ॥ एकविंशती अध्यायांत ॥ को
ल्हासुर करवीराचा निःपात ॥ करोनि त्रयमल्लीनें स्वहस्तें ॥ करवीरासुर वधियेला ॥५१॥ घेवोनियां करवीरासीं ॥
राजीं स्थापिलें लक्ष्मीसीं ॥ नाथ पातला रत्नागिरीसीं ॥ भैरवभारें गजरानें ॥५२॥ लक्ष्मी येवोनि आपण ॥ रत्नांकित
सिंहासन ॥ नूतन निर्मोन नाथनिरंजन ॥ सिंहासनीं बैसविला ॥ ५३ ॥ हे युग्मविंशती अध्यायींची कथा ॥ सक
ळीं परिसिली विस्तार पुरता ॥ जळसेना अष्टगंधीं समरसहोतां ॥ पोवतें चंद्रसेना झाली ॥ ५४ ॥ आतां एका
दशीचें महदाख्यान ॥ तेविसाव्यांत विस्तीर्ण पूर्ण ॥ चोविसाव्यांत जालंदर जनन मरण ॥ वृंदाउद्धारण केलें वै
कुंठविहारें ॥५५॥ पंचविसाव्यांत द्वादशलिंगें ॥ अगस्तीनें अर्चिलीं अंगें ॥ सविसाव्यांत तीर्थ मुनिवर श्रृंगें ॥ जे पा
वले मुनिमानस वसंतीं ॥ ५६ ॥ यमाईची घ्यावया भेटी ॥ नाथ जातसे महाजनदाटी ॥ चैत्र मधुमासीं निशाण

काठी ॥ अपार दुंदुभीसीं गर्जती ॥ ५७ ॥ ह्या कथेचा सुधारस ॥ सप्तविंशतीं विस्तार बहुवस ॥ वसंतऋतुकाळीं यात्रा मनोल्हास ॥ पौर्णिमा पर्वणीसीं महाजन येती ॥ ५८ ॥ पुनरपी अगस्तीनें अष्टतीर्थें ॥ केलीं भागीरथी प्रीत्यर्थें ॥ चत्वारी जळसेन वंदोनि पूजिला नाथें ॥ कलशकुमर वंदी पुनरपी ॥ ५९ ॥ हा कथार्थ अष्टविंशतीं अध्यायाचा ॥ संतीं सेविला बहुदिवसांचा ॥ भागीरथीचें अगमन साचा ॥ विस्तार एकोणतीसामाजीं वदला असे ॥ ६० ॥ दंपत्य होवोनि अनंतव्रतीं ॥ भोजनास गेला दक्षिणपती ॥ ब्रह्मा विष्णु श्रीपशुपती ॥ पृथकाकार होवोनि आले ॥ ६१ ॥ हे तिसाव्यांतीं कथा गहन ॥ अनंतव्रताचें महदाख्यान ॥ वदला सूत शौनकासीं जाण ॥ धनंजयासीं यदर्थीं वसिष्ठ वचनें ॥६२॥ अमृतवृक्ष वृषभ धेनु पुष्कर्णी ॥ यांची कथिली जन्म काहाणी ॥ ते श्रीकारक परम शिराणी ॥ एकतिसाध्यायीं परिसिली संतीं ॥ ६३ ॥ बतिसाध्यायीं गजेंद्रोद्धार ॥ अनंतभक्त उद्धरी हिमकेदार ॥ प्रल्हादचरित्रादिक विस्तार ॥ संतमुनिवरें परिसिले ॥ ६४ ॥ तेतीसाध्यायीं सर्व हरिजन ॥ अळंकारादि पंचांग श्रवण ॥ करोनि सेनान्हावीदावित दर्पण ॥ अळंकारिलें नरहारी सोनारें ॥ ६५ ॥ नरदेह उत्तम रांजण भाचर ॥ ज्ञानाग्नि भाजोनि गोरा कुंभार ॥ आणी चैत्रमासीं अपार ॥ भक्तजनांसीं देती हे साक्ष अद्यापी ॥ ६६ ॥ तुकोबावाणीयानें ॥ त्रिपुटीवरी घातलें चक्रासन ॥ हरिनामाचे अभंग केणें ॥ हरिनारायण सौदागरीचें आणिलें ॥ ६७ ॥ गोमा सावंताचें अजन्मजनन ॥ तेतीसाध्यायीं ऐकिलें श्रवण ॥ भक्तिभावार्थाचीं शुभलक्षणें ॥ संपूर्ण कथिलीं जाणतसा ॥ ६८ ॥ चौतिसाध्यायीं कथापरम ॥ नावजीचे हरावयालागीं श्रम ॥ घरासीं जावोन भक्तकाम कल्पद्रुम ॥ पूर्ण केलें दिनानाथें ॥ ६९ ॥ चत्वारी त्रिंशती अध्यायीं

॥ कथा परिसिली संत समुदायीं ॥ आतां युग्मगीताष्टक केदार विजयीं ॥ पस्तिसाध्यायीं परिसावें ॥ ७० ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वात्मा कृति भूषितं घृतदशा लीलावतारो कृतीं ॥ त्रेतायां खलु द्वापरेण रमितं भक्त्या कृतं सारथीं ॥ बौध्यः कल्किदयो विचित्र तरणी दक्षं प्रखांतेश्वरं ॥ चंडीः श्रीहयवाहनं दशभिदं क्रमण पदांघ्रिंनमो ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ गीतस्यास्य वामकरीराग रूपक तालेनगीयते ॥ त्रिगुण गुणमय सगुण करुणानिधि मीन कमटतनुघृत जलधिमथनं ॥ पान करवी अमृत विबुधादिका मोहनीस्वरूप निकेतनं ॥ १ ॥ आनंदीने भवभंजनं ॥ खळनाथ निरंजनं ॥ घ्रु० ॥ वराह कृति कारण करोनि कदनीं यदुनंदनें ॥ नरतनुमुख उत्कटपट केशरीकटतट नीट सुखंदिने ॥ २ ॥ आनं० ॥ वामन शतक्रतु भंगुनियां बळिद्वारीं चिन्मय मंडणें ॥ भृगुपति भृशंकेत कृतारणीं क्षितिपति करिरद खंडणें ॥ ३ ॥ आनं० ॥ वृष्णिकुलोत्तम हलधर अष्टम माया पुतना शोषणें ॥ कंस अघा बगळादि बकासुर वासरु केशी विदारणें ॥ ४ ॥ आनंदी० ॥ हस्ताभ्यां घृत खड्गडमर त्रिशूल पात्र क्रमणपदी मुनिमानस रंजनें ॥ रत्नासुर वधोत्सव मानुनि शोणित भोजगंजे ॥ ५ ॥ आनं० ॥ केयुराणिविभूषित मणिमणे विरवर विकुर मंडणें ॥ चापशराग्नि विदारण वारण गाधिसुत मख रक्षणें ॥ ६ ॥ आ० ॥ दशविधरूप खळेश शिखामणी ॐकार क्षकार पीश्वर व्यंजनें ॥ श्रीहरी नारायण पदकमळीं भृंग हरिस्मरणामृत सेवुनि कुंजनें ॥ ७ ॥ आनंदीने भव भंजनं ॥ ॥ इति प्रथमप्रबंधः ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केदारं जयकेदारं जयकेदारं विजयाकारं ॥ ॐकारं बीजाकारं साकारं मकाराकारं ॥ पारं नच तव गुण आकारं कृपया पारं अपरं पारं ॥ सारं हरिनाम तुसारं सेवित धन्य मनुजं वारंवारं ॥ ८ ॥ श्रीमुद्रीं खळेश चंद्रीं प्रथमातो चित्समुद्रीं पहा

॥ बद्रिनाथ सुबद्रि भैरवरूपीं उदवाद्रि सादशहा ॥ गृध्रा शोणित भक्षुरद्रि विचरे रत्नाद्रि तैं चित्करी ॥ मर्दी रा
क्षस रौद्री चंडी स्वरूपीं संह्याद्रि चिद्गांदरीं ॥ ९ ॥ श्रीमद्रवळनाथ निर्गुण गुणासंस्थापनार्थं विभू ॥ चिद्रत्नागि
रि भूषणैः कली वरान् नीलोत्पलान् भूषितां ॥ खड्ग डमर पात्र शूल धरवान् गंगाधरो मूर्तिमान् ॥ मां पाही क
रुणा निधि क्षितिपते श्रीदक्षिणान् मूर्तयत् ॥ १० ॥ गीतस्यास्य वराडीराग अष्टताली तालेन गीयते ॥ एकाग्र
मानस कृतं ह्रदय कमलेन रंचिंतितं देव परेशं ॥ त्रिगुण गुणमय धृतं सगुण तनु सुंदर ज्योतिरूपं स्वरूपं ॥
॥ १ ॥ नमो श्रीनाथ बद्रिनिवासं ॥ मुगुटी रविकांती वतलोल तंसं ॥ धृ० ॥ मृगमद सुतिलकं रम्य शुकनाशि-
क करयुगें धृत डमर खड्गशूलं ॥ वामपाणीं सुधापात्र हयवाहन दैत्य दोर्दंड कृत खंड खंडं ॥ २ ॥ नमो श्रीनाथ
॥ तव दुतिसु मंजरी भवतुं भवशासनं ॥ मुख कमली केश पिच्छ मयूरं सुरंग बिंबाधर भ्रूकुटी धनु सुंदर कर्णीं
कुंडल भुजंग मार्तंड कीरणीं ॥ ३ ॥ नमो श्री० ॥ कुंभिनी वाहानारूढ भूषय सदा क्रमणपदी कांतीका द्रव्यारिपु
बंधुपूर्णं ॥ घननील मय कलिवरं चंदनागरयुतं दिव्यकांती यद्विजंघं ॥ ४ ॥ नमो श्रीरवळेश० ॥ बद्रिकाश्रम त्य
जोनि श्रमवि दनुजारणी श्रीकरे निकरी परिवार कोशं ॥ रत्नासुर वधोत्सव रक्त जयहतं तंव करय जयतु केदार
मेशं ॥ ५ ॥ नमो श्रीरव० ॥ रत्नांचलय मंडलं खळ असुर खंडणं धृतस्वरूप धर्म संस्थापनार्थं ॥ नव गुणार्णव न
च वर्णन मंदमति दुरित तिमिर हरय हरि नामस्मरणं ॥ ६ ॥ नमो श्री० ॥ ॥ इति द्वितीय प्रबंधः ॥ २ ॥
॥ ॥ श्लोक ॥ ॥ भस्मांग कृत चांगंगांगचपलां जय मंगला कारकं ॥ अभ्यांगं कृत मांगल जननी धरं जंघा
ग्रीयो भूषितं ॥ चंद्रार्ध धृत शेखरं हरं सत्वै रजश्चास्त स्तमानं ॥ तस्मै ज्योतिस्वरूपं चतुर्भुज गुणौ त्रैलोक्य ना

थं विर्श्व ॥ ११ ॥ ॥ गीतस्यास्य गुणकरी रागरूपक तालेन गीयते ॥ ॥ रत्नांकित दुर्गाय दुर्गा ऐ रमणार्के स्वर्गाय धृत त्रिशूलपात्र डमरं ॥ कपर्दिक भर्गाय भक्तास्तवर्गाय दीर्घायु गर्गाय ऋषिवर प्रियकर ॥ १ ॥ जय मंगला कारक मंगलाभ्यां ॥ मंगल जननी धर जयपल जंघनं ॥ ध्रु० ॥ प्रतिष्ठायच परम जेष्ठाय भरत खंडाग्री दक्षिणदीप ॥ २ ॥ जय मंगला कार० ॥ निरीक्षाय गुरुवर दीक्षायप मन परिक्षायमुनीत्हदय कमळी भ्रमरं ॥ अपरोक्षाय धृत भक्त पक्षाय अंतर साक्षाय त्हदघटीं मठीं दिनकरं ॥ ३ ॥ जय मंगला० ॥ चंद्रार्क कीर्णायच्चत बिल्व पर्णाय तंस अपर्णाय वामांगी भूषितांगं ॥ त्रिनेत्र अकर्णाय कवरी विस्तीर्णाय अतसिका पुष्प वर्णाय श्रीज्योतिर्लिंगं ॥ ॥ ४ ॥ जय मंगला० ॥ निर्गुणा काराय वषट काराय कल्पांत भैरव अकारायकं ॥ ॐकार बीजाकाराय कलिकका र ह्रीकाररकोरायकं ॥ ५ ॥ जय मंगला० ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्या अष्टपदीसीं चतुषष्ठी श्लोकीं ॥ श्रवण केलें पुण्य श्लोकीं ॥ हें दुर्लभ या वामन लोकीं ॥ श्रीनाथ कृपावलोकनेंचि हे सिद्धी ॥ ७१ ॥ मुकंकरोति वाचालं ॥ ऐसा जयाचा नेम अचळ ॥ पंगु लंघी गिरिमंडळ ॥ हें सत्य करोनि दाविलें या ग्रंथीं ॥ ७२ ॥ आतां चूर्णिका गर्भयमकीं ॥ सावध परिसावें सिंहावलोकीं ॥ तें श्रवण करितां अति कौतुकीं ॥ अकौतुकीयार्थीया इच्छिते ॥ ७३ ॥ ॥ आतां चूर्णिकेचा अर्थ लिहितों ॥ ॥ ऐसें द्वयगीताष्टक श्लोकार्चन ॥ विस्तारिलें भविष्योत्तर ब्रह्मांड पुराण ॥ तें हें हरिमतीचें कनक कोंदण ॥ श्रीनाथअंगीं पस्तिस माणिकें जडियेलीं ॥ ७४ ॥ सारांश हें नाथ कृपेचें भाषण ॥ जाणती आत्मानुभवी विचक्षण ॥ यदर्थीं नाथा विरहित हें लेखण ॥ अणुप्रमाण हें घडेना ॥ ७५ ॥ सर्वात्माकृती भूषण हरी ॥ कृतायुगादि लिलावतारी ॥ सारथी झालासी द्वापारीं ॥

अर्जुनाचा समरंगणीं ॥ ७६ ॥ ऐसा दिनानाथ दीन कैवारी ॥ राज्य करित असतां हिमकेदारी ॥ पाणी वाहे एकनाथा घरीं ॥ सेले विणी कबिराचे ॥ ७७ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान ॥ मुक्तास्य मिराबाई गुणनिधान ॥ जनी नामदेवा हस्तें करिसी भोजन ॥ एकाजनार्दन रोहिदास ॥ ७८ ॥ रामदासस्वामी श्रीरघुनाथ ॥ भक्तिस्तव वृंदावनीं मधुमासीं डोलत ॥ हें ब्रह्मनाळीं कृष्णावेदा संगमांत ॥ एकशेंनऊ वर्षें झालीं ॥ ७९ ॥ तयावरी जयरामस्वामीचा अवतार ॥ धरोनि केला पृथ्वीचा उद्धार ॥ ऐसे भक्त स्थळो स्थळी उद्धरिले अपार ॥ हिमकेदार सर्वात्मक चराचरी ॥ ८० ॥ काम क्रोधादिक मदमत्सर ॥ हेचि रक्तभोज करवीर कोल्हासुर ॥ ब्रह्म सायोज्य करोनि मार ॥ चिद्रत्नाचळ ठाणें घेतलें ॥ ८१ ॥ देह रत्नागिरि तेचि त्रिपुटी मैनागिरी ॥ ज्योतिर्मय प्रकाशला सबाह्यांतरीं ॥ सहस्रदळीं भ्रमराकृती हे सुंदरी ॥ ज्योतिस्वरूप जगदांकुरली ॥ ८२ ॥ ऐसा हरिनारायण श्रीगुरुनाथ ॥ पूर्ण केला केदार विजय ग्रंथ ॥ श्रवणार्थी यांचा पूर्ण करील मनोरथ ॥ सद्भक्तीलीप्रियकर रवळेश्वर ॥ ८३ ॥ दुरित दनुज दमोनि स्वयें ॥ सद्भक्तांसीं देवोन अभय ॥ सिद्ध झाला केदारादिग्विजय ॥ कृपान्वयें पूर्ण श्रीनाथाचे ॥ ८४ ॥ काया वाचा मनें करून ॥ श्रीगुरुनाथासीं यावें शरण ॥ श्रीकेदारविजय करितां श्रवण ॥ दोष दारुण नासती ॥ ८५ ॥ श्रीनाथाचें वरदवचन ॥ विनयमनें मस्तकीं वंदोन ॥ संवत्सर प्रतिपदेसीं शुभदिन ॥ जाणोनि ग्रंथारंभहा करविला ॥ ८६ ॥ काम क्रोध अहंता दंभ ॥ हे ईश्वर भजनीं झाल्या स्वयंभ ॥ ह्मणोनि केदारविजयारंभ ॥ संवत्सर प्रतिपदेसीं करविला आवडी ॥ ८७ ॥ ग्रंथ लिहितां प्रतिपदेसी ॥ हाचि कवनार्थ उपदेशी ॥ सावध करित पदोपदीसी ॥ पुराण प्रसिद्धेसी चरितान्वया ॥ ८८ ॥ संवत्सर प्रतिपदे पासोनि जाणा ॥


अश्विन प्रतिपदेसीं षण्मास गणना ॥ विजय दशमी शुभदिना ॥ सीमा उल्लंघना पर्यंत ॥ ८९ ॥ करोनियां प्रातःस्नान ॥ शुचिष्मंत हें करविलें लेखन ॥ स्नाना विरहित न लिहिलें जाण ॥ ऐसीच नाथ आज्ञा स्नान करोनि ल्याहावें ॥ ९० ॥ हाचि श्रीकेदाराचा निश्चय ॥ करवोनि लिहविला केदारविजय ॥ माझें हृदयींचे तापत्रय ॥ हरविले समूळ ग्रंथान्वयीं ॥ ९१ ॥ श्रीगुरुकृपा रसभरितु ॥ केदारविजय वरद ग्रंथु ॥ पूर्ण करविला जेवीं नळाहातीं सेतु ॥ रामयणीं ज्यापरी वानराहस्तीं ॥ ९२ ॥ नाहीं व्यूत्पन्नाची संगती ॥ नाहीं गीर्वाण रसोत्पत्ती ॥ तर्क भाष्य व्याकरण अहंकृती ॥ ऐसें स्वप्नींही नाहीं देखिलें ॥ ९३ ॥ सर्व विषय प्रतिकुळ असोनियां ॥ हें कैसें करविलें विदीत अवघियां ॥ येथें यदर्थी ल्याहावया ॥ कारण कांहींच असेना ॥ ९४ ॥ नेणवे काय श्रीनाथराया ॥ बळेंचि करविलें केदारविजया ॥ सत्य मिथ्या अर्थान्वया ॥ कर्त्ता यदर्थी दक्षिणपती ॥ ९५ ॥ म्यांच हा ग्रंथ केला ह्मणावें ॥ युग्म संवत्सर पर्यंत लागे ॥ ल्याहावें तें समाप्त होय कीं न होय अभावें ॥ हेंचि सर्व मिथ्या मीपणें ॥ ९६ ॥ तैसें यदर्थी अहंतालयीं ॥ न बैसवी नाथ कालत्रयीं ॥ अखंड विरचितां संत समुदायीं ॥ विभक्त हननार्थी दर्शविलें ॥ ९७ ॥ कीं ज्योति स्वरूपाचि केलें निर्विकारी ॥ विभक्त हननार्थी भक्तानुग्रह आकारी ॥ केदारविजयार्थांतर विकारी ॥ हें संवत्सराचें फळ लाभलें ॥ ९८ ॥ तें कैसें ह्मणाल कृतनिश्चयें ॥ षण्मास झाले विजयादशमीये ॥ चैत्र फाल्गुण मासादि तापत्रयें ॥ संसार व्यावृत्ति मन गुंतविलें ॥ ९९ ॥ चत्वारी महिनेवरी दहादिवस ॥ शुद्ध अश्विन दशमी विशेष ॥ केदारविजय बीज वटांश ॥ श्रीगुरुनाथ कृपाघनें विस्तारिला ॥ २०० ॥ चार महिन्यावरी दहादिवस ॥ संसार व्यावृत्तीचा ह्व्यास ॥ करितां अध्याय पस्तिस ॥

प्राकृत मनुष्य कायकरी ॥ १ ॥ हे प्रचीत पावली माझियामना ॥ नवरात्रीं करितां हरिकीर्तना ॥ भांडारगृहीं कर
विलें लेखना ॥ सप्तरात्र दिवस पर्यंत ॥ २ ॥ उत्तराध्यायींचे सप्ताध्याय ॥ माझिया हस्तें युग्मदिनीं नाथराय ॥
आवडी लिहीवी केदारविजय ॥ विजयादशमी पर्यंत भोमवासरीं ॥ ३ ॥ कीं हा केदारविजय कनक कलश ॥ पस्तिसा
ध्याय रविप्रकाश ॥ कीं पंचत्रिंशती अध्याय भांडार कोश ॥ नवनिधिरस भरियेला ॥ ४ ॥ कीं या पस्तिस प्र-
स्थानभेरी ॥ कथान्वय रसिक गर्जनाकरी ॥ हा विजय घोष पृथ्वीवरी ॥ सूर्यप्रभें सारिखा ॥ ५ ॥ कीं रत्नासुराच्या
मुगुटींचींरत्नें ॥ रत्नागिरिवरी विखुरलीं प्रयत्नें ॥ त्यांतीलहीं अप्रयत्नें ॥ षष्ठिपूजा जनांसी आणिलेंनाथें ॥ ६ ॥ कीं
हाकेदारविजय सागरु ॥ यामाजी पस्तिस खणाचें जडिततारूं ॥ कींहे पस्तिस शामकर्णवारू ॥ श्रीनाथ चरित्रीं हेमा
भरणीं शोभलें ॥७॥ कीं हे पस्तिस मानस सरोवर ॥ नवरत्नखचित सुमनोहर ॥ कीं पस्तिस शृंगाचागिरीवर ॥ रत्नागिरी
सीं विराजिला ॥८॥ कीं पस्तिसरागांचा दिव्यरथ ॥ पस्तिसखणी रत्नखचित ॥ नानाख्यानीं नवनिधिभरित ॥ भक्तांस्त-
व आणिला रत्नागिरी ॥९॥ कीं पस्तिस रंगाचेंवैडूर्य पात्र ॥ केदारविजय रसभरिला पवित्र ॥ तेपाहोनि नयनींसंत सत्पा-
त्र ॥ वदंन करोन श्रोतीं सेविजे ॥ १० ॥ सकळ देवांमाजी शचिरमण ॥ पत्रांमाजी बिल्वपर्ण ॥ सप्तार्णवामाजी क्षीरार्णव
जाण ॥ हा ग्रंथराज अष्टमगणावा ॥ ११ ॥ कीं विवेक सिंधूची अमोल्यवाणी ॥ तेचि श्रीदासबोधीं जाहली शिराणी ॥ हेज-
न्ममुक्ता संबोधनी ॥ यदर्थीं नाथेंसंशयार्थीं वदविलें ॥ १२ ॥ नवरात्रातें नवविध भजन ॥ केदारविजय करावें मनन
श्रवण ॥ नवरात्रीं एकाग्रमन करून ॥ श्रवण पठणार्थीयां कार्यसिद्धी ॥ १३ ॥ उपोषित अथवा फलाहारी ॥ पठण
करावें निरंतरीं ॥ विवेकसिंधूची अमोल्य उत्तरी ॥ शुचिर्भूत नवरात्रीं सविजे ॥ १४ ॥ संत सज्जनीं मुनिवर्रीं

परिसावें आदरें ॥ सत्वरज तमाचे आकारें ॥ कथिला तो अर्थांश विवरें ॥ ग्रंथ आदरें वाचावा ॥ १५ ॥ एक मंडळ धनार्थीयानें ॥ एकचित्तें अर्थान्वयानें ॥ केदारविजय तीन आवर्तनें ॥ केलिया पठणार्थी लाभे कार्यसिद्धी ॥ १६ पुत्रार्थी यानें तीन मास ॥ पठण करावें भक्ति स्वस्थ मानस ॥ नव आवर्तनीं दक्षिणाधीश ॥ सुफल करिल मन-कामना ॥ १७ ॥ कारागृहादि बंधन ॥ परिहरती शतावर्तनें करून ॥ सर्व कार्यार्थी करितां पठण ॥ षण्मासें पावे धन संपत्ती ॥ १८ ॥ पुष्यार्कवारीं एक आवर्तनीं ॥ रोग पीडा परिहरे श्रवणीं ॥ निष्कामी पठण करितां ब्रह्मज्ञानी ॥ ग्रंथ आदरें वाचितां होय ॥ १९ ॥ विश्वास भाव धरील ग्रंथ पठणीं ॥ त्यासी कृपा करील खड्गपाणी ॥ ऐसी श्रीनाथ वरदवाणी ॥ केदारविजयीं वदली असे ॥ २० ॥ निष्कामीं करितां ग्रंथ पठण ॥ तयासीं होय ब्रह्मज्ञान ॥ अखंडीत करितां श्रवण ॥ दोष दारुण नासती ॥ २१ ॥ ऐसा केदार विजय निधी ॥ संग्रह करितां धनधान्य संमृद्धी ॥ करिल निश्चळ अचळबुद्धी ॥ चतुर्विध भक्ति मुक्ति देतसे ॥ २२ ॥ ह्मणोनि सज्जनीं एकाग्रचित्तें ॥ पठण करावें परमार्थ स्वार्थें ॥ ग्रंथीं ठेवितां दृढ भावार्थ ॥ द्वीमासीं एकविंशती आवर्तन करावें ॥ २३ ॥ धनधान्य स्त्री सुत शतायुष ॥ पुत्र होईल दक्षिणाधीश ॥ श्रीधनधान्य लाभे उत्कर्ष ॥ संमृद्धि विशेष गुरुनाथ कर्त्ता ॥ ॥ २४ ॥ झालें केदार विजय कथन ॥ भक्तांसी श्रीकारक दुरितांसी दहन ॥ यदर्थीं केदार विजय वचन ॥ सत्य सत्य त्रिवाचा २२५ ॥ येथें श्रोता वक्ता श्रीनाथ ॥ सर्वात्माकृती साक्षीभूत ॥ पूर्ण करिल पठणार्थीयाचें मनोरथ ॥ स्वार्थ परमार्थ सर्वही ॥ २६ ॥ नवचंडीमाजी नवराती ॥ पठण करावें त्रिआवृती ॥ जय कल्याण दैवि संपत्ती ॥ दक्षिणपति देत भावार्थ धरिलिया ॥ २७ ॥ यद्भावनाकार मूर्तिमंत ॥ श्रवणार्थी होईजे जयवंत ॥ यदर्थी वद-

ला खळनाथ ॥ संत महंत हरिजन कैवारी जो ॥ २८ ॥ जेवीं तारांगणीं निशाकरमणी ॥ कीं प्रभावेष्टित वासर मणी ॥ तैसा केदार विजय चंडांशु कीरणीं ॥ पस्तिसाब्रणीं शोभला ॥ २९ ॥ शकेसतराशें एकावरिचतु ॥ दक्षिणायणी शरदृतु ॥ केदार विजय संपूर्ण मस्तु ॥ चिद्रत्नवस्तु ज्योतिर्मय ॥ ३० ॥ विजयदशमीसी दिनमंगळ ॥ धनिष्ठा साठघटिका पूर्णपळ ॥ नवायोग नामशूल ॥ तैतिल कर्ण तेदिवशीं ॥ ३१ ॥ सर्व तिथीचा शुभान्वय ॥ नाथें करविला दिग्विजय ॥ विजयदशमीसीं केदार विजय ॥ पूर्ण झाला ग्रंथ भोमवासरीं ॥ ३२ ॥ पहिला चंद्र ज्योतिर्मयासी ॥ जाणोन केदार विजयासी ॥ समाप्त केलें विजयदशमीसीं ॥ दशम्यश्च धनिष्ठा नक्षत्र ॥ ३३ ॥ मंगळजननीघर मंडित जंघनी ॥ मंगळकारक हा खड्गपाणी ॥ मंगळवासरीं तुरंगम वहनीं ॥ मंगळवाद्यें पूर्ण झाला केदार विजय ॥ ३४ ॥ पंचगंगा उत्तरतीरीं ॥ रत्नाचळाचिये नवखण शिखरीं ॥ नववी रंग कनकांबरीं ॥ हरिनामध्वज उभविला चैत्रमासीं ॥ ३५ ॥ कीं या केदारविजय कनक ताटीं ॥ हरिनामामृत भरीलें चंद्रार्धपुटीं ॥ कीं पस्तिसाध्यान्न गोड ग्रास घे स्वाधिष्टीं ॥ समदृष्टि जे हरिभोक्ता ह्मणोनि सेविती ॥ ॥ ३६ ॥ कीं हरिनामामृताच्या सुवर्णवाटीं ॥ पस्तिस पूर्ण भरिल्या कथारसदाटी ॥ ते षष्ठिसीं लावितां नाथें वोटीं ॥ तैं कृपादृष्टि लक्षित हरिजनां ॥ ३७ ॥ हरिनारायण श्रीगुरुनाथ ॥ आमुचे प्रख्यात कुल दैवत ॥ श्रीरत्नागिरिवरि मूर्तिमंत ॥ मायबाप मजलागीं ॥ ३८ ॥ माझी जननी जनक दोघेजण ॥ श्रीगुरुनाथ हरिनारायण ॥ अंगापुरकर देशमुख रामचंद्र नंदन ॥ गोपाळराव पितृव्य माझा ॥ ३९ ॥ माझी माय प्रत्यक्ष यमुना ॥ जीचेनि प्रसादें पावलों जनना ॥ केदारविजय सिंधूच्या पस्तिस रत्ना ॥ काढोनि हरिद्रापा

त्रीं वोगारिलीं ॥ ४० ॥ तीं हीं त्रिस्तारिलीं नवरस भजनीं ॥ संत श्रोतीं श्रवणाननीं ॥ सेविजे अमळचित्तें पं-
डितजनीं ॥ जेवीं पकाम्रत शिखरणी सुवास ॥ ४१ ॥ इति केदारविजय सागर ॥ त्यांत पस्तिसाध्याय नौ-
कासुंदर ॥ त्यांतील हरिनाम केणें घ्या आपार ॥ पस्तिसाध्याय सेवोत गोडहा ॥ २४२ ॥ इति श्रीकेदार वि-
जय करवीरकांड ॥ केदारखंड भविष्योतर पुराण ॥ ब्रह्मोत्तरखंड पद्मपुराण काशीखंड ॥ अग्निपुराण विराचि-
तायां पंचत्रिंशतीतमोध्यायः ॥ ३५ ॥ प्रसंग ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ ॥ ॥


अध्याय ३६वा
श्रोते
कीर्त
श्रीकेदारनाथाचें देवालय

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीमत्सीतारामचंद्रायनमः ॥ श्रीरवळेश्वरायनमः ॥ जयजय पौगंडऋषेश्वर ल्हदयारविंदा ॥ जय विमलांवुज कराब्ज मिलिंदा ॥ जय रवळनाथ सच्चिदानंदा ॥ चिद्रत्नाचळीं अक्षयीं ॥ १ ॥ अकारादि क्षकारी ॥ काना मात्रा व्यंजन उकार मकारी ॥ श्रीकेदारविजय बत्तिसाक्षरी ॥ पस्तिसाध्यायांतरीं जो शोभला ॥ २ ॥ कीं चतुःषष्ठि कलासूत्रें ॥ तैसीं पस्तिसाध्यायाचीं पस्तिस पात्रें ॥ केदार विजय रस भरिला आगममंत्रें ॥ संत सत्पात्रें सेवनार्थी ॥ ३ ॥ तें पस्तिस श्लोकीं पस्तिसाध्यायीं ॥ सज्जनीं धारिजे सदयल्हदयीं ॥ स्वस्थ बैसोनि सदयल्हदयीं ॥ केदार विजयसार जपतां जयश्री लाभे ॥ ४ ॥ प्रथमाध्यायीं केदार विजयीं ॥ गणेश सरस्वती जगद्गुरुध्यायीं ॥ निवृत्ति ज्ञानदेव मुक्ताबाई ॥ शकें मही बोधिल्या सिंधु सारिला परशरामें ॥ ५ ॥ तैं विंध्याद्रीं अस्त झाला वासरमणी ॥ तैं दैत्योत्पात कथितां मेदिनि ॥ तीर्ते प्रबोधोनि वज्रपाणी ॥ अगस्तीसीं दक्षिणेसीं धाडिलें द्वितीयाध्यायीं ॥ ६ ॥ त्रितीयाध्यायीं कलशकुमरें ॥ उत्तर मानस करोनि सारे ॥ स्वशिष्यासी करवोनि शयनाकारें ॥ माध्यान्हीं उदय दिनकर करविला ॥ ७ ॥ मायावेश नटनागर त्रिगुणावतारी ॥ पौगंडऋषिकांतेच्या जो जन्मला उदरीं ॥ तैं विद्युत्पात झाला रत्नागिरीवरी ॥ हरिहर ब्रह्मा मानापहारी तृतियाध्यायीं जाहला ॥ ८ ॥ जमदग्नी क्रोधाचे पांच विभाग करून ॥ वांटोनि देई शचिरमण ॥ ह्मणोनि नवनाथ नवरस प्रकरण ॥ चत्वारी अध्यायीं कथिलें असे ॥ ९ ॥ हरिद्वाराहूनि शक्तिचमू परिवारीं ॥ भैरव दळेसीं निघोनि घनघोरीं ॥ श्वेत वराह जेथें सोरमपुरीं ॥ रुधिरोद्गारी वधिला पंचमाध्यायीं ॥ १० ॥ सोरमाहूनि पातले श्रीसमुदायासीं ॥ अष्टादश भैरव चमू सहित काशीं ॥ एक मंडळ राहिले अनायासीं ॥ स्थापोनि विश्वनाथासीं बाहत्तर युगारंभीं ॥ ११ ॥ भूधरावतारेंसी घनघोर

॥ सोरटीं स्थापोनि सोमेश्वर ॥ महाकाळ स्थापोनि नर्मदातीर ॥ ॐ कार ममलेश्वर स्थापिला ॥ १२ ॥ षष्ठमाध्यायीं रेवातीरीं ॥ नाथ उतरला भैरव भारीं ॥ सुचंदन शिवरात्री कथा विस्तारीं ॥ मालती आख्यान सप्तमाध्यायीं ॥ १३ ॥ वेरुळीं स्थापोनि घृष्णेश्वर ॥ सिद्ध दळेसी पातले गंगाद्वार ॥ पंचवटिकेसीं येवोनि लवणासुर आणि खंदार ॥ सोनार सिद्धें वधिले अष्टमाध्यायीं ॥ १४ ॥ त्यावरी येवोनि भीमाशंकरीं ॥ श्रीसह अष्टादश भैरवभारीं ॥ गौरवोनि तोरणयासीं धाडिलें रत्नागिरीं ॥ तो युद्ध करोनि मिळाला नवमाध्यायीं ॥ १५ ॥ तें रत्नासुरें रुधिरोचना ॥ बोधोनि अवतार चरित्राच्या खुणा ॥ धाडिला तो भेदांग तीव्र भाषणा ॥ प्रताप दावोनि पातला संह्याद्रीं ॥ १६ ॥ गोकर्णेश्वर स्थापी विघ्नेश्वर ॥ दशमाध्यायीं असे विस्तार ॥ सप्तकोटी मार्तंड भैरवभार ॥ मणिमल्ल मर्दन करविलें ॥ १७ ॥ श्रीचमूसी नाथवळ उद्भट ॥ श्रीनाथ पातले मूळपीठ ॥ अवंदासुरादि गृध्रासुर कंटक ॥ उपडोनि श्रीयाळयीं दक्षिणपंथें उतरला ॥ १८ ॥ एकादशाध्यायीं श्रीयालय नगरीं ॥ श्रीनाथ उतरला शक्तिपरिवारीं ॥ दैत्यांचीं मृत्युवर्में कथोनी सारीं ॥ द्वादशाध्यायीं काळरात्रीनें देविलास्य वधिला ॥ १९ ॥ त्रयोदशाध्यायीं वधिला कुंभासुर ॥ दानव कोथळासुर भैरव निकर ॥ काळभैरवें छेदिले भयंकर ॥ दहासहस्र कृष्णा वरुणा संगमीं ॥ २० ॥ चतुर्दशांत झेषासुरासीं समरीं ॥ इंद्रायणीनें पाराशराचे पाठारीं ॥ झेषासुरा वधिलें झेषाई पाठारीं ॥ झेषाई होवोनि तेथेंचि राहीली २१ ॥ सिंधुराज त्रिपंचसहस्र परिवारीं ॥ गंड भैरव निनाई सिद्धेश्वरी ॥ वधिला सिंधुराज निशाचरभारीं ॥ पंचदशाध्यायीं संह्याद्रिचे पूर्वें ॥ २२ ॥ पुष्करादिक रुधिरोचन ॥ विमानीं भंगिले चौघेजण ॥ बत्तिसाक्षरींच्या विभूति स्तविला निरंजन ॥ षोडशाध्यायीं विस्तारें ॥ २३ ॥ उकार मातृका बत्तिसाक्षरी ॥ कीर्ति

भटें वर्णिले बद्रिविहारी ॥ भस्मांकित होवोनि जटाधारी ॥ अष्टभैरवेंसी नाथ रत्नागिरीं पातला ॥ २४ ॥ रत्ना
सुर आणि खळनाथ ॥ उत्तर निरोत्तर करिती बळसमर्थ ॥ मंडुकासुर शेषहस्तें वधवी नाथ ॥ सप्तदशाध्यायीं ख
ळेश्वर ॥ २५ ॥ चत्वारी दिवस नाथरायें ॥ करोनि युद्धासीं प्रतापशौर्यें ॥ चर्पटांचा रणगांभिर्यें ॥ रत्नासुरासीं व
धिलें अष्टदशाध्यायीं ॥ २६ ॥ एकोणिसांत रक्तभोज नाथें वधिला ॥ अष्टभावीं जो उपरमला ॥ अष्टगंधार्चनीं
जो मिरवला ॥ श्रीखंडाद्य युगायुगीं जो अद्यापी ॥ २७ ॥ विसाव्यांत नाथें विसावा ॥ घेतां लोपामुद्रा ह्मणे हे
घटोद्भवा ॥ मधूमूरू जन्मकाळ प्रश्न बरवा ॥ ह्मणोनि मधुमूरूचें आख्यान वदलें असे ॥ २८ ॥ एकविंशती अध्या
यीं अद्भुत ॥ करवीर कोल्हासुराचा करोनि घात ॥ राज्यीं स्थापोनि श्रीलक्ष्मीतें ॥ नाथ रुसोनि पातला रत्नागि
रीवरी ॥ २९ ॥ तैं लक्ष्मी येवोनि आपण ॥ स्वयें बोधोनि निरंजन ॥ नूतन निर्मोन सिंहासन ॥ नाथासीं बैसवि
लें रत्नाद्रीं सिंहासनीं ॥ ३० ॥ हे बाविसावे अध्यायींची कथा ॥ रक्तभोजनाची जळसेना कांता ॥ अष्टगंधीं सम-
रस होतां ॥ तैं रत्नासुर वनिता पोवते झाली षष्ठीसी ॥ ३१ ॥ आतां तेविसाव्यांत एकादशीचें आ-
ख्यान ॥ एकाक्षदेशीं मृदुमान्याचें केलें हनन ॥ चोविसाव्यांत समुद्र मंथनादि जालंदर जन्ममरण ॥ वृंदा उद्धा-
रण केलें वैकुंठविहारें ॥ ३२ ॥ द्वादशज्योतिर्लिंगें पंचविसांत ॥ अगस्तीनें अर्चिलीं स्वहस्तें ॥ बाराज्योतिर्लिंगें
स्थापिलीं प्रख्यात ॥ ह्मणोनि नाथासीं ज्योतिर्लिंग ह्मणती ॥ ३३ ॥ जो चतुर्दश भुवनाचानाथ ॥ तोचि रत्नागि
रीवरी अनाथनाथ ॥ ह्मणोनि पूज्य होय प्रियनवनाथ ॥ त्रिभुवनीं हा बळसमर्थ नांदतसे ॥ ३४ ॥ जमदग्नि खा
ग्नीचे ज्वाळें ॥ अर्थें सेविलें पौगंडऋषीच्या बाळें ॥ ह्मणोनि खळनाथ नाम खाग्नि कल्होळें ॥ भक्तांसी भासे दी

नदयाळपणें ॥ ३५ ॥ सविसाव्यात सीमाउल्लंघन ॥ यमघंटाचें झालें हनन ॥ अष्टतीर्थें अगस्तीनें करून ॥
लोपामुद्रेसीं कथा विस्तारिली ॥ ३६ ॥ अनाथाचा हाचि नाथ कैवारी ॥ ऐसी गर्जत निगम दुंदुभि अष्टादश
भैरवभारीं ॥ ह्मणोनि जमदग्नि खावतारीं ॥ पूर्ण ब्रह्मचारि आश्रमीं खळेश्वर ॥ ३७ ॥ यास्तव सत्तावसांत यमाई
दर्शन ॥ घ्यावया नाथजातसे वेष्टित महाजन ॥ अठाविसांत भागीरथी आगमन ॥ सगरोत्पत्ति वसिष्ठें कथियेली ॥ ३८
एकुणतिसांत भगिरथ प्रयत्न कथियेला ॥ तिसांमाजी नाथ त्रिगुणीं दंपत्यें झाला ॥ वसिष्ठें अनंतव्रतार्थ सांगितला
॥ धनंजयातें श्रीकारक ॥ ३९ ॥ अच्युत वृषभ धेनु पुष्कर्णी ॥ यांची कथिली जन्म काहणी ॥ हे श्रीकारक पर
म शिराणी ॥ एकतिसाध्यायीं कथिली असे ॥ ४० ॥ बत्तिसाध्यायीं गजेंद्रोद्धार ॥ अनंत भक्त तारी हिमकेदार
॥ तेत्तीसाध्यायीं हरिजन परिवार ॥ सेनान्हावी दावी दर्पण ॥ ४१ ॥ तेत्तीसांत गोमा सांवता अजन्मजनन ॥
चौतिसांत भक्ति भावार्थाचें शुभ लक्षण ॥ नावजीचा सर्व श्रमहरोन ॥ केला संपत्तिसमुद्र किवळनगरीं ॥ ४२ ॥
॥ रत्नासुराचा पौत्र निशिगंध सुमनाकृती ॥ झालानाथचरणरजप्राप्ती ॥ पस्तिसाध्यायीं सर्व कथारसोत्पत्ती ॥
युग्म गीताष्टकीं वर्णिलें श्रीकेदारासीं ॥ ४३ ॥ गुरुमंडळरूप स्तोमा कारणा ॥ तिथी मंडळ विजयदशम्याश्च
कार्याकारणा ॥ केदारविजयार्क उदय धनिष्ठा नक्षत्र गणना ॥ पठण श्रवणार्थीयां श्रीकारक ॥ ४४ ॥ चूर्णिका ॥
राजिवलोचन ह्या राज्यीं तो ह्या विराजित रत्नागिरीं ॥ राजी परम भूधराजीवरी तक्षराजी धरी निकराजी ॥ राजी
करी करीं विराजित धरी करी वीरां जीर्ण समरीं ॥ राज्यीं बसवी अप्साराजीस वर्णितीस्वराज्यीं असो करवीरीं ॥
॥ १ ॥ वाजी वाहन दिव्य वाजीवरी नवा जीन घालोनि करें ॥ वाजी न करी भैरवाजीसह गणन वाजीस घे-

ऊन करें ॥ वारिज नेत्राब्ज स्वारीस निघे मंदवारीं स्वभारें ॥ वारीत संकट निवारित दुर्घट अर्कवारीं बुधमानवें
॥ २ ॥ जमदाग्नी करोनि जमदृग्नि परम श्रम स्वाग्नीसी टाकितकरें ॥ त्या मदाग्नीसी घे भैरवाग्नि मी केदार खड्गा
ग्नि उसळोनि असुरें ॥ जाळी समरीं बाणजाळीं भाळींक्षतांत्र रुधिरें ॥ काळिया असुर शक्तिहस्तें खर विध्वंसोनि
टाकित निकरें ॥ ३ ॥ भंगार जांबूनद शृंगार वर्णीं बुध अंगार पर्णप्रती ॥ अंगारकामय ऊंगास धरी उरग जं-
घातळीं लक्षिती ॥ भुजंगावरी स्वारी तुरंगावरी नाथ लंकार दक्षिणपती ॥ अंगावरी दिव्य लिंगाक्षसे त्या विहंगा
री हराकृती ॥४॥ मंदारकीश्वेत मंदारहाराय गंधारसांत प्रिया ॥ छंदाकरीचंड नंदाग्रहीं गोप वृंदास गोरस प्रियाया ॥
अंधार षण्मास वृंदावनी नाथ वंदावया गोपस्त्रिया ॥ मंदारमणी गजरमंदार साकारी आनंदा हरिहरखिया ॥ ५ ॥
चंद्रार्क बिंबाय आब्रह्म स्तंभाय निर्गुण स्वरूपाय ज्योतिस्वरूपा ॥ अकल्पायु दीर्घायु पूर्ण संकल्पायु भक्तमन त-
ल्पायु दक्षिणदीपा ॥ आम्लान मालाय अपाद वनमालाय शशी वाहन कुमरी भाय मिंदुतिलका ॥ कालाग्नि रुद्रा
य भक्तचित्तमुद्राय वेद मौन्य मुद्राय जगज्जनका ॥ ६ ॥ अष्टगंधा क्षताय बिल्वगंधाक्षताय गंधार्चनीं अपेक्षाय
अलक्षलक्षा ॥ रक्तभोजा सिक्षाय गोभूसुर पक्षाय घृतस्वरूपगुरुदिक्षाय पौगंडऋषिसुतनु वीरदक्षा ॥ सहस्रबाहु
सहस्राक्षाय जनाजनसमक्षाय विज्ञान अपरोक्षाय अचळसुखदा ॥ पौगंडऋषि दिग्गज शुशु प्रचंडाय दुरितदल
खंडाय रत्नासुर भुजदंडाय पशुमुंडवरदा ॥ ७ ॥ करवीरकांडाय केदारखंडाय अर्धांशचंडाय पूर्ण भरिता ॥ ब्रह्मां-
डांडाय दीप्सित खंडाय नाथरणपंडिताय यथार्थ विचरिता ॥ गीताष्टक रंडाय अर्थउदय चंडाय पौगंडऋषि रेव-
ती सपिंडाय रवळनाथ शुभदा ॥ केदारविजयार्क कंडाय संशयविखंडाय दुरित पाषांड दंडाय हरिनामवरदा ॥ ८

॥ ॥ श्लोक ॥ ॥ यद्गीताष्टक पठते पठयते खळेशयद्राजकं ॥ श्रीकेदार सहस्रनाम मधिकं अर्थान्वयं भाषितं ॥ तत्सर्वात्म निवेदनं हरिहरं ब्रह्मार्पणं भावयं ॥ कृत्वामेक मनोभिस्ताक्षणी विभो तस्मैजगन्मोहनं ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ इतिकेदारविजयांतील सार ॥ पस्तिसाध्याय रहस्यफार ॥ काढिलें तें हरिनामामृत तुषार ॥ सेवितां संतापसारे हरती ॥ ४५ ॥ ऐसिया चौसष्ठ श्लोकाष्टकेसी चोपन्नओंवी ॥ पस्तीसावर्णी बीजाक्षरें गोंवी ॥ श्रीखळनाथ हाचि मंत्रान्वयी ॥ संपूर्ण झाला गुरुकृपे ॥ ४६ ॥ हे श्रीकेदारसार पठण ॥ करितां प्राप्तहोय जयकल्याण ॥ रविवारीं करोनि प्रातःस्नान ॥ शतावर्तनें कार्य सिद्धीहोय ॥ ४७ ॥ धनार्थीयानें तीन मंडळ ॥ पठण करावे मन निर्मळ ॥ षण्मास जपतां विषमकाळ ॥ खंडोनि जयकल्याण पाविजे ॥ ४८ ॥ श्रीखळनाथाच्या पस्तिसाध्यायीं मंत्रावळी ॥ ह्याची बीजाक्षर ओळी ॥ सज्जनीं जपतां हृदय कमळीं ॥ त्रिकाळीं जपतां जयश्रीलाभे ॥ ४९ ॥ एकचित्तें शुचि अंतरीं ॥ चिंतितां दक्षिण केदारी ॥ दारा धनसुत त्याचे घरीं ॥ हरिनाम ध्वज उभारी अक्षयीं ॥ ५० ॥ इतिश्रीकेदार विजयसारे ॥ भविष्योत्तर केदारखंड विरचितायां ॥ षट् त्रिंशतितमोध्यायः ॥ ३६ ॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ओंवी संख्या ६११० ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥ श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ आरती केदाराची ॥

जय देव जय देव जयजी केदारा ॥ दारासंकटवारा भवभयअपहारा ॥ ध्रु० ॥ गंगाउगमशीतळहिमपर्वत वासी ॥ नलगतपळ दुर्जनखळ संहारी त्यांसी ॥ तो हा हिमकेदार करवीरापाशीं ॥ रत्नागिरिवरि शोभे कैवल्यराशी ॥ जय० ॥ १ ॥ उत्तरेचा देव दक्षिणे आला ॥ दक्षिणकेदार हें नाम पावला ॥ रत्नासुर मर्दुनी भक्तां पावला ॥ दास ह्मणे थोरादेवें धांवला ॥ जय० ॥ २ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ आरती महालक्ष्मीची ॥

आद्यस्थान तुझें करविरपुर माते ॥ प्रसन्नवदनें वससी माये मनरमते ॥ सुरवर किन्नर पूजिति ध्याती स्थिरचित्तें ॥ महिमा न कळे तुझी गाती भावार्थें ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ॥ आरती करितां तूं हरिसी अवलक्ष्मी ॥ ध्रु० ॥ दक्षिणभागीं तुझ्या कालीचें स्थान ॥ सरस्वतीचें सव्यभागीं तें ठाण ॥ तुझ्या सन्मुख माते शोभे गजवदन ॥ काशीतुल्य महिमा गाती मुनिजन ॥ जय० ॥ २ ॥ महिषासुरनिर्दळण प्रथम केलेंसी ॥ शुंभ रक्तबीज तेही वधिलेसी ॥ सर्वहि असुरां मर्दुनि स्वस्थ जाहलीसी ॥ सुराधिकारीं इंद्रा त्वां स्थापिलेंसी ॥ जय० ॥ ३ ॥ भजन करितां तुझें मुक्ती पैं देसी ॥ इहलोकीं सुखभोग भक्तां ओपीसी ॥ जनार्दन वदला परमभावेंसीं ॥ वरदहस्त माथां ठेवीं भक्तांसी ॥ जय देवी जय देवी० ॥ ४ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ देवीचें पद ॥

राग, हमीर (ऋषीच्या तपा विघ्नकेलें या चालीवर)

झडकरि पाव जगज्जननी ॥ कोल्हासुर मर्दुनी करविरीं वससी सुखसदनीं ॥ झड० ॥ ध्रु० ॥ उजवेकडे महा काली ॥ वामीं सरस्वती ठेली ॥ गजानन मूर्ति पुढें बसली ॥ सकल सुरपागिरिजावल्लभ तो धरिशि शिरस्थानीं ॥ झडक० ॥ १ ॥ मनकर्णिका काशि दत्त ॥ मुक्ति मंटप लखलखित ॥ रामअहिशियन रमाकांत ॥ राधाकृष्ण शनैश्वर मारुति राहाति सुवेष्टुनी ॥ झडक० ॥ २ ॥ पंचगंगा झळके नामी ॥ समावित नारायणस्वामी ॥ गरुड मंटप किती वर्णु मी ॥ दक्षिण काशी ह्मणोत परि मज अधिक दिसे तुळनीं ॥ झडक० ॥ ३ ॥ मनोरम रूप तुझें माते ॥ गदा खेटक फल पात्रातें ॥ धरोनि उभी चार हातें ॥ बलवद्दास मनोरथ पुरणि असिस कास कसुनि ॥ झ० ॥ ३ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

॥ अथ श्रीद्वादश-ज्योतिर्लिंग-स्तोत्र प्रारभ्यते ॥

श्रीगणेशाय नमः ॥ सौराष्ट्रदेशे विशदेऽतिरम्ये ज्योतिर्मयं चंद्रकलावतंसम् ॥ भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥ श्रीशैलसंगे विबुधातिसंगे तुलाद्रितुंगेऽपि मुदा वसंतम् ॥ तमर्जुनं मल्लिकपूर्वमेकं नमामि संसारसमुद्रसेतुम् ॥ २ ॥ अवंतिकायां विहितावतारं मुक्तिप्रदानायच सज्जनानाम्

हा ग्रंथ बेळगांव येथें आबाजी रामचंद्र सावंत यांणीं आपल्या श्रीरामतत्व प्रकाश छापखान्यांत छा० प्र० केला शके १८१६. सन १८९४ इसवी.

या ग्रंथाची लेखी प्रत आमचे परम मित्र रा० रा० सटवाप्पा सपले बेळगांव यांणीं आह्मांस दिली व सदरहू पुस्तक छापण्यास उत्तेजन देऊन त्या बद्दल कांहीं द्रव्यद्वाराही मदत केली, याजबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों. तसेंच रा० रा० चिंतोपंत नरवणे माजी हेड्मास्तर मराठी शाळा, यांणीं हा ग्रंथ तपासण्याचे कामीं बरेच श्रम घेतले याजबद्दल त्यांचेही आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

॥ श्री रामतत्व-प्रकाश छापखाना बेळगांव ॥

विक्रीस तयार.	कि०
श्रीकथाकल्पतरु ग्रंथ१४स्तवक	२०
भावार्थरामायण	१२
एकनाथीभागवत	६॥
एकनाथीभागवत	५
एकनाथीभागवत	३॥
भक्तमालाग्रंथ	६
काशीखंड	४॥
काशीखंड	३॥
पांडवप्रताप	४
पांडवप्रताप	३
पांडवप्रताप	२॥
रामविजयभरपूर टीपा	४
रामविजय	३
रामविजय	२
रामविजय	१॥
हरिविजय	३
हरिविजय	२
हरिविजय	१॥
जैमिनीअश्वमेघ	४
जैमिनीअश्वमेघ	३॥
जैमिनीअश्वमेघ बुक	२
वेदेश्वरी	६
ज्ञानेश्वरीपरिभाषासह	६॥
ज्ञानेश्वरी टीपासह	४॥
ज्ञानेश्वरीगुटका	२
दासबोध	३॥
दासबोध	१॥।
दासबोध	१।
गुरुचरित्र	२
गुरुचरित्र गुटका	१॥।
गुरुचरित्र	८१४
नवनाथभक्तिसार	४
नवनाथभक्तिसार	२॥
संतलीलामृत	२
संतलीलामृत	१।
नाथलीलामृत	२
भक्तविजय	३॥
भक्तविजय	२॥
भक्तविजय	२
केदारविजय	४
कथासारामृत	३
गणेशप्रताप	४
एकादशीमहात्म्य	३
देवीमहात्म्य	१॥
गणेशलीलामृत	८१२
लघुयोगवासिष्ठ	१॥
ज्ञानमोदक	१।
सदाचार	१।
विवेकसिंधु	१।
भागवत सारामृत	५
अधिकमहात्म्य	१।
कार्तिकमहात्म्य	१
कल्किविजय	२
व्यंकटेशविजय	१।
मूलस्तंभ मोठा	१॥
दीपरत्नाकर	२॥
गरुडपुराण	१
नासिकेतआख्यान	१
आगमनिगम	८८

	कि०		कि०		कि०		कि०
निगमसार	१	तुकारामचरित्र	१॥	ज्ञानोबाची गाथा	३	रामदाससर्वसंग्रह	२॥
रामाश्वमेध	३	रुक्मिणीस्वयंवर	ऽ८	निळोबाची गाथा	२	पदसंग्रह	ऽ८
रामाश्वमेध	१॥।	कृष्णलीलामृत	ऽ८	एकनाथाचीगाथा	४	शनीमहात्म्य लालकाना	ऽ४
सर्वसंग्रह	१	मल्हारीमहात्म्य	ऽ१२	आरत्यासंग्रह	ऽ१२	शनीमहात्म्य	ऽ३
उपयुक्तकथासंग्रह भा.१।२प्र०	१॥।	ज्ञानेश्वरविजय	१	कीर्तनतरंगिणी भाग १ ला	ऽ१४	शनीमहात्म्य	ऽ२
रामदास भाग १ ला	ऽ१२	पांडुरंगमहात्म्य	ऽ४	„ भाग २ रा	१ऽ२	शनीमहात्म्य	ऽ॥
रामदास भाग २ रा	ऽ१२	मार्कंडेयपुराणसार	४	„ भाग ३ रा	१	पंचदशीप्राकृत टीका	३॥
शिवलीलामृत लालकाना	१।	भक्तलीलामृत	५	„ भाग ४ था	ऽ१४	ललितसंग्रह सर्वभाग	१
शिवलीलामृत	१	तुळसीमहात्म्य	ऽ८	दत्तस्तवराज	ऽ८	आर्यासंग्रह	१ऽ५
शिवलीलामृत	ऽ१२	तुकारामाची गाथा	४॥	रामदास चरित्र	१॥	एकनाथभारुड	ऽ१२
शिवलीलामृत रेशमी गुटिका.	ऽ८	तुकारामाची गाथा	४	गीताजीवनमुक्ती	२॥	सिद्धांतबोध	६
शिवलीलामृत „ „	ऽ७	तुकारामाची गाथा	३	योगसंग्राम	१॥	गीताभाषाविवृत्ति	४

हीं व इतर सर्व जातीचीं पुस्तकें आमच्या छापखान्यांत विकत मिळतात. किंमती शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

आबाजी रामचंद्र सावंत.

श्रीरामतत्व प्रकाश छापखान्याचे मालक, बेळगांव. इलाखा मुंबई.

॥ इति श्रीमाहात्म्यकेदारविलास ग्रंथ समाप्तः ॥